# पर्यटनमहाराष्ट्राचे













अविनाशपुरात

# सारांश

वेळोवेळी पर्यटन स्थळांची माहिती देणारी वर्तमानपत्रांमधील कात्रणे गोळा करून ठेवण्याच्या छंदामधून महाराष्ट्रातील भेट देण्यायोग्य स्थळांची संकलित केलेली माहिती या पुस्तकात दिली आहे. प्रत्येकाची स्थळांची आवड वेगवेगळी असते, जसे कि कोणाला ट्रेकिंगची आवड असेल तर दुसऱ्या कोणाला मंदिरांना भेटी देणे आवडते. प्रेक्षणीय स्थळांचीअशी वैशिष्ट्ये एका टेबलमध्ये दिलीआहेत.आपल्या आवडीची वैशिष्ट्ये कुठे आहेतते पाहून त्याप्रमाणे सहल योजता येईल. जेथे आपण मुक्कामाला जाणार त्याच्या जवळपासच्या सर्व प्रेक्षणीय स्थळांची माहिती – स्थळाचे लोकेशन, मुक्कामापासुनचे तसेच दुसऱ्या स्थळापासूनचे अंतर आणि कात्रणात आलेली स्थळाची माहिती हे सर्व पुस्तकात मिळेल.वर्तमानपत्रात आलेल्या माहितीवर पुस्तक अवलंबून असल्यामुळे महाराष्ट्रातली सर्व स्थळे यात आली नाहीत तरीसुध्दा २९१ स्थळांची माहिती असल्याने आपण अजिबात न ऐकलेल्या स्थळांची माहिती यात मिळेल.

# मनोगत

वर्तमानपत्रातील वेगवेगळ्या स्थळांची माहिती असलेली कात्रणे काढून ठेवण्याचा मला छंद होता. सुमारे ३५० कात्रणे फक्त महाराष्ट्रातील स्थळांची जमा झाली होती. लॉकडाऊनच्या काळात वेळेचा सदुपयोग करावा म्हणून या सर्व स्थळांची जिल्ह्याप्रमाणे विभागणी करून माहिती संकलित केली. प्रत्येक वाचकाला त्याच्या आवडीप्रमाणे सहलीची योजना करणे सोयीचे जावे अशा प्रकारे माहिती दिली आहे. ज्यावेळी घरातून बाहेर पडणेसुध्दा कठीण अशावेळी सहलीकरीता प्रेक्षणीय स्थळांची माहिती देणे सुज्ञपणाचे नाही, परंतु हि परिस्थिती तात्पुरती आहे तर वेगवेगळी ठिकाणे, तेथल्या सहली आणि त्यामध्ये घेतलेला आनंद ह्या गोष्टी कायमस्वरुपी आहेत म्हणून आज ना उद्या याचा जरूर उपयोग होईल असा विश्र्वास वाटतो. महाराष्ट्रातील एकूण २९१ स्थळांची माहिती यामधून गोळा झाली आहे आणि मी ती आपल्यापुढे सादर करीत आहे. या स्थळांमध्ये सर्वच स्थळांची माहिती आहे असे नाही तर ज्या स्थळांची कात्रणे उपलब्ध होती त्यांचीच माहिती दिली आहे. त्यामुळे सर्वांना परिचीत अशा सिंहगड, शिवनेरी या स्थळांची माहिती नाही याचे आश्र्चर्य वाटू नये.

स्थळांची माहिती पुढे लिहीलेल्या पध्दतीने दिली आहे :


- सर्व स्थळांची जिल्ह्यानुसार विभागणी केली आहे. जिल्ह्यामधील एखाद्या सोयीस्कर शहरापासून जवळपासच्या भेट देण्याच्या स्थळांची माहिती दिली आहे.
- सुरुवातीला दिलेल्या टेबलमध्ये मुंबईपासून मध्यवर्ती शहराचे अंतर दिले आहे. नंतर ज्या ज्या टिकाणी भेट द्यायची त्या प्रत्येक ठिकाणाचे नांव, वैशिष्ट्य (किल्ला, मंदिर इ.), शहरापासून अंतर आणि पुर्वीच्या ठिकाणापासूनचे (म्हणजे पहिल्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणाचे, दुसऱ्या ठिकाणापासून तिसऱ्या ठिकाणाचे) अंतर दिले आहे.
- सहलीमधल्या सर्व स्थळाचा नकाशा जोडला आहे म्हणजे कसे कसे आणि किती अंतर फिरायचे आहे त्याचा अंदाज येईल.

- वर्तमानपत्रामध्ये एखाद्या ठिकाणी विशीष्ट शहरापासून जाण्याचे सुचविले असेल तरी दुसऱ्या शहरापासून ते ठिकाण जवळ असेल तर किंवा त्या शहरावरून एकच स्थळ पाहायला जायचे असेल तर दुसऱ्या शहरापासून जाण्याच्या स्थळांमध्ये त्या ठिकाणाचा समावेश केला आहे.
- वर्तमानपत्रातील कात्रणे काही वर्षापूर्वीची असल्यामुळे रिक्षा, टॅक्सी, हॉटेल्स यांच्या माहितीमध्ये बदल झालेला असेल.
- वर्तमानपत्रातील कात्रणांचे फोटो स्कॅन करून त्याचे प्रिंट आऊट यामध्ये घातले आहेत. लेखाचा आकार व पेपरमध्ये असलेली जागा यांचा मेळ घालताना अक्षरांचा आकार एकसारखा न राहता कमीजास्त झाला आहे त्याबद्दल क्षमस्व.
- सर्व ठिकाणांची एकत्रित माहिती एक्सेल शिटमध्ये दिली आहे. ठिकाणांच्या वैशिष्टांच्या कॉलमवर फिल्टर असून एखाद्या कॉलमला फिल्टरच्या बटणावर क्लिक केल्यास ते वैशिष्ट असलेल्या सर्व ठिकाणांची यादी मिळेल. एक्सेल शीट बघण्यासाठी पुढील लिंक क्लिक करा - http://bit.ly/AGPurat.
  एक्सेल शीट पाहाण्यासाठी लिंकवर क्लिक केल्यावर गुगल शीटओपन होईल. त्यात असलेल्या डाऊनलोड बटनावर क्लिक केल्यानंतर एक्सेल शीट पाहता येईल. या यादीमध्ये जिल्हा, मुक्कामाचे ठिकाण आणि पर्यटन स्थळे दिलेली आहेत. कोणत्या पानावर स्थळाची माहिती आहे तो पान क्रमांक दिला आहे. प्रत्येक स्थळाची वैशिष्ट्ये पुढील कॉलममध्ये नमूद केली आहेत. आपल्याला जे पाहाण्याची आवड आहे त्या वैशिष्ट्यांच्या ड्रॉप डाऊन लिस्टवर क्लिक करून व त्यातील (Blanks) पर्याय काढून टाकल्यावर ते वैशिष्ट्य असलेल्या सर्व स्थळांची यादी मिळते. वैशिष्ट्यांची यादी मोठी असल्याने कॉलमची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने शेवटचे ४ कॉलम 'काय पाहाल' असे ठेवून त्यामध्ये एकापेक्षा जास्त वैशिष्ट्ये घातली आहेत.
- समजा, एखाद्याला ट्रेकला जायचे असेल तर 'ट्रेक' कॉलमवर क्लिक केल्यास ट्रेक असलेल्या सर्व स्थळांची यादी मिळेल. त्यापैकी कोणत्या ठिकाणी जायचे ते ठरवल्यावर त्या मुक्कामावरून आणखी कोणती स्थळे पाहाता येतील ती माहिती मिळेल आणि सहलीचे आयोजन करता येईल. अनुक्रमणिकेत ज्या मुक्कामाला जायचे आहे त्या मुक्कामाच्या पान क्रमांकावर क्लिक केल्यास त्या मुक्कामाची माहिती असलेले पान उघडेल. उदा. तुम्हाला शहापूरची माहिती हवी असेल तर अनुक्रमणिकेत पान क्र.44 वर क्लिक केल्यास शहापूरचे पान समोर येई ल. दुसऱ्या एखाद्या ठिकाणाची माहिती हवीअसेल तर तुम्ही जे पान पाहात आहात


त्या पानाच्या शेवटी असलेल्या'अनु' या शब्दावर क्लिक करावे. अनुक्रमणिकेचे पान उघडेल आणि तुम्हाला पाहिजे त्या ठिकाणाच्या पान क्र. वर पुर्वीप्रमाणे क्लिक करावे. या मनोगताच्या शेवटी दोन स्क्रिनशॉट उदाहरण म्हणून दाखवले आहेत.

- आपल्या यादीमधील 'मुरुड' या नांवाची दोन ठिकाणे अस्तित्वात आहेत. एक स्थळ रायगड जिल्ह्यात तर दुसरे रत्नागिरी जिल्ह्यात आहे व दोन्ही पर्यटनस्थळे आहेत. नांवाचा गोंधळ होऊ नये म्हणून रायगड जिल्ह्यातील मुरुडला 'मुरुड बीच' असे संबोधले आहे. दोन्ही मुरुडचे नकाशे मुरुड मुक्कामाच्या माहितीमध्ये दाखवले आहेत.

हा प्रॉजेक्ट पूर्ण करण्याकरीता माझा मित्र मोहन नेरुरकर याची मला खूपच मदत झाली. स्वतःचे काम असावे अशाप्रकारे त्याने हे पुस्तकपूर्ण करण्याकरीता मेहनत घेतली. मैत्रीमध्ये Thank you आणि sorry नसते फक्त एवढ्याचकरीता मी त्याचे आभार मानत नाही.




| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |
| 2 | | जिल्हा | मुक्काम | | स्थळ | पान क्र | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 3 | | | | | | | | | | | |
| 4 | 1 | पालघर | पालघर | 1 | काळदुर्ग | 2 | | किल्ला | | | |
| 5 | 2 | पालघर | पालघर | 2 | शिरगाव | 5 | | किल्ला | | | |
| 6 | 3 | पालघर | पालघर | 3 | माहिमचा किल्ला | 7 | | किल्ला | | | |
| 7 | 4 | पालघर | पालघर | 4 | केळवा किल्ला | 8 | | किल्ला | | | |
| 8 | 5 | पालघर | पालघर | 5 | केळवा बीच | 8 | | | | | |
| 9 | 6 | पालघर | पालघर | 6 | दंडा किल्ला | 9 | | किल्ला | | | |
| 10 | 7 | पालघर | पालघर | 7 | भवानगड | 10 | | किल्ला | | | |
| 11 | 8 | पालघर | पालघर | 8 | तांदूळवाडी | 12 | | किल्ला | ट्रेक | | |
| 12 | 9 | पालघर | पालघर | 9 | टकमक गड | 13 | | किल्ला | ट्रेक | | |
| 13 | 10 | पालघर | जव्हार | 1 | दादर कोपऱ्याचा धबधबा | 17 | | | | धबधबा | |
| 14 | 11 | पालघर | जव्हार | 2 | हिरडपाडा धबधबा | 17 | | | | धबधबा | |
| 15 | 12 | पालघर | जव्हार | 3 | दाभोसा धबधबा | 17 | | | | धबधबा | |
| 16 | 13 | पालघर | जव्हार | 4 | दाभोसा | 18 | | | | धबधबा | |
| 17 | 14 | पालघर | जव्हार | 5 | जव्हार | 20 | | | | धबधबा | निसर्ग |
| 18 | 15 | पालघर | जव्हार | 6 | जव्हार धरण | 24 | | | | | निसर्ग |
| 19 | 16 | पालघर | जव्हार | 7 | जव्हार किल्ला | 25 | | किल्ला | | | निसर्ग |
| 20 | 17 | पालघर | जव्हार | 8 | पळूचा धबधबा | 28 | | | | धबधबा | |
| 21 | 18 | पालघर | जव्हार | 9 | विक्रमगड | 28 | | | ट्रेक | | निसर्ग |
| 22 | 19 | पालघर | जव्हार | 10 | भूपतगड | 30 | | किल्ला | | | |




| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |
| 2 | | जिल्हा | मुक्काम | | स्थळ | पान क्र | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 11 | 8 | पालघर | पालघर | 8 | तांदूळवाडी | 12 | | किल्ला | ट्रेक | | |
| 12 | 9 | पालघर | पालघर | 9 | टकमक गड | 13 | | किल्ला | ट्रेक | | |
| 21 | 18 | पालघर | जव्हार | 9 | विक्रमगड | 28 | | | ट्रेक | | |
| 32 | 29 | ठाणे | शहापूर | 3 | आजोबा पर्वत | 52 | | | ट्रेक | | |
| 33 | 30 | ठाणे | मुरबाड | 1 | गोरखगड | 59 | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 34 | 31 | ठाणे | मुरबाड | 2 | सिध्दगड किल्ला | 67 | | किल्ला | ट्रेक | | |
| 36 | 33 | ठाणे | माळशेज | 1 | हरिश्चंद्रगड | 70 | | किल्ला | ट्रेक | | |
| 38 | 35 | ठाणे | माळशेज | 3 | माळशेज घाट धबधबा | 74 | | | ट्रेक | | |
| 39 | 36 | ठाणे | माळशेज | 4 | निमगिरी | 82 | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 40 | 37 | रायगड | पनवेल | 1 | कलावंतीण दुर्ग | 84 | | किल्ला | ट्रेक | | |
| 41 | 38 | रायगड | पनवेल | 2 | प्रबळगड | 85 | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 42 | 39 | रायगड | पनवेल | 3 | कर्नाळा | 89 | | किल्ला | ट्रेक | | |
| 47 | 44 | रायगड | खोपोली | 1 | सोंडाई दुर्ग | 101 | | किल्ला | ट्रेक | | |
| 48 | 45 | रायगड | खोपोली | 2 | ईर्शाळगड | 104 | | किल्ला | ट्रेक | | |
| 54 | 51 | रायगड | खोपोली | 8 | मृगगड | 112 | | किल्ला | ट्रेक | | निसर्ग |
| 75 | 72 | रायगड | नागोठणे | 3 | सुधागड | 158 | मंदिर | किल्ला | ट्रेक | | |
| 76 | 73 | रायगड | नागोठणे | 4 | अवचितगड | 164 | | किल्ला | ट्रेक | | |
| 85 | 82 | रायगड | कोलाड | 9 | विश्रामगड (कुर्डुगड) | 178 | | किल्ला | ट्रेक | | |

# अनुक्रमणिका


## पालघर जिल्हा

| अनुक्रम | मुक्कामाचे ठिकाण | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | पालघर | 2 |
| 2 | जव्हार | 16 |
| 3 | डहाणू | 33 |

## ठाणे जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 4 | शहापूर | 44 |
| 5 | मुरबाड | 59 |
| 6 | माळशेज | 69 |

## रायगड जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 7 | पनवेल | 84 |
| 8 | उरण | 98 |
| 9 | खोपोली | 101 |
| 10 | अलिबाग | 119 |
| 11 | नागोठणे | 156 |
| 12 | कोलाड | 165 |
| 13 | मुरुड | 180 |
| 14 | महाड | 193 |
| 15 | श्रीवर्धन | 205 |

## रत्नागिरी जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 16 | खेड | 216 |
| 17 | दापोली | 220 |
| 18 | चिपळूण | 247 |
| 19 | गुहागर | 251 |
| 20 | देवरुख | 268 |
| 21 | रत्नागिरी | 274 |
| 22 | राजापूर | 284 |

## सिंधुदुर्ग जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 23 | देवगड | 292 |
| 24 | कणकवली | 297 |
| 25 | मालवण | 301 |
| 26 | सावंतवाडी | 315 |
| 27 | वेंगुर्ला | 323 |

## पुणे जिल्हा

| अनुक्रम | मुक्कामाचे ठिकाण | पान क्र. |
|---|---|---|
| 28 | लोणावळा | 331 |
| 29 | पुणे | 365 |
| 30 | जुन्नर | 376 |
| 31 | भोर | 410 |

## सातारा जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 32 | वाई | 423 |
| 33 | महाबळेश्वर | 432 |
| 34 | सातारा | 445 |
| 35 | कोयनानगर | 470 |

## कोल्हापुर जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 36 | कोल्हापुर | 485 |

## सोलापूर जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 37 | सोलापूर | 517 |

## नाशिक जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 38 | ईगतपुरी | 529 |
| 39 | नाशिक | 538 |

## अहमदनगर जिल्हा

| | | |
|---|---|---|
| 40 | भंडारदरा | 563 |
| 41 | शिरुर | 584 |

## जळगांव जिल्हा


| | | |
|---|---|---|
| 42 | जळगांव | 591 |

## विदर्भ - मराठवाडा

| | | |
|---|---|---|
| 43 | औरंगाबाद | 595 |
| 44 | जालना | 623 |
| 45 | परभणी | 625 |
| 46 | नांदेड | 630 |
| 47 | अमरावती | 636 |
| 48 | नागपूर | 644 |
| 49 | चंद्रपूर | 647 |
| 50 | गोंदिया | 656 |

# पालघर जिल्हा
## पालघर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | | | | | |
| | मुंबई ते पालघर | | | | | 109 | | | | |
| 1 | काळदुर्ग | | किल्ला | ट्रेक | | 8 | E | | | < \| |
| 2 | शिरगाव/शिरगावचा किल्ला | समुद्रकिनारा | किल्ला | | | 6.5 | W | 12.5 | W | \| |
| 3 | माहिमचा किल्ला | | किल्ला | | | 8.5 | SW | 7 | S | \| |
| 4 | केळवा किल्ला | | किल्ला | | | 13 | SW | 5 | S | \| |
| 5 | केळवा बीच | समुद्रकिनारा | | | | 13 | SW | 0.5 | S | \| |
| 6 | दंडा किल्ला / भवानगड | | किल्ला | | | 14 | SW | 3 | SE | \| |
| 7 | भवानगड | | किल्ला | | | 16 | SW | 1.5 | SE | \| |
| 8 | तांदूळवाडी | | किल्ला | ट्रेक | निसर्ग | 20 | SE | 19 | NE | 12SE |
| 9 | टकमक गड | | किल्ला | ट्रेक | | 48 | SE | 27 | SE | |




## वनातील काळदुर्ग



अनु.

झिम्माड पाऊस अनुभवायचा असेल तर श्रावण महिन्यासारखा दुसरा उत्तम काळ नाही. श्रावण महिन्यात साऱ्या चराचराला नुसता बहार आलेला असतो. अशा वेळी आमच्या सारख्या निसर्गवेड्या माणसांना या काँक्रीटच्या जंगलात थांबणं कठीण होतं आणि आमची पावलं आपसूकच निसर्गाकडे ओढली जातात.

पावसाळी रविवार म्हटलं की पावसात भिजायला बाहेर पडलेली बेधुंद तरुणाई, एखादं धबधब्याचं ठिकाण, त्या ठिकाणी भिजण्यासाठी कुंभमेळ्याप्रमाणे जमलेले शेकडो पर्यटक... अशा वेळी पावसाची खरी मजा लुटता येत नाही. म्हणूनच आम्ही जरा हटकेच ठिकाण निवडले आणि आमचा मोर्चा काळदुर्गाकडे वळवला.

भटक्यांच्या यादीत दुय्यम स्थान असलेल्या काळदुर्गाला पोहोचण्यासाठी पहाटे विरारहून सुटणारी ६.२० ची शटल पकडायची आणि पालघरला उतरायचं. पालघर एस.टी. स्थानकातून मनोरकडे जाणारी एस.टी. बस पकडायची आणि वाघोबाच्या खिंडीत दाखल व्हायचं.

काळदुर्गाला जायला आम्ही थोडा आरामदायी मार्ग निवडला. मुंबई-अहमदाबाद महामार्ग असलेल्या मस्तान नाक्यावरून आमची कार मनोर-पालघर रस्त्यावर वळली आणि आतापर्यंत दडी मारून बसलेल्या पावसाने आमचं जोरदार स्वागत केलं. साधारण दहा किमी अंतर पार केल्यावर सुर्या नदीवरचा पूल ओलांडून वळणावळणाच्या घाट रस्त्यावरून आम्ही वाघोबाच्या खिंडीत पोहोचलो. पावसाने लावलेल्या हजेरीमुळे घाटात धबधब्याचं कोसळणं सुरू झालं होतं. तर वरच्या बाजूला ढगांचा पडदा बाजूला सारून काळदुर्ग आम्हाला खुणावत होता.

खिंडीत असलेल्या आदिवासींच्या वाघदेवामुळे या खिंडीला 'वाघोबाची खिंड' असं नाव पडलं आहे. पालघर-मनोर रस्त्यावरून जाणारे बरेच पर्यटक इथे देवदर्शनासाठी थांबतात पण हाकेच्या अंतरावर असलेला काळदुर्ग त्यांना माहीत नसतो.

पाऊस थांबला होता. आम्ही गाडीतून उतरलो. देवाला नमस्कार केला व देवळाच्या मागून चढणीच्या वाटेला लागलो. कारवीच्या दाट जंगलातून जाणारी वाट आपल्याला वर घेऊन जाते. इथून गडावर पोहोचायला साधारण दीडतास पुरेसा होतो.

खरं तर वाट चुकायची शक्यताच नाही. परंतु यंदा फुललेली कारवी न्याहाळण्यात, वाटेत दिसणारे वेगवेगळे किटक पाहण्यात, त्यांची छायाचित्रं काढण्यात आम्ही मुख्य रस्ता केव्हा सोडला ते कळलंच नाही.

वाटेत आलेली झाडंझुडपं बाजूला सारत, दमवणारा उभा चढ चढत आम्ही मुख्य रस्त्याला लागलो. समोरच कातळाचं पठारं दिसत होतं. स्थानिक लोक या पठाराला नंदीमाळ म्हणतात. इथून प्रथमच काळदुर्गाचं व्यवस्थित दर्शन घडलं.

इथून पुढे जंगलात शिरलेली वाट आपल्याला एका घळीत घेऊन जाते. बाजूला वाढलेल्या कारवीमुळे उतार जाणवत नाही. काळदुर्गाला वळसा घालून शेवटचा उभा टप्पा पार करून आम्ही माथ्यावर पोहोचलो आणि श्रावण खेळाला सुरुवात झाली. झिम्माड पाऊस आणि बेभान वारा यांची जणू जुगलबंदीच सुरू होती. संपूर्ण दरी ढगांनी भरलेली पाहून जणू स्वर्गातच पोहोचल्याचा भास होत होता.

माथ्यावर गडाच्या काहीच खुणा नाहीत. कातळात




अनु.

खोदलेली पाण्याची तीन टाकी मात्र आहेत. शेवटचा टप्पा चढण्याअगोदर एक शंकराची पिंड, मंदिराचे मोडके अवशेष व नंदी आहे.

गडाच्या माथ्यावरून चौफेर नजर टाकली असता उत्तर पूर्वेला असलेला कोहोजचा किल्ला, उत्तरेला असलेला अशेरीगडमधूनच वाहणारी सुर्या नदी, पुढे वैतरणा नदीशी झालेला तिचा संगम, जवळच उत्तरेला असलेला आसावा दुर्ग व त्याच्या पायथ्याशी असलेला देवकोपाचा तलाव. पश्चिमेला दिसणारी सातपाटी, केळदे माहिमची किनारपट्टी आणि पालघरचा परिसर नजरेच्या टप्प्यात येतो.

सभोवार पसरलेला हा नजारा, बेभान झालेला वारा मनाच्या कप्प्यात बंदिस्त करून आम्ही गड उतरू लागलो. तेव्हा मनाशी एक निश्चय केला, पुढच्या पावसाळ्यात पुन्हा एकदा काळदुर्गला यायचंच!







अनु.

# शिरगाव

***शांतनिवांत*** सागरतीर, किनाऱ्यावरच शतकानुशतकांचा इतिहास सांगणारा दुर्ग आणि हिरव्यागार परिसराच्या कोंदणात वसलेलं शिरगाव हे मुंबई-ठाणेकरांसाठी एक निसर्गरम्य ठिकाण आहे. ठाणे जिल्ह्यातल्या पालघर तालुक्याला शांतनिवांत सागरतीर लाभला आहे. शिरगावचा किल्ला हा किनारी दुर्ग प्रकारातला असून तो पालघरच्या पश्चिमेला आहे. पालघरपासून ७ ते ८ कि.मी. अंतरावर शिरगावचा किल्ला आहे. शिरगावचा किल्ला पहाण्यासाठी आपल्याला प्रथम पालघरला पोहोचणं आवश्यक आहे. पोर्तुगीजांनी बांधलेल्या शिरगावच्या किल्ल्यावर छत्रपती संभाजीराजांनी इतर किल्ल्यांबरोबर हल्ला चढवला होता. पण तो त्यावेळी ताब्यात घेता आला नाही. पुढे चिमाजी आप्पांनी उत्तर कोकणाच्या मोहीमेत शिरगावचा किल्ला ताब्यात घेतला. गावाच्या मधोमधच किल्ला आहे. पोर्तुगीजकालीन वैशिष्ट्यपूर्ण बांधणी आणि मनोऱ्यामुळे किल्ला प्रथमदर्शनातच आकर्षून घेतो. पहिला दरवाजा पुर्वाभिमुख असून त्याच्या बाजूने ओवऱ्या आहेत. प्रवेशव्दाराच्या पुढे दुसरा दरवाजा आहे. दरवाजावरील नक्षीकाम पाहण्यासारखं आहे. दोन्ही दरवाजांच्यामध्ये पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. दुसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर किल्ल्यामधील पडझड झालेल्या वास्तू दिसतात. किल्ल्याचा आकार फारसा मोठा नसल्याने गडफेरीला फार वेळ लागत नाही. तटबंदीवर जाण्यासाठी पायऱ्यांचा मार्ग आहे. या पायऱ्यांवरुन तटबंदीवर पोहोचल्यावर प्रवेशव्दाराच्या वर बांधलेल्या घुमटाकृती मनोऱ्यावर जाता येते. तटबंदीवरुन किल्ल्याला फेरी मारता येते. पूर्वेकडील आयताकृती मनोऱ्यावरुन शिरगावचं मनोवेधक दृष्य दिसतं. गडाचा आकार छोटा असल्याने बांधकामं आटोपशीर आणि कमी जागेत बसवलेली आढळून येतात. पश्चिमेकडील बुरुजावरुन अथांग सागराचे रमणीय दृश्य दिसते. या बाजुच्या तटबंदीमधे एक चोर दरवाजाही आहे. किल्ल्यामधे असलेल्या ताडवृक्ष आणि त्यांच्या फांद्या सुंदर दिसतात.



**कसं जाल?**

**मुंबई – अहमदाबाद महामार्गावरील मनोर येथून पालघरला रस्ता जातो. पालघर रेल्वे स्थानकही आहे. शटल- मेल, लोकलने पालघरला जाता येते. तिथून शिरगावला जाण्यासाठी एस.टीची सोय आहे. एस.टी. थांब्यापासून लगेच किल्ल्याजवळ पोहचू शकतो.**





अनु.

## शिरगावचा किल्ला

दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर निघून पालघरच्या दिशेने जायचं. पालघरमध्ये प्रवेश करण्यापूर्वी एक रस्ता शिरगावला जातो. तिथून शिरगाव किल्ल्याला भेट देता येते. शिरगावचा किल्ला अत्यंत सुंदर अशा ठिकाणी उभारण्यात आला आहे. तिथला समुद्र आणि किल्ल्यालगताचा परिसर प्रेक्षणीय आहे. हा किल्ला आजही मजबूत आणि सुस्थितीत आहे. हा किल्ला आतून तसंच बाहेरुन स्वच्छ ठेवण्यात आला आहे. किल्ल्याच्या आतील बाजूला एकमेव असणारं झाड आणि त्याला फुटलेल्या अनेक फांद्या हे या किल्ल्याचं केंद्रबिंदू आहे. पालघर तालुक्यातला सर्वात सुंदर किल्ला म्हणजे शिरगावचाच. हा किल्ला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचं बरचंसं श्रेय जाते ते इथल्या गावकऱ्यांनाच. शिरगावच्या किल्ल्यात तुमचे दोन तास सहज निघून जातात.






अनु.

# माहिमचा किल्ला

शिरगावहून आपला प्रवास सुरु होतो तो माहिमच्या दिशेने. शिरगाव ते माहिम हा प्रवास करताना आपल्याला कोकणात असल्याची जाणीव होते. अरुंद रस्ते, रस्त्याला लागून असलेली कौलारु घरं, अवती-भवती नारळाची झाडं हे सारं पहात आपण किल्ले माहिमला येऊन पोहोचतो. किल्ले माहिमच्या भोवतालचा परिसर खूप शांत आहे. हा किल्ला बाहेरुन पाहिला की वेंगुर्ला किल्ला आठवतो. माहिम किल्ल्याच्या आतल्या बाजूला बरीचशी पडझड झालेली आहे. आतल्या बाजूला असणारा जिना (दुहेरी) इतर कुठल्याही किल्ल्यावर दिसत नाही. किल्ल्याच्या तटबंदीवरुन बाहेरचा सुंदर परिसर पाहता येतो. फक्त अर्ध्या तासात हा किल्ला बाहेरुन आणि आतून फिरता येऊ शकतो. माहिमचा किल्ला पाहताना दुपार झाली असेल तर केळव्याच्या दिशेने निघता येतं.



## केळवा किल्ला

केळव्याला पोहोचल्यावर प्रथम शितलादेवीचं मंदिर लागतं. देवीचं दर्शन घेऊन दुपारचं जेवण घेऊन केळवे किनारपट्टीवरुन केळवे किल्ल्यात जाता येतं. किल्ल्याकडे जाणारा मार्ग नारळाच्या आणि सुरुच्या झाडांमधून जातो. किल्ल्यात कुठलेही अवशेष शिल्लक नाहीत. सुंदर ठिकाणी वसलेल्या या किल्ल्याची दुर्दशा झाली आहे. बऱ्याचशा पर्यटकांना या किल्ल्याविषयी माहिती नाही. तिथून पुढे आपला प्रवास सुरू होतो पाणबुरुजाच्या दिशेने. थोड्या अंतरावर आपल्याला एक गोलबुरुज लागतो. या बुरुजाला स्थानिक मंडळी किल्ला म्हणून संबोधतात. तिथूनच पाठीमागे अशाच प्रकारचा दुसरा बुरुज आहे. त्याच्यासमोर किल्ल्याचे अवशेष असणारी एक तटबंदी आहे. त्यालाही स्थानिक लोक किल्ला असंच म्हणतात. वास्तविक हे तिन्ही किल्ले पोर्तुगीजांनी उभारलेल्या १६ तटबंदीयुक्त जागेपैकी असावेत. तिथूनच थोडं पुढे गेलो की एक धक्का लागतो तो थेट पाणबुरुजाच्या किनारपट्टीवर संपतो. ओहोटीच्या वेळी या बुरुजावर जाणं शक्य होऊ शकतं. स्थानिक लोक या बुरुजास जंजिरा असं म्हणतात.

## केळवा बीच

पालघरपासून सर्वात जवळचा आणि अत्यंत सुंदर बीच म्हणजे केळवा बीच. लांबच लांब पसरलेल्या या सागरकिनाऱ्यावर ठिकठिकाणी काळे खडक दिसतात.सुरुचे बन, केळवा किल्ला आणि शीतला देवी मंदिर ही इथली वैशिष्ट्य. इथले ताजे मासेही प्रसिद्ध आहेत.

## दंडा किल्ला

दंडा खाडीत उभ्या असणाऱ्या या पाणबुरुजाच्या समोरच आता एक पूल बांधण्यात आलाय तो ओलांडल्यावर एक मोठं वडाचं झाड लागतं. त्याच्या बाजूलाच एक जुनी भिंत उभी दिसते. एखादं पडकं घर असावं अशा या वास्तूला 'दंडा किल्ला' म्हटलं जातं. पूर्वी इथे कचेरीचं कामकाज चालायचं म्हणून त्याला आता किल्लाऐवजी कचेरी म्हटलं जातं. तो पाहिल्यावर आपला प्रवास सुरु होतो तो भवानगडाच्या दिशेने. दंडा ते भवानगड हे अंतर फक्त अर्ध्या तासाचं आहे. भवानगड हा एका छोट्याशा टेकडीवर वसवलेला असून आता भवानगडेश्वराचं मंदिर आहे. या गडावरुन आता चारही बाजूचा प्रदेश पाहता येतो. भवानगडाचा निरोप घेऊन मधुकरनगरमार्गे भादवे, एडवण करत 'किल्ले दातिवरे' इथे आपण पोहोचतो. दातिवरे किल्ल्याबद्दल गावकऱ्यांना फारसं ठाऊक नाही. दातिवरेच्या धक्क्यावरुन अर्नाळा किल्ला नजरेच्या टप्प्यात येतो. दातिवरे ते अर्नाळा अशी बोटसेवादेखील इथून नेहमी सुरु असते.



अनु.

**आपल्या ठाणे जिल्ह्याला पालघरचा भवानगड हा भटकंतीसाठी चांगलं डेस्टिनेशन ठरू शकतो. बरं, यासाठी खूप दिवस खर्च करण्याचीही गरज नाही. एका विकेण्डमधे ही भटकंती सहज जमू शकते.**

# भवानगड बेस्ट डेस्टिनेशन

ठाणे जिल्ह्याला लाभलेला विस्तीर्ण किनारा म्हणजे भटकंती करणाऱ्यांसाठी पर्वणीच. या किनाऱ्यालगत बऱ्याचशा टेकड्या पहायला मिळतात. याच टेकड्यांना इतिहासकाळात गड-किल्ल्यांचं स्वरूप देण्यात आलं होतं. नारळी पोफळीच्या दाट जंगलात आणि झुडपात दडलेली अशी अनेक पर्यटनस्थळं आपल्याला लाभलेली आहेत. त्यातलंच भवानगड हे एक ठिकाण.


भवानगडावर जाण्यासाठी पश्चिम रेल्वेचं विरार स्टेशन गाठायचं. नंतर विरारहून सुटणाऱ्या सुरत शटल ट्रेनने सफाळे स्टेशनवर उतरायचं. इथून पुढे दातिवरे गावाकडे जाणारी बस किंवा सिक्स सीटर पकडायची. मधुकरनगरला उतरल्यावर २०-२५ मिनीटांत गडाच्या पायथ्याशी पोचतो. गर्द झाडीने वेढलेल्या या भवानगडचं दर्शन दहा मिनीटांच्या पायपिटीनंतरच होतं. गर्द झाडीच्या परिसरात विविध पक्षी पाहायला मिळणंसुद्धा पर्वणीचं आहे.

ढासळलेल्या तटबंदीपर्यंत पोचल्यावर उजवीकडे सभामंडपात श्री भवानी गडेश्वराचं मंदिर आहे. इथेच गणराय आणि कार्तिकस्वामींचं दर्शन घेऊन बालेकिल्ल्याकडे निघायचं. गडावर मोठ्या प्रमाणात काजूची झाडं आहेत. तटबंदीनंतर गोमुखी आकाराचं प्रवेशव्दार आहे. त्याची कमान आणि घुमट ढासळलेले असले तरी ते पाहून त्याच्या भव्यतेची कल्पना येते. मोठ्या झाडावेलींमुळे याची अजूनच वाताहात झालेली आहे.

प्रवेशव्दाराच्या आतील बाजूस पहारेकऱ्यांच्या देवड्या बघायला मिळतात. इथून थोडं चालल्यावर बालेकिल्ल्यावर पोचतो. गड माथ्यावरून दांडा, खाडी मुखावर असलेला केळवे पाणकोट, दांडा किल्ला दिसतो. तर पूर्वेकडे तांदूळवाडी, जीवनधन गड, काळदुर्ग अशी सलग डोंगररांग न्याहाळता येते. गड माथ्यावरून खाली उतरल्यावर धान्याचं कोठार, गुहा यांचे अवशेष दिसतात.

वसई मोहिमेच्या वेळे इ. स १७३७च्या पावसाळ्यात दोन हजार मजूरांनी या भवानगडाची निर्मिती केली होती. पोर्तुगिजांचा पाडाव करण्यासाठी दांडा खाडीच्या परिसरात मराठ्यांकडे भक्कम दुर्ग असावा यासाठी हे बांधकाम करण्यात आलं होतं. चिमाजी अप्पांच्या पत्रात गडनिर्मिती संदर्भात हा उल्लेख आढळतो.

पालघरच्या भवानगडचा परिसर हा अनुभवण्यासारख्या आहे. हा गड आटोपशीर आहे. लहान मुलं आणि ज्येष्ठांना हा गड चढण्यास सोपा आहे. तेव्हा एक दिवसाचा मुक्काम करून विकेण्ड साजरा करायला हरकत नाही.








कसं जायचं? :

विरारनंतरच्या सफाळे स्टेशनावर उतरून तांदूळवाडीला एसटीनं जाता येतं. अन्यथा अहमदाबाद हायवेने जाताना मनोरच्या आधी डाव्या बाजूस वराई फाटा येतो. इथून केळवे बीचलाही जाता येतं. या फाट्यापासून उजवीकडे वळण घेऊन तांदूळवाडी गावात जाता येतं. तिथूनच तांदुळवाडी किल्ल्याला जायचा रस्ता आहे. वरपर्यंत जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. एक रस्ता जवळचा पण कठीण आहे. काहीतरी धाडस केल्याचा आनंद घ्यायचा असेल तर हा रस्ता पकडा. ट्रेकची सवय नसलेले, लहान मुलं बरोबर असतील दुसरा रस्ता बरा. तो जरा लांबून आहे. गावातील वाटाड्या सोबत घेतला तर उत्तम.

*पावसाळ्यात फक्त ट्रेकर्सच नाही तर मित्रपरिवार, कुटुंबकबिला घेऊन आउटिंगचे बेत झडत असल्याने लोकप्रिय ठिकाणी कधीकधी फारच गर्दी होते. तेव्हा कमी प्रसिद्ध, पण कमी गर्दीच्या, निसर्गसौंदर्याने ओतप्रोत भरलेल्या ट्रेकचा शोध सुरूच असतो. पालघर जिल्ह्यातील तांदूळवाडीचा किल्लाही असाच छान आणि अस्पर्श आहे.*

*तांदूळगडाकडची वाट हिरव्या गर्द झाडीतून जाते. पावसाळ्यात रस्त्यात अनेक खेकड्यांचं दर्शन होतं. पावसात रस्ता जरासा निसरडा असतो. त्यामुळे जरा जपून. आपण किल्ल्यावर पोहोचू लागतो, तसा आसपासचा निसर्ग अधीकच सुंदर दिसू लागतो. बाजूने जाणारी वैतरणा नदी आणि आसपासचे हिरवेगार डोंगर मन वेधून घेतात. किल्ला तसा लहान आहे. एक-दोन टाक्यांशिवाय इथे फार काही नाही. परंतु किल्ल्याहून दिसणारा नजारा अप्रतिम आहे. त्यासाठी तरी इथे यावं असं वाटतं. म्हणूनच इथे पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात यावं.*

*गडावर किंवा त्याच्या आजूबाजूला खाण्यापिण्याची काही सोय नाही. त्यामुळे जाताना थोडंफार खायला घेऊन जायलं हवं. हा किल्ला मुंबईपासून अगदी जवळ असल्यानं एका दिवसात जाऊन परतता येईल.*

# टकमक गड

ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यात सकवार गावाच्या मागे टकमक किल्ला आपल्या अंगाखांद्यावर पुरातन अवशेष बाळगत आजही उभा आहे. गडाचा डोंगर नैसर्गिकरित्या मुख्य डोंगर रांगेपासून वेगळा झाला आहे, तसेच गडाभोवती असलेल्या दाट जंगलाने त्याच्या दुर्गमतेत भरच टाकली आहे. अशा दुर्गम स्थानी १२व्या शतकात टकमक गडाची उभारणी करण्यात आली.

## कसे जाल?


मुंबई- अहमदाबाद महामार्गावर (हायवे) मुंबईपासून ८४ किमी अंतरावर सकवार गावाचा फाटा आहे. या फाट्यावर वाघाड गुरुकुल, सकवार असा मोठा फलक लावलेला आहे. महामार्गावरून उजवीकडे वळून ५०० मीटर अंतरावर सकवार हे टकमक गडाच्या पायथ्याचे गाव आहे. पठारावरून चढ- उतार पार करत उघड्या माळावरून एका तासात 'घोड्या'पर्यंत पोहोचतो. पुढे 'घोड्या'ला वळसा घालून वर चढत जाऊन पश्चिमेकडील तटबंदीवरून आपला टकमक गडावर प्रवेश होतो. सकवार गावातून टकमक गडावर जाण्यास ३ ते ४ तास लागतात.

## सकवार गावात जाण्यासाठी

- पश्चिम रेल्वेवरील वसई किंवा विरार स्थानकात उतरावे, येथून ६ आसनी शेअर रिक्षाने १० किमीवरील मुंबई- अहमदाबाद महामार्ग गाठावा. महामार्गावरून सकवार गावातील 'रामकृष्ण मठाला' जाण्यासाठी ६ आसनी शेअर रिक्षा मिळतात

# काय पहाल?

- सकवार गावातून आपल्याला टकमक गडाचे दक्षिण टोक (नाक), त्याच्यापुढे उजव्या बाजूस 'घोडा किंवा खुट्टा' नावाने ओळखला जाणारा छोटा सुळका (पिनॅकल) व त्यापुढे पसरलेल्या पठार व डोंगराची धार दिसते. डोंगराच्या धारेवरून आपण पठारावर पोहोचतो. पुढे घोड्याला वळसा घालून पश्चिमेकडील तटबंदीवरून आपला टकमक गडावर प्रवेश होतो. घोड्याच्या पुढे कातळात खोदलेल्या पायऱ्या पाहायला मिळतात.
- टकमक गड दक्षिणोत्तर पसरला आहे. पश्चिमेकडील तटबंदीवरून गडावर प्रवेश केल्यावर उजव्या बाजूची वाट गडाच्या दक्षिण टोकाकडे जाते. हेच टोक पायथ्याच्या सकवार गावातून आपल्याला दिसत असते. या टोकावरून आजूबाजूचा विस्तीर्ण प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो. पूर्वीच्या काळी येथे टेहळणीची चौकी असावी. टाक्यांच्या समोरच्या बाजूस खाली उतरणाऱ्या पायवाटेने जाताना दोनही बाजूंना वास्तूंचे चौथरे कारवीच्या दाट झुडपात लपलेले दिसतात. पुढे पायवाटेला उजव्या बाजूला फाटा फुटतो. येथे दोन बांगडी तोफा पाहायला मिळतात.
- टकमक गडाचा हा भाग पाहून पुन्हा मुख्य पायवाटेपाशी येऊन किल्ल्याच्या सर्वोच्च पठारावर जाताना उजव्या बाजूला पाण्याचे एक टाक दिसते, टकमक गडावरून दक्षिणेला कामण गडाची डोंगररांग दिसते, पश्चिमेला समुद्राला मिळणारी वैतरणा नदी दिसते तर, पूर्वेला वांदरी तलाव दिसतो.






अनु.



# जव्हार

| | - | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते जव्हार | | | | | | 121 | | | | |
| **1** | दादर कोपऱ्याचा धबधबा | धबधबा | | | | | 17 | N | | | |
| **2** | हिरडपाडा धबधबा | धबधबा | | | | | 14 | N | 12.5 | SW | |
| **3** | दाभोसा | धबधबा | | | | वॉटरस्पोर्ट | 14.5 | NW | 9 | NW | |
| **4** | दाभोसा धबधबा | धबधबा | | | | | 15 | NW | 0.7 | SE | |
| **5** | जव्हार | धबधबा | | | निसर्ग | | 0 | | | | |
| **6** | जव्हार धरण | | | | निसर्ग | धरण | 4 | NW | 4 | NW | |
| **7** | जव्हार किल्ला | | किल्ला | | निसर्ग | | 1 | SW | 5.5 | S | |
| **8** | पळूचा धबधबा | धबधबा | | | | | 20.5 | SW | 20.5 | SW | |
| **9** | विक्रमगड | | | ट्रेक | निसर्ग | | 27 | SW | 6 | SW | |
| **10** | भूपतगड | | किल्ला | | | | 30 | SE | 57 | NE | |




## दादर कोपऱ्याचा धबधबा

जव्हारच्या उत्तरेला १८ किमीवर हा धबधबा आहे. जव्हार-जामसार, विन्हवळ, सारसून, दादर कोपरा हा बसप्रवास करून गेलं की दादर कोपऱ्याजवळ एक किमी अंतरावर ऐंशी मीटर उंचीवर घळईत कोसळणारा धबधबा पाहता येतो.

## दाभोसा धबधबा, हिरडपाडा धबधबा

जव्हार-सिल्वासा रस्त्यावर जव्हारपासून १८ किमीवर दाभोसा फाटा आहे. तिथून १ किमी अंतरावर दाभोसा गाव आहे. लेंडी नदीवरचा १०० मीटर उंचीचा धबधबा पावसाळ्यात रौद्र रूप धारण करतो.

हिरडपाडा फाट्यापासून अडीच किमी अंतरावर आणखी एक धबधबा आहे. त्या हिरडपाड्याच्या धबधब्याजवळची गवताळ पठारं दार्जिलिंगची आठवण करून देतात.



# दाभोसा

**ॲडव्हेंचर टुरिझमच्या नकाशावर अजून दाभोसा धबधब्याचं नाव उमटलेलं नसलं तरी बाराही महिने कोसळणाऱ्या या धबधब्यामध्ये ती क्षमता नक्कीच आहे. वॉटर फॉल रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंगचं थ्रिल आणि जंगलभ्रमणाचा पर्याय असा दुहेरी आनंद तुम्हाला मिळवता येईल.**

ॲडव्हेंचर स्पोर्ट्सबाबत एक विलक्षण आकर्षण हल्ली पर्यटकांमध्ये, विशेषत: तरुण पर्यटकांमध्ये वाढू लागलं आहे. व्हाइट वॉटर राफ्टिंग, व्हॅली क्रॉसिंग, रॅपलिंग, रॉक क्लायंबिंग, माउंटन बायकिंग, पॅराग्लायडिंग यांसारखे साहसी प्रकार आता टुरिझमच्या मुख्य धारेत येऊ लागले आहेत. एके काळी ट्रेकर्स आणि एलिट क्लासपुरते मर्यादित असलेल्या ॲडव्हेंचर स्पोर्ट्सचा आता चांगला प्रसार झाल्यामुळे सर्वसामान्य पर्यटक मोठ्या प्रमाणावर या थरारक प्रकारांकडे वळत आहेत.

महाराष्ट्रातही आता ॲडव्हेंचर स्पोर्ट्ससाठी चांगले पर्याय उपलब्ध होऊ लागले आहेत. पूर्वी वॉटर राफ्टिंग म्हटलं की ऋषिकेशला किंवा कर्नाटकात दांडेलीच्या जंगलात जावं लागे. आता मुंबई-गोवा महामार्गावर कोलाडजवळ राफ्टिंगचा पर्याय उपलब्ध आहे. पानशेतजवळ पॅराग्लायडिंगचा थरार अनुभवण्याची संधी आहे. रॅपलिंग आणि व्हॅली क्रॉसिंगचा अनुभव तर अनेक उन्हाळी शिबिरांमधून देण्यात येतो. पण नेचर टुरिझम आणि ॲडव्हेंचर स्पोर्ट्स या मिश्रणाचा जहाल डोस चाखायला मिळाला, तर क्या बात है! हा अनुभव घ्यायचा असेल तर दाभोसाला जाण्यावाचून पर्याय नाही.

तब्बल २५० फुटांवरून कोसळणारा बारमाही धबधबा, या धबधब्यामुळे तयार झालेला ७० फूट खोल डोह, डोहाच्या तीन बाजूंनी डोंगरांचा वेढा आणि एका बाजूला पुढे जाणारी नदीची वाट अशा निसर्गाच्या मस्त मनोहारी कॅनव्हासवर रॅपलिंग किंवा व्हॅली क्रॉसिंगचा थरार अनुभवण्यातली गंमत वेगळी आहे. ठाणे जिल्ह्याचे महाबळेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जव्हार या हिलस्टेशनपासून १७ किमी अंतरावर, जव्हार-सिल्वासा रस्त्यावर दाभोसा आहे. पर्यटनाच्या नकाशावर अद्याप दाभोसाचा ठसा उमटलेला नाही. आडवाटेला असल्यामुळे वाहतुकीची पुरेशी साधने नाहीत आणि पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांचा अभाव यामुळे दाभोसा आजवर पर्यटकांकडून दुर्लक्षित राहिलं आहे.

मात्र, आता चित्र बदलतंय. दाभोसा इथल्या एका डोंगरशिखरावर नेचरट्रेल्सने (दिवेकरवाडी, विक्रमगड) सुंदर रिसॉर्ट बांधलं असून ॲडव्हेंचर स्पोर्ट्सची सोय इथे आहे. ॲडव्हेंचर हाय या कंपनीचे अमोल देशपांडे आणि त्यांचे सहकारी रॅपलिंग, व्हॅलीक्रॉसिंगचा थरारक अनुभव देण्यासाठी सज्ज असतात. एखाद्या वीकएण्डला सहकुटुंब कुठेतरी बाहेर जायचं असतं, पण पटकन वेगळी जागा सुचत नाही. अलिबाग, कर्नाळा किंवा एखाद्या रिसॉर्टमध्ये इतकी गर्दी असते की, त्यापेक्षा घरी बसलेलं बरं असं वाटतं. वेगळेपणाच्या शोधात असलेल्या पर्यटकांसाठी दाभोसा हा एक उत्तम पर्याय आहे. मुंबई-ठाण्यापासून तीन-साडेतीन तासावर असलेल्या दाभोसाला जाण्यासाठी स्वत:ची गाडी असेल तर उत्तम. अन्यथा ठाण्यावरून जव्हारपर्यंत एसटीने जाऊन पुढे प्रवासी जीपने जाता येतं.

अडीचशे फूट उंचीवरून खालच्या डोहात उतरण्याचा अनुभव शब्दातीत आहे. दोराच्या साह्याने डोंगरकड्यावरून एक एक पाऊल मागे टाकत सावकाश खाली डोहात उतरायचं. डोहातल्या थंडगार पाण्याने रॅपलिंगचा सर्व थकवा एका क्षणात पळून जातो. शिवाय सोबतीला नेचरट्रेल्सच्या दिवेकरांची आतिथ्यशीलता उरलीसुरली दमछाकही नाहीशी करते.

इथे अद्याप वीज पोहोचलेली नाही.




# रॅपलिंगचा थरार

त्यामुळे अक्षरशः गावाकडच्या घरात राहिल्याचा अनुभव घेता येतो. रिसॉर्टमधल्या आपल्या रूममधूनच समोर डोंगरकड्यावरून धबधबा कोसळताना दिसतो. रात्रीच्या निरव शांततेत एका संथ लयीत कोसळणाऱ्या धबधब्याचा आवाज तुम्हाला निसर्गाच्या कुशीत असल्याचा अविस्मरणीय अनुभव देतो. त्यामुळे रॅपलिंग आणि व्हॅलीक्रॉसिंगसारखे साहसी प्रकार आपल्याला कसे जमणार, या विचाराने ज्येष्ठ नागरिकांनी दाभोसापासून लांब राहण्याचं कारण नाही. इथला निसर्ग शहरातल्या गोंधळापासून चार क्षण दूर जाऊन मनाची शांती परत मिळवण्यासाठी पुरेसा आहे. शिवाय, जंगलभ्रमण, कृत्रिम धबधबा, या गोष्टींची मजाही लुटता येते.

दाभोसासाठीचे बुकिंग नेचरट्रेल्सच्या www.naturetrailsindia.com या वेबसाइटवर ऑनलाइन करता येते. शिवाय, २५४२३५८६, २५४०१६०१, २५३३७००३ या क्रमांकांवरही संपर्क साधता येईल.

# मन चिंब पावसाळी



**पावसाळ्याची चाहूल लागली की सहलीचे बेत आखायला सुरुवात होते. काही ठिकाणं तर खास पावसाळी सहलीसाठी प्रसिद्ध आहेत. यंदा तुम्ही पावसाळ्याच्या सहलीचे बेत आखत असाल तर जव्हार, खोडाळा, देवबांध, सूर्यमाळ हा गोल पट्टा अतिशय उत्तम आहे. निसर्गप्रेमींसाठी ही सहल पर्वणीच ठरेल. पर्यटकांना याविषयी परिसराविषयी माहिती नसल्यामुळे तिथे फारशी गर्दीही नसते. मुक्तपणे निसर्गाचा आस्वाद घेता येतो.**

ठाणे जिल्ह्यातला जव्हार, खोडाळा, देवबांध, सूर्यमाळचा मुलूख सह्याद्रीतल्या गच्च रानांनी वेढलेला. या रानांच्या आसऱ्याने राहणारा आदिवासी आजही मागासलेला आहे. त्यामुळे आपल्यापैकी बऱ्याच जणांना अपरिचित. भौगोलिकदृष्ट्या हा भाग वैशिष्ट्यपूर्ण आहे. सह्याद्रीचं इथलं रूप अगदीचं वेगळं आहे. इथले डोंगर सह्याद्रीतल्या इतर डोंगरांसारखे रुद्र आणि उंच भासत नाहीत. इथे छोट्या टुमदार टेकड्या आहेत. त्याभोवताली पसरलेली दाट जंगलं. हा रम्य परिसर पावसाळ्यात तर कल्पनेपलीकडे सुंदर होतो. बघाल तिकडे ओढे, धबधबे आणि हिरव्या रंगांची उधळण. जंगलामधून जाणारा वळणावळणांचा सुंदर रस्ता. एखाद्या सुरेख चित्रात दिसावा तसा. तरीही पर्यटकांपासून दुर्लक्षित राहिलेला. जणू निसर्गाचा हा सगळा बहर तुमच्या एकट्यासाठी आहे.

ठाणे-नाशिक महामार्गावर कसारा घाटातल्या

तोन चढणी पार केल्या की डावीकडे एक छोटा . हा खोडाळा–मोखाडा करत जातो. एरवी नाशिकला जाताना हा रस्ता लक्षात येत नाही. पण या रस्त्यावर शिरलं की आपण एका शय वेगळ्या जागत प्रवेश करतो. इथून साधारण ७५ किमीवर जव्हार लागतं. हा रस्ताबरोबर असल्याची पक्की खूण म्हणजे घाटात डावीकडे, या रस्त्यावर वळल्यानंतर एका छोट्याशा बोगद्यातून पलिकडे जातो. डावीकडे वळल्यावर खाली मोठा धबधबा दिसतो. हाच तो विहिगावचा धबधबा. जिथं अशोका चित्रपटाचं शूटिंग झालं होतं. गाडी रस्त्याच्या कडेला थांबवून साधारणतः ५०–७५ फूट खाली उतरावं लागतं. मात्र चढण चढताना थोडं सावध राहावं लागतं. अन्यथा हा धबधबा चुकू शकतो.

वळणवळणाच्या रस्त्याने दाट जंगलातून पुढं गेलं की खोडाळा हे मोठं गाव लागतं. खोडाळ्याहून ८ किमीवर सूर्यमाळ हे थंड हवेचं ठिकाण आहे. खोडाळहून जव्हारकडे निघाल्यावर वाटेत एका हिरव्याकंच खोऱ्यात देवबांध लागतं. इथे गणपतीचं सुंदर देऊळ आहे. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वनवासी कल्याण शाखेने विकसित केलं आहे.


देवबांधहून मोखाडामार्गे गेल्यावर जव्हार लागतं. इथूनचं सिल्वासालाही (गुजरातमधलं) जाता येतं. जव्हारहून १७–१८ किमी अंतरावर 'दाभोसा' नावाचा धबधबा लागतो. तिथल्या गावाचं नावच या धबधब्याला देण्यात आलं आहे. इथून १५ मिनिटं चालत गेल्यावर आपण डोंगराच्या कडेला येतो. इथून निसर्गाचं अप्रतिम दर्शन होतं. उजवीकडे दरीत कोसळणारा पांढराशुभ्र धबधबा निसर्गाच्या विराट रूपाचं दर्शन घडवतो. इथे खाण्यापिण्याची कुठलीही सोय नाही. सोबत ही सर्व व्यवस्था घेऊन काही तास मस्त निसर्गाच्या सानिध्यात घालवणं हा एक अभूतपूर्व अनुभव ठरतो.

ठाण्याहून भिवंडी, वाडा, विक्रमगड, जव्हार करत इथे जाता येतं. या रस्त्यावर प्रचंड ट्रॅफिक असतं. म्हणून कसारा घाटाच्या बाजूने जाणार रस्ता उत्तम आहे. निसर्गानं वेढलेला. पहाटे लवकर प्रवासाला सुरुवात केल्यास निसर्गाचा मनमुराद आनंद लुटता येतो. ट्रेकिंग आणि धबधब्यांची आवड असणाऱ्यांसाठी ही सहल पर्वणीच ठरू शकते. हा भाग पर्यटनसाठी विकसित झालेला नसल्यामुळे सोबत भरपूर खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवावी लागते. पावसाळ्यात हा पट्टा फिरण्यासाठी अतिशय उत्तम आहे. हिरवी मखमल, त्याच्या तृणपात्यावर पसरलेले दवबिंदू जणू हिरे जडवल्याप्रमाणे भासतात.

'चैतन्याचा अवखळ वारा, रविकिरणांच रजत पसारा, गोड शिरशिरी सुखद शहारा, मनामनामये फुले फुलोरा,' या कवितेतल्या ओळींप्रमाणे इथे येणाऱ्यांची स्थिती होते.

......................................

या रस्त्यावरून ही सगळी ठिकाणं एका दिवसात नीट बघायची असतील तर पहाटे पाच वाजता ठाणा सोडायला हवं आणि स्वतःचं वाहन हवं. दुसरं म्हणजे धबधब्यात डुंबायची मजा घ्यायची असेल तर या वाटेवर देवबांधच्या अगोदर रस्त्याच्या कडेला अनेक छोटे धबधबे आहेत. कारण दाभोसा आणि विहिगाव हे दोन्ही धबधबे प्रचंड मोठे असल्याने यात डुंबणं सर्वसामान्यपणे शक्य नाही. जव्हारला मुक्काम केल्यास हा परिसर मनसोक्त भटकता येऊ शकतो. पावसाळ्यात इथे सगळीकडे ढग जमलेले असतात. वातावरण धुंद-कुंद असतं. भुरभुरत्या पावसात पायी लांब फिरण्याचा आनंद इथे काही औरच आहे. ढगातून चालताना... इतकी शांतता असते की, तुम्हाला ऐकू येतं. हा अनुभव इतका वेगळा असतो की आपण तो गजबजाटात कधीही अनुभवलेला नसतो.


पाचूच्या
वाटेवर




जव्हारवारी

सध्या सर्वत्र दमदार पाऊस कोसळतोय. या पावसात भिजायची मजा काही औरच असते. मनसोक्त भिजायला भटक्या मंडळींची पावलं अनेक स्पॉटसकडे वळत असतात. ठाणे जिल्ह्यातलं जव्हार हे असंच एक मस्त ठिकाण. तुफान कोसळणारा धबधबा, अप्रतिम निसर्गसौंदर्य अनुभवायला इथे जरुर भेट द्यायला हवी.

जव्हार हा खरं तर महाराष्ट्रातला काहीसा दुर्लक्षित, दुर्गम असा भाग. पण, पावसाळ्याच्या दिवसांत इथलं वातावरण मनाला अक्षरशः वेड लावतं. दाट धुकं, थंड हवा, तुफान कोसळणारा पाऊस असं धुंद वातावरण वातावरण इथे पावसाळ्याच्या दिवसांत अनुभवायला मिळतं. जव्हारला 'महाराष्ट्रातलं चेरापुंजी' अशी उपमा देण्यास हरकत नाही. अप्रतिम निसर्गसौंदर्याचं वरदान जव्हारला लाभलं आहे. खळाळणारं पाणी, फेसाळत्या पाण्याचे धबधबे, हिरवीगार वनराई हे अनुभवायचं असेल तर इथे येण्याला पर्याय नाही. जव्हारमध्ये प्रवेश करताच अंदाजे ४०० मीटर्स खोली असलेली नारळीदरा ही दरी पहायला मिळते. त्यात अनेक छोटे-मोठे धबधबे वहात असतात. जव्हारचा हनुमान पॉइण्ट तर प्रसिद्धच आहे. तिथे उभं राहून सभोवताली नजर टाकल्यास निसर्गसौंदर्याचा नजराणाच तुमच्यासमोर खुला होतो. अतिशय उत्कृष्ट असा हा व्ह्यू पॉइण्ट आहे. याशिवाय सूर्यास्त पाहण्यासाठी इथला सनसेट पॉइण्ट प्रसिद्ध आहे.

जव्हारचं मुख्य आकर्षण म्हणजे इथला प्रचंड असा दाभोसा धबधबा. तुफान वेगाने कोसळणारं पाणी पाहून अंग शहारतं. जवळपासच्या २०० चौरसकिलोमीटर्सच्या परिसरात इतका मोठा धबधबा दिसणार नाही असं इथली स्थानिक मंडळी छातीठोकपणे सांगतात. या धबधब्यातल्या पाण्याचे तुषारच सुमारे १०० फूट उंचीपर्यंत उडत असतात. त्यात भिजणं म्हणजे अहाहा... या धबधब्याशिवाय इथे हिरडपाडा धबधबाही आहे. अलीकडेच बांधण्यात आलेलं खडखड धरण लोणावळ्यातल्या प्रसिद्ध भुशी डॅमची आठवण करुन देतं. जोरदार पावसाने हे धरण भरुन वाहू लागलं की त्या पाण्यात भिजण्याचा मनसोक्त आनंद लुटता येतो. पाण्यात भिजण्यासाठी तिथे खास पायऱ्याही बांधण्यात आल्या आहेत. जव्हारपासून सुमारे ६ ते ७ किलोमीटर्सवर हे धरण आहे. इथली आदिवासी आणि वारली संस्कृती प्रसिद्ध आहे. चिंब भिजून कडकडून भूक लागली की इथली गरमागरम नागलीची भाकरी आणि त्यासोबत उडदाचं भुजा खाण्यातला आनंद म्हणजे केवळ अवर्णनीय.

## कसं जाल?

मुंबई-अहमदाबाद हायवेवरुन निघाल्यास मनोरच्या मस्ताननाक्याजवळून जव्हारला जाणारा रस्ता आहे. त्या रस्त्याने विक्रमगड आणि तिथून जव्हारला पोहोचता येतं. याशिवाय भिवंडीहून वाडा-विक्रमगड करून जव्हारला पोहोचता येतं. रेल्वेने जायचं असल्यास पश्चिम रेल्वेच्या पालघर आणि डहाणू रेल्वेस्टेशनहून जव्हारला जाणाऱ्या बस सुटतात. शिवाय ठाणे-कल्याणहूनदेखील जव्हारला जाणाऱ्या बस आहेत. जव्हारमध्ये राहण्यासाठी काही हॉटेल्सची व्यवस्था आहे.

मुंबई-ठाण्याच्या अगदी जवळ असूनही पर्यटनासाठी म्हणून जव्हारला जाणाऱ्यांची संख्या फार नाही. इतक्या सामिप्यामुळेच कदाचित पर्यटनाच्या नकाशावर जव्हार आजपर्यंत दुर्लक्षित राहिलं. पण जव्हारला ठाणे जिल्ह्याचं महाबळेश्वर म्हणतात. यावरून या ठिकाणचे निसर्गसौंदर्य काय असेल, याचा अंदाज येऊ शकतो. ठाणे जिल्ह्यातलं हिल स्टेशन असलेल्या जव्हारला भेट देण्याचा कालावधी जुलै ते फेब्रुवारी. संपूर्णतः पहाडी प्रदेश असलेल्या जव्हार परिसरात पावसाळ्याचे तीन महिने मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात इथे वळणावळणाला धबधबे कोसळत असतात. शिवाय, जंगलाचा परिसर असल्यामुळे दूरवर हिरवाईशिवाय काहीच दिसत नाही. जंगलात भटकण्याची आवड असलेल्यांसाठी हे बेस्ट ठिकाण आहे.

जव्हारचं ऐतिहासिक महत्त्व म्हणजे भारतातली एकमेव आदिवासी राजवट इथे होती. आदिवासी राजाचा राजवाडा आजही इथे आहे. हा राजवाडा पाहण्यासारखा आहे. काजूच्या बागांच्या मध्यभागी राजवाडा आहे. प्रत्यक्ष जव्हारमध्ये बघण्यासारख्या म्हणाल तर दोन-तीनच गोष्टी आहेत. एक तर हा राजवाडा, दुसरी गोष्ट म्हणजे इथे एक छोटासा डॅम बांधला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात हा परिसर रखरखीत असला तरी जव्हारला पाण्याचं दुर्भिक्ष्य फारसं जाणवत नाही. तिसरी पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे इथलं वारली पेंटिंग सेंटर. वारली चित्रकला म्हणजे खास ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासींची मक्तेदारी. शेकडो वर्षांच्या परंपरेने चालत आलेल्या या कलेचं आजही इथल्या आदिवासींनी चांगल्या प्रकारे जतन केलं आहे. त्यामुळे हे वारली केंद्र पाहण्यासारखं आहे.

जव्हारपासून जवळच शेर्पामाळ हे ठिकाण आहे. महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवरायांनी सुरतेवर स्वारी केली, तेव्हा ते याच मार्गे गेले होते. त्यावेळी त्यांनी शेर्पामाळ इथे मुक्काम केला होता. जव्हारच्या राजाने त्यावेळी त्यांचे इथेच स्वागत केले होते. या स्मरणार्थ इथे एक मोठा स्तंभही बांधण्यात आला आहे.

चारोटीमार्गे जव्हारला जाताना चारोटीला उजवीकडे वळल्यावर थोड्याच अंतरावर एक छान तलाव आहे. डोंगरांच्या वर्तुळात हा तलाव आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात हिरवी दुलई पांघरलेले हे डोंगर आणि त्यांच्यामध्ये वसलेला हा तलाव हे दृष्य अप्रतिम दिसतं. आणखी थोडं पुढे गेल्यावर धामणी धरणाचा विस्तीर्ण परिसर दृष्टीपथात येतो. जव्हार गावात प्रवेश करायच्या थोडं आधी दोन्ही बाजूंना दरी दिसायला सुरुवात होते. अशाच एका पॉइंटवरून उजवीकडच्या बाजूला काजूच्या झाडांत लपलेला राजवाडा दिसतो. या ठिकाणी सूर्योदय आणि सूर्यास्त छान दिसतात. प्रत्यक्ष गावात



***जव्हारला असं पोहचा***

*मुंबईहून किंवा ठाण्याहून जव्हारला जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. मुंबई-अहमदाबाद हायवेवर चारोटी नाक्याहून उजवीकडे वळल्यावर ४० किमी.वर जव्हार येतं. दुसरा मार्ग आहे भिवंडी-वाडा मार्गे. जव्हारला जाण्यासाठी स्वतःची खासगी गाडी असणं हा सर्वोत्तम पर्याय आहे. त्यामुळे वाटेतील सौंदर्यस्थळांचा आस्वाद घेत पुढे जाता येतं.*



अनु.

# ठाणे जिल्ह्याचं महाबळेश्वर

सनसेट पॉइंट आहे. पण तिथे कचऱ्याचं साम्राज्य असल्यामुळे या ठिकाणाहूनच सूर्योदय आणि सूर्यास्त पाहणं अधिक श्रेयस्कर.

जव्हार-सिल्वासा रस्त्यावर पाच किमीवर एक छानसा तलाव आहे. इथून जवळच छोटीशी टेकडी चढून गेल्यावर एक विस्तीर्ण पठार लागतं. इथून दरीचं दृष्य छान दिसतं. निवांतपणे काही तास घालवण्यासाठी ही जागा आदर्श आहे. इथून थोडं पुढे गेल्यावर धाबोसा गाव लागतं. गावातून उजवीकडे वळल्यावर धाबोसा धबधबा दिसतो. पावसाळ्यात हा धबधबा सुसाट वेगाने कोसळत असतो. जव्हारला मुक्काम करून या ठिकाणी पाण्यात मनसोक्त भिजण्याचा आनंद लुटता येतो. मात्र, इथे येण्याचा रस्ता फारसा चांगला नाही. पण इतक्या फुटकळ बाबीकडे दुर्लक्ष करायचं ठरवलंत तर एक छान जागा पाहिल्याचं सुख मिळू शकेल.

जव्हारमध्ये राहण्यासाठी मोजकी हॉटेल्स उपलब्ध आहेत. पण फार चांगल्या व्यवस्थेची अपेक्षा न ठेवणं उत्तम. सरकारचं रेस्ट हाऊस आहे. त्याचं आधी बुकिंग करून जाता येतं.

**जव्हार :** मिनी महाबळेश्वर किंवा पिकनिक स्पॉट होऊ न शकलेलं महाबळेश्वर असं जव्हारचं वर्णन करता येईल. जव्हारसाठी ठाण्याहून एसटी बस मिळू शकते. स्वत:ची गाडी असेल, तर नाशिक रोडवरून कसारा घाटानंतर खोडाळामार्गाने जायचं. हा रस्ता अफलातून आहे. वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरून जायचं असेल, तर मात्र विक्रमगडमार्गे जव्हारपर्यंत पोहोचणं अधिक श्रेयस्कर ठरतं. आता सूर्य ढगांआडच लपत असला, तरी जव्हारच्या सनसेट पॉइण्टला भेट द्यायलाच हवी. या

सनसेट पॉइण्टवर पठारावरून पुढे एक सुंदर चौथरा बांधलेला आहे. या चौथऱ्यावरून खाली एक दरी दिसते आणि त्यापुढे आपल्याच लेव्हलचा एक डोंगर समोर दिसतो. सनसेट पॉइण्टशेजारच्या हॉटेलमध्ये किंवा एसटी स्टॅण्डजवळच्या हॉटेलांमध्ये राहण्याची-जेवणाची सोय होऊ शकते. एक दिवसासाठी हा स्पॉट उत्तम.







अनु.

**पळूचा धबधबा**

विक्रमगड ते जव्हार रस्त्यावर जांभा गावाच्या स्टॉपवर उतरायचं. तिथून डावीकडील देहेरजा नदीच्या दिशेने जावं. धबधबा नीट पाहायचा असेल तर नदी ओलांडून जावं लागतं. अर्धगोलाकार कड्यावरून फेसाळत १०-१५ मीटर उंचीवरून खाली कोसळणारा धबधबा अप्रतिम आहे. ठाणे-भिवंडी-वाडा-विक्रमगड ७८ किमी किंवा पालघाट-मनोर-विक्रमगड ४२ किमी. विक्रमगड ते पळू धबधबा सहा किमी.



**तुम्हाला स्वतःचा शोध घ्यायचाय. रोजच्या धावपळीतून मस्त वीकेण्ड एन्जॉय करायचाय. नाहीतर समस्त जुन्या मित्रमंडळींचा झकास ट्रेकिंगचा प्लॅन आहे. शहराच्या धकाधकीपासून दूर कुठेतरी रम्य ठिकाणी जायचं असेल, तर मग तुम्ही नक्की विक्रमगडचा रस्ता धरा, असा सल्ला दिलाय 'बिनधास्त' शर्वरी जमेनिस हिने.**



ठाणे-जव्हार रस्त्यावर असलेला विक्रमगड हे माझं खास आवडतं ठिकाण. चित्रपटाच्या शूटिंगच्या निमित्ताने आम्ही कलाकार वेगवेगळ्या साइट, लोकेशन्स आणि शहरांमधे फिरत असतो. या ठिकाणांचं खास वेगळेपण, त्यांची वेगळी अशी ओळख, तिथे प्रसिद्ध असलेल्या वस्तू आणि पदार्थ यांचा शोध घेऊन हमखास त्यांना भेटी देणं ठरलेलंच. त्या त्या दिवसांपुरतं आम्ही तिथलं आयुष्य जगतो. पण शूटिंगमुळे हा नित्याचाच भाग झाला आहे. त्यामुळेच खास धमाल किंवा वेगळं काही अनुभवायचं असेल, मस्त फिरायचं असेल तर हटके अशा विक्रमगडला भेट द्यायलाच हवी.

ट्रेकिंगसाठी निघायचं म्हणजे खास आकर्षण असलेल्या रिव्हर क्रॉसिंग, जंगल सफारी, रॉक क्लायम्बिंग यांचाही आनंद इथे उपभोगता येतो. शिवाय इथली शांतता, निसर्गरम्य परिसर, नदीचे निर्मळ-स्वच्छ पाणी, शुद्ध हवा अगदी मन मोहून टाकणारी आहे. विक्रमगडावरील एका आदिवासी पाड्यावर दिवेकरांचं मस्त रिसॉर्ट आहे. खास ग्रामीण टच असलेल्या या रिसॉर्टवर धम्माल आणि मनमुराद जगण्याचा आनंद लुटता येतो. पण शांत आणि मोकळ्या वातावरणामुळे निसर्गाच्या अधिक जवळ गेल्याचं समाधान मिळतं. या रिसॉर्टवर राहण्याची उत्तम सोय तर आहेच शिवाय अस्सल ग्रामीण टच असलेलं रुचकर जेवणही उपलब्ध आहे. या मोकळ्या वातावरणात आपल्याला मस्त सपाटून भूक लागते आणि या अस्सल चवीच्या जेवणाने वेगळंच समाधान मिळतं. मुंबईपासून अगदी जवळ शिवाय निसर्गाच्या सान्निध्यात एक-दोन दिवस राहून पुन्हा ताजं तवानंही होऊ शकता येतं. मग कधी निघताय 'भटकंती'साठी विक्रमगडला? इथला शांत परिसर अनुभवायला. स्वतःचा शोध घ्यायला?

# भूपतगड

जव्हार हे ठाणे जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण आहे. याच जव्हारजवळ, एका दिवसात जाऊन पाहून येण्यासारखा किल्ला आहे. त्याचे नाव भूपतगड.

भूपतगडावर आपला प्रवेश नामशेष होत आलेल्या प्रवेशद्वारातून होतो. गडाला उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे असे दोन दरवाजे होते. आज हे दोन्ही दरवाजे नष्ट झाले आहेत. प्रवेशव्दारापाशी असणारे बुरुज कसेबसे तग धरून उभे आहेत.

प्रवेशद्वारापाशी एक म्हसोबाची मूर्ती असून, आत शिरल्यावर समोर हनुमानाची मूर्ती दिसते. गडमाथा बराच विस्तीर्ण आहे. माथ्यावर एका मोठ्या पडक्या वाड्याचे अवशेष आहेत. या वाड्याच्या भिंती अजूनही काही ठिकाणी शिल्लक आहेत. वाड्याच्या मागच्या बाजूला पाण्याचा मोठा हौद आहे. गडावर ४ पाण्याची खोदीव टाकी दिसतात. या टाक्यांजवळच एक कोरडा तलाव आहे. संपूर्ण गडमाथा फिरण्यास अर्धा तास लागतो. या गडावरून त्रिंगलवाडी, हरिहर, त्र्यंबकेश्वर, जव्हार, मोखाडा असा सर्व परिसर दिसतो.

## कसे जाल?

- मुंबईहून भिवंडी- वाडामार्गे अथवा कसारा- खोडाळामार्गे जव्हार (दोन्ही मार्गांनी अंतर अंदाजे १३० किमी) गाठावे. जव्हारपासून १७ किमी अंतरावर झाप नावाचे गाव आहे. येथे २ फाटे फुटतात. या ठिकाणी उजव्या बाजूचा रस्ता झाप गावात जातो आणि सरळ जाणारा रस्ता १ किमी अंतरावर चिंचवाडी गावात जातो. तो रस्ता पकडावा. या फाट्यापासून १० मिनिटांवर चिंचवाडी आहे. चिंचवाडीतून कच्च्या रस्त्याने एक टेकाड पार केल्यावर आपण भूपतगडाच्या पायथ्याशी पोहोचतो. चिंचवाडीतून गडाचा पायथा गाठण्यास अर्धा तास लागतो. गड डावीकडे ठेवत वाट तिरपी वर जाते. पायथ्यापासून गडमाथा गाठण्यास सुमारे अर्धा तास लागतो.
- मुंबईहून पश्चिम द्रुतगती मार्गाने बोरीवली- मनोर- विक्रमगड- जव्हार (अंतर अंदाजे १४८ किमी) गाठावे. जव्हारपासून १७ किमी अंतरावर झाप नावाचे गाव लागते. पुढील रस्ता वरीलप्रमाणेच आहे.

भूपतगड हा छोटासा किल्ला पाहून झाल्यावर, स्वत:चे वाहन असल्यास जव्हारमधील राजवाडा, हनुमान पॉइण्ट, दाभोसा धबधबा, शिर्पाचा माळ इत्यादी ठिकाणे पाहता येतील.



अनु.





## मिलिंद गुणाजी यांच्या आवडीच्या ठिकाणाबद्दल त्यांनी केलेले वर्णन :जव्हार

हिलस्टेशनची आवड असलेल्यांसाठी खोडाळा, मोखाडा, जव्हार, विक्रमगड हे देखील उत्तम पर्याय आहेत. छोट्या-मोठ्या टेकड्या आणि दऱ्याखोऱ्यांनी भरलेल्या यापरिसराचं वर्णन 'टुमदार' या एकाच शब्दानं करता येईल. मुंबई-नाशिक महामार्गावर इगतपुरीच्या अलिकडे 'थळ घाट' सुरू झाल्यावर प्रत्येकी २०-२२ किमीच्या टप्प्याने एका मागोमाग एक खोडाळा, मोखाडा, जव्हार आणि विक्रमगड अशी ठिकाणं लागतात. खोडाळा हे या रस्त्यावर लागणारं पहिलं गाव. खोडाळा-वाडा रस्त्यावर सुमारे १२ किमी अंतरावर सूर्यमाळ ही प्रेक्षणीय जागा आहे. या परिसरात फेरफटका मारताना हरिहर, त्रिंबक, फणीचा डोंगर असे अनेक डोंगर दिसतात. तिथूनच चार किमीवरच्या खोडाळा-मोखाडा रस्त्यावर घाटाच्या




पायथ्याशी असलेल्या देवबांध इथं गणपतीचं सुंदर मंदिर आहे. याच रस्त्यावर १८ किमीवर मोखाडा आहे. मोखाड्याच्या पुढे जव्हार आहे. जव्हार हे त्या भागातल्या लोकांना हिलस्टेशन म्हणूनच परिचित आहे. इतर हिलस्टेशनप्रमाणे इथेही 'सनसेट पॉईंट' आहे. दाभोसा धबधबा आहे. शिवाजी महाराजांनी सुरतेहून येताना जिथे तळ ठोकला ते शिर्पामाळ आहे. जव्हारच्या थोडंसं पुढे साधारण २५ किमीवर विक्रमगड येथे श्री. दिवेकरांनी 'नेचर ट्रेल्स' नावाचं अत्यंत सुंदर रिसॉर्ट उभारलं आहे. हे रिसॉर्ट तुम्हाला एका स्वतंत्र हिलस्टेशनचा आनंद देऊ शकतं. या सर्व ठिकाणांची उंची ही सरासरी दीड हजार फुटांपेक्षा जास्त नाही. त्यामुळेच कमी उंचीचे डोंगर आणि लहानखुऱ्या दऱ्या असं निसर्गाचं सौम्य रुप इथे पाहायला मिळतं. मुंबई-जव्हार हे अंतर सुमारे १८० किमी आहे. या सर्व ठिकाणी रेस्ट हाऊसेस असल्यामुळे राहण्या-खाण्याची चांगली व्यवस्था होऊ शकते. पावसाळ्यात तर ही ठिकाणं फारच सुंदर असतात. पण, उन्हाळ्यातही जायला काहीच हरकत नाही.

आणखीही बरीच ठिकाणं आहेत. 'माझी मुलुखगिरी', 'भटकंती' (राजहंस प्रकाशन) आणि 'ऑफबीट ट्रॅक्स इन महाराष्ट्र' या माझ्या तीन पुस्तकांत मी या साऱ्याच ठिकाणांची सगळी तपशीलवार माहिती दिलेलीच आहे. मनमुराद भटकण्यातून मला मिळालेला आनंद तुम्हालाही मिळो हीच सदिच्छा!

# डहाणू

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते डहाणू | | | | | 135 | | | | |
| **1** | गंभीरगड | | किल्ला | | | 45 | NE | | | |
| **2** | बोर्डी | समुद्रकिनारा | गुंफा | गार्डन | मंदिर | 19 | N | 52 | NW | |
| **3** | बोर्डी बीच | समुद्रकिनारा | | निसर्ग | | 15 | N | 2 | S | |
| **4** | नरपड | समुद्रकिनारा | सुरुचे बन | | | 5 | N | 12 | S | |
| **5** | डहाणूची महालक्ष्मी | | | | मंदिर | 0.5 | SE | 5 | SE | |
| **6** | डहाणू किल्ला | | किल्ला | | मंदिर | 3.5 | SW | 4 | SW | |
| **7** | तारापूरचा किल्ला | | किल्ला | | | 20 | SW | 18 | S | |




# गंभीरगड

ठाणे जिल्हा आणि दादरा नगर हवेलीच्या सीमेवर गंभीरगड हा किल्ला आहे. दाट जंगलाने वेढलेल्या या किल्ल्यावर जाण्यासाठी पश्चिम रेल्वेवरील बोईसर हे जवळचे स्थानक आहे.

## काय पहाल?

- गडावर जाताना एक पठार लागते, हे पठार म्हणजेच गंभीरगडाची माची होय. या माचीवर बऱ्याच मोठ्या प्रमाणात जंगल माजले आहे. माचीवर गडाचे कोणतेही अवशेष नाहीत. उजव्या डोंगर सोंडेवरुन गडमाथ्याकडे कूच करायचे, वाटेतच कातळात कोरलेले सुरेख पाण्याचे टाके लागते. या टाक्यांमधील पाणी पिण्यायोग्य आहे, मात्र पाणी काढण्यासाठी दोरी बरोबर असणे आवश्यक आहे. येथून पुढे वाट ही कातळकडा उजवीकडे ठेवून पायऱ्यांच्या साह्याने वर जाते. आपण १५ मिनिटांतच गडमाथ्यावर पोहचतो. येथे दोन वाटा फुटतात. प्रथम उजवीकडील वाटेने थोडे चढून गेल्यावर, काही वास्तूंच्या खुणा दिसतात. एक देवीचे छोटेसे मंदिरदेखील दिसते. पाण्याची एक दोन बुजलेली टाकी आढळतात. येथून परत माघारी फिरून डावीकडचा माथा फिरायला निघायचे. बराच वेळ वाट दगडधोंड्यांमधून पुढे जाते. गडावर पूर्वी तटबंदी असल्याच्या खुणा स्पष्टपणे जाणवतात. डाव्या बाजूच्या डोंगरावर सुध्दा



एखाद दोनच अवशेष आहेत. ते पहावयाचे आणि याच बाजूने खाली उतरण्यास सुरुवात करायची. वाटेत दोन- तीन पाण्याची टाकी लागतात. या बाजूला काही छोटे छोटे सुळके वर आलेले दिसतात. सर्व परिसर पाहण्यास एक ते दीड तास पुरतो. किल्ल्यावरून महालक्ष्मीचा सुळका, अशेरी, अडसूळ असा परिसर दिसतो.

## कसे जाल?

- कल्याण किंवा वाडामार्गे मनोर फाट्याला यावे. मनोर फाट्यावरून अहमदाबाद मार्गावरील चारोटी नाक्यावर उतरावे. चारोटीवरून एक मार्ग अहमदाबादकडे तर, दुसरा मार्ग जव्हारमार्गे नाशिककडे जातो. नाशिकच्या मार्गावर २ किमी अंतरावर असणाऱ्या कासागावात उतरावे.

## बोर्डी

पश्चिम रेल्वेवरील डहाणूनजिकचा बोर्डीचा समुद्रकिनारा सर्वात सुरक्षित किनारा म्हणून ओळखला जातो. भरतीच्या वेळी इथे मोठ्या लाटा येत नाहीत. डहाणूपासून सुरू झालेला आकर्षक बोर्डीचा किनारा पुढे जवळपास १७ किलोमीटर्सच्या विस्तीर्ण परिसरात पसरलेला आहे. मुख्य डहाणू शहरापासून अगदी जवळ असलेला हा किनारा अतिशय शांत आहे. बोर्डीच्या किनाऱ्याइतकेच इथले चिकूही प्रसिद्ध आहेत. शिवाय इथून जवळपास पाहण्यासारखी ठिकाणं म्हणजे महालक्ष्मी मंदिर, डहाणूचा किल्ला, असावली धरण, कल्पतरू बॉटनीकल गार्डन, मल्लिनाथ जैन तीर्थ कोसबाड मंदिर, झोरोष्ट्रीयन हेरीटेज म्युझियम. या प्रेक्षणीय ठिकाणांनाही तुम्ही भेट देऊ शकता.

**कसं जाल?**

पश्चिम रेल्वेच्या डहाणू रोड स्टेशनपासून २४ किलोमीटर्स अंतरावर बोर्डीचा सागरकिनारा सुरू होतो. विरारहून डहाणू रोडला जाण्यासाठी नियमित शटल ट्रेनची सोय उपलब्ध आहे. या शिवाय अनेक एक्स्प्रेस गाड्या डहाणू रोडला थांबतात. खासगी गाडीने जात असल्यास मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून बोर्डीला जाता येतं.



अनु.

वीकएन्ड

# अभ्रकांचा किनारा आणि चिकूच्या बागा

ऑक्टोबर सरला, तरी अंगाची काहिली थांबत नाही, अशी सध्या मुंबापुरीत स्थिती आहे.दिवाळीच्या सुट्टीत मोठी टूर झाली असल्यास फार खर्चही परवडणारा नसतो. अशा वेळी शॉर्टट्रिपच आवश्यक असते. बोर्डीच्या किनाऱ्यावर अशा प्रकारची ट्रिप नक्कीच होऊ शकते.

शुभ्र अभ्रकी किनारा आणि सभोवतालच्या पट्ट्यातल्या चिकूच्या बागा असं या भागाचं वर्णन. कित्येक पावलं किनाऱ्यावरच्या पांढऱ्या वाळूतून चालत जावं आणि थंडगार वारा अंगावर घेतानाच मस्त शहाळ्याचं पाणी प्यावं, हेच इथे येऊन ताजंतवानं होण्याचं इंगित. कोणत्याही कृत्रिम खतांचा वापर न करता फुललेली इथली नैसर्गिक शेती-बागायती पाहण्यासाठी एका अभ्यास दौऱ्यावर आम्ही गेलो असताना प्रत्येकाचं स्वागत शहाळ्याच्या पाण्याने करण्यात आलं होतं आणि त्यातली स्ट्रॉसुद्धा निसर्गातल्याच संपत्तीतली म्हणजेच पपईच्या देठापासून बनविलेली होती, ही आठवण अजूनही मनात ताजी आहे. कित्येक वर्षांत हा भाग तस्साच राहिला आहे. शांत, रम्य वातावरणात सुरूच्या बनातून डोकावणाऱ्या किरण शलाकांमध्ये बसल्यावर मावळतीच्या सूर्याचं लालबुंद रुप पाण्याला टेकेपर्यंत आपल्याला खचितच इथून उठावंसं वाटत नाही.


इथून जवळच असवलीचं धरण आहे. बाहरोटच्या गुहाही प्रसिद्ध आहेत. दूरदर्शनवरच्या रामायण मालिकेचं चित्रिकरण झाल्यामुळे याच परिसरातल्या उंबरगावला त्या काळात भरपूर प्रसिद्धी मिळाली. याच उंबरगावमध्ये कल्पतरू बोटॅनिकल गार्डन बघण्यासारखं आहे. जवळच कोसबाड भागात मल्लिनाथ जैन तीर्थमंदिरातही बरेच जण जातात.

बोर्डी-डहाणू-घोलवड या परिसरात गेल्यावर तुम्ही घरी परतताना चिकूच्या घाऊक खरेदीशिवाय परतलात असं होऊच शकत नाही. त्यामुळे तशी आणि

कित्येक वर्षांत हा भाग तस्साच राहिला आहे. शांत, रम्य वातावरणात सुरूच्या बनातून डोकावणाऱ्या किरण शलाकांमध्ये बसल्यावर मावळतीच्या सूर्याचं लालबुंद रुप पाण्याला टेकेपर्यंत आपल्याला खचितच इथून उठावंसं वाटत नाही.

तितपत रिकामी जागा तुम्हाला तुमच्या बॅगेत जातानाच करून ठेवायला हवी.

इथे पोहोचायचं कसं हे सांगायचं राहून गेलं. पश्चिम रेल्वेवर विरारवरून पुढे निघाल्यावर घोलवड रेल्वे स्थानकावर उतरायचं. तिथून माणशी पाच-दहा रुपयात रिक्षाने बोर्डीपर्यंत येता येतं. सगळा प्रवास चार तासांत सहज होतो. गाडी घेऊन आल्यास मुंबई-अहमदाबादच्या पश्चिम द्रुतगती मार्गावर चारोटी नाक्यावर डहाणूकडे वळायचं. डहाणूवरून साधारण पंचवीसएक किलोमीटरवर घोलवडमार्गे बोर्डीत पोहोचता येतं.



बोर्डी



अनु.

# बोर्डी बीच

**महाराष्ट्र- गुजरातच्या** सीमेवर असलेलं बोर्डी हे लहानसं गाव तिथल्या सुरक्षित समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. डहाणूपासून सुरु झालेला हा किनारा बोर्डीपर्यंत पाहता येतो. जवळच असलेला घोलवड गावात चिकू पिकत असल्याने सर्वत्र चिकूची झाडं बघायला मिळतात. हा समुद्रकिनारा इथल्या नैसर्गिक सौंदर्यासाठी आणि शांततेसाठी प्रसिद्ध आहे. गावापासून जवळ असला तरी त्याला कोणत्याही प्रकारच व्यावसायिक स्वरूप आलेलं नाही. समुद्रावरची रेती काळ्या चॉकलेटी रंगाची असून थोडीशी चिकट आणि नैसर्गिक आहे. या किनाऱ्याला कुठल्याही प्रकारची नकली सजावट न केल्यामुळे तो आजही खूप रिफ्रेशिंग वाटतो. शिवाय समुद्राजवळ राहण्यासाठी झोपड्यांच्या आकारांचे कॉटेजेस तयार केले आहेत. जेणेकरून समुद्रकिनारी राहायचा आनंद घेत येईल. सूर्योदय आणि सूर्यास्त पाहत ओल्या वाळूतून फिरायचं सुख या समुद्रावरुन घेता येतं.

## कसं जाल ?

मुंबई पासून अंदाजे १५० किमीवर असलेलं हे ठिकाण जाण्यासाठी जवळ आहे. डहाणूपर्यंत ट्रेनने किंवा आसनगावपर्यंत लोकलने जाऊन पुढे रस्तेमार्गे जाण्याची सोय आहे. शिवाय खासगी वाहन घेऊन मुंबई-अहमदाबादद हायवेने जाता येतं.

## आणखी काय पहाल?

मुंबई-अहमदाबाद हायवेवरील चारोटी नाक्याजवळ सुप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर आहे.




अनु.




ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात नरपड हे गाव समुद्रकिनारी वसलेले असून निसर्ग सौंदर्याने नटलेलं आहे. मुंबईपासून अवघ्या दोन तासांच्या अंतरावर हे पर्यटनस्थळ असून डहाणू-विरार शटल एक-एक तासाने सुरू असतात. शिवाय मुंबई सेंट्रल, वांद्रे टर्मिनसहून रेल्वेच्या गाड्या सुटतात. पश्चिम रेल्वेच्या डहाणूरोड स्टेशनवर उतरा. रिक्षा किंवा बस पकडा. आठ-दहा मिनिटांतच नरपडचा निसर्गरम्य समुद्रकिनारा गाठता येतो. मुंबईकर पर्यटकांना प्रवाशांच्या दृष्टीने सोयीचं ठिकाण शिवाय टिपिकल खेडेगाव. शांत परिसर यामुळे या ठिकाणी अजून तरी केळवे बीचसारखा धांगडधिंगा होत

या ठिकाणी




शिर्डीप्रमाणेचं साईबाबांचं भव्य मंदिर आहे. ताडामाडांची, सुरूची, नारळांची उंच झाडं आणि विस्तीर्ण समुद्रकिनारा असल्याने या स्थळाला 'मिनी शिर्डी', 'मिनी गोवा' असंही पर्यटक म्हणतात. एक-दोन दिवसांच्या पर्यटनासाठी स्थळ प्रवाशांच्या दृष्टीने सोयीचं आणि मध्यमवर्गीयांना परवडणारं आहे.

साईबाबांचं गाव म्हणूनही भाविक पर्यटक या ठिकाणी भेट देतात. पर्यटकांच्या सोयीसाठी या ठिकाणी गेस्टहाऊस आहेत. घरगुती पद्धतीचं जेवण व इतर सुविधा हव्या असल्यास तशीपण सोय आहे. इकडे यायचीपण गरज नाही. मुंबईतच २८९५९८५५ हा नंबर फिरवा वनराईत, नारळीच्या बागेत १०० टक्के घरगुती पद्धतीने व्यवस्था होते. सकाळी उठल्यावर सुरूच्या बागेतून फेरफटका मारावा. समुद्रात यथेच्छ डुंबावं. कुठे घाई गर्दी नाही. या ठिकाणाहून कोसबाड,

डहाणूपर्यंतच्या किनाऱ्यालगतच्या पाण्यात असंख्य लहान-मोठी जहाजं हेलकावे खाताना दिसतात.

हे पर्यटन स्थळ आणखी एका 'नॅचरल' पेयासाठी प्रसिद्ध आहे. ते म्हणजे निर्भेळ आणि शुद्ध ताडी. नरपड हे ताडीचं माहेरघर आहे. या ठिकाणाहून मुंबईला ताडी पाठवली जाते. पण धंदेवाईक वृत्तीमुळे मुंबईकराना निर्भेळ ताडी मिळत नाही. म्हणून काही रसिक, गुलहौशी पर्यटक खास ताडीचा आस्वाद घेण्यासाठी नरपड गाठतात. शुद्ध आणि पौष्टिक शिवाय गोड ताडी मिळण्याचं खात्रीचं ठिकाण. सकाळी सकाळी समुद्रावर फेरफटका मारल्यावर ताडी शौकिन ताडीचा मांडव गाठतात. मस्त गोड गोड ताज्या ताडीचा आस्वाद घेतात. ताडीच्या बनात एखादा झावळ्याचा मंडप असतो. एखादी लाकडाची खाटली, आजूबाजूच्या झाडांना मडकी लटकलेली असतात. तलवाडे (ताडी काढणारे कारागिर) गळ्यात सापासारखा दोर अडकवून झाडावर चढतात आणि ताजी गोड ताडी पर्यटकांना तिथेच पिता येते.



गाव नसलेल्या मुंबईकरांना गावाला गेल्याचा आनंद लुटता येईल. कृत्रिम सहलीला वैतागला असाल तर हा 'स्पॉट' खचितच आवडेल. मग कधी निघताहात निसर्गरम्य नरपडच्या पर्यटनाला.

## डहाणूची महालक्ष्मी

मुंबई-अहमदाबाद हायवेवर चारोटी नाक्याजवळ महालक्ष्मी देवीचं प्रसिद्ध मंदिर आहे. महाराष्ट्र-गुजरात सीमेपासून जवळच आणि हायवेला लागून असल्याने भाविकांची इथे कायम वर्दळ असते. दरवर्षी मार्च-एप्रिल महिन्याच्या दरम्यान इथे खूप मोठी जत्रा भरते. आकाशपाळणे, खेळण्यांची दुकानं, खाद्यपदार्थांची रेलचेल, मुलांसाठी वेगवेगळे खेळ यामुळे ही जत्रा रंगतदार असते.

मुंबईहून जायचं असल्यास डहाणू स्टेशनला उतरायचं. तिथून बस-रिक्षा किंवा जीप मिळतात. मुंबई-अहमदाबाद हायवेवर चारोटी नाक्याजवळ महालक्ष्मी देवीचं हे मंदिर आहे.

# डेस्टिनेशन किल्ले डहाणू



■ श्रीपाद भोसले »

**ऊन्हाच्या झळा चुकवत फिरायला जायचं असेल, तर निसर्गरम्य डहाणूला भेट द्यायला हवी.**

उन्हाळ्यात फिरायला ज झळा आणि घामाच्या धारापासून सुटका नसते. पण, तरीही फिरायला जायचं असेल, तर फार लांब जायला नको. ठाणे जिल्ह्याला लाभलेल्या विस्तीर्ण किनाऱ्यावरचा गारवा अनुभवता येईल. ठाण्यातलं, खाडी समुद्राने वेढलेलं एक निसर्गरम्य ठिकाण म्हणजे डहाणू. ठाण्याच्या उत्तरेकडचा शेवटचा सागरी किल्ला म्हणजे किल्ले डहाणू. सागर किनाऱ्यावर डौलाने नांगर टाकून उभ्या असलेल्या होड्या आणि त्यावर फडकणारे लाल, पिवळे, हिरवे झेंडे... संपूर्ण किनारपट्टी, नारळी-पोफळीच्या झाडांनी व्यापली आहे.

डहाणू किल्ल्याकडे जाण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या डहाणू रेल्वे स्थानकावर उतरायचं. गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या मेल किंवा शटल एक्स्प्रेसही इथे थांबतात. डहाणू हे तालुक्यातलं प्रमुख ठिकाण असल्याने बससेवाही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. डहाणू गावात गेलं की डाव्या हाताला प्रशस्त डांबरी सडक गेलेली दिसते. या चौकातच वडाच्या झाडाच्या डाव्या बाजूने डांबरी सडकेने चालत गेलं, की वीस मिनटांत किल्ला गाठता येतो. गड प्रवेशद्वारावर पोहोचताच थोडा अचंबा वाटतो. कारण आजही इथे पोलिस तैनात असलेले दिसतात.

इसवी सन १००च्या सुमारास नाशिक इथे कोरलेल्या सहस्त्ररश्मी गुंफेमधे नहापन राजाचा जावई उहापन याने कोरलेल्या शिलालेखात डहाणू किल्ल्याचा उल्लेख आढळतो. सध्या गडावर तहसीलदार कार्यालय आणि पोलिस कोठडी आहे. प्रवेशद्वारावरच एक तोफ आपलं स्वागत करते. गडप्रवेश केल्यावर डाव्या हाताच्या पायऱ्या गडाच्या ध्वजस्तंभाकडे जातात. इथून आसपासचा बराच


परिसर व्याहाळता येतो. वडाच्या झाडांनी तटबंदीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. पायऱ्यांच्या बाजूने एक वाट खाली गेलेली दिसते, ते आहे गडाचं दुसरं प्रवेशद्वार. ही वाट थेट वस्तीत जात असल्याने या प्रवेशद्वाराला कुलुप लावण्यात आलं आहे. गडाची बरीच पडझड झाली असली तरी इथल्या देवीची पूजा मात्र रोज होते. गडावर छोटेखानी विहीर आहे. तिचं पाणी आजही वापरण्यायोग्य आहे.

गडावर सतराव्या शतकाच्या सुमारास लोखंडाच्या आणि पंचधातूच्या तोफा असल्याचा उल्लेख आहे. गडावर काही पोर्तुगीज सैन्य आणि इसाई कुटुंबं राहत होती. गुजरातच्या राजासह इसवी सन १५३३ मधे झालेल्या तहात पोर्तुगिजांनी व्यापारासाठी डहाणू बंदर ताब्यात घेतलं, तर राजर्षी रामोजी शिंदे यांनी ११ जानेवारी १७३९ रोजी डहाणू शिताफीने जिंकला. पुढे काही काळ हा किल्ला इंग्रज आणि पुन्हा मराठ्यांकडे आला. अखेर १८८८ मधे या किल्ल्याचं पोलिस कचेरीत रुपांतर झालं. ठाणे जिल्ह्यात अशा अनेक ऐतिहासिक वास्तू सागर किनाऱ्यावर गिर्यारोहकांसोबत पर्यटकांचीही वाट पाहत आहेत.

मुंबई-डहाणू-पालघर हा संपूर्ण प्रवास साधारणतः ३०० किलोमीटर्सचा आहे. मुंबईहून निघायचं असेल तर मुंबई-अहमदाबाद हायवेवरुन सकाळीच निघालं की साधारणतः तीन तासांत डहाणूला पोहोचता येतं आणि मग सुरु होते ती या किल्ल्यांची सफर.


## डहाणू तारापूरचा किल्ला

डहाणू ते बोर्डी हे १६ किलोमीटर्सचं अंतर कापून बोर्डीला पोहोचलं की तिथला समुद्रकिनारा पाहता येतो. तिथून डहाणूला परत येऊन डहाणू किल्ला, सिद्धेश्वर मंदिर पाहता येतं. डहाणूच्या किल्ल्याची तटबंदी आणि बुरुजांना आता वडाच्या पारंब्यांनी विळखा घातला आहे. या किल्ल्यात आता तहसिलदार आणि कार्यकारी दंडाधिकारी यांचं कार्यालय आहे. डहाणूचा किल्ला चहुबाजूंनी चालत बघता येतो. किल्ल्याच्या समुद्राच्या दिशेने एक मोठा पूल खाडीवर बांधण्यात आला आहे. तो ओलांडून तारापूरला येता येतं. तारापूरचा किल्ला हा तारापूर बसस्थानकापासून केवळ २०० मीटर अंतरावर आहे. किल्ल्याची तटबंदी मजबूत असून ती उंचही आहे. तटबंदीला लागून हनुमानाचं छोटंसं पण सुंदर मंदिर आहे. किल्ल्याच्या आतल्या बाजूला आंब्याच्या आणि नारळाच्या बागा आहेत. तारापूरचा किल्ला पाहण्यात संध्याकाळ झाली तर बोईसरला हॉटेल्सवर राहण्यासाठी यायचं



# ठाणे जिल्हा
## शहापूर

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते शहापूर | | | | | 75 | | | | |
| **1** | वापे | निसर्ग पर्यटन केंद्र | | | | 27 | NW | | | |
| **2** | माहुली | | किल्ला | | | 7.5 | NW | 29 | E | |
| **3** | आजोबा पर्वत | | | ट्रेक | | 42 | E | 51 | E | |




या पर्यटन केंद्राचे खरे वैशिष्ट्य म्हणजे ते सरकारी वन विभागाचे असले तरी ते चालवणार आहे एक गाव. या गावाने जंगल वाचवण्यात व वाढवण्यात महत्वाची भूमिका बजावल्याने हे निसर्ग केंद्र सरकारने त्यांच्याकडे चालवायला द्यायचे ठरविले आहे. अशा प्रकारचा महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रयोग. मुंबईपासून जवळ शहापूरपाशी हे नवे पर्यटन केंद्र साकारले आहे...



# हिरवी हाक; वन खात्याची!



अनु.

सभोवताली हिरवीगार वनराई, काठोकाठ भरलेली भातसा नदी, उन्हाची तोशीसही पडू न देणारा वारा, विविध औषधी वनस्पतींचे जाळे, भातसा नदीत बोटींग करण्याची सोय अशा या नयनरम्य वातावरणात निसर्गाच्या सहवासात एकदोन दिवस राहण्याची सोय होत असल्याने रिलॅक्स होण्यासाठी मुंबई आणि ठाणेकरांना इगतपुरी, सापुतारा, अलिबाग अशा ठिकाणी



जाण्याची गरज नाही. कारण मुंबईपासून केवळ दीड तासावर शहापूरजवळ भव्य निसर्ग पर्यटन केंद्र आकाराला येत आहे.


मुंबई-नाशिक महामार्गाचे चौपदरीकरण सुरु झाल्यापासून मुंबईहून नाशिक आणि नाशिकहून

# निसर्ग आणि पर्यटन

♦ प्रकाश परांजपे

मुंबईकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांची संख्या कमालीची वाढली आहे. रोज किमान पाच हजार कार दोन्ही बाजूंनी जात-येत असतात. तर शनिवार, रविवार आणि सुटीच्या दिवशी हे प्रमाण वाढून ते दहा हजारांच्या पुढे जाते. रोजच्या धकाधकीच्या वातावरणातून दोन विरंगुळ्याचे क्षण मिळावे म्हणून बरेच मुंबईकर नाशिक आणि अन्य ठिकाणी जात असतात.

आता मुंबईपासून केवळ दीड-दोन तासावर, आणि महामार्गापासून अवघ्या दीड किलोमीटर



अंतरावर वापे या गावात एकरात हे भव्य निसर्ग पर्यटन केंद्र उभे राहत आहे. विशेष म्हणजे, राज्य सरकारच्या वन खात्याने पुढाकार घेऊन हे केंद्र उभे केले आहे. त्याचे दोनच दिवसांनी उद्घाटन होत आहे.

हे केंद्र अनेक बाबतीत वैविध्यपूर्ण असणार आहे. निसर्गाच्या प्रसन्न सान्निध्याचा तर अनुभव येथे मिळणार आहे. याचे एक कारण म्हणजे या केंद्रात राहण्यासाठी तंबू असतील. या तंबूमध्ये आवश्यक त्या सर्व सोयी असतील. या केंद्रातल्या कॅन्टिनमधील पदार्थही निसर्गाशी नाते सांगणारे असतील. विशेष म्हणजे, हे पदार्थ खास बनवलेल्या पत्रावळीवर दिले जाणार आहेत.

इथले तंबू विशेष म्हणजे जवळपास वीस फूट उंचीवर असणार आहेत. म्हणजे हँगिंग टेन्ट. महाराष्ट्र सरकारच्या वनाधिकाऱ्यांनी इंटरनेटवर असा टेन्ट कुठे आहे का, याचा शोध घेतला. पण त्यांना तो कुठेही असल्याचे आढळून आले नाही.

या टेन्टमधून भातसा नदीचे विहंगमदृष्य दिसणार आहे.

या पर्यटन केंद्राच्या एका भागात फुलपाखरे स्वच्छंद विहार करतांना दिसणार आहेत. फुलपाखरांना प्रिय अशी क्रोटोलेरिया, बेल, आईन, शेवंती, निर्गुडी, कणेर, चाफा यासारखी झाडे लावण्याची दक्षता घेण्यात आली आहे. तर एका भागात वाळवंटाचा फील यावा म्हणून साप, सरपटणारे प्राण्यांची मॉडेल्स आणि निवडुंगाच्या असंख्य जाती असतील.

या केंद्रात भारतीय नौसेनेचा एक विभाग असेल. यात नेव्हीने देऊ केलेल्या नऊ बोटी ठेवण्यात येणार आहेत. या बोटीबरोबर रक्षकही असतील. या विभागात नौदलाची सारी माहिती देण्यात येईल. तरुणांनी नौदलात येण्यास उद्युक्त व्हावे, असा यामागचा उद्देश आहे. हा विभाग सर्व सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी नौदलाचे वरिष्ठ अधिकारी जातीने लक्ष घालत आहेत.

आता सहावी ते अकरावीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरणाचा विषय आहे. या केंद्रात या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणावरचा एक दिवसाचा भरगच्च कार्यक्रम असेल. विद्यार्थ्यांना दिवसभरात झाडे कशी लावावीत, झाडांसाठी पॉलिथिनच्या बॅगा कशा कराव्यात, झाडांची निसर्गातील भूमिका याची माहिती देण्यात येईल. तसेच, पर्यावरणावरील डॉक्युमेंटरी दाखवण्यात येईल. त्याचबरोबर त्यांना वनाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करता येईल. हा एक दिवसाचा खास कार्यक्रम मुलांसाठीच तयार करण्यात आला आहे.

शतावरी, सर्पगंधा, लेंडीपिंपळी, बेडकी, कदंब, पांगिरा, कोरफड, गुळवेल आदि ८० प्रकारची औषधी झाडे व वनस्पती इथे लावण्यात आल्या आहेत. कोणत्या आजारावर त्या उपयुक्त आहेत याची माहिती देणारे गाईडही इथे असणार आहेत. या केंद्राच्या बाजूनेच वाहणाऱ्या भातसा नदीत बोटिंग करता येईल. त्यासाठी जेटी तयार करण्यात आली आहे. दोन मोटार बोटी, चार पॅडल बोटी आणि दोन बांबूच्या बोटी पर्यटकांच्या दिमतीस असतील. टेन्टबरोबरच इतर टेन्ट आणि काही कारवीने बनविलेल्या झोपड्याही इथे असणार आहेत. तेथेच राहून वनभोजनाचा आनंदही घेता येणार आहे.

शहापूर तालुक्यातील भागदळच्या गावकऱ्यांनी संयुक्त वन व्यवस्थापनाचे काम उत्कृष्ट केल्याने या केंद्राचे व्यवस्थापनही या गावाकडेच देण्यात येणार आहे. यासाठी या गावातील तरुणांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आले आहे. अशा स्वरूपाचाही हा पहिलाच प्रयोग आहे. या केंद्रातून मिळणारा शंभर टक्के नफा हा भागदळ गावाच्या विकासासाठी संयुक्त व्यवस्थापन समितीकडे दिला जाईल.

अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्याने सोडली तर वनक्षेत्रात उभे राहणारे हे महाराष्ट्रातले पहिलेच निसर्ग पर्यटन केंद्र आहे. या केंद्रामुळे महाराष्ट्रात पर्यटनातील एका नव्या प्रयोगाची सुरुवात होत आहे.

अनु.

# माहुलीचा थरार

आसनगाव-शहापूरमध्ये प्रवास करताना डावीकडे एक भलामोठा आणि दूरवर पसरलेला डोंगर आपलं लक्ष सतत वेधत असतो. क्षणभरही आपली नजर या डोंगररांगेवरून हटत नाही. त्या डोंगररांगेतले सुळकेही तितकेच लक्षवेधी असतात. यातला एक सुळका आपलं काळंकभिन्न अस्तित्व गेली हजारो वर्षं दिमाखाने मिरवत उभा आहे. हा आहे माहुली किल्ला! नवरा, नवरी, नवऱ्याची करवली, नवरीची करवली, लूझ बोल्डर, वजिर आणि पॉन... कसलेल्या रॉक क्लायम्बर्सना आव्हान देणारे हे सह्याद्रीतले सुळके. एवढे जबरदस्त सुळके आणि कडे आपल्या अंगावर मिरवणारा माहुली हा सह्याद्रीतला एकमेव डोंगर असावा.

या बुलंदीमुळेच शहाजीराजांनी आपल्या अडचणीच्या काळात सुरक्षिततेसाठी या किल्ल्याचा आश्रय घेतला असावा. नंतर त्यांना हा किल्ला शत्रूला द्यावा लागला. शिवाजी महाराजांनी ८ जानेवारी १६५८ रोजी हा किल्ला परत जिंकून स्वराज्यात आणला. त्या घटनेला या महिन्यात ३५१ वर्षं पूर्ण झाली. या गूढरम्य डोंगररांगेशी आणि त्यावरच्या माहुली किल्ल्याशी भटक्यांचे पिढ्यानुपिढ्या पाश गुंतलेले आहेत. माहुलीचा ट्रेक न केलेला डोंगरभटक्या सापडणं तसं दुर्मिळच!

सह्याद्रीच्या मुख्य पर्वतरांगेपासून विस्तीर्ण पसरलेला माहुलीचा डोंगर आपला स्वतंत्र संसार मांडून आहे. इथलं सगळंच विलक्षण आहे. या डोंगररांगेतल्या छाती दडपवून टाकणाऱ्या कडे-कपाऱ्यांबरोबरच या परिसरातलं तसंच डोंगमाथ्यावरचंही जंगल घनदाट आहे. मागच्या बाजूला गर्द झाडीने वेढलेला तानसा हा मोठा जलाशय आहे.

आसनगावहून हायवे ओलांडला की साधारणपणे पाच-साडेपाच किलोमीटरवर पायथ्याचं माहुली गाव लागतं. रेल्वेलाइन पकडून कसाऱ्याच्या दिशेने गेल्यास येणाऱ्या फाटकातून डावीकडे वळल्यानंतरही माहुली गावाकडे जाणारी पायवाट लागते. गावाबाहेर मोकळ्यावर ओढ्याच्या काठावर शंकराचं एक देऊळ आहे. या देवळात मुक्कामही करता येतो. माहुलीचा ट्रेक तसं पाहिलं तर सोपा आहे. परंतु पहिल्यांदा इथे येणारी मंडळी वाट चुकतात आणि सगळा ट्रेक फसतो. डोंगराकडे तोंड करून उभं राहिल्यानंतर उजवीकडे जाणाऱ्या पायवाटेवरून बरीच पायपीट केल्यानंतर वर जाणारी एक वाट लागते. ही वाट डोंगराच्या एका सोंडेवरून जाते. चढण तशी हलकी आणि झाडीतून जाणारी आहे. या चढणीनंतर एक लहान लोखंडी शिडी चढून गेलं की आपण डोंगरमाथ्यावर पोहोचतो. इथून थोडं उजवीकडे गेल्यानंतर किल्ल्याचे भग्नावशेष आणि दरवाजा लागतो. इथेच दोन लहान गुहा आणि पाण्याचं एक टाकं आहे. गडावरच्या मुक्कामासाठीचा हा एकमेव आसरा आहे. इथून





अनु.


पुढे उजवीकडे दूरवर सगळा डोंगरमाथा पसरलेला आहे. डोंगराच्या शेवटी 'वजिर' हा भीमकाय सुळका आहे. इथूनच मागे पसरलेला तानसाचा रम्य परिसर दिसतो. पायथ्यापासून वरपर्यंत वाटेत, अगदी पावसाळ्यातही, पाणी मिळत नाही.

गेली कित्येक वर्षं माहुलीचा ट्रेक डोंगरभटक्यांना भुरळ घालत आला आहे. मुंबई, ठाणा आणि पुण्याकडच्या रॉक क्लायम्बर्सना या ट्रेकचं अधिक आकर्षण वाटत आलं आहे. महाराष्ट्रात रॉक क्लायम्बिंगची मुहूर्तमेढ रोवण्यात आली ती १९७८ च्या डिसेंबर महिन्यात. 'हॉलिडे हायकर्स'नी लिंगाणावर यशस्वी चढाई केली होती. त्यामध्ये हिरा पंडित, संतोष गुजर, अनिल पटवर्धन आणि तुकाराम जाधव यांचा समावेश होता. त्यानंतर सह्याद्रीतले आकाशाला भिडणारे सुळके सर करण्याची रोमहर्षक परंपराच चालू झाली. मिलिंद पाठक, दिलीप झुंजारराव, छत्रपती पुरस्कार विजेते प्रजापती बोधणे आणि प्रदीप केळकर, अरुण सावंत, चारूहास जोशी, संजय बोरोले, वसंत लिमये, जगन्नाथ राऊळ, सागर ओक, अभिजित दांडेकर, राजेश गाडगीळ अशा अनेक गिर्यारोहकांच्या असामान्य कामगिरीने महाराष्ट्रातल्या गिर्यारोहणारी पताका जगभर फडकत राहिली.

माहुलीतला सर्वात मोठा सुळका म्हणजे 'नवरा'. यावर पहिला झेंडा रोवला 'हॉलिडे हायकर्स' आणि 'केव्ह एक्सप्लोअरर'च्या दिलीप झुंजारराव, रमाकांत महाडिक आणि दिलीप धुमाळ यांनी. नंतर १९८४ च्या डिसेंबर महिन्यात 'हॉलिडे हायकर्स'च्याच मिलिंद पाठक आणि प्रजापती बोधणे या जोडीने 'वजिर' हा सुळका सर केला. त्यानंतर पुढल्याच वर्षी या जोडीने इथला सगळ्यात धोकादायक आणि जीवघेणा 'लूज बोल्डर' हा सुळका सर करून सगळ्यांनाच थक्क केलं. माहुलीतले सुळके सर करताना एका अपघाताचीही नोंद झाली आहे. २७ डिसेंबर १९९२ रोजी 'नवरा' सर करताना अनिलकुमार यांचा अपघाती मृत्यू झाला होता. सुळक्यांच्या समूहामध्ये 'नवरा' हा सर्वात मोठा सुळका असला तरी 'नवरी', दोन्ही 'करवल्या' आणि 'वजिर' हे सुळके रॉक क्लायंबर्ससाठी सर्वाधिक आव्हानात्मक आहेत. त्यातही उंचीने लहान असला तरी 'लूज बोल्डर' सर्वांत कठीण आणि धोकादायक आहे. धोकादयक असूनही माहुलीचे सुळके गिर्यारोहकांना साद घालत राहतील, यात शंकाच नाही.







# माहुलीचा इतिहास जागवताना

महाराष्ट्रातल्या इतर किल्ल्यांप्रमाणेच माहुली इतिहासाबद्दल फारसा बोलत नाही. भंडारगडावरील चोर दरवाजातल्या शिलालेखाव्यतिरिक्त कुठल्याही लिखित नोंदी माहुलीवर नाहीत. परंतु त्याचा ज्ञात इतिहास खरोखरच अभिमानास्पद आहे. या किल्ल्याचं बांधकाम शिलाहारांच्या काळात झालं, असा उल्लेख ठाणे जिल्हा गॅझेटिअरमध्ये सापडतो. परंतु माहुली किल्ल्याचाच एक भाग असलेल्या भंडारदुर्गावरील पाण्याच्या टाक्यावरून तो शिलाहारांपूर्वीच्या काळातही अस्तित्वात असावा. याला प्रमाण म्हणजे या पाण्याच्या टाक्याची बांधणी. अशी बांधकामं लेण्यांचा काळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातवाहन कालखंडात केली जात.

किल्ल्याचा ठोस पुराव्यांवर आधारित इतिहास १४८५ पासून सुरू होतो. १४८५ मधे निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमदने कोकणातील इतर किल्ल्यांबरोबरच माहुलीचा किल्लाही ताब्यात घेतला. १६३५ मधे संगमनेर जवळच्या पेमगिरी किल्ल्यावर शहाजी राजांनी निजामाचा शेवटचा वंशज मूर्तीजा याला निजामशाह म्हणून घोषित केलं. निजामशाही संपवण्यासाठी १६३५ मधे शाहजहान स्वतः महाराष्ट्रात उतरला होता. विजापूरच्या आदिलशहाला त्याने आपल्या बाजूला वळवलं. निजामशाही वाचवण्याच्या धामधुमीत पेमगिरी-जीवधनचा किल्ला सोडून शहाजीराजांनी लहानगा शिवबा आणि जिजाऊंसह माहुलीचा आश्रय घेतला. १९६३ मधे मुघल सेनापती खानजमान आणि रणदुल्लाखान यांनी माहुलीला वेढा दिला आणि शहाजीराजे आणि निजामशहाची कोंडी केली. ऑक्टोबर १६३६ तहामधे शहाजीराजांना माहुलीचा किल्ला खानजमान आणि रणदुल्लाखानाकडे सुपूर्द करावा लागला. निजामशाही बुडाली आणि त्याचबरोबर शहाजीराजांचे मराठेशाहीचं स्वप्न भंगलं. त्यांना आदिलशहाची चाकरी स्वीकारणं भाग पडलं. शहाजीराजांची बंगळूरला रवानगी करण्यात आली. त्यानंतर माहुलीचा किल्ला कधी मोगलांकडे तर कधी मराठ्यांकडे ये-जा करत राहिला. १६५७ मधे कल्याण-भिवंडी फत्ते करून स्वराजाच्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवून शिवाजी महाराज जातीने माहुलीवर चालून गेले. ८ जानेवारी १६५८ मधे शिवाजी महाराजांनी तो मोगलांकडून जिंकला आणि शहाजीराजांच्या पराभवाचे उट्टं फेडलं. पुढील केवळ आठ वर्षं माहुली स्वराज्यात होता. १६६५ मधे मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखानाबरोबर झालेल्या पुरंदरच्या तहात माहुलीचा ताबा पुन्हा मोगलांकडे गेला.

शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका होताच उत्तर कोकणाच्या मोहिमेदरम्यान शिवाजी महाराजांनी १५०० मावळ्यांसह जातीने रात्री अचानक छापा घालून माहुलीचा किल्ला काबीज करण्याचा प्रयत्न केला. पण या मोहिमेत १००० मराठे कापले गेले. फारच जबर फटका महाराजांना बसला. मात्र महाराजांनी लवकरच संधी साधली. मोरोपंत पिंगळ्यांनी माहुलीस वेढा दिला. सुमारे दोन महिने माहुलीस वेढा टाकून हल्ले सुरू होते. १६ जून १६७० रोजी निकाराचा एल्गार झाला आणि माहुलीवर पुन्हा एकदा मराठ्यांचे निशाण चढले, असं या लढाईचं वर्णन



अनु.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केलं आहे. तेव्हापासून १८१७ मधील इंग्रज आणि पेशवे यांच्यातल्या पुणे तहापर्यंत जवळजवळ दीडशे वर्षं या किल्ल्याचं स्वामित्व मराठ्यांकडे होतं. एक अभेद्य तसंच महाभयंकर किल्ला (Formidable Fort) म्हणून या किल्ल्याचं वर्णन ठाणे जिल्हा गॅझेटियरमधे सापडतं.

१८१८ मधे कॅप्टन डिकन्सन नामक इंग्रज अधिकारी माहुलीवर आला. त्याने स्वत: फिरून माहुलीचं सर्वेक्षण केलं. सन १८१८ मधील कॅप्टन डिकिन्सनच्या भेटीपर्यंत गडावरील काही वास्तू शाबूत होत्या. मात्र १८६२ च्या आसपास किल्ल्याचं आणखी नुकसान झालं आणि किल्ल्यावरची तटबंदी जवळपास नष्ट झाली. माहुलीच्या दक्षिणेकडील एका घळीत एक दरीच्या तोंडाशी एक वैशिष्ट्यपूर्ण तुरुंग असल्याचं गॅझेटिअरमधे म्हटलं आहे.

शिवाजी महाराजांच्या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या उपस्थित रायगडावर झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्रातील अनेक पवित्र तीर्थक्षेत्रं आणि किल्ल्यांवरील पाण्याने महाराजांच्या समाधीला अभिषेक करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील ३०० हून अधिक तीर्थक्षेत्रं आणि किल्ल्यांवरून आणलेल्या पाण्याचे कुंभ रायगडावर आणले होते. राजांच्या समाधीवर अभिषिक्त होण्याचा पहिला मान होता तुळजापूरहून आणलेल्या जलकुंभाचा. त्यानंतर शिवनेरी आणि त्यानंतर महाराजांचं बालपण पाहिलेल्या माहुलीच्या गडगंगेला तिसरं मानाचं पान देऊन गौरवण्यात आलं होतं.

माहुलीवर आढळणारे घरांचे प्रशस्त चौथरे, तलाव तसंच मानवी वस्तीच्या खाणखुणा पाहता एकेकाळी या किल्ल्यावर प्रचंड वस्ती असावी. मात्र आता किल्ल्यावर उरले आहेत काही वीरगळ, भग्न तटबंदी, दगडधोंडे, चौथरे आणि मानवी वस्तीच्या खुणा दर्शवणारी आंबा, फणस, बकुळीची झाडं...




पाऊस जोर धरू लागला की सह्याद्रीच्या डोंगरकपाऱ्यात धुंद वातावरण पसरू लागतं. सगळ्या डोंगररांगा मेघांनी वेढल्या जातात. मग निसर्गप्रेमींच्या पावलांना या डोंगरी वाटा हाका मारायला लागतात. त्यांची पावलं आपसूकच या वाटांकडे धाव घेतात. मुंबई-ठाण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असणाऱ्या या डोंगररांगांमध्ये असंख्य सुंदर ठिकाणं आहेत. असंच एक अगदी शांत आणि निसर्गरम्य ठिकाण म्हणजे आज्या पर्वत, आजोबा. हा अगदी सोपा ट्रेक आहे. नाशिक हायवेवरच्या शहापूरहून इथे जायला फाटा आहे.

हा आहे एक थोरला डोंगर. याला बहुतेक त्याच्या आकारावरूनच 'आजोबा' किंवा 'आजा पर्वत' नाव पडलं आहे. हा सह्याद्रीचा पुराणपुरुष. नुसतं नावच 'आजोबा' नाही तर सगळा प्रदेशही गर्द रानाचा आणि बेलाग कडेकपाऱ्यांचा असल्याने इथे सह्याद्रीची सगळी समृद्धी एकवटलेली आहे. साहजिकच निसर्गभटक्यांना या परिसराचं खूप आकर्षण आहे. त्यात इथे मोठ्या कड्याखालच्या घनदाट जंगलात वाल्मिकी ऋषींचा आश्रम असल्याने त्याला श्रद्धेचाही पदर आहे.

घाटावरून आजा पर्वतावर (समुद्रसपाटीपासून ४५११ फूट) जाण्याच्या अनेक रानवाटा आहेत. सगळ्या वाटा भंडारदारा तलावाच्या रतनगड, घनचक्कर, खतरा या किल्ल्यांच्या परिसरातल्या करोली घाट, दर्या घाट, पाथर्डी घाट या सह्याद्रीतल्या अतिदुर्गम भागातून जातात. घाटावरून कुठूनही गेलं तरी पोहोचायला एक पूर्ण दिवस लागतो. या वाटा घनदाट रानांतून आणि कडेकपाऱ्यांतून जात असल्याने स्थानिक माणूस सोबतीला आवश्यक ठरतो.

आजोबाला जाण्याचा सगळ्यात सोपा आणि जवळचा मार्ग म्हणजे डोळखांब-साकुर्लीजवळच्या डेणे गावावरून जाणारा. ठाणे-नाशिक रस्त्यावरच्या शहापूरहून उजवीकडे वळलं की डोळखांब आहे. साधारण ३०-३५ कि.मी.वर डोळखांबहून १० कि.मी. वर साकुर्ली आहे. साकुर्लीहून पाच कि.मी.वर डेणे आहे. शहापूरहून डेणेसाठी एस.टी. बसेस आहेत. पण अगदीच मोजक्या. साकुर्लीसाठी मात्र अनेक बसेस आहेत. या व्यतिरिक्त खासगी प्रवासी जीपची वाहतूक या भागात आहे. स्वतःची गाडी असेल तर डोंगराच्या पायथ्यापर्यंत गाडी जाते. शेवटपर्यंत रस्ता चांगला आहे.

या मार्गाने हा ट्रेक दोन भागात विभागलेला आहे. डोंगराच्या अर्ध्या भागात कड्याखाली, मोठी सपाटी आहे. हा सगळा परिसर घनदाट जंगलाचा आणि असीम शांततेचा आहे. या गर्द झाडीत दोन वास्तू आहेत. एक आहे वाल्मिकी ऋषींचा आश्रम आणि दुसरी लहानशी धर्मशाळा. आश्रमात एक साध्वी गेली तेरा-चौदा वर्षं एकटीच राहते. धर्मशाळेला चारी बाजूंनी भिंती नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात जमिनीला ओल असते. पण या जागेला एक कमी उंचीचा लाकडी माळा आहे. तिथे मात्र सहज दहा-पंधरा जण मुक्काम करू शकतात. बरोबर मात्र गॅस किंवा स्टोव्ह हवा. कारण समोरच्या आश्रमातून सगळ्यांनाच सुकी फाटी



अनु.

देणं त्यांना शक्य नाही. पावसाळा सोडून मात्र ही जागा मुक्कामाला एकदम छान आहे.

आश्रमाच्या वरती जाणारी पायवाट कड्यातल्या 'सीतेचा पाळणा' या ठिकाणी जाते. ही दगडधोंड्यांची वाट निबिड अरण्यातून जाणारी असून खड्या चढणीची आहे. पावसाळ्यात फांद्या-वेली बाजूला करत, वाट काढत वर जावं लागतं. काही टप्प्यात तर वाट ओहोळातून जाते. त्यात सगळा डोंगरकडा ढगाने वेढलेला असल्याने अंदाज येत नाही. परत येताना वाट चुकू नये म्हणून लहान फांद्या वाटेत टाकत जाणं आवश्यक आहे.


डेण्याहून वरती जाणारी पायवाट बहुतेक ठिकाणी चांगलीच रुंद असून अतिशय सोपी आहे. लांब लांब वळणांचा रस्ता असल्याने चढणही पार करणं, तेवढं दमछाक करणार नाही. आश्रमापर्यंत या सोप्या वाटेने सहज दीडेक तासात पोहोचता येतं. मात्र 'सीतेच्या पाळण्या'ला जाण्यासाठी दीड-पावणे दोन तास लागू शकतात.

आजोबाच्या आश्रमापर्यंतचा ट्रेक कुठल्याही वयोगटातले लोक आरामात करू शकतात. पावसाळ्यात तर सगळा परिसर धुंदकुंद असतो. आपण अक्षरशः ढगातून जात असतो. खूप मजा येते. त्यात इथे गर्दीही अजिबात नसल्याने निसर्गाच्या या नवलाईचा आनंद आपण मनसोक्त लुटू शकतो. सकाळी पाच-साडेपाचच्या आसपासची आसानगाव लोकल पकडली तर रात्री ८-९ वाजेपर्यंत परत ठाणे गाठता येतं. मात्र कधी कधी साकुर्लीपर्यंत पाच कि.मी. पायी जावं लागतं. त्यामुळे ट्रेक सुरू करण्याअगोदर परतीच्या गाड्यांची वेळ गावात विचारून जायला हवी. स्वतःची गाडी असेल तर काहीच टेन्शन नाही. मस्त पोळी-भाजीचा डबा सोबत घ्यावा. थोडासा शेव-चिवडाही घ्यावा आणि आजोबाच्या भेटीला जावं. आजोबा आशीर्वादाच्या रूपाने तुम्हाला जे काही देईल, ते शब्दात नाही सांगता येणार. त्यासाठी प्रत्यक्ष जायलाच हवं.

**सह्याद्रीच्या आडवळणाच्या गावात अगदी ठराविक वेळीच बसेस येतात. डोंगरात मुसळधार पाऊस पडला की एखादं वेळी खाली यायला उशीर होतो आणि बस चुकू शकते. दुसरं म्हणजे ग्रामीण भागात अनेक लहान पूल असतात. डोंगररांगात पाऊस जोरदार झाला की या नद्यांच्या पाण्याची पातळी खूप वाढते. कधी पुलावरून पाणी वाहायला लागतं. अशा वेळी बस गावात पोहोचत नाही किंवा आपली गाडी नेली असेल तर पूर ओलांडणं अत्यंत धोक्याचं असतं. अगदी लहान ओढेसुद्धा अशावेळी पार करू नयेत. सोबत कपडे, चादर, खाण्याचे पदार्थ ठेवावेत म्हणजे मुक्काम करावा लागला तरी त्रास नाही.**



अनु.




सह्याद्रीच्या पर्वतरांगेत एक थोरला डोंगर आहे. याला बहुतेक त्याच्या आकारावरून आजोबा किंवा 'आजा पर्वत' नाव पडलंय. नुसतं नावंच आजोबा नाही, तर सगळा प्रदेशही गर्द रानाचा आणि कडेकपाऱ्यांचा असल्याने इथे सह्याद्रीची सगळी समृद्धी एकवटलेली आहे. साहजिकच निसर्गभटक्यांना या परिसराचं खूप आकर्षण आहे. त्यात इथे मोठ्या कड्याखालच्या घनदाट जंगलात वाल्मिकी ऋषींचा आश्रम असल्याने त्याला श्रद्धेचाही एक पदर आहे.



# सह्याद्रीचे आजोबा



अनु.

घाटावरून आजा पर्वतावर (समुद्र सपाटीपासून ४५११ फूट) जाण्याच्या अनेक रानवाटा आहेत. सगळ्या वाटा भंडारदरा तलवाच्या रतनगड, घनचक्कर, खतरा या किल्ल्यांच्या परिसरातल्या करोली घाट, दऱ्या घाट, पाथर्डी घाट या सह्याद्रीतल्या अतीदुर्गम भागातून जातात. घाटावरून कुठूनही गेलं तरी पोहोचायला एक पूर्ण दिवस लागतो. या वाटा घनदाट रानांतून आणि कडेकपाऱ्यांमधून जात असल्याने स्थानिक माणूस सोबतीला आवश्यक ठरतो.

आजोबाला जाण्याचा सगळ्यात सोपा आणि जवळचा मार्ग म्हणजे डोळखांब-साकुर्लीजवळच्या डेणे गावावरून जाणारा. ठाणे-नाशिक रस्त्यावरच्या शहापूरहून उजवीकडे वळलं की डोळखांब आहे, साधारण तीस-पस्तीस किमीवर डोळखांबहून साकुर्ली आहे. दहाएक किमीवर आणि साकुर्लीहून डेणे आहे. पाच किमी शहापूरवरून डेणेसाठी एस.टी. बसेस आहेत. पण अगदीच मोजक्या. साकुर्लीसाठी मात्र बऱ्यापैकी बसेस आहेत. या व्यतिरिक्त खासगी प्रवासी जीपची वाहतूक या भागात आहे. जर आपली स्वत:ची गाडी असेल तर डोंगराच्या पायथ्यापर्यंत गाडी जाते. शेवटपर्यंत रस्ता चांगला आहे.

या मार्गाने हा ट्रेक दोन भागात विभागलेला आहे. डोंगराच्या अर्ध्या भागात कड्याखाली मोठी सपाटी आहे, हा सगळा परिसर घनदाट जंगलाचा व असीम शांततेचा आहे. या गर्द झाडीत दोन वास्तू आहेत. एक आहे वाल्मिकी ऋषींचा आश्रम आणि दुसरी लहानशी धर्मशाळा. आश्रमात एक साध्वी गेली तेरा-चौदा वर्षं एकटीच राहते. धर्मशाळेला चारी बाजूंना भिंती नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात जमिनीला ओल असते. पण या जागेला एक कमी उंचीचा लाकडी माळा आहे. तिथे मात्र सहज दहा-पंधरा जण मुक्काम करू शकतात. बरोबर मात्र गॅस किंवा स्टोव्ह हवा. कारण समोरच्या आश्रमातून सगळ्यांनाच सुकी देणं त्यांना शक्य नाही. पावसाळा सोडून मात्र ही जागा मुक्कामाला एकदम सही आहे. आश्रमाच्या वरती जाणारी पायवाट कड्यातल्या सीतेचा पाळणा या ठिकाणी जाते. ही दगडधोंड्यांची वाट निबीड अरण्यातून जाणारी असून खड्या चढणीची आहे. पावसाळ्यात तर फांद्या-वेली बाजूला करत. वाट काढत वर जावं लागतं. काही टप्प्यात तर वाट ओहोळातून जाते. त्यात सगळा डोंगरकडा ढगाने वेढलेला असल्याने अंदाज येत नाही. परत येताना वाट चुकू नये म्हणून लहान फांद्या वाटेत टाकत जाणं आवश्यक आहे.

डेण्याहून वरती जाणारी पायवाट बहुतेक ठिकाणी चांगलीच रुंद असून अतिशय सोपी आहे. लांब लांब वळणांचा रस्ता असल्याने चढणही पार करणं, तेवढं दमछाक करणार नाही. आश्रमापर्यंत या सोप्या वाटेने सहज दिडएक तासात पोहोचता येतं. मात्र सीतेच्या पाळण्याला जाण्यासाठी दीड-पावणे दोन तास लागू शकतात.

आजोबाचा आश्रमापर्यंतचा ट्रेक कुठल्याही वयोगटातले लोक आरामात करू शकतात. पावसाळ्यात तर सगळा परिसर धुंदकुंद असतो. आपण अक्षरश: ढगांतून जात असतो. खूप मजा येते. यात इथे गर्दीही अजिबात नसल्याने निसर्गाच्या या नवलाईचा आनंद आपण मनसोक्त लुटू शकतो. सकाळी पाच-साडेपाचच्या आसपासची आसनगाव लोकल पकडली तर रात्री आठ-नऊ वाजेपर्यंत परत ठाणे गाठता येतं. मात्र कधी कधी साकुर्लीहून पुढे डेण्यापर्यंत पाच किमी पायी जावं लागतं. त्यामुळे ट्रेक सुरू करण्याच्या अगोदर परतीच्या गाड्यांची वेळ गावात विचारून जायला हवी. स्वत:ची गाडी असेल तर काहीच टेंशन नाही. मस्त पोळी भाजीचा डबा सोबत घ्यावा. आणि आजोबाच्या भेटीला जावं... आजोबा आशीर्वादाच्या रूपाने तुम्हाला जे काही देईल, ते शब्दात नाही सांगता येणार... त्यासाठी प्रत्यक्ष जायलाचं हवं.

# पर्णकुटीतल्या वास्तव्याची आठवण



वीकएन्ड

थेट रामायण-महाभारतातली पर्णकुटी किंवा रानावनातील आश्रमांची वर्णनं वाचली की, अरण्यातल्या पर्णकुटीमधलं वास्तव्य हा काय प्रकार असू शकेल, असं कुतूहल मनात निर्माण होतं. अशा पर्णकुटी किंवा रानावनातला निवास आपल्याला आजही वास्तवात पहायला, अनुभवयाला मिळतो, हे माहीत आहे का तुम्हाला?

सह्याद्रीत शहापूर परिसरातला 'अजापर्वत' म्हणजेच आजोबाचा डोंगर हा अशा वास्तव्यासाठी एकदम फिट्ट. तिथल्या वाल्मिकी ऋषींच्या आश्रमासमोरची धर्मशाळा आणि सभोवतीचा परिसर हा खरोखरीच आजही आपल्याला प्राचीन काळात नेतो. साधारण साडेचार हजार फूट उंचीच्या या डोंगराच्या

सह्याद्रीत शहापूर परिसरातला 'अजापर्वत' म्हणजेच आजोबाचा डोंगर हा अशा वास्तव्यासाठी एकदम फिट्ट. तिथल्या वाल्मिकी ऋषींच्या आश्रमासमोरची धर्मशाळा आणि सभोवतीचा परिसर हा खरोखरीच आजही आपल्याला प्राचीन काळात नेतो.

माथ्यापर्यंतही पोहोचता येत असलं, तरी आपल्याला दीड-दोन दिवसांच्या भटकंतीसाठी तिथपर्यंत जायलाच हवं, असं नाही. आपण केवळ या आलेलीही आम्ही पाहिली आहे.

आपण आपल्या पायांनीच तिथे जावं, हे उत्तम. नागमोडी वळणांचा रूंद रस्ता आपल्याला वाल्मिकी ऋषींच्या पोहोचल्यावर तिथून साकुर्ली किंवा डेणे गावाकडे कूच करायची. डेणे गावात पोहोचल्यावर आपण थेट आजोबांच्या पायाशी पोहोचतो.

# आजोबाचा डोंगर

आश्रमाच्या परिसरात निवास केला, तरी भरपूर ताजंतवानं होऊन मुंबईत परतू. आजोबाचा डोंगर उंचावर असला, तरी तिथली वाट खूपच रमणीय आणि अगदी ग्रॅज्युअल चढ असलेली आहे. पण रस्ता 'जीपेबल' आहे. एकदा थोडी शक्तिशाली रांगडी जीप वरपर्यंत

आश्रमापर्यंत घेऊन जातो.

वृक्षराजींनी वेढलेल्या या आश्रमापासून पाच मिनिटांवर पाण्याचा बारमाही निर्मळ झरा असल्याने पाण्याचीही सोय होऊ शकते.

आजोबाच्या डोंगरावर जाण्यासाठी आपल्याला कसारा मार्गावरच्या आसनगावला उतरावं लागतं. आसनगाव-शहापूर सारख्या एसटीबसेस असतात किंवा रिक्षाही मिळतात. अर्ध्या तासात शहापूरला

संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास शहापुरातून थेट डेणे गावापर्यंत बस मिळू शकते. पण एवढ्या रात्री पायपीट करण्याची गरज नाही. शहापुरातून थेट जीप घेण्याचा पर्यायही खुला आहे. साकुर्लीपर्यंत पोहोचल्यास साकुर्ली ते डेणे तासभर रपेट करावी लागते. डेण्यातून आजोबापर्यंत जाण्यासाठी चांगली रुंद वाट आहे. डेण्यातले रहिवासी नाना पाटेकर (हे ते नव्हेत!) यांच्याकडे मार्गदर्शन आणि

इतर तातडीची मदत मिळू शकते. पण वाटाड्या घेण्याचीही आवश्यकता भासत नाही. या वाटेने जास्तीतजास्त दोन ते अडीच तासात वर गेल्यावर आपण वाल्मिकी ऋषींच्या आश्रमाच्या परिसरात पोहोचतो. वर चढताना कात्राबाईचा डोंगर आपल्या डाव्या हाताला दिसत असतो. आश्रमात शंकराचं मंदिर आहे. त्यासमोरच धर्मशाळा आहे. इथे ३०-४० जणही सहज राहू शकतात.


राहण्यासाठी ही एकमेव सोय. आता तर तिथे छान मस्त गुलाबी थंडी पडते. डोक्यावर छप्पर असलं, तरी थंडीपासून बचाव म्हणून आपलं बेडिंग आपल्याबरोबर नेणं अगदी मस्ट. शिवाय जेवणासाठी शिधा किंवा पॅक्ड रेडीफूडही जवळ बाळगावंच लागतं. थोडक्यात तयारी ट्रेकिंगसारखी करायची. पण एक-दीड दिवसाला पुरेल, इतपत 'पॅक्ड फूड'ही आजकाल भरपूर बाहेर मिळतं. त्यामुळे संपूर्ण भटारखाना नेण्याची आवश्यकता नसते.

सीता आणि लव-कुशांचा इथे निवास होता, असं सांगितलं जातं. त्यामुळेच वाल्मिकी ऋषींच्या आश्रमापासून थोडं पुढे डावीकडे जंगलात शिरलं की आपसुक सापडणाऱ्या पाऊलवाटांवरून सीतामाईच्या पाळण्यापर्यंत जाता येतं. आजोबाच्या डोंगराला उजव्या हाताला लव-कुशाच्या टेकडीवर एक सुळका आहे. त्याला सीतामाईचा पाळणा म्हणतात. लव-कुशाच्या टेकडीवर चढण्यासाठी एक लोखंडी शिडी आहे. वर थोडी सपाट जागा आहे. सीतामाईच्या पाळण्याच्या सुळक्यातल्या गुहेत एका खडकात लव-कुशांच्या पादुका कोरलेल्या आहेत. डाव्या बाजूला आजोबा डोंगरात एक पाण्याचं टाकंही आहे.

परतताना डेणे गावात उतरल्यास संध्याकाळी आसनगावपर्यंत बस मिळू शकते. दीड-दोन दिवसातली ही सफर खूपच आनंददायी ठरते.

# मुरबाड

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते मुरबाड | | | | | 75 | | | | |
| **1** | गोरखगड | गुंफा लेणी | किल्ला | ट्रेक | मंदिर | 21 | SE | | | |
| **2** | सिध्दगड | | किल्ला | ट्रेक | | 24 | SE | 17 | S | |
| **3** | सिध्दगड | धबधबा | | | | 25 | SE | 1.5 | SE | |




**गोरखगडाच्या ट्रेकचं आकर्षण म्हणजे तिथल्या गुहेतला मुक्काम. तेराव्या शतकातल्या त्या गुहेत राहून आजूबाजूचा भिजरा निसर्ग परिसर न्याहाळणं हा अनुभव घ्यायला एकदातरी जायलाच हवंच**

अनु.



# प्राचीन गुहा आणि आदिम निसर्ग



मान्सून ट्रेकिंगसाठी प्रसिद्ध असलेलं मुंबई-पुण्याजवळील आणखी एक ठिकाण म्हणजे किल्ले गोरखगड. नाणेघाट, जीवधन किल्ला, सिद्धगड, मच्छींद्र गड यांचा शेजारी असलेल्या गोरखगडावर जायचं, वरती गुहांमध्ये राहायचं, गोरखनाथाचं दर्शन घ्यायचं, आजूबाजूचा हिरवागार परिसर आणि धुक्यात हरवलेली सह्याद्रीची पर्वतरांग शोधायची, रिमझिम पावसात भिजलेल्या कातळाच्या चकचकीत झालेल्या भिंती आणि लाल मातीच्या कार्पेटवरून या परिसरात मनसोक्त भटकायचं.... गोरखगडची ट्रीप ही अशी असते. चढायला फारसा कठीण नसल्यामुळे आणि दोन-अडीच तासांत सर करता येण्यासारखा हा पर्वत असल्याने इथे सगळ्याच मौसमात ट्रेकर्सची गर्दी असते. तेराव्या शतकातील भलीमोठी गुहा आणि भगवान शंकराचं प्राचीन मंदिर ही इथली वैशिष्ट्य.

धुकं नसेल आणि आभाळ स्वच्छ असेल तर गोरखगडावरून सिद्धगड, नाणेघाट, मच्छींद्र गड या ठिकाणांचंही मनोरम दर्शन घडतं. गोरख गडाच्या पायथ्याशी देहरी नावाचं गाव वसलंय. देहरी गावात एक पुरातन गणपती मंदिर असून या मंदिराला वळसा घालून मागच्या बाजूला गेलं की तेथून गोरखगडाकडे जाणारी वाट सुरू होते. ही संपूर्ण वाट लाल मातीची असून पावसाळ्याच्या दिवसात या वाटेवरचा निसर्ग अधिकचं खुलून येतो. थोडीशी निसरडी असली तरी त्या मातीचा सुगंध आणि भिजलेला लालबुंद रंग मनाला मोहून टाकतो. एकेक पाऊलं पुढे टाकताना ओल्या मातीत पावलांचे ठसे उमटत जातात आणि पुढच्याच क्षणाला पावसाच्या पाण्याने धुतलेही जातात. अशी ही निसर्गरम्य वाट असल्याने थकवा फारसा जाणवत नाही. उलट प्रत्येक पावलागणिक आपण निसर्गाच्या अधिकाधिक जवळ जात असतो. गोरखगडाकडे जाणारी एक वाट सिद्धगडाकडूनही येते. ही वाट म्हणजे घनदाट जंगलातून जाणारी आहे. मात्र देहरी गावाकडून जाणारी वाट जास्त प्रचलित आहे. सिद्धगडाकडून यायचं तर आधी मुरबाड-नारवली गावामार्गे सिद्धगडावर जावं लागतं



अनु.

आणि मग परतीच्या प्रवासात गोरखगडावर येता येतं. पण याकरीता दोन ते तीन दिवसांचा ट्रेक करावा लागतो.

एक दिवसाच्या ट्रेकसाठी देहरी गावातून जाणारा रस्ता जास्त सोयीचा आहे. देहरी गावापर्यंत पोहोचण्यासाठी कल्याण डेपोतून बसने मुरबाडपर्यंत जाता येतं. तिथून पुढे मुरबाड ते देहरी या प्रवासासाठी रिक्षा, जीपने जाता येतं किंवा मुरबाड ते म्हसा आणि म्हसा ते देहरी असंही जाता येतं. गोरखगडाचा संपूर्ण परिसर भौगोलिक वैविध्य, नैसर्गिक सौंदर्य आणि प्राचीन काळातील मानवी कलाकुसर यांनी युक्त आहे. देहरी गावातून दूरवर पाहिल्यास समोर दोन भलेमोठे सुळके दिसतात. त्यातला मोठा सुळका म्हणजे गोरखगड आणि डाव्या दिशेला दिसणारा सुळका म्हणजे मच्छींद्र गड. देहरी गावातील मंदिरातही राहण्याची व्यवस्था होऊ शकते. रात्री या मंदिरात मुक्काम ठोकून पहाटेच्या सुमारास गोरखगडाच्या दिशेने आगेकूच करता येते. गडावरती पोहोचलं की कोरीव काम केलेला सुंदर दगडी दरवाजा तुमचं स्वागत करतो. हा या गडाचा मुख्य दरवाजा आहे. जंगलातली भटकंती, थोडंसं गिर्यारोहण, डोंगराच्या माथ्यावर नेणारी वेडीवाकडी वाट, मातीचा कच्चा रस्ता - गोरखगडाच्या ट्रेकिंगमध्ये अशा वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक वाटा चोखाळायला मिळतात. मध्येच पाऊस, मध्येच निरभ्र आकाश, मध्येच भरून आलेले ढग आणि मुलायम गालिचा पसरल्यासारखा हिरवागार मऊशार वाटणारा परिसर पाहायला, अनुभवायला गोरखगडावर एकदा तरी जायलाच हवं.

**गोरखगडाची उंची :**

२१३७ फूट. पायथ्याशी वसलेलं गाव : देहरी
वरती पोहोचायला लागणारा वेळ : सुमारे अडीच ते तीन तास

**जेवणखाण :**

गोरखगडावर पाण्याची कुंडं आहेत पण जेवणा-खाण्याची व्यवस्था नाही.

**राहण्याची व्यवस्था :**

गडावरील गुहेत एका वेळी साधारणतः २५ लोक राहू शकतात.



अनु.

**गोरखगडाकडे जाणारे मार्ग :**

गोरखगडला मुरबाडहून जाता येतं.
मुरबाडला पोहोचण्यासाठी मुंबईहून जाणाऱ्यांनी कल्याणला उतरावं तर पुण्याहून येणाऱ्यांनी कर्जतला उतरावं. कल्याण आणि कर्जत या दोन्ही ठिकाणांहून एसटी बसेस किंवा सहा आसनी रिक्षा करून मुरबाडला जाता येतं. सिद्धगडामार्गेही एक रस्ता गोरखगडाकडे जातो.

**असाही ट्रेक करता येतो :**

निसर्गप्रेमी पर्यटक बहुतेक वेळा सिद्धगड आणि गोरखगड असा एकत्र ट्रेक करतात. सिद्धगडाच्या पायथ्याशी नारावली गाव वसलं असून मुरबाडहून बसने नारावलीला जाता येतं.

# गर्द झाडीतला गोरखगड

दऱ्याखोऱ्यांनी नटलेल्या, पक्षांनी भरलेल्या, सागरकिनाऱ्यांनी डुंबलेल्या, काळ्या पाषाणात कोरलेल्या इतिहासाचं एक अनोखं प्रतिबिंब म्हणजे मस्त भटकंती. अशा या महाराष्ट्रात सह्याद्री रांग म्हणजे डोंगर; भटक्यांना जणू पर्वणीच. या सह्याद्रीत निसर्गाचं अतुलनीय वैभव, गड-किल्ले, पाषाणात कोरलेली मंदिरं, उंचच उंच कातळकडे, जंगल असं वैभव पाहावयास कोणाला आवडणार नाहीत. असाच दुर्गयात्रींना आव्हान देणारा ठाणे जिल्ह्यातील गोरखगड होय.

ठाणे ते कल्याण ट्रेनचा प्रवास आणि पुढे कल्याणहून मुरबाडला जाण्यासाठी दर वीस मिनिटांनी बससेवा आहे, तर पुढे मुरबाडहून पायथ्याचं गाव देहरीपर्यंत बससेवा उपलब्ध आहे. गडाची उंची आणि उभी चढाई लक्षात घेता दुर्गयात्रींना एक आव्हानच आहे. गडाची उंची साधारण २,१३७ फूट उंच आहे. तर गडावर गुहा, पाण्याची टाकं-कातळात खोदलेल्या पायऱ्या आणि माथ्यावर मध्यभागी गोरखनाथाचं

# फेरफटका

मंदिर आहे.

देहरी गावात रस्त्यालगतच गोरखनाथाचं मोठं मंदिर आहे. याच देवळामागच्या पायवाटेने गडावर जाण्यासाठी मार्ग आहे. ही पायवाट गर्द झाडी-झुडपातून जाते, तर तासाभराचा चढाईनंतर गोरखगडाशेजाराच्या मोकळ्या पठारावर पोहोचतो. इथूनच गोरखगडाचा उभा सुळका आपलं लक्ष वेधून घेतो. प्रथमदर्शनी गडावर जाण्यासाठी वाट कशी असेल, असा प्रश्न पडतो. पण जसंजसं पुढे जावं तसतसा गडावर जाण्याचा मार्ग दिसू लागतो. तासाभराच्या चालीनंतर आपण गडाच्या मागच्या बाजूला आल्याचं भासतं, पण इथूनच गडावर जाण्याचा सरळ मार्ग आहे, थोडं पुढे गेल्यावर उघड्यावर एक शिवलिंग दिसतं. इथूनच डाव्या हाताने गडावर जाण्याची वाट आहे.

दोन्ही बाजूने दरी आणि मधोमध जागा असेल तिथे कातळात पायऱ्या खोदलेल्या आहेत. चढण उभी आणि खडकातील बिकट वाट असल्याने अत्यंत काळजीपूर्वक ही चढाई चढावी लागते. थोडं वर गेल्यावर कातळात कोरलेला एक दरवाजा दिसतो. आतमध्ये संपूर्ण अंधार दिसत असल्याने इथून पुढे वाट आहे, असं प्रथमदर्शनी ध्यानात येत नाही. पण इथूनच एक छोटा भुयारी येत नाही. पण इथूनच एक छोटा भुयारी मार्ग गडाच्या दिशेने वर जातो. इथूनच थोडं वर गेल्यावर गोरख गडाच्या मुख्य सुळक्याच्या खालच्या टप्प्यात पोहोचतो.

इथेच डाव्या हाताने पुढे गेल्यास कातळात खोदलेली एक चौकोनी गुहा लागते. याच गुहेत घोड्यावर स्वार असे दोन शिल्प आहेत. स्थानिक लोक या शिल्पास मामा-भाचाचं शिल्प म्हणतात. तर उजव्या पायवाटेने गेल्यावर एक प्रशस्त अशी गुहा लागते.


या गुहेत गिर्यारोहकांना मुक्कामासाठीही राहत येतं. पण गुहेसमोरील प्रांगण अरुंद असल्याने समोर वावरताना काळजी घ्यावी लागते. इथूनच हाक्याशेजारून जाणाऱ्या पायवाटेने गोरख गडाच्या सर्वोच्च शिखरावर जाणारी वाट आहे. अंतिम चढाई थोडी अवघड असल्याने थोडा सराव असलेल्यानेच चढाई केलेली बरी. गड माथा अत्यंत लहान असून, शिखरावर गोरखनाथाचं छोटेखानी मंदिर आहे.

तर गडमाथ्यावरून सह्याद्रीचं सुंदर दर्शन घेता येतं. समोरच मच्छिंद्रगड आपलं लक्ष वेधून घेतो, तर दक्षिणेस सिद्धगड दिसतो. उत्तरेस नाणेघाट, जीवधन, आजोबा पर्वत आणि लांबवर कळसुबाईचं शिखर न्याहळता येतं. अशा या डोंगरयात्रेचा एकदा तरी अनुभव घ्यावा.












**सिद्धगड** ! सह्याद्रीच्या मुख्य धारेपासून सुटा झालेला हा किल्ला आहे ठाणे जिल्ह्यात. दुरुन पाहिल्यास टोपीच्या आकाराचा. इथे जाताना वाटेत पाणी नसल्याने गावातूनच भरून घ्यावं. वाटेत ब-यापैकी झाडी आहे. शक्य असल्यास दुपारी ११ ते २ या वेळेत चालणं शक्यतो टाळावं. नारिवलीतून टप्प्या-टप्प्याने चढणारी वाट आहे. थोड्या चढणीनंतर काकडमळा लागतं. दक्षिणेला सिद्धगड आपली सोबत करत असतो. गडाची डावी बाजू आणि सह्याद्रीची मुख्य धार यांच्यामध्ये एक सुळका दिसतो, त्याचे नाव 'सिद्धाची लिंगी'. तासा-दीड तासात सिद्धगडमाचीच्या समोरील माचीच्या पायथ्याशी पोहोचता येतं. या दोन माच्यांमधील घाट चढला की गडाचं प्रवेशद्वार लागतं. इथे जवळच गर्द झाडीत नारमाता देवीचं मंदिर आहे. सिद्धगडमाचीवरील वस्ती मंदिरापासून जवळच आहे. माचीवरील शाळेत मुक्काम होऊ शकतो. माचीवर २ विहिरी आहेत. बालेकिल्ल्याकडे निघण्यापूर्वी इथेच पाणी भरुन घ्यावं. वर पाणी नाही. बालेकिल्ल्याची वाट थोडी अवघड आणि निसरडी आहे पण धोकादायक नाही. माचीपासून बालेकिल्ला चढायला पाऊण - एक तास लागतो. वाटेत बाबाची गुहा आहे. त्यात पूर्वी एक बाबा रहात असे. माथ्यावर काही टाकी आहेत. पण त्यात पाणी ठरत नाही. तटबंदीचे अवशेष आहेत. वाड्याचे

आणि मंदिराचे अवशेष आहेत. सिद्धगड सह्याद्रीच्या मुख्य धारेपासून सुटावलेला आणि कोकणात असला तरी त्यावरून बराच प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो. उत्तरेस कुलंगगड, मदनगड, अलंगगड, कळसूबाई, पूर्वेस माहुली, दक्षिणेस भीमाशंकर, पेठ किल्ला, तुंगी किल्ला हे सर्व, आकाश निरभ्र असल्यास माथ्यावरून दिसतं.

भाई कोतवाल आणि हिराजी पाटील या क्रांतीकारकांना इंग्रजांनी १९४३ मध्ये या गडावर गोळ्या घालून ठार मारलं. त्यांचं स्मारक पलीकडच्या बाजूस, किल्ल्याच्या पायथ्याच्या बोरवाडीत आहे. बोरवाडीतून माचीवर येण्यास खडा चढ आहे. मात्र बोरवाडी मुख्य रस्त्यापासून आत असल्याने तेथपर्यंत येण्यास खासगी वाहन हाच पर्याय राहतो.




## कसं ज़ाल?

कल्याणहून बसने मुरबाडला पोहोचायचं. मुरबाडहून थेट जीपने किंवा टमटमने नारिवली इथे पोहोचता येतं. किंवा म्हसाला पोहोचायचं आणि तेथून नारिवली गाठायचं. वाटेची खात्री नसल्यास, गावात विचारून घेणं किंवा वाटाड्या बरोबर घेणं उत्तम.

# माळशेज

| | - | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते माळशेज | | | | | | 128 | | | | |
| **1** | हरिश्चंद्रगड | | किल्ला | ट्रेक | लेणी | | 19 | N | | | |
| **2** | थिदबीचा धबधबा | धबधबा | | | | | 5 | W | 24 | SW | |
| **3** | माळशेज घाट धबधबा | धबधबा | | | निसर्ग | | 2.5 | SE | 8 | SE | |
| **4** | निमगिरी | | किल्ला | ट्रेक | | मंदिर | 18 | S | 16 | SW | |
| **5** | नाणेघाट | | | ट्रेक | निसर्ग | घाट | 37 | SW | 18 | NW | |
| **6** | जीवधन | | किल्ला | ट्रेक | निसर्ग | | 38 | SW | 2 | S | |






अनु.

**ठाणे,** पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांच्या सीमेवर उभा असलेला हरिश्चंद्रगड म्हणजे सर्व गिर्यारोहकांचं आवडतं स्थान. इथं जाणं तसं सोपं आहे. पण खात्री नसेल खिरेश्वर गावातून वाटाड्या सोबत घ्यावा. पाणीही भरून घ्यावे. उन्हाळ्यात वाटेत पाणी दुर्मिळ आहे. आता वाट कारकाई डोंगराच्या कुशीतून चढून, गर्द झाडीतून टोलार खिंडीत पोहोचते. खिंडीत आपण गडाला भिडतो. खिंडीतील खडी आणि कातळावरील चढण सावधतेने पार करायची. खिंडीच्या माथ्यावरून मंदिरापाशी येण्यासाठी ७-८ टेकड्या पार कराव्या लागतात. गावातून ३ तासांत आपण मंदिरापाशी पोहोचतो. मंगळगंगा नदीचा उगम गडावर होतो. नदीवरील दगडी पुलावरून हरिश्चंद्रेश्वर मंदिरात प्रवेश करायचा. प्रवेशापाशीच शिलालेख आहे. हे मंदिर हेमाडपंथी बांधणीचं असून, पुरातन आहे. मंदिर परिसरात पाण्याची टाकी व गुंफा आहेत. तसंच बाजूच्या डोंगराच्या पोटातही काही लेणी कोरलेली आहेत. यातील एका लेण्यात गणेशाची सहा फूट उंच मूर्ती कोरलेली आहे. कोणत्याही गुंफेत राहता येतं.


मंदिराच्या समोर पुष्करणी आहे. मंदिराच्या बाजूने थोडे खाली उतरून गेलं की केदारेश्वर गुंफा आहे. या गुंफेत मध्यभागी शिवलिंग असून त्याच्या सभोवताली नेहमी कमरेभर पाणी असते. पाण्यात उतरून शिवलिंगाला प्रदक्षिणा घालण्याचा अनुभव घ्यावाच असा. गडाची रोहिदास आणि तारामती अशी दोन शिखरं आहेत. या शिखरांवरून पिंपळगाव-जोगे धरणाचा विशाल जलाशय, ढाकोबा, आजोबा, कात्राबाई असा बराच प्रदेश नजरेस पडतो. गडावरील मुख्य आकर्षण म्हणजे कोकणकडा! सहाशे मीटर उंचीचा अंतर्वक्र कडा म्हणजे सृष्टीचा चमत्कार, अवघ्या महाराष्ट्राचं भूषण आहे. थेट पाताळात डोकावण्याचा अनुभव. कोकणकड्यावरून सूर्यास्तदेखील मस्त अनुभवता येतो.

## कसं जाल?

कल्याणहून माळशेज घाटातून जाणारी कोणतीही बस पकडावी आणि खुबी फाट्यावर उतरावे. समोरच पिंपळगाव-जोगे धरणाचा विशाल जलाशय आहे. त्याच्या भिंतीवरून रमत-गमत तासाभरात खिरेश्वर गावात पोहोचायचे. गावातील नागेश्वराचे मंदिर पहायचे. कोणत्याही वेळी खिरेश्वर गावातील हॉटेलातून वाटाड्या मिळू शकतो. पुढची वाट रुळलेली आहे.

## आणखी काय पहाल?

दोन दिवस मजेत सार्थकी लावायचे असतील तर हरिश्चंद्रगड उत्तम. स्वतःचं वाहन असेल तर लेण्याद्री तसंच शिवनेरीला भेट देता येईल.



# अद्‌भुत, निसर्गरम्य हरिश्चंद्रगड

आतापर्यंत ताम्रपट, शिलालेखातून दानशूर राजे, धनाढ्य व्यापारी, श्रेष्ठी आणि सर्वसामान्य रयतेने लोककल्याणाकरिता जी दाने अथवा देणगी दिली त्याबद्दलची माहिती त्यांनी आपल्या कोरीव लेखातून कायमस्वरूपी लिहून ठेवलेली आपण मागील काही लेखांतून वाचली असेल. या साऱ्या लेखांतून तत्कालीन आर्थिक सुबत्तेचे चित्र प्रामुख्याने आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते, मात्र ठाणे परिसरातील काही गड-किल्ल्यांवरील लेखातून साहित्य, कला व अध्यात्माचे दर्शनही घडते. अशा गडांपैकी एक आहे नगर, पुणे आणि ठाणे जिल्ह्याच्या सीमेवरील हरिश्चंद्रगड.

सह्याद्रीतील सर्वात उंच गिरीशिखरे माळशेज घाट, बालाघाट ते थळघाट दरम्यान एकवटली आहेत. कळसूबाई शिखर, अलंग-कुलंग, अजापर्वत, कातुरबा आणि माळशेज घाटातील तारामती शिखर यांची जणू आकाशात उंच झेपावण्याची स्पर्धा चालू असते. आपण माळशेज घाट चढून आल्यावर डाव्या बाजूला खुबी गावाची पाटी दिसते. तेथून पिंपळगाव जोगे धरणाच्या भिंतीवरील रस्ता थेट टोलार खिंडीच्या पायथ्यापर्यंत जातो. त्या आधी डाव्या बाजूला प्राचीन खिरेश्वर मंदिराला भेट देऊन मग टोलार खिंडीची वाट पकडून तिच्या माथ्यावर यावे. आता आपण नगर आणि पुणे यांच्या सीमेवर उभे राहतो. थोडी विश्रांती घेऊन पलीकडे न उतरता डाव्या बाजूच्या कातळात खोदलेल्या खोबणीत हात-पाय गुंतवीत वर चढू लागावे. जसजसे वर चढू लागावे तसतशी दोन डोंगरामधली दरी आ वासून रुंदावत जाते. तिचे रौद्ररूप न्याहाळत माथ्यावर येतो. येथे थोडीशी तटबंदी दिसते. हरिश्चंद्रगडावर आल्याची ती पहिली खूण पुढे डाव्या बाजूला गच्च झाडीतून डोके वर काढत रोखून राहणारा रोहिदास शिखर आपले लक्ष वेधून घेतो. या शिखराला तटाबुरूजांचे आंगडे टोपडे आहे, तर लहानसे मंदिर असून राजवाड्याचे व काही घरांचे अवशेष व खडकात खोदलेल्या पाण्याची टाकी आहे. हरिश्चंद्रगडावरील रोहिदास शिखराची तटबंदी सोडल्यास या गडाला कोठेही तटबंदी नाही.

हरिश्चंद्रगडावरील तारामती शिखराची उंची ४८५० फूट असून तिच्या पोटात एकूण सात लेण्या आहेत. यापैकी एका लेण्यात श्री गणपतीची मूर्ती कोरलेली आहे. बाकीच्या लेण्या साध्या व निवासासाठी वापरात असाव्यात. तारामती शिखरावर उगम पावलेली मंगलगंगा नदी या लेण्यांच्या डाव्या बाजूने झेपावत खाली येते आणि हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या गर्भगृहाखालून महादेवाच्या चरणकमळांना स्पर्श करून गोमुखावाटे उत्तरेकडे अवखळपणे स्वतःभोवती गिरक्या घेत, अनेक डोह आणि जलप्रपात निर्माण करून खाली पांचणई गावाजवळ मुळा नदीत सामावून जाते. मंगलगंगा नदीला बंदिस्त करून तिच्यावर भव्य दगडी सेतुवजा प्रांगण बनवून त्यावर हरिश्चंद्रेश्वर मंदिराची उभारणी केली आहे. मंदिराच्या शिखराभोवती चहूबाजूने कोंदण केले आहे. असे म्हणतात की, या कोंदणात पूर्वी हिरे-माणके बसवली होती. या गडावर शैव व वैष्णव हे दोन्ही पंथ गुण्यागोविंदाने नांदले असावेत. कारण मंदिराच्या समोर 'सप्ततीर्थ' नावाचे तलाव असून त्याच्या भिंतीमध्ये



अनु.

चौदा कोनाडे आहेत. त्यामध्ये विष्णूच्या निरनिराळ्या रूपांतील आयुधधारी मनमोहक मूर्ती होत्या. १९७९ला मी गडाला पहिली भेट दिली तेव्हा आठ मूर्ती ह्या जागेवर होत्या, तर तीन गुहेमध्ये आणून ठेवल्या होत्या. आता येथील देवकोनात एकही मूर्ती नाही.

येथील प्रमुख आकर्षण म्हणजे मंदिराच्या खाली मंगलगंगा नदीच्या पश्चिमेला एका प्रचंड गुहेत कमरेइतके खोल थंडगार पाणी असून गुहेच्या मध्यावर पाषाणातून वर आलेली महादेवाची भव्य पाषाणाची पिंडी आहे. आपल्याला कंबरभर पाण्यातून चालत जाऊन शिवलिंगाची पूजा करता येते. पण एकूण तिथल्या अनामिक गूढ वातावरणामुळे मनावर प्रचंड दडपण येऊन आपण दुरूनच दर्शन घेऊ लागतो. या गुहेला केदारेश्वर गुहा असे म्हणतात. श्री चांगदेव महाराज यांची ही तपश्चर्येची जागा, येथेच त्यांनी हटयोगी सिद्धी आत्मसात करून या गडाच्या सहवासात 'तत्त्वसार' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाच्या शेवटी त्याने लेहिले आहे.

*हरिश्चंद्र नाम पर्वतु। तेथ महादेओ भक्तु*
*सुरसिद्धगंणी विख्यातु। सेविजे जो।।*
*हरिश्चंद्र देवता। मंगलगंगा सरिता*
*सर्वतीर्थ पुरविता। सप्तस्थान।।*
*ब्रम्हस्थळें ब्रम्ह न संहितु। चंचल वृक्ष अनंतु*
*लिंगि जगन्नाथु। महादेओ।।*
*ऐसा सर्वांचा समाओ। कळी संसारू दुःखाचा प्रवाहो*
*तो दैओ मोक्षाचा उत्साओ। शनैः शनैः।।*
*जो तीर्थांसि तीर्थ। केदारेंसिं तुकीताति।*
*आणि क्षेत्रिं निर्माती। प्रबंधु हा।।*

हरिश्चंद्रेश्वर मंदिर आणि येथील लेण्यांवर एकूण आठ शिलालेख आहेत. त्यावरून येथे निवृत्तीनाथ, ज्ञानदेव व संत नामदेव येऊन गेल्याचे दिसते. तसा स्पष्ट उल्लेख पाच क्रमांकाच्या शिलालेखात आहे. या लेखाचे वाचन डॉ. वि. भ. कोलते यांनी केले असून 'महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख' या आपल्या ग्रंथात प्रसिद्ध केले आहे. निवृत्तीनाथ हे ज्ञानदेवाचे मोठे बंधू पण नाथ परंपरेनुसार निवृत्तीनाथ ज्ञानदेवांचे गुरू आणि ज्ञानदेव त्यांचे शिष्य आहेत.

## इतिहासाच्या पाऊलखुणा

क्रमांत सात आणि आठव्या शिलालेखात नंदनाथ आणि गयनाथ तथा गहिनीनाथ व दखिणनाथ व त्याचा शिष्य सपकनाथ यांचा उल्लेख असून हे तिन्ही लेख हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या मागील लेण्यांच्या दर्शनी स्तंभावर कोरलेले आहेत. यावरून हरिश्चंद्रगडावर अनेक नाथयोगी राहत होते व येथे ९-१०व्या शतकातील मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथांपासून सुरू झालेली गुरू शिष्यांची परंपरा जोपासणारे नाथ संप्रदायाचे गुरूकुल असल्याचे सिद्ध होते.

हरिश्चंद्रगडावरील लेण्यात व मंदिरात कोरलेल्या शिलालेखावर प्रथम लक्ष गेले ते डब्ल्यू. एफ. सिंक्लेर याचे इ. स. १८७७ मध्ये. त्यानंतर फर्ग्युसन आणि बर्जेस यांच्या 'दि केव्ह टेम्पल ऑफ इंडिया' या पुस्तकात

उल्लेख आढळतो. पण इ. स. १९६९मध्ये गो. नी. दांडेकर यांनी 'दुर्गदर्शन' या पुस्तकात 'चक्रपाणी वटेश्वर नंदतु (तु) / तस्य सुतु वीकट देऊ' अशा ओळी लिहिल्या आहेत. यानंतर नागपूर विद्यापीठातील संशोधक प्रा. म. रा. जोशी यांनी हरिश्चंद्रगडावरील सर्व लेख शोधून त्याचे फोटो व ठसे महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाचे संचालक वि. गो. खोबरेकर यांच्याकडे पाठविले व तेथून ते डॉ. वि. भि. कोलते यांच्याकडे आले.

निसर्गप्रेमी मित्रांचे सर्वांत आवडते ठिकाण म्हणजे कोकण कडा. चंद्राच्या कोरीसारखा अंतर्वक्र आणि सुमारे अडीच हजार फूट खोली असलेला कोकण कडा अधिक उग्र रूप धारण करतो. त्याची भीषणता आणि भव्यताही मनाला स्तिमीत करून जाते. येथे शैव-वैष्णव पंथाबरोबरच येथील आदिवासी, गिरीवासींचा देव जागरही वेतोबाच्या रूपात पाहावयास मिळतो. गडाच्या उत्तरेस धावत गेलेल्या ऑक्टोपससारख्या लांबच लांब डोंगरधारा आहेत त्यापैकी मधल्या धारेवर सुमारे तीन मैल अंतरावर दगडाचे तांदळे व एका काठीला दोन-चार फूटके घाट (घंटी) बांधलेले दिसतात हाच तो आदिवासींचा वेतोबा.


हरिश्चंद्रेश्वर मंदिर, त्याच्या मागील टेकडीवरील विश्वामित्र ऋषींचे लहानसे मंदिर, केदारेश्वर गुहा तारामती शिखराच्या पोटातील गणेशलेणे, सप्ततीर्थ तलाव, रोहिदास आणि तारामती शिखराभोवती असणारी घनदाट झाडी, त्यामध्ये वास्तव्यास असणारे भेकर, सांबर, मोर, ससे आणि निरनिराळे पक्षी, अद्‌भुतरम्य कोकण कडा आणि मंगलगंगा नदीने केलेले लहानमोठे डोह आणि जलप्रपात यामुळे असे वाटते की निसर्गाने त्याच्या ठेवणीतील जे जे काही आहे ते सर्व येथे उधळून टाकले असावे. सरत्या पावसात रंगबिरंगी तेरड्याच्या फुलांनी बहरलेला किंवा अगदी मणिकांचन योग असेल तर कारवी फुललेली असताना गडाचे रूप म्हणजे त्रिभुवनातील सारे सौंदर्य लेवून काश्मीरच्या नंदनवनाशी स्पर्धा करणारे स्वर्गीय सुखाचा परमोच्च आनंद देणाऱ्या मयपुरीत आपण आल्याचा भास होऊ लागतो. खरोखर भाविकांनी, दुर्गयात्री आणि निसर्गमित्रांनी या गडाला आवर्जून भेट द्यावी, असे हे नितांत सुंदर आणि संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, निवृत्तीनाथ आणि नवनाथ संप्रदायांच्या पवित्र पदरवाने पुनित झालेल्या गूढरम्य परिसराला भेट द्यावी, असे ठिकाण आहे.

## थिदबीचा धबधबा

माळशेज घाट उतरून खाली गेलं की सावर्णे गावाजवळ हॉलिडे रिसॉर्ट आहे. तिथे उतरलं की थिदबी गावापर्यंत तीन किमी अंतर पायी जावं लागतं. जीप तिथपर्यंत जाऊ शकते. पायी जायचं असेल तर तासभर वेळ लागेल. थिदबी गावापासून धबधब्याच्या पायथ्यापर्यंतचं अंतर एक तासाच्या वाटचालीने पार होतं. वाटेतील नदी ओलांडताना खूप काळजी घ्यावी लागते. इथल्या तीन धबधब्यांपैकी डावीकडच्या धबधब्याचं पाणी जोरदार वाऱ्यामुळे खालपर्यंत पोहोचतच नाही. पाण्याच्या धारेचं रूपांतर तुषारांमध्ये होते.
मुंबई ते सावर्णे अंतर : १२८ किमी.



अनु.



# ढगातला माळरान

पावसाची मजा लुटायची तर कोणत्या ना कोणत्या धबधब्याखाली भिजायला हवं. मुंबईकरांना असं जवळचं ठिकाण म्हणजे माळशेज घाट. पावसातील निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी हॉट डेस्टिनेशन.

थंडगार वाऱ्याची झुळुक. त्याबरोबर येणारे काळे काळे ढग आणि ढगांबरोबर रिपरिप करत येणारा पाऊस... डोंगररांगांनी अंगावर पांघरलेला हिरवा शालू, भुरळ पाडणारं धुकं आणि खळखळत वाहणारे धबधबे... मनमोहक असं हे दृश्य प्रत्येकाच्याच आवडीचं. या धबधब्याखाली भिजताना लहानांबरोबरच मोठेही मागे राहत नाहीत. पावसाच्या धारा पडू लागताच अनेकांचं आऊटिंगला जाण्याचं वीकेण्ड प्लॅनिंग सुरू होतं. यात धबधब्याखाली भिजायला जाणाऱ्यांची संख्या जरा जास्तच. ठाणे, मुंबईकरांना असं जवळचं धबधब्याचं ठिकाण म्हणजे 'माळशेज घाट'.



अनु.

कल्याणहून मुरबाड मार्गे माळशेजला जाता येतं. कल्याणहून माळशेज घाट साधारण ७५ किमीवर आहे. सध्या या घाटात २४ तास पोलिसांची गस्त असते. जागोजागी 'इथे दरड कोसळतात, इथे वाहनं थांबवू नयेत' अशा सूचना लावलेल्या आहेत. तरीही पावसात भिजण्याचा आनंद लुटायला आलेले पर्यटक या सूचनांकडे दुर्लक्ष करून बेधुंदपणे धबधब्याखाली भिजत असतात. रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करून धबधब्याखाली भिजण्याचा मनमुराद आनंद घेता येतो. पण, अनेक जण दारू पिऊन भर रस्त्यात नाचतही असतात. हा धिंगाणा पाहून माणसांनाच काय,
निर्सगालाही संताप येत असेल.

माळशेज घाटाच्या पायथ्याचं गाव टोकावडे. या गावातून सह्याद्रीची अजस्त्र रांग दिसते. सह्याद्रीचा हा पर्वत जणू आपल्याला खुणावत असल्यासारखं वाटतं. तर दाटून आलेले ढग चादर बनून या सह्याद्रीला झाकण्याचा प्रयत्न करताना दिसतात. निसर्गाच्या या वाटेवर एकही हॉटेल नाही. त्यामुळे स्वतःची बेगमी स्वतःच करायला हवी. स्थानिक लोक इथे चहा, वडापाव, मक्याची कणसं विकत असतात. माळशेज घाट संपता संपताच डाव्या हाताला डोंगराच्या ओढ्यावर एमटीडीसीचं गेस्ट हाऊस आहे.

काही वर्षांपूर्वी दरडी कोसळतात म्हणून पावसात बऱ्याचदा रस्ता बंद असायचा. पण सध्या रस्त्याचं चांगलं रुंदीकरण झाल्याने वाहतूक सुरळीत चालू असते. तरीही एखाद्या ठिकाणी रस्ता खचलेला आढळतोच. तेव्हा वाहनं सावकाश चालवावी लागतात. तरीही या साऱ्या धोक्यांची पर्वा न करता भिजायला येणारा पर्यटक मनमुराद निसर्गाचा आनंद घेत असतो. गर्द झाडी, धबधब्यांचा आवाज, रस्त्यावर येणारं धुकं या साऱ्यातून हा प्रवास पर्यटकांना भुरळ पाडतो.

माळशेज घाटाच्या या निसर्गरम्य प्रवासात अनेक गडकिल्ले पाहायला मिळतात. सिद्धगड, गोरख, मच्छिंद्रघाट, नाणेघाट, जीवधन, भैरव गड इथून दिसतात. माळशेज घाटापुढे असणारा गिर्यारोहकांची पंढरी ठरलेला हरिश्चंद्रगडही इथून दिसतो. इथूनच २० किमी अंतरावर शिवतीर्थ किल्ले शिवनेरी आहे. घाट रस्त्यावर अनेक पक्षी, प्राणी पहायला मिळतात. लहान मुलं माकडांना शेंगदाणे, बिस्किटं खायला देऊन एक वेगळाच आनंद लुटताना दिसतात.

घाटात सतत पाऊस पडत असल्याने बऱ्याचदा वाहतूक ठप्प होते. कधी कधी तर धुकं दाटून आल्याने चार-पाच फूटावरचंही दिसत नाही. घाटाच्या मधल्या टप्प्यात महादेवाचं मंदीर आहे. इथे निर्सगाचा अद्भूत चमत्कार पाहायला मिळतो. तेव्हा निसर्गाच्या या जादुई दुनियेचा अनुभव घ्यायला या पावसात भेट द्यायला हवी.

***गेले काही वर्ष दारुड्यांच्या गोंधळामुळे माळशेजघाटासारखं निसर्गरम्य ठिकाण इतकं बदनाम झालंय की कुटंबांच्या सहलीतून ते कधीच बाद झालंय. मात्र पर्यावरणाच्या विविधतेबरोबर त्या परिसराला ऐतिहासिक ओळखही आहे.***



माळशेज घाटात पाऊस आणि दारुडे यांचं आगमन एकत्रितच होतं. पूर्वी दरडी कोसळण्यासाठी कुख्यात असलेला माळशेज घाट गेल्या काही वर्षांत बेवड्या पर्यटकांमुळे बदनाम झाला आहे; इतका की फॅमिली टूरिस्ट जवळपास इथे फिरकतच नाहीत आणि त्यामुळे टग्या दारुड्यांना तीन महिने हा घाट अक्षरशः आंदण दिल्यासारखा बेवारस असतो.

पण माळशेज घाट हा या बेवड्यांमुळे बदनाम झाला असला तरी हा घाट म्हणजे निसर्गाची अक्षरशः खाण आहे. मात्र, या खाणीतील रत्न वेचण्यासाठी माणसाने शुद्धीवर असण्याची गरज आहे. खरंतर इथल्या निसर्गाचीच बेहोषी इतकी आहे की त्यापुढे अन्य कृत्रिम नशेची गरज नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच इथले डोंगर हिरवी दुलई पांघरून पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज होतात. इथली वैविध्यपूर्ण जैवसंपदा, अगणित प्रकारची फुलं, पक्ष्यांच्या विविध प्रजाती हे सर्व डोळसपणे अनुभवण्याची गरज आहे.

माळशेज हा मुख्यतः वन डे पिकनिक स्पॉट म्हणून फेमस आहे. आठवड्याभराच्या दगदगीनंतर रविवारच्या एका दिवसात आपल्या मित्रमंडळींसमवेत धम्माल करून परतण्यासारखा हा स्पॉट आहे. मुंबई-पुण्यापासून जवळ असल्यामुळे इथे अशाच पर्यटकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असते. पण माळशेजचे सौंदर्य खऱ्या अर्थाने, शांत चित्ताने आणि डोळसपणे अनुभवायचे असेल तर इथे मुक्काम ठोकला पाहिजे. माळशेजची वैशिष्ट्यं अनेक आहेत. भारतातली पतंगांच्या (मॉथ) सर्वाधिक प्रजाती माळशेज घाटात आढळतात. पावसाळ्यात तर माळशेज घाट म्हणजे पतंगांसाठी स्वर्गच. जून ते ऑक्टोबर या काळात अमावस्येच्या रात्री प्रकाशाच्या आजूबाजूला हे पतंग जमा होतात. त्यामुळे फारसे कष्ट न करताही ते सहज दिसू शकतात.

ॲटलास मॉथ हा जगातला सर्वांत मोठा पतंग माळशेज घाटात आढळतो. विस्तारलेल्या पंखासह

याची रुंदी जवळपास एक फूट इतकी विस्तीर्ण असते. याशिवाय पंखावरील चंद्रकोरीप्रमाणे दिसणाऱ्या आकाराचा 'मून मॉथ', पंखांवर डोळ्यांसारखे पारदर्शक ठिपके असलेला गोल्डन एम्परर मॉथ (या पारदर्शक ठिपक्यांमुळे याचं संरक्षण होते), वड, पिंपळ, उंबर यांसारख्या फायकस जातीच्या झाडांची पाने खाऊन वाढणारा फायकस मॉथ (ही सर्व फायकस जातीची झाडे आहेत, त्यावरून या पतंगाला फायकस मॉथ हे नाव पडलं आहे), पंखांवर घुबडांच्या डोळ्यांप्रमाणे खुणा असलेला आऊलेट मॉथ (या खुणांमुळे पक्षी या पतंगाला खाण्याचा प्रयत्न करत नाहीत), पानासारखा दिसणारा लीफ मॉथ, गोट मॉथ (बकरी पतंग : याच्या विष्ठेला बकरीच्या विष्ठेसारखा वास येतो), फक्त डोंगराळ प्रदेशात आढळणारा अत्यंत देखणा हिल हॉक मॉथ, टर्नटेल मॉथ (याच्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे डोके आणि शेपटी याच्यातील फरक पक्ष्यांना पटकन समजून येत नाही.) आदी वैविध्यपूर्ण रंगआकाराचे पतंग माळशेज घाटात दिसून येतात. इतक्या वेगवेगळ्या प्रकारचे पतंग अन्य कुठेही एकाच ठिकाणी आढळून येत नाही. त्यामुळे केवळ जाणकारांनीच नव्हे, तर रंगबिरंगी पतंग बघण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकानेच पावसाळ्यात माळशेजला भेट दिली पाहिजे.

माळशेजला मुक्काम करून आसपास बघण्यासाठी अनेक ठिकाणं आहेत. ट्रेकर्ससाठी तर माळशेज घाट म्हणजे पर्वणीच आहे. हरिश्चंद्र गड, सिद्धगड, नाणेघाट, शिवनेरी आदी किल्ले या परिघात आहेत. वर्षभरच ट्रेकर्सची या किल्ल्यांना पसंती असते पण पावसाळ्यातलं वातावरणच काही और असतं. हिरवी चादर पांघरलेले डोंगर, सतत कोसळणारा पाऊस आणि मऊसूत ढगांची प्रचंड गर्दी यामुळे निर्माण झालेल्या गूढ वातावरणात, वारा अंगावर घेत ट्रेक करण्याचा अनुभव काही औरच



अनु.

आहे. नाणेघाट, सिद्धगड वगैरे किल्ले चढण्यास सोपे असल्यामुळे अगदी नॉन-ट्रेकर्सनीही पावसाळ्यात इथे ट्रेकिंगचा अनुभव घेण्यास हरकत नाही.

माळशेज घाटातून पुढे गेल्यावर ओझर आणि लेण्याद्री ही अष्टविनायकांपैकी दोन श्रद्धास्थानं आहेत. त्यामुळे माशळेजला मुक्काम करून दिवसभरात ही ठिकाणं सहज करता येण्यासारखी आहेत. शिवनेरीवरही अगदी वरपर्यंत गाडी जात असल्यामुळे महाराष्ट्राचं आराध्यदैवत असलेल्या शिवरायांचं हे जन्मस्थान सहज बघता येतं.

या प्रसिद्ध ठिकाणांबरोबरच दोन अपरिचित ठिकाणंही या परिसरात आहेत. माळशेज घाटाच्या माथ्यावर एमटीडीसी रिसॉर्टच्या जरापुढे एक कच्चा डॅम बांधला आहे. या डॅमच्या भिंतीवरून जाऊ लागलो की, जरा पुढे डाव्या हाताला खाली एक कच्चा रस्ता उतरतो जो आपल्याला एका प्राचीन मंदिराकडे घेऊन जातो. स्थानिक रहिवासी हे पांडवकालीन मंदिर असल्याचं सांगतात. या मंदिराच्या एकूण स्वरूपावरून ते बरंच प्राचीन असावं, हे सहज समजून येतं. मोठमोठ्या दगडांमध्ये अतिशय सुरेख कोरिवकाम करून हे शिवमंदिर साकारलं आहे. काळाच्या ओघात मंदिराची बरीच पडझड झाली आहे. शिवाय, स्थानिक रहिवाशांनी इथल्या अनेक दगडांना शेंदूर फासून अवकळा आणली आहे.




अनु.


पण
काळाचे आणि
माणसांचे हे घाव सोसत
हे मंदिर अजूनही आपले
सौंदर्य टिकवत उभे आहे.


या मंदिराच्या उजव्या हाताला, काही अंतरावर एक गूढ गुंफा आहे. या गुंफेबाबत स्थानिकांनाही फारशी काही माहिती आहे. तिच्या एकंदर स्वरूपावरून ही गुंफा बौद्धकालीन असावी किंवा प्राचीन काळातील एखादं प्रार्थनास्थळ असावं, असा अंदाज बांधता येतो. या गुंफेचीही बरीच पडझड झाली आहे. मात्र, या गुंफेतील कोरिवकामही थक्क करणारं आहे.

विशेष म्हणजे हे मंदिर आणि गुंफा ही दोन्ही ठिकाणं पर्यटकांच्या गर्दीपासून दूर आहेत. त्यामुळे चहूबाजूने उभे असलेले हिरवेगच्च पहाड, या पहाडांच्या अंगाखाद्यांवर खेळणारी ढगांची गर्दी, मनसोक्त कोसळणारा पाऊस, कुडकुडायला लावणारी थंडी यांचा आनंद निवांतपणे, शांत चित्ताने लुटायचा असेल, तर ही ठिकाणं बेस्ट आहेत.

पियक्कड पर्यटकांमुळे बदनाम झालेल्या माळशेजचं हे वेगळं रूप खऱ्या पर्यटकाने आवर्जून अनुभवावं असं आहे. अशा पर्यटकांची गर्दी इथे वाढली, तर माळशेजची प्रतिमा बदलायला वेळ लागणार नाही.





सह्याद्रीची बालाघाट रांग ही पश्चिम पूर्व पसरली आहे. ती नाशिक, नगर आणि पुणे या जिल्ह्यांना छेदत पुढे जाते. या रांगेत अनेक दुर्गपुष्प आणि अनेक नागमोडी घाट आहेत. माळशेज, दऱ्याघाट, नाणेघाट, साकुर्डीघाट असे अनेक घाट आहेत. माळशेज घाट ओलांडल्यावर हरिश्चंद्रगडाच्या एकदम समोर निमगिरी किल्ला आहे. निमगिरी व त्याच्या बाजूच्या डोंगरावर असलेला हनुमंतगड एका दिवसात पाहता येतात.

## काय पहाल?

किल्ल्याच्या पायथ्याच्या खांडेपाड्यातल्या शाळेच्या मागून किल्ला चढायला सुरूवात केल्यास विहीर लागते. थोड्याच वेळात आपण उघड्यावरील मारुतीच्या मूर्तीपाशी पोहोचतो. मारुतीच्या समोरच समाधीचे दगड आणि वीरगळी आहेत. येथून एक पायवाट खालच्या बाजूला जाते. या वाटेने १० मिनिटे उतरल्यावर काळूबाईचे मंदिर आहे. मंदिर ही मुक्कामासाठी अगदी योग्य जागा आहे. मंदिराच्या समोरच्या झाडांमध्ये तीन समाधी आहेत. मारुती मंदिरापासून अर्ध्या तासात आपण कातळात खोदलेल्या पायऱ्यांपाशी पोहोचतो. इथे नैसर्गिक गुहा आहेत. त्यांना घोड्याच्या पागा म्हणतात. किल्ल्याच्या खोदीव पायऱ्या प्रथम उजवीकडच्या डोंगरावर घेऊन जातात. गडावर दरवाजाच्या बाजूला पहारेकऱ्यांच्या खोल्या आहेत. तेथून गडाची सर्वात वरची टेकडी चढायला लागायचे. समोरच एक महादेवाचे मंदिर आहे. यात गजांतलक्ष्मीचे शिल्प आहे. सर्वात वरच्या भागात काही घरांचे व वाड्यांचे अवशेष आहेत. येथून हरीश्चंद्रगडाचा बालेकिल्ला आणि टोलारखिंड दिसते. समोर चावंडचा किल्लाही दिसतो. किल्ल्याच्या बाजूचा डोंगर म्हणजे हनुमंतगड त्यावरील तटबंदी, २ पाण्याच्या टाक्या आणि गाडल्या गेलेल्या दरवाजाचे अवशेष दिसतात. संपूर्ण किल्ला फिरण्यास १ तास लागतो.

## पोहोचण्याच्या वाटा

निमगिरीला जायचे असल्यास कल्याण- मुरबाडमार्गे नगर, आळेफाटा किंवा जुन्नर येथे जाणारी कुठलीही एसटी पकडावी. माळशेज घाट पार केल्यावर दोन किमी अंतरावर खुबी फाटा आहे. त्याच्या पुढे ४ किमी अंतरावर वेळखिंड लागते. वेळखिंड संपली की पारगाव नावाचे गाव आहे. येथून एक रस्ता उजवीकडे जातो.

एक वाट पायऱ्यांची आहे.

या कातळ कोरीव पायऱ्यांच्या मार्गावरील पायऱ्या तुटल्यामुळे वाट बरीच अडचणीची झाली आहे. या वाटेवर बराच घसारा (स्क्री) आहे. हा घसाऱ्याचा धोकादायक भाग पार करण्यासाठी बरोबर रोप असणे आवश्यक आहे. हा धोकादायक भाग टाळण्यासाठी दुसरी वाट वापरावी. दुसरी वाट निमगिरी किल्ल्याच्या दोन डोंगरांच्यामधील घळीतून वळणावळणाने वर जाते व पुढे घसाऱ्याच्या वर पायऱ्याच्या वाटेला मिळते.

निमगिरी किल्ल्याच्या दोन डोंगरांच्या मधील घळीतून वळणावळणाने वर जाणाऱ्या वाटेने खिंडीच्या टोकाशी पोहोचल्यावर पुढे दोन वाटा फुटतात. उजवीकडची वाट निमगिरीवर आणि डावीकडची वाट हनुमंतगडावर जाते.

# रायगड जिल्हा
## पनवेल

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते पनवेल | | | | | 35 | | | | |
| **1** | कलावंतीण दुर्ग | | किल्ला | ट्रेक | | 15 | E | | | |
| **2** | प्रबळगड | | किल्ला | ट्रेक | मंदिर | 15 | E | 0.1 | S | |
| **3** | कर्नाळा | अभयारण्य | किल्ला | ट्रेक | | 15 | SW | 30 | SW | |
| **4** | जांभुळपाडा | धबधबा | | मठ | निसर्ग | 17 | SW | 30 | SW | |
| **5** | रानसई धरण | | | | धरण | 22 | SW | 6 | SE | |





# कलावंतीण

**गिरीदुर्ग** म्हणजेच डोंगरमाथ्यावरील दुर्ग या प्रकारात मोडणारा कलावंतिणी हा ट्रेकिंग स्पॉट विशेष प्रसिद्ध आहे तो त्याच्या अंगठ्यासारख्या आकारामुळे. माथेरानच्या डोंगररांगात असल्याने उन्हाळ्याच्या सुट्टीतदेखील तो अनेक ट्रेकर्सच्या पसंतीस उतरतो. पनवेल विभागात येणारा आणि रायगड जिल्ह्यात मोडणारा हा मध्यम श्रेणीतला किल्ला समुद्र सपाटीपासून दोन हजार तीनशे फुट उंचावर असून चढण्यास सहज असल्याने नेहमीच सर्वांचं लक्ष वेधून घेतो. किल्ल्यांमध्ये असणाऱ्या टाक्यांवरून हा किल्ला सातवाहनकालीन असावा असं वाटतं. मात्र याचा उल्लेख यादव काळात आढळतो. शिवरायांनी इ.स १६५७ मध्ये हा किल्ला घेतला. पुरंदरच्या तहामध्ये मोगलांना देण्यात येणार्या २३ किल्ल्या मध्ये या किल्ल्याचा समावेश होता. त्यामुळे याला ऐतिहासिक महत्त्व देखिल आहे.



अनु.




## प्रबळगड

कलांवतीणी दुर्गाच्या बाजूलाच लागून असलेला प्रबळगड हा गिरीदुर्ग प्रकारात मोडतो. जुन्या मुंबई - पुणे हमरस्त्यावरुन जातांना एक दुर्ग चटकन आपले लक्ष वेधून घेतो तो म्हणजे प्रबळगड. पूर्वेला उल्हास नदी, पश्चिमेला गडी नदी, दक्षिणेला पाताळगंगा नदी, माणिकगड आणि नैऋत्येला कर्नाळा किल्ला, तसंच जवळच असलेला इर्शाळगड असा चहूबाजूंनी वेढलेला हा किल्ले मुरंजन उर्फ प्रबळगड. प्रबळगड व त्याच्या बाजूचा कलावंतीणीचा सुळका याच्या मध्ये इंग्रजी ‘व्ही’ आकाराची खाच आहे. माथेरानच्या ‘सनसेट पॉईंट’वरुन दिसणारा सूर्यास्त याच प्रबळगडाच्या खाचेत होतो. त्यामुळे अनेक ट्रेकर या गडाकडे खेचले जातात.



### कसं जाल?

मुंबई ते पनवेल ट्रेनने प्रवास करुन पुढे एस टी च्या बस ने किंवा खासगी वाहनाने पायथ्याशी असलेले ठाकुरवाडी गाव सहज गाठता येतं. तिथून पुढे कलावंतीण सुळक्याकडे जाता येतं.

# प्रबळगड



जुन्या मुंबई- पुणे हमरस्त्यावरून जाताना एक दुर्ग चटकन आपले लक्ष वेधून घेतो तो म्हणजे प्रबळगड. पूर्वेला उल्हास नदी, पश्चिमेला गडी नदी, दक्षिणेला पाताळगंगा नदी, माणिकगड आणि नैऋत्येला कर्नाळा किल्ला, तसेच जवळच असलेला इर्शाळगड असा चहूबाजूंनी वेढलेला हा किल्ले मुरंजन उर्फ प्रबळगड. प्रबळगड व त्याच्या बाजूचा कलावंतीणीचा सुळका यांच्यामध्ये इंग्रजी 'व्ही' आकाराची खाच आहे. माथेरानच्या 'सनसेट पॉइंट'वरून दिसणारा सूर्यास्त याच प्रबळगडाच्या खाचेत होतो.

प्रथम इंग्रजांनी प्रबळगड हे माथेरानसारखे थंड हवेचे ठिकाण म्हणून विकसित करण्याचा विचार केला होता. मात्र पाण्याच्या दुर्भिक्ष्यातेमुळे तो विचार मागे पडला.

## काय पहाल?

प्रबळगडाचा माथा म्हणजे एक मोठे पठार आहे. हे पठार जंगलाने व्यापलेले आहे. गडावर एक गणेशमंदिर आहे. तसेच दोन- तीन पाण्याच्या टाक्यासुद्धा आहेत. मात्र ही टाकी शोधण्यासाठी व गडावर फिरण्यासाठी वाटाड्या घेणे आवश्यक आहे. गडावर तीन- चार इमारतींचे अवशेष आहेत. घनदाट कारवीच्या जंगलामुळे गडावरील वाटा नीट दिसत नाहीत. मात्र गडावरून माथेरानचे विविध पॉइंट्स फार सुंदर दिसतात.

किल्ला पाहून झाल्यावर पुन्हा माचीवर यावे. किल्ला व कलावंतीणीचा सुळका यामधील खिंडीतून कलावंतीणीच्या सुळक्यावर जाण्यासाठी कातळात खोदलेल्या पायऱ्यांची वाट आहे. या वाटेवर पाण्याचे टाक आहे. माथ्यावर कुठलेही अवशेष नाहीत.




## पोहोचण्याच्या वाटा

**शेडुंग मार्ग:** मुंबई किंवा पुण्याहून येणाऱ्यांनी पनवेल गाठावे. जुन्या पनवेल- पुणे हम रस्त्यावर शेडुंग गावाकडे जाणारा फाटा आहे. एसटी चालकांना सांगून शेडुंग फाट्यावर उतरावे. हमरस्त्यावरून जाणारी वाट पकडावी, अर्ध्या तासाच्या रस्त्यावर शेडुंग गाव लागते. शेडुंग गावापासून (अंतर ५ किमी) ठाकुरवाडीपर्यंत चालत जावे. ठाकुरवाडी हे गडाच्या पायथ्याचे गाव आहे. गावातून बैलगाडीची वाट थेट आपल्याला प्रबळमाचीवर घेऊन जाते. प्रबळमाचीवर जाण्यास १ तास लागतो. प्रबळमाची गावातून समोरच किल्ला दिसतो. प्रबळमाची गावातून किल्ल्याचा माथा डावीकडे ठेवत ३० मिनिटे चालल्यावर एक घळ दिसते. येथून गडावर जाण्यास एक तास पुरतो. ठाकूरवाडीला जाण्यास पनवेलहून बसेस आहेत.





अनु.



जुन्या मुंबई-पुणे हमरस्त्यावरुन जाताना एक डोंगररांग आपलं लक्ष वेधून घेते. त्यातला एक आहे प्रबळगड. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेकडो किल्ल्यांपैकी एक असलेला हा किल्ला खूप मोठा आहे. फार कमी लोकांनी तो नीट पाहिला असेल. जाणून घेऊ या प्रबळगडाविषयी...

# नक्की पाहावा असा प्रबळगड

प्रबळगडावर पोहोचण्यासाठी आता खूप सोपं झालं आहे. पनवेलहून ठाकूरवाडी बस सेवा आहे. तसंच खासगी गाड्यासुद्धा जातात. तुम्ही तुमची गाडी घेऊन जाण्याचा पर्याय तर आहेच.

- **( शेडुंग मार्ग ) पनवेल** - ठाकूरवाडीपर्यंत जाऊन तिथून चांगली पायवाट आहे, जी थेट माचीवर जाते.
- **पनवेल** - वाजे जाऊन तेथूनसुद्धा आता चांगली वाट झाली आहे.
- माथेरान जवळील शार्लोट जलाशयाजवळील पिसरनाथ मंदिराजवळून डावीकडे वळल्यावर दहा मिनिटांत आपण एका घळीत येऊन पोहोचतो. लोखंडी शिड्यांच्या सहाय्यानं दोन तासांत आरकस वाडी या गावात पोहोचता येतं. आरकस वाडीतून प्रबळगडचा डोंगर चढत काळ्या बुरूजाखाली असलेल्या पठारावरून घळीतून वर चढत जाता येतं. ( सोबत वाटाड्या किंवा माहितगार असावा)
- ठाकुरवाडीतून (प्रबळगडाचे पायथ्याचे गाव) प्रबळगडाकडे बघताना समोर पठार दिसतं. डाव्या हाताला कलावंतीण सुळक्याच्या खाली एक वाडी आहे आणि उजव्या हाताला एक वाडी आहे, ज्याला आम्ही तेथे राहणाऱ्या देहूची वाडी असं म्हणतो. तिथूनसुद्धा वर वाट जाते आणि नंतर ती वाट एका घळीतून थेट काळ्या बुरुजाकडे जाणाऱ्या वाटेवर पोहोचते. (सोबत वाटाड्या किंवा माहितगार असावा)

महाराष्ट्रात सध्या गिर्यारोहणाचं वेड वाढत चाललं आहे. आपल्या इथे केलं जाणारं गिर्यारोहण किंवा भटकंती ही सहसा एखाद्या गड-किल्ल्यावर किंवा घाटवाटेवर तर काही नुसत्या डोंगररांगावर केली जाते. यात प्रामुख्यानं समावेश आहे तो सह्याद्री पर्वतरांगांचा आणि येथील गड-किल्ल्यांचा. शेकडो वर्षांचा इतिहास लाभलेले हे गड-किल्ले आजही इतिहासाच्या पाऊलखुणा दाखवत आहेत. आज गडांवर जाणारे किती जण ऐतिहासिक गोष्टींचा अभ्यास करत असतील यात शंका असली, तरी किल्ल्यांवर जाण्याचं प्रमाण वाढतंय.

गडकोटांच्या उदाहरणांमधील एक महत्त्वाचं उदाहरण म्हणजे पनवेलजवळचा, समुद्रसपाटीपासून २ हजार ३०० फूट उंचीवर असलेला 'प्रबळगड'. याचं आधीचं नाव मुरंजन. जुन्या मुंबई-पुणे हमरस्त्यावरुन जाताना एक डोंगररांग आपलं लक्ष वेधून घेते. त्यातला एक गड म्हणजे प्रबळगड. पूर्वेला उल्हास नदी, पश्चिमेला गाढी नदी, दक्षिणेला पाताळगंगा नदी, माणिकगड आणि नैऋत्येला कर्नाळा किल्ला. जवळच आणि एक धार एकमेकांना जोडलेली असा इर्शाळगड असा चहूबाजूंनी वेढलेला हा किल्ले मुरंजन उर्फ प्रबळगड. प्रबळगड आणि त्याच्या बाजूचा कलावंतीणीचा सुळका याच्या मध्ये इंग्रजी 'व्ही' आकाराची खाच आहे. माथेरानच्या सनसेट पॉईंटवरून दिसणारा सूर्यास्त याच प्रबळगडाच्या आणि कलावंतीण यामध्ये होतो. प्रचंड मोठा पण, फार कमी लोकांनी नीट पाहिलेला असा हा किल्ला. कारण आज प्रबळगडावर प्रचंड संख्येनं लोक फिरायला किंवा गिर्यारोहणासाठी जात असतात. पण, ते प्रबळगडाला लागून असलेल्या कलावंतीण नावाच्या सुळक्यावर जातात ( पूर्ण सुळक्याला दगडात कोरलेल्या पायऱ्या आहेत) किंवा बैलशिंगाच्या वाटेनं प्रबळगडाच्या एका ठिकाणी जातात आणि 'आम्ही प्रबळगड पाहिला' असं म्हणतात. पण खरं तर प्रबळगडाचा आवाका हा प्रचंड मोठा. प्रबळगडावरील जंगलसुद्धा तेवढंच दाट, प्रबळगडावर असलेली समाधी, काळा बुरुज, गडावर बांधकामांचे ३ ते ४ अवशेष आहेत. पाण्याची टाकी आणि मानवनिर्मित चोकौनी आकारानं सुरुवात

होऊन आतमध्ये मोठ्या खोल अशा गुहादेखील तिथे आहेत. काही लोकांच्या किंवा चांगल्या भटक्यांच्या नजरेत आलेल्या या गोष्टी आहेत. पण आजकाल तिथे जाणारे अनेक जण, एक तर कलावंतीण करून आम्ही प्रबळगड पाहिला, किंवा काळ्या बुरुजापर्यंत पूर्ण न जाताही नुसता भोज्जा करून, किल्ला पाहून आल्याचं सांगून मोकळे होतात.

गड-किल्ले हे असे न पाहता त्याचा प्रत्यक्षात त्या-त्या विशिष्ट ठिकाणी जाऊन ती जागा आणि त्या गोष्टी अनुभवायची गोष्ट आहे. इतिहास संशोधक त्याचा सखोल अभ्यास करतात. पण, खरीखुरी भटकी आणि गिर्यारोहक मंडळी काळाच्या आड जात चाललेल्या आपल्या गड-किल्ल्यांचे अनुभव नक्कीच घेऊ शकतात. या किल्ल्यांवर किती आणि काय दडलंय तो अनुभव आम्हाला, म्हणजे 'निसर्ग मित्र'च्या टीमला २०१९ साली प्रस्तरारोहणाच्या मोहिमेदरम्यान ( Rock climbing expedition ) पाहणी करताना आला. कदाचित पहिल्यांदा आम्ही तिथे गेलो असू किंवा अनेक वर्ष तिथे कुणी गेलंच नसावं अशा काही जागाही आमच्या नजरेस पडल्या. त्या म्हणजे, प्रबळगडाच्या पश्चिमेस काही बुरुज, तटबंदी आहे. चक्क पूर्ण दगडात कोरलेला बुरुज आणि त्या बुरुजात एक अगदी सुंदर असा गुप्त दरवाजाही असलेला आमच्या नजरेस पडला. ही वैशिष्ट्यं अशी आहेत की पाहत राहावीत. प्रबळगड आणि असे अनेक गिरीदुर्ग हे नुसते जाऊन पूर्ण बघून होऊच शकत नाहीत. ते बारकाईनं पाहायला हवेत. किल्ल्यांवर गेल्यावर आपण निसर्गाचा पुरेपूर आदर करायला हवा. सुरक्षिततेची जाणीव ठेवून आणि गड-किल्ल्यांचं पावित्र्य राखून गड हा तसाच बघायचा प्रयत्न केला पाहिजे.



## कर्नाळा अभयारण्य

गेली अनेक वर्षे मुंबईकरांचा आवडता आणि मुंबईच्या जवळचा स्पॉट म्हणजे कर्नाळा पक्षी अभयारण्य! पेण आणि पनवेलच्या मध्ये असलेल्या या सुंदर अभयारण्यात पक्ष्यांची विविधता आहेच, पण त्याचबरोबर वृक्षसंपत्तीच्या बाबतीतही कर्नाळा संपन्न आहेच.

या अभयारण्याचं वैशिष्ट्य म्हणजे, ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांनाही हा स्पॉट एकदम बेष्टच. मुंबईपासून केवळ ६० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या स्पॉटला जायचं, म्हणजे बरोबर काही खाण्यापिण्याचे पदार्थ घेतले नाहीत, तरी चालण्यासारखंच आहे. कारण अभयारण्याच्या सुरुवातीला हायवेला लागूनच हॉटेल आहेत.

### कसे जाल?

0 मुंबईहून कोकण-अलिबाग-पेण येथे जाणारी कोणतीही बस पकडून कर्नाळ्याला उतरायचं.

0 मुंबईहून ट्रेननं पनवेलला जाऊन तिथून टमटमने कर्नाळा.

### जंगलात जाताना काय काळजी घ्याल?

0 जंगलात जाताना निसर्गाची नासधुस होणार नाही, याची काळजी घ्या. प्लॅस्टिक बॅग्ज स्ट्रीक्टली नॉट अलाऊड.

0 जंगलात विषारी साप असल्याने हंटर शूज घालणे मस्ट.

**कर्नाळ्याचं पक्षी वैभव**

सुळक्यावर घरटं बांधणारा शाहीन ससाणा, मलबार व्हिसलिंग थ्रश, कोकीळ, सुतार, नीलकंठ, पॅराडाइज फ्लाय कॅचर, कोतवाल, सुतार, नीलकंठ इ.

**कर्नाळ्याला असंही जाता येईल...**

मुंबई ते कर्नाळा अंतर : ६४ कि.मी. पनवेलहून २० कि.मी.वर असलेल्या गुळसुंदे गावाहून पूर्वेकडूनही किल्ला सर करता येतो. पण यासाठी भरपूर चालायची तयारी हवी.

**कर्नाळ्यात राहण्यासाठी**

वनविभागाचं रेस्ट हाऊस. मात्र आधी आरक्षण करणं आवश्यक.

**संपर्कासाठी फोन : ०२२-२५४०२५२२**

अभयारण्य म्हटलं, की तिथं वाघ, हरिण किंवा बिबट्या असायलाच पाहिजे, असा समज असेल तर दूर करा; कारण महाराष्ट्रामध्ये वन्य प्राणी मोठ्या संख्येनं वास्तव्याला नसलेली काही 'वैशिष्ट्यपूर्ण' अभयारण्यंही आहेत. यापैकी एक म्हणजे पनवेलनजिकचं कर्नाळा अभयारण्य. इथं कोल्हा, भेकर, रानडुक्कर असे प्राणी आहेत; पण या जंगलावर वर्चस्व आहे ते मुख्यतः पक्ष्यांचं. इथली वनसंपदा आणि पक्ष्यांच्या वास्तव्यासाठी असलेली अनुकूलता लक्षात घेऊनच ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांनी सरकारकडे हा परिसर पक्ष्यांचं अभयारण्य म्हणून घोषित करण्याची शिफारस केली होती.

## कुठं आहे कर्नाळा?

मुंबई-गोवा एक्सप्रेसवेवर पनवेल जवळ कर्नाळा अभयारण्य आहे. याचं वैशिष्ट्य म्हणजे जंगलाला लागून अतिशय देखणा कर्नाळा किल्लाही आहे. त्यामुळे निसर्गातील भटकंतीबरोबरच ऐतिहासिक किल्ला बघण्याची संधीही मिळते. वृक्षराजीच्या घनदाट छायेतून पक्षी निरीक्षण करत किल्ला चढण्याची मजा काही वेगळीच आहे.

## अभयारण्याची वैशिष्ट्यं

अभयारण्यामध्ये १४७ प्रकारचे स्थानिक पक्षी, तर ३७ प्रकारचे विविध ऋतुंमध्ये येणारे स्थलांतरीत पक्षी पाहायला मिळतात. स्वर्गिय नर्तक, भृंगराज, हळद्या, हरितांग, सोनेरी पाठीचा सुतार, पाचू कवडा, श्याम हे निमसदाहरित किंवा पानझडीच्या जंगलात आढळणारे पक्षी इथे सहज दिसतात. हिवाळ्यात स्थलांतरीत पक्षी इथं दाखल होतात. करडा परीट, तांबूला, ग्रे हेडेड कॅनरी फ्लायकॅचर, शैल कस्तुर असे काही हिवाळी पक्षी इथं येतात. उन्हाळ्यात हळद्या, बुरखा हळद्या, सुभग, कोतवाल, नाचरा, सोनपाठी सुतार, नीलिमा, नीलमणी, बंड्या धीवर या स्थानिक पक्ष्यांची वीण होते. ॲशी मिनिवेट आणि स्पॉटेड हार्ट वूड पिकर हे या अभायरण्यांचं वैशिष्ट्य.

## असे पाहा पक्षी

जंगलात पक्षी बघण्यासाठी काही अटी असतात, त्या म्हणजे एकाग्रता आणि पेशन्स. जंगलातील वन्यप्राण्यांपेक्षाही पक्ष्यांची श्रवणशक्ती आणि नजर अधिक तीक्ष्ण असते. त्यामुळे शांत राहून आणि पेशन्स ठेवूनच त्यांचं निरीक्षण करावं लागतं. त्यांची इच्छा असेल, तरच तें तुमच्या समोर येतात; नाहीतर झाडीत ते सहज लपून बसतात. पक्षीनिरीक्षणासाठी जाताना निसर्गाशी मिळते जुळते कपडे, दुर्बिण, नोंदवही तसंच पक्ष्यांविषयी माहिती असलेलं एखादं पुस्तक बरोबर नेणं मस्ट असेल.

## राहायची व्यवस्था

कर्नाळा अभायरण्यात वन विभागानं विश्रामगृहाची सोय केली आहे. त्यामुळे रात्री तिथं मुक्काम करून पहाटे लवकर बाहेर पडता येतं. सकाळी लवकर जंगलात फेरफटका मारला, तर वैविध्यपूर्ण पक्षी पाहायला मिळतात. याशिवाय या भागात खासगी हॉटेल्सही



अनु.

# कर्नाळ्याच्या डोंगरावर...

सळसळत्या तरुणाईला एक दिवसाच्या हाइकसाठी किंवा रॉक क्लायम्बिंगसाठी मस्त ठिकाण म्हणजे कर्नाळ्याच्या ट्रेक. पनवेल ओलांडून दोन-तीन कि.मी.वरच्या पळस्पा फाट्याला उजवं वळण घेतलं की आपण गोव्याला जाणाऱ्या हमरस्त्याला लागतो. इथून जवळच असलेलं शिरढोण ओलांडलं की कर्नाळ्याचा परिसर सुरू होतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना रान दिसू लागतं. विशेषतः डावी बाजू दाट रानझाडीची असल्याने वातावरणात एक वेगळ्याच प्रकारचं गहिरेपण जाणवू लागतं. डावीकडच्या डोंगरावरचा भला मोठा सुळका आपलं लक्ष सतत वेधत राहतो. खरं म्हणजे हा परिसरच निसर्गसौंदर्याने भरलेला आहे.

डावीकडे दूरवरच्या प्रबळगड, माथेरान, ईर्शाळगडाच्या हिरवट-जांभळ्या डोंगररांगा, समोरचा स्वतंत्र संसार मांडलेला कर्नाळ्याचा डोंगर... त्यावरचा एखाद्या ध्यानस्थ ऋषीसारखा दिसणारा कर्नाळ्याचा सुळका... फार पूर्वीपासूनच कर्नाळ्याच्या या डोंगराचं अनेकांना आकर्षण आहे. बाराव्या शतकात यावर आज भग्नावस्थेत

आज भग्नावस्थेत



असल्याने तेवढा जाणवत नाही. नंतर आपण साधारण सपाटीवरच्या मोकळ्या वनात येतो. इथून उजव्या बाजूला कर्नाळ्याचा सुळका अगदी समोर येतो. डावीकडे डोंगरापलिकडचं पाताळगंगेचे खोरं दिसतं. खोऱ्यात रसायनीचा औद्योगिक परिसर, गुळसुंदा, आपटा ही गावं दिसतात. इथून पुढे सोंडेवरच्या निमुळत्या पायवाटेने गेल्यावर खडकात खोदलेल्या पायऱ्या लागतात. सुळक्याच्या या कातळातून काही ठिकाणीच्या पायऱ्या तुटलेल्या असल्याने खूपच सावधानतेने जावं लागते. सुळक्याच्या पायथ्यापर्यंतचं हे अंतर तसं विशेष नाहीए. हा पट्टा छोटासा असला



अनु.

तरी निष्काळजीपणामुळे जीवघेणा ठरू शकतो. विशेषतः पावसाळ्यात सावध राहावं लागतं.

वरती गडाची सपाटी असून भग्नावस्थेत असलेल्या कोठारांची, इमारतींची बांधकामं आहेत. समोर कर्नाळ्याचा साधारण दीडशे फुटी घेराचा सरळसोट सुळका आहे. या सुळक्याच्या पायथ्याशी गुहा आणि पाण्याची टाकी आहेत. पायवाटेने गेल्यावर समोर असलेली सुळक्याची पूर्व बाजू आहे. इथूनच सुळक्याच्या शेंड्यावर जाणारा मार्ग आहे. सुळक्याचा खडक मजबूत असून वर दोराशिवायही जाता येते. मात्र चढणारी व्यक्ती तशा तयारीची असली पाहिजे. सर्वसामान्यांनी उत्तम सोबतीवाचून सुळका चढायच्या फंदात अजिबात पडू नये. खडक मजबूत असला तरी मार्गावर बऱ्याच ठिकाणी घसरवणारी दगडाची तुकड्यांची पुळण आहे. त्यात सुळक्यावर अनेक ठिकाणी आग्या मधमाशांची पोळी आहेत. त्या काही कारणाने उठल्या तर ते अत्यंत धोकादायक होऊ शकते. अशा घटना पूर्वी इथे झालेल्या आहेत. मात्र नेहमी प्रस्तरारोहण करणाऱ्यांना हा सुळका आणि तटबंदीचे कडे क्लायबिंग, रॅपलिंगसाठी उत्तम आहेत.


इथे खाण्याच्या काहीही सोयी नसल्याने आपल्याबरोबर पोळीभाजी आणि खाण्याचे पदार्थ बरोबर न्यायला हवेत.

पावसाळ्यातली तर ही हाइक खूप आनंददायी असते. यावेळी सगळा डोंगर पाचूसारखा दिसतो. ही डोंगररांग अक्षरशः अंतराळात तरंगताना दिसते. वातावरणात सगळीकडे एक अनामिक बेहोशी असते. आपण ढगांच्यामधून चिंब भिजत वेगळ्याच धुंदीत ट्रेक करतो. गडावरून एका बाजूला माथेरान, प्रबळगड, हाजीमलंग, माणिकगड, ईर्शाळगड, खंडाळा घाटाच्या समोरचा ड्युक्स नोज (नागफणी) तर पलिकडे अरबी समुद्राची असीम निळाई असा विशाल देखावा दिसतो. त्यात हे पक्षी अभयारण्य असल्याने अनेक प्रकारचे पक्षी दिसतात. पावसाळ्यात दाट जंगलांमुळे इथलं कीटकविश्वही खूपच बहरलेलं असतं. शेकडो प्रकारचे वेगवेगळ्या रंगांचे कीटक सहज दिसतात.





# झिम्माड पावसातला कर्नाळा



कर्नाळा केवळ मान्सून डेस्टिनेशनच नाही, तर पक्षीनिरिक्षकांचं नंदनवन आणि वेगळं ऐतिहासिक ठिकाणही आहे.

पनवेल जवळचा कर्नाळा हा केवळ मान्सून डेस्टिनेशनच नाही तर पक्षीनिरिक्षकांचं नंदनवन आणि वेगळं ऐतिहासिक ठिकाणही आहे. पाऊस भरात आला की तुंबणारी मुंबई वैताग आणते. वीकेण्डला दिवसभर टीव्हीसमोर बसून 'यहा पाणी भरा..'च्या रंगवलेल्या बातम्यांचा रतीब बघण्यापेक्षा सॅक पाठीवर टाकायची, रेनकोट काखोटीला मारायचा आणि हिरवाईतला खराखुरा पाऊस अनुभवायला मुंबईबाहेर कूच करायचं. कर्नाळा हे मुंबईकरांचं फेवरिट पावसाळी डेस्टिनेशन. सकाळी जाऊन पावसाशी दंगामस्ती करून रात्री घरी येऊन पडी टाकावी इतकं जवळ.

मुंबईहून पनवेलला जायचं. तिथून गोवा हायवे पकडायचा. दुरूनच कर्नाळ्याचा सुळका दिसू लागतो. पनवेलहून बस किंवा सिक्ससीटर रिक्षाने अवघं १३ किलोमीटर अंतर पार केलं की आपण कर्नाळ्याच्या पायथ्याशी पोहोचतो. फॉरेस्ट चेकपोस्टजवळून डावीकडे वळलं की कर्नाळ्याची हद्द सुरू.

अधूनमधून पाऊस रिमझिमत असतो. चिंब वाटेनं हिरवाईतून चालत गेलं की फॉरेस्टच्या ऑफिसजवळून एक वाट सरळ जंगलात उतरते आणि कर्मचारी निवासामागून जाणारी दुसरी वाट थेट किल्ल्याकडे. ही वाट पकडायची. ही वाट मळलेली असली तरी चढण चांगलीच अंगावर येणारी आहे. तळातून मोठमोठ्या झाडांमधून जाणाऱ्या निसरड्या वाटेनं वर जाताना भर पावसातही घाम निघतो. वरून गडगडत आलेल्या मोठमोठ्या शिळांमधून पुढे जाणारा रस्ता एका पठाराशी येऊन थांबतो. आजूबाजूला पसरलेली मऊ पोपटी हिरवळ, गडद दाट धुकं आणि पठारावरचा अंगात हुडहुडी भरवणारा भणाण वारा...पाऊस तर अक्षरशः सडकून काढतो. त्याला शरण जात आपल्याला अजून बरंच चालायचंय ही खूणगाठ मनाशी बांधत पुन्हा चालायला सुरुवात करायची. अंगावर पावसापासून वाचवायला घातलेल्या रेनीवेअर्सची सपशेल धूळधाण उडवत पावसाने चिंब केलेले कपडे एव्हाना निथळत असतात.

थोड्याच वेळात आपण किल्ल्याजवळ पोहोचतो. किल्ला म्हणून तिथं फारसं काही उरलेलं नाही अंगावर शेवाळ पांघरून निखळते चिरे सावरत तटबंदी उभी आहे. कधीही निखळतील असे दोन दरवाजे अद्याप

तग धरुन आहेत. या किल्ल्याचा इतिहास १२व्या शतकापासूनचा. खडकात खोदलेली टाकी बाराव्या किंवा तेराव्या शतकातली. किल्ल्याचं बांधकाम सोळाव्या शतकातलं. निजाम, शिवाजीमहाराज, मुगल,आंग्रे, पेशवे आणि शेवटी इंग्रज असा या किल्ल्याचा प्रवास आहे. शिवाजी महाराजांनी हा किल्ला घेताना त्यांचा हुकमी गनिमी कावा वापरला होता. त्यांनी आधी पनवेलजवळच्या डोंगराला वेढा घातला. मग फळ्यांच्या तात्पुरत्या भिंती उभारुन त्याच्या आडून हल्ला करत ते तटाशी पोहोचले. तो दिवस होता, आषाढ शुद्ध १४ शके, १५९२. म्हणजे आत्तासारखाच बेफाम पाऊस कोसळत असणार...

कर्नाळ्याचा ३० ते ३५ मीटरचा सुळका हा त्या किल्ल्याची ओळख आहे. गो.नी. दांडेकरांच्या 'जैत रे जैत' या कादंबरीवर आलेल्या त्याच नावाच्या सिनेमात या सुळक्याचा वापर केलाय. स्मिता पाटील आणि मोहन आगाशे या दोघांच्या अप्रतिम अभिनयाइतकाच हा बेलाग सुळकाही चांगलाच लक्षात राहून जातो. बाराही महिने या सुळक्याला मधमाशांची प्रचंड पोळी लटकलेली असतात. या सुळक्याच्या पोटातच पाण्याच्या टाक्या खोदल्या आहेत. तिथून मागे जाणारी वाट सुळक्यावर घेऊन जाते. या सुळक्यावरची चढाई हे हौशी भटक्यांचं काम नव्हे. त्यासाठी अशा साहसांची सवयच हवी. त्यातून पावसाळ्यात तर हे धाडस टाळलेलंच बरं. समुद्रसपाटीपासून ४४५ मीटर उंचीवर कर्नाळ्याच्या माथ्यावर आपण उभे असतो तेव्हा हा सुळका ढगांशी अक्षरशः लपंडाव खेळत असतो. क्षणार्धात दिसेनासा होतो तर कधी ढगाआडून हळूच डोकावतो.

किल्ल्याच्या पायथ्याचा साडेचार चौरसकिलोमीटरच्या प्रदेश गच्च झाडांनी व्यापलाय. पाताळगंगा नदीच्या पसिरसरातील हा प्रदेश पक्षी अभयारण्य म्हणून ओळखला जातो. आपटे, कल्हा, रानसई, चिचवण या गावांच्या शिवारात हे समृद्ध जंगल वसलंय. पावसाळ्यात पक्षीदर्शन तसं दुर्लभ पण एरवी हा परिसर म्हणजे हौशी पक्षीनिरिक्षकांचं नंदनवन आहे. दीडशे प्रकारचे पक्षी इथं सहज दिसतात. पक्षीनिरिक्षणासाठी लागणारा संयम मात्र हवा.

---

एव्हाना तीन साडेतीन तास सहज निघून गेलेले असतात. पोटात भुकेची जाणीव होऊ लागते. परतीची उतरणीची निसरडी वाट जपून पार करत पुन्हा पायथ्याशी येऊन हायवेला गेल्यावर चांगली हॉटेल्स आहेत. अन्यथा सोबत डबा आणण्याचा पर्याय आहेच.

एक चांगलं पावसाळी डेस्टिनेशनच नव्हे तर एक वेगळं ऐतिहासिक ठिकाण पाहिल्याचा आनंद गाठीशीं बांधून आपण कर्नाळ्याचा निरोप घेताना हत्तीच्या सोंडांनी बरसणारा पाऊस आपली मुंबईपर्यंत सोबत करतो.



# निसर्गाने वेढलेलं जांभुळपाडा

सहल म्हटली म्हणजे आठ-दहा दिवस लांब कुठेतरी फिरायला जायचं. पण आता हा ट्रेण्ड बदलला आहे. आता वीकएण्डच्या निमित्ताने दोन दिवस शहराबाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढते आहे. अशा छोट्या ट्रिपसाठी जांभुळपाडा हा चांगला पर्याय आहे. जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून जाताना खोपोलीनंतर जांभुळपाडा हे गाव लागतं. इथे जांभळाची झाडं मुबलक प्रमाणात असल्यामुळे गावाचं नाव 'जांभुळपाडा' असं पडलं.

१९८९ मध्ये आलेल्या महापूरामध्ये जांभुळपाडा गावाची अपरिमित हानी झाली होती. त्यानंतर पुन्हा नव्याने या गावाचा विकास करण्यात आला. पुरामध्ये वाहून गेलेल्या लोकांचं स्मारक गावात उभारण्यात आलं. जांभुळपाडा अतिशय निसर्गरम्य, टुमदार गाव आहे. या गावात आलिशान रिसॉर्ट आहे. जांभुळपाड्याला वस्ती करून नजिकच्या निसर्गरम्य ठिकाणांना भेट देता येते. जांभुळपाडा हे गाव पावसाळ्यातल्या सहलीसाठी योग्य ठिकाण आहे.

खोपोलीहून जांभुळपाड्याला जायला रस्ता आहे. सकाळी खोपोलीला मुक्काम करून तिथला गगनगिरी महाराजांच्या मठ पाहायला जाता येईल. इथलं शांत वातावरण मनाला ताजंतवानं करतं. खोपोलीपासून तीन ते चार किलोमीटर अंतरावर 'परसरे धबधबा' आहे. उन्हाळ्यात या धबधब्याचा आनंद घ्यायला बरेच जण येतात. संध्याकाळचा वेळ निसर्गरम्य 'ढोकशेत डॅम'च्या परिसरामध्ये घालवता येतो. इथला सुसाट वारा रखरखत्या उन्हाळ्यात थंडगार फुंकर घालतो.

जांभुळपाड्याला 'सिद्ध लक्ष्मीगणेशा'चं सुबक मंदिर आहे. हा सिद्ध लक्ष्मीगणेश उजव्या सोंडेचा आहे. अष्टविनायकातला महड आणि पालीचा गणपतीही इथून जवळच आहे. पाली गावाजवळ 'ठाणाळ्याची लेणी' आहेत. ही लेणी पुरातन आहेत. हा परिसरही निसर्गरम्य आणि सुंदर आहे. ठाणाळ्याचं २१ गणपतींचं मंदिरही खूप प्रसिद्ध आहे. ठाणाळ्याला जाताना वाटेत उन्हेरे गाव लागतं. इथे गरम पाण्याची कुंडं आहेत. तसंच इथलं धरणही अतिशय सुंदर आहे.


जांभुळपाडा हे ठिकाण वीकएण्डसाठी तर छान आहेच, पण ॲडव्हेंचरची आवड असणाऱ्यांसाठी उत्तम आहे. जांभुळपाड्यापासून पाली गाव पंधरा किलोमीटरवर आहे. पालीपासून सरसगड आणि सुधागड जवळ आहेत. हे गड ट्रेकर्समध्ये खूप लोकप्रिय आहेत. मात्र इथे ट्रेकिंगला जाताना वाटाड्या सोबत न्यावा. जांभुळपाड्यापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेला मृगगडही ट्रेकिंगसाठी चांगला आहे.

## रानसई धरण

रानसई धरण मात्र आडवाटेला आहे. त्यामुळे इथे फारशी गर्दी नसते. धरणामुळे तयार झालेल्या तलावात डुंबण्यासारखं सुख नाही. पनवेलवरुन उरणला जातानाच्या रस्त्यावर रानसई धरण आहे. बस किंवा रिक्षाने इथे जाणं अवघड. इथे जाण्यासाठी स्वतःची गाडी हवी. धरण आडवाटेला असल्यामुळे इथे हॉटेल्स नाहीत. सकाळी सांगितल्यास गावकरी जेवणाची सोय करतात. पण स्वतः खाणं नेणं उत्तम.

# उरण

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते उरण | | | | | 37 | | | | |
| **1** | रिध्दी सिध्दी गणेश मंदिर | | | | मंदिर | 1 | NW | | | |
| **2** | पिरवाड बीच | समुद्रकिनारा | | | | 3 | SW | 4 | S | |






## विनायकगावचा विनायक

सुमारे ७०० वर्षांपूर्वी पेशव्यांचं आराध्यदैवत असलेलं हे गणपतीचं मंदिर आहे. रिद्धी-सिद्धीसोबत असलेली गणपतीची मूर्ती ही भारतातील एकमेव मूर्ती असल्याचं म्हटलं जातं. गणेशोत्सवाच्या काळात मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास पंचामृताची पूजा केल्यानंतर परिसरातील घरच्या गणपतींचे पूजन करण्याची परंपरा आहे. यामुळे विनायक इथल्या गणपती मंदिर हे संपूर्ण रायगड, मुंबई, ठाणे इथे प्रसिद्ध आहे.

उरण शहरापासून सुमारे दोन किमी अंतरावर विनायक हे गाव आहे. गावाचं नाव मूळातच गावाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या गणपतीच्या मंदिरामुळेच [illegible] प्रवेशद्वारावर अ[illegible] मंदिराभोवतालचा नयनरम्य परिसर भक्तांना मोहीत करतो.

मंदिरामध्ये गणपतीच्या उजव्या हाताला रिद्धी आणि डाव्या हाताला सिद्धी स्थानापन्न आहे. गणपतीची ३×२ फूट उंचीची मूर्ती पाहून मन प्रफुल्लित होतं. माधवराव पेशवे यांनी विनायक इथल्या मंदिराचं व्यवस्थापन उरणमधल्या घरत कुटुंबियांना अनुदान [illegible] फुटाचा गाभारा उभारण्यात आला होता. हा गाभारा वैशिष्ट्यपूर्ण आहे. गाभाऱ्यात जाण्यासाठी पाच फुटांच्या दरवाजातून प्रवेश करावा लागतो. यामागेही शास्त्रशुद्ध कारण आहे. आराध्यदैवत असलेल्या गणपतीसमोर नतमस्तक झाल्यानं आपला अहंकार गळून पडतो, असं सांगितलं जातं. मंदिरातील गणपतीच्या मूर्तीमागे शिलालेख आहे. त्यामधील मजकूर उलगडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गाभाऱ्यावर गोल घूमट असून गाभाऱ्याला कुठेही खिडकी नाही. गाभाऱ्याभवतीचा सभामंडपही



अनु.

वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सभामंडपात होणारी भजनं, कीर्तन ऐकण्यासाठी पुरुषांसाठी खाली बसण्याची व्यवस्था आहे, तर वरच्या मजल्यावर स्त्रियांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मंदिराभोवताली ४० गुंठ्यांच्या परिसरामुळे मंदिराचा भारदस्तपणा वाढतो.



हे गणपती मंदिर उरणकरांचं श्रद्धास्थान आहे. संकष्टी, विनायकी आणि मंगळवारी भाविकांची गर्दी लोटते. तालुक्यातील काही भाविक नवसपूर्तीसाठी अनवाणी मंदिरात येतात. विनायक मंदिरातली प्राचीन गणपती मूर्ती दीर्घकाळ टिकावी यासाठी काही वर्षांपूर्वी पंचधातूची सुमारे १२ फूट उंचीची गणपतीची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. याच मूर्तीचं पूजन केलं जातं.


# पिरवाडला चला





आठवडाभर काम करून आलेला मानसिक आणि शारीरिक थकवा दूर करणं जरुरीचं असतं. शहराच्या धका-धकीपासून दूर जात कुठेतरी निवांतपणा शोधण्यासाठी प्रत्येक जण धडपडत असतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहून त्याच्याकडून काहीतरी शिकावं आणि 'रिचार्ज' व्हावं असं काहीतरी करण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. या विकेण्डला 'रिचार्ज' व्हायला कुठे जाताय?

जास्त विचार करू नका... अगदी जवळच आहे ते ठिकाण... पिरवाड किंवा पिरवाडीचा किनारा!



मुंबईपासून फक्त दोन तासाच्या अंतरावर, उरणला. या ठिकाणी आहे मस्त सी बिच आणि बरंच काही... पिरवाडला तुम्ही अगदी समुद्रमार्गेही जाऊ शकता. पिरवाडचा किनारा आता विकेण्डसाठी चांगला क्राऊड पुलर ठरू लागला आहे. या ठिकाणी विकेण्ड साजरा करण्यासाठी मुंबईकर आताशा गर्दी करू लागले आहेत. सकाळी निघून दोन तासात तुम्ही इथे पोहोचू शकता. इथे राहण्यासाठी शॅक्सही उपलब्ध आहेत. पिरवाडी दर्गा ट्रस्टच्या रुम्सही राहण्यासाठी उपलब्ध आहेत. या ठिकाणी नाममात्र दरात तुम्ही कुटुंबासह मुक्कामही करू शकता. मस्तपैकी भुट्टा, भेळ असे टाइमपास पदार्थ खात तिथला समुद्रकिनारा तुम्ही एन्जॉय करू शकता.

इथे असलेला ओनजीसीचा प्लाण्टही पर्यटकांचं लक्ष वेधून घेतो. मात्र तिथे पर्यटकांना प्रवेशबंदी आहे. समुद्रसफरीची हौस असल्यास तुम्ही पिरवाडला लाँचनेही जाऊ शकता. अवघ्या पाऊण तासात किंवा फार तर एक तासात तुम्ही पिरवाडला पोहोचू शकता. भाऊच्या धक्क्यावरून मोरा बंदराकडे जाणारी लाँच तुमच्या सेवेसाठी उपलब्ध असते. पिरवाडच्या किनाऱ्यावरून संध्याकाळी मुंबईचा किनारा आकर्षक दिसतो. महामुंबई सेझ प्रकल्पामुळे सध्या उरण आणि परिसराचा चेहरामोहरा झपाट्याने बदलतो आहे. तिथली हॉटेल इण्डस्ट्रीही सध्या जोशात आहे. याचा प्रभाव पिरवाड किनाऱ्याच्या विकासावर न पडता तरच नवल! सध्या इथे होत असलेली पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन छोटी हॉटेल्स किनाऱ्यावर थाटली जात आहेत.

फेब्रुवारीच्या १५ तारखेला इथे पिरवाडी बाबांचा उरुस भरतो. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमासाठी ठाणे, रायगड, पुणे, नाशिक आदी ठिकाणांवरून सर्वधर्मीय येतात. त्या वेळी गावाला जत्रेचं स्वरूप येतं. पिरवाडीला विविध सुविधांचा विकास केल्यास हे एक चांगलं पर्यटन केंद्र ठरू शकतं, असा विश्वास इथल्या स्थानिकांनी व्यक्त केला आहे. इथून जवळच घारापुरी लेणी आहेत तसंच रेवस बंदरही इथून हाकेच्या अंतरावर आहेत. कोळ्यांची देवी असलेल्या करंजे इथलं देवीचं मंदिर दहा ते पंधरा मिनिटांच्या अंतरावर आहे.

**कसं जायचं?**


- मुंबईहून बसने जायचं असल्यास पनवेलमार्गे जाता येतं.
- समुद्रमार्गे जायचं असल्यास भाऊच्या धक्क्याहून मोरा बंदरावर लाँचने जाता येतं.
- वन डे ट्रिप म्हणून चांगलं ठिकाण



अनु.

# खोपोली


| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | | | | | |
| | मुंबई ते खोपोली | | | | | 71 | | | | |
| **1** | सोंडाई दुर्ग | | किल्ला | ट्रेक | | 25 | NW | | | |
| **2** | ईर्शाळगड | | किल्ला | ट्रेक | | 21 | NW | 15 | SW | |
| **3** | मोरबे धरण | | | | धरण | 20 | NW | 4.5 | SE | |
| **4** | काळोटे तलाव | धबधबा | | | तलाव | 12 | NW | 13 | SE | |
| **5** | पळसदरी | धबधबा | | | | 11 | N | 15 | NE | |
| **6** | माधवबाग | स्वास्थ्य पर्यटन | | | | 9 | NW | 10 | SW | |
| **7** | झेनिथ फॉल | धबधबा | | | | 4 | NE | 13 | SE | |
| **8** | मृगगड | | किल्ला | ट्रेक | निसर्ग | 32 | SE | 36 | S | |
| **9** | सांकशी दुर्ग | | किल्ला | | | 40 | SW | 60 | NW | |






अनु.

पनवेल-कर्जत मार्गावरील मोरबे धरणाचा जलाशय ओलांडला की हिरवाजर्द डोंगर डोळ्यांसमोर उभा राहतो. सोंडाई त्याचं नाव. सोंडाईची उंची समुद्रसपाटीपासून १४०० फूट आहे. ट्रेकर्सना खुणावणाऱ्या सोंडाईची वारी म्हणजे त्यांच्यासाठी एक आगळा अनुभव ठरु शकतो.



वातावरण ढगाळ होतं तरी सोंडाईचा माथा स्पष्ट दिसत होता. पनवेल, कर्जत मार्गावरील मोरबे धरणाचा जलाशय ओलांडून गेल्यावर लगेचच डोळ्यात सामावणारा हिरवाजर्द डोंगर पुढे उभा ठाकला होता. सोंडाई त्याचं नाव. शेजारचे ईर्शाळगड आणि प्रबळगड नेहमीच्या ओळखीने आमच्याकडे पाहत होते, पण सोंडाई मात्र हे कोण पाहुणे आले बा...अशा अनोळखी नजरेचा कटाक्ष टाकत होता. कारणही तसंच होतं. मुंबई, पुणे, कर्जत, पनवेल परिसरात एवढ्या वेळा भटकंती होऊनही सोंडाईचं दर्शन काही झालं नव्हतं. त्यासाठीच ही भेट होती. काही दिवसांपूर्वीच चक्रम हायकर्सतर्फे आम्ही १६ जण सोंडाईच्या भेटीला गेलो होतो.

चौक-कर्जत रस्त्यावर बोरगाव नावाचं एक गाव आहे. या गावामधून सोंडाईचा रस्ता जातो. सोंडेवाडी हे पायथ्याचं गाव तसं लहानच. म्हणजे आदिवासी पाडाच म्हटला तरी चालेल. ठाकूर, कातकऱ्यांची ३०-३५ घरं आहेत. मुंबईहून दोन तासांत या गावात पोहोचता येतं. वाडीत उतरल्या उतरल्याच आजूबाजूचा हिरवागार निसर्ग पाहून थक्क व्हायला होतं. पोपटी रंगाचा अंगरखा संपूर्ण डोंगरावर अंथरल्यासारखं वाटत होतं. सह्याद्रीत भटकताना कित्येकदा मुख्य डोंगराचा डोंगरमाथा थेट दृष्टीस पडत नाही. इथे मात्र माथ्यावरचं एक उंच झाड आणि सोंडाईदेवीचा झेंडा पायथ्यावरूनही दिसत होता.

सोंडाईची उंची समुद्रसपाटीपासून १४०० फूट आहे. सोंडाई गाव ते किल्ला हे अंतर साधारण दोन तास आहे. एकूणच फार दमछाक करणारी रपेट नाही, पण सरसकट वाट सोपीही नाही. माथ्यावर जाताना काही ठिकाणी रॉकपॅच आहेत. त्यामुळे किल्ल्यावर जाताना गिर्यारोहणाची साधनसामुग्री आपल्याजवळ असणं गरजेचं आहे.

किल्ल्यावर पाण्याच्या चार टाक्या, खडकामध्ये कोरलेल्या पायऱ्या, माथ्यावर सोंडाई देवीची मूर्ती आहे. बाकी गडाला तटबंदी किंवा बुरुज वगैरे नाहीत. गडमाथा छोटासा आहे. सह्याद्रीतल्याच आसपासच्या परिसरावर पाळत ठेवण्यासाठी चौकी म्हणून गडाचा वापर होत असावा. किल्ल्यावर पाण्याची टाकी मात्र चांगली आहे. त्यामुळे हिवाळ्यातही गडावर




अनु.

जायला हरकत नाही. दिवाळीत स्थानिक कातकऱ्यांची सोंडाई देवीची यात्रा असते. आता ती होऊन गेलीय, त्यामुळे गर्दीची चिंता नाही. गावातून वाटाड्याची सोयही होऊ शकते.

माथ्यावरून माथेरानचं लांबलांब पसरलेलं पठार आणि मोरबे धरणाचा विस्तीर्ण जलाशय हे आपल्याला सोंडाईच्या माथ्यावर जाईपर्यंत सतत दिसत असतात. धरणाच्या जलाशयात ऊन्हाची सोनेरी किरणं आली की अत्यंत मनोहारी चित्र दिसतं. चहूबाजूंनी ढगांची ये-जा सुरू असते. ऊन पडलं की काळाकभिन्न कातळही हिऱ्यासारखा चकाकून उठतो. वाऱ्यावर हिरवंगार गवत डोलू लागतं. हे सगळं अनुभवण्यासाठी सोंडाईची वारी करण्यात मजा आहे.

# किल्ले इर्शाळ

**घाटमाथा आणि कोकण यांना जोडणारा इर्शाळ गड आज आडवाटेवरचा झाला आहे. नैसर्गिक तटबंदी लाभलेला हा किल्ला मुख्य रस्त्यावर उभा आहे.**



# किल्ले इश

शिवकाळात गडकिल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होतं. इतिहासाचे मूक साक्षीदार असलेले हे गडकिल्ले म्हणजे स्वराज्याची ढालच. असाच एक किल्ला म्हणजे इर्शाळ गड. नैसर्गिक तटबंदी लाभलेला हा किल्ला मुख्य रस्त्यावर उभा आहे.

रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यात असलेला हा किल्ला पनवेल-खोपोली मार्गावर आहे. पनवेलपासून खोपोलीला जाताना १७ किमी अंतरावर मुख्य रस्त्यावर चौक गाव आहे. या गावातून चालत जात साधारण वीस मिनटांत गड पायथा गाठता येतो. खाजगी वाहनं उपलब्ध असल्याने गडाच्या पायवाटेजवळ पोहोचता येतं. पायथ्याच्या गावातून इर्शाळ गडावर जाणारी सोंड आहे. गडमाचीवर ठाकर वस्ती असल्याने ही पायवाट ठळक आहे. नागमोडी वळण घेत साधारण तासाभरात गड माचीवरच्या इर्शाळवाडीत पोहोचता येतं. साधारण २५ घरांच्या या वाडीत थोडी विश्रांती घ्यायची आणि डाव्या हाताने गडमार्गाला लागायचं. माचीवर दाट झाडी आहेत. तेव्हा हा प्रवास करताना थकावा जाणवत नाही.

इर्शाळवाडीतून पायपीट करत गडाच्या डाव्या हाताला निघायचं. येथूनच उजव्या हाताला गर्द झाडीतून एक पायवाट वर गेलेली दिसते. या पायवाटेने १०-१५ मिनिटांच्या चालीनंतर गडमाथ्याच्या खालच्या टप्प्यावर पोहोचतो. येथून इर्शाळवाडी, प्रकाशगड, पनवेल, खोपोली, मुख्य रस्ता, कर्नाळा असा सारा मुलुख न्याहाळता येतो. येथून थोडं पुढे गेल्यावर डाव्या हाताने एक छोटी वाट गडाच्या मागच्या बाजूस जाते. वाटेत असणारे मोठे खडक म्हणजे भटक्या मंडळींच्या मुख्य आसऱ्याचं ठिकाण. रात्री मुक्काम करायचा झाला, तर थोडी साफसफाई करून इथे मुक्काम करता येईल.



गडावर अनेक छुप्या पाण्याच्या टाक्या आहेत. हे पाणी स्वच्छ असून पिण्यास योग्य असं आहे. या पाण्याच्या टाकीतील पाणी काढण्यासाठी थोडी कसरत करावी लागते एवढंच. गडमाथ्यावर जाण्याठी कातळात खोदलेल्या पायऱ्या आहेत. पण, काही ठिकाणी या पायऱ्या पूर्णपणे ढासळलेल्या आहेत. गडमाथ्यावर जायाची ही वाट पडझड झालेली आहे, तेव्हा जरा जपूनच. शेवटच्या टप्प्यात लाकडाची शिडी लावलेली आहे. या शिडीने वर गेल्यावर थेट माथ्यावर पोहोचता येतं.

इथे असणाऱ्या सुळक्यावर जाण्यासाठी गिर्यारोहणाचं सर्व साहित्य असायला हवं. इथून आजूबाजूचा संपूर्ण परिसर लक्ष वेधून घेतो. माथेरानच्या पठाराचं अतिशय मोहक दृष्य या गडावरून दिसतं. इर्शाळ गडाच्या माचीवरून एक पायवाट प्रबळगडाच्या दिशेने जाते. सोबत एखादा वाटाड्या असेल तर हा अनुभवही घेता येईल. गडमाथ्यावरील गिर्यारोहकाचं आवडतं ठिकाण म्हणजे 'नेढं'. नैसर्गिकरित्या अखंड खडकात तयार झालेलं एक मोठं भोक. या नेढ्यातून हवा जोरदार वाहत असते. तेव्हा अंधार व्हायच्या आत इथून निघायला हवं.

इतिहासात गडाच्या मूक कामगिरीबद्दल काही फारसा उल्लेख नसला तरी मुख्य वाटेवरचा हा गड टेहळणीसाठी वापरत असावा. घाटमाथा आणि कोकण यांना जोडणारा मुख्य वाटेवरचा हा किल्ला आज आडवाटेवरचा झाला आहे.



## मोरबे धरण

पावसाळ्यात माथेरानला फिरायला जाणारे चिक्कार आहेत. पण माथेरानच्या परिसरातच अशी अनेक ठिकाणं आहेत, जिथे सकाळी जाऊन संध्याकाळी परतता येईल. माथेरानच्या मागच्या बाजूला असणारं मोरबे धरण हे यातलंच. कोसळणाऱ्या पावसामध्ये या धरणात चिंब भिजायला खूप मजा येते. इथे जाण्यासाठी खोपोली स्टेशनला उतरावं. तिथून सिक्स सिटरने शीळफाट्याला जाता येतं. तिथून मोरबे धरण खूपच जवळ आहे. मोरबे धरणाजवळ खाण्यापिण्यासाठी अनेक हॉटेलं आहेत.

## काळोटे तलाव

खोपोलीजवळचा काळोते तलाव हा पावसाळ्यात जाण्यासाठी एक वेगळा आणि मस्त पर्याय असू शकतो. पुण्याहून मुंबईला येताना खालापूरला एक्सप्रेस वे सोडायचा. त्यानंतर मुंबईच्याच दिशेने ४-५ किलोमीटर्स पुढे आल्यावर एक कुरण लागेल. तिथे वळलं की एक-दोन किलोमीटर पुढे गेल्यावर तलावापर्यंत पोहोचता येतं. इथे पोहोचल्यावर मुख्य रस्त्यापासून इतकी जवळ अशी सुंदर जागा आहे यावर विश्वास ठेवणं कठीण होतं. शहरातल्या कुठल्याही तलावाजवळ असलेले फेरीवाले, खाद्यपदार्थांचे ठेले इथे नाहीत. जवळपास काही रिसॉर्टस आहेत. आजुबाजूचं निसर्गसौंदर्य न्याहाळणं, तिथला पाऊस अनुभवणं हे यादगार ठरतं.



तलावात पडणारे पावसाचे टपोरे थेंब हे दृश्य मनात साठवता येतं. घरुनच काही खाद्यपदार्थ घेऊन यायचं आणि तिथे त्याचा मनसोक्त आस्वाद घ्यायचा. तीन-चार तास इथली शांतता आणि निसर्गसौंदर्याची अनुभूती घेतली की कार पुन्हा मुंबई-पुण्याकडे वळवायची.

# पळसदरी

खोपोलीजवळील झेनिथचा धबधबा अलिकडे पर्यटकांना धोकादायक वाटत असल्याने अनेकजण त्याकडे पाठ फिरवत आहेत. मात्र याचवेळी कर्जत व खोपोली दरम्यान असलेल्या पळसदरी गावातील हा धबधबा पर्यटकांचं आकर्षण होत चालला आहे. झेनिथपेक्षा हा धबधबा जवळ आहे. मुंबईहून खोपोली लोकल पकडल्यानंतर कर्जत स्टेशनच्या पुढील पहिले स्टेशन पळसदरी लागते. स्टेशनपासून दोन कि.मी. अंतरावर पळसदरी गावाच्या मागे डोंगराच्या कुशीत हा धबधबा आहे. पळसदरी स्टेशनवर जेवणाची सोय नसली तरी गावामध्ये राहण्याची व जेवणाची घरगुती व्यवस्था होते. चुलीवरच्या जेवणाची लज्जत पर्यटकांच्या आनंदात अधिकच भर घालते. धरणाकडे जाताना 'रेल्वेधरण' म्हणून ओळखलं जाणारं १९०५ सालचं ब्रिटिशकालीन धरण पर्यटकांचं लक्ष वेधून घेते. या धरणावरूनच गावाकडे रस्ता जातो. गावात विनंती केल्यास जेवणाची व्यवस्था केली जाते.

## स्वास्थ्य पर्यटन

प्रियाच्या ऑफिसतर्फे आरोग्यशिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये विविध प्रकारच्या तपासण्या झाल्या. तपासणीअंती ऑफिसमधल्या अनेक कर्मचाऱ्यांमध्ये अतिरीक्त चरबीचं प्रमाण आढळून आलं. फिट दिसणाऱ्या व्यक्तींमध्येही ते अधिक आढळून आलं. प्रियाही स्वतःच्या आरोग्याबाबत विशेष जागरूक होती. तरीही तपासणीनंतर तीसुद्धा धोक्याच्या पातळीवर असल्याचं तिला समजलं. त्यानंतर प्रियाच्या ऑफिसमधले सगळेजण आपल्या स्वास्थ्याविषयी जागरूक झाले.

आपल्याकडे गेल्या काही वर्षांत स्वास्थ्य पर्यटन ही संकल्पना रूजत चालली आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडा विरंगुळा मिळून आरोग्याचीही काळजीही घेतली जाते. या दोन्हीसाठी स्वास्थ्य पर्यटन खूप फायदेशीर आहे. खोपोलीनजीक 'माधवबाग' स्वास्थ्य पर्यटनासाठी अतिशय उत्तम आहे. डॉक्टर रोहित साने यांच्या माधवबागेत हृदयातील ब्लॉक्स दूर केली जातात. पण माधवबाग केवळ त्यासाठी प्रसिद्ध नाही. हृदयविकार होऊ नये म्हणून किंवा निरोगी आयुष्य जगण्याची गुरूकिल्ली जाणून घेण्यासाठी माधवबाग एक अतिशय चांगला पर्याय आहे.

निसर्गाच्या कुशीत, आमराईच्या छायेत आणि डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या माधवबागेत राहणं एक सुंदर अनुभव आहे. आत शिरल्यावर दीड किलोमीटरचा वॉकिंग ट्रॅक असून त्याच्या भोवती रंगीबेरंगी फुलं लावली आहेत. ट्रॅकच्या मधोमध ध्यानधारणा केंद्र आणि योगसाधना मंदिर आहेत. या दोन्हींना जोडणारं छोटेखानी कमळांनी फुललेलं तळं आहे. सकाळी योगसाधना केंद्रामध्ये योगासनांचे वर्ग भरतात. दुपारच्या वेळात ध्यानधारणा केंद्रात रूग्णांना मेडिटेशन शिकवलं जातं. ध्यान धारणा केंद्रातल्या काळोखात मधोमध एक मंद ज्योत तेवते. त्या उजेडात मेडिटेशन चांगल्या पद्धतीने होतं. काही अंतरावर छोटी कॉटेजस् आहेत. या कॉटेजच्या भिंती शेणाने सारवलेल्या आहेत. आतल्या सोयीसुविधाही अत्याधुनिक आहेत. जुन्या वाड्याची आठवण करून देणारं पंचकर्म केंद्रही तिथे आहे. छोट्या आकाराच्या खोल्यांमध्ये पंचकर्मासाठी वापरली जाणारी लाकडी पेटी आहे. याच परिसरात काऊन्सेलिंग सेण्टर्सही आहेत.

इथे दाखल होणारे रूग्ण आणि पर्यटक यांना दररोज सकाळी साडेचार वाजता उठवण्यात येतं. नंतर दंतदावन करायला शिकवलं जातं. डोळ्यांची



अनु.

आणि शरीरातील इतर अवयवांची स्वच्छता शास्त्रोक्त पद्धतीने कशी करायची हेही इथे शिकवलं जातं. त्यानंतर अर्धातास व्यायाम आणि नंतर एक ते दीड तास योगासनं शिकवली जातात. नाश्ता झाल्यावर पंचकर्म आणि स्नान करून प्रार्थनेसाठी ध्यान धारणा मंदिरात सगळे एकत्र जमतात. दुपारचं जेवण झाल्यावर सगळ्यांसाठी लेक्चर्स आणि पर्सनल काऊन्सेलिंग असतं. संध्याकाळी ट्रेडमिलवर व्यायाम केला जातो. त्यानंतर संध्याकाळच्या खाण्यानंतर पुन्हा पंचकर्म आणि रात्री सात साडेसात वाजता रात्रीचं जेवण. रात्रीच्या स्नेहसंमेलनाने दिवसाची सांगता केली जाते. सकाळी हृदयविकाराच्या रूग्णांना ट्रॅकवरून चालवलं जातं. त्यावेळी ट्रॅकवर काही अंतरावर डॉक्टर उभे असतात. दररोज इथे रुग्णांची शास्त्रोक्त पद्धतीने तपासणी केली जाते. इथे सात दिवस राहिल्यानंतर पेशंटच्या हृदयातील ब्लॉक्स कमी होऊन हृदयविकारचा धोका कमी होतो. बरोबरीने हृदयविकाराला दूर कसं ठेवायचं याचीही माहिती मिळू शकते.







अनु.

**झेनिथ फॉल-खोपोली** : सेंट्रल रेल्वेने कर्जतला उतरायचं. तिथून धबधबा साधारण १८ किमीवर आहे. तिथपर्यंत जाण्यासाठी सिक्स सिटर मिळेल. खोपोली एसटी डेपोतूनही बस मिळेल.





अनु.




# मृगगड

**सह्याद्रीच्या घाटवाटांचं आणि किल्ल्यांचं मोठं जिवाभावाचं नातं. जिथं घाट तिथं किल्ला हवाच. घाटातून होणाऱ्या वाहतुकीच्या नियंत्रणासाठी आणि सशस्त्र आक्रमकांना अटकाव करण्यासाठी पूर्वीच्या काळी डोंगरी छावण्यांची निर्मिती केली जात असे. या डोंगरी छावण्या म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सह्याद्रीतील किल्लेच आहेत. त्यातलाच एक भेलीवचा मृगगड.**

पावसाळ्यात घाटवाटांची सैर करण्याची मजा काही औरच. धब्यधब्याच्या वाटांनी अडखळत कधी ठेचकाळत कोकणात उतरतांना पूर्वीच्या काळी लोकांना या मार्गाने प्रवास करताना किती त्रास होत असेल याचा छोटासा अनुभव येतो. पुण्याहून कोकणात उतरण्यास अनेक घाटमार्ग होते. कोणत्याही वाटेने उतरताना सह्याद्री आपले हातपाय पसरून बसलेलाच. यामध्ये



अनु.

प्रामुख्याने बोरघाट, कुखंडीघाट, सवघाट, वाघजाई घाट, सवघाट याचा समावेश होतो. यापैकी सवघाट हा पवनेच्या खोऱ्यातून पश्चिमेला खाली येतो. याच्या तोंडावर तुंग आणि मिरगड हे दोन किल्ले आहेत. तर पायथ्याला मृगगड आहे. तुंगवाडी, जांभुळणे, नांदगाव, मलुष्टे, सवघाट, परळी, जांभुळपाडा असा हा मार्ग आहे. याच्या जवळच कुखंडा नावाचा घाट आहे. या घाटाच्या पायथ्याशी उबरे नावाचे गावसुद्धा आहे. इथेच इतिहासप्रसिद्ध अशी कारजलबखानाची लढाई झाली. या लढाई झाली. या लढाईचा एक प्रत्यक्ष साक्षीदार म्हणजे 'मृगगड'. स्थानिक लोकांमध्ये हा भेलीवच किल्ला म्हणून प्रसिद्ध आहे.

लोणावळ्याहून आयएनएस शिवाजीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक घाट लागतो त्या घाटाची दरी वाघदरी या नावाने ओळखली जाते. याच्या पायथ्याशी मोराडी नावाचा सुळका आहे. या दरीतून खाली पहिल्यावर दरीमध्ये तीन सुळक्यासारखे डोंगर दिसतात यापैकी मधला उंचवटा म्हणजे 'मृगगड'. जर टायगर स्लीपमधून मृगगडावर जायचे असल्यास आयएनएस शिवाजीची परवानगी घेणं आवश्यकच आहे. यामार्गालाच सव घाटाची निसणी असंही म्हणतात. आपण मात्र कोकणातून किल्ल्यावर चढायचं आहे.

पाली खोपोली रस्त्यावर माणगाव या गावी पोहोचायचं. माण गावातून टमटमने कल्याण गाठायचं. कल्याणहून तीन किमी अंतरावर असणार भेलीव हे किल्ल्याच्या पायथ्याचं गावं. आषाढ श्रावणात या परिसरातील भटकंती करण्याचा आनंद वेगळाच. सर्वदूर नाना प्रकारची आर्किडस आणि रानफुलं फुललेली असतात. ऐन श्रावणाच्या शेवटी ऊन पावसाचा लंपडाव सुरूच असतो.

भेलीवच्या अलीकडे अंबानदीच्या वरचा पूल लागतो. आजूबाजूच्या हिरवागार प्रदेश समोरच कातळभिंती सारखा उभा असणारा सह्याद्री यामुळे आपलं मन एका वेगळ्याच विश्वात जाते. आयएनएस शिवाजीच्या तलावातून ओसंडून वाहणारे पाणी धबधब्याच्या रुपाने सह्याद्रीच्या २१०० फुटाच्या कड्यावरुन आदळत आपटत मृगगडाचे पाय धुवून अंबानदीला मिळते.

भेलीव गावात मृगगडाची एक डोंगरसोंड बाजूच्या उंचवट्याना स्पर्श करून खाली



अनु.

उतरते. गाव मागे टाकून डोंगरसोंड चढणीला लागलं की पंधरा मिनिटांतच वरच्या पठारावर पोहोचतो. सर्व पठारावर पिवळी पिवळी सोनकीची फुलं आलेली असतात. यामुळे वातावरणाला पिवळी झळाकी आल्यासारखी वाटते. पुढची वाट दाट झाडीतून वर जाते. उंचवटा आणि तिसरा उंचवटा यामधील घळीतून वाट गडावर चढते. पावसाळ्यात जरा निसरडं झाल्याने पावलं दमानेच टाकावी लागतात. वाटेत कातळात खोदलेल्या गुहा दिसतात. मृगगडाचा माथा छोटासा आहे. यात काही पाण्याची काही टाकी आहेत एका विहीरवजा टाक्यात उतरण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्थाही आहे. समोरच गडाचा छोटासा, उंचावलेला डोंगर दिसतो. पण दुरून डोंगर साजरे असे म्हणून लांबूनच सलाम ठोकायचा. कारण वर पाहण्यासारखे काहीच नाही. गडावरून घाटमाथा आणि कोकण यांना विभागणाऱ्या सह्यपर्वतांचं सुंदर दर्शन होतं. सह्याद्रीने या सर्व किल्ल्यांना कुशीत घेतल्याचा भास होतो.

याच्यासमोर आपण सर्व म्हणजे आकाशाच्या छताखाली बागडणारी चिमुकली मुलं. अशातच एक गोष्ट अचानक लक्षात येते. संपूर्ण कातळभिंतीच्या वरच्या भागात धब्याधब्याचे पाणी आणि वारा यामुळे पांढरा पट्टाच निर्माण झालेला दिसतो.

असा हा भेलिवचा किल्ला ऊर्फ मृगगड पावसाळी ट्रेकसाठी उत्तम ऑप्शन ठरू शकतो.


मृगगड

खंडाळा- लोणावळा घाट परिसर प्रसिध्द आहे तेथील वातावरणामुळे, पावसाळ्यात येथे पर्यटकांची झुंबड उडालेली असते. भुशी डॅम हे येथील सर्वात प्रसिध्द स्थळ. भुशी धरणाकडे जाताना उजवीकडे एक दरी लागते, याला 'टायगर व्हॅली' असे म्हणतात. या 'टायगर व्हॅली'मध्ये एक अनोखे दुर्गरत्न आहे. त्याचे नाव 'मृगगड.' पण इथे जाण्यासाठी 'बोरघाटा'च्या अलीकडे असलेल्या खोपोलीच्या जवळून वाट आहे.



## काय पहाल?

किल्ल्यावर जाताना खोबण्यांच्या बाजूला एक छोटीशी गुहा आहे. तिथपर्यंत जरा सांभाळून जावे लागते. मृगगडाचा माथा फारच लहान आहे. चढून गेल्यावर समोरच सपाटीसारखा भाग आहे. त्यावर पाण्याची टाकं आहेत. एक छोटेसे तळेही आहे. एक दोन टाकं मातीच्या ढिगाऱ्यामुळे गाडली गेलेली आहेत. समोरच टेकाडासारखा भाग दिसतो. यावर चढून गेल्यावर पाण्याची टाकं दिसतात. काही वाड्यांचे अवशेष दिसतात. या गडाचा उपयोग केवळ चौकी पहाऱ्यासाठी होत असावा. स्थान एकदम मोक्याचे... याच्या एका बाजूला उंबरखिंड तर, दुसऱ्या बाजूला वाघदरी, असा सर्व परिसर येथून दिसतो. संपूर्ण किल्ला फिरायला एक तास लागतो.

## पोहोचण्याचे मार्ग

मृगगडावर जाण्यासाठी खोपोलीला जायचे. पाली- खोपोली रस्त्यावर खोपोलीपासून २० किमी अंतरावर परळी नावाचे गाव आहे. या गावातून सहा आसनी रिक्षाने भेलीव नावाच्या गावात जायचे. भेलीव हेच पायथ्याचे गाव आहे. स्थानिक लोक या किल्ल्याला भेलीवचा किल्ला असेही म्हणतात. भेलीव गावाच्याच मागे तीन सुळक्यांसारखे डोंगर दिसतात. त्यापैकी मधला डोंगर म्हणजे मृगगड. गावाच्या मागून एक वाट किल्ल्यावर जाते. जाण्याची वाट जंगलातून असल्याने उन्हाचा त्रास बिलकूल होत नाही. किल्ला आणि त्याच्यापुढे असणारा तिसरा डोंगर यांच्यामध्ये एक खिंड आहे. त्या खिंडीतूनच वाट किल्ल्यावर जाते. वरती थोडी कातळचढाई असल्यामुळे जरा जपूनच चढावे लागते. भेलीवमधून किल्ल्यावर जाण्यास १ तास पुरतो.

# वन डे पिकनिकसाठी : सांकशी



पनवेल पासून २०किलोमिटर अंतरावर असणारा सांकशीचा किल्ला घनदाट अरण्याने वेढलेला आहे. एका बाजूला मुंबई गोवा महामार्ग तर एका बाजूला कर्नाळा पक्षी अभयारण्य. पनवेलजवळ इरशाळ, प्रबळगड, माणिकगड, कर्नाळा यासारखे अनेक किल्ले आहेत. पण सांकशी हा यापेक्षा खूपच वेगळा आहे. पनवेलहून पेणच्या दिशेने गाडी निघाली की पनवेलहून १७ ते १८ किमीवर वळवली नावाच फाटा लागतो. या गावाच्या फाट्यावर उतरलं की आपली भ्रमंती चालू होते. बळवली हे छोटसं गाव. लाल मातीच्या भिंती, कौलारू घरं, घरासमोर अंगण, अंगणात असणारी विविध रंगांची फुलं हे सर्व पहातपहात गावाच्या शाळेकडची वाट पकडायची. इथून एक वाट किल्ल्याकडे गेलेली दिसते. विशेष म्हणजे गावाच्या आसपास जवळ कुठे किल्ला असेल याचा मागमूसही लागत नाही. किल्ल्याचा पायथा वळवलीपासून ५ किलोमीटर अंतरावर आहे. गावाच्या बाहेरून लालतांबड्या मातीचा एक रस्ता वेडीवाकडी वळणे घेत भेंडेवाडीपर्यंत जातो. वाटेत आजूबाजूला सर्वदूर भाजीपाल्याचे मळे फुललेले दिसतात. पावसाची रिमझिम चालूच असते. सर्व डोंगरांनी एखाद्या नववधूसारखा शालू पांघरल्याचा भास होतो.


तासा दीडतासात आपण किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचतो. किल्ल्याचा पायथा आला हे ओळखण्याची खूण म्हणजे बद्रुद्दीन दर्गा. हा दर्गा म्हणजे जवळपासच्या बारा गावांचं दैवत. हा दर्गा बराच जुना आहे. अलीकडेच या दर्ग्याची नवी इमारत बांधली आहे. या दर्ग्याच्या मागच्या बाजूने किल्ल्यावर जायला ठळकशी वाट आहे. किल्ल्याची चढण बरीच सोपी आहे. त्यामुळे मधल्या पठारावर जायला २० मिनिटं पुरतात. पठार संपूर्ण हिरवंगच्च असल्याने तिथं थांबण्याचा मोह टाळता येत नाही. पण वेळेचं गणित जुळवायला किल्ला लगेच चढायला लागणं उत्तम. या पठारावरुन किल्ल्यावर जायला दोन वाटा आहेत. एक समोरच्या बाजूने तर दुसरी उजव्या कड्याला वळसा घालून वर जाते. समोरून किल्ल्यावर जाणारी वाट बाबूजी धीरे चलना अशी क्षणक्षणाला आठवण करून देणारी असल्याने कातळातील खोबण्या जरा जपूनच चढाव्या लागतात. उजवीकडे सुंदर कातळात खोदलेली पाण्याची टाकी आहेत. यापैकी इका टाक्यातलं पाणी चक्क पिवळं आहे. थोडं अंतर चढून गेल्यावर कातळात खोदलेली टाकी लागतात. या किल्ल्यावर इतक्या प्रचंड संख्येने टाकी आहेत की हा किल्ला टाक्यांचा किल्ला म्हणून ओळखला जावा.


टेकडीच्या पलिकडच्या बाजूला खालच्या पठारावरून येणारी दुसरी वाट दिसते. या वाटेवर अनेक टाकी खोदली आहेत. समोर कर्नाळयाचं पक्षी अभयारण्य खुणावत असतं. हा परिसर नितांत रम्य गूढ वृक्षवेलींनी नटलेला असल्यानश वेळ कसा आणि कधी जातो समजत नाही. आत्तापर्यंत विश्रांती घेतलेले वरुणराज प्रसन्न झालेले असतात. पाऊस अंगावर घेत किल्ला उतरताना पावलं बोलू लागतात पण दिवसभर अनुभवलेला निसर्ग आणि किल्ल्याच्या आठवणींनी ही वाटही सोपी होऊन जाते.



# अलिबाग

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते अलिबाग | | | | | 94 | | | | |
| **1** | सागरगड | | किल्ला | | | 19 | NE | | | |
| **2** | सिध्देश्वर | धबधबा | | मंदिर | | 11 | NE | 18 | SW | |
| **3** | किहीम बीच | समुद्रकिनारा | | | | 10 | NW | 19 | NW | |
| **4** | खांदेरी | | | दीपगृह | | 9 | NW | 3 | S | |
| **5** | रामधरणेश्वर | | | मंदिर | | 7 | NE | 7 | SE | |
| **6** | वर्सोली बीच | समुद्रकिनारा | | | | 3 | NW | 10 | S | |
| **7** | अलिबाग | समुद्रकिनारा | किल्ला | | | 0 | | | | |
| **8** | सिध्दिविनायक | | | मंदिर | | 2 | SW | 2 | SW | |
| **9** | आक्षी बीच | समुद्रकिनारा | | मंदिर | सुरुचे बन | 8 | S | 7.5 | SE | |
| **10** | नागाव बीच | समुद्रकिनारा | | पक्षीजीवन | वॉटरस्पोर्ट | 10 | SE | 5 | S | |
| **11** | मुकरी गणपती | | | मंदिर | | 15 | SE | 7 | SE | |
| **12** | रेवदंडा | समुद्रकिनारा | किल्ला | | | 17 | SE | 9 | S | |
| **13** | कोरलाई | समुद्रकिनारा | किल्ला | दीपगृह | | 23 | S | 7 | SW | |
| **14** | फणसाड धरण | | | धरण | | 29 | SE | 9 | SE | |
| **15** | काशिद बीच | समुद्रकिनारा | | मंदिर | सुरुचे बन | 32 | S | 13 | SW | |
| **16** | नांदगांव | समुद्रकिनारा | | मंदिर | | 40 | S | 8 | S | |
| **17** | फणसाड अभयारण्य | धबधबा | | | अभयारण्य | 42 | SE | 5 | NE | |





kihim Beach
Khanderi and Underi Island Port
Ramdharneshwar Shiva Temple
3 h 4 min
74.4 km
Varsoli Beach
Alibag
Siddheshwar Waterfall
Sagargad
Kihim
Chondhi
Choronde
Gunjis
Navgaon
Vaishet
Thal
Parhur
Prayas Hospital
Sagaon Maruti Mandir
Khandale
Pavele
Ruturaj Inn
Alibag Court
Bank of India Alibag Branch
Alibag Beach
Waghran
Kamarle
Khidki
Kopar
Pezari
Ambepur
Bamangaon
166A


Alibag
Siddhivinayak Temple
Alibag Beach
Akshi Beach
Nagaon Beach
Shree Mukhari Ganapati Mandir Chaul
Revdanda Fort
Korlai Fort
3 h 50 min
97.7 km
Phansad Dam
Bamangaon
Sahan
Nagaon
Dawale
Khanav
Varande
Bagmala
Vave
Bhonang
Salav
Cheher
Korlai
Borli
Yesade
Mandala
Barashiv
166A
91
Map data ©2020 India Terms



अनु.


Thal
ठाल
89
166A
Poynad
पोयनाड
Dolvi
डोलवी
Alibag
Akshi Beach
Nagaon Beach
Beloshi
बेलोशि
Shree Mukhari Ganapati Mandir Chaul
Revdanda Fort
Korlai Fort
Salav
Korlai
3 h 50 min
97.7 km
Kude
कुडे
Sanegaon
साणेगांव
Phansad Dam
Kashid Beach
Phansad Wildlife Sanctuary
Nandgaon Beach


प्लस
पावसाळी...

प्राचीन काळापासून माणूस मनाला शांतता मिळण्यासाठी डोंगरातल्या निसर्गरम्य आणि शांत जागी जाण्याचा प्रयत्न करत आलेला आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात पसरलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगेत अनेक निसर्गप्रेमींचे पाश गुंतलेले आहेत. यातले अनेक डोंगरमाथे, पठारं, किल्ले, गर्द राईत वसलेली आणि आडवाटेवरची देवळं त्यांच्या विसाव्याच्या जागा आहेत. पाऊस बहरायला लागला की ही मंडळी मनसोक्त भिजायला बाहेर पडतात. सह्याद्रीतला पावसातला आविष्कार अवर्णनीय असाच आहे. सगळीकडे पसरलेला हिरवागार मखमली निसर्ग, त्यात या डोंगररांगांमध्ये सगळीकडे जथ्थ्याने तरंगणारे काळे ढग... त्या काळ्या ढगांहून बऱ्यापैकी उंचीवर पसरलेले पांढरे ढग... अक्षरशः या डोंगररांगा अंतराळात तरंगताना दिसू लागतात. सगळीकडे एक अनामिक बेहोशी असते. अशीच एक नितांत सुंदर वाट जाते सागरगडावर.

मुंबई-अलिबाग रस्त्यावरच्या वडखळ नाक्यापुढची धरमतरची खाडी ओलांडून थोडंसं पुढे आलं की निसर्गाचं रूप एकदम वेगळं जाणवायला लागतं. सपाटी जाऊन डोंगर दिसू लागतात. पोयनाडच्या पुढची कार्लेखिंड पार केली की परत अलिबागच्या विस्तृत परिसरात मोठी सपाटी आणि एका बाजूला अरबी समुद्र पसरलेला आहे. या मधल्या पट्ट्यात सह्याद्रीची एक डोंगररांग आपला स्वतंत्र संसार मांडून आहे. कार्लेखिंडीपासून सुरु होऊन डावीकडे पार रोह्यापर्यंत पसरलेल्या या डोंगररांगेत वसला आहे सागरगड आणि या डोंगराचा स्वामी आहे सिद्धेश्वर.

कार्लेखिंड ओलांडली की खंडाळा नावाचं गाव आहे. इथून डावीकडे लहान डांबरी सडकेने दोन एक कि.मी. गेलं की डोंगरपायथ्याला पवेळे नावाचं लहान खेडं आहे. इथपर्यंत गाडीने जाता येतं. इथून पुढे पंधरा-वीस मिनिटं चाललं की सिद्धेश्वराला जाणारी पायवाट सुरु होते. साधारण तासाभराच्या या वाटेवर मधूनमधून पायऱ्याही आहेत. आपण चालायला सुरुवात केली की समोर सागरगडाची डोंगररांग दिसतेच पण इतक्या दुरुनही आपली नजर वेधून घेतो तो या डोंगरावरून कोसळणारा अतिशय देखणा धबधबा.

साधारण अर्ध्या तासाच्या चढणीनंतर उजवीकडे हा दीडेकशे फूट सरळ रेषेत आणि दोन टप्प्यांत कोसळणारा धबधबा आपल्याला अगदी समोरून दिसतो. या ठिकाणचा मोठा कडा जवळजवळ अर्धवर्तुळाकार असून विस्तारही चांगलाच मोठा आहे. या कड्याच्या मध्यातून कोसळणारा धबधबा बघून भान विसरायला होतं. मुख्य म्हणजे आपल्या वाटेजवळच्या ज्या उंच आणि मोकळ्या जागेवरून



अनु.

हा धबधबा दिसतो, ती जागा एकदम सुंदर आहे. त्यात वारा खूप असल्याने धबधब्याची धार हवेत अक्षरशः नाचताना दिसते. इथून अजिबात उठावंसं वाटत नाही. या जागेवरून थोडंसं वर गेलं की सिद्धेश्वराचं देवस्थान आहे.



एका बाजूला घनदाट जंगल व दुसऱ्या बाजूला दरी अशा नितांत सुंदर जागी हे देऊळ वसलेलं आहे. देवळात पंधरा-वीसजण सहजपणे मुक्काम करू शकतात. देवळाच्या वरच्या बाजूला पंधरा-वीस मिनिटांवर 'सागरगडाची माची' म्हणून एक छोटीशी वाडी आहे. या वाडीतल्या काही घरांतून जेवणही आणून देतात. या वाडीतही दत्ताचं देऊळ असून इथेही राहता येतं.

देवळापासून रमतगमत चालीने सागरगड साधारण दीड तासावर आहे. देवळातून निघालं की एका हलक्या चढणीनंतर पंधरा-वीस उंबरठ्यांची वाडी लागते. इथेही राहण्या-जेवण्याची सोय होते. इथून सगळा रस्ता जवळजवळ सपाटीचा आहे. हे भलं मोठं पठार आहे आणि त्यावर अधूनमधून दाट जंगलांचे पुंजके आहेत. वाटेवर खुणेसाठी दगडांवर बाण काढलेले आहेत. हा रस्ता शेवटी मोठा ट्रॅव्हर्स घेऊन पलिकडच्या डोंगराला मिळतो व थोडीशी तटबंदी दिसू लागते. पलिकडच्या डोंगरावर सागरगड वसलाय. ऐतिहासिक बांधकामाच्या अगदी तुरळक निशाण्या इथे आहेत. पहिली तटबंदी ओलांडली की निबिड अरण्य आहे. झाडीच्या पलिकडच्या बाजूला एक छोटंसं देऊळ आहे व त्याच्या थोडंसं खालच्या बाजूला पाण्याची लहान पुष्करणी आहे. पावसाळा सोडून गडावर पाण्याची बहुतेक हीच एकमेव व्यवस्था आहे.

पठाराच्या शेवटी कड्यावरून या डोंगराला खेटूनच एक मस्त सुळका आहे.

पावसाळ्यात या परिसरात समृद्ध कीटकविश्वही फुलत असतं. हा त्यांचा विणीचा काळ असल्याने नाना प्रकारचे रंगीत किडे, रंगीबेरंगी फुलपाखरं पावलोपावली दिसतात. गर्दीचा लवलेश नसल्याने आणि वाटही सोपी असल्याने सगळ्या वयाच्या लोकांना निसर्गाचा हा खजिना मुक्तपणे बघता येतो.

*मन चिंब पावसाळी...*
*झाडांना रंग ओले...*
*घनगर्द सावल्यांनी आकाश वाकलेले...*
*पाऊस पाखरांच्या पंखात थेंबथेंबी...*
*शिडकाव संथ येता पाने निळी कुसुंबी...*

हे कवितेतलं वर्णन आपण प्रत्यक्ष अनुभवतो.

या मंतरलेल्या वाटेवर सिद्धेश्वर आपल्याला पानापानांतून भेटतो. धबधब्याच्या सळसळत्या रूपात तर तो आपल्याला प्रत्यक्ष दर्शन देतो. निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची खरी ओळख आपल्याला आपसूकच होते. आपण भरलेल्या आणि भारलेल्या मनानं सागरगड सोडतो.

मुंबई-अलिबाग रस्त्यावरच्या वडखळ नाक्यापुढची धरमतरची खाडी ओलांडल्यावर थोडसं पुढे आलं, की निसर्गाचा सगळा कॅन्व्हास बदलतो. सपाटी जाऊन डोंगर दिसायला लागतात. पोयनाडच्या पुढची कार्लेखिंड पार केली, की परत अलिबागच्या विस्तृत परिसरात मोठी सपाटी आणि एका बाजूला अरबी समुद्र पसरलेला आहे. या मधल्या पट्ट्यात सह्याद्रीची एक डोंगररांग आपला स्वतंत्र संसार मांडून आहे. कार्लेखिंडीपासून सुरु होऊन डावीकडे पार रोह्यापर्यंत पसरलेल्या या डोंगररांगेत वसलाय सागरगड आणि या डोंगराचा स्वामी आहे, सिद्धेश्वर.



कालेखिड ओलांडली की खंडाळा नावाचं गाव आहे. इथून डावीकडे लहान डांबरी सडकेनं दोन-एक किमी गेलं की डोंगरपायथ्याला पवेळे नावाचं लहान खेडं आहे. इथपर्यंत गाडीने जाता येतं. इथून पुढे पंधरा-वीस मिनिटं चाललं की सिद्धेश्वराला जाणारी पायवाट सुरू होते. साधारण तासाभराच्या या वाटेवर मधूनमधून पायऱ्याही आहेत. आपण चालायला सुरुवात केली की समोर सागरगडाची डोंगररांग दिसतेच, पण इतक्या दुरूनही आपली नजर वेढून घेतो तो या डोंगरावरून कोसळणारा अतिशय देखणा धबधबा.

साधारण अर्ध्या तासाच्या चढणीनंतर उजवीकडे हा दीड-एकशे फूट सरळ रेषेत आणि दोन टप्प्यात कोसळणारा धबधबा आपल्याला अगदी समोरून दिसतो. या ठिकाणचा मोठा कडा जवळजवळ अर्धवर्तुळाकार असून विस्तारही चांगलाच मोठा आहे. या कड्याच्या मध्यातून कोसळणारा धबधबा बघून भान विसरायला होतं. मुख्य म्हणजे आपल्या वाटेजवळच्या ज्या उंच आणि मोकळ्या जागेवरून हा धबधबा दिसतो. ती जागा एकदम सही आहे. त्यात वारा खूप असल्याने धबधब्याची धार हवेत अक्षरशः नाचताना दिसते. या जागेवरून थोडंस वर गेलं की सिद्धेश्वराचं देवस्थान आहे. एका बाजूला घनदाट जंगल आणि दुसऱ्या बाजूला दरी अशा नितांतसुंदर जागी हे देऊळ वसलेलं आहे. देवळात सहज पंधरा-वीस जण मुक्काम करू शकतात. देवळाच्या वरच्या बाजूला पंधरा-वीस मिनिटांवर 'सागरगडाची माची' म्हणून एक छोटीशी वाडी आहे. या वाडीतल्या काही घरातून जेवणही आणून देतात.

देवळापासून सागरगड रमतगमत चालीने साधारण दीड एक तासावर आहे. देवळातून निघालं, की एका हलक्या चढणीनंतर पंधरा वीस उंबरठ्यांची वाडी लागते. वाडीत दत्ताचं एक देऊळ आहे. इथेही राहण्या-जेवण्याची सोय होते इथून सगळा रस्ता जवळजवळ सपाटीचा आहे. हे भलं मोठं पठार आहे आणि त्यावर मधून मधून दाट जंगलाचे पुंजके



अनु.

आहेत. वाटेवर खुणेसाठी दगडांवर बाण काढलेले आहेत. बराच वेळ चालल्यावरही किल्ल्याच्या काहीही खुणा दिसत नसल्याने अस्वस्थ व्हायला होतं. पण हा रस्ता शेवटी मोठी ट्रॅव्हर्स घेऊन पलिकडच्या डोंगराला मिळतो व थोडीशी तटबंदी बांधकामाच्या अगदी तुरळक निशाण्या इथे आहेत. पहिली तटबंदी ओलांडली, की निबिड अरण्य आहे. झाडीच्या पलीकडच्या बाजूला एक छोटंस देऊळ आहे व त्याच्या थोडंस खालच्या बाजूला पाण्याची लहान पुष्करणी आहे. पावसाळा सोडून गडावर पाण्याची बहुतेक हीच एकमेव व्यवस्था आहे. पठराच्या शेवटी कड्यावरून या डोंगराला खेटूनच एक मस्त सुळका आहे.

पावसाळ्यात या परिसरात समृद्ध किटकविश्वही फुलत असतं. हा त्यांचा विणीचा काळ असल्याने नाना प्रकारचे रंगीत फुलपाखरं पावलोपावली दिसतात. धबधब्याच्या सळसळत्या रुपात तर तो आपल्याला प्रत्यक्ष दर्शन देतो. निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची खरी ओळख आपल्याला आपसूकच होते. हे सगळं डोळ्यात पुरेपूर साठवून... आपण भरलेल्या आणि भारलेल्या मनानं सागरगड सोडतो...

## सिद्धेश्वर

मुंबईहून अलिबागला जाताना रस्त्यात कार्ले खिंड लागते. तिथून ३-४ किलोमीटर्स अंतरावर खंडाळा हे गाव लागतं. या गावातूनच सिद्धेश्वर धबधब्याकडे जाणारी वाट आहे. मात्र इथे जाताना पोटपूजेचं सामान घेऊनच जावं. धबधब्याकडे जाताना शिवकालीन सागरगड लागतो. इथे असलेल्या वानरटोक या पिनॅकलवर क्लायम्बिंग केलं जातं. किल्ल्याच्या पायथ्याशी गाडी जाते. तिथून जेमतेम पाऊण तासावर हा धबधबा आहे. समुद्रसपाटीपासून १३०० फूट उंच असलेला हा सागरगड. त्याच्या अर्ध्या रस्त्यावर सिद्धेश्वर आश्रम आणि मंदिर लागतं. तिथे जाण्यापूर्वी अनेक छोटे-छोटे धबधबे लागतात. मात्र मंदिराच्या बाजूला असणारा आणि मंदिराच्याच नावाने असणारा धबधबा लक्ष वेधून घेतो. हा धबधबा वळणदार आकाराचा आहे. भर पावसात खूप वेगाने वाहतो. इथे जाताना वाटेत दोन ओढे लागतात. दिवसभर पाऊस पडत असेल तर या ओढ्यांना खूप पाणी असतं.





अनु.

## सिद्धेश्वर :

अलिबागपासून तीन किमी दूर मुंबई रस्त्यावर खंडाळे गाव लागतं. इथून उजवीकडे एक कच्चा रस्ता फुटतो. या रस्त्यानं साधारण दोन किमीपर्यंत आपण आपले वाहन नेऊ शकतो. पुढे मात्र पायीच जावं लागतं. प्रथम पायऱ्या व नंतर अरुंद अवघड अशी पायवाट लागते. पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारा ओढा आधी पार करावा लागतो. हेदेखील शंकराचंच मंदिर असून महाशिवरात्रीस इथे यात्रा भरते. दर श्रावण सोमवारी दर्शनास येण्याची प्रथादेखील आहे. परंतु एरवी मात्र सहसा इथे कोणी फिरकत नाही.

वरील दोन्ही ठिकाणे पदभ्रमंतीसाठी, निसर्गाशी एकरूप होण्यासाठी, देवदर्शनासाठी व छायाचित्रणासाठी उत्तम आहेत. ऋतुमानाप्रमाणे सृष्टीचं रूप बदलत असतं. पावसाळ्यात हिरवी साडी ल्यालेली पुरंध्री, हिवाळ्यात धुक्याचा घुंघट ओढलेली, तर उन्हाळ्यात लाल भडक फुले माळलेली अल्लड तरुणी. एक मात्र खरं की इथली गूढ शांतता आपल्याला अंतर्मुख करते. चिटपाखरू नसलेल्या या उजाड माळरानावर मनाचं पाखरू उगाचच फडफडू लागतं वाटतं इथंच बसून राहवं. परंत जाऊच नये. नाइलाजानं पाय पुन्हा मुंबईकडे वळवावे लागतात.

महाशिवरात्रीला दोन्ही देवळांत यात्रा भरते. शिवरात्र अजून लांब असली तरी श्रावणाची चाहूल लागलीय. त्यामुळे एखाद्या सोमवारी या शंकरांचं दर्शन घ्यायचा प्लॅन करायला हरकत नाही.



अनु.

## किहिम-अलिबाग

अलिबागपासून जवळच असलेली किहिम-चोंढी-आवास ही गावं ऐनवेळी ठरणाऱ्या सहलींसाठी परफेक्ट ऑप्शन्स आहेत. इथले स्वच्छ निसर्गरम्य समुद्रकिनारे मनाला भुरळ घालतात. इथल्या माडांच्या बनातल्या वाड्यांमध्ये रहाण्याची मस्त सोय होते. मासेमारी जोरात असल्याने मासेखाऊ खवय्यांचीही चांगलीच चंगळ आहे. वीकेण्ड ट्रिपसाठी मुंबईपासून अवघ्या २ तासांवर असणारं किहिम हा चांगला पर्याय ठरेल.

**कसं जाल?**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरून वडखळ नाक्यावरून किहिमला जाता येईल. तसेच गेटवेवरून सुटणाऱ्या फेरीबोटी हाही एक मस्त ऑप्शन आहे. गेटवेवरून बोट पकडून मांडवा धक्क्यावर उतरून पुढे बसने किहिमला जाता येईल.

## खांदेरीचं कान्होजी आंग्रे दीपगृह.



अलिबाग तालुक्यात थळच्या टेकडीसमोर खांदेरी या बेटावर कान्होजी आंग्रे दीपगृह आहे. छत्रपती शिवरायांची ३०० मावळे घेऊन ही जागा शोधली आणि किल्ला बांधला. सरखेल कान्होजी आंग्रे यांनी इंग्रजांना जेरीस आणलं, त्या यशोगाथेचं हे प्रतीक. आज त्यांच्याच नावाने इथे मुंबई पोर्ट ट्रस्टने दीपगृह उभारलेलं आहे आणि तेही प्राचीन आहे. १८६६ साली हे दीपगृह सुरु झालं. तिथेच आता शिपिंग विभागातर्फे दीपगृह पर्यटन सुरू होणार आहे. सध्या थळहून मच्छिमार नौकेने तिथे जाता येतं. अधिकृत पर्यटन सुरू झाल्यावर तिथे गेटवेवरून थेट बोट जाईल. दीपगृहाबरोबरच इथे धातूसारखा आवाज येणारा एक दगड हे वैशिष्ट्य आहे. किल्ल्याची तटबंदी शाबूत आहे. भरभक्कम बुरुज आहेत. तटबंदीवरच चाकांची तोफ आहे. वेताळ मंदिराला पूजायला मच्छिमार येतात. अरबी समुद्रात मुंबई बंदरात प्रवेश करताना हेच दीपगृह प्रथम दिशादर्शन करतं. दगडी बांधकाम असलेलं अष्टकोनी असं हे दीपगृह आहे. अगदी छान आणि निवांत वातावरण इथे आपल्याला अनुभवायला मिळतं.



*धरणेश्वर आणि सिद्धेश्वर ही दोन्ही ठिकाणे पदभ्रमंतीसाठी, निसर्गाशी एकरूप होण्यासाठी, देवदर्शनासाठी व छायाचित्रणासाठी उत्तम आहेत. ऋतुमानाप्रमाणे सृष्टीचं रूप बदलत असतं. पावसाळ्यात हिरवी साडी ल्यालेली पुरंध्री, हिवाळ्यात धुक्याचा घुंघट ओढलेली, तर उन्हाळ्यात लाल भडक फुले माळलेली अल्लड तरुणी. एक मात्र खरं की इथली गूढ शांतता आपल्याला अंतर्मुख करते. चिटपाखरू नसलेल्या या उजाड माळरानावर मनाचं पाखरू उगाचच फडफडू लागतं.*

## धरणेश्वर :

अलिबागपासून ६ किमी अंतरावर रेवस रस्त्यावर भालनाका आहे. इथून एक चिंचोळा रस्ता धरणेश्वरकडे निघतो. साधारण दोन किमी आत गेले की डोंगर पायथा येतो. इथपर्यंत आपण आपले वाहन आणू शकतो. पुढे मात्र दमछाक करणारी चढण लागते. एक पाऊलवाट आपल्याला डोंगर पठारावर घेऊन जाते. इथे एक छानसं तळं आहे. शहरात न दिसणाऱ्या किंवा दिसल्या तरी नको वाटणाऱ्या म्हशी त्यात डुंबताना दिसतात. गावकरी या जनावारांना काही काळ खुशाल इथे सोडून देतात आणि पावसाळा तोंडावर आला की त्यांना परत खाली घेऊन जातात. म्हणजे चाऱ्याचा खर्च नको. तळ्याच्या काठावर उभं राहून आजूबाजूचा आसमंत न्याहाळून बघत असता झाडीत लपलेलं एक मंदिर दिसतं. धरणेश्वर आलं की काय, असं वाटून आपण खूष होतो. पण ते असतं एकविरा मातेचं मंदिर. इथून पुढे पाऊलवाटा आपल्या सोबतीला नसते. आपण शिवाजी महाराजांचे अनुयायी असून शत्रूपक्षावर चाल करून जात आहोत असा विचार मनात येतो आणि अंगात विरश्री संचारते. काट्याकुट्यांची झाडाझुडपांची पर्वा न करता आपण साधारण ३० ते ४० मिनिटं तंगडतोड करतो. अचानक नजर एका झोपडीवजा

मंदिराकडे जाते. हे असतं भवानी मातेचं मंदिर. इथून उंच सुळक्यावर एक झाडांचा पुंजका स्पष्ट दिसतो. त्या पुंजक्यामध्ये उभं असलेलं धरणेश्वराचं मंदिर आपल्याला खुणावत असतं. पण वर जायला मार्ग दिसत नाही. शूर मावळे कुठल्याही परिस्थितीत हार मानत नाहीत, असा विचार करून आपण ते शेवटचं शिखर सर करण्याच्या जिद्दीनं आगेकूच करतो. अनेकदा घसरगुंडी होते. हातापाय खरचटतात. परंतु सरतशेवटी आपण शिखर सर करतो. "अरे हे काय? मंदिर तर बंद आहे," असा उद्‌गार काढून आपण मटकन मंदिराच्या पायरीवरच खाली बसतो. गार वाऱ्याची झुळूक सुखावते.

महाशिवरात्रीला इथे यात्रा भरते. एरवी पुजारी दर सोमवारी इथे झाडलोट, पूजाअर्चा करण्यासाठी येतात.

इथे येण्यासाठी अन्य तीन मार्ग आहेत. एक खडताळ पुलापासून सुरू होतो, दुसरा वायशेत वरून व तिसरा सोगांव इथून निघतो. हे शिवमंदिर असलं तरी स्थानिक या मंदिरास राम धरणेश्वर म्हणतात.

---

## वर्सोली बीच

**अलिबाग** जवळ असलेला वर्सोली बीच म्हणजे एक शांत समुद्र किनारा! अलिबागच्या गर्दीच्या तुलनेत हा समुद्रकिनारा काहीसा आत असल्याने तिथलं नैसर्गिक सौंदर्य बघायलाच हवं. नारळाच्या झाडांनी वेढलेला हा किनारा सुंदर असला तरी तितकाच स्वच्छही आहे. परंतु खोल असल्यामुळे पाण्यात जाताना मात्र सावधनता बाळगावी लागते. वर्सोली हे छोटंसं गाव असून अलिबागपासून आतल्या बाजूला सुमारे २० मिनिटांच्या अंतरावर हा समुद्र आहे. गर्दी, गोंधळ यांपासून लांब जायचं असेल तर वर्सोलीचा पर्याय योग्य ठरतो. शिवाय मुंबईपासून जवळ असल्यामुळे एक दिवसाची ट्रीपदेखील पुरेशी ठरते. वर्सोलीत राहायची विशेष सोय नसली तरी अलिबाग जवळ असल्याने तिथे राहून या समुद्रावर जाता येतं.

### कसं जाल ?

मुंबई गोवा हायवे वरून अलिबागला जाता येतं. मुंबईपासून सुमारे १४० किमी अंतर असल्यामुळे कोकणच्या तुलनेत इथं लवकर पोचता येतं. खाजगी वाहनानं किंवा सरकारी बसनं अलिबागला जाता येतं. अलिबाग पासून वर्सोलीला रिक्षा, टमटमने देखील जाण्याची सोय आहे. शिवाय मुंबईपासून अलिबागला लाँचने जायची सोय गेट वे ऑफ इंडियापासून आहे.

### आणखी काय पहाल?

अलिबागला राहायचा प्लॅन असेल तर तिथून सुमारे दीड तासाच्या अंतरावर असलेलं बिर्ला मंदिर बघता येईल. शिवाय अलिबागच्या समुद्रातला प्रसिद्ध कुलाबा किल्लादेखील बघता येऊ शकतो. समुद्रात असलेला हा किल्ला बघायचा असेल तर भरतीच्या वेळी बोटीनं आणि ओहोटीच्या वेळेस चालत जायची सोय आहे.

## अलिबाग

मुंबई-मुरूड मार्गावर आणि मुरूडपासून सुमारे पन्नास कि.मी. अंतरावर अलिबाग आहे. रायगड जिल्ह्याचं मुख्यालय असलेल्या अलिबागच्या पश्चिम किनाऱ्यालगतही पांढऱ्या वाळूचा प्रशस्त नयनमनोहर बीच आहे. मुंबईपासून केवळ शंभर किमीवर अलिबाग आहे. अलिबागच्या अगदी जवळ आणखी एक चंदेरी वाळूचा सागरकिनारा आहे, तो म्हणजे वरसोली बीच. या बीचवरून कुलाबा, खांदेरी व उंदेरी हे समुद्रात असणारे ऐतिहासिक किल्ले दृष्टीपथात येतात. या ठिकाणीही पर्यटकांची वर्दळ असते. अलिबाग ते रेवसदरम्यान किहीम, आवास, मांडवा ही निसर्गरम्य रुपेरी वाळूच्या किनाऱ्यांची आणखी काही स्थळं आहेत. तीसुद्धा पर्यटकांना नेहमी आकर्षित करतात. अलिबाग-मुरूड मार्गावरचे नागाव, चौल आणि रेवदंडा हे किनारेसुद्धा प्रेक्षणीय आहेत.

# कुलाबा किल्ल्यातला सिद्धिविनायक

अलिबागच्या कुलाबा किल्ल्यात सिद्धिविनायकाचं मंदिर आहे. नवसाला पावणारा गणपती अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. सरखेल कान्होजी आंग्रे



यांनी कुलाबा किल्ला बांधल्यावर गणपती आणि भवानीदेवीची प्रतिष्ठापना केली. तेव्हापासून अलिबागनजिकच्या वेश्वी गावातील गुरव कुटुंबातील मंडळींनी आंग्रेनी देवळातील पूजा करण्यासाठी नेमणूक केली होती. आजही गुरवांचे वंशज किल्ल्यात वस्ती करून सिद्धिविनायकाची पूजा अर्चा करत आहेत. कोळी समाजाची या गणपतीवर अफाट श्रद्धा आहे. समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाताना किल्ल्याजवळून गलबतं नेली जातात. जाताना सिद्धिविनायकाला नमस्कार करूनच पुढे मासेमारीला कोळी लोक जातात. गणेशजयंतीला या ठिकाणी मोठा महोत्सव साजरा होतो. या वेळी महाप्रसादाचा लाभ अनेक गणेशभक्त घेतात. महाप्रसादासाठी लागणारे साहित्य अलिबागकर उत्स्फुर्तपणे देत असतात. सिद्धिविनायकच्या मूर्तीच्या बाजूला रिद्धी-सिद्धी आहेत. सिद्धीविनायकाचे दर्शन आहोटीच्या वेळी किल्ल्यात पायी चालत जाता येते.

# आक्षीचं निसर्गरम्य 'गावपण'



मुंबईत अनेक चौपाट्या असल्या, तरी मुंबईकरांना कोकण प्रांतातील समुद्रकिनारे नेहमीच खुणावत असतात. काहीतरी निमित्त करून मुंबईकर कोकणात धाव घेतात. नैसर्गिक वैभवाने नटलेली आणि हे वैभव जपलेली अनेक गावं कोकणात आहेत. काही परिचयाची तर काही अजूनही फारशी परिचित नसलेली. अलिबागपासून पाच-सहा किलोमीटरवर वसलेलं 'आक्षी' हे असंच एक छोटसं पण देखणं गाव. शहरीकरणाचे वारे आसपास घोंघावत असतानाही आक्षी गावाने आपलं 'गावपण' अजूनही जपलेलं आहे.



अनु.

रायगड जिल्ह्यातील दळणवळणाचं मुख्य केंद्र म्हणून एकेकाळी आक्षी या गावाचं नाव झळकत होतं. आक्षीचा समुद्रकिनारा अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक विस्तृत असल्यामुळे बोटी या किनाऱ्याला लागायच्या. दळणवळणाच्या दृष्टीने आक्षीचं महत्त्व ओळखून इंग्रजांनी १९३२ साली इथल्या खाडीवर पूल बांधला होता. यात ज्या स्थानिकांचं योगदान होतं, त्यांची आठवण देणारा एक स्तंभही या गावात आहे. निसर्गाने नटलेल्या आक्षी गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे. कान्होजी आंग्रेच्या राज्यात आक्षी हे एक प्रमुख बंदर म्हणून परिचित होतं. गावातील शिवकालीन दीपमाळा, सोमेश्वराचं मंदिर, ग्रामदेवता काळंबादेवी, गावात सापडलेले शालीवाहन काळातील शिलालेख हा सगळा दस्तावेज गावाचं ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करतो. मात्र पुढे तालुक्याचा विकास होत गेला, तसं नकाशावरून आक्षीचं नाव पुसट होत गेलं असावं.

आज अलिबागमार्गे लोक आक्षीला जातात, पण पूर्वी आक्षीमार्गे अलिबागला जाता यायचं. दूरवर पसरलेला विस्तृत समुद्रकिनारा, रुपेरी वाळू, सुरूचं बन अशा नैसर्गिक विविधतेने हे गाव नटलेलं आहे. आक्षीच्या समुद्रकिनाऱ्यावर बसून सूर्यास्त पाहताना 'निळ्या-जांभळ्या जळात केशर सायंकाळी मिळे'चा प्रत्यय येतो. एकीकडे प्रकाशदाता जलाखालच्या घरी जात असताना मागच्या बाजूने चंद्रोदय होत असतो. एकाच आकाशात सूर्य-चंद्र पाहण्याचा अनुभव आक्षीच्या किनाऱ्यावर घेता येतो.

आक्षीला थेट बसने जाता येतं किंवा बोटीने मांडव्यापर्यंत जाऊन पुढे बस किंवा टमटमने जाता येतं. समुद्रकिनारी वसलेल्या या गावात वीज आली असली, तरी विजेचा झगमगाट इथे नाही. त्यामुळे काळोख पडल्यावर चंद्राचा प्रकाश आक्षीचा समुद्रकिनारा उजळून टाकतो. गावाकडे जाणारे मुख्य रस्ते सिमेण्टचे झाले असले, तरी गावातील रस्त्यांवरून चालताना मऊसर लाल माती आणि मातीतले छोटे-छोटे दगडगोटे



अनु.

पायाला गुदगुल्या करतात. गावात दळणवळणाची आधुनिक साधनं आली असली, तरी गळ्यातल्या घुंगरांचा आवाज करत डौलात जाणारी बैलगाडी इथल्या रस्त्यावर दिसते. आकाशाला भिडलेली उंच नारळाची झाडं, चिंच, वडापिंपळासारखे वृक्ष, फुलझाडं अशा नैसर्गिक साधनसंपत्तीने हे गाव समृद्धआहे. कमर्शिअल वारे न लागल्यामुळेच इथलं नैसर्गिक सौंदर्य अबाधित आहे. मुंबईच्या जवळ असूनही आक्षी हे गाव शहरांपासून कित्येक मैल दूर वसलेल्या तळ कोकणातल्या निसर्गरम्य गावांच्या पंक्तीत जाऊन बसतं. या गावाच्या जवळ अलिबागसारखं शहरीकरणाचा स्पर्श झालेलं तालुक्याचं ठिकाण असूनही आक्षीने आपलं 'गावपण' अजूनही जपलं आहे, हे विशेष. सिमेण्टचे टुमदार बंगले आले असले, तरी कौलारू घरं, माडीवर आणि अंगणात दिसणारी वाळवणं, चिऱ्याच्या दगडांनी केलेलं बांधकाम, काळ्या कातळाचे प्राचीन दीपस्तंभ, वाडीतल्या प्रत्येक झाडाभोवती घातलेले बांध, घरामागच्या विहिरीकडून खळाळत जाणारं आणि झाडांच्या मुळांना बिलगणारं पाटाचं पाणी, एकावर एक रचून ठेवलेले नारळाचे झाप, लाकडी कुंपण, शेतजमिनीवर उगवलेली नाजूक रोपं या सगळ्या गोष्टी गावपणाची साक्ष देतात. कोकणचं वर्णन करताना गो. नी. दांडेकरांनी एका ठिकाणी म्हटलंय, 'कोकणच्या भूमीत एवढं अफाट सौंदर्य आलं कुठून ? का ते मूळचंच होतं ? पाण्याची प्रचंड मिठी पडताचक्षणी ते उन्मळून आलं...' आक्षीमध्ये फिरताना गोनीदांच्या या वाक्यांची आठवण होते.

नारळाच्या बागांमधून वाट काढत पुढे गेलं, की समोर अथांग समुद्र दिसतो. एका बाजूला दूरवर अलिबागचा किल्ला, बिर्ला मंदिर नजरेस पडतं तर दुसऱ्या बाजूला नारळाचं आणि सुरूचं बन. सूर्याची किरणं आक्षीचा समुद्र



अनु.

सोनेरी करून टाकतात. चंद्रोदय होताच आक्षीच्या किनाऱ्यावरची पांढरी शुभ्र वाळू चंदेरी भासू लागते. शुभ्र चांदण्यांनी आकाश भरलेलं असतं, तेव्हा किनाऱ्यावरची वाळू त्या प्रकाशात चमकून उठते.

ओहोटीनंतर अनेकरंगी शंख-शिंपल्यांची नक्षी पांढऱ्या वाळूवर पसरते. वाळूवर उठलेल्या लाटांच्या खुणा भरतीच्या वेळी पाणी किती बाहेर आलं होतं आणि किनाऱ्यावर लाटा कशा फिरल्या होत्या, याची साक्ष देतात. रेड कार्पेट हा शब्द आपण नेहमी उच्चारतो पण आक्षीच्या किनाऱ्यावर वाळूचं पांढरं कार्पेट असं काही पसरलंय, की नकळतच चपला हातात घेऊन आपण चालू लागतो. अलिबागच्या किनाऱ्याकडे जाताना आजकाल अधेमधे फेरीवाले भेटतात, पण सुदैवाने आक्षीच्या किनाऱ्याला अजून तरी फेरीवाल्यांचा डाग लागलेला नाही. त्यामुळेच निसर्गाचं सानिध्य इथे अनुभवता येतं.

आक्षी गावात बऱ्याच वेळा रात्री उशिरा दिवे येतात. पण दिवे नसतानाही इथले रस्ते भकास किंवा उजाड भासत नाहीत. उलट चंद्रप्रकाशात ते उजळून निघालेले असतात. थंडीची दुलई गावावर पसरलेली असते. डोक्यावर चंद्राचा दिवा, सोबतीला समुद्राचा थंडगार वारा आणि पायाखाली चंदेरी वाळू असा सीन इथे अनुभवायला मिळतो. मुंबईतील चौपाट्यांवर फेरीवाल्यांच्या लाटा उसळलेल्या असतात तर अक्सा, गोराई, मढ, जुहूसारख्या उपनगरातील बीचेसवर कायमच दहशतीचं वातावरण असतं. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या केळवे-माहीमसारख्या बीचवरही हल्ली नेहमीच गर्दी असते. पण आक्षीचा समुद्रकिनारा या सगळ्याहून वेगळा आहे...

## नागाव बीच

अक्षी बीचच्याच पुढच्या भागाला नागाव बीच असं म्हणतात. एका दिवसाच्या पिकनिकसाठी हे गाव एकदम छान आहे. इथल्या रिसॉर्टसमध्ये मिळणारा पोपटी हा पदार्थ खायला हवाच असा आहे. वेगवेगळ्या भाज्या, चिकन, मटण याला विशिष्ट मसाला लावून ते मडक्यात ठेवून शेकोटीमध्ये हे मडके भाजून केला जाणारा उत्कृष्ट खाद्यप्रकार म्हणजे पोपटी. कोकणचा हा मेवा खाल्यानंतर पोहायला जाण्यासाठीही नागाव बीच उत्तम आहे.

# अष्टागरातला विसावा



वीकएन्ड

### आक्षी-नागाव

उंचउंच पसरलेल्या सुरूच्या बनातून समुद्राची गाज ऐकू यावी, पांढऱ्या वाळूतून वाट काढत आपण तिथपर्यंत पोहोचावं, आणि मग समुद्राच्या लाटा जणू आपल्यालाच भेटायला भरभरून येताहेत, असं आपल्याला वाटू लागावं. फक्त समुद्र आणि आपण. अंगावर धावून येणारा भेळवाला नाही नि 'कुल्फी-कुल्फी' करत तुमच्याभोवती घुटमळणारेही नसतात. तुमच्याशी संवाद करीत असतो, केवळ तो अथांग सागर.

किहीम, रेवदंडा, आक्षी-नागावचा परिसर हा अष्टागर म्हणून प्रसिद्ध आहे. या अष्टागरातली किहीम, अलिबाग ही ठिकाणं आता शहरी आक्रमणाच्या विळख्यात सापडली आहेत. पण याच परिसरातले नागाव, आक्षी, कोरलईचे समुद्रकिनारे मात्र अजूनही शांत, नि:शब्द सौंदर्याचा आनंद आपल्याला देतात. माडापोफळीच्या वाड्यांमध्ये बागडण्याचा आणि वाड्यांपुढल्या कॉटेजमध्ये राहण्याचा आनंद आपल्याला इथे मिळू शकतो. इथले वळणावळणांचे रस्ते आणि नाक्यानाक्यांवर असलेल्या वाड्या, तिथे मिळणारे ताडगोळे- शहाळी आणि लज्जतदार जेवण या सगळ्याची मजा इथे आहे.

आक्षीचा समुद्रकिनारा अजूनही खूपच 'अनटच्ड' असा राहिला आहे. उजव्या हाताला अलिबागचा कुलाबा किल्ला दिसत

असतो. वाळूत स्टारफिशच्या खुणा असतात. आता पावसाळा सरत आला आहे आणि थंडी पण मस्त पडेल, अशी चिन्हं आहेत. तेव्हा अशा वेळी एखादा रविवार इथे जाण्यातली मौज न्यारीच आहे. या सफरीचं आणखी एक वैशिष्ट्यं म्हणजे इथपर्यंतचा सुखद प्रवास.

पावसाळा संपल्यामुळे आता अलिबागपर्यंत पोहोचण्यासाठी जलमार्गाचा पर्यायही खुला झाला आहे. सध्या भाऊचा धक्का ते रेवस अशी लाँचसेवा उपलब्ध आहे. काही दिवसातच गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा अशी कॅटमरान सेवाही सुरू होईल. कोणत्याही मार्गाने अलिबागपर्यंत पोहोचल्यावर तिथून सारख्या एसटी गाड्या उपलब्ध असतात किंवा नागावपर्यंतचं अंतर आठ-दहा किलोमीटरच असल्याने रिक्षानेही जाणं स्वस्तातच पडतं.

नागाव-आक्षीच्या समुद्रकिनाऱ्यांप्रमाणेच थोडं पुढे गेल्यास चौलचं दत्त मंदिर आणि शीतळादेवीचं मंदिरही बघण्यासारखं आहे. रेवदंडा किल्ल्याचे आता केवळ ढासळलेले बुरुज बघायला मिळतात. पण नागमोडी रस्त्यावरही या किल्ल्याची ढासळती तटबंदी लक्ष वेधून घेते. चौल, रेवदंड्यावरून पुढे गेल्यावर साळावचा पूल ओलांडून डावीकडे वळल्यास बिर्लाचं गणेश मंदिरही जरूर भेट द्यावं असं आहे.

ही सगळी ठिकाणं शहरापासून अवघ्या तीन ते चार तासांच्या अंतरावर असल्याने एक-दीड दिवसात तावंतवानं होऊन मुंबईत नव्या तजेल्याने परतता येतं.

अलिबागपासून आक्षी, नागाव, कोरलई-रेवदंडा या परिसरात कुठेही तुम्ही विसावा घेऊ शकता. अनेक ठिकाणी घरगुती स्वरुपात राहण्याची सोय होऊ शकते. अनेक कॉटेजांमध्ये शंभर रुपयांच्या आसपास राहण्याची सोय होऊ शकते. अशाच काही घरगुती कॉटेजेसचे संपर्क : सागर कॉटेज : एमटीडीसीकडून मान्यताप्राप्त, दरडोई शंभर रुपये निवास आणि जेवणासाठी केवळ भाजी तसंच कच्च्या मालाचा खर्च घेतला जातो. शाकाहारी-मांसाहारी दोन्ही जेवणांची सोय होते. निवासाच्या खर्चातच आचाऱ्याचा मोबदला आणि इतर खर्च अंतर्भूत असल्यामुळे ग्रुपला हे सोयीचं जातं. कॉटेजमध्ये रोझ गार्डन, वाडी अशा सर्व सुविधा आहेत. केवळ दोन माणसांसाठी निवास हवा असल्यास अडीचशे रुपये खर्च येतो. द्ू






अनु.

गेल्या काही वर्षांमध्ये अलिबाग हा सहलीसाठीचं आवडतं ठिकाण बनलं आहे. मुंबई आणि ठाण्यातली अनेक हौशी मंडळी वीकएण्डला अलिबागला जातात. मुंबईपासून जवळ असल्याने इथे गर्दी होणं स्वाभाविकच आहे. त्यामुळे शहरातला गजबजाट टाळण्यासाठी ज्यांना बाहेर जायचं असतं ते अलिबागला जाणं टाळू लागले. गेल्या चार-पाच वर्षांत अलिबागपासून काही अंतरावर असणाऱ्या निसर्गरम्य आणि शांत अक्षी-नागावला पर्यटकांची पसंती मिळू लागली आहे. या ठिकाणचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अलिबागपासून मुरुडपर्यंतच्या पट्ट्यात नागावसारख्या सोयी फार कमी ठिकाणी आढळलात.

अलिबाग मागे टाकलं की आपण खाडीने वेढलेल्या लहान डांबरी सडकेने मुरुडकडे जाऊ लागतो. हा तीन-चार कि.मी.चा परिसर एकदम मोकळा आहे. उजवीकडे सतत सोबत करत असते तिवरांची गच्च झाडी असलेली दलदल आणि डावीकडे दूरवर दिसत राहतात सागरगडाच्या डोंगररांगा. धरमतरच्या खाडीपासून अलिबागपर्यंतचा सगळाच वीस-पंचवीस कि.मी.चा मोठा पट्टा कार्लेखिंडीचा अपवाद वगळता असाच मोकळा आणि रखरखीत आहे. मात्र अलिबागहून पुढे चार-पाच कि.मी.चा पट्टा पार केला की आपण अचानक नारळी-पोफळीच्या गर्द हिरव्यागार पट्ट्यात घुसतो. सृष्टीचा अवघा कॅनव्हास क्षणार्धात बदलतो. या हिरव्यागार प्रदेशाच्या वेशीवरच वसलंय ऐतिहासिक वारसा असलेलं आक्षी हे गाव.

आक्षी आणि नागाव ही पाठीला पाठ लावलेली दोन गावं. ही गावं पर्यटकांमध्ये लोकप्रिय होण्याचं मुख्य कारण म्हणजे इथला सुरक्षित किनारा आणि निसर्गरम्य परिसर. राहण्याची उत्तम व्यवस्था होत असल्यानेही इथे येणाऱ्यांची संख्या वाढले आहे. इथल्या स्थानिकांनी आपल्या वाड्यांमधून पर्यटकांसाठी छोटी छोटी घरं बांधली आहेत. ही घरं वाडीत असल्याने निवांतपणा तर मिळतोच शिवाय एकांतही मिळतो. अंगण ही संकल्पना शहरांतून केव्हाचीच हद्दपार झाली आहे. पण गावांमध्ये आजही शेणाने सारवलेली नीटनेटकी अंगणं दिसतात. आक्षी-नागावमध्ये अशी अंगणं दिसली नसती तर नवलच. अंगणातल्या झोपाळ्यावर किंवा आरामखुर्चीत मस्तपैकी रेलून बसून आराम करण्यात जी मौज आहे ती प्रत्यक्षच अनुभवायला हवी. प्रत्येक

वाडीत केवळ एकच पर्यटकघर असल्याने बाहेरचं कुणीही तिथे येत नाही.

या घरांमध्ये रुचकर ज़ेवणही बनवून मिळतं. अंगणात बसून जेवण्यात खरंच काही औरच मजा असते. ही सगळी घरं सर्वसामान्यांना परवडतील अशा दरात उपलब्ध आहेत.

या प्रदेशाची प्राचीनता दर्शवणारा एक शिलालेख आक्षीला आहे. असं म्हणतात की हा नऊ ओळींचा शिलालेख मराठीतला उपलब्ध असलेला पहिला कोरीव लेख आहे.

चौलच्या छोट्या टेकडीवर वसलेल्या दत्तमंदिरालाही आवर्जून भेट द्यावी. या टेकडीवरून दिसणारं विहंगम दृश्य आपण कधीच विसरू शकणार नाही. एका बाजूला चौल-रेवदंड्याचा हिरवागार पट्टा आणि दुसरीकडे अथांग पसरलेला अरबी समुद्र. चौलमधलंच शितळादेवी आणि रामेश्वराचं स्थानही आपलं अस्तित्व राखून आहे. रेवदंड्याच्या जवळ असणाऱ्या साळावचं बिर्लामंदिर पाहण्यासाठीही बरेच पर्यटक येतात.

आक्षी-नागावचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथलं पक्षीजगत. इथे सहसा पाहायला न मिळणारे अनेक पक्षी सहजपणे दिसतात. विशेष उल्लेख करायचा झाला तर रेवदंड्याच्या कुंडलिका खाडीच्या किनाऱ्यावर हजारोंनी दिसणाऱ्या सागरपक्ष्यांचा म्हणजेच सीगल्सचा. डिसेंबर-जानेवारीमध्ये इथे हे पक्षी मोठ्या प्रमाणात दिसतात. या परिसरात अनेक सुंदर तळी आहेत. या तळ्यांच्या दलदलीवर अनेक प्रकारचे पाणपक्षी मोठ्या संख्येने दिसतात.

स्वतःचं वाहन असेल तर उत्तमच. पण मुंबई-ठाण्याहून अलिबागला येण्यासाठी एसटीची उत्तम सेवा आहे. गेटवे ऑफ इंडियाहून मांडव्यासाठी आणि भाऊच्या धक्क्याहून रेवससाठी मोटरलाँच जातात.

अक्षी-नागावमध्ये सहा आसनी रिक्षा मुबलक असल्याने स्थानिक प्रवास करणं अतिशय सुकर बनलं आहे.

नागावला मुक्काम करावा... पहाटे लवकर उठून तळ्यावर फेरी मारायला जावं...तिथे पाण्यावर खेळणारे पक्षी पाहावेत... कुंडलिका खाडीवरच्या सीगल्सचे हवेत झेपावणारे थवे न्याहाळावेत आणि संध्याकाळी परत नागावला येऊन तिथल्या किनाऱ्यावरच्या सुरुच्या बनात मस्त फिरावं... अप्रतिम सूर्यास्ताची शोभा न्याहाळून मुक्कामी परतावं... नागावमधलं वास्तव्य तुमच्या कायम लक्षात राहिल!





अनु.



# कॅप्टन अर्चितची कमाल

***वॉटरस्पोर्ट्‌सचा*** अनुभव घ्यायचा असेल तर बोजाबिस्तरा घेऊन गोव्याला जायला हवं असं समीकरण पूर्वी होतं. पण, मुंबईनजिक अलिबागच्या पट्ट्यात वॉटरस्पोर्ट्‌सचे एकामागोमाग एक पर्याय उपलब्ध होत आहेत. नागाव बीच, काशीद बीच, किहिम, मांडवा, रेवदांडा अशा अनेक ठिकाणी पाण्यात भरपूर खेळण्याचा आनंद घेता येतो. नागावचा समुद्रकिनारा तर गेल्या दीड-दोन वर्षांत वॉटर स्पोर्ट्‌ससाठी प्रसिद्ध झालाय. वॉटरस्पोर्ट्‌स इथे रुजवण्याचं काम केलं ते कॅ. अर्चित कर्पेने. त्याने ऑक्टोबर २०१० मध्ये नागावला याची सुरूवात केली. नागावचा किनारा म्हणजे साधारणतः २ किलोमीटर्सचा सपाट पट्टा आहे. कुठेही तो खोल नसल्याने शक्यतो रिस्क नाही. सकाळी ८ ते संध्याकाळी साधारणतः सूर्य मावळेपर्यंत जेट स्की, बनाना राइड, बम्पी राइड, स्पीड बोट, एटीव्ही, पिंट बॉल असे वॉटर स्पोर्ट्‌सचे भरपूर पर्याय उपलब्ध होतात.

याबाबत 'ॲक्वास्प्लॅश'चे कॅ. कर्पे म्हणाले की, 'यातलं थ्रिल इतकं मस्त आहे की ते एकदा तरी अनुभवावसं वाटतं. वॉटर स्पोर्ट्‌समध्ये मुंबई-पुण्याहून खास वॉटर स्पोर्ट्‌ससाठी नागावला खूप लोक येऊ लागले आहेत. विशेषतः वीकेंड्‌सना तर खूप गर्दी होते. बीचवर येणाऱ्या लोकांपैकी ८० टक्के लोक एका तरी राइडचा अनुभव घेतातच.'

**कसं जायचं?**

नागावचा बीच अलिबागपासून ८ किलोमीटर्स अंतरावर आहे. गेटवे ऑफ इंडियाहून मांडव्याला बोटीने गेलं की तिथून अलिबागला जायचं. तिथून नागावला जायला सिक्स सीटर रिक्षा मिळतात. रस्तेमार्गे जायचं झाल्यास अलिबागहून मुरुड रोडवर नागाव लागतं.



अनु.



# चौलचा मुकरी गणपती

अलिबागेहून रेवदंड्याकडे जाताना सुमारे बारा किलोमीटर अंतरावर चौलच्या अलीकडे उजव्या बाजूला मुकरी गणपतीचे मंदिर आहे. सुमारे ५० वर्षांपूर्वी हे मंदिर बांधले आहे. नारळी-पोकळीच्या दाट झाडीत रस्त्यावरून हे गणपती मंदिर अधिक उठून दिसते. जागृत देवस्थान म्हणून इथल्या रहिवाशांची या गणपतीवर मोठी श्रद्धा आहे. अलिबागहून चौलकडे जाण्यास एस.टी. बस तसंच रिक्षा आणि खासगी वाहने उपलब्ध असतात.

*मस्त कौलारू घरं.. घरासमोर नारळी-पोफळीच्या बागा.. थोडं पुढं गेल्यावर समुद्राची सतत ऐकू येणारी गाज असं एकदम रिफ्रेशिंग वातावरण अनुभवायचं असेल तर रेवदंडा मस्त ऑप्शन आहे. रेवदंडा फार लाबं नाही, अलिबागपासून केवळ १६ किलोमीटरवर.*

# ऐतिहासिक रेवदंडा

उन्हाच्या झळा वाढू लागल्यात. पावलं आपसूकच पाण्याकडे वळू लागलीत. समुद्रकिनारे आता गजबजू लागतील. किनाऱ्यालगत नारळा-पोफळीच्या बागा, निळशार पाणी सगळं कसं हवंहवंसं वाटतं. त्यामुळेच नेहमीच्या ठिकाणी न जाता जरा वेगळं ठिकाण शोधायला हरकत नाही. त्यासाठी 'रेवदंडा कोट' हे अगदी जवळचं ठिकाण.

रेवदंड्याला पोहोचण्यासाठी प्रथम अलिबाग गाठायचं. नंतर अलिबागहून रेवदंड्याला जाण्यासाठी पुरेशी बससेवा उपलब्ध आहे. अलिबागहून रेवदंडा १६ किमीवर आहे. साधारण पाऊण तासात अलिबागहून रेवदंड्याला येता येतं. या प्रवासात संपूर्ण कोकण पाहिल्याचा अनुभव घेता येतो. वेडीवाकडी नागमोडी वळणं, नारळा-पोकळीच्या गर्द बागा, टुमदार घरं, स्वच्छ सुंदर मंदिरांचा परिसर हे सारं पाहत हा प्रवास मस्त झकासच होतो. सहाव्या शतकाच्या सुमारास मौर्यांच्या राजवटीत चौल आणि रेवदंडा ही बंदरं नावारूपाला आली. तर या बंदरावरून पश्चिमेकडील देशांशी मोठ्या प्रमाणात व्यापार होऊ लागला. काही काळ चौलचा हा भाग निजामशाहीत होता. तर, पुढे पोर्तुगीज कॅप्टन सोजने इ.स. १५२८ मधे चौल रेवदंड्याचं महत्त्व ओळखून इथे किल्ला बांधला.

अलिबागहून रेवदंड्यात प्रवेश करताना डांबरी सडक गावात प्रवेश करते. ही सडक रेवदंड्याच्या किल्ल्याचे तट फोडून केलेली आहे. संपूर्ण रेवदंडा पाहायचा असल्यास आपण इथेच थांबायचं. रेवदंडा पर्यटन स्थळ झाल्यामुळे इथे घरगुती मुक्कामाची चांगली व्यवस्था होते. विशेष म्हणजे रेवदंडा गाव हे संपूर्ण किल्ल्याच्या परिघातच वसलेलं आहे. यामुळे या किल्ल्यातील बरीच जागा खासगी मालमत्ता झालीय. अनेक घरं, वाड्या, बंगले या किल्ल्यांच्या तटाशेजारी बांधलेले दिसतात. गडफेरी करताना थोडी तुटक तुटक पद्धतीने होते.

रेवदंडा किल्ल्याचं वैशिष्ट्य म्हणजे किल्ल्याच्या किनाऱ्यालगत असणाऱ्या तटांखाली भुयारी मार्ग. किल्ला बांधायच्या आधीच हा भुयारी मार्ग दगड विटांनी बांधून घेण्यात आलाय. या भुयारी मार्गात शिरायला सहा तोंड म्हणजे प्रवेशद्वार करण्यात आले होते. या भुयारी मार्गाचा शोध 'केव्ह एक्स्प्लोरर्स' संस्थेच्या सभासदांनी १९८२ जुलैमधे लावला.


साधारण तीन मीटर उंच आणि बऱ्यापैकी रुंदी असलेल्या या गुहांच्या आतील बाजूने चांगल्या कमानी आहेत. तर आतल्या बाजूस हवा खेळती राहावी म्हणून दहा मीटर अंतरावर भुयाराला झरोके पाडण्यात आले आहेत.

हे सगळं पाहत तटांच्या पलीकडे नितळ आणि स्वच्छ किनारा पाहायला मिळतो. जिथे कुंडलिका नदी सागराला मिळते त्या किनाऱ्यावर फिरायची मजाही घ्यायला हरकत नाही. समोरच सागराच्या कुशीत घुसलेला आडवा डोंगर आपलं लक्ष वेधून घेतो. हा डोंगर म्हणजे कोर्लई किल्ला होय. या किनाऱ्यावर मनमुराद आनंद लुटायचा. मग वेळ काढून कोर्लईच दर्शन घ्यायचं.



अनु.





# चौलचा राखणदार





सध्या मुंबईकरांमध्ये 'अलिबाग' वीकएण्ड डेस्टिनेशन म्हणून लोकप्रिय बनलं आहे. अलिबागचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचं ऐतिहासिक महत्त्व. प्राचीनकाळी चौल हे भरभराटीला आलेलं आंतरराष्ट्रीय बंदर होतं. वास्को द गामा, मार्को पोलो भारतात येण्याच्या अनेक वर्षं आधी जागतिक बाजारपेठेला 'चौल' हे नाव माहीत होतं. इतकं की पार्थेनॉनचं बांधकाम चालू होतं त्या काळात इथे ग्रीक आले होते. दहाव्या शतकात इथे पारशी आले होते. या सर्व घडामोडींची साक्षीदार असलेली एक वास्तू भग्नावस्थेत का होईना आज इथे उभी आहे. तो आहे या समृद्ध भूमीचं डोळ्यात तेल घालून रक्षण करणारा कोरलाईचा किल्ला आणि रेवदंड्याची कुंडलिका खाडी. मात्र याची माहिती नसल्याने इथे सर्वसामान्य पर्यटक फिरकतही नाही.

कोरलाईच्या किल्ल्याला 'आगरकोट' आणि 'पाम गार्डन कोर्ट' असंही म्हटलं जाई. त्यावेळी युरोपिअन लोक या डोंगराला 'चौलचा रॉक' म्हणून ओळखत होते. पोर्तुगिजांनी १५२० मध्ये हा किल्ला बांधायला घेतला. हे ठिकाण निवडण्याचं कारण म्हणजे या परिसरातलं हे किनाऱ्यालगतचं सर्वात उंच ठिकाण होतं.

इथून समुद्राच्या दोन बाजूंवर लक्ष ठेवणं सोपं होतं. किल्ल्याची बुलंदी दाखवणाऱ्या दोन गोष्टी त्यावेळी होत्या. किल्ल्याच्या दोन मोठ्या बुरुजांमध्ये असलेल्या प्रवेशद्वाराच्या भिंतीवर ब्राँझचा एक मोठा सिंह होता. त्याखाली संदेश लिहिला होता, 'माझ्याशी लढल्याशिवाय आत प्रवेश नाही'. तसंच बालेकिल्ल्याच्या शिखरावर एक गरूड काढला होता. तिथे लिहिलं होतं, 'माझ्या तावडीतून माशांखेरीज कुणाचीच सुटका नाही.'

किल्ला बांधायला घेतल्यापासून पुढची दोनशे वर्षं छोटीमोठी बांधकामं चालूच होती. अँण्टिनिओ बोकारो नावाच्या त्यावेळच्या रेकॉर्ड ऑफिसरच्या नोंदीनुसार किल्ल्याला दीड मैल लांब, बारा फूट रुंद आणि सात फूट उंच तटबंदी होती. किल्ल्याला जमिनीकडच्या म्हणजे उत्तर बाजूकडून जास्त धोका असल्याने या बाजूला पार किनाऱ्यापासून सात फूट खोल आणि सतराएक फूट रुंद खंदक खोदलेला होता. त्यात त्याच्या मुख्य बाजूला तीस फूट मोठे वॉच टॉवरही होते. सुरुवातीला तीनेक वर्षांत इथे एक सिटाडेल उभं राहिलं. १५३४ मध्ये फ्रान्सिस्कन पंथाच्या धार्मिक वास्तूंनी बांधकामाला सुरुवात झाली. १५४९ मध्ये डॉमिनिकन्स पंथाची धार्मिक स्थळं बांधून झाली. १६३४ मध्ये किल्ल्याच्या आत कॅथेड्रल बांधण्यात आलं. त्यावेळी किल्ल्याला समुद्राकडून आणि जमिनीकडून असे दोन मुख्य दरवाजे होते. नंतर उत्तरेकडे एक दरवाजा वाढवण्यात आला.

किल्ला मोक्याच्या ठिकाणी असल्याने किल्ल्याभोवती असंख्य महत्त्वाच्या घडामोडी झाल्या होत्या. १७३९ मध्ये वसईच्या पाडावानंतर पोर्तुगिजांना चौल रेवदंडा राखणं कठीण होऊन बसलं. त्यांनी हा किल्ला ब्रिटिशांना द्यायचं ठरवलं.

एखाद्या जागेचं भौगोलिक महत्त्व किती अबाधित राहतं हे या टेकडीवर आल्यावर कळतं. आजही ही वास्तू तेवढंच महत्त्वाचं काम करतेय. फक्त स्वरूप बदललंय. आता इथे सुरेख दीपगृह आहे. १९५९ पासून हे दीपगृह बोटींना मार्गदर्शन करतंय. या दीपगृहात आधुनिक उपकरणं आहेत. या दीपगृहातून फेकला जाणारा प्रकाशझोत ४० किमीपर्यंतच्या भागात जातो. इथल्या आठ सक्षम लेन्सेस मिनिटाला वीस फोकस देतात. त्या मिनिटाला अडीच राऊंड करतात. झोत फेकण्याच्या या पद्धतीला 'कॅरेक्टर' म्हणतात. प्रत्येक दीपगृहाचं विशिष्ट कॅरेक्टर असतं. भरकटलेल्या जहाजाला थोड्याशा निरीक्षणानंतर कॅरेक्टर ओळखता येतं. जहाजावर प्रत्येक दीपगृहाचं कॅरेक्टर, प्रदेश, त्या किनाऱ्याची इत्थंभूत माहिती, अक्षांश-रेखांशासह सूची असल्याने किनारा गाठणं सोपं जातं. इथे अत्याधुनिक ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिमही आहे. याची रेंज साधारणपणे १०० किमी आहे. हे दीपगृह सर्वांसाठी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत खुलं असतं.

कोरलईच्या उंच माथ्यावर उभं राहिलं की इथल्या अफाट निसर्गाचा सगळा खजिनाच खुला होतो. एका बाजूला रुंद कुंडलिका खाडी, तिच्या तिरावरची चौल, रेवदंडा ही गावं, दुसऱ्या बाजूला अथांग पसरलेला समुद्र... इथलं वातावरण आपल्या चित्तवृत्ती खुलवून टाकतं.



अनु.





अलिबाग, किहीम या समुद्रकिनाऱ्यांवर आता सुट्ट्यांमध्ये भरपूर झुंबड उडत असते. इथली गर्दी पाहून मग अनेक जण या अष्टागरातल्या इतर शांत किनाऱ्यांच्या शोधात असतात. सासवणे, आक्षी, नागाव इथले किनारे त्यामुळेच अनेकांना आवडतात. ज्यांच्यापाशी प्रवासाचा वेळ असतो, ते नागावच्या पुढेही जातात. नागावला कधी तुम्ही संध्याकाळपर्यंत थांबलात, तर पूर्वेकडे (डावीकडे) समुद्रात टेकडीवरुन एक प्रकाशझोत पश्चिमेच्या दिशेने पडताना दिसतो. इथेच आहे कोरलईचा किल्ला आणि तिथलं दीपगृह.

आजकाल काशिदचा किनारा लोकप्रिय होऊ लागला आहे. सुरूच्या झाडांमुळे दिवसभर सावली देणारा हा किनारा रेवदंड्याच्या पुढे आहे. या सर्व भागात अनेक लोक फिरत असूनही वाटेवरच्याच कोरलई किल्ल्याला मात्र फार कमी जण भेट देतात.

रेवदंडा सोडल्यावर डाव्या हाताला साळाव गावचं बिर्ला गणेश मंदिर आहे. साळावचा पूल पार केल्यानंतर बिर्ला मंदिराकडे डाव्या हाताला वळतात. काशिदकडे जाण्यासाठी उजव्या हाताला वळायचं. हा रस्ता फारच सुंदर आहे. संध्याकाळी उजव्या हाताला पश्चिमेचा सूर्य असतो. याच रस्त्याने थोडं पुढे गेल्यावर फणसाडचं अभयारण्य आहे. या अभयारण्यापूर्वी उजव्या हाताला एक छोटासा चढ आहे. तिथेच आहे एक सुंदर स्पॉट. इथे उजव्या हाताला कोरलई हे मच्छिमारी लोकवस्तीचं गाव आहे. या गावात शिरल्यानंतर कोरलईचा सुंदर किल्ला आहे. विशेष म्हणजे आता किल्ल्यावरच्या पायथ्याशी असलेल्या दीपगृहापर्यंत चारचाकी जाऊ शकते. स्वतःची गाडी नसेल, तर रिक्षाही जाऊ शकेल. फक्त रस्ता अरुंद आणि डोंगराच्या उतारावरून असल्याने गाडी जपूनच न्यावी. समोरासमोरून गाडी आल्यास तारांबळ उडेल. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या दीपगृहापाशी प्राचीन तोफाही आहेत. नाममात्र पाच रुपयांच्या तिकिटामध्ये हे दीपगृह पाहता येतं. कोणतंही दीपगृह पाहणं ही मोठी रंजक गोष्ट असते. मुळात समुद्रातील जहाजांना ज्या मनोऱ्यावरून मार्गदर्शन होतं, तिथून आपण विशाल क्षितिजाचं निरीक्षण करायचं, ही कल्पनाच मोठी भारी असते. सौरऊर्जेवर वीजसंचय करून रात्री प्रकाशझोत टाकणाऱ्या या दीपगृहातून पश्चिमेस समुद्र दिसतो. अलिबागचा किल्ला, खांदेरी, उंदेरी बेटं हेही आपल्या नजरेच्या टप्प्यात असतं. पूर्वेच्या बाजूस किल्ल्याची तटबंदी आणि त्यावर जाणाऱ्या पायऱ्यांची वाट दिसत असते.

कुंडलिका नदी जिथे समुद्राला मिळते, तिथे हा किल्ला उभा आहे. १६८३ मध्ये छत्रपती संभाजीराजांनी कोरलई किल्ल्यावर मोठा हल्ला चढवला होता. मात्र पोर्तुगीज शिबंदीने संभाजीराजांना यश लाभू दिलं नाही. १७३९ साली पोर्तुगीजांचं निशाण खाली खेचलं, ते पेशवे चिमाजी अप्पांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडलेल्या मराठी फौजांनी, असा उल्लेख निनाद बेडेकरलिखित दुर्गकथामधील प्रकरणात सापडतो.

साळावच्या एका पुलामुळे रेवदंड्यापासून मुरुड-जंजिऱ्यापर्यंतचा मार्ग किती सुलभपणे जोडला गेला आहे, त्याचा आवाका या किल्ल्यावरून स्पष्ट होतो. विशेष म्हणजे या सर्व परिसरात अजून तरी अतिवर्दळ नसल्याने खादाडीची दुकानं, विक्रेते यांचा त्रास नसतो. शांतता असते. परिसर इतिहास, भूगोल आणि इतर सौंदर्य न्याहाळता येतं. अर्थात, त्यामुळेच स्वतःकडे पाणी, जुजबी खाण्याचा साठा ठेवा. मात्र त्याच्या खाणाखुणा किल्ल्यात सोडू नका.



अनु.

# कोर्लई

मुरुड-अलिबाग रस्त्यालगत मुरुडपासून सुमारे २० किमी अंतरावर कोर्लई गाव आहे. या गावाला लागूनच असलेल्या परंतु समुद्रात घुसलेल्या टेकडीवर कोर्लईचा किल्ला आहे. तीन बाजुंना समुद्र आणि पूर्वेकडे कोर्लई गावाशी सलग असलेला हा किल्ला पोर्तुगिजांनी १५२० ते ३० या दशकात बांधला. समुद्राकडच्या पश्चिम बुरुजाचं नाव होतं सां दियोगु आणि खाडीकडच्या पूर्व बुरुजाचं नाव होतं सां फ्रांसीच्कू. सात दरवाजे ओलांडल्यावर बालेकिल्ल्याच्या माथ्याशी जाता येते. सुमारे दहा मीटर रुंद आणि शंभर मीटर लांबीचा असा वरचा किल्ला आहे. या किल्ल्यावर तोफाळी ठेवल्या आहेत. किल्ल्यामध्ये पाणी साठवण्याचा हौद आहे. उत्तराभिमुख 'माद्री द देऊस' हे चर्च आता मोडकळीला आलं आहे. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी एक पाषाणाचा सिंह अलंकृत केला आहे. असा हा ऐतिहासिक कोर्लईचा किल्ला आणि कोर्लई गाव स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये इंग्रजांच्या ताब्यात होते. हा भाग अलिबाग तालुक्यात येत असे. परंतु आता हा भाग मुरुड तालुक्यात येतो. कोर्लई गावातल्या रस्त्यांने किल्ल्याकडे जाता येते.





अनु.

## काशिद बीच

मुरूड-अलिबाग मार्गावर काशिद गाव लागतं. ते मुरुडपासून सुमारे वीस किमी अंतरावर आहे. काशिदच्या समुद्रकिनारी सुरूच्या झाडांचं सुंदर बन आहे. इथे खानपानाची फार चांगली सोय आहे. म्हणूनच इथे वर्षभर पर्यटकांची वर्दळ असते. मुरूडला जाणारे आणि मुरूडहून येणारे सर्वच पर्यटकांचे पाय काशिद बीचवर रेंगाळतात. रस्त्याला लागूनच समुद्रकिनारा असल्याने इथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते.

## काशीद बीच

पांढरी रेती, निळे पाणी, अनेक तलाव आणि सभोवताली हिरवाईने नटलेले डोंगर असं सुरेख समीकरण येथे पाहायला मिळतं. सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला इथून जवळ आहे. बिर्ला मंदिर आणि गणपती मंदिरही तुम्ही पाहू शकता. येथे लाटांची उंची साधारण पाच ते सहा फुट असते. ऑक्टोबर ते जून हा काशीद बीचला जाण्याचा योग्य कालावधी आहे.

-अलिबाग-मुरुड रस्त्यावर अलिबागपासून ३० किमीवर हा बीच आहे.

## काशीद

अलिबाग-मुरुड रोडवर वसलेलं काशीद हे गाव स्वच्छ सुंदर सागरकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. ३ किलोमीटर्स लांब पसरलेला हा सागरकिनारा पांढऱ्या शुभ्र वाळूंचा बनलेला आहे. इथली बहुतांश किनाऱ्यानजीक जमीन ही हॉटेलांनी व्यापली असली तरी इथल्या काही घरांमध्येही तुमची निवासाची उत्तम सोय होऊ शकते. काशीदला गेलेला बहुतांश खवय्या पर्यटक इथल्या स्थानिक कोकणी जेवणाची चव कधीही विसरत नाही.

**कसं जाल?**

अलिबाग-मुरुड रोडवर मुंबईपासून अंदाजे १६० किलोमीटर्सवर काशीद हे गाव वसलेलं आहे. मुंबईसेन्ट्रलहून निघालेली मुंबई-मुरुड बस काशीदला थांबते. ठाण्याहूनही मुरुडसाठी दिवसभर बसेसची सोय आहे. त्यामुळे मुंबईहून काशीदला जाणं सहज सोपं आहे. काशीदच्या थांब्याला उतरताच रस्त्याच्या डावीकडे वसलेल्या टुमदार गावात शिरलं की एका निसर्गरम्य ठिकाणी पोहोचल्याचा अनुभव येतो. हाच रस्ता पुढे काशीदच्या किनाऱ्याला जाऊन थांबतो.






आजकाल बरेचसे समुद्रकिनारे वर्षाखेरीस तुडुंब भरलेले असतात. ठाणे जिल्ह्यातले केळवे, अर्नाळा समुद्रकिनारे असू दे किंवा अलिबाग, किहीम, आक्षी असू देत. जेव्हा तुम्ही समुद्रकिनाऱ्यावर थर्टीफर्स्ट साजरा करणार असाल आणि तुम्हाला निवांतपणा पाहिजे असेल, तर थोडं लांब जायची तयारी ठेवायला हवी. खूप लांब नाही पण काशीदपासून सुमारे १२ किलोमीटर्स अंतरावर नांदगाव आहे. इथलं गणपती मंदिर प्रसिद्ध आहे. या नांदगावचा समुद्रकिनारा काशीदएवढा प्रसिद्ध नाही. नांदगावला राहायची सोय होऊ शकते. नवीन वर्षाची सुरुवात समुद्रकिनाऱ्यावर करू शकतो. नांदगावला पोहोचायला मुंबईतून एसटी महामंडळाच्या भरपूर बस आहेत. त्या सगळ्याच नांदगावला थांबतात. स्वतःची गाडी नसेल तरी हरकत नाही. आगाऊ तिकीट मात्र काढून ठेवा, अन्यथा उभं राहून जायची पाळी येऊ शकते. मुंबई ते नांदगाव हे अंतर सुमारे १५० किलोमीटर्स असेल.

## फणसाड अभयारण्य

मुंबईपासून जवळच असलेल्या काशीद बीचवर तोबा गर्दी होत असली, तरी काशीदला लागून असलेल्या फणसाड अभयारण्यात अजूनही फारसे लोक जात नाहीत. फणसाड अभयारण्य काशीद समुद्रकिनाऱ्यापासून फक्त १५ किलोमीटर्स अंतरावर आहे. अत्यंत घनदाट अशा या जंगलात महिला बचतगटाच्या माध्यमातून वनविभागानं वास्तव्य आणि जेवण्याची सोय केलेली आहे. तसेच अभयारण्याच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सुमारे २०० मीटर अंतरावर असलेल्या सुपेगावात काही होमस्टेसुद्धा उपलब्ध आहेत.

**फणसाडला पोहोचायला खालील पर्याय उपलब्ध आहेत**

मुंबई ते सुपेगाव साळावमार्गे साधारण १५० तर बरशिव, नांदगावमार्गे १६५ किमी होते.

- मुंबई ते मुरुड बसनं नांदगावनंतर उसरोली फाट्यावर उतरून रिक्षा किंवा महामंडळाच्या बसनं सुपेगाव गाठता येतं.
- कोकणात जाणाऱ्या काही ट्रेन रोह्यात थांबतात किंवा पनवेलहून रोह्यासाठी पॅसेंजर ट्रेन आहेत. त्यानं रोह्याला उतरायचं. रोहा बस डेपोमधून सुपेगावमार्गे मुरुड गाडीनं सुपेगाव गाठायचं.
- भाऊचा धक्का किंवा गेट वे ऑफ इंडिया इथून मांडवामार्गे अलिबाग आणि पुढे मुरुड गाडी पकडून उसरोलीमार्गे सुपेगाव असा जरा साहसी प्रवास करू शकता.

## फणसाड अभयारण्य

पावसाळ्यात जंगलात फिरायची मजा काही औरच! त्यात ते जंगल मुंबईपासून अवघ्या सव्वाशे किलोमीटरवर असेल, तर आणखीनच धमाल. जंगलातील शांतता आणि त्या शांततेत अधिकच मंजुळपणे उमटणारे पक्ष्यांचे आवाज, मध्येच एखादा बिबळ्या दिसण्याची शक्यता! हे सगळं अनुभवायचं असेल, तर तुम्हाला जायला हवं अलिबागजवळच्या फणसाड अभयारण्यात. अलिबागपासून सुमारे २५-३० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या फणसाड अभयारण्यात धनेश, खंड्या, पिट्टा अशा पक्ष्यांच्या १४८ प्रजाती आहेत. त्याचबरोबर बिबळ्या, रानमांजर, सांबार, भुंकणारे हरिण असे प्राणी, फुलपाखरांच्या प्रजाती आणि काही विषारी-बिनविषारी सापांच्या प्रजाती आढळतात. पक्षीनिरीक्षकांची पसंती कर्नाळा अभयारण्यानंतर असते, ती फणसाड अभयारण्यालाच!

या अभयारण्याला भेट देण्याचा फायदा म्हणजे जवळच असलेला काशिद बीच. दिवसभर जंगलात निसर्गाच्या हिरवाईचा आस्वाद घेतल्यानंतर संध्याकाळी मावळणाऱ्या सूर्याची भगवी छटा अनुभवण्याची मजा जास्तच असते.

### कसे जाल?

0 मुंबईहून मुरुड बस पकडून फणसाडला उतरता येतं.

0 तुमची स्वतःची गाडी किंवा बाइक असल्यास उत्तम.

0 मुंबईहून रेवसपर्यंत लाँचने-तिथून पुढे बसने अलिबाग-अलिबागहून टमटमने फणसाड (लाँच पावसाळ्यात बंद असते)





अनु.

अलिबाग व मुरुड येथील फणसाड अभयारण्यातील धबधबेदेखील पर्यटकांचे आकर्षण होत चालले आहे. अलिबागपासून ३० कि.मी. व मुरुडपासून २० कि.मी.वर असलेल्या फणसाड अभयारण्यातल्या धबधब्यांनाही पर्यटक भेट देतात. धबधब्यात भिजण्याच्या मजेबरोबरच अभयारण्याची सैर करता येते. तसेच मुरुड व काशीदच्या समुद्रकिनाऱ्यावरही भटकंती करता येते. फणसाडमध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था विनंतीवरुन होऊ शकते.

## सृष्टीवेध

# फणसाडचं वैभव





समुद्राच्या लाटा अंगावर घेत आपण हळूहळू पुढे सरकत असतो. समुद्र आणि वाळूला खेटूनच एक डांबरी रस्ता जातो. मुंबईपासून जवळच असलेलं आणि अलीकडे अनेक पिकनिकर्सचं ठिकाण बनलेलं अलिबाग पार केल्यावर जी किनारी गावं लागतात, त्यातून ही मार्गक्रमणा सुरू असते. पूर्वापार परिचित झालेल्या अष्टागरातील रेवदंड्याचा भुईकोट पार केला की, कोरलईच्या किल्ल्यावरचं मनोरम दीपगृह... सभोवताली हे असं धन भरलेलं असतानाच रस्ता अलगद वर उचलला जातो आणि आपण एका घनगर्द जंगलात शिरतो. काशिदचा सदासावली देणारा किनारा किंवा मुरुड-जंजिऱ्याकडे जाताना अनेकांनी या जंगलाचा थोडाफार फील घेतलाही असेल. हे आहे फणसाडचं अभयारण्य. शेजारी अरबी समुद्र, आजूबाजूला खडकाळ भूभाग, मोठी माळरानं, भातशेतीची जमीन असे विविध प्रकार एकत्र नांदणारं जंगल हे फणसाडचं वैशिष्ट्य.

आपल्याकडे समुद्राच्या जवळ असं वैविध्याने नटलेलं जंगल आढळण्याचं प्रमाण तसं विरळा. शिवाय शहरी भागांपासून जवळ असूनही इतकं सृष्टीधन टिकवून ठेवणारं अरण्यही कमीच पहायला मिळतं. पण फणसाडच्या अभयारण्यात मात्र केवळ जमिनीचे विविध पोतच नव्हे, तर पशु-पक्षी, कीटक यांचेही विविध प्रकार पहायला मिळतात. गेल्या काही वर्षांत अनेक पर्यावरण अभ्यासक इथे निसर्गवाचनासाठी नियमित जातात आणि आल्यावर त्यांना दरवेळी काहीतरी नवीनच गवसल्याचा आनंद मिळालेला असतो. रायगड जिल्ह्यात सुमारे ५२ चौरस किलोमीटरच्या परिसरात पक्ष्यांच्या १६४ प्रजाती आहेत, तर किमान २५ प्रकारचे प्राणी आहेत, असं इथे नेहमी जाणारे बीएनएचएसचे अभ्यासक निखिल भोपळे सांगतात. इथे असलेलं पशुपक्ष्यांचं धन हे महाराष्ट्रातल्या अन्य कोणत्याही अरण्याइतकंच संपन्न आहे, याची माहिती देताना ते सांगतात की, भीमाशंकरच्या जंगलात महाराष्ट्राचा राज्य प्राणी शेखरू आढळतो, पण तेच शेखरू इथेही आढळतं. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानानंतर एवढ्या पट्ट्यात कुठे न आढळणारं सांबर इथे आढळतं. बिबटेही इथे सापडले आहेतच. सर्पांचे विविध प्रकार इथे पहायला मिळतात. कोकण ते कोल्हापूर या पट्ट्यामध्ये केवळ १०० गिधाडं उरली आहेत, असं एका अभ्यासात समोर आलं होतं. पण या जंगलात मात्र पांढरी पाठ असलेली गिधाडं मोठ्या संख्येने पहायला मिळाली आहेत. अलीकडेच अशी सात



अनु.

**नैसर्गिक संपत्तीचं वरदान लाभलेलं फणसाडचं जंगल हे कोकणाचं एक वैभव आहे. ते जतन करायचं तर आतापासूनच त्याच नियोजन कठोरपणानं करायला हवं...**



गिधाडं दिसली होती. काही वर्षांपूर्वी तर एका मृत म्हशीवर १०० गिधाडं ताव मारताना दिसली होती. याचाच अर्थ हा की इथे निसर्गातील टाकाऊ वस्तूंची विल्हेवाट लावण्यासाठी निसर्गचक्रातील उपजत यंत्रणाही योग्य रीतीने कार्यरत आहे. बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सुमारे दीडशे प्रजातींची फुलपाखरं आढळतात. फणसाडमध्येही फुलपाखरं आहेत. कलरसार्जन्ट हे ईशान्य भारतात सापडणारं फुलपाखरू इथे सापडलं होतं. या परिसरात खवले मांजरही सापडल्याचं या परिसरात कीटकांच्या अभ्यासासाठी अनेकदा येणारे डॉ. अमोल पटवर्धन सांगतात.

तर एकूणच या जंगलाच्या वैविध्याबद्दल बरंच काही सांगता येईल. पण आज कोणतीही जंगलं ज्या धोक्यापासून सुटलेली नाहीत, तोच धोका या जंगलालाही आहेच. या जंगलातही वृक्षतोडीचे प्रकार वरचेवर निदर्शनास येत आहेत. (छायाचित्रात त्याचा दाखला मिळतोच.) अंजनीसारखे उंच प्रदेशात आढळणारे वृक्ष इथे आहेत. एकदा तर इथे चंदनाचे झाड म्हणून एक बोर्डही लावलेला होता. पण बहुधा हा बोर्ड लावल्यानंतर असेल कदाचित पण हे झाडच दिसेनासं झालं, असं इथले प्रत्यक्षदर्शी सांगतात. परिसरात वेळास्ते गावाच्या वर भरपूर वृक्षतोड झाल्याच्या तक्रारी आहेत. इथेही शिकारीच्या घटना समोर आल्या आहेत. २७ पाणवठे असलेलं बारा महिने पाण्याचे जंगल आहे. पण आज इथेही पाण्याऐवजी अन्य द्रव्याच्या बाटल्यांचे खच पहायला मिळतात. आता आतमध्ये वाहनांची ये-जा वनखात्याने थांबवली आहे, याचं सर्वांनी स्वागत केलं आहे. पण आतमध्ये रेस्टहाऊसचं बांधकाम सुरू आहे, त्यावर अनेकांचा आक्षेप आहे. पूर्वी रहायला जागाच नव्हती, त्यामुळे लोकही कमी यायचे. पण आता जर निवासाची मोठी व्यवस्था झाली, तर त्याचा भार जंगलाला पेलवणार आहे का, असा एक मतप्रवाह आहे. तर दुसरा मतप्रवाह असा की, जंगलातला हा ठेवा पाहण्यासाठी लोकांना उपलब्ध व्हायला हवा आणि त्यामुळे निवासाची व्यवस्था करण्यात गैर काही नाही, मात्र त्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने व्हायला हवं. हा असा प्रश्न प्रत्येक जंगलाच्या बाबतीतच येत आहे. कर्नाळा अभयारण्याच्या तोंडाशीच काही वर्षांपूर्वी उभ्या राहिलेल्या उपाहारगृहांनी आपला पसारा वाढवत नेला. पण ती तोडण्याचं धाडस वनखात्याने दाखवलं. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात काही भाग निषिध्द करण्यात आल्यानंतरही तिथे हातभट्टीचे गुत्ते अधिकच जोरात सुरू झाले. त्यामुळे जंगल पूर्णपणे नो मॅन्स लॅन्ड बनवल्यास ते साध्य न होता उलट काही मोजकी मंडळी ते आपल्या हितासाठी वापरत असतात, असेही प्रकार घडले आहेत. फणसाडचं वैभव अशाच निर्णायक टप्प्यावर आता उभं आहे. महामुंबईच्या पसाऱ्यात आता रायगड जिल्ह्याची गावंही आली आहेत. रस्ते, वाहतूक वाढत आहे. लोकांचं पर्यटन वाढणार आहे. पण आजही आपल्याकडे इको-टुरिझम ही संकल्पना सरकारी पातळीवरून प्रत्यक्षात उतरल्याचं फारसं पहायला मिळत नाही. उद्या इथेही लोक झुंडीने आत येऊन शेखरू किंवा सांबराला प्लॅस्टिकच्या पिशवीतून चणे-दाण्याचा खाऊ नेण्याचे प्रकार करणार नाहीत कशावरून? या भीतीपोटी इथे माणसांना रोखा, असं म्हणणं खचितच योग्य ठरत नाही. पण अशा नाजूक जंगलांसाठी काही विशिष्ट नियोजन नक्कीच करावं लागेल. कर्नाळ्यातून मुंबई-गोवा महामार्ग जातो. या मार्गाच्या रुंदीकरणासाठीही जंगलाचा बळी न देता काय पर्याय देता येईल, याचा सध्या विचार सुरू आहे. फणसाडचंही वैभव टिकवायचं, तर आतापासूनच त्याचं नियोजन करावं लागेल. पर्यटन, अरण्यवाचन, निसर्गनिरीक्षण, संवर्धन या सर्व गोष्टींमध्ये गल्लत न करता हे वैभव जपावंच लागेल.

## अभयारण्यात राहायचंय?

वनखात्याने बांधलेल्या विश्रामगृहात सोय होऊ शकते.

संपर्क : उपनवनसंरक्षक वन्यजीव विभाग ठाणे, तीन हात नाका.

टेलिफोन : २५४०२५२२.

**जेवणाची सोय :**

सोबत शिधा नेल्यास उत्तमच. पण जवळच्या सुपेगावात जेवणाची सोय होऊ शकते. (पूर्व चौकशी आवश्यक)

*फणसाड अभयारण्य संरक्षित क्षेत्र असल्यामुळे तिथे जाण्यासाठी वनविभागाची पूर्वपरवानगी घेणं आवश्यक.*

# समुद्राकाठचं अभयारण्य


रमणीय सागरकिनारा एकीकडे अन् लगतच डोंगराळ भागात दाट जंगलराईचं अभयारण्य... अशा वातावरणात रमायचं असेल तर मुरूडजवळील फणसाड अभयारण्य गाठायला हवं. मौजमस्तीसाठी गजबजलेल्या बिचेसवर न जाता थोडासा आडवळणाचा, शांततेचा आणि जंगलाचा अनुभव घ्यायचा तर मग फणसाडसाठी वाट वाकडी करायला काहीच हरकत नाही. अलिबाग-मुरूड मार्गावरील नांदगावपासून दोन किमीवरच्या सुपेगाव फाट्याने छोटासा घाट चढू लागल्यावर शहरी वतावरण मागे पडतं. ७-८ किमी नागमोडी रस्ता केला, की आपण पोहोचतो, ते फणसाड अभयारण्याच्या प्रवेशद्वारासमोरच.

कधी काळी जंजिरा संस्थानाच्या नवाबाचं खासगी शिकार क्षेत्र असणारे हे जंगल १९८६ मध्ये फणसाड





अभयारण्य म्हणून घोषित झालं. तब्बल ५३ चौ. किमी क्षेत्रफळाच्या झाडाझुडपांच्या, वेलींच्या जंजाळातून फिरण्यासाठी वनखात्याने इथे चांगले जंगल ट्रेल रूट्स तयार केलेत. प्रामुख्याने पाणवठ्यांच्या जागांपर्यंत (स्थानिक भाषेत गान) हे रूट्स आपल्याला घेऊन जातात, तर इतर काही अखबं जंगल भेदून जातात. सेमी डेन्स आणि एव्हरग्रीन असे काही




मिश्रस्वरूपाचं हे जंगल आहे. त्यामुळेच अभयारण्यात आढळणारे वन्यजीवन, पक्षी जीवनही याच स्वरूपात आहे. तब्बल १६० जातींचे पक्षी हे या अभयारण्याचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. तर बिबळ्या, तरस, भेकर, डुक्कर आदी वन्यजीवांचा वावरही या अभयारण्यात आहे. महाराष्ट्राचा राज्यपक्षी हरियल आणि राज्यप्राणी शेकरूचं तर इथे हमखास दर्शन देतो. त्याचबरोबर दुर्मिळ होत असलेल्या गिधाडांचं दर्शनही काही निसर्गप्रेमींना नुकतंच घडलंय. इथे आढळणारी तब्बल पाच फुटापर्यंतची गारंबीची शेंग हे आणखीन एक वैशिष्ट्य.

या जंगलाचा अनुभव घ्यायचा तर काही पथ्यं मात्र पाळली पाहिजेत. नेचर ट्रेल रूट्सवरून पायपीट करायची तयारी हवी. गोंगाट न करता पाणवठ्यांवर शांतपणे मौजमस्तीसाठी बसायला हवं. मद्यपान, धुम्रपान, सामिष आहार आदी कटाक्षाने टाळावं लागेल. पायपीट करायची नसेल तर मग वनखात्यांने बांधलेल्या टॉवर्सवर चढून पार क्षितिजापर्यंत पसरलेल्या वनराईचं मोहक रूप न्याहाळता येईल.

सदाहरीत असणारी आणि फेब्रुवारी-मेमध्ये फुलणारी नाजूक निळीशार अंजनीची फुलं, इतरत्र क्वचितच आढळणारी सीता अशोकाची फुलं, सायलीच्या पांढऱ्या चिमुकल्या फुलांचा सडा अशा वातावरणाने आपण नक्कीच रिचार्ज व्हायला होतं. जाता जाता अभयारण्याच्या सीमेवर वसलेल्या सुपेगावाजवळील देवराई आपल्या आनंदात आणखीनच भर घालते.

# नागोठणे

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते नागोठणे | | | | | 94 | | | | |
| **1** | अष्टविनायक वरदविनायक | | | | मंदिर | 50 | NE | | | |
| **2** | अष्टविनायक बल्लाळेश्वर | | | | मंदिर | 15 | E | 38 | SW | |
| **3** | सुधागड/भोरपगड/भोराईचा डोंगर | | किल्ला | ट्रेक | मंदिर | 26 | E | 11 | E | |
| **4** | अवचितगड | | किल्ला | ट्रेक | | 13 | SW | 33 | SW | |






अनु.

## श्री वरदविनायक ( महड )


गुत्समद ऋषींना आणि अर्थातच सर्व भक्तांना वर देणारा विनायक म्हणजेच श्री वरदविनायक. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात महड गावामध्ये श्री वरदविनायक विराजमान आहेत. मंदिर पूर्वाभिमुख असून पश्चिमेला देवाचं तळं आहे. गाभाऱ्यात दगडी महिरपी नक्षीदार सिंहासनावर श्री वरदविनायकाची मूर्ती आहे. मूर्ती डाव्या सोंडेची असून बैठी आणि पूर्वाभिमुख आहे. मनोवांछित वर देणारा वरदविनायकाच्या देवळातील नंदादीप इ.स.१८९२पासून म्हणजे गेली ११६सोळा वर्षं अव्याहत तेवत आहे, असं सांगतात.





## श्री बल्लाळेश्वर ( पाली )

भक्त बल्लाळाच्या नावाने प्रसिध्द पावलेला आणि उपरणं, अंगरखादी वस्त्रे परिधान केलेला अष्टविनायकातील हा एकमेव गणपती. भक्त बल्लाळाला ब्राह्मणाच्या वेशात दर्शन दिल्याने इथला विनायक वस्त्रे ल्यायला आहे असं म्हणतात. हे स्थान अत्यंत जागृत मानलं जातं. रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात नागोठणे गावाजवळ पाली हे गाव आहे. मंदिर 'श्री'कारी धाटणीचं असून दोन गाभारे आहेत. बाहेरील गाभाऱ्यात दोन पायात मोदक घेऊन बल्लाळेश्वराकडे पाहाणारा चांदीचा उंदीर आहे. आतील गाभाऱ्यात दगडी सिंहासनावर श्री बल्लाळेश्वराची पूर्वाभिमुख मूर्ती आहे. डोळ्यात आणि नाभीमध्ये हिरे असून मागील चांदीच्या प्रभावळीत ऋध्दी-सिध्दी चवऱ्या ढाळीत असलेल्या दिसतात.



सह्याद्रीतल्या किल्ल्यांमध्ये 'सुधागड' आपलं स्वतंत्र अस्तित्व आणि ओळख समर्थपणे टिकवून आहे. फार कमी जणांना हा ऐतिहासिक आणि भौगोलिक संदर्भ माहीत आहे. मराठ्यांच्या राजधानीच्या ठिकाणासाठी महाराजांनी जवळजवळ हे ठिकाण निश्चित केलं होतं. गडावरची विस्तृत सपाटी हे त्यातलं महत्त्वाचं कारण असावं. त्यादृष्टीने त्यावेळच्या प्रमुख विचारवंतांनी या परिसराची कसून पाहणीही केली होती. पण शेवटी निवड झाली ती रायगडाची. त्यावेळची मोगलांबरोबरच्या झगड्याची व्याप्ती लक्षात घेतली तर या ठिकाणचा राजधानी म्हणून केलेला विचारच या ठिकाणाची भौगोलिक समर्थता दाखवतो.

महाराजांच्या अमदानीत १६४८ मध्ये हा किल्ला नारो अप्पाजी यांनी मुघलांकडून जिंकून स्वराज्यात आणला. या किल्ल्याला आणखी एक ऐतिहासिक संदर्भ आहे. औरंगजेबाच्या मुलाने, शाहजादा अकबरने, बापाशी म्हणजे औरंगजेबाशी फारकत घेऊन मोगलांची छावणी सोडली



सुधागडच्या डोंगराचा घेर प्रचंड असल्याने पायथ्याचा परिसरही विस्तृत आहे. पायथ्याला नाडसूर, धोंडसे आणि वैतागवाडी अशी तीन गावं आहेत. यातल्या कुठल्याही गावातून गडावर जाता येत असलं तरी वैतागवाडीहून गडाच्या मुख्य वाटेला जाणारी पायवाट बऱ्यापैकी सोयीची आहे. पहिल्या अर्ध्या तासाची सपाटीवरची चाल सोडली तर गडापर्यंत जाणारी वाट गर्द रानातून जाते. मधला अर्ध्याएक तासाचा टप्पा प्रचंड दगडधोंड्यांचा आहे. साधारण पाऊण टप्पा पार केला की वाटेच्या बाजूलाच डावीकडे पाण्याची टाकी आहे. इथे कातळात कोरलेली 'बहिरोबा'ची प्रतिमा आहे.

गडावर रमतगमत जायला अडीच ते

# भोराईच्या किल्ल्यावर

आणि तो मराठ्यांना येऊन मिळाला. त्यावेळी त्याने याच परिसराचा आसरा घेतला होता. त्याने या गडाच्या धोंडसे आणि नाडसूर परिसरात दीर्घकाळ आपली छावणी टाकली होती. हा परिसर सह्याद्रीच्या ऐन गाभ्यातला आहे. त्यावेळी त्याच्याबरोबर त्याचे विश्वासू मिर्झा यहुद्दीन शुजाई, वकील अब्दुल हमीद आणि दुर्गादास राठोड अशी मोगलांच्या बाजूची नामवंत मंडळी होती. ही घटना संभाजीराजांच्या काळातली आहे आणि ही घडामोड या प्रदेशाचं बेलागपण ठसठशीतपणे दाखवते.

या जागेचं आणखी एक महत्त्व म्हणजे भोर संस्थानच्या पंत सचिवांच्या कुलदेवतेचं, भोराईदेवीचं देऊळ गडावर आहे. इथे अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून दशमीपर्यंत मोठी जत्रा भरते. त्यामुळे या किल्ल्याला 'भोराईचा किल्ला' असंही म्हटलं जातं. काही ठिकाणी या किल्ल्याचा उल्लेख 'घेरा सुधागड' असाही करण्यात आला आहे.

भ्रमंती





अनु.



ोन तास लागतात. सगळा चढ अजिबात ंगावर येणारा नाही. गडाच्या सगळ्या तारांवर प्रचंड रान असून यात भेकरं, ोल्हे, माकडं आणि तुरळक प्रमाणात स्वलंही आहेत.



गडावर प्रचंड मोठी सपाटी असून या सपाटीवर मध्येमध्ये दाट जंगलाचे पुंजके आहेत. गडमाथ्यावर मोकळ्या जागेत भोराईदेवीचं चांगलंच मोठं आणि बऱ्यापैकी स्थितीत असलेलं देऊळ आहे. देवळाच्या गाभाऱ्याबाहेरच्या मंडपात पंचवीसेक जण सहज मुक्काम करू शकतात. बाहेरच्या पटांगणात शेकोटीभोवती बसून मोकळ्या वाऱ्यात गप्पाही मारता येतात. देवळापासून पाच मिनिटं चालत जाण्याच्या अंतरावर पण गर्द झाडीत पंतप्रतिनिधींचा त्यावेळी बांधलेला मोठा वाडा आहे. आता हा वाडा पडक्या स्थितीत असला तरी त्याच्या ओसरीत पंचवीसेक जण सहज राहू शकतात. वाड्याला मोठं कूस असल्याने सुरक्षितही वाटतं. या दोन्ही ठिकाणांपासून पाच ते दहा मिनिटांवर एक मोठं तळं आहे. पण इथलं पाणी पिण्यायोग्य नाही. त्यामुळे इथे मुक्काम करायचा असल्यास सोबत पिण्याच्या पाण्याचा भरपूर साठा हवाच.

गडाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथे भरपूर प्रमाणावर साप आहेत. इतके की इथे परंपरेने 'अजिबात नांगरट करायची नाही', असा जणू अलिखित नियमच आहे. जो इथे नांगरट करेल त्याचा निर्वंश होईल, असा इथल्या स्थानिकांचा समज आहे. त्यामुळे रात्रीच्या शेकोटीसाठी किंवा जेवणासाठीचा लाकूडफाटा दिवसाच्या उजेडातच करावा. मुक्कामाच्या जागेची, त्यातही कोपऱ्यांची काटेकोरपणे तपासणी करून मगच तिथे राहावं.

नाडसूरला जाण्यासाठी ठाण्याहून सकाळी थेट बस आहे. याव्यतिरिक्त पालीहून बसने किंवा सहा आसनी रिक्षाने जाता येतं. गडावर लोणावळा-आंबवणे, तैलबैला करत 'वझरी'च्या खिंडीतून नाडसूर गाठता येतं. तसं मुळशी-पवना खोऱ्यातल्या जंगलातूनही हा परिसर गाठता येतो. मागतले इथले काही विस्तृत प्रदेश आजही निर्जन असल्याने अत्यंत माहितगार असणारा स्थानिक सोबत असणं आवश्यक आहे.



अनु.




घाटमार्गानं देशावरुन कोकणात उतरताना सह्याद्रीतल्या विविध गिरीशिखरांची आणि विशेषत: सुधागडची विविध रूपं न्याहाळता येतात. आडवाटेवरची अज्ञात शिल्पं न्याहाळणं म्हणजे भटक्यांसाठी बोनस ठरतो. या गडाला आजही पंचक्रोशीत भोराईचा डोंगर या नावानेच ओळखलं जातं.

महाराष्ट्रात अनेक किल्ले आजही इतिहासाचे मूक साक्षीदार बनून सह्याद्रीमध्ये वर्षानुवर्षे उन, वारा, पाऊस झेलत ताठ मानेनं उभे आहेत. बऱ्याच ऐतिहासिक घटनांची साक्ष देत 'भोरपगड उर्फ सुधागड' हा त्यापैकीच एक! सह्याद्रीच्या कडेकपारीत, आडवाटांवर फिरुन किल्ल्यांचं विविध दिशांनी दर्शन घेताना त्याचं स्थान चारही दिशांनी किती महत्त्वाचं आहे हे कळतं. देशावरुन कोकणात उतरणाऱ्या घाटवाटांवर पहारा करत उभा असलेला हा किल्ला आणि त्याच्या आसपास पसरलेला प्रदेश असा एक छान ट्रेक करता येतो.

सुधागडला जाण्यासाठी भटके पालीमार्गे जाणं पसंत करतात. थोडीशी आडवाट निवडली तर प्राचीन घाटमार्गानं देशातून कोकणात उतरताना सह्याद्रीतील विविध गिरीशिखरांची आणि विशेषतः सुधागडची विविध रूपं न्याहाळता येतात. आडवाटेवरची अज्ञात शिल्पं न्याहाळणं म्हणजे भटकंती मधला बोनस असतो. सुधागडला जायचं असल्यास किमान दीड ते दोन दिवसांचा अवधी आपल्या हाती असला पाहिजे. पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या सुधागडला देशावरून उतरण्यासाठी चार वाटा प्रचलित आहेत. त्यापैकी 'वाघजाई' घाटानं कोकणात नाडसूर या गावी पोहोचून तिथूनच जवळ असलेल्या सुधागड किल्यावर जाता येतं. या आडवाटेवर जाण्यासाठी पुण्याहून जायचं असेल तर तैलबैला या गावी पोहोचायचं. त्यासाठी स्वारगेटवरून दुपारी तीन वाजता 'तैलबैला' अशी थेट बस उपलब्ध आहे. आपण तैलबैलाच्या परिसरात पोहोचताना घनगड आणि तैलबैलाच्या भिंती आपलं लक्ष वेधतात.

तैलबैलाच्या पायथ्याशी मुक्काम करून सकाळी उठून धुक्यात हरवलेल्या तैलबैलाचं दर्शन घ्यायचं.



अनु.



कोवळ्या किरणांनी उजळून निघालेल्या सुधागडला बघून तैलबैलाला लागून असणारी वाघजाई घाटाची वाट पकडायची. सुरुवातीलाच वाघजाईचं छोटंसं मंदिर आहे. त्याच्या शेजारून वाघजाई घाट जातो. डाव्या हाताची वाट पकडून उतरणं चालू ठेवायचं. घाट उतरताना कोकणातील दमट हवा जाणवते. सुधागड आपल्या नजरेच्या टप्प्यातून गेलेला असतो. तैलबैलाच्या भिंती आपल्या डोक्यावर असल्यानं त्या अधिकच अक्राळविक्राळ भासतात. या घाटात 'ठाणाळे लेणे' हे अपरिचित गिरीशिल्प लपलेलं आहे. या लेण्या इसवी सन पूर्वी पहिल्या शतकात खोदल्या असाव्यात असा अंदाज आहे. आपल्याकडे वेळ असल्यास त्या लेण्याही आवर्जून पाहाव्यात. तीन तास चालून वाघजाई घाट उतरल्यावर ठाणाळेमार्गे नाडसूर या गावातून सुधागडचं दृश्य मनमोहक असतं. त्याच्या बाजूला दिसणारा पालीचा सरसगड पगडी घालून बसल्यासारखा दिसतो. नाडसूरमधून सुधागडच्या पायथ्याच्या धोंडसे गावी पोहचावं लागतं. इथून दगडी पायऱ्यांच्या मार्गानं गडावर पोहोचता येतं. झाडीतून जाणारी ही वाट सुखद अनुभव देणारी आहे. या वाटेनं वरती पोहोचण्यासाठी अडीच तीन तास लागतात. तैलबैला जवळून उतरणारा सवाष्णीचा घाट हा आपल्याला याच मार्गावर घेऊन येतो. इथून गडाच्या गोमुखी पद्धतीच्या महादरवाजातून प्रवेश करत आपण थेट भोराई देवीच्या मंदिरात पोचतो. तसंच अजून एक रस्ता हा पाच्छापूरमार्गे येतो.

भोरपगड असं नाव असलेल्या या किल्ल्याचं सुधागड हे नाव शिवाजी महाराजांनी ठेवलं. सुधागडच्या पायथ्याशी असलेल्या पाच्छापूर गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे. पातशाहपूर या नावाचा तो अपभ्रंश आहे. याच गावात संभाजी महाराज आणि औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर यांची भेट झाली होती.

सुधागड किल्ल्याच्या पठाराचे तीन भाग होतात. वाड्यासमोरील पश्चिमेकडील पठार हा पहिला भाग. या परिसरात मोठ्या प्रमाणात वास्तूंचे अवशेष दिसतात. इथंच तलाव आणि मोठी टाकी आहेत. दुसरा भाग म्हणजे, भोराई देवीचं मंदिर आणि टकमक टोकापर्यंत असलेला परिसर. या निमुळत्या असलेल्या भागात भव्य कोठारांचे अवशेष आहेत. पूर्वेकडील परिसराच्या तिसऱ्या भागात एक विशाल बुरुज असून, वाढलेल्या जंगलात काही अवशेष आढळतात. पाच्छापूरमार्गे येणाऱ्या रस्त्याला लागून पुढे गेल्यावर अजून एक पठार लागतं. इथं तलाव डाव्या बाजूला आणि तैलबैलाला समोर ठेवून सरळ गेल्यावर दहा मिनिटात एक वाडा येतो. सुधागड किल्ल्यावर असणारा पंत सचिवांचा सरकारवाडा हा इ.स. १७०५ साली बांधलेला आहे. दोन दरवाजे असलेला वाडा ऐसपैस आहे. दोन बंद खोल्या आणि एक माडी आहे. वाड्याच्या बाजूस एका छोट्या घरात वाड्याची देखभाल





अनु.

करणाऱ्या आजींचे कुटुंब वाडा स्वच्छ ठेवण्याचं काम करतं.

पश्चिमेकडील पठार म्हणजे पाच्छापूरकडून वाड्याकडे जाताना डाव्या बाजूचा परिसर. इथं खूप वस्तूंचे अवशेष आणि जोती दिसतात. वाड्याच्या आवारातून बाहेर पडून सरळ चालत गेल्यावर टोकावरून आपल्याला सरसगड आणि वातावरण स्वच्छ असल्यास कर्नाळा दिसतो. या पठारावर मोठा तलाव आहे. तसंच टोकावरून फिरत पाच्छापूरकडे उतरणाऱ्या वाटेकडे गेल्यावर दगडी पायऱ्या दिसतात. सुधागडावरील मुख्य प्रवेशद्वार म्हणजे महादरवाजा. हा दरवाजा म्हणजे रायगडावरील महादरवाजाची प्रतिकृतीच वाटतो. दोन भव्य बुरुजांनी संरक्षित प्रवेशद्वारावर दोन सुंदर कोरलेले शरभ आहेत. आजही दरवाजावरचं बरंच नक्षीकाम शाबूत आहे. या महादरवाजामध्ये बंदुकींसाठी जंग्या आहेत. बुरुजावर उभे राहून पुढील घळीतून येणारा शत्रू सहज टप्प्यात येतो अशी व्यवस्था करण्यात आली होती. दरवाजात दोन देवड्या आहेत. तसंच चौकटीत खाली पाणी वाहून जाण्यासाठी वाट आहे. महादरवाजाच्या विस्तृत परिसरात तटबंदीच्या बाजूनं फिरता येतं. डावीकडील बाजूनं फिरत गेल्यास झाडाझुडपातून भोराईच्या पठार लागतं. उजवीकडील वाट बंद असून ती पूर्व बुरुजाकडे जाऊन मिळते. महादरवाजातून खाली उतरल्यावर अजून दोन दरवाजे पार करून आपण पुढची वाट उतरतो. इथे खूप पडझड झाली असल्यानं जवळपास नष्ट झालेला एक दरवाजा दिसतो.

सुधागड किल्ल्याला आजही पंचक्रोशीत भोराईचा डोंगर म्हणूनच ओळखतात. वाड्यापासून झाडीतून जाणाऱ्या वाटेनं आपण भोराईच्या देवळापाशी येतो. सुंदर आणि ऐसपैस असलेल्या देवळातील भोराई देवीचे मंदिर अत्यंत सुंदर आहे. मंदिरात भली मोठी घंटा आहे. मंदिराच्या आवारात एक दीपमाळ असून त्यावर एक हत्ती कोरला आहे. जणू त्यानं आपल्या पाठीवरच ती दीपमाळ धरून ठेवली आहे. मंदिराच्या आवारात जवळपास चाळीस वीरगळ आहेत.

सुधागडावर शिवमंदिर, विशाल कोठारे, टकमक टोक, चोर वाटा, वैशिष्ट्यपूर्ण तानाजी टाके आणि इतरही अनेक अवशेष पाहाण्याजोगे आहेत. सुधागडच्या अस्ताव्यस्त पठारावरून दिसणारे घनगड आणि तैलबैला हे जणू अंगावर आल्यासारखे भासतात. सह्याद्रीचं रूप हे सुधागडावरून न्याहाळण्यासारखं असतं. जवळच दिसणारा सरसगड हा सुधागड वर सतत लक्ष ठेवून असल्यासारखा दिसतो. दोन दिवसाची सुधागडची सफर संपवून परतीच्या वाटेने येताना पालीच्या गणपती बाप्पाचे दर्शन घ्यायचं. वाटेवर खंडाळ्याच्या घाटानं लोहगड विसापूर यांचं दर्शन घेत अत्यंत सुखद ट्रेकची सांगता करायची आणि रिचार्ज होऊन नव्या जोमानं घरी परतायचं.

### पाणी आणि राहाण्याची सोय

वाघजाई घाटाने उतरताना तैलबैला गावामधून पाणी भरून घ्यावं. वाटेत कुठंही पाण्याची सोय नाही. सुधागडावर बारमाही पाण्याचे टाके आहे. गडावर सरकारवाड्यात किंवा भोराई देवीच्या मंदिरात राहू शकता.

### टीप

पावसाळा सोडून कधीही वाघजाई घाटाच्या आडवाटेनं जाता येतं. सोबत वाटाड्या किंवा माहितगार असणं आवश्यक.

# अवचितगड




ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांना आणखी एका पर्यायाचा विचार करता येईल. सगळं सामान पाठीवर घेऊन फिरायची हौस असेल, तर अवचितगड हा एक उत्तम पर्याय नववर्ष स्वागतासाठी उपलब्ध आहे. चढायला सोपा आणि माथ्यावर वस्तीसाठी भरपूर जागा, पाणी उपलब्ध असलेला छोटेखानी किल्ला. रोह्यातून अगदी जवळ असलेल्या निडी येथे रेल्वेने उतरून जास्तीतजास्त दीड तासात गडमाथा गाठता येतो. गडावर मुबलक पाणी आहे. तसेच माथा सपाट आहे. त्यामुळे पावसाळ्याव्यतिरिक्त झोपायची चिंता अजिबात नसते. गडाचं वैशिष्ट्य म्हणजे गडाच्या साधारण मध्यावर असलेले द्वादशकोनी पाण्याचे टाके किंवा तलाव. गडावरून वातावरण स्वच्छ असल्यास रेवदंडा खाडी आणि आसपासचा परिसर दिसू शकतो. किल्ल्याच्या खालच्या गावात पोहोचायला पनवेल-पेण-नागोठणे मार्गे, तसेच पनवेल-पेण-कोलाड-रोहामार्गे रस्ता आहे, ट्रेनमार्गे पनवेल ते रोहा पॅसेंजर गाडीनं निडी येथे किंवा रोहा येथे उतरून गडावर जाता येतं. स्वतःची गाडी असल्यास मुंबई-पनवेल-पेण-नागोठणे-रोहा असा प्रवास करता येईल. किंवा महामंडळाच्या रोह्याला जाणाऱ्या बसेससुद्धा आहेत. मुंबई रोहा पेणमार्गे सुमारे १३० किमी आहे.



अनु.

# कोलाड

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते कोलाड | | | | | 112 | | | | |
| 1 | ताम्हिणी घाट, टाटा तलाव | | | घाट | निसर्ग | 60 | NE | | | |
| 2 | विंझाई देवी | | | | मंदिर | 56 | NE | 6 | SW | |
| 3 | ताम्हिणी घाट पॉईंट | लाँग ड्राईव्ह | | घाट | निसर्ग | 44 | NE | 12 | NW | |
| 4 | ताम्हिणी धबधबा | धबधबा | | | | 38 | NE | 6 | SW | |
| 5 | कोलाड वॉटरस्पोर्ट | वॉटरस्पोर्ट | | नदी | | 23 | NE | 19 | NW | |
| 6 | कुंडलिका राफ्टिंग | वॉटरस्पोर्ट | | नदी | धरण | 11 | NE | 18 | W | |
| 7 | कुंडलिका नदी | | | नदी | | 9 | NW | 20 | W | |
| 8 | सुतारवाडी भिरा धबधबा | धबधबा | | | | 12 | NE | 21 | SE | |
| 9 | विश्रामगड (कुर्डुगड) | | किल्ला | ट्रेक | | 34 | SE | 29 | SE | |






अनु.

वीकएन्ड

## मुळशी-ताम्हणी घाट

# आडवाटेवरच्या घाटावर... तळ्याच्या काठानं



रस्त्याच्या अगदी कडेला विस्तीर्ण जलाशय आणि त्याभोवती फिरणारा वळणावळणांचा रस्ता...जलाशयातलं शांत निर्मळ पाणी आणि कित्येक मैल दूरवर दिसणारी शांतता...फारशी वर्दळही नाही. अशा वातावरणाच्या आपण कायम शोधात असतो. अशा स्थळी जाण्यायेण्याचा मार्गही जर सुंदर असेल, तर वीकएन्डची बहार वाढते.

मुळशी धरणाच्या बॅकवॉटर्सच्या भवतालचा रस्ता हा अशाच सौंदर्यानं नटलेला आहे. या प्रदेशाचं वैशिष्ट्यं काय असं कुणी विचारलं, तर तिथं पोहोचण्यासाठी अलिकडेच नव्यानं सुरू झालेल्या ताम्हणी घाटातली सफर. खरं तर मुळशीची भेट अलिकडे ताम्हणी घाटाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. अलिकडे म्हणण्याचं कारण असं की, पूर्वापार मुळशीकडे पोहोचण्यासाठी पुण्याकडून पिरंगुट घाटातून येणारा मार्ग तरी उपयोगात यायचा किंवा लोणावळ्याकडून पौडमार्गे येणारा रस्ता. आता मात्र मुंबई-गोवा मार्गावरील कोलाड व माणगाव गावाच्या मधून भीरा पॉवरहाऊसमार्गे एक रस्ता जातो. भीरा हे भरपूर पावसाचं ठिकाण. हाच ताम्हणी घाट. या घाटाचं रौद्र स्वरूप अगदी बघत रहावं असं. त्यामुळे गाडी चालवताना अगदी जपूनच जावं, हे उत्तम.

आजकाल, कुणाला गाडी घेऊन जाणं काही नवीन राहिलेलं नाही. स्वतःची नसेल, तर भाड्याची गाडी घेऊन ट्रिपला लोक जातातच. त्यामुळे अशी आपल्या हाती गाडी असेल, तर उत्तमच. पण त्याचबरोबर एसटी बसनंही मुळशीपर्यंत पोहोचणं जड नाही. कारण आता महाड, माणगाव, या भागातून पुण्याकडे जाणाऱ्या बऱ्याचशा गाड्या याच मार्गाने जातात.

कोलाडनंतर भीरा गावाकडे जाणाऱ्या फाट्यावरून ताम्हणी घाटात आपण प्रवेश करतो. घाटातलं प्रत्येक वळण काळजाचा ठोका चुकवणारं. पण रस्ता फार सुंदर आहे. ताम्हणी घाटातून वर आल्यावर मात्र डाव्या हाताला मुळशीचा जलाशय आपल्याला कायम साथ देत राहतो.

लोणावळ्यामार्गे जाणारा मार्ग पवना धरणामार्गे जातो. या मार्गावर तुंग-तिकोना हे छोटेखानी गड सुंदर दिसतात. तिथपासून मुळशीत जाईपर्यंत कोराईगड, ड्यूक्स नोज यांचं दर्शन होतं. मुळशीत गेल्यावर ताम्हणी घाटाच्या बाजूने पालीचा सरसगड, विश्रामगड, तेलबैला हे गडही दिसतात. एकूण परिसर अफाट सुंदर असून जलाशयाच्या सान्निध्यामुळे सतत गारवा असतो.

अगदी इथेच या स्पॉटवर कुठेही गाडी उभी करावी आणि पाण्यापाशी थंडावा घेत बसून रहावं, असं इथलं वातावरण असतं. याच काठांपाशी अनेक रिसॉर्ट आता उदयाला आली आहेत. या रिसॉर्टवर चहा-न्याहारीपासून जेवणाची आणि राहण्याचीही सोय होऊ शकते. अजून हा स्पॉट लोकांना फारसा माहिती नसल्याने थेट या ठिकाणी गेल्यावरही रिसॉर्ट मिळणं कठीण जात नाही.

ताम्हणी घाटाच्या बाजूने जाताना मुळशीपर्यंत निवास करायचा नसेल, तर कोलाड किंवा नागोठण्यात निवासाची सोयही होऊ शकते. त्यामुळे थेट प्रवासाचं अंतर कमी होतं.

या सर्व निवासांचे दूरध्वनी : प्रत्यक्ष मुळशी तलावाजवळच असलेलं ग्रीन गेट रिसॉर्ट : दूरध्वनी ९५२०-५६५५५५५. कोलाडमध्ये : ग्रीनएकर फार्म : २३६२६८८४. प्रभाकर लॉज ०२१९४-२५००५७. नागोठण्याजवळचं कामत रेसिडेन्सी : २३८०९७७१.

> लोणावळ्यामार्गे जाणारा मार्ग पवना धरणामार्गे जातो. या मार्गावर तुंग-तिकोना हे छोटेखानी गड सुंदर दिसतात. तिथपासून मुळशीत जाईपर्यंत कोराईगड, ड्यूक्स नोज यांचं दर्शन होतं.



अनु.








अनु.

ताम्हिणी घाटाचा विस्तृत परिसर आहे सह्याद्रीच्या गाभ्यातला. बेलाग कडेकपाऱ्यांचा, घनदाट जंगलांचा आणि निसर्गसौंदर्याने समृद्ध असलेला. परिसर एवढा दुर्गम की ताम्हिणी घाट बांधेपर्यंत हा सर्वसामान्यांना माहीतही नव्हता! पूर्वी पठारावरच्या लोणावळा, तळेगाव, पुणे या प्रदेशातून कोकणातल्या सुधागडपाली, कोलाड, निजामपूर, माणगाव एवढ्या मोठ्या पट्ट्यात डोंगरवाटांवरूनच बरीच ये-जा चाले. मुळशी आणि पवना नद्यांच्या या गूढरम्य खोऱ्यांत तुंग-तिकोना, लोहगड-विसापूर, कोरीगड, धनगड, विश्रामगड, पागोटा डोंगर असे अनेक किल्ले आहेत. अशा या भरलेल्या आणि भारलेल्या प्रदेशाची स्वामिनी आहे विंझाईदेवी.

पुण्याहून पौंड, पिरंगुट करत मुळशी जलाशय ओलांडत हा मार्ग रायगड जिल्ह्यातल्या मिरा-कोलाड-माणगावला जातो. विंध्यवासिनी विंझाईदेवीचं देऊळ सह्याद्रीच्या कुशीतल्या ताम्हिणी या छोट्याशा खेडेगावात आहे. हे देऊळ पूर्वाभिमुख असून देवी जागृत आहे आणि नवसाला पावते, अशी भक्तांची गाढ श्रद्धा आहे. देवीची मूर्ती अडीचेक फूट उंच असून चतुर्भुज आहे. मागच्या उजव्या हातात खड्ग, डाव्या हातात ढाल तर पुढच्या उजव्या हातात त्रिशूळ आणि डाव्या हातात महिषासुराचं मुंडकं आहे. देवीचा उजवा पाय महिषासुरावर तर डावा पाय जमिनीवर घट्ट रोवलेला आहे. देवीचे केस मोकळे असून डोक्यावर मुकुट, कपाळावर केशरी मळवट आणि त्यावर कुंकू-चिरी... असं देवीचं रूप रुद्र असलं तरी आश्वासक आहे.

देवस्थानाच्या परिसरात वाघजाई, कमलजा, शिर्काई, बहिरी, कालकाई या देवता तर भैरव, रखवालदार आणि मारुतीच्या मूर्ती आहेत. ताम्हिणी घाटापासून जवळच असलेल्या आरध्या घाटाच्या पायथ्याला अधरवाडीला देवीचं मूळ स्थान आहे. साधारण ३०० वर्षांहूनही जुनं असलेलं हे प्राचीन





अनु.

## भ्रमंती

देवस्थान त्यावेळी अतिदुर्गम असल्याने घाटातल्या म्हसेनाळ किंवा आधरमार्गे रानवाटेने गाठावं लागले. त्यावेळी काहीही सोयी नसल्याने सोबत शिधाही न्यावा लागे. ही देवी प्रधान, देशमुख, चिळेकर, सबनीस, सुळे, वैद्य, देशपांडे आदी क्षत्रिय प्रभु कुलोत्पन्न कुटुंबांची कुलदेवता आहे.

चैत्र पौर्णिमेला इथे तीन दिवसांचा उत्सव साजरा केला जातो. या दिवसांत इथे मोठी यात्रादेखील भरते. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी 'भदी' हा अस्सल ग्रामीण बाज असलेला सुवासिनींचा कार्यक्रम होतो. या दिवशी सुवासिनी दिवसभर उपवास करतात. संध्याकाळी उद्यापनाला त्या नटून, केस मोकळे सोडून डोक्यावर मातीच्या मडक्यात दिवे ठेऊन देवळाला पाच प्रदक्षिणा घालतात. त्यावेळी त्या सामूहिक नृत्यदेखील करतात.

घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत दहा दिवस इथे नवरात्रीचा उत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा होतो. यावेळी देवीची 'तळई' भरली जाते. 'तळई' म्हणजे एका मोठ्या परातीत नारळ ठेऊन परात पाण्याने भरलेल्या घागरीवर ठेऊन 'येळकोट येळकोट चांगभलं' असं तीन वेळा म्हणत परात तीन वेळा उचलली जाते. नंतर हे नारळ फोडून त्या खोबऱ्याच्या वाट्यांना हळद लावून त्या परातीत पुन्हा ठेऊन असाच गजर तीन वेळा केला जातो. याप्रसंगी देवीची गाणीही म्हटली जातात. नवरात्रीच्या उत्सवात अनेक भागांतून 'भुत्ये' देवस्थानात मुक्कामाला येतात. मानाची कवड्यांची माळ देवीपुढे ठेवली जाते. या नऊ रात्रींत हे भुत्ये रोज गळ्यात संबळ अडकवून भजन, कथा, भारूडं सादर करून रात्र जागवतात.

या सुरेख देवस्थानाला जाण्यासाठी स्वतःचं वाहन असेल तर वाटेतला सह्याद्री आणि समृद्ध निसर्ग यांचा पुरेपूर आनंद घेता येतो. एक्स्प्रेस वेवरून चांदणी चौकाच्या नाक्यावरून उजवं वळण घेतलं तर इथे लवकर पोहोचता येतं. मात्र गोवा रस्त्यावरच्या कोलाड-माणगावहून इथे गेलात तर घाट चढताना सह्याद्रीच्या आकाशाला भिडणाऱ्या डोंगररांगा, त्यातले कडे-सुळके, वाटेतली जंगलं... खरंतर सह्याद्रीची विविध रूपं डोळ्यांना खुणवत राहतात. नवरात्रीच्या दिवसांत तर अश्विन महिन्यातली निसर्गाची अनोखी रूपं इथे अनुभवता येतात. त्यामुळे ही भ्रमंती निसर्गभेटीची आणि देवीच्या प्रसन्न दर्शनाची, अशी दुहेरी आनंद देणारी ठरते.

# श्रावणमासी हर्ष मानसी..

श्रावण सुरू झालाय... सगळीकडे हिरव्या-पिवळ्या रंगाचं साम्राज्य आहे. श्रावणातल्या निसर्गाचा हा आविष्कार सगळीकडेच दिसत असतो. अगदी थोड्या फार प्रमाणात शहरातही. पण श्रावणातला चैतन्याने निथळणारा हिरवागार धुंद-कुंद निसर्ग बघायचा असेल तर 'ताम्हिणी' घाटात जायला हवं. ताम्हिणी आहे सह्याद्रीच्या डोंगररांगेत... कडेकपाऱ्यांच्या कोंदणात. सगळा परिसर घनदाट जंगलांचा. साहजिकच इथे तुफान पाऊस पडतो... सगळ्या डोंगररांगा मेघांनी वेढलेल्या असतात. धबधबे तर अगणित. मुख्य म्हणजे हे सगळे धबधबे रस्त्यालगत असल्याने सगळ्या वयाच्या लोकांना निसर्गाच्या या उत्सवांत सहभागी होता येतं.

कोकणातल्या कोलाड-इंदापूरला पुण्याशी जोडणारा हा घाट आहे. पावसाळ्यातली खरी मजा अनुभवायची असेल तर मुंबई-गोवा रस्त्यावरच्या कोलाडहून भिरामार्गे ताम्हिणी घाटातून पुण्यापर्यंत एक दिवसाची ट्रीप करायला हवी. मात्र हा खूपच आडमार्ग असल्याने स्वत:चं वाहन हवं. मुंबईहून कोलाड-भिरा-ताम्हिणी-मुळशी-पुणे करत परत मुंबई हे अंतर सहज साडेतीनशे किमीच्यावर होतं. त्यामुळे सकाळी अगदी लवकर मुंबई सोडली तरच मनमुराद फिरता येतं. निसर्गाची नाना रूपं निवांतपणे अनुभवता येतात. जाताना कोकणातल्या मार्गाने गेलं तर सतत आपल्या अगदी नजरेसमोर निसर्गाचा हा खजिना दिसत राहतो आणि संध्याकाळी एक्स्प्रेसवेवरून मुंबई गाठणं, सोपं जातं. घाट पार करून गेल्यावर वाटेत ताम्हिणी हे छोटंस गाव आहे. गावात विंझाईदेवीचं सुरेख देऊळ आहे. पुढे मुळशी जलाशय आहे. मात्र या मार्गावर राहाण्याजेवणाच्या काहीही सोयी नाहीत. विशेषत: घाटातं. दुसरं म्हणजे शक्यतो शनिवार-रविवार टाळून गेलं तर सगळा निसर्ग फक्त तुमचाच.. अन्यथा इतर जागांप्रमाणेच या दिवसांत दारूड्यांचा वावर माळशेजएवढा नसला तरी फार तुरळकही नसतो.

त्यामुळे रविवारी त्यांच्या बेशरम चाळ्यांनी सगळं वातावरण बिघडलेलं असतं. त्यांच्या गोंगाटात सगळी मजा निघून जाते.

एक मात्र खरं की आपण जेव्हा परत पुण्याच्या चांदणी चौकातून एक्प्रेसवेवरून निघतो त्यावेळी बालकवींची 'श्रावणमासी...' कविता आपल्याला खऱ्या अर्थाने कळलेली असते. त्यांनी वर्णन केलेला श्रावणाचा महिमा आपण प्रत्यक्ष बघितल्याने 'हर्ष माझ्या हृदयांत' अशीच प्रत्येकाची अवस्था असते. श्रावण महिन्यात आपली संस्कृती काही ना काही चांगला 'वसा' घ्यायला सांगते. आपणही श्रावणात अशा छान ठिकाणी जाऊन आपल्या मुलांना बालकवींची ही कविता प्रत्यक्ष अनुभवण्याचा वसा द्यायला काय हरकत आहे. हा वसा त्यांना निश्चितच निसर्गाच्या विराट आणि सुंदर रूपाचं दर्शन घडवून वेगळ्या चैतन्याचा लाभ देईल








बरसत्या पावसाची मजा आपण नेहमीच घेत असतो. पण सह्याद्रीच्या बेलाग डोंगररांगेतल्या पावसाचा सळसळता अविष्कार आपल्याला कल्पनाही करता येणार नाही, एवढा वेगळा असतो. गेल्या काही वर्षांत यातल्या काही काही ठिकाणी घाट रस्ते झाल्याने आता सर्वसामान्यांना ही मजा सहज लुटता येते. रायगड जिल्ह्यातल्या कोलाड-इंदापूरला पुण्याशी जोडणारा असाच एक जबरदस्त घाट आहे 'ताम्हिणी'.

कोकण आणि घाट यांच्यामधल्या पट्ट्यातला बराच प्रदेश दुर्गम आणि घनदाट अरण्याचा असल्याने तिथली खोरी आजही आपल्याला परिचित नाहीत. त्यातले बरेचसे प्रदेश रुंद व खूप विस्तृत आहेत. रायगड जिल्ह्यातल्या सुधागड-पालीपासून ते पार सावंतवाडीपर्यंत आजही घाटाला जोडणारे दुर्गम डोंगरी मार्ग आहेत व स्थानिक लोक पायीच या वाटांवरून जात असतात.

ताम्हिणी घाटाचा चाळीस-पन्नास मैलांमधला परिसर काही वर्षांपूर्वी असाच कोणाच्या माहितीचा नव्हता. पाच-सात वर्षांपूर्वी घाट बांधल्यापासून मात्र इथल्या भन्नाट निसर्गाची ओळख सर्वसामान्यांना व्हायला लागली. मुंबई-ठाण्याच्या बऱ्याचशा लोकांना आजही हा प्रदेश अनभिज्ञ आहे.

पावसाळ्याच्या मौसमात घाटात आपण जसजसे उंची गाठायला लागतो, तसंतसं मुसळधार पावसाचा, भन्नाट, वाऱ्याचा, अगणित धबधब्यांचा आणि ढगांचा कधीही न अनुभवलेला धमाल खेळ आपल्याला दिसायला लागतो. त्यात घाटमाथ्यावर पोहोचल्यावरही पंधरा-वीस किमीपर्यंत गर्दीचा मागमूस नसल्याने आपण चक्क वेगळ्या जगात असल्यासारखंच वाटतं. जवळजवळ सगळेच धबधबे रस्त्याच्या निकट असल्याने कुटुंबातल्या वृद्धांनाही यात डुंबता येतं व पावसाळ्यातल्या सह्याद्रीचे ढगांनी वेढलेले डोंगर-कडे जवळून बघता येतात. मात्र खाण्याच्या काहीही सोयी नसल्याने बरोबर सगळं न्यावं लागतं.

इथल्या निसर्गाची खरी मजा अनुभवायची असेल तर गोवा रस्त्यावरच्या कोलाड-भिरा-ताम्हिणी-मुळशी-पिरंगूट-पुणे ही एक दिवसाची ट्रीप करायला हवी. मुंबईहून हे अंतर सहज साडेतीनशे किमीच्या आसपास होतं. जाताना कोकणातल्या मार्गाने गेलं तर सतत आपल्या अगदी नजरेसमोर निसर्गाचा हा खजिना दिसत राहतो आणि संध्याकाळी एक्स्प्रेस वे वरून मुंबई गाठणं, सोयिस्कर जातं. घाट पार केल्यावर वाटेतल्या विंझाईदेवीचं दर्शनही होतं. मुळशी जलाशय पार करून पुण्याकडे सरळ गेलं की एक्स्प्रेस वे लागतो.

पहाटे लवकर निघालं तर ही सहल एका दिवसात करता येते. अगदी इथे थांबायचं असेल, तर ताम्हिणी गावातल्या विंझाई देवस्थानच्या धर्मशाळेत, मुळशीला किंवा घाटाखाली कोलाड-भिऱ्याला एक मुक्काम करायला हवा, या सगळ्या ठिकाणी राहण्याच्या अगदी साध्या सोयी आहेत. एवढं मात्र निश्चित आहे की सह्याद्रीतल्या निसर्गाविषयी मनापासून प्रेम असणाऱ्यांना ताम्हिणी घाटाचा हा प्रदेश स्वप्नभूमीच आहे.

## कोलाड (ताम्हिणी घाट)

मुंबई-गोवा हायवेपासून थोडंसं आत माणगावच्या पुढे ताम्हिणी घाटात वसलेलं कोलाड गाव पर्यटकांमध्ये फारसं प्रसिद्ध नाही. गावाजवळची कुंडलिका नदी हे इथलं मुख्य आकर्षण. इथे नुकतंच सुरू करण्यात आलेल्या रिव्हर राफ्टिंगमुळे आताशा इथे पर्यटकांची वर्दळ वाढत आहे. मित्र-मैत्रिणींच्या ग्रुपसमवेत २-३ दिवस धम्माल करायला कोलाडचं रिव्हर राफ्टिंग हा बेस्ट चॉईस ठरेल. याच्याच जोडीला इथे आता कयाकिंग, जंगल क्राम्पिंगची मजादेखील अनुभवता येईल. स्थानिक रहिवाशांकडे रहायची सोय होते. तसंच अनेक रिसॉर्टसही आहेत. २-३ दिवस हातात असले तर इथून जवळच असलेल्या कोरलई किल्ला आणि फणसाडच्या अभयारण्यालाही भेट देता येईल. फणसाडच्या अभयारण्यातही रहाण्याची सोय होते.

**कसं जाल?**

मुंबई-गोवा हायवेवरून नागोठणे-माणगाव-ताम्हिणी घाट असं मुंबईपासून अंदाजे ४ तासांत इथे पोहोचता येईल.

# कुंडलिकात राफ्टिंग

***मुळशी*** आणि भिरा धरणांच्या जवळपासच्या भागातल्या जंगलातून वाहणारी कुंडलिका नदी प्रसिद्ध आहे. इथे सकाळी ८ ते दुपारी १ या वेळेत राफ्टिंग मोठ्या प्रमाणावर केलं जातं. साधारणतः १४ किलोमीटर्सच्या टप्प्यात सुमारे दीड तास राफ्टिंगचा आनंद घेता येऊ शकतो. भिरा धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहावर हे अवलंबून असल्याने ते वेळापत्रक लक्षात ठेवणं आवश्यक आहे. नाही तर पाण्याअभावी संधी हुकण्याची वेळ येऊ शकते. भिरा धरणानजिकच्या शेजे गावाजवळ याचा स्टार्टिंग पॉइंट आहे. जुलै ते डिसेंबर या काळात इथे राफ्टिंग होतं.

**कसं जाल?**

मुंबईपासून १२० किलोमीटर्स तर पुण्याहून १०० किलोमीटर्स अंतरावर हे ठिकाण आहे. मुंबईहून निघाल्यावर गोवा हायवेने कोलाडपर्यंत यायचं. तिथून सुतारवाडी आणि पुढे शेजे गावात पोहोचता येतं.



अनु.

# कुंडलिकेच्या परिसरात थोडी ऐश



मुंबई-गोवा हायवेवरून जाताना वडखळ परिसराच्या आसपास आता उद्योगधंद्यांनी चांगलं बस्तान मांडलं आहे. हे लोण थेट नागोठणे, महाड आणि आता चिपळूणपर्यंत गेलं आहे. तरीही हायवेवर काही पट्टे मात्र गर्द हिरव्या झाडीतून जातात. इथून प्रवास करतानाही गारेगार वाटतं. रोह्याजवळ कोलाडचा परिसर हा अगदी तसाच. इथल्या धरणामुळे रायगड परिसरातही दुबार पिकं घेतली जाणारा ह्रा विरळा परिसर ठरला आहे. इथलं पाणी अगदी थेट थळच्या आरसीएफपर्यंत जातं.

कोलाडला आम्ही फिरायला जातो, असं कुणाला सांगाल, तर तिथे काय आहे बघण्यासारखं, असं म्हणत ते तुम्हाला वेड्यात काढतील. खरं तर खूपखूप काही फिरण्यासारखं परिचित आहे, अशातलाही भाग नाही. पण

आजकाल बहुतेक ठिकाणी रिसॉर्टची सोय झाली आहे. अशा रिसॉर्टमध्ये तुम्हाला बाहेर जाऊन काही बघावं, यासाठी वेळच दिलेला नसतो. लहान मुलांसाठी खेळणी, कधी एखाद्या ठिकाणी स्वीमिंग पूल, टेबलटेनिस, बॅडमिन्टनची सोय, नदी असल्यास डुंबण्याची सोय किंवा बोटिंगची सोय, खाण्यापिण्याची चंगळ असं बरंच काही इथे असतं. साधारण अशा रिसॉर्टचा पॅटर्न सारखाच असतो. मुरबाड, बदलापूर या परिसरात अलिकडच्या काळात अशी काही रिसॉर्ट्स विकसित झाली आहेत. एरव्ही ओसाड भासला असता अशा परिसरात या रिसॉर्टवाल्यांनी मात्र हिरवळीवर चांगली मांडामांड केली आहे. पण कधीकधी रिसॉर्टसाठी नव्या स्पॉटची निवडही जरा अधिक विरंगुळा देऊ शकते. अर्थात् रिसॉर्टचं भाडं आणि तिथे मिळणाऱ्या सोयी-

सुविधा यांचा मेळ अगोदरच बुकिंग करताना घातलेला बरा. एक तर शक्यतो अशा रिसॉर्टवर जाताना मोठा ग्रुप असलेला बरा. म्हणजे आसपासच्या परिसरात फारसं भटकायला मिळालं नाही, तरी ग्रुपबरोबर मजा करता येते. नाहीतर एखादी गाडी हाताशी हवी, म्हणजे आसपासची ठिकाणं सहजासहजी पाहून येणं जमतं.

कोलाडच्या परिसरात एरव्ही मुद्दाम कुंडलिका नदीचं दर्शन घ्यायला आपण काही थांबलो नसतो. पण या रिसॉर्टवर थांबून ते शक्य होऊ शकतं. अर्थात गाडीने एका दिवसातही बरंच फिरून येता येतं. कोलाडला जाताना गोवा महामार्गावर वळताना वडखळचा स्पॉट ब्रेकफास्टसाठी अगदी मस्टच आहे. इथे गरमागरम बटाटावडा किंवा मिसळ

खाण्यातली मजा खासच.

कोलाडला गेल्यावर तुम्ही कुठेही विश्राम केलात, तरी त्या परिसरात तळा, घोसाळा हे छोटेखानी किल्लेही करता येतात. कोलाड-नागोठणे कुठेही मुक्काम केल्यास पालीच्या गणपतीच्या दर्शनालाही जाता येतं. कोलाडहूनच ताम्हणी घाटाचं रौद्र रुप बघायला एखादा फेरफटका मारून आपलं हृदय ठिकठाक धडधडतंय, याची खातरजमाही करून घेता येते. किल्ले सूरगड खरं तर याच परिसरातला. पण तिथे जायला एक दिवस हवा आणि बरोबर वाटाड्याही.

इथल्या काही रिसॉर्ट्सचे संपर्क : डॉक्टर्स फार्म : खेळ तसंच कुंडलिकाच्या बॅकवॉटर्समध्ये बोटिंगची सोय उपलब्ध. ग्रीनएकर फार्म्स : दूरध्वनी : ९८२००७५७७०, इथे बोटिंग, ट्रेकिंग, पक्षीनिरीक्षण, इत्यादी सोयी उपलब्ध. कॅम्प रिव्हर वाईल्ड तसेच अंजली व्हिस्परिंग ग्रोव्ह या रिसॉर्टसाठीही ग्रीनएकर फार्म्स चौकशी करावी. नागोठण्याजवळ रहायचं झाल्यास कामत रेसिडेन्सी :



## सुतारवाडी भिरा

मुंबई-गोवा हायवेने मुंबईहून निघालात ड्राइव्ह करत कोलाडला यायचं. तिथून पुढे पुण्याचा रस्ता पकडायचा, सुतारवाडीपर्यंत जायचं. इथे तुम्हाला राफ्टींगचा आनंद लुटता येतो. तिथून पुढे ताम्हणी घाटात आलं की तिथे अनेक छोटे-छोटे धबधबे बघायला मिळतात. घाटात गरमागरम चहा, भजीवर ताव मारला की मग मुळशी लेककडे यायचं. निसर्गरम्य वातावरणात इथे खूप वेळ टाइमपास करता येतो. ट्रेकिंग, हॉट एअर बलून यासारख्या अनेक ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटीज इथे करण्याची संधी मिळते. भिरावरुन ताम्हणीघाटात जायचं नसेल तर पालीला जाऊन गणपतीचं दर्शन घेता येतं. दिवसभर मस्त मजा करून संध्याकाळी पुन्हा मुंबईचा रस्ता पकडायचा.



महाराष्ट्रात अनेक जिल्हे असे आहेत, ज्यांना निसर्गानं काहीही कमी पडू दिलेलं नाही. रायगड जिल्हा हा त्यातील एक भाग्यवान जिल्हा. इतिहाससमृद्ध किल्ले, पांढरेशुभ्र धबधबे, भेदक घाटवाटा, निवांत सागरतीर असा रायगड जिल्ह्याचा एकूण लवाजमा! इतिहास आणि निसर्ग यांचा सुरेख मिलाफ इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर इथलं कुठलंही ठिकाण म्हणजे पृथ्वीवर उतरलेला स्वर्गच. मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव हे असंच एक ठिकाण. अनवट जागी वसलेलं. विश्रामगड उर्फ कुर्डुगड हा तिथला सर्वांगसुंदर दुर्ग. 'मान्सून' अनुभवण्याचा हा एक मस्त पर्याय.

रायगड जिल्ह्यातल्या या दुर्गाला भेट देण्यासाठी ताम्हीणी घाट उतरून माणगावचा रस्ता धरायचा. सुमारे १५ किलोमीटर अंतर कापलं की डावीकडे शिरवली फाटा आहे. तिथं वळल्यावर अर्ध्या तासात कडापे, शिरवली, टिटवे मार्गे आपण उंबर्डीत येऊन ठेपतो. वाटेवरच्या जिते गावातून किल्ल्याला जाणारा रस्ता तसा वापरातला आहे; पण निसर्गाचं गहिरं रूप उंबर्डीची वाटच दाखवते. गावाच्या थोडं बाहेर एक पुरातन आणि काहीसं भग्न असं काळ्या पाषाणातलं शिवमंदिर आहे. मंदिराशेजारून चालायला लागल्यावर सपाटी सुरू होते. आपला सपाटीचा आनंद फार काळ टिकत नाही; कारण पंधरा-वीस मिनिटांतच किल्ल्याच्या

---

खड्या चढणीला सुरुवात होते. गडाची पायवाट चांगली मळलेली आहे. गडावर कुर्डुपेठ नावाची छोटी वस्ती असल्यानं संपूर्ण पायवाट रोजच्या वापरातली आहे. पायथ्यापासून कुर्डुपेठपर्यंत लाइटचे टॉवर्स गेले आहेत. त्यांचा माग काढत गेलो, की तासाभरात आपण कुर्डुपेठेत पोहोचतो. विश्रामगडाचा उत्तुंग सुळका गावाच्या मागेच उभा आहे. त्याच्यावरचा बुरुजही गावातून स्पष्ट दिसतो.

कुर्डुपेठेतल्या हिरव्यागार शेतांमधून गडाची वाट तुडवत निघालो, की पाचच मिनिटांत डावीकडे कुर्डाई देवीचं कौलारू मंदिर आहे. मंदिरात देवीची मूर्ती असून बाहेरील कोरीव दगड नीट न्याहाळल्यास गजांतलक्ष्मीचं शिल्पही दिसू शकतं. या कुर्डाई देवीच्या नावावरूनच विश्रामगडाला कुर्डुगड असं नाव पडलं. मंदिरापासून पंधरा मिनिटांत आपण किल्ल्याच्या दरवाजासमीप येतो. दरवाजाच्या अलीकडे एक पाण्याचं बारमाही टाकं आहे. आजही कुर्डुपेठेला पाण्याची टंचाई जाणवू लागली, की हे टाकं गावच्या मदतीला धावून येतं. गडाच्या मुख्य सुळक्याच्या पायथ्याशी भग्नावस्थेतला दरवाजा असून त्याच्या दिशेनं नेणाऱ्या खोदीव पायऱ्या मात्र सुस्थितीत आहेत. दरवाजातून आत प्रवेश केला, की सुळक्याच्या पोटात खोदलेलं एक टाकं दिसतं. यातलं पाणी पिण्यायोग्य नाही. मुख्य दरवाजापासून आपण सुळका उजवीकडे ठेवत निघालो, की कोरीव मिशा, कमरेला खंजीरआणि पायाखाली दैत्याला चिरडणारं मारुतीचं उघड्यावरच ठेवलेलं शिल्प दिसतं. सुरगड, रसाळगड इत्यादी किल्ल्यांवरही अशाच प्रकारची मारुतीची शिल्पं दगडात कोरलेली आहेत. या मूर्तीनंतरच्या पुढच्या मार्गावर दगडांचा खच आहे. या दगडांना धार असल्यामुळे सावधपणे चालावं लागतं. विश्रामगडावरील सुळक्याच्या पोटात अशाच दगडांनी भरलेली एक गुहा आहे. सुमारे शंभर माणसं सहजपणे बसू शकतील इतकी ती मोठी आहे. या गुहेच्या परिसरातही पिण्याच्या पाण्याची टाकी खोदलेली आहेत. विश्रामगडाच्या दुर्गअवशेषांमधला शेवटचा बुरुज या वाटेच्या शेवटी आहे. या बुरुजापासून समोरच्या लिंग्या घाटातील नितांत सुंदर धबधबे मनसोक्त पाहाता येतात. दुर्बीण असली, तर ताम्हिणी घाटातून वळणं घेत कोकणात उतरणारी एस.टी.सुद्धा दिसते आणि भूतकाळातल्या एखाद्या तशाच अविस्मरणीय दुर्गभ्रमंतीच्या आठवणी पुन्हा जागवते. किल्ल्याच्या मुख्य सुळक्याला एक अजून छोटा सुळका बिलगला आहे. या दोघांच्यामध्ये एक घसाऱ्याची वाट असून ती पार केल्यावर एका नैसर्गिक खिडकीशी आपण पोहोचतो. ही घळीतली वाट तशी अवघड आणि निसरडी आहे. इथे पोळी असल्यामुळे योग्य ती खबरदारी घ्यावी लागते.


किल्ल्याची वारी पूर्ण झाली असली, तरी नजर नावीन्याचा शोध घेत अजूनही भिरभिरत राहाते. त्या गिरीशिखरांच्या मस्तकावरून खाली कोसळणाऱ्या एखाद्या जलधारेचा दुरूनच वेध घेते आणि आपल्या मनात ते निसर्गचित्र कायमचं रंगवून ठेवते.



अनु.

# मुरुड

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते मुरुड बीच | | | | | 145 | | | | |
| **1** | सिध्दिविनायक मंदिर | | | | मंदिर | 9 | N | | | |
| **2** | गारंबी | धबधबा | | धरण | निसर्ग | 9 | N | 16.5 | SE | |
| **3** | कासा किल्ला | | किल्ला | | | 3 | NW | 11 | NW | |
| **4** | मुरुड दत्तमंदिर | | | | मंदिर | 3 | NE | 5 | E | |
| **5** | मुरूड बीच | समुद्रकिनारा | | | | 0 | | | | |
| **6** | जंजिरा बीच | समुद्रकिनारा | | | | 5 | S | 5 | S | |
| **7** | मुरूड-जंजिरा किल्ला | | किल्ला | | | 5 | SW | 0.5 | W | |
| **8** | नानवेल दीपगृह | दीपगृह | | | | 17 | SW | 13 | SW | |



# नांदगाव (मुरूड)चा सिद्धिविनायक

मुरूडच्या अलीकडे सुमारे पाच किमी अंतरावर नांदगाव आहे, इथल्या श्री सिद्धिविनायक हे मोठे जागृत देवस्थान आहे. गावाच्या मध्यभागी असलेल्या या मंदिराचे उत्कृष्ट नक्षीकाम भक्तांचे लक्ष वेधून घेते. पूर्वी हे मंदिर कौलारू होते. १९६६ साली देवस्थानचा ट्रस्ट निर्माण करण्यात आला. १९८३ साली या मंदिराचा जीर्णोद्धार गावकऱ्यांनी केला. माघी गणेशजयंतीच्यावेळी इथे मोठी यात्रा असते. पाच दिवस यात्रा चालते. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद, माजी अर्थमंत्री चिंतमणराव देशमुख, स्व. शंकरराव चव्हाण आदी महान नेत्यांनी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले आहे. देवस्थान सेवा मंडळातर्फे नित्य पूजा अर्चा आदी विविध कार्यक्रम पार पाडतात. दर संकष्टी चर्तुथीला गणेशभक्तांची रिघ इथे लागते.





अनु.



# गारंबीत चला भिजायला

*राज्याचं मिनी गोवा ही मुरुडची ओळख. पण पावसाळ्यात मात्र पर्यटक वळतात ते मुरुडपासून जवळच असलेल्या गारंबी धरणाकडे, इथल्या धबधब्यांमध्ये मनसोक्त भिजण्यासाठी.*

जंजिरा-मुरुड म्हणजे पर्यटकांचं सुट्टीतलं आवडतं ठिकाण. सुट्टीमध्ये तर मुरुड पर्यटकांनी बहरून जातं. सुंदर रुपेरी समुद्र किनारा, नारळी पोफळीच्या बागा, प्रदूषणविरहीत वातावरण यामुळे राज्याचं मिनी गोवा म्हणून

मुरुडची ओळख आहे. समुद्र किनारी दिसणारा किल्ला व मुरुडच्या दक्षिणेकडे ३ कि.मी.वर असणारा प्रसिद्ध जंजिरा किल्ला आहे. परंतु पावसाळा सुरू होताच समुद्र उग्र रूप धारण करतो. अशा वेळी समुद्रात मौज-मजा करता येत नाही आणि किल्लाही पाहता येत नसल्याने पर्यटक मुरुडपासून जवळच असलेल्या प्रसिद्ध गारंबी धरणाकडे वर्षा सहलीसाठी मोठ्या प्रमाणावर येतात.

पावसाळा सुरू झाला की स्थानिक वर्षासहलीसाठी व मनसोक्त भिजण्यासाठी पर्यटक या ऐतिहासिक धरणावर जाणं पसंत करतात. गारंबी इथे जाण्यासाठी पब्लिक ट्रान्सपोर्टची व्यवस्था नसल्याने स्वतःच्या वाहनानेच गारंबीला जावं लागतं किंवा एखादं स्थानिक वाहन भाड्याने घेऊन जाता येतं. गारंबी इथे मुख्य रस्त्यावर आपली वाहनं उभी करून चालत जाता येतं. मुख्य रस्त्यावरून खाली उतरताच उजवीकडे खळाळणारे धबधबे पहायला मिळतात. या ठिकाणी कोणताही धोका नसल्याने महिलांसह लहान मुलांनाही भिजण्याचा आनंद घेता येतो.

या धबधब्याच्या खालील बाजूस तीन धरणं आहेत. ती अतिशय खोल आहेत. याच्या मधल्या धरणातून पाणी भरून वाहत असताना छान धबधबा पहावयास मिळतो. खाली शेवटच्या धरणावरूनसुध्दा अशा प्रकारचे धबधबे पहायला मिळतात. परंतु खाली खोल दरी असल्यामुळे धरणाच्या धबधब्यामध्ये भिजण्याचं धाडस करू नये. धरणामध्ये तर पोहण्यास बंदी असतानासुद्धा इथल्या सुरक्षारक्षकांचं न ऐकता धरणात काही टारगट मुलं पोहताना दिसतातच. पण असं न करता, योग्य ती काळजी घेणं गरजेचं आहे.

## कसं जाल?

गुरुड केळघर मार्गे रोहा असा प्रवास करताना वाटेतच ऐतिहासिक गारंबी धरण पहायला मिळतं. मुरुडपासून ८ किमी अंतरावर हे धरण आहे. मुंबईपासून अलिबाग मार्गे मुरुड असा १५५ किमीचा प्रवास आहे. तर पुणे इथून ताम्हाणी रोहा मार्गे असा १३० किमी प्रवास करून इथे पोहोचता येतं. रोह्यातून केळघर मार्गे मुरुड असा प्रवास करताना वाटेत २४ किमी अंतरावर हे ठिकाण आहे.



गारंबी इथे खाद्यपदार्थांचे कोणतेही स्टॉल नसल्याने इथे जाताना स्वतःबरोबर जेवण करण्याचं साहित्य अथवा तयार जेवण घेऊन जावं लागतं. इथे जेवण करताना पर्यटकांनी स्वच्छतेचं भान ठेवणं अतिशय गरजेचं आहे. कारण हे पाणी मुरुडच्या जनतेला पिण्यासाठी वापरलं जातं. दारु पिणं, इतस्ततः कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या टाकणं हे जबाबदारीने टाळलं पाहिजे. गारंबी हे ठिकाण अभयारण्यात असल्याने इथे भेकर, ससे, पिसोरी, मोर, वानर, माकडं व विविध पक्षी यांचंही दर्शन होत असतं.

या ऐतिहासिक धरणाचं वैशिष्ट असं की मुरुड-जंजिरा हे स्वांतत्र्यपूर्वकाळात एक सिध्दी नबाबाचे स्वतंत्र संस्थान होतं. त्याकाळी जनतेच्या पिण्याच्या पाण्यासाठी सिध्दी नबाबाने १८९२ साली हे छोटेखानी धरण बांधलं. या ठिकाणी छोटी छोटी तीन धरणं आहेत. १९६० मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी गारंबी धरणाला भेट दिली होती. सध्या गारंबीचं धरण दुथडी भरून वाहत आहे. या धरणात पर्यटक मनसोक्त डुंबताना दिसतात.



## पद्मदुर्ग उर्फ कासा

जंजिरेकर सिद्दीच्या सत्तेला शह देण्यासाठी शिवरायांनी जंजिऱ्याच्या उत्तरेकडे सुमारे तीन किलोमीटरवर समुद्रातल्या बेटावर पद्मदुर्ग उर्फ कासा किल्ला उभारला. या किल्ल्याचा आकार कमळासारखा असून किल्ल्यावरही ठिकठिकाणी कमळं कोरली आहेत. किल्ल्यात गोड्या पाण्याचे हौद आहेत. मोठ्या प्रयासाने बांधलेला हा किल्ला शिवरायांच्या हयातीतच जंजिरेकर सिद्दीने जिंकून घेतला. आज भग्नावस्थेत हा किल्ला इतिहासाची साक्ष देत आहे. पद्मदुर्गपर्यंत राजपुरी बंदरातून निघणाऱ्या होडीने जाता येते.

# मुरुडचं दत्तमंदिर

मुरुड-जंजिऱ्याला आलात तर त्याला लागूनच उत्तरेकडच्या टेकडीला अवश्य भेट द्या. तिथे गेल्यावर मन एकदम प्रसन्न होईल. इथे देखणं दत्तमंदिर तर आहेच, शिवाय मंदिराभोवतीच्या पटांगणात फिरताना दूरवरची मनोहरी दृश्यंही पाहता येतात. सूर्योदयाच्या वेळी पूर्वेकडच्या डोंगरशिखरांमधून वर येणाऱ्या सूर्याचं दर्शन होतं. डोंगराकडून उजव्या बाजूला वळल्यास प्रथम खेडी दिसतील. सप्टेंबर महिना असला तर हिरवीगार शेतं आणि गवताची कुरणं दिसतील. नारळी-पोफळींच्या बागेत लपलेलं मुरुड शहर, त्यातून मध्येच थोड्याशा उंच इमारती डोकावतील. आणखी थोडं दक्षिणेकडे गेलात तर अरबी समुद्राकडे जाऊ पाहणाऱ्या सह्याद्रीच्या टेकड्या, त्यांच्यामधून राजपुरीच्या खाडीमधला जंजिरा किल्ला दृष्टीस पडेल. आणखी थोडसं उजवीकडे वळल्यास अथांग अरबी समुद्र आणि त्यात सिद्दीवर वचक ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला पद्मदुर्ग (कासा किल्ला) खुणावेल. आणखी उजवीकडे वळल्यावर सह्याद्रीच्या लहानमोठ्या टेकड्या नजरेस पडतील. थोडं सूर्यास्तापूर्वी गेलात तर पश्चिम क्षितिजापाशी अरबी समुद्रात अस्त पावणाऱ्या, तप्त लोहगोळ्याप्रमाणे भासणाऱ्या सूर्यबिंबाचं रमणीय दृश्य पाहून हरखून जालं. अशी निसर्गरम्य पार्श्वभूमी लाभलेल्या या दत्त मंदिराची दंतकथाही अतिशय रोचक आहे.



मुरुडच्या दत्तमंदिराचा विकास टप्प्याटप्प्याने होत गेला. १९०६-०७च्या सुमाराचे जंजिरा संस्थानचे सरन्यायाधीशपदी राजाध्यक्ष यांनी स्वखर्चाने दत्तात्रेयांची एक लहानशी मूर्ती आणून तिची टेकडीवर प्राणप्रतिष्ठा केली. त्या मूर्तीपुढेच ब्रह्मेंद्रस्वामींनी प्रतिष्ठापलेल्या श्री दत्तगुरूंच्या पादुका आहेत. पुढे सुमारे वीस वर्षांनी दत्तमंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. भव्य कलापूर्ण सभागृह आणि कळसही उभारण्यात आला. सभागृहाच्या लाकडी छतावरच्या रंगीत कलाकुसरीचं काम खूपच अप्रतिम होतं. त्यामध्ये सभोतालची रमणीय दृश्यही रंगवली होती. मंदिराचं हे काम मुरुडमधल्या चिंतामण अनंत जोशी यांच्या पुढाकारने झालं. त्याच्या खर्चाची जबाबदारी मुरुडमध्ये स्थिरावलेले व्यापारी जफराबादवाला यांनी उचलली होती. इतर काही धनिकांनीही त्याला हातभार लावला होता. १९९७ मध्ये दत्त मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. सभामंडपाच्या पूर्वीच्या कौलारू छपराऐवजी सिमेंट काँक्रीटचा स्लॅब टाकण्यात आला. सभामंडप आणि गाभारा कलापूर्णतेने सुशोभित करण्यात आलं. त्यानंतर २००८ मध्ये नव्याने कळस बनवून सभामंडपात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यामुळेच भव्य आणि देखणं दत्तमंदिर दिमाखात उभं असून मुरुड-जंजिऱ्याची शान वाढवत आहे.

मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेला दत्त जयंतीच्या उत्सव इथे मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. १९२७ पासून हा उत्सव सातत्याने दरवर्षी इथे साजरा होतो. त्यानिमित्त तीन दिवसाची जत्रा भरते. जत्रेमध्ये खेळण्यांपासून भजी, शेव, पापडी, गाठी इत्यादी खाद्यपदार्थांपर्यंत अनेक गोष्टी पाहायला मिळतात. जत्रेला येणारे खवय्ये भजी आणि उसाच्या रसावर ताव मारूनच जत्रेचा आनंद लुटतात.

**रायगड जिल्ह्याला रूपेरी वाळूचे देखणे सागरी किनारे लाभले आहेत. किनाऱ्यालगतच माडांची, सुरूची आणि केवड्यांची बनं पसरलेली आहेत. विशेष म्हणजे रायगडाचे अन्य तालुके जेव्हा उष्णतेमुळे हैराण होतात, तेव्हा अलिबाग, मुरुड आणि श्रीवर्धन या तीन तालुक्यांमधलं वातावरण आल्हाददायक असतं. अशा निवांत सागरकिनाऱ्यांचा आढावा घेताहेत लक्ष्मण रा. दिवेकर.**

# रूपेरी वाळूत...





अनु.

## मुरुड

श्रीवर्धन तालुक्यातल्या कोंडिवली गावालाही रूपेरी किनारा लाभला आहे. बागमांडला, भरडखोल, आदगाव आणि वेळास या गावांनाही शुभ्र वालुकामय आकर्षक किनाऱ्यांची नैसर्गिक देणगी मिळालेली आहे. जंजिरा-मुरुड तालुक्यात मुरुडच्याच भागात रमणीय रूपेरी वाळूचा सागरकिनारा अनुभवता येतो. मुरुडच्या किनाऱ्यावरून सूर्यास्ताचं आल्हाददायक आणि दररोज बदलणारं दृश्य पाहायला मिळतं. इथल्या किनाऱ्यावरून समुद्रात उभा असलेला पडक्या अवस्थेतला पद्मदुर्ग किंवा कासा किल्ला दिसतो. समुद्रालगत टेकडीवरचा राजवाडा, दुसऱ्या टेकडीवरचं दत्तमंदिर, राजपुरी खाडीतला भव्य जंजिरा किल्ला, खोकरीतली इतिहासकालिन देखणी थडगी ही ठिकाणं पर्यटकांसाठी वर्षभर खुली असतात.



### शर्यती :


पाडवा झाला की मुरूडच्या समुद्रकिनारी रंगतात बैल आणि घोड्यांच्या शर्यती. दर महिन्याला किमान एक शर्यत तरी होतेच. विशेष म्हणजे या शर्यती पर्यटकांचं आकर्षण बनल्या आहेत.

### विश्रामबाग किनारा :

मुरूडमध्ये रस्त्यालगत असलेला विश्रामबाग किनारा मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित आहे. किनाऱ्यालगत असणाऱ्या उंच-उंच नारळाच्या झाडांमुळे इथलं सौंदर्य आणखी खुलतं. शनिवार-रविवारी या किनाऱ्यावर पर्यटक गर्दी करतात.

### सुखद सकाळ :

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी उन्हाचा कडाका वाढला असला तरी मुरूडमधला थंडावा फारसा कमी झालेला नाही. दुपारी जरी ऊन जाणवत असलं तरी मुरूडची सकाळ ही आल्हाददायकच असते.





अनु.

# निसर्गाच्या कुशीत...

परिसरातल्या प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यापूर्वी प्रथमतः दत्तमंदिर टेकडीवरून सभोवार नजर टाका. उत्तर आणि पूर्वेला सह्याद्रीमधले उंच डोंगर आणि त्यातच सवतकडा धबधब्याची उभी पांढरी रेघ दिसेल. पूर्वेकडून दक्षिणेकडे नजर वळवताना विखुरलेली खेडी आणि त्यांना जोडणारे रस्ते, दक्षिणेकडे डोंगर टेकड्यांच्या पल्याड राजपुरीची खाडी आणि त्यांच्या आड लपलेला ऐतिहासिक जंजिरा किल्ला दिसेल.





मुंबईपासून फार दूर नसलेलं निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणजे रायगड जिल्ह्यातलं जंजिरा-मुरुड. तसं पाहिलं तर संपूर्ण वर्षभर जंजिरा-मुरुडमध्ये देशी तसंच परदेशी पर्यटक येत असले तरी डिसेंबरपासून पर्यटकांच्या ओघाला उत्साहाची भरती येते. भर दुपारी ऊन असलं तरी हिरवागार निसर्ग आणि थंडगार वारा यामुळे उन्हातून फिरणंसुद्धा आल्हादकारक असतं. रात्री तर न बोचणाऱ्या सुखद गुलाबी थंडीचा आस्वाद घेता येतो. किनाऱ्यावरच्या शुभ्र वाळूवरून चालताना अथांग समुद्राच्या आणि भर समुद्रात विसावलेल्या पद्मदुर्ग उर्फ कासा किल्ल्याच्या दृश्याने मन भारावून जातं. याच किनाऱ्यावर पॅरासेलिंग करत समुद्राचं आणि धरतीचं विहंगम दृश्य पाहण्याचा आनंद घेता येतो.

परिसरातल्या प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यापूर्वी प्रथमतः दत्तमंदिर टेकडीवरून सभोवार नजर टाका. उत्तर आणि पूर्वेला सह्याद्रीमधले उंच डोंगर आणि त्यातच सवतकडा धबधब्याची उभी पांढरी रेघ दिसेल. पूर्वेकडून दक्षिणेकडे नजर वळवताना विखुरलेली खेडी आणि त्यांना जोडणारे रस्ते, दक्षिणेकडे डोंगर टेकड्यांच्या पल्याड राजपुरीची खाडी आणि त्यांच्या आड लपलेला ऐतिहासिक जंजिरा किल्ला दिसेल. दक्षिणेकडून पश्चिमेकडे नजर वळवली तर समुद्रात घुसलेलं नानवेलीच्या डोंगराचं टोक दिसेल. याच टोकावर दीपगृह आहे.



अनु.

त्यानंतर थेट पश्चिमेकडे अरबी समुद्राचं दृश्य आणि त्यात विसावलेला, ढासळत चाललेला भग्न पद्मदुर्ग उर्फ कासा किल्ला. इतिहासात डोकावल्यास हा किल्ला जंजिरेकर सिद्दीवर वचक ठेवण्यासाठी शिवाजी महाराजांनी बांधला हे कळतं. सूर्योदयाच्या वेळी दत्तमंदिर टेकडीवर गेल्यास पूर्वेकडच्या पर्वतराजीतून उदयाला येणाऱ्या सूर्याचं मनोहारी दृश्य पाहून हरखून जायला होतं. सूर्यास्ताच्या वेळी अरबी समुद्रात सूर्याचा लालेलाल गोळा अस्ताला चालल्याचं अप्रतिम दृश्य दिसतं.

जंजिरा किल्ल्याकडे जाण्यासाठी मुरुडपासून सुमारे तीन किलोमीटरवरचं राजपुरी बंदर गाठावं लागतं. तिथून जंजिरा किल्ल्याकडे यांत्रिक किंवा शिडाच्या होडीने जाताना मस्त नौकाविहाराचा आनंदही लुटता येतो. समुद्रातल्या एका बेटावर बांधलेला हा किल्ला अद्वितीयच आहे. बांधकामातले दगडी चिरे समुद्री लाटांच्या माऱ्याने थोडे झिजले असले तरी त्यांना सांधणाऱ्या चुन्याचं (मॉर्टर) सिमेंटिंग जसंच्या तसं आहे. तटावर तलालबांगडी, चावरी आणि लांडाकासम अशा नावांच्या प्रचंड मोठ्या तोफा पाहायला मिळतात.

मुरुड-आगरदांडा रस्त्यालगत मुरुडपासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या खोकरी या ठिकाणी सिद्दींच्या घराण्यातल्या काही पुरुषांच्या देखण्या कबरी पाहता येतील. पुढे मुरुड-गोवा रस्त्यावरून खाजणीचा पूल पार करून तळा तालुक्यातली प्राचीनकालिन सुंदर लेणी पाहता येतील. मुरुड-अलिबाग मार्गावर मुरुड शहरापासून ८ किलोमीटर अंतरावर 'ग्रहलाघव'कार गणेश दैवज्ञाने स्थापित केलेल्या सिद्धिविनायकाच्या सुंदर मंदिरातल्या गणपतीचं दर्शन घेता येईल. आणखी कितीतरी सौंदर्यस्थळं जंजिरा-मुरुडच्या परिसरात पाहता येतील. १० डिसेंबर १९६० रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी जंजिरा-मुरुडला भेट दिली होती. तेव्हा त्यांनी या ठिकाणाचा उल्लेख 'रायगड जिल्ह्याचं काश्मीर' असा केला. अशा या पर्यटनस्थळाला जागतिक पर्यटनस्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

जंजिरा-मुरुड आणखी एका गोष्टीमुळे पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहे. ते म्हणजे ताजे मासे. पापलेट, सुरमई, हलवा, कोलंबी अशा माशांबरोबर नारळाच्या झाडापासून निघणाऱ्या माडीचंही आकर्षण असतं. शहाळ्यांचं अमृततुल्य मधूर पाणी पिण्याचीही मजा लुटता येते. अशा या निसर्गरम्य जंजिरा-मुरुडला प्रत्येकानेच भेट दिली पाहिजे.



अनु.




## जंजिरा :

राजापुरी गावातल्या नारळी बागांनी नटलेल्या समुद्रकिनाऱ्यावरून जंजिरा किल्ला समुद्रात मोठ्या दिमाखात उभा असलेला दिसतो. सिद्दी अहमद खानने बांधलेल्या या किल्ल्यात १९ बुरूज आहेत. किल्ला पाहण्यासाठी होडी किंवा नावेतून दीड किलोमीटरचा सागरी प्रवास करावा लागतो. जलप्रवासाचा हा अनुभव खूप वेगळा आहे.

## होडी :

जंजिरा हा जलदुर्ग पाहण्यासाठी होडी किंवा नावेने जावं लागतं. यंदा उन्हाचा कडाका जास्त असला तरी अनेक पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत.

**जंजिरा-मुरुड या पर्यटनक्षेत्रात तीन जलदुर्ग आहेत. जंजिरा, पद्मदुर्ग उर्फ कासा आणि कोरलई. इतिहासाची साक्ष देणाऱ्या या तीन जलदुर्गांविषयी थोडक्यात माहिती देत आहेत लक्ष्मण दिवेकर**




# इतिहासाचे साक्षीदार

## जंजिरा

पंधराव्या शतकाचा अखेरचा काळ. जंजिराच्या दंडा राजपुरीच्या परिसरात कोळ्यांची वस्ती होती. या कोळ्यांना चाचे आणि लुटारूंचा उपद्रव होता. त्यावर उपाय म्हणून कोळ्यांचे प्रमुख राम पाटील यांनी या खाडीतल्या बेटावर मेढेकोट म्हणजे लाकडी ओंडक्यांचा किल्ला बांधला. निजामशहाने मेढेकोट मिळवण्यासाठी तिरमखानाची नेमणूक केली. आपण दारूचे व्यापारी असल्याची बतावणी करून तिरमखानाने मेढेकोटाला आपली जहाजं लावली.

राम पाटील आणि त्याच्या साथीदारांना त्याने दारूचा नजराणा दिला. सारे कोळी दारूच्या नशेत बेहोश झाल्यानंतर जहाजातल्या बुधल्यांमध्ये लपलेले निजामचे सैनिक बाहेर आले आणि त्यांनी त्या कोळ्यांचा खात्मा केला. राम पाटलांना कैद करून किल्ला ताब्यात घेतला.

तिरमखानाच्या मृत्यूनंतर त्या जागी निजामाने १५३८ मध्ये बुऱ्हाण खानाची नेमणूक केली. त्याने १५६७ ते १५७१ या काळात मेढेकोटाच्या ठिकाणी मजबूत किल्ला उभारला. तोच हा जंजिरा किल्ला. १६१७ मध्ये मलिक अंबरने सिद्दी अंबर सानक या हबशाला (अॅबिसिनियन) जंजिऱ्यात पाठवलं. हाच तो जंजिरेकर सिद्दींचा मूळ पुरुष. या किल्ल्यावर कलालबांगडी, लांडा कासम आणि चावरी या प्रचंड तोफा अजूनही शाबूत आहेत. गोड्या पाण्याचे दोन तलाव किल्ल्यामध्ये आहेत. स्वातंत्र्यकाळात उत्खनन होऊन शंकराचं मंदिर आणि पिंडी सापडल्या. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी बंदरातून होडीची व्यवस्था आहे.



अनु.




ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या पूर्वीचा कुलाबा आणि आताचा रायगड जिल्हा फार भाग्यवान आहे. इथल्या अरबी समुद्राच्या पाण्याने आणि सह्याद्रीच्या डोंगर रांगेने महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाची कामगिरी बजावली आहे. उसळत्या दर्याशी जन्मापासूनच खेळत असलेले कोळी, तांडेल, मांगेले यांनीही समुद्रावरच्या परकीय सत्तांना नामोहरम करण्यात जबरदस्त मर्दुमकी गाजवलेली आहे. अशा हिंमतबाज तांडेलांच्या आणि महाराजांच्या कडव्या सैन्याच्या वर्षानुवर्षं केलेल्या चढायांना ज्याने अजिबात दाद दिली नाही. जो शेवटपर्यंत अजिंक्य राहिला तो म्हणजे कुलाब्याच्या समुद्रातला अतिबळकट जलदुर्ग किल्ले जंजिरा!

जंजिरा हा मुंबईच्या दक्षिणेला ३०-३२ सागरी मैलांवर आहे. 'जेझिरा' म्हणजे अरबीत 'बेट' अर्थात जंजिरा म्हणजे बेटावरचा किल्ला. चारही बाजू उसळत्या दर्याने वेढलेल्या साधारण मैलभर रुंदीच्या प्रचंड खडकावर गेली कित्येक शतकं ही अतिबळकट वास्तू आपल्या अपराजितपणाचा सार्थ अभिमान बाळगून दिमाखात उभी आहे. गेल्या चारशे-साडेचारशे वर्षं इतक्या प्रदीर्घ काळात हा किल्ला कोणाला एकदाही जिंकता आला नाही. इतकी असामान्य अभेद्यता जगात कुठल्याही वास्तूने नक्कीच दाखवली नसेल. आजही किल्ल्याचा मुख्य दरवाजा तेवढाच मजबूत आहे. फरक इतकाच की आज दरवाज्यावर नंग्या तलवारी घेतलेले पहारेकरी नाहीत आणि आपल्याला मर्जीप्रमाणे कधीही जाता येतं. याच दरवाज्यावर मराठे शंभर वर्षं निकराने झुंजत राहिले. पण या दरवाजाने त्यांना अजिबात दाद दिली नाही. किंबहुना महाराजांना आपलं आरमार प्रबळ करायला हा किल्ला आणि त्यावरचे कडवे सिद्दीच कारणीभूत झाले.

परंपरा सांगते की, हा किल्ला सुरुवातीला रामभाऊ नावाच्या कोळी राजाच्या अधिपत्याखाली होता. पण हबसाणातून व्यापारी म्हणून आलेल्या सिद्यांनी हा जलदुर्ग कोळ्यांना फसवून आपल्या ताब्यात घेतला आणि नंतर अनेक शतकं पश्चिम सागरावरची लहानशी पण मजबूत नाविक सत्ता म्हणून आपला दबदबा अबाधित ठेवला. त्यांच्याकडे विजापूरकरांनी किनारपट्टीचं संरक्षण आणि मक्केला जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंच्या वाहतूकीची व्यवस्था अशी दुहेरी जबाबदारी दिली. हे हबशी शरीराने धिप्पाड तर होतेच. पण ते जबरदस्त कडवे लढवय्ये, कुशल कारागीर आणि अतिशय धाडसी नाविक होते. ते एवढे कसबी दर्यावर्दी होते की तकलादू शिडहोड्या घेऊन ते इथून इराणचं आखात, पूर्व आफ्रिकेपर्यंत व्यापारी मालासाठी प्रचंड अंतराच्या मजला मारत. ते सागरी लढाईच्या तंत्रात पारंगत होते आणि समुद्राची त्यांना खडान्खडा माहिती होती.

सिद्यांच्या या किल्ल्याचं पूर्वीचं नाव 'जझिरे मेहरूब' म्हणजे चंद्रकोर! वास्तूशास्त्रातल्या मजबूतीचं आणि बुंदलीने थक्क करणारे कसब असलेला हा किल्ला २० एकर जागेत व्यापलेला आहे. गेली शेकडो वर्षं अजस्त्र उसळत्या लाटांचा मारा, कोकणातला प्रलयकारी पाऊस आणि प्रचंड वेगाने वाहणारे वारे झेलत किल्ल्याची तटबंदी आजदेखील मजबूत आणि अभेद्य आहे.

सिद्यांच्या लढवय्येपणाबरोबरचं किल्ल्याच्या अजिंक्यपणाचं सगळ्यात मोठं बलस्थान म्हणजे इथली 'कलालबांगडी' ही महाकाय तोफ. मराठे आणि सिद्दी यांच्या शेकडो युद्धात तिने आपल्या अजोड मर्दुमकीने स्वतंत्र स्थान मिळवलेलं आहे. किल्ला आजपर्यंत अजिंक्य राखण्यात तिचा सिंहाचा वाटा आहे. बत्ती लावली तर त्याच पूर्वीच्याच ताकदीने तोफगोळा सोडील अशा तयारीत ती तोफ आजही किल्ल्याचं रक्षण करत उभी आहे. त्याकाळी तिला मदत करणाऱ्या 'लांडा कासम' आणि 'चावरी' या तोफांची कीर्तीदेखील काही कमी नाही. या त्रिकूटाने उडत्या पक्ष्यांखेरीज कुणाही परक्याला किल्ल्याजवळ येऊ दिलेलं नाही.

हा जलदुर्ग मिळवण्याची संधी मराठ्यांना दोनदा मिळाली होती. एकदा लायाजी पाटील नावाचा बहादूर कोळी जंजिऱ्याच्या तटाला बंदोबस्ताच्या नजरा चुकवून

भिडला होता. पण ठरल्याप्रमाणे मोरोपंतांची शिरबंदी वेळेवर पोहोचू शकली नाही आणि सगळा डाव वाया गेला. पण महाराजांनी लायाजी पाटलाचा मोठा मान केला. त्याला सरपाटीलकी आणि पालखी नावाची जहाजं भेट दिली.

नंतर १६७० मध्ये तेराव्या मोहिमेच्या वेळी महाराजांनी सूत्रं आपल्या हातात घेतली आणि सर्वसामर्थ्यानिशी जंजिऱ्यावर हल्ला चढवला. असं म्हणतात की ही एकच वेळ होती की ज्या वेळी फत्तेखानाच्या दरबारात त्याच्यापेक्षा मनगटात अधिक जोर असलेले कडवे आणि जिद्दी लढवय्ये होते. त्यांनी फत्तेखानाला कैदेत टाकलं आणि शर्थीने किल्ला लढवून अजिंक्य ठेवला. या मसलीत त्यांचा प्रमुख होता सिद्दी कासम. या अफाट कामगिरीनंतर औरंगजेबाने सिद्दी कासमचा 'याकूतखान' हा किताब देऊन गौरव केला आणि त्याला युद्धनौकांच्या देखरेखीसाठी वार्षिक चार लाखांचं अधिक अनुदान दिलं. विजापूरच्या दरबारात 'वझीर' या किताबापेक्षा 'याकूतखान' हा किताब अधिक रुबाबदार होता.

महाराजांनतर संभाजीराजांनी मराठा आरमार जंजिऱ्यावर चालवून भयंकर नुकसान ओढवून घेतलं. मात्र त्यांनी त्यावेळी जंजिरा जिंकण्यासाठी जी कल्पना राबवली त्याची तुलना दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या वेळी महासागराखालून आणि मलबेरी बंदराजवळून एक पाइप लाइन (पीएलयूटीओ) टाकायची कल्पना होती. ही अचाट कल्पना होती. मुख्य भूभाग ते किल्ला यामधील खाडी बुजवून त्यांनी मार्ग काढायचा प्रयत्न केला होता. भरभक्कम दगडमातीने खाडी बुजवण्याचं काम बरेच दिवस चाललंही. मात्र काही दिवसांनी मोगलांचा सेनापती हुसैन अली हा आपल्या घोडदळाची मुसंडी मारत अवघ्या ५० मैलांवर पोहोचल्याने जंजिऱ्यावर लष्करी सामर्थ्य विभागलं गेलं आणि खाडी बुजवायचं काम थांबवाव लागलं.

हा किल्ला समुद्रात दोन कि मी आत आहे. दंडाराजपुरीहून मचव्याने जावं लागतं. मतलय पडली असेल तर मचवा वल्हवायला लागतो. या शिडाच्या



होडीतला पंधरावीस मिनिटांचा प्रवास थरारक आणि आगळी मजा देणारा आहे. पूर्ण भरतीच्या वेळीही तीस-पस्तीस फूट पाण्याच्यावर राहात असलेली जबरदस्त तटबंदी आपल्याला नक्कीच त्या काळात नेते. किल्ल्याचा तटबंदीचा मजबूत असलेला प्रत्येक चिरा सिद्यांच्या पोलादीपणाची ग्वाही आपल्याला देतो. मराठ्यांनी कोंडी केल्यामुळे मनस्थिती दोलायमान झालेल्या सिद्दी फत्तेखान या आपल्याच सेनापतीला कैदेत टाकणारे आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी असामान्य धडाडीने लढणारे सिद्दी कासम, सिद्दी खैर्यत सारखे पोलादी लढवय्ये नजरेसमोर उभे राहतात. जंजिऱ्याच्या मजबूत तटबंदीचा प्रत्येक दगड त्याने पाहिलेल्या आपल्या लढवय्यांच्या पराक्रमांच्या कहाण्या पुढच्या पिढीला सांगायला किल्ले जंजिरा अजून कित्येक शतकं तेवढ्याच मजबूतीने आणि दिमाखात टिकून राहाणार आहे, उसळत्या दर्याशी... तेवढ्याच सामर्थ्याने टक्कर देत.. हे नक्की!





अनु.


## नानवेल दीपगृह

अनेक ऐतिहासिक प्रसिद्ध किल्ल्यांपैकी एक म्हणजे मुरुडजंजिऱ्याचा किल्ला. या किल्ल्याच्या समोर नानवेल पॉइंट लाइटहाऊस आहे. किल्ल्यासमोरच सुमारे आठ किलोमीटर्सची खाडी आहे. ती ओलांडून पलिकडे गेलं की तिथे लाल-पांढऱ्या रंगाचं आणि अष्टकोनी आकाराचं असं हे दीपगृह आहे. या खाडीला रस्त्याने वळसा घालूनही जाणं शक्य आहे. हे दीपगृह दिघी बंदराच्या जवळ एका टेकडीवर आहे. तिथे जाताना २ टेकड्या चढून व उतरून जावं लागतं. हे दीपगृह उंचावर असल्यामुळे अरबी समुद्राचा नितांत सुंदर देखावा इथून बघायला मिळतो. मुरुड-जंजिराच्या दक्षिणेला हे दीपगृह आहे. या दीपगृहाच्या आजुबाजूला गर्द वनराई पाहायला मिळते. मुरुड जंजिऱ्याला अलिबागहून बसने तासा-दीड तासात पोहोचता येतं.






Ratnagiri district, Maharashtra
Ratnagiri
रत्नागिरी
Maharashtra
Directions
Save
Nearby
Send to your phone
Share
Photos
Satellite
Shekhadi
Aravi
Pangloli
Shrivardhan
Toradi
Harihareshwar
Devhare
Velas
Kelshi
Virsai
Aade
Anjarle
Harnai
Murud
मुरुड
Karde
Ladghar



Murud Beach, Murud, Maharashtra
Murud, Maharashtra 415713
Add destination
Leave now
OPTIONS
Send directions to your phone
via MH SH 272
3 h 56 min
Fastest route
142 km
DETAILS
via NH 66
4 h 2 min
160 km
via MH SH 99
4 h 16 min
110 km
Kashid
Murud Beach
Rajapuri
Dighi
Kudali
Indapur
Mangaon
Raigad Fo Natural Reserve
Diveagar
Mhasala
Shrivardhan
Mahad
Mandangad
Kashedi
Anjarle
Harnai
Palgadh
Murud
Karde
Dapoli
Furus
Khed
Satellite



अनु.

# महाड

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते महाड | | | | | 170 | | | | |
| **1** | शिवथरघळ | धबधबा | | | निसर्ग | 33 | NE | | | |
| **2** | लिंगाणा किल्ला | | किल्ला | ट्रेक | | 32 | NE | 33.5 | NW | |
| **3** | रायगड किल्ला | | किल्ला | ट्रेक | | 25 | N | 56 | SW | |



# सौंदर्य शिवथरघळीचं

मुंबईत राहून पावसाळ्यात भिजण्यापेक्षा दूर, एखाद्या निवांत ठिकाणी मनसोक्तपणे भिजणं कोणालाही आवडेल. मुंबईप्रमाणे मुंबईत पडणारा पाऊसही दूषितच असतो. म्हणूनच पावसात भिजायचं असेल तर मुंबई सोडायलाच हवी. पण त्यासाठी खंडाळा आणि लोणावळ्यासारखे गर्दीचे पर्याय नकोत! त्यापेक्षा एक चांगलं ठिकाण आम्ही तुम्हाला सुचवतो!



छाया : मनोज मेहता

रामदास स्वामींनी 'दासबोधा'ची रचना केली त्या शिवथरघळला जाऊन पाहा. महाड-पोलादपूर मार्गावर महाडपासून बिरवाडीकडे जाण्याच्या रस्त्यावर ३३ किमी अंतरावर ही घळ आहे. पावसाळ्यात या घळीच्या तोंडाशी असणारा प्रचंड जलप्रपात पाहून आपण दडपूनच जातो. या धबधब्याचं वर्णन खुद्द रामदासस्वामींनीही असं केलंय-

*'गिरीचे मस्तकी गंगा। जेथुनी चालल्या बळे।।*
*धबाबा लोटल्या धारा। धबाबा तोय आदळे।।'*

पडवी, कोंड, अंबे शिवथर, कुंभे शिवथर या गावांमध्ये ही घळ पसरलेली आहे. पावसाळ्यात या ठिकाणचं सौंदर्य आणखीनच खुलून येतं. हिरवेगार डोंगर, हिरवळीवर उमलेली रानफुलं व तिथे बागडणारी फुलपाखरं...सर्वकाही आपल्या मनाला मोहून टाकतं. रात्रीच्या वेळी मात्र हा परिसर भयाण वाटत असला तरी काजव्यांनी भरलेली झाडं पाहिली की भीती पळून जाते.

ऐतिहासिक महत्त्व असलेलं हे ठिकाण भटकंती करणाऱ्यांसाठी उत्तम असंच आहे. शनिवार-रविवार अशी जोडून सुट्टी असेल तर शिवथरघळला जाणं सहज शक्य आहे. ज्यांना पावसाचा खरा आनंद लुटायचा असेल त्यांना या ठिकाणाला भेट न देणं कसं जमेल? मग कधी जाताय?





अनु.

# जलसंगीताची अनुभूती

सध्या सह्याद्रीच्या सर्वच डोंगररांगांमधून जागोजागी निसर्गसंगीताचा महोत्सव सुरू आहे. त्यातूनही जलधारा आणि जलप्रवाहांमधून निघणारे संगीताचे स्वर कानांना तर तृप्त करतातच करतात, परंतु इच्छा असली तर या जलसंगीतात सर्वांगानी न्हाऊन घेणंही शक्य होतं. या जलवृंदामध्ये सहभागी झालेले असतात-पावसाची संततधार, कोसळणारा धबधबा, खळखळत जाणार ओढा, संथ वाहणारा निर्झर, वेगवेगळ्या वृक्षांच्या पर्णिकांमधून टपटप आवाज करत अंगाखांद्यावर पडणारे जलबिंदू, आणिक कोण कोण!

अशाच एका जलमहोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळाली गेल्या आठवड्यात शिवथर घळीचा आणि कशेडी घाटात गेलेल्या एका सहलीमधून. मुंबई-पुणे दोन्ही ठिकाणांहून सुमारे १८० किमी अंतरावर मुंबई-गोवा मार्गावरील महाड शहरापासून सुमारे तीस किमीवर आत डोंगराच्या कुशीत असलेला शिवथर घळीचा सुरेख परिसर आहे. या वाटेने तुम्ही जुलै-ऑगस्ट महिन्यात गेलात तर डोंगरमाथा आणि कड्यांवरून जमिनीकडे येणारे अक्षरश: शेकडो धबधबे तुमचे स्वागत करतात. वळणा-वळणाने जाणारा एकेरी रस्ता केव्हा डोंगराच्या कुशीतील घळीच्या (गुहेच्या) पायथ्याशी नेऊन पोहोचतो ते तुम्हालाच कळत नाही. शंभरच्या आसपास असलेल्या पायऱ्या चढून वर गेलात तर अगदी घळीच्याच तोंडाशी धबधबा कोसळणारा पाण्याचा प्रचंड स्त्रोत तुमचे नुसते लक्षच वेधून घेतो असे नव्हे, तर तो तुम्हाला विस्मयच करायला लावतो. चहू बाजूंनी दाट वृक्षराईने दडवून ठेवलेल्या या प्रपाताजवळील गुहेत बसूनच समर्थ श्री रामदास स्वामींनी दहापेक्षा अधिक वर्षे साधनेत घालवली असे इतिहास सांगतो. समर्थांची साधना नुसतीच अध्यात्माच्या मार्गाने जाणारी नव्हती तर त्यात राष्ट्रनिर्मिती आणि स्वतंत्रतेची बीजे निर्माण करणारी आणि रुजवणारी होती हे आपल्या सर्वांना ठाऊकच आहे. (निदान ते तसे असावे) याच ठिकाणी बसून त्यांनी सार्थ श्री दासबोध या ग्रंथाचे लेखन केले असे इतिहासकार सांगतात. त्यामुळे या सगळ्याच परिसराला एक प्रकारचा भारदस्तपणादेखील लाभला आहे. मुख्य म्हणजे हमरस्त्यापासून खूप आतमध्ये असल्यामुळे उटपटांग तत्वांचा उपद्रव कमी असतो.

## आपला परिसर जाणोनि घ्यावा

डोंगरावरून कोसळणाऱ्या अपघाताचे घळीजवळील दरीतूनच शिवथर नदीत रूपांतर होते. ही





अनु.

नदी पुढे जाऊन सावित्री नदीला मिळते. तिच्या या प्रवासात अजून औद्योगिक आणि शहरी प्रदुषणाची सरमिसळ व झाल्यामुळे पूराच्या वेळची अवस्था सोडली तर पाणी स्वच्छ आणि नितळ असल्याचे जागवते. या सगळ्याच खोऱ्यातील लोकांना अजूनही शेतीशिवाय कामधंद्याची इतर साधने फारशी उपलब्ध नसल्याचे जाणवते.

सगळ्याच परिसरात वेगवेगळ्या प्रकारची रानफुले जलस्त्रोतांच्या संगीत महोत्सवात सामील होऊन याना डोलवतांना दिसतात. वेगवेगळ्या पाखरांच्या किलबिलाट वातावरणात जिवंतपणा आणतो.

या सगळ्यात विसंवादी सूर असतो ते फक्त इथे देखील येणाऱ्या मनुष्य प्राण्याचाच! मूळात एवढे सुंदर मनप्रसन्न करणारे, निसर्गरम्य असलेले स्थळ बरोबर आलेल्या लोकांपैकी पन्नास टक्के लोकांनी तरी बघितलेले नसते. जवळपास सर्वच प्रवाशांची आर्तस्वरात किंचाळण्याची स्पर्धाच लागलेली जाणवते. छायाचित्रण करणारे बहुतांश हौशी लोक इथल्या निसर्गाला कॅमेऱ्यात टिपण्याऐवजी आपापली छबीच त्यात बंदिस्त करून न्याहाळताना बघितले की, थोडे वाईट वाटते.

निसर्गाची अशी मुक्त उधळण आणि संगीताची अशी मैफल सगळीकडे अनुभवायला मिळतेच असे नाही. त्यामुळे नाक-कान-डोळे उघडे पण तोंड बंद ठेवून त्यात सामील होणे आवश्यक असते. मात्र असे क्वचितच होतांना दिसते.

इथे येणाऱ्यांनी आल्या-आल्या घळीच्या पायथ्याशी असलेल्या दोन छोटेखानी, घरगुती उपहारगृहात आपल्या जेवणाची व्यवस्था करूनच वर घळीत गेलेले बरे. त्यामुळे प्रवासातील अमूल्य वेळ वाचवण्यास मदत होते. मनन-चिंतन, निसर्ग निरीक्षण करण्यासाठी येणाऱ्यांच्या राहण्याची सोय आता घळीतील निवासस्थानात होऊ शकते. उपहाराची व्यवस्था मात्र आपणच आपली खालच्या उपहारगृहात येऊन करायची असते.

थोडे गैरसोयीचे असले, तरी पावसाळ्यातच इथे येणे अधिक आनंददायी असते.






अनु.

## शिवथरघळ

समर्थ रामदासस्वामींच्या अनेक घळींपैकी अत्यंत महत्त्वाची आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाची म्हणजे शिवथरघळ. डोंगराच्या बेचक्यात वसलेल्या या घळीच्या डोक्यावरुन शिवथर नदीचा प्रवाह आतुरतेने कड्यावरुन खाली झेप घेतो. घळ खऱ्या अर्थाने अनुभवण्याचा काळ पावसाळ्याचाच. चारही बाजूला हिरवळ, धबधब्याच्या स्वरुपात कोसळणारं पाणी, पावसाची रिपरिप हे सारं निसर्गप्रेमींसाठी वेड लावणारं असतं. महाडपासून जवळपास २५ किलोमीटर्सवर हे ठिकाण आहे. महाड आगारापासून इथे जाण्यासाठी एसटीच्या बस मिळतात.



मुंबईच्या 'हॉलिडे हायकर्स'चे हिरा पंडित यांनी २५ डिसेंबर १९७८ साली प्रथमच लिंगाणाची चढाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यानंतर तिथे बऱ्याच साहसी मोहिमा पार पडल्या. लिंगाणा चढाईचे आव्हान आम्हीही पेलले. खऱ्या अर्थाने आमची कसोटी पाहणारी ही चढाई होती.

# साहसाची श्रीमंती लिंगाणा

### लिंगाणा

**जिल्हा** - रायगड
**पायथ्याच गाव** - पानेगाव
**उंची** - ९०८ मीटर
**चढाई श्रेणी** - अवघड
**मार्ग** - नाशिक-महाड-बिरवली-दापोली-पानेगाव
**पाणी** - ३ जल टाक्या
**मुक्काम** - गुहेत

लिंगाणा किल्ल्याची चढाई तशी साहसी प्रकारात मोडणारी आहे. क्लायंबिंग, रॅपलिंगसाठी लागणारे साहित्य, ते हाताळणारे जाणकार गिर्यारोहक सोबत स्थानिक वाटाड्याही हवाच. तरच हा किल्ला सर करण्याचं नियोजन करावं.



अनु.

नाशिकहून पनवेल, पेण, रोहा, महाड असे मार्गक्रमण करत रात्री अकराला महाडला पोहोचलो. तिथेच ठरल्याप्रमाणे मुंबईकर सह्यमित्र भेटले. मग तिथून २२ किमीवरच्या पानेगाव या पायथ्याच्या गावाकडे मार्गस्थ झालो. काळ नदीच्या खोऱ्यातल्या या गावाकडे जाताना महाड, बीरवाडी, मांगरुण, दापोली मग पानेगाव असा थेट गाडी मार्ग आहे. आमच्या गाड्या रात्री बारा वाजण्याच्या सुमारास पानेगावात पोहोचल्या. गाव तर शांत झोपलेलं होतं पण तिथल्या उनाड कुत्र्यांनी तुतारी वाजवून आमचं स्वागत केलं. गावातल्या देवी मंदिरात आम्ही पथाऱ्या पसरल्या.

सकाळी साडेसहा वाजता सर्व भटके एकसाथ उठले. फ्रेश झालो आणि बरोबर साडेसात वाजता मार्गाला लागलो. समोर स्वप्नवत लिंगाणा उभा ठाकला होता. अगदी भोले शंकराच्या पिंडीसारखा वाटणारा! पूर्वरंगात त्याचं रुप शेलुटी (फोटोग्राफीतला शब्द) वर्गात मोडणार होतं. सूर्याजीराव तापण्याच्या आत बराच मोठा पल्ला गाठावा अशी ताकीदच कॅप्टन हिरा सरांनी दिलेली असल्याने पावलं भराभरा चालू लागली. दोन तासांच्या वेगवान चालीनंतर लिंगाणा माचीवर येऊन पोहोचलो. लिंगाणा आम्हाला आव्हान देत होता. इतक्या वर्षात अनेक बुलंद गडकिल्ल्यांना आणि डोंगरांना भिडलो असल्याने तोच उत्साह भरून आला. तासाभरात लिंगाणाच्या पश्चिम पोटावरील गुहेत जेवण उरकून घ्यायचं ठरलं. गुहेच्या छत्रछायेत दुपारच जेवण आटोपलं. समोर पानेगाव व परिसर लख्ख प्रकाशात उजळून निघालेला होता. कुठेतरी हिरवेपणाचं अस्तित्व सुखावून टाकणारं होतं. दूरवर किल्ले रायगड बघताना शिवरायांची आठवण स्फूरण भरत होती. खरंच मन भरून आलं. मनात इतिहासाची पाने फडफडली. एक-एक प्रसंग स्लाईड-शो सारखा पुढे सरकू लागला. रायगडाभोवतीच मन कितीतरी वेळ गुंतून गेलं होतं.

भानावर आलो तर सवंगडी पुढच्या वाटेला निघण्याच्या तयारीला लागले होते. हळूहळू पावलं पुढे सरकू लागली. काही वेळातच लिंगाण्याच्या दक्षिण टप्प्यावर आलो. आता पूर्वेला जायचं होतं. ते विहंगम दृश्य कॅमेऱ्यात कैद करत लिंगाणाच्या पूर्व बाजूच्या पोटावरून चालू लागलो. अगदी एकेरी पाऊलवाट होती. उजवीकडे आठशे ते हजार फूट खोल दरी, पायथ्याशी झाडाझुडपांचं रान होतं.

आता मात्र पावलं हळूवार अन् नजर वाटेवर स्थिर असा प्रकार झाला होता. सगळे संयमानं चालत होते. ऊन जाणवू लागलं होतं. डावीकडे आधारासाठी लिंगाणा कातळ आपलासा वाटत होता. पुढे तर वाट अजूनच अस्पष्ट होऊ लागली आणि उजवीकडची खोली अधिकच भयानक वाटू लागली. एके ठिकाणी तर अक्षरशः रांगत गेलो.

लिंगाणा आता आपले रंग दाखवू लागला होता. उन्हाच्या तडाख्याने पाण्याचा साठा रिता होऊ लागला. काही वेळातच उत्तरेला बोराट्याच्या नाळेचं अस्तित्व दिसू लागलं. डावीकडे वळसा मारत लिंगाण्याच्या अगदी उत्तर टोकावर विसावलो. तोपर्यंत आघाडीच्या सहकाऱ्यांनी चढाईसाठी दोर बांधलेला होता. आता डोक्यावर हेल्मेट, कंबरेवर हार्नेस, सोबतीला डिसेंडर, कॅराबीनर, हातात मिटॉन अशी सर्व सुरक्षा बाळगून एक एक जण गुहेच्या टप्प्यावर चढलो. टप्प्यापासून गुहेत जाणं म्हणजे महाकठीण आणि जीवघेणं काम वाटत होतं. समोर रायलिंगचा कातळकडा टोलेजंग दिसत होता. तितक्यात दिवस ढळू लागला. पूर्व कड्यावरील पाण्याच्या टाकीतलं पाणी घेऊन फ्रेश झालो. उत्तर टोकावर चहाचे घोट रिचवत मावळतीच्या रंगात गप्पांची मैफल जमली. समोर रायलिंग व बोराट्याच्या नाळेचा बुलंदपणा भन्नाट दिसत होता. यानिमित्ताने सह्याद्रीच हे आगळंवेगळं रूप नजरबंद होत होतं. गुहेत स्वयंपाकाची तयारी सुरू झाली. तिथेच झोपण्याचीही व्यवस्था आम्ही केली. लिंगाणाचं अर्ध आव्हान पार केल्याचं समाधान मिळाल्याने शांत झोप लागली.

सकाळी डोळे उघडताच धुक्याने लिंगाण्याला लपेटलेलं दृष्य दिसलं. सायंकाळी सहापर्यंत लिंगाणा पार करून पानेगावात पोहोचायचे असल्याने सर्व लवकरच तयार झालो. अजूनही धुक्याचा पडदा बाजूला सरकला नव्हता. वेळेचं भान ठेवत सहकारी सरसर पहिल्या टप्प्यापर्यंत चढले. तिथेच एका दगडाला दोर बांधून त्यांनी एकेकाला वर क्लाईंब करत येण्यास सांगितले. धुक्यातून आजूबाजूचं काहीच दिसत नसल्यामुळे पहिला टप्पा न घाबरता पार झाला. काही वेळातच धुक्यानं आपलं बिऱ्हाड आवरतं घेतलं आणि सर्व लख्ख दिसू लागलं. बापरे ! फक्त डोंगर धारेवरची चढाई आणि दोनही बाजूंना नजर भिरभिरणारी खोली पाहून लिंगाणाच्या वाटेला शक्यतो कुणी का जात नाही, याची प्रचिती येऊ लागली. बरं लिंगाण्याचा रॉक जरा ठिसूळ आणि मातीही जरा मुरमाड असल्यामुळे काळजीच कारण होत. पण हिरा काका व इतर आघाडीचे सहकारी सहजता दाखवत आमचाही वावर सहज करण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे सर्वांचाच आत्मविश्वास द्विगुणीत झाला होता.

लहान मोठे टप्पे पार करत तासाभरात बरीच मजल मारलेली होती. एका धारेवर विश्रांती थांबा ठरवला. नजर दूरवर खिळली. पूर्वेला बोराट्याची, सिंगापूर नाळ व इतर कुटुंबकबिला अगदी भव्य दिव्य दिसू लागले. पुन्हा एकेरी वाट सुरू झाली. शेवटचे दोन कठीण टप्पे पार करत माथा गाठला आणि आनंदाला पारावार उरला नाही. जणू एव्हरेस्ट सर केल्याच्या भावना मनी दाटून आली. सर्वांनीच जल्लोष केला आणि फोटो काढण्यात गुंग झाले.




रायगड... महाराष्ट्राच्या सह्याद्रीचा अनभिषिक्त राजा! मराठी कर्तृत्वाची सर्वश्रेष्ठ पेठ! यादवांच्या पाडावानंतर साकारलेली मराठ्यांची राजधानी. मराठ्यांनी जिथे कायम नतमस्तक व्हावं, अस पवित्र ठिकाण!

राज्याभिषेकामुळे स्वराज्याला राजकीय, सामाजिक स्थैर्य प्राप्त होईल, या कारणाने गागाभट्टांनी महाराजांना राज्याभिषेक करून घेण्याचा सल्ला दिला. राजधानीसाठी रायगड हे ठिकाण नक्की झालं आणि सह्याद्रीच्या या शिखरावरून मराठी तुतारी दऱ्याखोऱ्यात अतीव आनंदाने निनादली.

हा रायरीचा डोंगर सह्याद्रीच्या ऐन गाभ्यात असल्यामुळे अतिसुरक्षित जागी होता. महाराज गमतीने म्हणत की, गडाचे दरवाजे बेलाशक उघडे ठेवा. कारण शत्रू जरी इथपर्यंत आला तरी तलवार उचलण्याचं बळ त्याच्या मनगटात उरणार नाही. गडाच्या चहूबाजूला असणारे डोंगराचे कडे, रंधा फिरवावा तसे ताशीव. गडावर सपाटीही भरपूर होती. महाराजांच्या बांधकाम खात्याचे प्रमुख हिराजी इंदुलकर यांनी गड सजवायला घेतला. गडावर राजवाडा, राजसभा, जगदीश्वराचं देखणं देऊळ, बाजारपेठ अशी अनेक बांधकामं झाली. राजसभेतल्या सिंहासनाजवळ उभं राहून हळू आवाजात बोललं तरी ते दूर असलेल्या प्रवेशद्वाराजवळ एकू येईल, अशी ध्वनीशास्त्राची कमाल इथल्या कसबी कारागिरांनी केली. राजसभेच्या प्रवेशद्वाराची उंची इतकी भव्य की हत्तीवर झेंडा फडकवत स्वारी आली तरी ती सहज आत यावी. या प्रवेशद्वाराचा नगारखानादेखील भव्य साकारला गेला. गडावर कुशावर्त आणि गंगासागर या मोठ्या तलांवाबरोबर



इतर ठिकाणीही पाण्याची उत्तम व्यवस्था केली गेली. गडावरची बाजारपेठ तर उत्कृष्ट बांधकामाचा नमुनाच व्हावा, इतकी सुरेख बांधली गेली. इथली जोती इतकी उंच की घोड्यावर बसूनदेखील खरेदी सहज करता यावी. अगदी आज सगळं भग्नावस्थेत असलं तरी याचा सहज प्रत्यय आपल्याला येतो.

गडाचा आकार चौकोनी असून गडाला तीन टोकं आहेत. टकमक, हिरकणी आणि भवानी. आजही गडावर बारा महिने जाता येतं. इथून दूरवर पसरलेल्या गांधारीच्या खोऱ्याचा विहंगम देखावा दिसतो. टकमक टोकाखाली छत्री निजामपूर गाव दिसतं. बाजूलाच कोकणदिव्याचा प्रचंड घेर असलेला डोंगर आहे. राजसभेतून उतरून बाजारपेठ ओलांडली की जगदीश्वराचं काळ्या पाषाणात घडवलेलं अप्रतिम देऊळ आहे. देवळाला मोठं प्रांगण असून बाहेरच्या बाजूला महाराजांची व त्यांच्या आवडत्या वाघ्या कुत्र्याची समाधी आहे. समाधीच्या परिसरात निवांत शांतता आहे. इथून पुढे जाणारी वाट भवानी टोकावर जाते. ही गडाची पूर्व बाजू असून दूरवर राजगड, तोरणा व सिंहगड दिसतात. डाव्या बाजूला समोर लिंगाण्याचा सुळका लक्ष वेधून घेतो. उजवीकडे प्रतापगडाच्या निळ्याजांभळ्या डोंगररांगा दिसतात. तोरण्याच्या मागून पूर्वा उजळते आणि टकमक टोक किंवा हिरकणी बुरूजावरून सूर्यास्ताचा अप्रतिम देखावा दिसतो.

मुंबई-गोवा महामार्गावर साधारण पावणेदोनशे कि.मी. वर असलेल्या महाडपासून चोवीस कि.मी. आत गड वसलेला आहे. पायथ्याचं गाव पाचाड असलं तरी सध्या वाहनरस्ता

वरच्या 'खूबलढा बुरूजा'पर्यंत आहे. त्यामुळे गडावरची चढाई फारच सोपी झाली आहे. 'खूबलढा बुरूजा'पासून वर जायला मोठी पायवाट आहे. वाटेत टप्प्याटप्प्यांनी रूंद दगडी पायऱ्याही आहेत. सर्वसाधारणपने या वाटेने रमतगमत वर जायला दोन तास लागतात. सध्या रोप-वेने हेच अंतर पाच मिनिटांत गाठता येतं. गडावर जिल्हा परिषदेची व पर्यटन मंडळाची

होत नाही. आता शाळांना सुट्ट्या पडल्या आहेत. एखाद्या शनिवार-रविवारी आपण मुलांना रायगड दाखवला पाहिजे. ही वेगळी सहल त्यांना नक्कीच भावेल. आता तर रोपवे असल्याने घरातल्या वृद्धांनाही सोबत नेता येतं व त्यांनाही रायगड सहज बघता येतो. फारतर जाताना रोप-वेने जाऊन येताना पायी उतरलं तरी मुलांना खूप मजा येते. मात्र गडावर फिरताना विशेषतः



राहण्याची व्यवस्था आहे. तसंच रोप-वेवाल्यांचंदेखील विश्रामगृह आहे. पायथ्याला देशमुख आणि इतर काही गावकऱ्यांकडे राहण्या-जेवण्याची व्यवस्था आहे. हौशी डोंगरभटके स्लिपिंग बॅग आणि कॅरीमॅट घेऊन सरळ जगदीश्वराच्या बाजूच्या दालनांमध्ये मुक्काम करतात.

सध्या ट्रेकिंगची आवड समाजात चांगलीच रुजायला लागली आहे. आज बहुतेक जण सह्याद्रीत पायी फिरायला जातात. असं असलं तरी रायगड मुंबई-ठाण्यापासून बऱ्यापैकी दूर असल्याने रायगडचा ट्रेक सहज

भवानीटोक, टकमकटोक, व हिरकणी या बुरूज या ठिकाणी फार कडेला जाऊ नये. या तिन्ही ठिकाणचा कडा एकदम धोकादायक आहे. त्यामुळे इथे जाताना मुलांवर खूप लक्ष दिलं पाहिजे.

नुसतं रायगड हे नाव जरी मनात आलं तरी सगळा इतिहास डोळ्यासमोर अक्षरशः जिवंत होतो. हे स्थानच असं आहे की प्रत्येक मराठी माणसाने आयुष्यात एकदा तरी रायगडला जायला हवं.



अनु.



# प्रदक्षिणा नंदादीपाची

सह्याद्रीच्या ऐन गाभ्यात एकांड्या शिलेदारासारखा उभा असणारा रायगड म्हणजे जणू स्वराज्याचा नंदादीपच. भटक्यांसाठी या दुर्गपंढरीची वारी करणं हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. हिरवाईचा बहर ओसरूनही जाणवणारा रानाचा धुंदपणा, गर्द राईतल्या वाटचालीत घडणारं रायगडाचं कातळकोरीव दर्शन, विविध प्रकारच्या वनस्पती अन् या साऱ्यांतून अलगद उलगडत जाणारा नंदादीप. हे सगळं अनुभवण्यासाठी रायगडाची प्रदक्षिणा करायला हवी.

तणसं, रासिवटा, जंबुद्वीप, रायरी ही नावं आहेत अभेद्य रायगडाची. त्यातच नंदादीप हे सुंदर आणि समर्पक नावही गडाला शोभणारं. गडाला भवानी, श्रीगोंदे, टकमक अशी टोकं, एखाद्या दिव्याला वात लावल्यावर जसं दिसेल त्या जागेसारखी आहेत. सह्याद्रीच्या ऐन गाभ्यात एकांड्या शिलेदारासारखा उभा असणारा रायगड जणू स्वराज्याचा नंदादीपच. भटक्यांसाठी या दुर्गपंढरीची वारी करणं हा एक अविस्मरणीय अनुभव असतो.

सर्वाधिक दुर्गावशेष अंगाखांद्यावर मिरवणारा हा दुर्गराज गडमाथ्यावर फिरून पाहाणं जितकं आनंददायी, तितकंच त्याच्या घेऱ्यात हिंडणंही. त्यासाठी रायगडाची प्रदक्षिणा करायला हवी. तसं बोराट्याची वा सिंगापूरची नाळ, घोळ-रायगड या वाटांनी कोकणात उतरणाऱ्यांची अर्धी रायगड प्रदक्षिणा होतेच. मात्र एकदा स्वतंत्रपणे ही प्रदक्षिणा पूर्ण करावी. रायगड प्रदक्षिणेसाठी शक्यतो आदल्या दिवशी रात्री रायगडवाडीला मुक्कामी जायला हवं. थोडी धावपळ करत पहाटे निघून रायगडवाडीला पोहोचल्यास एका दिवसातही प्रदक्षिणा पूर्ण करून आपण परतू शकतो. मात्र त्यासाठी स्वतःचं वाहन हवं. चितदरवाजा व खुबलढा बुरुजाजवळच्या वाडीच्या खिंडीतील देशमुखांकडे न्याहारी उरकून सकाळी लवकर चालायला सुरवात करावी. तशी वाट चुकणारी नाही, तरीही गरज भासल्यास रायगडवाडीतून वाटाड्या मिळू शकतो.

वाडीतल्या शिवारात सिद्दीनं बांधलेल्या कोटाचे अवशेष आहेत. तिथून टकमक टोकाच्या दिशेनं कूच करावं. पावलोपावली टकमकाचं उग्र रूप सोबत करीत राहातं. गडभेटीत या कड्यावरून न्याहाळलेला आसमंतही आठवू लागतो. रायगडाच्या घेऱ्यात जपलेली दाट झाडी पहिल्या टप्प्यात सोबत करते. वाटेतील रायनाकाच्या स्मारकाचं दर्शन घेऊन पुढे जाताच धनगरवाडा लागतो. पिढ्यान्पिढ्या त्या रानात जगणारी ती मंडळी पुढील वाटेचा हिशेब सांगून निरोप देतात. इथेच टकमकाकडे जाणारी रायगडाची भिंत अक्षरक्षः अंगावर येणारी वाटते. या टप्प्यावर लिंगाण्याचंही दर्शन घडतं.

त्यानंतरची खडकाळ वाट व पानगळ झालेल्या झाडांच्या गर्दीत मोठा ओहोळ आडवा येतो. अर्थात उन्हाळ्याची चाहूल लागल्यानं तो कोरडा-ठणठणीत असतो. तोफेचा माळ ओलांडून तुम्ही भवानी कड्याखालच्या वाटेला लागता. रायगडाची एक सलग भिंत साथ देत असतेच. या वाटेवर भटकतानाच गडाचा 'धोंडा तासिव एकच आहे' याचीही प्रचिती येत राहते. पुढे दाट झाडांचा टप्पा ओलांडला, की वाघोलीची निसरडी खिंड ओलांडून तुम्ही पलीकडच्या बाजूला जाता. उन्हाळ्यातही या परिसरातील हिरवीगार झाडी पाहताच अंगाला पडलेल्या साऱ्या श्रमांचा विसर पडतो.


उजवीकडे वाघ दरवाजा व डावीकडे

काळकाईचा वा पोटल्याचा डोंगर अशी चाल सुरू राहाते. रायगडावर जाणाऱ्या बहुतांश लोकांना वाघ दरवाजा हे ठिकाण माहीत नसतं आणि ते माहीत होऊ नये अशाच हेतूनं दुर्गम जागी बांधलेलं अप्रतिम गडद्वार आहे. या रानातून त्या दरवाजाखालचा उभा कडा डोळ्यांचं पारणं फेडतो. वाटेत करवंदीच्या जाळ्यांनी रानमेव्याची अक्षरशः लयलूट केलेली असते.

काळकाईच्या घळीत थोडा चढावाचा टप्पा येतो. तो पूर्ण करताच तुम्हाला गडावर जाणारे रोप-वे दिसू लागतात. तेव्हा गडाच्या इतिहासात हरवलेले तुम्ही पुन्हा वर्तमानात येता. सुमारे १५ किलोमीटर अंतराची ही प्रदक्षिणा किमान पाच ते सात तासांत पूर्ण होते. या वाटेवर पाणी कुठेही नसल्यानं सोबत भरपूर पाणी ठेवा. सातत्यानं चालण्याची सवय असणाऱ्यांनीच या वाटेच्या नादी लागावं. उन्हाळ्यात कोकणातला हैराण करणारा उकाडा ही प्रदक्षिणा पूर्ण होताच सुसह्य वाटू लागतो आणि डोळाभर पाहिलेलं रायगडाचं रांगडं रूप परतीच्या प्रवासातही आठवत राहातं. इतिहासाच्या वाटेला उजळणारा हा नंदादीप मनात त्याच्या असंख्य पैलूंसह नव्यानं तेवू लागतो.

# श्रीवर्धन

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते श्रीवर्धन | | | | | 171 | | | | |
| **1** | दिवेआगर बीच | समुद्रकिनारा | | | मंदिर | 21 | NW | | | |
| **2** | श्रीवर्धन | समुद्रकिनारा | | | मंदिर | 0 | | | | |
| **3** | हरिहरेश्वर | समुद्रकिनारा | | मठ | मंदिर | 19 | S | 19 | S | |
| **4** | हिंमतगड (बाणकोट) (व्हिक्टोरिया फोर्ट) | | किल्ला | | निसर्ग | 22 | S | 17.5 | SE | |






मुंबई-गोवा हायवेवरून माणगावपर्यंतचा प्रवास तसा डोंगर दऱ्या आणि दाट झाडीतून जाणारा. परंतु, श्रीवर्धनपासून दिवे आगारपर्यंतचा प्रवास नेत्रसुखद अनुभव आहे. एका बाजूला अथांग सागर दिवे आगारात शिरेपर्यंत आपली साथसंगत करत असतो, तर एका बाजूने आरवी, वाळवटी, कोंडवली, शेखाडी, भरडखोल ही किनाऱ्यावरची पाच-पंचवीस टूमदार घरांची छोटी गावं मागे पडत असतात. वाटेतल्या वाळवटी गावात महालक्ष्मीचं मंदिर आहे. तिथली वरचा आणि खालचा पाट अशी ग्रामरचना पाहिल्यानंतर गुहागरची आठवण येते. भरडखोल गावाच्या खडकाळ किनाऱ्यावर माशांचा लिलाव चालतो. तिथले शेकडो प्रकारचे मासे आणि कोळ्यांची उडालेली धांदलही पाहण्यासारखी असते. कार्ले नदीवरचा छोटा पूल ओलांडल्यानंतर दिवे आगारात आपला प्रवेश होतो.

संध्याकाळी देवाचा गाभारा प्रकाशाने उजळत असल्याने इथलं ग्रामदैवत उत्तरेश्वराच्या मंदिरात दिवा लावला जात नसे. आपोआप लागणाऱ्या या दिव्यामुळे गावाचं नाव दिवे पडलं. तसंच, या गावाशेजारून पाणी भरतीच्या वेळी आत शिरायचं. त्या वेळी दिवे गाव आणि त्याच्या पूर्वेकडील आगाराचा पट्टा यांचं एक बेट तयार व्हायचं. गावाला चौहोबाजूंनी पाण्याचा वेढा पडायचा. परंतु, गाव आणि आगार सुरक्षित असायचं. त्यामुळेच दर्याशी अहोरात्र झुंजत असलेल्या या गावाचं नाव दिवे आगार पडलं.

निसर्गाच्या खजिन्यासह प्राचीन मंदिरं, गडकिल्ले, लेणी, गुहा अशी असंख्य ऐतिहासिक स्थानं दिवे आगार आणि त्या भोवतालच्या परिसरात आहेत. दिवे आगारातलं पक्षीजीवनही समृद्ध आहे. थंडीत समुद्रकिनाऱ्यांवरील खडकांत युरोप आणि सैबेरीयातून आलेले टर्न स्टोन पक्षी दिसतात. तुरुतुरु चालणाऱ्या या पक्षांची खडकांमध्ये किडे खाण्यासाठीची लगबग पाहण्यासारखी असते. रिफ हेरॉन आणि ग्रीन हेरॉन या बगळ्यांच्या जातीही इथे आढळतात. गल पक्षांचे थवेही थंडीत अवतरतात. सॅण्ड पायपरर्स बाकदार टोक असलेला समुद्री गरुडांसारखे असंख्य पक्षी इथे बागडत असतात.

दिवे आगारात राहण्याची आणि जेवणाची उत्तम सोय आहे. घरगुती खानावळींमध्ये मिळणारं जेवण लज्जतदार असतं.

**नारळ, सुपारीच्या बागांची हिरवीगार झालर, रेखीव काटकोनातल्या रस्त्यांवर घातलेल्या लाल मातीच्या पायघड्या, कानात रुंजी घालणारी दर्याची गाज, रुपेरी वाळूचं लेणं लेवून साद घालणारा समुद्र आणि त्या जोडीला मस्त निवांतपणा... शहरी धकाधकीतून दोन दिवसांची विश्रांती घेण्यासाठी दिवे आगार हे चिमुकलं कोकणी खेडं हा उत्तम पर्याय ठरू शकतो.**

परंतु, प्रेमळ आदरातिथ्याचा अनुभव घ्यायचा असेल तर इथल्या एक्झॉटिका बिच रिसॉर्टला पर्याय नाही. हिरव्या गर्द झाडीत लपलेल्या टुमदार कॉटेजमध्ये राहण्याचा इथला अनुभव अद्वितीय आहे. 'एमटीडीसी'चं हे रिसॉर्ट असलं तरी इथे कुठेही कमर्शिअल अॅप्रोच नाही. इथला अॅम्बियान्सही भन्नाट आहे. प्रसाद कोळंबकर या मराठमोळ्या तरुणाकडे या रिसॉर्टची जबाबदारी आहे. समुद्राला अत्यंत खेटून असलेल्या या रिसॉर्टला सीआरझेडचं बंधन असल्यामुळे इथे पक्कं बांधकाम करता येत नाही. परंतु, या रिसॉर्टला लाभलेलं नैसर्गिक सौंदर्य खुललंय.

## सुवर्ण गणेश मंदिर

दिवे आगारचं प्रथम दैवत म्हणून या स्थानाचं महत्त्व आहे. या मंदिरात एक किलो ३२५ ग्रॅम वजनाचा गणपतीचा सोन्याचा मुखवटा आहे. १९९७ मध्ये संकष्टी चतुर्थीच्या दिवशी धर्मा पाटील यांना नारळी पोफळीच्या बागेतील खोदकामादरम्यान एका तांब्याच्या पेटीत ही मूर्ती, गळ्यातली कंठी आणि काही खडे सापडले होते. या मूर्तीची मंदिरात प्राणप्रतिष्ठापना केल्यानंतर गेल्या १० वर्षांत दिवे आगार गावाची भरभराट झाली आहे.

## शिलालेख

दिवे आगारात पाच प्राचीन ताम्रपट, दोन शिलालेख आणि दोन मुयारं सापडली. त्यातला एक ताम्रपट मराठी भाषेतला पहिला ताम्रपट म्हणून प्रसिद्ध आहे. हे ताम्रपट पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळात असलं तरी दोन शिलालेख मात्र दिवे आगारात पाहायला मिळतील.

# जीवना बंदर

श्रीवर्धन ते दिवे आगार या समुद्रकिनाऱ्याने जाणाऱ्या

**इथे यायचा सीझन**

**नोव्हेंबर ते फेब्रुवारी**

अल्हाददायक, मोकळं हवामान, स्थलांतरित पक्षांचा हंगाम.

**मार्च ते मे**

उष्ण दमट हवामान. परंतु, आंबा, काजू, फणस, करवंद या कोकणच्या मेव्याचा सीझन.

जून ते सप्टेंबर

पर्जन्यकाळ. किनाऱ्यावर धडका देणाऱ्या उसळत्या लाटांचं रौद्रदर्शन. जरा हटके सहलीचा आनंद.

**कसं जाल?**

मुंबई-गोवा हायवेवर माणगावहून हरिहरेश्वर ५३ किलोमीटर. माणगावपासून म्हसाळ्यापर्यंत गेल्यानंतर अवघ्या तीन किलोमीटरवर दिवे आगार, तर १६ किमीवर हरिहरेश्वर. दिवे आगारहून हरिहरेश्वरला जाताना वाटेत श्रीवर्धन आणि वेळास ही ठिकाणं लागतात.

मुंबई ते दिवे आगार अंतर : १९८ किमी

बंदरावर हे बंदर आहे. समुद्रात शिरलेल्या टेकडीच्या पायथ्याशी सुरू असलेली कोळ्याची धांदल, माशांचे असंख्य प्रकार, मासेमारीसाठी वापरली जाणारी जाळी, बोटींचे विविध प्रकार इथे पाहायला मिळतात. एखाद्या निवांत बसलेल्या कोळ्याशी तुम्ही गप्पा मारायला बसलात तर सुमद्रातील मासेमारीच्या शौर्यकथाही ऐकायला मिळतील.



## दिवेआगर

दिवेआगर हे श्रीवर्धन तालुक्यातलं गावसुद्धा रूपेरी वाळूचा किनारा असलेलं रमणीय ठिकाण. एकूण परिसरही निसर्गरम्य. समुद्रकिनारी केवड्याचं मोठं बन आहे. असं बन इतर ठिकाणी क्वचितच सापडते. गावात आठ हिंदू मंदिरं, एक मठ, मशीद आणि धर्मशाळा आहे. काही वर्षांपूर्वी दिवेआगरातल्या सुपारीच्या एका खासगी बागेत मशागतीसाठी जमीन खणण्यात येत होती. या खोदकामात एक मोठी सोन्याची गणेशमूर्ती सापडली होती. या मूर्तीसाठी दिवे आगरमध्ये एक सुंदर देवालय उभारण्यात आलेलं आहे. या देवालयात ठिकठिकाणहून आलेल्या गणेशभक्तांची रीघ नेहमीच असते.

---

## श्रीवर्धन

श्रीवधनचा रूपेरी वाळूचा किनारा विलोभनीय आहे. तिथलं निसर्गसौंदर्य सर्वांनाच आकर्षित करतं. याच किनाऱ्याच्या एका टोकाला जीवना नावाचं एक नैसर्गिक बंदरही आहे. सोळाव्या आणि सतराव्या शतकात व्यापाराच्या दृष्टीने हे बंदर अतिशय उपयुक्त होतं. श्रीवर्धन हे पेशव्यांचे मूळ ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. तिथे सोमजाई देवी, कालभैरव, जीवनेश्वर (शंकर), लक्ष्मीनारायण, श्रीराम यांचीही सुंदर मंदिरं आहेत. श्रीवर्धन मुंबईपासून १९२ किलोमीटरवर आणि पुण्यापासून १९७ किलोमीटरवर आहे.

## श्रीवर्धन

मुंबईपासून साधारणपणे ३-४ तासांच्या अंतरावर, हरिहरेश्वरपासून जवळच असलेलं श्रीवर्धन हा हरिहरेश्वरला एक उत्तम पर्याय ठरू शकतो. इथून जवळच असलेला दिवेआगर किंवा कोंडिवलीचा समुद्रकिनारा अतिशय सुंदर आहे. म्हणूनच वीकेण्ड ट्रिपसाठी श्रीवर्धन हा एक चांगला ऑप्शन आहे. मासेखाऊ खवय्यांसाठीही हे मस्त ठिकाण आहे. सर्व प्रकारच्या सीफूडचा इथे छान आस्वाद घेता येईल. रहाण्यासाठी इथे अनेक बीच रिसॉर्ट्स आहेत. एम.टी.डी.सी.चं गेस्टहाऊसही आहे. त्याच्या जोडीला स्थानिक रहिवाशांच्या घरीही राहण्याची उत्तम सोय होते.

**कसं जाल?**

मुंबईहून नवी मुंबई-रसायनी-नागोठणे-इंदापूरमार्गे श्रीवर्धनला जाता येतं.

# भाविकांचं श्रद्धास्थान

**कोकणच्या सौंदर्याचं वर्णन करण्याचा प्रयत्न अनेक कवी आणि लेखकांनी आपापल्या परीने केला आहे. मात्र प्रत्यक्ष दर्शनाचा अनुभवच वेगळा असतो. हा अनुभव हरिहरेश्वरच्या एका भेटीत मिळू शकतो. इथल्या नारळ, सुपारीच्या वाड्या आणि त्यात लपलेली कौलारू कोकणी घरं पाहण्यासारखी असतात. पर्यटन स्थळ असण्याबरोबरच हरिहरेश्वर हे भाविकांचं श्रद्धास्थानही आहे.**



कोकण परिसराच्या निसर्ग सौंदर्याचं वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. हे सौंदर्य बघावं आणि त्याच्या प्रेमात पडावं. निळाभोर अथांग सागर, फेसाळत्या लाटा, शुभ्र वाळू, लांबलचक किनारे, हिरवीगार केतकीची बनं, गडद हिरव्या रंगाचे उंच सुरूचे वृक्ष... असं सगळंच अवर्णनीय. त्यांच्या सुक्या पानाच्या गालिच्यावरून चालायला मजा वाटते. नारळ, सुपारी, केळी, फणस, अननस अशा अनेक फळांच्या सहवासातील वाड्या आणि त्यात लपलेली कौलारू कोकणी घरं पाहण्यासारखी असतात. घरोघरी विहिरी, झोपाळा स्वच्छ सारवलेली अंगणं असतातच. इथली माणसं अत्यंत कष्टाळू, स्पष्टवक्ती, प्रामाणिक म्हणून ओळखली जातात. कोकणचं हे वैभव अनुभवायचं असल्यास हरिहरेश्वरला भेट द्यावी. हरिहरेश्वरशी संबंधित एक कथा सांगितली जाते..

फार पूर्वी ब्रह्माने विष्णू व शंकर यांच्यासह एका महायागाचा संकल्प केला. अनेक ऋषीमुनींना आमंत्रण दिलं. ब्रह्मदेवाने अपूर्व यज्ञासाठी हरिहर क्षेत्राची निवड केली. यज्ञ करायचा म्हणजे प्रथम पाणी हवं. ब्रह्माने पाण्याची सोय करून पाणी खेळतं केलं. सर्व




अनु.

देवांच्या विनंतीवरून हरिहरांनी पर्वत रूपाने तिथेच कामयचं वास्तव्य केलं. हा पर्वत समुद्रात थोडा वेगळा दिसतो. हेच ते हरिहरेश्वर क्षेत्र.

शतघ्न नावाच्या दैत्याचा शंकराने नायनाट केला, तो दिवस कार्तिक वद्य अष्टमी होती. इथे यादिवशी मोठी यात्रा व महाप्रसाद असतो. सर्वप्रथम कालभैरव आणि मग हरिहराचं दर्शन घेण्याची प्रथा आहे. मुख्य देवळात अगस्ती मुनींनी स्थापन केलेले ब्रह्मा, विष्णु, महेश, पार्वती विराजमान झालेले दिसतात. गणपतीला नंदीसह दीड प्रदक्षिणा घालून परत एकदा कालभैरवाचं दर्शन घेण्याची प्रथा आहे. मंदिरामागे असणाऱ्या जांभ्या दगडाच्या ७० पायऱ्या चढून आपण पर्वत माथ्यावर येतो. इथून निसर्गाचा देखावा फार छान दिसतो. दोन काळ्या पत्थरांच्या कड्यांमध्ये पायऱ्या तयार झाल्या आहेत. पायऱ्या उतरण्याआधी उजवीकडे डोंगराच्या कडेकडेने सावकाश पाच मिनिटं पुढे गेल्यास आपण ब्रह्मपर्वताच्या माथ्यावर येतो. इथून अथांग समुद्राचं दर्शन होतं.

हा डोंगर चढण्या-उतरण्यास थोडा व्याप करावा लागतो, हे खरं. पण वर पोहोचल्यावर मिळणाऱ्या आनंदाची तुलना होणं शक्य नाही. गर्जना करत येणाऱ्या लाटांची मजा अनुभवत पुढे जाणं रोमहर्षी आहे. सूर्य कितीही वर चढला, तरी प्रसन्न हवा मन आनंदित करते. लाटा व वाऱ्याने आघात करून कातळात एक निसर्गशिल्प निर्माण केलं आहे. ते बघण्यासारखं आहे. हरिहरेश्वरच्या पर्यटनाविषयी अधिक माहिती www.harihareshwar.com या वेबसाइटवर मिळू शकेल.






# हरिहरेश्वर

दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध असलेलं हरिहरेश्वर हे तीर्थक्षेत्र असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. समुद्रात शिरलेल्या गोलाकार टेकडीवर हे देवस्थान आहे. या ठिकाणच्या विहिरीला ब्रह्मकुप म्हणतात. ब्रह्मदेवाने स्वतःच्या हाताने ती विहीर खणली, अशी आख्यायिका आहे. २० फूट उंचीच्या दोन दगडी दीपमाळा इथे आहेत. हरिहरेश्वर, कालभैरव, गणपती आणि मारुतीची प्राचीन मंदिरंही आहेत. सर्व मंदिरांना कोकणी पद्धतीचं कौलारू छप्पर आहे. प्रथम कालभैरवाचं, नंतर हरिहरेश्वराचं, मग गणपतीचं दर्शन आणि नंदीसह दीड प्रदक्षिणा घालून पुन्हा काळभैरवाचं दर्शन घ्यावं, अशी इथली प्रथा आहे. क्षेत्र आणि लघूपरिक्रमेचा मार्गही सुंदर आहे.

## हरिहरेश्वर...

श्रीवर्धन तालुक्यातलं हरिहरेश्वर हे दक्षिण काशी म्हणून ओळखलं जातं. समुद्राचं सानिध्य आणि निसर्गसौंदर्यामुळे हरिहरेश्वरकडे मन आकर्षित झाल्याशिवाय राहत नाही. इथली दोन दैवतं म्हणजे हरिहरेश्वर आणि कालभैरव. त्यांची एक दंतकथा आहे.

हरेश्वरच्या कालभैरवाची ख्याती ऐकून काशीच्या कालभैरवाने हरेश्वरच्या कालभैरवाचं महालय प्रत्यक्ष पाहण्याचं निश्चित केलं. रातोरात हरेश्वरला जाऊन उजडण्यापूर्वी काशीक्षेत्री परत येण्याचं ठरवून तो हरेश्वरच्या दिशेने निघाला. ही बाब हरेश्वरच्या कालभैरवाला कळली. उत्तरेकडून येणाऱ्या काशीच्या कालभैरवाचं स्वागत करण्यासाठी हरेश्वरचा कालभैरव उत्तरेला तोंड करून उभा राहिला. काशीचा

कालभैरव श्रीवर्धनला आला आणि पहाटेचा कोंबडा आरवला आणि तो श्रीवर्धनलाच स्थिर झाला. काशीच्या कालभैरवाच्या स्वागतासाठी उत्तरेकडे तोंड करून उभा असलेला हरेश्वरचा कालभैरवही त्याच अवस्थेत उभा राहिला. त्यामुळेच हरेश्वर आणि कालभैरव यांची दोन स्वतंत्र मंदिरं या ठिकाणी आहेत.

मंदिराच्या पश्चिमेकडच्या टेकड्या व पलिकडचा सागरकाठच्या परिसरात विष्णुपद, गायत्रीतीर्थ, चक्रतीर्थ, सूर्यतीर्थ, यज्ञकुंड, विष्णुतीर्थ, ब्रह्मगुहा, कोसाच्या प्रदक्षिणेचा मार्ग इत्यादी अनेक तीर्थं आणि धार्मिक स्थळंही पाहण्यासारखी आहेत. तसं पाहिलं तर हरिहरेश्वर हे

पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचं ठिकाण ठरलेलं आहे. ते मुंबईपासून २१० किलोमीटर तर पुण्यापासून २०५ किलोमीटरवर आहे.



दीपा परब हे हिंदी आणि मराठी मनोरंजनविश्वातलं नावाजलेलं नाव. शूटिंगच्या निमित्ताने ती देशाच्या कानाकोपऱ्यात भरपूर हिंडत असली तरी तिच्या मनातलं गाव आहे ते हिरव्याकंच कोकणातलं हरिहरेश्वर...



# दक्षिण काशी हरिहरेश्वर

फिरस्ता

शूटिंगसाठी देशभर फिरलेय. दिल्ली, बंगळुरू, कुरुक्षेत्र, गुजराथ, दिल्ली... बरीच शहरं पालथी घातलीत. तरीही महाराष्ट्रातल्या हरीहरेश्वराने मला अतीव समाधान दिलंय. शांत, गंभीर समुद्र... निसर्गाने मुक्तपणे केलेली उधळण आणि या वनराजीत विसावलेला काळभैरव... या सगळ्यांनी मला नेहमीच वेगळ्याच मनःशांतीचा प्रत्यय दिलाय.

गोरेगावात राहणाऱ्या एका नातेवाईकाने मला हरीहरेश्वरची ओळख करून दिली. मला समुद्राचं भारी वेड. कदाचित म्हणूनच 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गावाशी माझी नाळ इतकी पटकन जुळली. इथल्या शांत पण गंभीर समुद्रात असणारे दोन मोठे दगड या समुद्राची भयाणता अधिकच वाढवतात. तरीही हा समुद्र मला आल्हाददायक वाटतो. इथे असणारं काळभैरवाचं मंदिरही पुरातन आहे. या मंदिराला प्रदक्षिणा घालताना समुद्राला प्रदक्षिणा घालावी लागते. त्यामुळे ओहोटी असतानाच मंदिराला प्रदक्षिणा घालता येते. गोंगाट आणि व्यापारीकरणापासून अलिप्त राहिलेलं हे गाव माझी नेहमीच पहिली पसंती ठरलंय. मावकुंडा गाव आणि शिवथरगळीचा परिसर ही शांत ठिकाणंही माझ्या आवडीची.

अशाच एका शूटिंगच्या निमित्ताने मला आणखी एका नवीन जागेचा शोध लागलाय. पुण्यापासून साडे तीन तासांच्या अंतरावरचं सातारा रोडनजिकचं 'हरपूड' हे गाव. इनमिन दहा घरांच्या या गावात सहा महिन्यांपूर्वीच वीज आलीय. टीव्ही नाही, रेडिओ नाही. यात नवल वाटणार नाही कदाचित पण इथे साधी बैलगाडीही नाही. एसटी पण खाली येते. तिथून गावात यायला तीन चार मैलांचा रस्ता तुडवत यावं लागतं. या गावात शूटिंग करायचं असल्यामुळे गाडी जाण्याइतपत लाल मातीचा रस्ता करावा लागला. शहराच्या गोंगाटापासून पूर्णपणे अलिप्त असलेल्या गावावर निसर्गाने मात्र मुक्तहस्ताने पखरण केलीय. हिरवीगर्द वनराई, एक बाजूला खोल दरी आणि खळखळ वाहणाऱ्या झऱ्यातल्या स्वच्छ पाण्याने मला मोहून टाकलं होतं.

अजूनपर्यंत मी बर्फाळ प्रदेशाची सैर केली नाहीय. पण, एकदा का होईना मला तिथे जायचंय. सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं कणकवली तालुक्यातलं कळसुली माझं गाव. तिथे जाणं मला नेहमीच आवडतं. पण, लहानपणी एसटीच्या लाल गाडीतून गावापर्यंत केलेला प्रवास मला पुन्हा अनुभवायचाय. पण कंपनी असेल तरच!

शब्दांकन : सुचित्रा सुर्वे
suchitra.surve@timesgroup.com

# निसर्ग'तीर्थ' हरिहरेश्वर

हरिहरेश्वर महाराष्ट्राच्या दूरवर पसरलेल्या देखण्या कोकणपट्टीतलं एक निसर्गरम्य पर्यटनस्थळ आणि भाविकांचं श्रद्धास्थान. किंबहुना इथल्या विराट आणि सुंदर निसर्गामुळेच इथे देऊळ बांधण्याची कल्पना इथल्या पूर्वजांना सुचली असावी. श्रीमंत बाळाजी विश्वनाथांच्या श्रीवर्धनपासून अवघ्या १७ कि.मी. अंतरावर असलेल्या हरेश्वरचा इतिहास छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळापर्यंत जातो. राजे हरेश्वरच्या दर्शनासाठी नेहमी येत असत. त्यांनी सन १६७४ मध्ये दिलेली भेट शेवटची होती. देवालय आणि तीर्थावर जाण्याच्या पायऱ्या जावळीचे सुभेदार चंद्रराव मोरे यांनी बांधल्याचे उल्लेख आहेत. सन १७३३ मध्ये श्रीमंत पेशव्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला अशा आशयाचा शिलालेख इथल्या काळभैरवाच्या मंदिरावर आहे. इथला काळभैरव नवसाला पावतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे देवाला नवस करण्याची प्रथा फार पूर्वीपासून आहे. यात्रा आणि उत्सवाच्यावेळी तोफ

वाजवण्याची प्रथाही त्यावेळेपासूनच आहे.

पौराणिक कथेप्रमाणे या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू आणि महेश सिद्धी देण्यासाठी वास करत आहेत असं मानलं जातं. इथे ब्रह्मदेवाने सावित्रीसह यज्ञ करण्यास प्रारंभ केला. परंतु सर्व देवादि गण उपस्थित असताना गायत्री तिथे नाही हे पाहून त्यांनी सावित्रीला सांगितलं की, गायत्रीला बोलावून घे. सावित्रीला हे हवंच होतं. सावित्री आनंदित झाली आणि तिने गायत्रीची प्रार्थना केली. गायत्री प्रकट झाली. ती अजूनही इथे सूक्ष्मरूपाने असल्याचा भाविकांचा विश्वास आहे. भाविक इथल्या डोंगराला प्रदक्षिणा घालतात आणि असं केल्यास हजार अश्वमेधाचं पुण्य लाभतं असं सांगितलं जातं. भूतेखेतांवर इथे उतारा दिला जातो अशीही लोकांची धारणा आहे.

हरिहरेश्वरच्या एका बाजूला श्रीवर्धन आणि दिवेआगर तर दुसऱ्या बाजूला बाणकोटची खाडी ओलांडली की केळशी, वेळास आणि आंजर्ला ही नितांत सुंदर ठिकाणं पाहण्यासारखी आहेत. खाडीतून पलिकडे जाण्यासाठी 'तर' आहेत. इथला पांढराशुभ्र समुद्रकिनारा तर पर्यटकांना भान विसरायला लावतो. मात्र तो पोहोण्यास अतिधोकादायक आहे. हरिहरेश्वला अनेक पक्षी दिसतात. विशेषतः व्हाइट इगल आणि समुद्री गरूड इथे दिसतातच. खरं म्हणजे हे 'पक्षीतीर्थ' म्हणूनही जाणकारांमध्ये प्रसिद्ध आहे. इथे नाना प्रकारची फुलपाखरंही पाहायला मिळतात.

हरिहरेश्वरला महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची राहण्याची चांगली सोय आहे. त्याचबरोबर गावातही लॉज आहेत. इथल्या घरघुती हॉटेल्समधून मिळणारं शाकाहारी आणि मांसाहारी जेवण इथली खासियत. हरिहरेश्वर मुंबईपासून साधारणतः दोनशे ते सव्वादोनशे कि.मीवर आहे. रस्त्यामार्गाने गेल्यास मुंबई-गोवा हायवेवरच्या माणगावहून उजवीकडे वळावं लागतं. पुढे साई-मोरबा, ऊसर, म्हसळा करत हरिहरेश्वरला पोहोचता येतं. स्वतःच्या गाडीने गेल्यास श्रीवर्धन, दिवेआगर अशी आजूबाजूची ठिकाणंही पाहता येतात. हरेश्वरचं आणखीएक वैशिष्ट्य म्हणजे संध्याकाळी इथे पर्यटक आणि भाविकांची फारशी गर्दी नसल्याने निवांतपणे फिरता येतं. निसर्गाचा मनमुराद आनंद लुटता येतो. हरिहरेश्वर थोडं आडवळणावर असलं तरी निसर्गाच्या विराट, सुंदर आणि तीर्थाटनाच्या भेटीचा दुहेरी आनंद इथे घेता येतो. आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या 'मॉडर्न' युगात निसर्गाचं स्तिमित करणारं रूपडं, शांतता, पक्ष्यांची किलबिल, भिरभिरणारी फुलपाखरं आणि स्वच्छंदी उनाड वारा आपल्या मनाला तजेला देतो. प्रवासाचं संचित यापेक्षा वेगळं काय असतं?



अनु.





# सागर तीरावरचा 'हिंमतगड'



किनारपट्टीलगत असणाऱ्या डोंगररांगा अन् या डोंगर रांगांवर वसलेली लहानलहान गावं... वाड्या, नारळ-पोफळीच्या बनातून तर कधी आंब्या-फणसाच्या बागांमधून नागमोडी वळणं घेत गेलेल्या रस्त्याने फिरायला कोणाला आवडणार नाही? या अशाच निर्सगाने परिपूर्ण असलेल्या ठिकाणी अनेक ऐतिहासिक वास्तू आपली वाट पहात असतात. मंदीर, लेण्या, गुहा अन् वर्षांनुवर्षं सागरी किनारपट्टीचं रक्षण करणारे किल्ले... असाच एक किल्ला आहे, 'किल्ले बाणकोट' उर्फ हिंमतगड.

सावित्री नदी जिथे सागराला मिळते त्या नदीच्या उत्तर तीरावर हरिहरेश्वर हे श्रीक्षेत्र आहे, तर दक्षिण तीरावर बाणकोटचा किल्ला. हरिहरेश्वरहून बागमांडला या जेटीवरुन अगदी १५ मिनटांत बाणकोट गावात येता येतं किंवा महाडहून मंडणगडमार्गे बाणकोट साधारण ७५ किमी आहे. बाणकोट गावात उतरताच आश्चर्य वाटतं. इथे प्रत्येकाच्या दारात श्रीमंती दिसते, कारण इथला बराच तरुण वर्ग परदेशात नोकरी करतो.

गावातून गडावर जाण्यासाठी नागमोडी वळणाची आंबराईतून जाणारी डांबरी सडक आहे. गडावर पिण्याचं पाणी नसल्याने आपल्या पाण्याच्या बाटल्या गावातूनच भरुन घ्याव्यात. साधारण १५-२० मिनटांत आपण गडावर पोहोचतो. किल्ल्याच्या बांधकामासाठी काही खडक जांभ्याचा तर काही काळा पाषाण वापरलेला आहे. गडाचं उत्तराभिमुख प्रवेशद्वार दोन भक्कम बुरुजांमध्ये बांधलेला आहे. गडाचं प्रवेशद्वार कोरलेलं असून चौकटीवर कोणत्याही प्रकारचं चिन्ह किंवा चित्र कोरलेलं दिसत नाही. गडावर प्रवेश करताच प्रथम दोन्ही हाताला पहारेकऱ्यांच्या देवड्या सुस्थितीत असलेल्या दिसतात. पुढे डाव्या हाताने पायऱ्यांची वाट थेट नगारखान्यावर जाते. या नगारखान्यावरुन हरिहरेश्वरची सागरात घुसलेली सोंड दूरुन व्यवस्थित न्याहाळता येते. गडावर इतरत्र झाडंझुडपं माजली असली, तरी तटबंदी, बुरुज, खंदक,

भुयार, चोरदरवाजा, रेवडी उत्तम अवस्थेत आहेत. गडाच्या बुरूजाशेजारी असणारी विहिरी आणि हौद सध्या कुजलेल्या अवस्थेत आहेत. साधारण अर्ध्या तासात आपल्याला गडाची फेरी पूर्ण करता येते. लोभस आणि स्वच्छ सागर किनारा इथून न्याहाळता येतो.

किल्ल्याच्या वायव्य दिशेने थोडं खाली उतरलं, की एक दफनभूमी दिसते. इथे एक दगडी चौथरा आणि उंच स्तंभ आहे. यावर घडलेल्या घटनेची माहिती देणारा शिलालेख आहे. हे दगडी खांब जलसमाधी मिळालेल्या आर्थर मॅलेच्या पत्नीचं आणि मुलीचं स्मारक आहे. इसवी सन पहिल्या शतकात पिल्बी या ग्रीक तज्ज्ञाने मंदगोर किंवा मंदारगिरी या नावाने बाणकोटचा उल्लेख केलेला आहे. पुढे शिवकाळात याचं नाव हिंमतगड ठेवण्यात आलं, तर इंग्रजांच्या ताब्यात गेल्यावर त्याला फोर्ट व्हिक्टोरिया हे नाव पडलं. छत्रपती शंभूराजांच्या हत्येनंतर बाणकोट, मंडणगड ही ठाणी सिद्दीच्या ताब्यात गेली. पुढे १७३३ मध्ये बंकाजी महाडिकांनी मोठा पराक्रम करून हा किल्ला पुन्हा स्वराज्यात आणला.

झाडावेलींच्या वाटांमधून गडाचा प्रवास करायला काही औरच मजा येते. गडाची फेरी मारून झाल्यावर तीन किमीवर असणाऱ्या वेळास गावातील रामेश्वरचं सुंदर मंदीर इाणि लोभस सागर किनाऱ्याचा आनंद घेण्यास विसरू नका. इथेच कालभैरव मंदीर आणि महादेवाचं मंदीर असून चार फूट लांबीचं शिवलिंग आहे. वेळासच्या किनाऱ्यावर थंडीच्या शेवटी आणि उन्हाळ्यात 'ऑलिव्ह रिडले टर्टल' या समुद्री कासवांची प्रजात अंडी घालायला येतात. निसर्गाचं हे सौंदर्य पाहायला हवं, असंच!






अनु.

# रत्नागिरी जिल्हा
## खेड

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | | | | | |
| | मुंबई ते खेड | | | | | 215 | | | | |
| **1** | रसाळगड | | किल्ला | ट्रेक | | 20 | NE | | | |
| **2** | महाळुंगे रोड | खेडे | | | नदी | 16 | E | 23.5 | S | |



काही किल्ले असे असतात की कोणत्याही मोसमांमध्ये तिथे जावंसं वाटतं. रसाळगड हा अशा किल्ल्यांपैकी एक. कोणत्याही मोसमात जा, इथला निसर्ग आपल्या खाली हाती कधीच पाठवत नाही तो. तो भरभरून आपल्याला देत राहतो. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातला रसाळगड हा यापैकी एक. खेडला पोहोचलं की भरणं नाक्यावरून एक रस्ता डावीकडे निमन-रसाळवाडी कडे वळतो. याला रस्ता म्हणणं म्हणजे याचा अपमानच आहे ही रानवाटच.


वाटेच्या दुर्तफा हिरवंगार जंगल मध्येच उगवलेली पिवळ्या, जांभळ्या गुलाबी रंगाची फुलं, हिरवं गच्च पठार. मागे क्षितिजावर पसरलेल्या डोंगररांगेत मध्येच वाट ओलांडणारा रानडुक्कर दिसतो. झाडाझुडपांमध्ये एकमेकांशी टिवल्याबावल्या करणारे मोर दिसतात. खेडपासून वीस किमी अंतरावर असणारे निमनी गाव कधी येतं, ते समजतच नाही. एखादं गाव हे वाड्यांपासून बनलेलं असतं अशी आपली समजून आहे पण इथे तर रसाळगडवाडी ही सात गावांपासून बनलेली आहे. एसटी फक्त निमनी गावापर्यंतच येते. पुढे सुरू होतो तो तांबड्या रंगाचा रस्ता. एका बाजूला दरी आणि दुसऱ्या बाजूला डोंगर असा हा रस्ता. मध्येच एखाद्या ओहोळाच्या थंड पाण्याचा गारेगार स्पर्श पावलांना होतो. पठारावर भात लोंब्यावर येऊ लागलेली असतात तर कुठे हळवी भातंही तयार झालेली दिसतात. निमनी गावापासून एका तासात आपण एका आधुनिक पाण्याच्या टाकीजवळ येऊन पोहोचतो. या खिंडीतच महिपत सुमारवरून येणारी वाट येऊन मिळते. इथून रसाळगड अगदीच थिटुकला दिसतो. पुढे आलेला कडा सारखा खुणावत असतो. हा गड नावाप्रमाणेच रसाळ आहे. गडाचा घेरा ५ ते ७ एकरपेक्षा जास्त नाही. पण या एवढ्याशा किल्ल्यावर २० च्या वर तोफा आहेत. गडाचं पहिलं प्रवेशद्वार बरंचसं मजबूत आहे. दरवाजाच्या तटबंदीमध्येच एक हनुमानाची मूर्ती बसवलेली आहे. थोडं वर चढून गेलं की गडाचं दुसरं प्रवेशद्वार लागतं. या अलीकडेच एक वाट कातळकड्यात असणाऱ्या पाण्याच्या टाक्यापाशी जाते. दुसऱ्या दरवाजाच्या शिलेदारासारखा भासतो. यातून आत गेलं की किल्ल्याचं लांबवर पसरलेलं पठार दिसतं. याच्यावरील हिरवं लुसलुशीत गवत यातून पावलं टाकायला फार मजा येते. प्रत्यक्ष पठारावर पोहोचल्यावर या किल्ल्याचा आवाका नजरेस पडतो. दुर्ग या संज्ञेला शोभेल अशी सर्व लक्षणं यावर आहेत. किल्ल्यावर वीसएक तोफा आहेत. यावर इंग्रजाचं निशाणही कोरलेले आहे. या सर्व तोफांना लागणाऱ्या खाद्याची व्यवस्था ठेवण्यासाठी भलं मोठं दारू कोठार आहे. जोकाई देवीचं मंदिर आहे. दर नवरात्रीत इथे देवीचा मोठा उत्सव होतो. मंदिराच्या कोनाड्यात अनेक प्रकारच्या मूर्ती ठेवलेल्या दिसतात. समोर दीपमाळ आहे. चौथरा आहे, मागच्या बाजूस बालेकिल्ल्यसारखा उंचवटा आहे. गडावर पाण्याची तळी मोठ्या प्रमाणावर आहेत. हुद्देकऱ्यांचे गडकऱ्यांचे वाडे आहेत. माचीसारखा थोडा निमुळता भागही आहे. तटबंदी आहे. असं सर्व काही इथे आहे.

किल्ल्याचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे इथून दिसणारा सूर्यास्त, समोर असणाऱ्या कोयनेच्या जंगलातील डोंगररांगा, वासोटा, चकदेव तर एकीकडे महाबळेश्वर डोंगररांगा असा देखावा रसाळगडाच्या पुढ्यात उभा ठाकला आहे. किल्ल्यावर एक रात्र मुक्काम करण्यासाठी झोकाई देवीचं मंदिर किंवा दारूकोठार उत्तम ठिकाणं आहेत. पावसाळ्यात मात्र दारूकोठारच बरं, कारण मंदिरात पाणी साठतं. १६६० च्या मोहिमेत शिवाजीराजांनी रसाळगड जिंकला आणि पुढे १७५५ मध्ये तुळाजी आंग्रेने पुन्हा रसाळगड घेतला. नानासाहेब पेशव्यांनी तुळाजी आंग्रेकडून सर्व किल्ले घेतलो.

रसाळगड तेवढा राहिला. पुढे तुळाजी आंग्रे शरण आल्यावर रसाळगड त्यांच्या ताब्यात आला असावा. रसाळगडाच्या ट्रेकमध्येच पुढे सुमारगड आणि महिपतगडही करता येतात.



अनु.








# महाळुंगे

**खेड** तालुक्यामधलं महाळूंगे हे गाव शांत निवांत अशा एखाद्या वीकेंडसाठी उत्तम पर्याय आहे. खेडच्या भरणे नाक्यावरून केवळ १५ कि.मी. अंतरावर सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हे एक टुमदार, चिरेबंदी, कौलारू घरांचं छोटसं गाव. गावाच्या बाजूनेच जगबुडी नदी वाहते. ऑक्टोबरनंतरही तिचा प्रवाह संथ आणि शीतल असतो. उन्हाळ्यात पोहण्यासाठी हा अगदी उत्तम स्पॉट आहे. गावात पर्यटकांना केळीच्या पानावरचं खास ग्रामीण जेवण, जाखडी, नमन येथील पारंपारिक नृत्य प्रकार व कला प्रकार, गावातून फेरफटका, बैलगाडी सफर, पर्यटक स्वागत, सह्याद्री भ्रमंती, गावकऱ्यांबरोबर गप्पा अशा सर्वांचा आनंद घेऊ शकता. महाळुंगेपासून तुम्ही रसाळगड आणि रघुवीर घाट या दोन्ही स्थळांना भेट देऊ शकता.

रसाळगड- गावातून चालत रसाळगडावर पोहचता येतं. हा एक उत्तम ट्रेक आहे. रसाळगडावर शिवछत्रपतीकालीन एकूण १६ लहान-मोठ्या तोफा आहेत. वाघजाई देवीचे मंदिर आहे. मंदिराबाहेर दिपमाळा आणि दोन छोटे तलाव आहेत. गडावरून महाबळेश्वरच्या डोंगररांगा पाहता येतात. याशिवाय सध्या इथे दर वीकेण्डला हापूस पर्यटनदेखील सुरु झालं आहे. त्याचीही मजा तुम्हाला घेता येईल.


रघुवीर घाट - रघुवीर घाटावरून सूर्यास्ताचं मनोहारी दर्शन घडतं. घाटावरून जगबुडी नदीचं विस्तीर्ण पात्र नजरेस पडतं. श्री देव केदारनाथ हे महाळूंगे गावचे ग्रामदैवत. दरवर्षी होळीला मोठी जत्रा असते. यावेळी येथील पालखीनृत्य प्रेक्षणीय असते.



# दापोली


| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते दापोली | | | | | 218 | | | | |
| 1 | केळशी बीच | समुद्रकिनारा | निसर्ग | मंदिर | सुरुचे बन | 34.5 | NW | | | |
| 2 | आंजर्ले बीच | समुद्रकिनारा | | मंदिर | | 24 | NW | 11 | S | |
| 3 | कनकदुर्ग, फत्तेगड, गोवा गड | | किल्ला | दीपगृह | | 16.5 | NW | 8 | S | |
| 4 | सुवर्णदुर्ग | | किल्ला | | | 15.5 | NW | 1 | NW | |
| 5 | फिश मार्केट | | | | | 15.5 | NW | 0.5 | E | |
| 6 | हर्णे बीच | समुद्रकिनारा | | दीपगृह | बंदर | 15 | NW | 0.6 | SE | |
| 7 | मुरुड | समुद्रकिनारा | डॉल्फिन | मंदिर | | 11 | NW | 5.5 | S | |
| 8 | दापोली | | | मंदिर | | 0 | | | | |
| 9 | लाडघर बीच | समुद्रकिनारा | डॉल्फिन | | | 10.7 | SW | 10.7 | SW | |
| 10 | करदे बीच | समुद्रकिनारा | डॉल्फिन | पक्षीजीवन | वॉटरस्पोर्ट | 13 | SW | 5 | N | |
| 11 | कोळेश्वर | समुद्रकिनारा | | मंदिर | | 20 | SW | 20 | S | |
| 12 | पन्हाळेकाझी | | | | गुंफा लेणी | 21.5 | SE | 21 | SE | |
| 13 | दाभोळ बंदर | | | | बंदर | 29 | SW | 18 | SW | |






अनु.

रिचार्ज





हरिहरेश्वर, दिवेआगार या प्रसिद्ध ठिकाणांबरोबरच तिथूनच जवळ असलेलं केळशी हे गाव पर्यटकांना आकर्षित करू लागलं आहे. इथल्या याकुबबाबा टेकडीवर उभं राहिलं की दिसणारं गावाचं सौंदर्य विलोभनीय आहे. जणू 'अलीकडे पाचू, पलीकडे मोती, कोंदण डोंगररांगा असती...' असंच त्याचं वर्णन करावं लागेल.

# ...कोंदण डोंगररांगा असती!

समुद्रकिनारे हे कोकणचं मुख्य आकर्षण. पर्यटकांना आकर्षित करणारे कोकणपट्टीतले समुद्रकिनारे म्हणजे अलिबाग, नागाव, कर्दे, मुरुड. या सगळ्यांच्या बरोबरीनं हळूहळू विकसित होणारं आणखी एक नाव आहे केळशी. नारळ-पोफळीच्या बागा, आंब्याची झाडं, फणसाच्या बागा इथे भरपूर बघायला मिळतात. सूर्यप्रकाशालाही जमिनीपर्यंत पोहोचायला अवरोध करणारी दाट हिरवाई, त्यातून जाणाऱ्या पायवाटा ऊन-सावलीचा खेळ खेळवत कधी समुद्रापर्यंत नेतात, ते कळतही नाही. हा शांत आणि सुरक्षित समुद्रकिनारा सुरूच्या दाट बनामुळे अधिक सुंदर दिसतो.

केळशी हे कोकणातलं अगदी टिपिकल म्हणता येईल असं गाव आहे. केळशीला स्वत:चा इतिहास, ओळख आहे. लागू, घैसास, वर्तक ही घराणी इथलीच. लोकमान्य टिळकांचं आजोळही हेच. कोल्हापूरच्या अंबाबाईची बहीण मानली जाणारी केळशीची महालक्ष्मी हे एक जागृत देवस्थान मानलं जातं. १५२३ला आलेल्या त्सुनामीमुळे तयार झालेली वाळूची टेकडी हा इतिहास संशोधकांचा कुतूहलाचा विषय आहे. या टेकडीखाली त्यावेळचा गुजरवाडा गाडला गेल्याचे संकेत मिळतात. शिवकालीन याकुबबाबांचा दर्गा छोट्या टेकडीवर आहे. तो दोन्ही धर्मांच्या लोकांचं एक श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

याकुबबाबाच्या टेकडीवरून दिसणारं केळशीचं सौंदर्य विलोभनीय आहे. भरारणारा वारा, उजव्या हाताला लांबवर पसरलेली भाताची खाचरं, समोर शुभ्र लाटांचा हार घेऊन पुढे येणारा समुद्र, मागे हिरव्या रंगाच्या अनंत छटा मिरवत असलेली दाट झाडी आणि या सगळ्याला कवेत घेणारे डोंगर! जणू 'अलीकडे पाचू, पलीकडे मोती, कोंदण डोंगररांगा असती...'

भौगोलिकदृष्ट्याही केळशीचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. एका बाजूला आंजर्ल्याचा कड्यावरचा गणपती, हर्णे बंदर, केशवराज, मुरुड, तर दुसऱ्या बाजूला हरिहरेश्वर, श्रीवर्धन आणि दिवेआगर ही ठिकाणंही आहेत. मानवनिर्मित ग्लॅमर नसलेल्या; पण निसर्गाचं सौंदर्य चहुअंगानं मिरवणाऱ्या केळशीला पर्यटकांची पर्दी होऊ लागली आहे. आप्तेष्ट, मित्रांबरोबरच्या गेट-टू-गेदरचे कार्यक्रम करण्यासाठी हे एक छान गाव आहे. इथली छोटीशी टुमदार घरं, डोळ्याला



अनु.

सुखावणारा निसर्ग कॅनव्हासवर उतरवण्यासाठीही कलाकार इथे आवर्जून भेट देतात. ट्रेकिंग करणाऱ्यांसाठी एक पर्याय इथे उपलब्ध आहे. या किनाऱ्यापासून आंजर्ल्याच्या किनाऱ्यावरून कड्यावरच्या गणपतीपर्यंतच्या ट्रेकचाही जरूर विचार करावा.

पुण्यापासून १८५ किलोमीटरवर तर मुंबईहून जवळपास २२५ किलोमीटर्स अंतरावर असलेल्या या नितांतसुंदर स्थानामध्ये दोन-तीन राहिल्यानंतर तुम्हाला एकदम ताजंतवानं करण्याची ताकद आहे. एकदा तरी याचा अनुभव घ्यायला हवा. खवैय्यांसाठीही ताजे फडफडीत मासे, सोलकढी, मोदक यावर ताव मारायला मिळणं ही पर्वणीच ठरावी. कोकण किनारपट्टीला जोडणारा सागरी महामार्ग केळशीवरून जातो. कोकण पर्यटन विकासांतर्गत केळशीसाठी मोठा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे येत्या काळात केळशी हे गाव पर्यटकांच्या नकाशावर ठळकपणे यायला हरकत नाही.



उन्हात चमचमणारी पांढरी वाळू... किनाऱ्यावर जोरदार थडकणाऱ्या लाटांची गाज... सुरुचं बन आणि निवांतपणा, शांतता... हे वातावरण अनुभवायचं असेल तर कोकणातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना पर्याय असूच शकत नाही. शहरातल्या रुटीन लाइफस्टाइलचा कंटाळा आला की फ्रेश होण्यासाठी बिनदिक्कतपणे निसर्गात रमावं. त्यातही कोकण म्हणजे 'द बेस्ट' पर्याय. कोकणातला निसर्ग जितका सुंदर तितकेच तिथले समुद्रकिनारेही रमणीय आहेत. अशाच एका नितांतसुंदर परिसराला भेट देण्याचा योग मला आला. दापोलीजवळ असलेला केळशी या छोट्याशा गावातला भव्य समुद्रकिनारा लाभला आहे. आणि सोबतीला आहे आजूबाजूचा रमणीय परिसर.

केळशी हे रत्नागिरी जिल्ह्यातलं एक छोटं गाव असलं तरी या गावाला निसर्गानं भरभरून दान दिलं आहे. मुंबईहून सुमारे अडीचशे किलोमीटर अंतरावर असलेलं या गावात जाण्यासाठी किमान दोन दिवस तरी हातात हवेतच. इथे जाण्यासाठी कोकण रेल्वेचा पर्याय तर आहेच. शिवाय मुंबई-गोवा हायवेने गेल्यास पाच तासांत तिथे पोहोचता येईल. दापोलीहून केळशी अगदी जवळ आहे. केळशीतला समुद्रकिनारा अतिशय भव्य आहे. समुद्राच्या पाण्यात मनसोक्त डुंबल्यानंतर पांढऱ्याशुभ्र वाळूत लोळत पडायचं आणि पुन्हा लाटांचं पाणी अंगावर झेलायचं. शहरातल्या सगळ्या कंटाळ्याला, टेन्शन्सना त्या लाटांबरोबर समुद्राच्या पोटात जाऊ द्यायचं आणि आपण नवा श्वास घ्यायचा. केळशीच्या समुद्रकिनाऱ्याबरोबरच परिसरात हर्णेचं बंदर पाहाण्याजोगं आहे. हर्णेला होणारा माशांचा लिलाव प्रसिद्ध आहे. लिलावाच्या वेळी कोळी बांधवांची चालणारी लगबग, त्यांचं राहणीमान, त्यांची गोड भाषा यांचाही अनुभव घ्यावा. शिवाय डॉल्फिन मासे पहायला मिळतात. डॉल्फिन दर्शन करण्यासाठी बोटीतून प्रवास करावा लागतो.

निसर्गसौंदर्य भरभरून असतं म्हणजे काय याचा प्रत्यय या भागात फिरताना पदोपदी येतो. ही सगळी ठिकाणं फोटोग्राफीसाठी राखीव ठेवल्याप्रमाणे सुंदर आहेत. भटकंतीतून मनाला तजेला देताना आपली जिव्हा शांत कशी राहील? इथल्या घरगुती हॉटेलमध्ये मिळणारे टिपिकल कोकणी पद्धतीचे मासे म्हणजे स्वर्गसुखच! अत्यंत माफक दरात तुमच्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी माशांचे विविध प्रकार आणि त्यावर एक ग्लास सोलकढी. समुद्राशी निगडित सगळी प्रेक्षणीय स्थळं पाहताना महालक्ष्मी मंदिर, आंजर्ले गावाजवळच असलेल्या कड्यावरील गणपती आणि याकूब दर्गा हेही आवर्जून पाहावं. या समुद्रकिनाऱ्यांचं वैशिष्ट म्हणजे हे किनारे मानवनिर्मित कचऱ्यापासून मुक्त आहेत. इथे गेल्यावर पर्यटकांनी हा किनारा कसा स्वच्छ राहिल याची खबरदारी घेतलीच पाहिजे. आतापर्यंत सुंदर राहिलेल्या या समुद्रकिनाऱ्यांचं सौंदर्य कायम ठेवणं ही पर्यटकांचीही जबाबदारी आहे.

**कसं जाल?**

कोकण रेल्वेने गेल्यास खेडला उतरावं. तिथून दापोलीमार्गे केळशीला जाता येतं. मुंबई-गोवा हायवेने गेल्यास दापोलीला पोहोचून केळशी गाठता येईल. केळशी ते दापोली अंतर सुमारे २५ कि.मी. आहे.

**पाहण्यासारखी आणखी ठिकाणं :**

दापोली, आंजर्ले, हर्णे, मुरुड.

## आंजर्ले

आंजर्ले इथला समुद्रकिनारा पांहण्यासारखा आहे. आंजर्ल्याचा कड्यावरचा गणपती प्रसिद्ध आहे. घनदाट जंगलात वसलेल्या कड्यावरच्या गणपतीचं दर्शन घेण्यासाठी गणेशभक्तांची गर्दी होते.






महाराष्ट्राला लाभलेल्या लोभस किनारपट्टीचा मोह परकियांनाही आवरता आलेला नाही. मुघल, पोर्तुगीज, डच इंग्रज असे एकेक शत्रू सागरी मार्गाने भारतामध्ये घुसले. याच किनारपट्टीच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांनी पश्चिम तटावर जलदुर्गांची साखळीच उभी केली. आज या साखळीतले अनेक गडकिल्ले ढासळले आहेत, तर काही अस्तित्वासाठी लढत आहेत. यातलेच काही म्हणजे हर्णे किनारपट्टावरील कनकदुर्ग, फत्तेगड आणि गोवागड.

मुंबई-गोवा महामार्गावरील खेड आणि पुढे दापोलीमार्गे हर्णे गावात दाखल व्हायचं. खेड-दापोली आणि दापोली-हर्णे या प्रवासासठी बससेवा आणि खाजगी वाहनं उपलब्ध आहेत हर्णे बस स्थानकावरून किनारपट्टीवर यायला साधारण १५-२० मिनिटं लागतात. उजव्या हाताला असलेला गोवागड सोडून सध्या फत्तेगडावर असलेली कोळी बांधवांची वस्ती मागे टाकून धक्क्याच्या दिशेने निघायचं. दोन्ही बाजूला समुद्र आणि समुद्रात घुसलेल्या सोंडेवर कनकदुर्ग वसलेला आहे. डाव्या हाताला सागरात डौलात पताका फडकवत असलेल्या होड्या आपल्याला खुणावत असतात. य धक्क्याच्या उजव्या हाताला असणाऱ्या टेकडीवर जाण्यासाठी पायऱ्या खोदलेल्या आहेत.

कनकदुर्गच्या पश्चिम दिशेला नाममात्र तटबंदी पाहायला मिळते. गडावर खोदलेले पाण्याचे टाके आहेत, पण ते बुजल्याने त्यात पाणी नाही. तर गडावर असलेला दीपगृह लक्षवेधक आहे. या दीपगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची घरं या किल्ल्यावर आहेत. गडावरून संपूर्ण सागर किनारपट्टीची टेहाळणी करता येते. या गडाची बांधणी केव्हा झाली याची इतिहासात नोंद नाही. पण, १७१० मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी यांची बांधणी केली असा कयास आहे.

आल्या वाटेने थोडं मागे आलं, की किनारपट्टीवर डाव्या हाताला कोळी लोकांची वस्ती दिसते. इथेच होता फत्तेगड. सध्या कोणत्याही प्रकारचे अवशेष इथे शिल्लक नसल्याने पाहण्यासारखं काहीच नाही. इथून थोडे पुढे गेलं, की डाव्या हाताला गोवा गडाची प्रशस्त तटबंदी दिसते. इथच रस्त्यालगत किल्ल्याच्या द्वारावर लोखंडी गेट आहे. सध्या हा किल्ला मुंबईच्या खाजगी हॉटेल चालकाला दिलेला असल्याने इथे चौकीदार असतो. किल्ला पाहायला कोणतंही बंधन नसलं, तरी भविष्यात या तटबंदीच्या आवारात हॉटेलचं वातावरण दिसू शकतं. सध्या असणारं प्रवेशद्वार हे मुख्य प्रवेशद्वार नाही. समुद्रालगत खाली उतरून गडाच्या उत्तर दिशेला आपल्याला मुख्य प्रवेशद्वार पाहायला मिळतं. हे प्रशस्त द्वार जाम्याच्या दगडांनी बनवेलं आहे. इथेच छोटेखानी हनुमंताचं मंदीर आहे, तर दरवाजाच्या चौथऱ्यावर तळाशी चार हत्तींचं वैशिष्ट्यपूर्ण शिल्प पाहायला मिळतं. आजही



अनु.

बुरुजावर जाणाऱ्या पायऱ्या आपली वाट पाहत असलेल्या दिसतात.

बालेकिल्ल्यावरून गडावर असलेले वाड्यांचे ढासळलेले चौथारे नजरेस येतात. काळ्या पाषाणात बांधकाम केलेली विहिरही आहे. या विहिरीच्या पाण्याचा वापर होत नसल्याने सध्या हे पाणी पिण्याजोगं नाही. गोवा गडावरून दिसणारा सुवर्णदुर्गचा परिसर अतिशय लोभस दिसतो. खडकांवरती आपटणाऱ्या फेसाळ लाटा जणू आपल्याला इतिहासाच्या या साक्षीदारांची आठवण करून देत असतात.

इ.स. १७५५ मध्ये इंग्रज आणि पेशवे यांच्या झालेल्या तहानुसार सुवर्णदुर्ग जिंकल्यानंतर सुवर्णदुर्गाबरोबर गोवा किल्लाही पेशव्यांच्या स्वाधीन केला. तर १८६२ च्या पाहणीनुसार या गडावर ६९ तोफा आणि १९ शिपाई गडाची व्यवस्था पाहण्यास होते, याची नोंद मिळते. दुर्गप्रेमींबरोबर सामान्य पर्यटकांनाही हा किल्ला सहज पाहता येतो, तर याच्या निर्सगरम्य आणि ऐतिहासिक वातावरणात मन रमून जातं. महाराष्ट्राला लाभलेल्या या नैसर्गिक आणि ऐतिहासिक ठिकाणाला आवर्जुन भेट द्यावी, असंच हे ठिकाण आहे.

# सागरकुशीतला सुवर्णदुर्ग

**हर्णे बंदरातील सुवर्णदुर्ग म्हणजे किनारपट्टीलगतचं कोकणी निसर्ग सौंदर्याची खाणच जणू!**

महाराष्ट्राच्या किनारपट्टीलगत असलेले गडकिल्ले आजही स्वराज्याचं रक्षण करत आहेत. ऐन सागराच्या कुशीत दर्यावर राखण करत आजही ताठ मानेने हे जलदुर्ग उभे आहेत. त्या गडांवर माजलेलं जंगल आणि झुडपं तुडवत हा झाकलेला इतिहास शोधत काढावा लागतो. ह्या जलदुर्गांची राखण करणाऱ्या तोफांची आजची अवस्था पाहून मन दुखावतं. स्वराज्याचं रक्षण करणाऱ्या अशा या पहारेकऱ्यांकडे पर्यटकांनीच पाठ फिरवल्यासारखं वाटतं. असाच दर्यात ताठ मानेने आजही उभा असणारा आणि स्वराज्याचं रक्षण





अनु.

करणारा गड म्हणजे 'सुवर्णदुर्ग'

मुंबई गोवा महामार्गावर असणाऱ्या खेड फाट्यावरुन दापोली गाठायचं. पुढे दापोलीहून हर्णे बंदराकडे जाण्यासाठी बससेवा उपलब्ध आहे. हर्णे बस स्थानकावर पायउतार झालं, की साधारण १०-१५ मिनिटांत हर्णे बंदर गाठता येतं. ऐन सागराच्या कुशीत वसलेल्या या जलदुर्गावर आज पिण्याचं पाणी उपलब्ध नसल्याने सोबत पाणी घेऊन जावं. बंदरावर अनेक होड्या डौलात नांगर टाकून उभ्या असतात. नितळ सागरकिनाऱ्यालगत डौलत असणाऱ्या होड्या, नारळपोफळीची झाडं आणि किनाऱ्यावर येणारी ताजी मच्छी हे दृश्य पाहण्यासारखं असतं.

बंदरावरुन किल्ल्यात जाण्यासाठी स्थानिक मच्छीमार संघटनेने छोटे पाडाव ठेवले आहेत. होडीतून सुवर्णदुर्गावर जाण्यासाठी साधारण २० मिनिटं लागतात. होडीतून जाऊन येण्यासाठी माणशी ६०-७० रुपये आकारले जातात. सुवर्णदुर्गावर उतरण्यासाठी धक्का नसल्याने सुवर्णदुर्गाच्या किनाऱ्यावर असणाऱ्या शुभ्र वाळू आणि गुडघाभर पाण्यात उतरावं लागतं. ही शुभ्र वाळू तुडवत किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचायचं. प्रवेशद्वाराबाहेर झुडपं वाढल्याने बऱ्याचदा प्रवेशद्वार दिसत नाही. याच झुडपात आपल्याला तोफा गंजत पडलेल्या दिसतात. दुर्गाचं प्रवेशद्वार पूर्व दिशेला असून उत्तराभिमुख आहे. हे प्रशस्त प्रवेशद्वार शिवनिर्मित आहे.

महाद्वाराजवळ पोहोचताच पायरीवर कोरलेलं कासवाचं शिल्प नज़रेस पडतं, तर उजव्या बाजूला तटबंदीवर हनुमानाची मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती शिवकाळानंतर निर्माण केलेली आहे. प्रवेशद्वारातून आत शिरताच दोन पहारेकऱ्यांच्या देवड्या दिसतात. या देवड्यांच्या दोन्ही बाजूने तटबंदीवर जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. गडावर झुडुपं माजल्याने जरा जपूनच फिरावं लागतं. डाव्या हाताने पुढे गेल्यावर बांधीव विहीर आणि पुढे राजवाड्याचे दगडी चौथरे पाहायला मिळतात. तर किल्ल्याच्या दक्षिणेकडे भक्कम बांधणीचं कोठार आहे. सुवर्णदुर्गाच्या भक्कम तटबंदीवरुन हिरवं पाणी असलेल्या विहिरी आणि पडझड झालेले वाड्याचे अवशेष पाहायला मिळतात. इथेच दोन झाडांवर कावळ्यांची घरटी आहेत.

दुर्गाच्या पश्चिम तटाकडे एक सुरेख चोरदरवाजा आजही सुस्थितीत असलेला दिसतो. या दरवाज्याने थोडं खाली उतरलात की दहा फूट खोल किल्ल्याचा पायथा उरतो. तिथे खोबणीत घुबडं पाहायला मिळतात. गडावर सात विहिरी आहेत, पण कुठेही मंदीर नाही. याचा संदर्भ इतिहासता शोधल्यावर कळतं, की दर्याराज कान्होजी आंग्रे म्हणजे म्हणजे समुद्रावरचा शिवाजी यांची कुलदैवता कालंबिका देवी इतिहासकाळात सुवर्णदुर्गावरुन हलवून अलिबागच्या हिराकोटामध्ये प्रस्थापित केली होती. इ.स. १६६० मध्ये महाराजांनी हा किल्ला आदिलशहाकडून जिंकून घेतला आणि किल्ल्याच्या डागडुजी आणि पुर्नरचनेसाठी दहा हजार दोन रुपये खर्च केले.

निसर्गाचं अद्भुत रुप आणि त्यावर साकारलेला हा भव्यदिव्य जलदुर्ग पाहून नक्कीच समाधान लाभतं, तेव्हा तुम्ही कधी करताय तयारी?

## सुवर्णदुर्ग किल्ला

हर्णे बंदरापासून समोरच, भर समुद्रात उभा असलेला हा अभेद्य जलदुर्ग. या दुर्गाची तटबंदी अद्यापही टिकून आहे. इथं जाण्यासाठी हर्णे बंदरावरुन बोट ठरवून जावं लागतं.




# फिश शो @ हर्णे





मसाला पापलेट, सुरमई फ्राय, कोळंबीचं सुकं किंवा बांगड्याचं कालवण...नुसती नावं जरी काढली तरी तोंडाला पाणी सुटतं. जीभेचे चोचले पुरवणारा हा सारा मत्स्यावतार ताटात येण्यापूर्वी त्याची खरेदी-विक्री कशी चालते हे पहायचं असेल तर कोकणातल्या हर्णे बंदराला जरूर भेट द्या. अवघ्या तीन-साडेतीन तासांमध्ये या किनाऱ्यावर मासेविक्रेते आणि मत्स्यप्रेमींची जत्रा भरलेली असते. सूर्यास्ताच्या वेळी चालणारा 'माशांचा लिलाव' म्हणजे जणू 'हर्णे सनसेट फिश शो'च.



एकिकडे दिवसभर थकलाभागलेला सूर्य समुद्रात चाललेला असतो, तर दुसरीकडे त्याच सागरातली दर्याची दौलत घेऊन कोळ्यांच्या बोटी किनाऱ्यावर विसावत असतात. या बोटी वाळूत नांगर टाकतात आणि काही मिनिटांतच हर्णेच्या बंदराचं अवघं रुपरंग पालटून जातं. दिवसभर 'सुशेगात' असलेल्या या बंदराला संध्याकाळी अचानक जाग येते. या ठिकाणाला अक्षरशः जत्रेचं स्वरूप प्राप्त होतं. साधारणतः संध्याकाळी ४ ते ७ वेळेत दापोलीजवळच्या या हर्णे बंदरामध्ये हा सुप्रसिद्ध माशांचा लिलाव भरतो.

मुंबईसारख्या शहरातल्या मासळीबाजारात येणाऱ्या माशांमधला मोठा वाटा इथूनच येतो. या व्यापाराची पहिली पायरी म्हणजे हा लिलाव. समुद्रातून पकडून आणलेले माशांचे ढिगच्या ढिग किनाऱ्यावर खोक्यांमध्ये ठेवलेले असतात. त्यावर उभे राहून दलाल त्यांची बोली लावत असतात. सभोवताली जमलेले घाऊक व्यापारी आपापला भाव चढवत ती बोली जिंकण्यासाठी डावपेच आखतात. २०-३० हजारापासून सुरु होणारी ही बोली कशी लाखाच्या घरात पोहोचते तो सोहळा याची देही, याची डोळा अनुभवण्यासारखा असतो.

माशांचा हा लिलाव सुरू असतानाच आजूबाजूला खूप काही घडत असतं. किनाऱ्याला लागलेल्या बोटीवरून मासे उतरून घेतल्यानंतर त्यावर लगेचच उद्याची तयारी सुरू होते. यासाठी अक्षरशः एक समांतर व्यवस्था काम करत असते. समुद्रात सफर करून आलेल्या या बोटी साफ केल्या जातात. त्यावर इंधनाची मोठमोठी पिंपं चढवली जातात. मच्छिमारांसाठी पिण्याचं पाणी भरून

ठेवलं जातं. त्यासाठी किनाऱ्यावर टँकर लागलेले असतात. त्यापुढे गॅलन्सच्या रांगा लागलेल्या असतात. या गॅलनमध्ये भरलेलं पाणी कुणी खांद्यावरून, कुणी हातगाडीतून तर कुणी बैलगाडीतून आपापल्या बोटीपर्यंत नेत असते.

पाणी-डिझेलची ही वाहतूक बहुतांश बैलगाड्यांमधून सुरू असते. साधारणतः गावातल्या रस्त्यावरून धुरळा उडवत धावणाऱ्या बैलगाड्या, किनाऱ्यावर चक्क अर्ध्या बुडतील एवढ्या पाण्यात जात हे काम करत असतात. या बैलगाड्या चालवणारे चालकही एकमेकांशी स्पर्धा लावल्यासारखे घाईत असतात. सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर ही सारी लगबग आपल्याला वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते.

पाणी आणि डिझेलसोबत बोटीवर आणखी एका गोष्टीची नितांत गरज असते, ती म्हणजे बर्फाच्या चुरा. यासाठी किनाऱ्यावर आईस क्रशर अखंड धडधडत असतात. नारळाच्या झांवळ्य बनवलेल्या तात्पुरत्या गोदामां साठवलेल्या बर्फाच्या मोठमोठ्या लाद्या क्रशरमध्ये घालून बर्फाचा चुरा केला जात असतो. हा चुरा पोत्यांमध्ये भरून बोटीवर चढवला जातो. तसंच बाहेरगावी नेण्यात येणाऱ्या माशांसाठीही या चुऱ्याचा उपयोग होते. असे नाना उद्योग घाऊक प्रमाणावर इथे सुरू असतात.

किरकोळ मासेखरेदीसाठी आलेल्यांचाही इथे हिरमोड होत नाही. त्यांच्यासाठी कोळीणी आपल्या पारंपरिक पेहरावात पाट्या मांडून बसलेल्या असतात. शहरात कधीही न मिळणारे ताजे मासे, वाजवी किंमतीमध्ये या कोळीणी विकत असतात. त्यामुळे पट्टीचे मासेखाऊ एक-दोन वाटे नव्हे तर, चक्की किलो-किलोंनी मासे खरेदी करतात. हे मासे खास थर्माकोल बॉक्समध्ये बर्फाचा चुरा घालून 'पिक अँड पॅक' स्वरूपात घरी नेता येतात.

तुम्ही कार घेऊन आला असाल तर तुमची कार थेट वाळूपर्यंत आणून ही खरेदी करता येते. अशा शेकडो गाड्या संध्याकाळी या किनाऱ्यावर उभ्या असतात. किनाऱ्यावर हा 'फिश शो' बघायला आलेल्या पर्यटकांच्या दिमतीला भेळेपासून कडक चहापर्यंत सारं काही हजर असतं. फक्त खिशात हात घालायची खोटी.

किनाऱ्यावरच्या या गलबलाटात साथ देण्यासाठी मत्स्यप्रेमी माणसांप्रमाणे मत्स्यवेधी पक्षीही हजर असतात. थंडीच्या मोसमात सीगल्सची गर्दी पर्यटकांना कॅमेऱ्यामध्ये पकडण्याची संधी इथे मिळते. हर्णे बंदरावर चालणाऱ्या माशांच्या या साऱ्याला फक्त लिलाव का-म्हणावं? जगभर अनेक लहानलहान गोष्टींना मोठमोठी नावे देऊन त्याचं ब्रँडिंग केलं जातं. मग आपणही आपल्या या अनुपम्य मत्स्यसोहळ्याला 'हर्णे सनसेट फिश शो' म्हणूया...

## कसं जाल?


- हर्णे बंदरावर जाण्यासाठी दापोलीहून एसटीच्या बस नियमितपणे सुरू असतात.
- हरिहरेश्वरवरून बागमांडला-वेशवी बोटीने आंजर्लेमार्गेही हर्णे येथे पोहचता येतं.

## हर्णे बंदर

कोकणात पाऊल ठेवणारे बहुतेकजण माशांवर ताव मारण्यास उत्सुक असतात. दर्दी मत्स्यप्रेमींसाठी आवर्जून पाहण्यासारखं ठिकाण म्हणजे हर्णे बंदर. रोज संध्याकाळी इथे मोठ्ठा मासळी बाजार भरतो. या बाजारात फेरफटका मारल्यावर माशांचे अनेक प्रकार आपल्याला बघायला मिळतात. इथून दीपगृह पहायला जाणं हा एक वेगळा अनुभव ठरतो. समुद्रात खूप आतपर्यंत घुसलेला जमिनीचा भाग आपल्याला या दीपगृहापर्यंत घेऊन जातो.

# हर्णै दीपगृह

रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यातलं हर्णै बंदर मासळीच्या खरेदी-विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. तिथल्या हर्णै गावामध्ये बंदरावरच हे लाइटहाऊस आहे. हरणाई बंदरात असलेले हे दीपगृह कुठल्याही पारंपरिक दीपगृहासारखं नसून थोडं वेगळं आहे. कुठल्याही नेहमीच्या दीपगृहात आढळणारा फिरणारा दिवा तिथे नाही. हरणाई बंदरामध्ये दररोज मोठमोठाले ट्रॉलर्स भरून मासळी आणली जाते. मोठे ट्रॉलर्स समुद्रात उभे राहतात. भरती-ओहोटीचं गणित अचूक सांभाळून, छोट्या नावांतून ती मासळी किनाऱ्यावर आणली जाते. मासे खरेदी करण्यासाठी इथे गावकऱ्यांची, व्यापाऱ्यांची झुंबड उडालेली असते. दापोलीला जाण्यासाठी कोकण रेल्वे तसंच बसचा पर्याय उपलब्ध आहे.





अनु.

## मुरुड-हर्णे

दापोलीपासून ११ किलोमीटर्सवर मुरुड गाव आहे. नारळ-पोफळींच्या बागा आणि विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. इथल्या स्वच्छ, मऊ वाळूवर बसून दाभोळपासून केळशीपर्यंतचा परिसर न्याहाळता येतो. इथे खासगी रिसॉर्टस, एमटीडीसीने तंबू-राहुट्यांची सोय केलेली आहे. मुरुड गावात गणपतीचं एक मंदिर आहे. हा गणपती 'तळ्यातला गणपती' म्हणून ओळखला जातो. दापोलीपासून १५ किलोमीटर्सवर हर्णे गाव आहे ते बंदर म्हणून ओळखलं जातं. हर्णे बंदराकडे जाताना एक किल्ला दिसतो. हा हर्णेचा गोवा किल्ला. हर्णे बंदराचा धक्का पार करून पायऱ्या चढून वर गेलं की कनकदुर्ग किल्ला लागतो. आंजर्ले हेदेखील दापोलीतलं समुद्रकिनाऱ्यावर वसलेलं आणखी एक गाव. आंजर्ल्याचा गणपती प्रसिद्ध आहे.

# फेसाळता समुद्र अन् डॉल्फिनच्या उसळ्या

फेसाळता समुद्र...लाटावर स्वार झालेल्या डॉल्फिनचा थवा...पांढऱ्या शुभ्र वाळूची पुळण...नारळी-पोफळीच्या बागा आणि ताजी कोळंबी, सुरमई, खेकडे, शेवंड्या अन् बांगडे...हे वर्णन आहे, दापोलीपासून बारा किमीवर असलेल्या मुरुडच्या समुद्रकिनाऱ्याचे. अजून तरी अतिरेकी मानवी हस्तक्षेपापासून दूर राहिल्यामुळे गोव्याच्या किनाऱ्यांपेक्षाही सुंदर असलेला मुरुडचा समुद्रकिनारा महत्त्वाचं पर्यटन केंद्र झालाय. स्वच्छ आणि पोहोण्यासाठी अत्यंत सुरक्षित असलेल्या मुरुडच्या समुद्रात गेल्या अनेक वर्षांत एकही अपघाताची घटना घडली नसल्याचं मुरुडकर मंडळी अभिमानाने सांगतात.



**राहणार कुठे?**

दापोली आणि हर्णेमध्ये मिळून २२५ खोल्यांची व्यवस्था, एमटीडीसीचं रिसॉर्ट, अनेक घरांतही राहण्याची सोय

**हर्णे- मुरुडला जाण्यासाठी...**

मुंबई ते दापोली बसने दापोलीपर्यंत जाऊन तिथून बस अथवा रिक्षा करून मुरुडला जाता येईल.

या समुद्रात एकही खडक नाही. फेसाळत्या लाटा अंगावर घेत आत गेलेला पर्यटक तासन् तास पाण्याबाहेर येत नाही. डॉल्फिनचे दर्शन याच समुद्रात होते. सकाळी सातच्या डॉल्फिन दर्शनासाठी कोळी पर्यटकांना घेऊन बोटी समुद्रात लोटतात. खोल पाण्यात गेल्यावर अचाकन एखादा डॉल्फिन पाण्याबाहेर सूर मारतो. बोटीतील गाईडच्या हाताकडे सतत लक्ष ठेवावं लागतं. तो फक्त हाताने दिशा दाखवतो. त्या दिशेकडे बघत राहायचे. तुमचे नशीब असेल तर डॉल्फिनचा थवाच्या थवा दिसेल. डॉल्फिनचं दर्शन होईपर्यंत बोट किनाऱ्याला येत नाही. डॉल्फिनचा हा अद्‌भूत खेळ बघण्यासारखा दुसरा रोमांचकारी अनुभव नाही.

किनाऱ्याच्या एका बाजूला हर्णे बंदर तर दुसऱ्या बाजूला कर्दे. हर्णे बंदरात तर जायलाच पाहिजे. कोकणात बोट सेवा सुरू होती तेव्हा हर्णे बंदराला प्रचंड महत्त्व होते. आता हर्णेचं महत्त्व कमी झालं असलं तरी संध्याकाळी ट्रॉलर भरभरून येणारी ताजी मासळी पाहण्यासाठी बंदरात आवर्जुन जावं. तुम्ही मासे खाणारे असाल तर मेजवानीच समजा. कोळंबी, पापलेट, खेडके, जवळा, सुरमई अशा माशांचे ढिगच्या ढिग असतात. किनाऱ्यावरच मासळीचा लिलाव होतो. पर्यटकाने लिलावात खरेदी करायच्या भानगडीत पडू नये. बाजूच्या कोळणींकडून मासळी विकत घ्यावी. समुद्रकिनाऱ्याव्यतिरिक्त मुरुडमध्ये दुर्गादेवीचं मंदिर, जंगलात लपलेलं केशवराज मंदिर, व्याघ्रेश्वर मंदिर, आंजर्लेचा कड्यावरचा गणपती अशी सुंदर ठिकाणं आहेत.

१६८५ च्या काळातील दुर्गादेवीचं मंदिर म्हणजे गावचं भूषण आहे. आठही हातात आयुधं असलेली महिषासुराचा वध करणारी मूर्ती आहे. मंदिरातील नक्षिकाम तर डोळ्याचं पारणं फेडते. मंदिराच्या बाहेरील महाकाय घंटा ही वसईच्या चिमाजी अप्पांनी आणल्याचं सांगण्यात येतं. डोंगरातला रस्ता तुडवत केशवराज मंदिरात जाताना धाप लागते. पण मंदिरात गोमुखातून पडणाऱ्या झऱ्यातलं थंडगार पाणी प्यायल्यावर थकवा पळून जातो. पांडवकालीन मंदिरातील या झऱ्याचा उगम मंदिराजवळच असलेल्या झाडाच्या बुंध्यातून आहे. या झऱ्याच्या पाण्यावर पोफळीच्या बागा फुलल्या आहेत. आंजर्लेचा कड्यावरच्या गणपतीचं इ.स. ११५० मधील हे देऊळ म्हणजे वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. बैंझटाइन (रोमन) स्टाइलप्रमाणे रचलेल्या कमानी आणि घुमट गॉथिक पद्धतीचे आहेत. मंदिराच्या गच्चीवर आकाश दर्शनासाठी जाता येते.

कोकणच्या या भूमीत आल्यावर



अनु.

महर्षी अण्णासाहेब कर्वे आणि श्री.ना. पेंडसे यांचं आवर्जून स्मरण करावं. मुरुडमध्ये अण्णासाहेबांच्या जन्मगावी त्यांचं स्मारक उभारण्याचं आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी दिलं होतं. पण अद्यापि स्मारकाचा पत्ता नसल्याची खंत कर्वे स्मारक समितीचे दत्तात्रय खोत सांगतात.

वीकएण्डला दोन दिवस निवांत पडी टाकावी, असं हे मुरुड आपली वाट बघतंय!

*किनाऱ्यावरची पांढऱ्या शुभ्र वाळूची पुळण म्हणजे उंचावरून विमानाची धावपट्टी वाटावी. म्हणूनच १९५७-५८ च्या काळात जर्मन स्मगलर वॉलकॉट दौंजे याचं छोटेखानी विमान चुकून मुरुडच्या किनाऱ्यावर उतरलं होतं. कोणी म्हणतं विमानाचं इंधन संपलं तर कोणी म्हणतं हा समुद्रकिनारा आकाशातून धावपट्टी वाटली म्हणून त्याने विमान उतरवलं. गावकऱ्यांनी त्याला कोकणी पाहुणचार घडवत एसटीमध्ये बसवून निरोप दिला अन् मागाहून तो स्मगलर असल्याचं कळताच कपाळावर हात मारून घेतला. तोपर्यंत गावात पोलिस पोहोचले. गावकऱ्यांना फैलावर घेतलं. स्मगलिंगचा माल वाळूत पुरून ठेवला असेल या संशयाने पोलिसांनी अख्खा समुद्रकिनार नांगरून घेतल्याचं ग्रामस्थ आजही सांगतात.*

## तांबूस रेती आणि समुद्रपक्षीही

रत्नागिरी जिल्ह्यातला दापोली हा तालुका म्हणजे पर्यटकांसाठी उत्तम डेस्टिनेशन ठरू शकते. समुद्रसपाटीपासून सर्वात उंच असलेला हा तालुका आहे. त्यामुळे इथलं तापमान आल्हाददायक असतं. नारळी-पोफळींच्या बागा, सागरकिनारे, हिरवेगार डोंगर, रस्ते, हॉटेल्स यामुळे दापोलीला कोकणचं महाबळेश्वर म्हणून ओळखलं जातं. दापोलीच्या समुंद्रकिनाऱ्यांचं वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या समुद्रपक्ष्यांचं दर्शन या किनाऱ्यांवर होतं. दापोली परिसर मध्यवर्ती असून आजुबाजूच्या स्थळांना भेट देणं सोयीचं ठरतं. साधारणतः तीन-चार दिवसांची एक मस्त ट्रिप इथे प्लॅन होऊ शकते.

## कसं जाल?

मुंबईपासून दापोली रस्तेमार्गे सुमारे २२५ किलोमीटर्सवर आहे. मुंबई-गोवा हायवेवर पनवेल, वडखळ, माणगाव लोणेरे, गोरेगाव, मंडणगड, पालगड करून खेर्डीतून दापोलीला पोहोचता येतं. कोकण रेल्वेने जायचं झाल्यास खेड रेल्वेस्टेशन हा पर्याय आहे. तिथून एसटी किंवा इतर वाहनांनी दापोलीला जाता येतं.



# दापोलीची नवलाई

महर्षी कर्वे, लो. टिळक, साने गुरुजी, पांडुरंग वामन काणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रेव्हरंड ना. वा. टिळक, रँगलर र. पु. परांजपे, श्री. ना. पेंडसे अशा नररत्नांची खाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दापोली तालुक्यातला निसर्ग, माती अजब रसायन म्हणायला हवं. कोकणातला निसर्ग म्हणजे हिरवीगार नारळी-पोफळीची झाडी, सुपारीच्या बागा, सुंदर बीचेस, भल्यामोठ्या खाड्या, हिरवे डोंगर आणि वळणावळणाने वाहत जाऊन समुद्राला मिळणाऱ्या नद्या. दापोली तालुक्यात निसर्गाची ही नवलाई उधाणलेली दिसते. पर्यटकांना बघण्यासाठी तिथे आहेत ६० ठिकाणं आणि ११ प्रकारचे बीचेस. कोकणातल्या पर्यटनाची सुरुवातच होते मुळी दापोलीच्या उंबरठ्यावरून. दापोली तालुक्यात इतिहास आहे, किल्ले आहेत, सुंदर प्राचीन जागृत देवस्थानं आहेत. परदेशातील किनारपट्ट्यांना लाजवतील असे बीचेस आहेत, केरळला लाजवेल अशा नारळी-पोफळीच्या बागा आहेत. विशेष म्हणजे, हे पाहण्यासाठी चार दिवस पुरेसे ठरतात.

मुंबई-दापोली सडकमार्गे अंतर केवळ २२३ किमी आहे. शिवाय, कोकण रेल्वे आहेच. स्वतःची गाडी असेल, तर मुंबईहून सकाळी सहाला निघून दापोलीला बाराच्या आत पोहोचता येतं. दापोलीच्या उत्तर बाजूला श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांतील आसूद बाग, व्याघ्रेश्वर मंदिर, केशवराज मंदिर, सुपारीच्या बागा, मुरुड, कर्दे, हर्णे आणि आंजर्लेचा किनारा, कड्यावरचा तसंच केळशीमधील पांढरा गणपती आणि महालक्ष्मी मंदिर अशी ठिकाणं पाहू शकतो. दुसऱ्या टप्प्यांत दक्षिण बाजूकडील लोकमान्य टिळकांचं चिखली गाव, तामसतीर्थ, केशवसुतांचं वेळणे गाव, कोळथरे आणि दाभोळच्या किनारपट्ट्या, विजापूर आणि आदिलशाही काळातील जुन्या, देखण्या मशिदी, साने गुरुजींचं पालगड या ठिकाणांना भेटी देऊन आनंद घेऊ शकतो.

दापोलीपासून ३० मिनिटांवर असलेल्या आसूद बागेला सहज भेट देता येते. नारळी-पोफळीच्या बागा इतक्या घनदाट, की सूर्याची किरणं जमिनीपर्यंत पोहोचू शकत नाहीत. डोंगरातून वाहत येणाऱ्या पाण्याचे पाट सतत खळाळत असतात. बहुतेक घरांच्या छपरांवर ओल्या सुपाऱ्या वाळवताना दिसतात. याच दाट झाडीतून आसूद बागेतील डोंगरावर केशवराज मंदिराकडे जाण्यासाठी लाल मातीची छान पायवाट आहे. रस्ता वळणाचा आणि चढ-उताराचा असला, तरी निवांत आहे. मध्येच ओढा लागतो. पूर्वी त्यावर साकव होता. आता सिमेण्टचा पूल बांधलाय. तो ओलांडून १०० पायऱ्यांची व्यवस्थित चढण पार करून वर पोहोचलो, की केशवराज मंदिर आहे. खळाळणाऱ्या पाण्याचा गारवा आणि पक्ष्यांच्या कूजनाने हा थकवा पार पळून जातो. मंदिराची बांधणी दगडी आणि पेशवेकालीन, पण गूढ वाटते. गोमुखातून सतत पाण्याची धार चालू असते. त्या धारेचा धीरगंभीर आवाज मनाला आनंद देतो. समईच्या उजेडातील विष्णूची मूर्ती पाहून प्रसन्न वाटतं. आसूद गावात पूर्वसूचना दिल्यास राहण्याची आणि भोजनाची सोय होऊ शकते. शिवाय, कोकणी घरगुती पदार्थ किफायतशीर दरात मिळतात.

आसूद रस्त्यावर पुढेच व्याघ्रेश्वर मंदिर असून, हे मंदिर पेंडशांच्या कादंबऱ्यांमुळे मनात घर करून असतं. कच्च्या रस्त्याने गाडी थेट मंदिरापर्यंत नेता येते. व्याघ्रेश्वर ८०० वर्षं जुनं आहे. शंकराचं हे जागृत देवस्थान अनेकांचं कुलदैवत आहे. पुढे दीपमाळ, मोठा सभामंडप, गर्भगृह आणि मंडपातच तीन फूट उंचीची नंदीची पाषाणमूर्ती आहे. मंदिराच्या आवारातील जुन्या पद्धतीची दगडी बांधणीची विहीर बघण्यासारखी आहे.

दापोली तालुक्यात दोन उत्तम किनारे म्हणजे मुरुड आणि हर्णे. मुरुड गावात शिरल्याबरोबरच उजवीकडे कोपऱ्यात म. कर्वे यांचा अर्धपुतळा दिसतो. मुरुड आटोपशीर आणि स्वच्छ असल्याने पर्यटकांचा चांगलाच लोभ आहे. दुर्गादेवी मंदिराला भेट देऊन त्याच रस्त्याने पुढे थेट मुरुडच्या स्वच्छ किनाऱ्यावर जाता येतं. हा किनारा चांगलाच लांबलचक आणि स्वच्छ आहे. केव्हाही जा, तिथे गर्दी कधी जाणवणारच नाही. याच किनाऱ्याच्या उजव्या कोपऱ्यातून थेट



अनु.



सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग आणि हर्णेची बंदरपट्टी दिसते. मुरुडची घरं नारळी-पोफळीच्या सावलीत विसावली आहेत. आता अनेक रिसॉर्ट झालीयेत. घरगुती सोयीही आहेत.

मुरुडजवळच कर्दे हा आणखी एक बीच. इथला समुद्र शांत वाटतो. थंडीच्या मोसमात हर्णे, कर्दे आणि मुरुडच्या किनाऱ्यावर हजारो स्थलांतरित पक्षी येतात. पांढऱ्याशुभ्र लाटा आणि त्यावर झेपावणारे हजारो काळे-पांढरे गेल पक्षी तासन्तास पाहत बसता येतात. कर्दे इथूनच पहाटे सात ते आठ किमी समुद्रात गेल्यावर डॉल्फिनचं दर्शन होऊ शकतं. समुद्रात जाण्यासाठी बोटींची सोय आहे, मात्र ज्यांना भल्या पहाटे उठून जाणं शक्य आहे, त्यांनी ही संधी सोडता कामा नये.

आचार्य अत्रे यांच्या गाजलेल्या 'श्यामची आई' चित्रपटाचं बरंचसं शूटिंग ज्या हर्णे किनाऱ्यावर आणि बंदरात झालं, त्या हर्णे गावाला जुना इतिहास आहे. दाभोळप्रमाणेच हर्णे हेही एक प्रमुख बंदर. हे बंदर मासे व्यवसायासाठी अधिक ख्यातनाम आहे. सकाळपेक्षा हर्णे बंदरावर संध्याकाळी गेल्यास दीपस्तंभापलीकडून होणारा सूर्यास्त पाहण्याची संधी मिळते. दीपस्तंभाच्या टेकाडावरून हरिहरेश्वरचा डोंगर, कड्यावरचा गणपती, जवळचा सुवर्णदुर्ग आणि थेट दाभोळपर्यंतचा भाग दिसतो. मच्छिमारीसाठी गेलेल्या बोटी संध्याकाळी सूर्यास्ताच्या आसपास बंदरात येतात, तेव्हा त्यातील ताज्या माशांच्या खरेदीसाठी जी झुंबड उडते, ती पाहण्यासारखी असते. एकसाथ २०० च्या संख्येने बोटी बंदराला लागतात आणि बंदर गजबजून उठतं. ती वेळ ओहोटीची असल्यास टेम्पो, रिक्षा, ढकलगाड्या थेट बोटीपर्यंत जातात. याच बंदरात माशांचा लिलावही होतो आणि पाहतापाहता माशांच्या टोपल्यांनी भरलेले टेम्पो मुंबईच्या दिशेने रवानाही होतात.

हर्णे गाव झाडीत लपलंय. गावातून पुढचा रस्ता आंजर्ले इथल्या कड्यावरच्या गणपतीकडे घेऊन जातो. कोकणात गणपतीचं प्रस्थ खूप मोठं आहे. हर्णे-आंजर्लेचा समुद्रकिनारा, आंजर्लेची टेकडी आणि जवळच्या डोंगराच्या झाडाझुडपात लपलेलं गणपतीचं देऊळ हा परिसरच मोठा विलक्षण दिसतो. पूर्वी नदी ओलांडून जावं लागायचं. आता पूल झालाय. लांबूनच मंदिराची शिखरं नजरेला खुणावतात. मंदिरापर्यंत थेट गाडी जाते. हे मंदिरही पेशवेकालीन असून, काही वर्षांपर्यंत त्याची निगराणी निजसुरे कुटुंबाकडे होती, तेही ती भक्तिभावाने करत. मात्र आता ट्रस्ट स्थापन झाला असून, तेच त्याची व्यवस्था बघतात. मंदिरात भक्तनिवास असून, तिथे भोजनाचीही माफक दरात सोय होऊ शकते.

आंजर्ल्याजवळचं मुर्डी हे गाव श्री. ना. पेंडसे यांचं. तिथल्या परशुराम मंदिराचा समूह, उटंबरचं बेलेश्वरचं मंदिर आणि खुद्द केळशीतलं सिद्धिविनायक तसंच महालक्ष्मीचं मंदिर बघण्यासारखं आहे. भारजा नदीकाठावरील आणि डोंगराच्या घळीत हरवलेलं केळशी गाव टुमदार आहे. परांजपे आळीतलं सिद्धिविनायकाचं म्हणजे 'पांढऱ्या गणपती'चं मंदिर दगडी तटबंदी ल्यालेलं असून, माघात मोठा गणेशोत्सव साजरा केला जातो. महालक्ष्मी मंदिर मात्र खूप प्रशस्त आहे. हे मंदिर उत्तराभिमुख असून, बांधकामावर पेशवाई छाप आहे. परिसरात विहीर आणि तळ्यात कमळं असतात. केळशीहूनच पुढे थेट हरिहरेश्वर किंवा श्रीवर्धनला जाता येतं.

दापोलीच्या दक्षिण भागात लो. टिळकांचं चिखली गाव, साने गुरुजींचं पालगड, लाडघर-तामसतीर्थ, कोळथरे, पन्हाळेकाजी लेणी आणि खुद्द दाभोळ बंदर ही ठिकाणंही बघण्यासारखी आहेत. दापोलीपासून २०-२५ किमी अंतरावरली ही ठिकाणं एका दिवसातच बघून होतात, मात्र दाभोळला मोठा इतिहास असल्याने ते पूर्ण दिवसासाठी राखून ठेवायला हवं. दापोलीत बसचं जाळे चांगलं आहे, परंतु स्वतःचं वाहन करून जाणं चांगलं.



अनु.

# लाडघर (दापोली)




कोकणातल्या 'तामसतीर्थ' या नावाने प्रसिद्ध असलेलं लाडघर हे रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यामध्ये वसलेलं एक निसर्गरम्य गांव आहे. दापोली तालुक्याच्या मुख्यालयापासून ८ कि. मी. अंतरावर हे गाव आहे. या गावात पोहोचल्यानंतर समुद्राचा काही भाग लालसर रंगाचा दिसतो. म्हणून या भागास तामसतीर्थ असे म्हटले जाते. स्वच्छ, सुंदर समुद्रकिनारा व आसपासचा निसर्गसंपन्न परिसर यामुळे मन प्रसन्न करण्यासाठी लाडघर हे आंदर्शवत असं ठिकाण आहे.

लाडघर या ठिकाणाला धार्मिक महत्त्वदेखील आहे. या ठिकाणी केल्या जाणाऱ्या समुद्रस्नानाला विशेष महत्त्व आहे. पोहण्याचा आनंद घेण्यासाठी हे एक उत्कृष्ट ठिकाण आहे. समुद्र किनाऱ्यावरील काही भाग रंगीत खडे, दगड यांनी आच्छादलेला आहे. तर काही भाग खडकांनी आच्छादलेला आहे. ज्यांना समुद्र किनाऱ्यावर चालण्याचा आनंद घ्यायचा असेल. त्यांच्यासाठी लाडघराचा सागरकिनारा हे उत्तम स्थळ आहे.



अनु.



लाडघर सागरकिनारा या परिसराचा अजूनपर्यंत पुरेसा विकास झालेला नाही. इथून सूर्यास्ताचं मनोहारी दर्शन घडतं. सायंकाळच्या वेळेला लाल रंगाने भारून टाकलेले आकाश पाहताना पर्यटक खूश होतात. या ठिकाणचं महत्त्वाचं आकर्षण म्हणजे 'डॉल्फीन दर्शन'. नावेमध्ये बसून डॉल्फीन दर्शन सफारीचा आनंद आपल्याला घेता येतो. येथून जवळच एका बाजूने प्राचीन शिवमंदिर असलेलं वेळणेश्वर देवस्थान व दुसऱ्या बाजूला पुरातन 'दत्त' देवस्थान आहे. मासेप्रेमींसाठी लाडघरला येणं ही पर्वणी असेल. कारण हे ठिकाण माशांसाठी अतिशय प्रसिद्ध आहे. सायंकाळच्या अंधुक प्रकाशात, इथून जवळच असणाऱ्या बुरोंडी गावी किनाऱ्यावर होड्या दिसत असतात. हे दृश्य अतिशय मनोहारी असतं.

# चला डॉल्फिन बघायला...

रोजच्या धावपळीतून दूर नेऊन सगळा ताण विसरायला लावण्याची अद्‌भुत क्षमता निसर्गाशिवाय कशात आहे ? निसर्गाच्या कुशीत जाऊन सगळा क्षीण विसरून जाण्यासाठी निसर्गाची सारखी ओढ लागते. मग तो जर सागरकिनारा असेल तर मजा औरच असते. दापोलीजवळच्या करदे या ठिकाणीही वास्तवाचं भान विसरून समुद्राशी एकरूप होऊन जाण्यात निराळीच गंमत आहे. पर्यटकांना हा सागरकिनारा खुणावतोच. पण अगदी सातासमुद्रापलीकडूनही परदेशी पाहुणेही या सागराकडे खेचले जातात. वेगवान लाटांबरोबर लपंडाव खेळत डॉल्फिनही कुटुंबासमेवत इथे येतात. कोकणसागरातील पर्यटनसफरीचा आणि तिथल्या स्वादिष्ट किंड्याचा, माश्यांचा आस्वाद घेत किंबहुना त्यांचा फडशा पाडत त्यांची समुद्रसफारी इथे येते. लाटांवरून उंच कोलांट्या उड्या मारत डॉल्फिनची कुटुंबं दाखल होतात. त्यांचं दर्शन घ्यायचं असेल तर जून-जुलै महिना योग्य. मच्छिमारांबरोबर त्यांच्या लाँचमधून जायाचं आणि डॉल्फिन काही अंतरावर बघायचे. पण समुद्रात उतरू न शकणाऱ्या पर्यटकांनी निराश होण्याचे कारण नाही. त्याला दुसरा मस्त पर्याय आहे. सागरकिनाऱ्यासमोरच, उंच डोंगरावर असलेल्या रिसॉर्टमध्ये बसून अथांग सागराचं दर्शन घेण्याचा अनुभवही घेता येतो.

# हा सागरी किनारा



रम्य समुद्रकिनारे, अवतीभवती हिरवाई, आल्हाददायक वातावरण ही सारी कोकणची वैशिष्ट्यं. कोकणातली अनेक ठिकाणं पर्यटकांमध्ये प्रसिद्ध आहेत. त्यातलंच एक नाव दापोली. या दापोलीपासून केवळ १५ मिनिटांच्या अंतरावर असणारं निसर्गरम्य गाव म्हणजे कर्दे. शहरातला गजबजाट, कोलाहल, धावपळ, गर्दी यांपासून काही काळ शांतता हवी असेल, निसर्गात रमायचं असेल तर कर्दे गावात दोन दिवस मुक्काम करायला हरकत नाही. कर्दे गावच समुद्रकिनारा खूप सुंदर आहे. कर्द्यातून दिसणारं सूर्यास्ताचं दृश्य केवळ अविस्मरणीय असतं. कर्द्याच्या समुद्रकिनाऱ्यावर सॅण्ड स्कूटर, पॅरासेलिंग वॉटरस्पोर्ट्सची व्यवस्था आहे. याशिवाय तिथे डॉल्फिन सफारीही घडवली जाते. साधारणतः एक-दीड तासांच्या फेरीत डॉल्फिन्स दाखवले जातात.



अन्.

# मंदिराचं गाव श्री कोळेश्वर

निसर्गाचं सान्निध्य आणि वनश्रीनं नटलेलं पूर्वाश्रमीचं शंभूग्रामच आज कोळेश्वर म्हणून ओळखलं जातं. श्री कोळेश्वर ही देवता शंकरच, पण कोळ्यांना सापडला म्हणून कोळ्यांचा ईश्वर तो कोळेश्वर अशी त्याची आजची ओळख झाली. श्रावणातले सोमवार, एकादशी, शिवरात्र आणि कार्तिक महिन्यांत ठिकठिकाणांहून येणारे शेकडो भाविक कोळेश्वरला खास अभिषेक करतात.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यात दाभोळ बंदरापासून केवळ १२ कि. मी. अंतरावर असलेले कोळेश्वर दापोलीपासून २७ कि. मी. इतकेच दूर आहे, मात्र दापोली डेपोतून दर दोन-दोन तासांनी कोळेश्वरला बस सोडली जात असल्याने कोणत्याही वेळेला दापोलीला पोचल्यास कोळेश्वरला जाण्यासाठी एसटी हमखास मिळते. पुण्याहून दापोलीला तर थेट बस आहे. रेल्वेने जायचे असल्यास खेड स्थानकावर उतरून दापोलीला जाऊन मग कोळेश्वरला जाता येते.

कोळेश्वर मंदिराला कोकणातल्या देवळाप्रमाणेच समुद्राची पार्श्वभूमी असल्याने देवळाच्या सौंदर्यात आणखीनच भर पडते. मंदिराच्या समोरचा सभामंडप नवीन मोठा आहे आणि देवळाचे बाकीचे बांधकाम मात्र प्राचीन काळातले आहे. आसपास अनेक मंदिरे असल्याने पूर्वाभिमुख असलेले हे मंदिर म्हणजे देवांचे संकुलच म्हणायला हवे. गाभाऱ्यातील स्वयंभू पिंडीतून सतत पाणी पाझरत असल्याचा अलौकिक चमत्कार येथे भाविकांना पहायला मिळतो. या चमत्काराचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला, पण पाणी पाझरण्याचा तपास लागू शकला नाही. मुख्य मंदिर तीन ागांत विस्तारले असून, भोवतीची संरक्षक फरसबंदी आजही मजबूत व भक्कम आहे. मंदिरापर्यंत तर चिरेबंदी पाट आहेत. बांधणी मुस्लिम धाटणीची मानली जाते.

कोळेश्वर मंदिराच्या आजूबाजूलाच श्रीलक्ष्मी, विष्णु मंदिर, श्री गणपती, मारुती, जाखाय-काळकाय ग्रामदेवता, राम मंदिर, दत्त मंदिर अशी देवळे असल्याने मंदिराचे गाव म्हणून कोळेश्वर परिचित आहे. उतरत्या छापरांची अस्सल कोकणी घरे कोणाचेही लक्ष वेधून घेतील अशीच आहेत. पांढऱ्या शुभ्र वाळूचा पट्टा लाभलेला लांबच लांब किनारा तसा शांतच असतो. विशेष म्हणजे याच किनाऱ्यावर ाळूत काळ्या रंगाच्या कवड्या सापडतात. घराघरांतून निवास भोजनाची वस्तात सोय होऊ शकते. कोकणी उतपादनेही वाजवी किंमतीत मळतात. केवळ कोळेश्वरचे दर्शन घेऊन समाधान होत नसल्यास ाजूलाच असलेले लोकमान्य टिळकांचे चिखलगाव, तामसतीर्थ, रोंडी गाव आणि दाभोळ गावाची पायपीट करता येऊ केल. म्हणजे कोळेश्वरचे दर्शन घेतल्यास पर्यटन आणि र्शन असा दुहेरी लाभ होऊ शकेल.

# पन्हाळेकाझी


***रत्नागिरी*** जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यातलं एक गाव आहे पन्हाळेकाझी. या गावाला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. पन्हाळेकाझी हे गाव कोरलेल्या लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे. कोटजाई नदी जी दाभोळ खाडीला जाऊन मिळते, या नदीच्या काठावर वसलेलं हे एक नितांत सुंदर गाव आहे. इथल्या गुंफा ऐतिहासक असून त्या जवळपास हजार वर्षांहून अधिक जुन्या आहेत. एकूण २९ भल्या मोठ्या दगडांमध्ये पहायला मिळतात. या ठिकाणी श्रीगणेश, सरस्वती यांसारख्या देवीदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. तसंच भिंतींवर महाभारत आणि रामायणातले काही प्रसंग चित्रीत केले आहेत.

पन्हाळेकाझी इथे नैसर्गिक सौंदर्य आणि ऐतिहासिक लेण्यांचं अनोखं मिश्रण आहे. हा संपूर्ण भाग पाहण्यासाठी किमान दोन-तीन तास हातात हवेत. लेणी पाहताना इथल्या आंब्यांच्या झाडांखाली घटकाभर विश्रांती घेण्याची संधी मिळते. तसेच विरंगुळा म्हणून नदीत पोहण्याचा आनंददेखील पर्यटकांना घेता येतो. नदीकाठचं दृश्य अतिशय रमणीय आहे. येथील परिसर हिरव्यागर्द वनराईने समृद्ध आहे.





पन्हाळेकाझी लेण्यांना पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. या पर्यटनस्थळास 'क' वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. दापोलीपासून पन्हाळेकाझीचं अंतर २१ कि.मी. असून, मुंबई, पणजी या राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ वरील खेड तालुक्यातल्या भरणानाका इथूनही या पर्यटनस्थळाकडे जाण्यासाठी मार्ग उपलब्ध आहे. हे अंतर आहे ४० कि.मी. इतकं. पन्हाळेकाझी लेण्यांवरील डोंगर म्हणजे पन्हाळेदुर्ग किंवा पद्मनाभदुर्ग होय. गडावर तटबंदीचे अवशेष दिसून येतात. माथ्यावर मधोमध एका जोत्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा नव्यानंच बसवलेला आहे. हेरीटेज पर्यटनासाठी पन्हाळेकाझी हे ठिकाण विकसित होत आहे. इथली होळी रात्री एक-दोनच्या सुमारास लावली जाते. होम कसा असतो, पालखी कशी नाचवली जाते हे सगळं इथे पाहता येऊ शकेल.




**दाल्भ ऋषींची परंपरा सांगणारं दाभोळ म्हणजे सर्वात प्राचीन बंदर. आजही इथं मोठ्या प्रमाणात गलबतांची लगबग चालू असते. मच्छिमारांच्या बोटींनी बंदर सकाळ संध्याकाळ गजबजून जातं. चंडिका देवीचं मंदिर, समुद्राची देखणी रुपं आणि खास कोकणी पाहुणचार यासाठी दाभोळची सैर करायलाच हवी.**

छोट्या छोट्या डोंगरांच्या रांगा आणि समुद्राच्या किनाऱ्यावरून पसरत गेलेली नारळाची दाट झाडी असे कोकणचे वर्णन करता येईल. लाल मातीच्या पायवाटा हे तर कोकणचेच वैशिष्ट्य. दाभोळ आणि आसपासच्या परिसरात फिरताना हीच सारी वैशिष्ट्ये पर्यटकांना आढळतील. दाभोळ गाव, बंदर आणि खाडीचा परिसर पाहिल्यानंतर कोकण निसर्गसंपन्न का आहे याची खात्री पटते. तीन ते चार दिवसांसाठी कोकणात फिरायचे असल्यास चटकन जाण्यासाठी पर्यटकांना दाभोळ परिसराची निवड करायला काहीच हरकत नाही.

खुद्द दाभोळ गाव, दाभोळ बंदर, चंडिकादेवी मंदिर, अंडा मशीद, कोळथरे गाव अशा परिसरात फिरण्यासाठी तीन ते चार दिवस पुरतात. मुंबईकडून जाणारे सच्चे पर्यटक आधी दापोलीला जाऊन मगच दाभोळच्या दर्शनासाठी रवाना होतात. दापोली-दाभोळ रस्त्यावर दाभोळच्या अलीकडे चार कि. मी. अंतरावर मुख्य रस्त्यापासून थोडे आतमध्ये

चंडिकादेवीचे स्वयंभू स्थान आहे. आता नवीन पद्धतीचे मंदिर झाले असले तरी हे मंदिर मूळचे गुहासदृशच आहे. देवीची मूर्ती साधारणतः साडेतीन फूट उंचीची असावी. मूर्तीच्या चारही हातात तलवार आणि अन्य शस्त्रे आहेत. गुहेचे तोंड अगदीच चिंचोळे असल्याने मंदिरात प्रवेश करताना नम्र होऊनच प्रवेश करावा लागतो. चंडिकादेवी मंदिराला शिवाजी महाराजांनी भेट दिल्याचा उल्लेख सापडतो. सभोवतालचा परिसर शांत आणि एकलकोंडा वाटत असला तरी वाहत्या वाऱ्याने प्रसन्न वाटते आणि दाभोळकडे रवाना होताना देवदर्शन झाल्याने मनालाही तजेला येतो.

दाभोळ गावाचे नाव दाल्भ ऋषींच्या नावावरून पडले असल्याचे सांगण्यात येते. गावातले दालभेश्वर मंदिरही खास करून बघण्यासारखे आहे. मूळ मंदिर पेशवेकालीन छापाचे असून, पायऱ्या दगडी आहेत.

मूळ मंदिर

गावापासून दूर व काहीसे उंचावर झाडीत आहे. आत महादेवाची पिंड दिसते. बाजूलाच गुहा असून, ती दाल्भ ऋषीची असून ते या गुहेत तपश्चर्या करीत असा इतिहास गावकरी सांगतात. दालभेश्वर मंदिराला जसा प्राचीन इतिहास आहे, तसाच इतिहास माँसाहेबांच्या मशिदीला आहे. मुस्लिम राजवटीच्या काळातली ही मशीद असून, इतकी वर्षे उलटली असली तरी ती अजून बऱ्याच चांगल्या स्थितीत आहे. मशिदीला चार मिनार आणि ७५ फुटांचा मोठा घुमट असून मशिदीचा इतिहासही मोठा मजेशीर आहे. विजापूरची राजकन्या आयेशाबिबी हिला मक्केला जायचे असल्याने ती दाभोळ बंदरात आली होती. पूर्वी मक्केला जाण्यासाठी दाभोळहूनच जावे लागत असे. मात्र अचानक हवामान बदलले आणि तिचे मक्केला काही जाणे झाले नाही. अखेर मक्केला जाण्यासाठी लागणारा पैसा दाभोळला ही मशीद उभारण्यासाठी खर्च करण्यात आला. हीच मशीद अंडा मशीद नावाने परिचित असली तरी हे नाव कसे पडले याबाबत कोणी सांगू शकले नाही. दाभोळ खाडीवर फेरफटका मारताना झाडीत लपलेली ही मशीद आणि तिचे मिनार लांबूनही दिसतात.

खुद्द दाभोळ बंदर पूर्वी इतकेच आजही गजबजलेले दिसते. बंदरातला मुख्य व्यवसाय मच्छिमारीचा असल्याने सायंकाळ होऊ लागताच समुद्रात खोलवर गेलेल्या बोटी मोठ्या संख्येने किनाऱ्याकडे येऊ लागतात तेव्हा एकच पलका होतो. सूर्यास्ताचे मनोहारी दृश्य आणि धन्याचे स्वागत करण्यासाठी नटूनथटून आलेल्या कोळणी, मासे विकत घेऊन मुंबईकडे रवाना करण्याची टेंपोंची लगबग पाहण्यासारखी असते. इथला मासा परदेशातही जातो. काही वेळापूर्वी शांत वाटणारा अख्खा किनाराच जत्रेसारखा फुलून गेलेला दिसतो. ताज्या आणि फडफडीत माशांचा बाजार आणि विकत घेणाऱ्यांची लगबग बघत बसणेही गंमतीशीर वाटू शकते. बंदरावरून दूरवरचे वेलदूर, धोपावे ही गावेही दिसतात. किनाऱ्यावरचा दीपस्तंभ ओढ लावतो. रात्रीचा अंधार पडताच पूर्वी एन्रॉनच्या चिमण्या दिसत असत. याच बंदरातून दर तासाला फेरीबोटीतून पर्यटकांना फिरवून आणले जाते. सगळ्यांनी हा अनुभव घ्यायला हवा. बोटीने पलीकडे जाऊन थेट गणपतीपुळे, रत्नागिरी, चिपळूण, गुहागर आणि वेळणेश्वरापर्यंत जाऊन येता येते.

दाभोळ बंदर खूप पुरातन आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्वात प्राचीन बंदर म्हणून



अनु.

दाभोळचाच उल्लेख केला जातो. टॉलेमीच्या जुन्या नकाशात दाभोळचे नाव आहे. पूर्वी दाभोळवरूनच तलम वस्त्रांचा आणि अरबी घोड्यांचा व्यापार चाले. मुस्लिम राजवटीने जवळपास ३०० वर्षे परिसरावर राज्य केले, पण ही राजवट जुलूम जबरदस्तीची असल्याने स्थानिकांनी वारंवार उठाव केला. बंदराची ख्याती झाल्यानेच पुढे डच, पोर्तुगीज, हबशी, तुर्क आणि इराणीही येऊन पोचले. आजही मुसलमानांच्या असंख्य कबरी गावात सर्वत्र दिसतात. दर्गे आणि मशिदीही मोठ्या संख्येने आहेत. त्यांची आजची अवस्था पडझडीचीच आहे.

ज्यांना समुद्रकिनाऱ्याची आवड आहे, त्यांना दापोली-दाभोळ मार्गावरील कोळथरे गाव आणि किनारा नक्कीच आवडेल. केवळ समुद्रकिनारा एवढीच कोळथरेची ओळख नव्हे. पांढऱ्या स्वच्छ वाळूचा किनारा, बाजूची नारळाची दाट झाडी आणि त्या झाडीत लपलेले कोळथरे पट्टीच्या पर्यटकाला वेडे करते. छोटे छोटे रस्ते आणि त्यांच्या दोन्ही बाजूस उतरत्या छपराची खास कोकणी तोंडवळ्याची घरे कोणालाही आवडून जातील. बाजूच्याच डोंगरात अजूनही अनेक जिवंत झरे आहेत आणि त्याचे पाणी औषधांसाठी वापरले जाते हे स्थानिक मंडळी आवर्जून सांगतात. पण येथलेच एक आश्चर्य बघायला विसरू नका. जवळच्याच डोंगरात समुद्राचे पाणी वर्षानुवर्षे आदळत राहिल्याने भल्या मोठ्या आकाराचे विवर तयार झाले आहे. भरतीच्या सुमारास पाणी वेगाने दौडत सुसाट येते आणि या विवरावर आदळते. आत शिरून वर उसळते आणि त्याचाच केवढा तरी आवाज होऊन तो अवघ्या डोंगरात घुमतो. कोळथरे हे गाव मंदिराचे गाव म्हणूनही ख्यातनाम आहे. गावात कोळेश्वराचे मंदिर ग्रामदेवतेप्रमाणेच आहे. त्याशिवाय श्रीलक्ष्मी, विष्णू मंदिर, मारुती आणि रामाचे मंदिर, खेम मंदिर, दुर्गादेवी मंदिर अशा मंदिरांची दाटी झालेली आहे.

खेड, दापोली, चिपळूण, रत्नागिरी आणि दाभोळच्या परिसरात विविध श्रेणीची असंख्य हॉटेले आहेत. ही हॉटेले आपल्या चवीचे लाड पुरवू शकतात. दाभोळला माशांची कमतरताच पडणार नाही. रेल्वे, एस. टी., लक्झरी गाड्या किंवा स्वतःच्या वाहनाने दाभोळचा परिसर पर्यटकांना केव्हाही पादाक्रांत करता येऊ शकतो. दाभोळच्या बंदरात लाटा बघत बसले तरी वेळ कसा निघून जातो ते कळणारही नाही. देखणा सूर्योदय आणि सूर्यास्त बघायचा असल्यास दाभोळ ही काही वाईट निवड ठरणार नाही.



अनु.

# `चिपळूण

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते चिपळूण | | | | | 238 | | | | |
| **1** | सवतसडा वॉटरफॉल | धबधबा | | | मंदिर | 3.5 | NW | | | |
| **2** | अडरे | धबधबा | | | | 11.5 | SE | 15 | SE | |
| **3** | कुंभार्ली घाट | धबधबा | घाट | | निसर्ग | 20.5 | SE | 19.5 | SE | |






जूनमध्ये मान्सून सुरू झाला की वेध लागतात ते धबधब्यांचे. त्यातही सह्याद्रीमधल्या धबधब्यांचं वेड पर्यटकांना जरा जास्तच आहे. मुंबई-गोवा हायवेवरील चिपळूण हे शहर मुंबईपासून २६० किमी अंतरावर आहे. शहरात प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला परशुराम घाट लागतो. या घाटामध्येच कोकणच्या निर्मात्या श्री परशुरामाचं मंदिर आहे. इथून आपण चिपळूणच्या दिशेने उतरत असताना, या नॅशनल हायवे १७च्या (एन. एच. १७) उजव्या हाताला, चिपळूणपासून ५ किमी आधी आपणास एका प्रचंड धबधब्याचा आवाज ऐकू येतो. हाच तो 'सवतसडा'. हे नाव मनामध्ये नक्कीच काही प्रश्न उभे करते. या सवतसड्याची कथा इथले गावकरी सांगतात ती अशी की, इथे एका गृहस्थाच्या दोन बायका होत्या. त्यातील नावडती स्त्री आवडत्या स्त्रीला म्हणाली, तुझी आज मी वेणी घालून देते. कधीही असं न म्हणणाऱ्या नावडतीबद्दल आवडतीला शंका आली म्हणून प्रत्यक्ष वेणी घालत असताना आवडतीने स्वतःच्या पदराची गाठ नावडतीच्या पदराला हळूच घट बांधली. वेणीफणी झाल्यावर नावडतीने या कड्यावरून आवडतीला धक्का दिला. परंतु गाठ बांधलेली असल्यामुळे आवडतीसह नावडतीदेखील खाली कोसळली. तेव्हापासून या निसर्गरम्य धबधब्याला 'सवतसडा' हे नाव पडलं. धबधब्याच्या पायथ्याची जाण्यासाठी येथील नगरपालिकेने सिमेंटची वाट केलेली आहे. अगदी धबधब्याच्या जवळ जावून त्याचा आपणास आनंद घेता येतो. हायवेच्या अगदी कडेस असल्याने आबालवृद्धदेखील याला भेट देऊ शकतात. ज्यांना धबधब्यात जाण्याची भीती वाटते ते जवळ उभे राहून वरून पडणाऱ्या धबधब्याचे तुषार आपल्या अंगावर घेऊ शकतात. पाऊस खूपच पडत असेल तर याचे तुषार अगदी हायवेपर्यंत येतात. जेथून पाणी कोसळते तेथे या धबधब्याचा घोड्याच्या नालेसारखा असल्याने वेगवान जलधारा कड्यापासून काही अंतरावर कोसळतात. हा धबधबा फक्त पावसाळ्यातच असतो. चिपळूण शहर अगदी ५ किमीवर असल्याने तिथे हॉटेल्स भरपूर आहेत.

**कसं जायचं?**

मुंबई-गोवा महामार्गावर मुंबई ते चिपळूण हे अंतर २६० किमी आहे तर पुणे ते चिपळूण अंतर २२० किमी आहे.




वळणावळणांच्या घाटावर थांबून तुम्ही दरीत हळूच डोकावून पाहिलंय का? पावसाने दिलेला हिरवा नजराणा मिरवणारी सृष्टी न्याहाळण्याचा अवर्णनीय आनंद घेतलाय का? नसेल घेतला, तर सामान भरा आणि अडरेच्या वाटेने निघा. चिपळूणपासून अवघ्या १३ किमी अंतरावर अडरे गाव आहे. अडरेचा भव्य नैसर्गिक धबधबा दरीतून खळाळत खाली कोसळतो. पायथ्याशी पहुडलेलं अडरे गाव, दोन्ही बाजूंना विशाल डोंगर, मधोमध धरणाची भिंत आणि एका बाजूला खळाळणारा धबधबा हा देखावा अगदी बघण्यासारखा आहे.

कोकणात नैसर्गिक सौंदर्याची खाण आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशी पहुडलेल्या कोकणचं सौंदर्य खुलतं, ते पावसाच्या दिवसात. इथे पावसाळ्यात शांत, शीतल हिरवाई पाहायला मिळते. दरी-डोंगरातून वाहणारं पाणी व खळखळणारे झरे-धबधबे हे या दिवसांचं वैशिष्ट्यं आहे. कोकणात अनेक ठिकाणी छोटेमोठे धबधबे आहेत. ते आज पर्यटकांचं आकर्षण झाले आहेत. अशाच प्रकारे पर्यटकांच्या चर्चेचा विषय झाला आहे, अडरे धबधबा! रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यामध्ये हा धबधबा आहे. चिपळूणच्या पूर्वेला अवघ्या १३ किमी अंतरावर हे ठिकाण आहे. हा धबधबा मानवनिर्मित असला, तरी त्याचं स्वरूप नैसर्गिक आहे. अडरे व अनारी गावाच्या सीमेवर पाझर तलाव बांधण्यात आला आहे. त्याची लांबी ५०० फूट व रुंदी ४२०० फूट आहे. या तलावाच्या बाजूने नदीकडे पाणी सोडण्यात येतं. खूप उंच व भल्यामोठ्या दगडांवरून वाहणारं हे पाणी आपलं वेगळंपण जपत आहे. भरपूर पाण्याचं अत्यंत देखणं दृश्य पाहाण्यासारखं आहे. या धबधब्यावरून पडणारं पाणी ३० फुटांवरून पडतं. पुढे ते छोट्या उंचवट्यांवरून मोठ्या शीळांवर आदळत नदीला जाऊन मिळताना फार मोहक दृश्य दिसतं. दोन्ही बाजूंना विशाल डोंगर, मधोमध धरणाची भिंत आणि एका बाजूला खळाळणारा धबधबा हा देखावा फार सुंदर आहे. धरणाच्या पायथ्याशी शांतपणे पहुडलेलं अडरे गाव, गुराख्यांनी चरायला आणलेल्या गायी-म्हशी, आजूबाजूला जंगलात गुराख्यांच्या वाजणाऱ्या मंद बासरीचा सूर आणि घनदाट जंगलातून पक्ष्यांच्या आवाजाचा येणारा किलबिलाट आणि त्यामध्ये कोकिळेच्या मंजुळ गाण्याचा स्वर इथे येणाऱ्याचं भान हरपायला लावतो.

या धबधब्यावर ऑगस्ट महिन्यापासून मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी उसळते. दूरवरून अनेक पर्यटक येऊन धबधब्यात चिंब भिजण्याचा आनंद लुटतात. इथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये कॉलेज युवक-युवतींचा फार मोठा भरणा असतो. श्रावण महिन्यात आणि सुट्टीत या धबधब्यावर जत्रेचं स्वरूप असतं. मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीला आता कोकणचंही विशेष आकर्षण वाटायला लागलं आहे. कोकणातील अनेक ठिकाणं चित्रपटांमध्ये दिसायला लागली आहेत. अडरे इथला धबधबा यासाठी आदर्श ठरू शकेल. पर्यटन विकास केंद्राने असं प्रकारचं दुलर्क्षित पर्यटन केंद्र विकसित करण्यासाठी पावलं उचलली पाहिजेत. त्यामुळे या भागाचाही विकास होऊ शकेल.


अडरेच्या या धबधब्याला भेट देण्यासाठी चिपळूण आगारातून अडरे-अनारी एसटी बसेस आहेत. दर तासाने सुटणाऱ्या एसटी बसेसबरोबर खाजगी वाहनांची सोयही आहे. अडरेला भेट देण्यासाठी आता वाट कसली पाहायची?

## कुंभार्ली घाट

सह्याद्रीच्या माथ्यावरुन कोसळणारे अनेक धबधबे पाहण्याची संधी पर्यटकांना इथे मिळू शकते. थंडगार वातावरण, दाट धुकं, अंगाला स्पर्श करणारे ढग हे सारं मोहवून टाकणारं असतं. चिपळूण-कराड मार्गावर असलेला हा घाट चिपळूण स्टेशनपासून ३० किलोमीटरवर आहे.

# गुहागर

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते गुहागर | | | | | 264 | | | | |
| **1** | गोपाळगड | दीपगृह | किल्ला | | | 17 | N | | | |
| **2** | गुहागर | | | | | 0 | | | | |
| **3** | वेळणेश्वर | समुद्रकिनारा | | | मंदिर | 14.5 | S | 14.5 | S | |
| **4** | हेदवी | समुद्रकिनारा | | | मंदिर | 15.5 | S | 3.5 | SE | |
| **5** | आबलोली | ॲग्रो टुरिझम | | | निसर्ग | 35 | SE | 22 | SE | |




## अंजनवेलचा किल्ला (गोपाळगड)

दाभोळ बंदरातील व्यापारी जहाजांवर लक्ष ठेवण्यासाठी विजापूरकरांनी हा किल्ला बांधल्याचं सांगण्यात येतं. १६६० नंतर शिवरायांनी हा किल्ला जिंकून तो स्वराज्यात सामील करून घेतला. पुढे संभाजीराजांनी त्याची डागडुजी केली. हा किल्ला पहायला साधारणपणे दोन तास लागतात. किल्ल्याचं बांधकाम आजही मजबूत असल्याचं जाणवतं. इथून जवळच दीपगृह आहे. या दीपगृहातूनदेखील गोपाळगड, दाभोळच्या खाडीचा परिसर रमणीय दिसतो.

गुहागरच्या उत्तरेला असलेल्या अंजनवेल गावामध्ये गोपाळगड हा पुरातन किल्ला आहे. किल्ल्याला बारा बुरुज आहेत. किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर इतिहासकालीन काही अवशेष येथे पहावयास मिळतात. गोपाळगडाच्या खाली एन्रॉनची जेटी दिसते. व दाभोळची खाडी येथून आत प्रवेश करते. यामुळे मच्छिमारांच्या बोटी, वाळूचे बार्ज दाभोळच्या खाडीत प्रवेश करताना इथून दिसतात. दाभोळ बॅकवॉटर व समुद्रकिनारा यांचं विहंगम दृश्य गोपाळगडावरून पाहता येते. गोपाळगडावरून परत थोडे मागे येऊन वेलदूर जेटीवर जाता येते. वेलदूर जेटीवर प्रामुख्याने मच्छिमारी व्यवसाय चालतो. सर्व प्रकारचे मासे येथे पहायला मिळतात. याच जेटीवर व दाभोळ बॅकवॉटरमध्ये अलिकडे बॅकवॉटर टुरिझम विकसीत होतेय.

## गुहागर

जगातील काही देश केवळ समुद्रकिनाऱ्यांमुळे पर्यटनासाठी प्रसिद्ध झाले आहेत. भारतातली कोकण किनारपट्टीही त्याला अपवाद नाही. पण, मुरुड-जंजिरा, हरिहरेश्वर, दिवेआगार, गणपतीपुळे, तारकर्ली हे ठराविकच समुद्रकिनारे प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय गुहागर तालुक्यातही असे रम्य समुद्रकिनारे आहेत. गुहागरमध्ये देखणा असा ६ ते ७ किमी. लांबीचा समुद्रकिनारा आहे. दरवर्षी २ लाखांहून अधिक पर्यटक या समुद्रकिनाऱ्यावर येतात. अतिशय निसर्गरम्य असं हे गाव. खालचापाट व वरचापाट अशा दोन भागांमध्ये प्रामुख्याने या गावाची विभागणी होते. गावाच्या मध्यावरती एक रस्ता आहे आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला कोकणी पद्धतीची सुंदर घरे आहेत. कोकणातील पारंपारिक ग्रामरचना या गावामध्ये आपल्याला पाहता येते. प्रत्येक घराच्या मागे नारळी-पोफळीच्या बागा आहेत. तालुक्याचं मुख्य ठिकाण असल्याने अतिशय सुंदर बाजारपेठ आहे.

---

गावातील प्रत्येक घरात समुद्राची गाज ऐकू येते. या संपूर्ण गावाला किनारा लाभला असून इथे अनेक पर्यटक पर्यटनाचा अनुभव घेतात. गावाचं आराध्यदैवत व्याडेश्वर आहे. या बरोबरच गावात दुर्गादेवीचे मंदिर हे पर्यटनाचे आकर्षण आहे. या शिवाय निसर्गरम्य दत्त मंदिर व टेकडीवरचा अष्टवणे गणेश ही पर्यटकांना मोहवणारी धार्मिक स्थळे आहेत.

### पालशेतचा किनारा

केरळहून अधिक कोकणातील बॅकवॉटरचं सौंदर्य आहे. खाडी किनारे असलेली गावे, खाडी किनारी चाललेली वेगवेगळी कामं, मच्छिमारांचं जीवन हे सगळं या बॅकवॉटर टूरमध्ये प्रत्यक्ष पाहता येतात. वरच्या बाजूला भारतीय शिपयार्डचा मोठा जहाज बांधणीचा कारखाना पाहता येतो. इथूनच उत्तर गुहागरची एक दिवसाची टूर करता येऊ शकते. गुहागरच्या



अनु.

दक्षिणेकडेसुद्धा अनेक सुंदर पर्यटनस्थळं आहेत. दक्षिणेला गुहागरला लागूनच असलेलं असगोली हे मच्छिमारांचं गाव आहे. हे गावही अतिशय देखणं आहे. तिथून पुढे पालशेतमध्ये गेल्यावर संपूर्ण हापूस आंब्याच्या बागा व नारळी सुपारीच्या बागा पहायला मिळतात. गावापासून २ किमी आत गेल्यावर पालशेतचा सुंदर समुद्रकिनारा आहे. येथेही कोळी समाजाची वस्ती आहे. या गावात अलिकडेच पुरातन गुहा सापडली आहे. पालशेतच्याही पलिकडे अडूर नावाचं गाव आहे. हे विनोबा भावेंचे मूळ गाव. अडूर गावाच्या बाजूलाच बोऱ्याबंदर आहे. बोऱ्याबंदरच्या बाजूला कारुळचा देखणा समुद्रकिनारा आहे आणि बोऱ्याचा देखील छोटा समुद्रकिनारा आहे. हे संपूर्ण कोळी वस्ती असणारं गाव आहे. खरं कोकण पाहण्याकरिता त्या ठिकाणी आवर्जून जायला पाहिजे.

## उकडीचे मोदक आणि थालीपीठ

कारुळच्याच थोडे पुढे गेल्यावर वेळणेश्वरचा समुद्रकिनारा आहे. हा समुद्रकिनारा वेळणेश्वराच्या पुरातन मंदिरामुळे प्रसिद्ध झाला आहे. मंदिर व रुपेरी सागरकिनारा हे कोकणच्या वैभवाचं प्रतिक आहे. या गावात अनेक घरांमध्ये निवास व भोजनाची व्यवस्था होते. कोकणातील ग्रामपर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आवर्जून वेळणेश्वर पाहिल पाहिजे. कोकणातील थालीपीठ, उकडीचे मोदक, पारंपारिक ब्राह्मण पद्धतीचे जेवण याचा आनंद या गावात घेता येईल. या पलिकडेच हेदवी नावाचें प्रसिद्ध गाव आहे. दशभुज गणपती हा सर्वांनाच परिचित असलेले देवस्थान आहे. गणपती मंदिरापासून २०० ते ३०० मीटरवर हेदवीचा सुंदर समुद्रकिनारा आहे.  हेदवीच्या सागर किनाऱ्याबरोबरच त्याचेही पुढे गेल्यावर रोहीले व नरवण ही छोटी–छोटी गावे आहेत. नरवणच्या बाजूलाच छोटासाच परंतु सुंदर समुद्रकिनारा आपल्याला फोटो काढण्यासाठी मोहात पाडतो. त्याच्यापुढे गेल्यावर तवसाळ नावाचे खाडी किनाऱ्यावरील गाव आहे. जयगडच्या खाडी पलीकडे जयगडचा किल्ला आणि जयगड बंदर पाहता येते. जयगड बॅकवॉटरमध्ये मस्त नौकासफर करणं शक्य आहे.



## गुहागर शेजारी आणखी ...

- ✓ बामणघळ : *(हेदवीपासून ३ कि. मी.)*
- ✓ व्याडेश्वर, उफराटा गणपती आणि अंजनवेलचा गोपाळगड *(गुहागरपासून २७ कि. मी.)*
- ✓ नरवणचे व्याघ्रांबरी देऊळ : *(हेदवीपासून ३ कि. मी.) ही नरवणची ग्रामदेवता आहे.*
- ✓ रोहिले : *(नरवणपासून ४ कि. मी.) नदी, समुद्र, डोंगर, पुळण आणि संथ वहाणाऱ्या बोटी.*
- ✓ मळण : *(गुहागर-शृंगारतळी मार्गावर) आनंदीबाईंचे जन्मगाव.*
- ✓ काताळे जेट्टी-फेरीबोटीची सोय, शास्त्री नदीतील बॅकवॉटरचा आगळा प्रवास.

**गुहागरला पोहचण्यासाठी...**

मुंबईहून गुहागरपर्यंत भरपूर बसेस. तिथून सर्व ठिकाणी जाण्यासाठी बसेस आणि रिक्षांची सोय

**हॉटेल्स**

गुहागरमध्ये अनेक हॉटेल्स आहेत. हॉटेल लगून, हॉटेल रुचिरा, सागर लॉज, हॉटेल कौटिल्य, हॉटेल मानस ही त्यापैकी काही.

**पेट्रोलपंप**

या परिसरात फारसे पेट्रोलपंप नाहीत. त्यामुळे अडचण येऊ शकते. म्हणून गुहागर येथेच पेट्रोल भरून घेतले की, निश्चिंत मनाने प्रवास करता येतो. हल्ली रिक्षांची संख्या वाढली आहे. विनंती केल्यास रिक्षाचालक मदत म्हणून पेट्रोल देतातही, पण त्याची खात्री नाही.



अनु.

वीकएंड

# वेळणेश्वर-गुहागर

सूर्याची कोवळी किरणं अंगावर येत असतानाच तुम्ही गुलाबी थंडीत समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारायला बाहेर पडता. तो अथांग सागर त्याच्या मस्त लयीत फेसाळत कायम वाळूपर्यंत आवर्तनं करीत असतो. त्याच्या विलोभनीय दर्शनानंतर तुम्ही टिपिकल कोकणातल्या कौलारू घरी परतता आणि मस्त भाजणीचे गरमागरम वडे ब्रेकफास्टसाठी तुमचं स्वागत करतात. माडपोफळींच्या वाडीत तोपर्यंत सकाळची कामं सुरू झालेली असतात आणि चुलींचा धूर घरांच्या भोवती व्यापलेला असतो. कोकणातलं हे टिपिकल वर्णन. गुहागर-वेळणेश्वरच्या परिसरात गेल्यावर तर आजही याच वातावरणात आपली सकाळ उगवते. अर्थात् यावेळी आपण या परिसरात जायचं, ते खासकरून वेळणेश्वराच्या समुद्रकिनाऱ्याची मजा अनुभवण्यासाठी. नागमोडी वळणांनंतर इथला अवचित् भेटणारा समुद्र पाहण्यासाठी, आपण तिथे जायचंय.

एन्रॉन प्रकल्पाच्या वेळी खूप खूप चर्चेत आलेल्या या अंजनवेल-वेलदूर आणि गुहागर परिसरात प्रकल्पउभारणीच्या वेळी हॉटेलउद्योगांची संख्याही वाढली. पण गेली कित्येक वर्ष पर्यटनाच्या दृष्टीने या परिसराचं महत्त्व टिकून आहे. रत्नागिरी-चिपळूण या सर्वच परिसरात आता उद्योग-व्यवसाय, छोटे कारखाने वाढत असले, तरी अजूनही समुद्रकिनारी काही शांत, रमणीय स्थळं शाबूत आहेत. इथे आजही तेच पूर्वीचं गाव आपल्याला भेटतं, हे विशेष. त्यामुळेच एन्रॉनचं काहीही झालं असलं, तरी आपल्या स्वतःला ऊर्जा मिळविण्यासाठी या परिसराला दिलेली आपुलकीची भेट आपल्याला ताजंतवानं करून सोडते.

रत्नागिरी जिल्ह्यात गुहागरच्या परिसरातलं वेळणेश्वर, हेदवी आणि खुद्द गुहागराची सहल अशी दोन दिवसातही आपल्याला भरपूर आनंद देऊ शकते.

**रत्नागिरी-चिपळूण या सर्वच परिसरात आता उद्योग-व्यवसाय, छोटे कारखाने वाढत असले, तरी अजूनही समुद्रकिनारी काही शांत, रमणीय स्थळं शाबूत आहेत. इथे आजही तेच पूर्वीचं गाव आपल्याला भेटतं, हे विशेष. त्यामुळेच एन्रॉनचं काहीही झालं असलं, तरी आपल्या स्वतःला ऊर्जा मिळविण्यासाठी या परिसराला दिलेली आपुलकीची भेट आपल्याला ताजंतवानं करून सोडते.**

# शांत समुद्रावरची ऊर्जा



छाया : आमोद मेहंदळे

गुहागरापर्यंत रस्त्याने जायचं, तर जवळपास साडेतीनशे किलोमीटर अंतर आपल्याला कापायला लागतं. पण कोकण रेल्वेमुळे आता हा प्रवास पूर्णपणे रस्त्याने करायलाच हवा, असं नाही. मुंबई सेन्ट्रल, परळ, ठाणे, बोरिवली या सर्व ठिकाणांहून गुहागर, चिपळूण इथे जाण्यासाठी एस.टी.च्या गाड्या निघतात. काही ठिकाणांहून रातराण्याही जात असल्याने पहाटेपर्यंत आपण गुहागरात पोहोचू शकतो. कोकण रेल्वेने आल्यास चिपळूणला उतरावं लागतं. तिथून बसने गुहागरापर्यंत येता येतं. म्हणजेच सकाळी कोकण रेल्वेने निघाल्यास दुपारच्या आत गुहागरापर्यंत



अनु.

पोहोचता येतं. वेळणेश्वर, हेदवी इथे फिरायचं असेल, तरी हॉटेल-लॉज यासारखी राहण्याची व्यवस्था गुहागरातच आहे.

गुहागरापासून वेळणेश्वरकडे जायचं झाल्यास चिपळूण-गुहागर रस्त्यावरच पाच-सहा कि.मी. अगोदर मोडकेआगर इथे एक फाटा जातो. तिथून आठ-नऊ कि.मी.वर वेळणेश्वरचा रमणीय परिसर आहे. नागमोडी वळणांच्या वाटेने चढ चढून गेल्यावर खाली नजर टाकली की, अत्यंत सुंदर असा समुद्र आपल्या डोळ्याच्या पातळीलगतच दिसतो. वेळणेश्वरला शंकराचं आणि दत्ताचं देऊळ आहे. मंदिरामागे किनारा भिडलेला आहे. वेळणेश्वर हे आजही पर्यटकांच्या धामधुमीपासून दूर राहिलेलं गाव आहे. यामुळेच इथे राहण्याची खूप मोठी सोय नाही. पण अलिकडेच भक्तगणांच्या योगदानातून तयार झालेल्या भक्त निवासात राहण्याची सोय होऊ शकते. चार-पाच खोल्या आणि एक ३०-४० जण राहू शकतील, इतका प्रशस्त हॉल इथे आहे. अर्थात हा भक्तनिवास असल्याने काही मर्यादा पडतात. भक्तनिवासातील सोयीच्या अधिक माहितीसाठी श्री. सरदेसाई यांच्याशी ९५-२३५९ -४३३२२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. केवळ वेळणेश्वराची शांतता अनुभवायची असेल, तर इथे रहायला काहीच हरकत नाही. रास्त दरात जेवणाचीही सोय होऊ शकते.

वेळणेश्वरपासून जवळच हेदवीचा दशभुजा गणपती प्रसिद्ध आहे. इथलं समुद्रातल्या खडकातच उभं राहिलेलं उमा-महेशाचं मंदिर आणि सभोवतीचा परिसर हा भरतीच्या वेळी निसर्गाच्या रौद्र रुपाचा अद्‌भूत चमत्कार असतो.

गुहागरात मुक्काम करून वेळणेश्वर आणि हेदवीची सफर करता येते. गुहागरातून रिक्षा किंवा एसटी बसने तिथपर्यंत जाता येतं. गुहागरात मुक्काम केल्यास बरीच चांगली लॉज तिथे आहेत. त्यांच्याचकडे जेवणाची सोयही होऊ शकते. शिवाय काही लोक घरगुती स्वरुपातही राहण्याची सोय करतात. गुहागरचा जवळपास चार-पाच किलोमीटर लांबीचा विस्तीर्ण किनारा हे एक मुख्य आकर्षण इथे असतं. वेलदूर ते अंजनवेल असा हा परिसर एप्रिल-मे महिन्यात आंब्याच्या गोडीत बुडालेला असतो. गुहागरात व्याडेश्वराचं देऊळ आहे. शिवाय गोपाळगडावर जाण्यासाठी आता चांगला रस्ता झाला आहे. तिथेही वर रिक्षा किंवा खाजगी मोटारीने जाता येतं. इथेच एक दीपगृह आहे आणि ते पाहण्याची संधीही आपल्याला मिळू शकते. गुहागरात शनिवारी दुपारी पोहोचल्यावर रविवार दुपारी निघून त्याच दिवशी मुंबईत परतण्याचा पर्यायही सुट्टी कमी असलेल्या लोकांसाठी उपलब्ध असतो.


गुहागरात लॉजमध्ये अडीचशे रुपयांच्या आसपास डबलरुमची सोय होऊ शकते. गुहागरातील लॉजचे दूरध्वनी.

कौटिल्य लॉज : अरुण ओक ९५२३५९-२४०२०३, सागर लॉज :९५२३५९-२४०३४७, प्रेस्टिज लॉज : ९५२३५९-२४०५११, मानस लॉज : ९५२३५९-२४०६८४, किस्मत लॉज : ९५२३५९-२४०१५६, श्रीपूजा लॉज : ९५२३५९-२४०५२७.



अनु.

गुहागर तालुका पर्यटनदृष्ट्या संपन्न असल्यामुळेच फारशी प्रसिद्धी लाभली नसली तरी आसपासची अंजनवेल, धोपावे, उरफाटा गणपती, व्याडेश्वर मंदिर, असनोली, पालशेत आणि तिथलं लक्ष्मीनारायण मंदिर, बुधल सडा ही स्थळं पर्यटकाच्या मनात घर करून बसली आहेत. हेदवी आणि वेळणेश्वर ही दोन्ही ठिकाणं वरील ठिकाणांपेक्षा अधिक चांगली असली तरी काहीशी आतमध्ये असल्याने पर्यटक तिकडे वळत नव्हते. मात्र आता हेदवी-वेळणेश्वराकडे पर्यटकांचा ओघ वाढू लागलाय. राज्य सरकारनेही हेदवी आणि वेळणेश्वर यांना पर्यटन स्थळाचा दर्जा दिलाय. हेदवी आणि वेळणेश्वरचे मंदिर आणि समुद्रकिनारा खूप आत आत वाटत असला तरी थेट गाड्या करून पर्यटकांचे पाय तिकडे वळू लागलेत हे निश्चित.





## वेळणेश्वर

कोकणातल्या कोणत्याही 'टिपिकल' गावाप्रमाणेच वेळणेश्वर हेही गाव किनारपट्टीवरचं नारळी-पोफळीच्या झाडपेड्यात लपेटून गेलेलं गाव आहे. गाव छोटं आणि समुद्रकाठी असल्याने गावाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेलं तरी समुद्राची धीरगंभीर गाज कानावर पडतेच. हे गावच मुळी खूप उतारावर वसलेलं असून, गावातील सारेच रस्ते अलगद्रपणे किनाऱ्यावर नेऊन सोडणारे आहेत. आदिलशहाच्या राजवटीपासून वेळणेश्वर गावाचा इतिहास सांगण्यात येतो आणि वेळणेश्वर मंदिराची हकीकतही तिथूनच सुरू होते. वेळणेश्वरच्या आसपास नारळी-पोफळीच आहे. स्वच्छ समुद्र, शांत किनारा, कोणतीच गडबड नाही, आवाज आहे तो केवळ गाजेचा. नवसाला पावणारा समुद्राचा देव म्हणजेच वेळणेश्वर. गावकऱ्यांचीही वेळणेश्वरावर भक्ती आहे. मूळचं मंदिर बाराव्या शतकातलं. त्याला आजचं स्वरूप आलं ते टप्प्याटप्प्याने, गेल्या ४०० वर्षांत. वेळणेश्वर मंदिराचं आवार कोकणातल्या कोणत्याही मंदिरापेक्षा मोठं आहे. बाहेर ९-१० मीटर उंचीची दीपमाळ, शिखराखाली तसाच भव्य सभामंडप, प्रशस्त ओटा, त्यावर चारही बाजूला मुखवटे, मुखवट्यांवर पाच फण्यांचा नाग. गाभाऱ्यातल्या शिवाच्या शंकराचा मुखवटा ठेवून त्यास पोषाख घालतात. पिंडीच्या मागे कोनाड्यात पार्वती-गणपतीच्या मूर्ती आहेत. मुख्य मंदिराला लागूनच श्री काळभैरव, श्री गणपती आणि श्री लक्ष्मीनारायण अशी मंदिरं आहेत. मंदिरात तशी शांतताच असते.

वेळणेश्वराला पर्यटनाचा दर्जा मिळाल्याने अलीकडे आता पर्यटकांच्या सोयीसाठी हॉटेलं, रिसॉर्ट आणि चहा-पाण्याच्या टपऱ्या वाढू लागल्या आहेत. मंदिराच्या आसपासच्या घरांतून निवासाची आणि आगावू कळवल्यास भोजनाची सोय होऊ शकते. मंदिराचे भक्तनिवासही आहे. वेळणेश्वरचा समुद्रकिनारा प्रशस्त, मोठा आणि चांगलाच लांबलचक पसरलेला आहे. समुद्रात बोटी हेलकावत असतात. मऊमऊ वाळूवरून कितीही चालले तरी कंटाळा येणार नाही.



अनु.



# हेदवीचा दशभूज लक्ष्मी गणेश

निसर्गरम्य परिसर, तिन्ही बाजूला डोंगर आणि एका बाजूस पसरलेला अथांग सागर, अशा हेदवी गावाच्या कुशीत एका टेकडीवर पेशवेकालीन बांधणीची भव्य वास्तू, सभोवतालचे भव्य प्रांगण, बाजूला असलेली फुलबाग आणि दशभुजलक्ष्मी गणेशाच्या अस्तित्वाने भारावून टाकणारं मंदिर आकर्षित करतं. माघ महिना जवळ आला की वेध लागतात ते माघी उत्सवाचे. येथील गणेशाचा माघी जन्मोत्सव फारच प्रसिद्ध आहे. तीन वर्षांपूर्वी या उत्सवाला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी श्री. केळकर स्वामींनी पेशव्यांच्या साह्याने बांधलेल्या या मंदिरात श्री दशभूज लक्ष्मी गणेशाची स्थापना केली. १९५५ पूर्वी मंदिराची फारशी देखभाल होत नव्हती. परंतु हेदवीचे गणेशभक्त आणि मंदिराचे पुजारी शिवराम गोविंद तथा भावना जोगळेकर यांनी त्यांचे स्नेही शंभू हेदवकर बंधू आणि ग्रामस्थ यांच्या मोलाच्या सहकार्याने मंदिराचा जीर्णोद्धार केला. सन १९५६ पासून माघी जन्मोत्सवाला सुरुवात झाली. हेदवी या निसर्गाच्या सान्निध्याचा अलौकीक वारसा लाभलेल्या गावामध्ये असलेल्या या गणेशाचे रूप अद्वितीय आहे. ही संगमरवरी मूर्ती काश्मिरात घडविलेली आहे असे म्हणतात. दहा हात असलेल्या गणेशाच्या मांडीवर सिद्धलक्ष्मी



अनु.

विराजमान झाली आहे. मूर्तीच्या उजव्या हातात अनुक्रमे चक्र, त्रिशुल, धनुष्य, गदा व पर्शी आशिर्वादाच्या हातात. महाळुंग नावाचे औषधी फळ आहे. एका बाजूच्या हातात कमळ, पाश, नीलकमल, रदन (दात) आणि पाचव्या हातात धान्यांची लोंबी आहे. सोंडेत अमृत कुंभ असून, गळ्यात माळा कोरल्या आहेत. अशा प्रकारच्या वस्त्रसज्ज मूर्ती पूजायचा अधिकार केवळ सेनेचे नेतृत्व करणारे सेनापती यांनाच असतो, असा पूर्वापार संकेत आहे. त्या मुळेच सर्व ठिकाणी अशा मूर्ती दिसून येत नाहीत.

कोकणचं खरंखुरं दर्शन घ्यायचे असेल तर मुंबईपासून ३७० किमी असलेल्या हेदवी गावी तीन दिवसांची फुरसत घेऊन जावं. आजूबाजूला पहाण्यासारखं बरंच काही आहे. येथे जाण्यासाठी थेट एस. टी. सेवा आहे. तसेच रोज रात्री मुंबईहून निघणाऱ्या लक्झरी बसेसही आहेत.

स्वत:चं वाहन असेल तर परशुराम घाटात श्री परशुराम देवस्थानाला भेट देऊन पुढे जाता येईल. घाट उतरताना डाव्या बाजूला असलेला सक्त कडा पहावा. पावसाळ्यात हिरव्यागार डोंगरमाथ्यावरून कड्यावरून दरीत कोसळणारा धबधबा विलोभनीय दिसतो.

हेदवीला जाण्यासाठी चिपळूणमध्ये जाण्याची गरज नाही. घाट संपताच महामार्ग सोडून उजवीकडे फाटा फुटतो तो आपल्याला या निसर्गदत्त कोकण किनाऱ्याला घेऊन जातो. गुहागरच्या अगोदर डावीकडे वळलं की आपण हेदवी गावात पोहोचतो.

पर्यटकांनी गजबलेली ठिकाणं, पर्यटन स्थळाचे झालेले व्यापारीकरण आणि शहरी कोलाहलापासून थोडं दूर जायचं असेल तर हेदवीचा किनारा हा उत्तम पर्याय आहे. हॉटेलच्या औपचारिक स्वागतापेक्षा येथील घरगुती स्वागत निश्चितच आपल्याला सुखकर असेल. भक्त निवासात राहण्याची उत्तम सोय होते. शेखर जोगळेकर यांच्याकडे त्याचे व्यवस्थापन आहे. राजाभाऊ जोगळेकरांचे देवराई, समुद्र किनारी असलेले भाटकरांचे 'सुरुची', शुभांगी गुरव (जिजी) गजानन जोगळेक ही मंडळी पर्यटकांची आपल्या घरी रहाण्याची सोय करतात.

निसर्गसौंदर्याची राखण करणारा हेदवीचा समुद्र किनारा प्रदूषण मुक्त आहे. सुरुच्या बनात समुद्रावरचा भन्नाट वारा



अनु.


अंगावर घेत निवांत बसणं हा सुख अनुभव असतो. समुद्राकडे तोंड करून उभे राहिलो कि उजव्या बाजूला असलेले उमा महेश्वर मंदिर आणि त्याच्या पुढे असलेली बामणघळ ही पाहण्यासारखी ठिकाणं आहेत. बामणघळ हा निसर्ग चमत्कार आहे. नैसर्गिकरीत्या खडकात पडलेल्या या घळीमध्ये भरतीच्या लाटा बेभानपणे घुसतात, जवळजवळ २० ते २५ फूट उंच वर उसळतात. हा निसर्गाचा थरार पहाताना अंगावर रोमांच उभे राहातात.

रात्रीची शांतता निरव नसते. समुद्राची गाज आणि सोबतीला रातकिड्यांची किरकीर ऐकत आपण निद्रादेवीच्या अधीन कधी होतो हे कळत नाही. सकाळी जाग येते ती मोराच्या केकावलीने आणि पक्षांच्या किलबिलाटाने.

तसेच अंजनवेल येथे असलेला गोपाळ गड, गुहागरचा समुद्र किनारा, तिथे असलेली मंदिरे, अश्मकालीन गुहा, प्राचीन बंदर सापडल्यामुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेलं पालशेत गाव पहाण्यासारखं आहे. या सहलीमध्ये आपण अन्य दिवसांत गणपतीपुळे येथेही जाऊन येऊ शकतो. गपणतीपुळे देवस्थानापासून १ किमी अंतरावर साडेतीन एकर जमिनीवर पाचशे वर्षांपूर्वीचे कोकण आणि तिथलं समाज जीवन दर्शवणारे खेडं तयार करण्यात आलं आहे. ते पाहण्यास विसरू नये.



हेदवीच्या दशभुजा गणेशाची स्थापना सुमारे ३५० वर्षांपूर्वी पेशवेकाळात झाल्याची माहिती सांगितली जाते. पेशव्यांचे सल्लागार असलेल्या केळकर स्वामी यांनी मोघलांची आक्रमणं रोखण्यासाठी पेशव्यांना दशभुजा गणेश स्थापन करण्याचा दृष्टांत दिल्याचं सांगितलं जातं. त्यानुसार पेशव्यांनी काश्मिरहून हा गणपती तयार करून त्याची इथे प्रतिष्ठापना केली. दशभुजा गणेशाच्या हातात आयुधं आहेत आणि त्याच्या मांडीवर शक्ती आसनस्थ झाल्या आहे. ही मूर्ती संगमरवराची असली तरी हा संगमरवर काश्मीरचा असल्याने तो इतर खडकांपेक्षा जरा वेगळा दिसतो. या गणपतीचे डोळे उत्तरेकडच्या गणेशमूर्तींसारखे मोठे आहे. पेशव्यांनी या गणपतीच्या दोन मूर्ती घडवण्यास सांगितल्या होत्या. कारण काश्मीरहून इथे मूर्ती आणण्याच्या प्रवासात आक्रमणांमुळे एक मूर्ती नष्ट झाल्यास दुसऱ्याची प्रतिष्ठापना करता येण्याचा विचार त्यामागे होता.



नंतर या मंदिराकडे दुर्लक्ष झाल्याने ते जीर्ण झालं. परंतु काकासाहेब जोगळेकर (शिवाजी पार्क इथे 'प्रकाश' उपहारगृह आणि गिरगावात 'प्रकाश दुग्धमंदिर' सुरू करणारे) यांच्या कठीण काळात त्यांना या गणपतीने दृष्टांत देऊन मंदिराचा जीर्णोद्धार करण्यास सांगितलं. त्यानुसार काकासाहेबांनी शंभूभाऊ हेदवकर यांच्या मदतीने १९५६ मध्ये या मंदिराच्या जीर्णोद्धार केला.



अनु.

# पवित्र सौंदर्य

एकदा काही कामासाठी मी मित्राकडे चिपळूणला गेलो होतो. तिथल्या हेदवीच्या गणपती मंदिराबद्दल मी ऐकलं. मी गणेशभक्त असल्याने आणि या मंदिराचं वर्णन ऐकून हेदवीला जायचंच असा निश्चय करून मी निघालो.

आम्ही तिथे रात्री पोहोचलो तेव्हा तर कळलंच नाही की मंदिर कुठे आहे. कारण इतर मंदिरांसारखी इथे हार-फुलं किंवा प्रसादाची दुकानं नाहीत. पैसे मागणारे भिकारी किंवा 'नारळ घ्या' म्हणत मागे लागणारे दुकानदार नाहीत! आहे ती फक्त शांतता... प्रसन्नता... प्रशस्त प्रांगण आणि सौंदर्य! एरवी आपण कोणत्याही मंदिरात गेलो की गर्दीच्या रेट्यामुळे आपल्याला नीट दर्शन घेताही येत नाही. आपल्या मनातलं गूज किंवा प्रार्थना त्या परमेश्वराला सांगताही येत नाही. इथे मात्र तसं नाही. अत्यंत पवित्र वातावरणात एका छोट्याशा टेकडीवर वसलेला हा हेदवीचा दशभुजा गणपती त्याच्या पायाशी येणाऱ्या प्रत्येक भक्ताला भरभरून आशीर्वाद देतोय... प्रत्येकाचं म्हणणं, प्रार्थना ऐकून घेतोय....

क्लिक



हेदवीचं मंदिर प्रशस्त असलं तरी त्याच्या स्थापत्यशास्त्राला सौंदर्याची नाजूक किनार आहे. लाल, पिवळ्या, गुलाबी अशा प्रसन्न रंगसंगतीमुळे या देवळाचं आवार खूप छान आहे. मन प्रफुल्लित होतं. म्हणूनच मी माझ्या कॅमेराच्या डोळ्यांनी ही रंगसंगती पकडण्याचा प्रयत्न केला.

विशेष म्हणजे या गणपतीच्याच कृपेने यातल्या एका फोटोला अमेरिकन इण्टरनॅशनल फोटोग्राफी अॅवॉर्ड मिळालं. त्या फोटोत मी गुलाबी, पिवळा, आकाशी निळा आणि भिंतीवर काढलेली फुलांची नक्षी, विशिष्ट शैलीत तयार केलेला नंदी आणि ऊन-सावली टिपण्याचा प्रयत्न केला आहे. तसंच मंदिराच्या काळ्या फरशांवर काढलेली पिवळ्या रंगाची सुबक नक्षीही टिपण्याचा मोह मला आवरला नाही. मंदिराच्या कळसाची आणि दीपमाळेची रंगसंगती तर अप्रतिमच! तसंच मंदिराच्या भिंतीवर काढलेली विविध फुलांची लहानशी पण नाजूक नक्षीही चित्तवेधक आहे.

या मंदिराच्या भिंतीसाठी विशिष्ट रंग वापरले जातात. हे रंग फिकट होत नाहीत किंवा वातावरणातल्या बदलांचा यावर परिणाम होत नसल्याचं सांगण्यात आलं. गाभाऱ्यातल्या मूर्तीचे फोटो काढण्याची परवानगी नसली तरी बाहेरून (कॅमेराची लेन्स चांगली असल्याने) मला गणपतीचे फोटो काढता आले. ही सुंदर मूर्ती पाहून मला एकदम प्रसन्न वाटलं जणू त्या मूर्तीतून मला ऊर्जा मिळत होती...

सुंदर आणि प्रसन्न रंगसंगतीचं स्थापत्य, शांत, प्रशस्त मंदिर आणि या सगळ्या वातावरणावर असलेलं अध्यात्मिक आणि पवित्र अस्तर या सगळ्याचा घेतलेला अनुभव सांगणं कठीण आहे... ते शब्दांच्या... कुठल्याही फ्रेम किंवा रंगभाषेच्या पलिकडचं आहे... ते फक्त अनुभवत राहावं... बस्स!

## हेदवी

वेळणेश्वराच्या जवळच हेदवीचं गणपती मंदिर आहे. मात्र गुहागरकडून हेदवीला जाणं सोयीचं पडतं. हेदवी गावात शिरल्याबरोबर डावीकडे तटबंदीने वेढलेलं, थोड्या उंचीवरील गणपतीचं मंदिर दृष्टीस पडतं. वाहनासकट वर यायचं असल्यास मंदिरापर्यंत चांगला रस्ता झालेला आहे. मंदिराची भक्कम तटबंदी, आसपासचा हिरवागार प्रदेश, थंड आणि प्रफुल्लित करणारा गार वारा मनाला तजेला देतो आणि आपण मंदिराच्या प्रेमातच पडतो. मंदिराचा साराच परिसर स्वच्छ आणि देखणा आहे.

पेशवेकालीन कोणा केळकर या भक्ताने हे मंदिर बांधलं असं सांगण्यात येतं. मंदिराच्या बांधकामासाठी पेशव्यांनी काही रक्कम दिली होती. त्यातली काही उरली म्हणून जवळच हरिश्वराचं मंदिर बांधण्यात आलं हेदवीच्या डाव्या सोंडेच्या गणेशाची देखणी मूर्ती काश्मीरमधल्या पाषाणाची आहे. ही मूर्ती दहा हातांची आहे. गणेशाच्या मांडीवर सिद्धलक्ष्मी आहे. मूर्तीवर थोडे कोरीव कामही आहे. गळ्यात सुंदर सुंदर माळा आहेत. सिंहासनावर उंदीर कोरलेला आहे. सभामंडपाच्या गाभाऱ्यात जयविजय या द्वारपालाच्या मूर्ती आहेत. बाहेरील बाजूस पिसारा फुलवलेल्या मोरांच्या प्रतिमा आहेत. मंदिराच्या आवारातच केळकर स्वामींच्या पादुका आहेत. हेदवीला भक्तनिवास आहे आणि आधी कळवल्यास भोजनाची सोय होऊ शकते. हेदवीमध्येच दशावतारी कैलास लक्ष्मीनारायण मंदिर, उमा-महेश मंदिर आहे.

# संगतीनं, माझ्या तू येशील का ?



त्याच त्या घिस्यापिट्या ठिकाणी जायचं...आऊटिंगला आलेल्या भाऊगर्दीत एकांत शोधायचा...घाईघाईनं परतायचं...दरवर्षी अशाच प्रकारे व्हॅलेण्टाइन साजरा करायचा कंटाळा आला असेल आणि यंदा काहीतरी हटके ठिकाणाच्या शोधात असाल तर यावर्षी कोकणात चला! व्हॅलेण्टाइन डे यंदा शनिवार-रविवारला जोडून आला असल्यानं दोन दिवस कोकणातल्या शांत, एकांत, रम्य बीचवर, जराशा अनोळख्या परिसरात घालवायचा अनुभव घेऊन या खास दिवसाचं वेगळेपण जपता येईल.

## रहायचं कुठे ?

चार खोल्यांचं सुंदर कॉटेज इथे आहे. सगळ्या आवश्यक सोयी असलेलं, पण तरीही गावचा गोडवा असलेलं. जेवण्या-खाण्याची उत्तम सोय इथे होऊ शकते.

## कसं जायचं ?

आबलोली गाव चिपळूणहून साधारण तासाभराच्या अंतरावर आहे. गुहागरला जाताना शृंगारतळी इथून २० किमी अतंरावर. चिपळूणहून भरपूर बसेस उपलब्ध आहेत.

गौरी देशपांडे

व्हॅलेण्टाइन डेला एकमेकांच्या हातात हात घालून मनसोक्त भटकणं हा प्रेमीजनांचं एकदम फेव्हरेट. कपल्सना ग्रुप करून जाता येईल किंवा लग्न झालेल्या जोडप्यांनाही यंदाचा व्हॅलेण्टाइन जरा वेगळ्या प्रकारे घालवता येईल, असं एक छान ठिकाण कोकणात, गुहागरच्या अलिकडे आहे. आबलोली नावाचं शांत आणि निसर्गरम्य गावात हा निवांतपणा अनुभवता येऊ शकेल. या गावात 'गारवा' नावाचं ॲग्रो टूरिझम सेण्टर सुरू झालंय. शेती पर्यटन आणि व्हॅलेण्टाइन हे वाटतं तितकं रुक्ष कॉम्बिनेशन नाहीये! प्रेमाचा गोडवा आणि हळूवारपणा शेती पर्यटनासारख्या ठिकाणीही तितक्याच रोमँटिक पद्धतीनं घालवता येईल, असा झकास प्लॅन इथे होऊ शकतो. सध्या तशी पर्यटकांची फारशी गर्दीही नाहीये इथे. त्यामुळे आपल्याला हवे तसे दोन दिवस एन्जॉय करता येऊ शकतात.





चिपळूणहून गुहागरला जाताना आबलोलीला जाण्यासाठी रस्ता मिळतो. तिथपर्यंतचा रस्ता अरुंद आणि नागमोडी आहे. पहाटेच्या वेळी इथून जाताना मस्त वाटतं. भरपूर झाडं, वस्ती पाहत झकास प्रवास होतो. सध्या आंब्यांना जोरदार मोहर आलाय, करवंदीच्या जाळ्यांना फुलं लागलीयेत, छोटे फणस धरलेत, काजूही लगडलेत... त्यामुळे कोकणी मेव्याचा डोळ्यांनी आस्वाद घेत हे अंतर कधी संपतं ते कळतही नाही. या ठिकाणाचं 'गारवा' नाव अतिशय सार्थ आहे. नारळी-पोफळीची भरपूर झाडं आहेत, हळदीचं पीक आहे. त्यामुळे आंब्याच्या खाली, नारळाच्या बागेत, कॉटेजमागच्या जंगलात एकमेकांच्या संगतीने गप्पा मारण्याचा अनुभव सुखावून जाईल.

उंच आणि डेरेदार झाडांमुळे इथे भरपूर सावली आहे. त्यामुळे प्रेमात पडलेल्यांना हवाहवासा वाटणारा आणि एरवी फार क्वचितच मिळणारा एकांत इथे मनसोक्त मिळेल. हे कॉटेज सचिन कारेकर या मराठी तरुणानं उभारलंय. कॉटेजपासून जवळच त्यांचं जुनं घर आहे. तिथे जेवणाची उत्तम सोय होते. शिवाय, जुना बाज असलेलं हे घरही पाहता येईल. गावात तसं बघण्यासारखं फारसं काही नाही. पण गुहागर, तवसाळ, गणपतीपुळे हे सारे रमणीय बीचेस इथून जवळ आहेत. अगदी तासाभरापेक्षाही कमी अंतरावर. त्यामुळे राहण्याचं ठिकाण हे ठरवून बिचवर भटकण्याचा प्लॅन करता येईल. समुद्रकिनारा आणि प्रेमी मंडळी यांचं नातं अतिशय घट्ट असल्यानं या ठिकाणांच्या प्रेमात पडायला वेळ लागत नाही. हे किनारे स्वच्छ आणि तुलनेने एकांत आहेत. त्यामुळे प्रेमीयुगुलांना कोणाचा अडथळा नको! शिवाय, अजून तसा उकाडा सुरू झालेला नाही. वातावरण एकदम उत्तम आहे. आबलोलीत तर मस्त थंडी पडतेय अजूनही. त्यामुळे उन्हाचा त्रास तितका जाणवत नसल्यामुळे लांबच लांब पसरलेल्या शांत, एकांत किनाऱ्यावर हातात हात गुंफून चालत राहण्याचा किंवा एखादी छानशी जागा बघून तासन् तास वाळूत बसून समुद्राच्या साक्षीनं एकमेकांचा सहवास अनुभव हा व्हॅलेण्टाइन अविस्मरणीय असा असेल! संपर्क : ९४२३१२९७९६.

## बघण्यासारखी ठिकाणं ?


आबलोली गाव तसं मध्यवर्ती आहे. इथून गुहागर (३० किमी), तवसाळचा किनारा (२० किमी), हेदवी (२० किमी), गणपतीपुळे (५० किमी), डेरवणची शिवसृष्टी ही ठिकाणं पाहता येऊ शकतात. दिवसभर हुंदडून पुन्हा आबलोली राहायला यायचं असा प्लॅन मस्त होऊ शकतो.




अनु.

# देवरुख

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते देवरुख | | | | | 308 | | | | |
| **1** | कर्णेश्वर संगमेश्वर | | | | मंदिर | 22 | NW | | | |
| **2** | निवळी धबधबा | धबधबा | | | | 28 | W | 28.5 | SW | |
| **3** | मार्लेश्वर | धबधबा | निसर्ग | | मंदिर | 20.5 | E | 47 | NE | |
| **4** | आंबा घाट | धबधबा | निसर्ग | | | 29 | SE | 23 | SE | |



## शिल्पकलेचं कर्णेश्वर

संगमेश्वरपासून अवघ्या दोन किलोमीटर्स अंतरावर असलेल्या कसबा या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या गावात हे कर्णेश्वराचं मंदिर वसलेलं आहे. या मंदिराच्या उभारणीबाबत अनेक आख्यायिका आहेत. कर्णेश्वर मंदिराची रचना आणि त्यासाठी वापरण्यात आलेले मोठे दगड पाहून हे मंदिर उभारणाऱ्यांच्या कलेचा अंदाज येऊ शकतो. अप्रतिम शिल्पकला हीच सर्वांचं मुख्य आकर्षण आहे. अलकनंदा आणि वरुणा नदीच्या संगमावर वसलेलं संगमेश्वराचं मंदिरही या मंदिरापासून हाकेच्या अंतरावर आहे. पावसाळ्याच्या दिवसांत इथलं निसर्गसौंदर्य अप्रतिम असतं. मुंबई-गोवा हायवेवर संगमेश्वरनजिक हायवेच्या आत साधारणतः ४ किलोमीटर्सवर हे ठिकाण आहे.



अनु.

## निवळी घाट

रत्नागिरीकडे जातांना निवळी घाटात डाव्या बाजूला एक सुंदर असा धबधबा आहे. या धबधब्याचं दृष्य डोळ्यांत साठवून घ्यावं असं मनोहारी आहे. खळखळ वाहणारी नदी, हिरवंगार वातावरण यात रमून जायला कुणालाही आवडेल. गणपतीपुळेसारखं प्रसिद्ध ठिकाण तिथून जवळ आहे.

**चिपळणपासन संगमेश्वरला येतांना** वाटेत २६ किमीवर आरवली गाव लागेल. आरवली बसस्टॅण्डपासून अवघ्या २००-३०० मीटरवर गड नदीवरच्या पुलाखाली गरम पाण्याची कुंडं आहेत. त्यातल्या पाण्याचं तापमान ४०-४४ अंश असतं. अगदी अंघोळीसाठी तापवल्यासारखं. पावसाळ्यात गड नदीला पूर येतो तेव्हा हे तापमान जरा कमी झाल्यासारखं वाटतं, पण कोमट पाण्याने हातपाय धुवायला हरकत नाही. कोकण ज्वालामुखीतून बनलेलं असल्याने एकट्या रत्नागिरी जिल्ह्यात गरम पाण्याचे नऊ झरे आहेत.

मुंबईपासून ३२७ आणि चिपळूणपासून ६१ किमीवर रत्नागिरीच्या अलीकडे निवळी घाटात अप्रतिम धबधबा दिसतो. दाट झाडीत असलेला हा धबधबा दिसल्यावर गाडी थांबतेच थांबते. पण तिथे जाताना स्थानिकांकडून माहिती घेतलेली बरी. हा धबधबाही फक्त पावसाळ्यात कोसळतो. त्यामध्ये खेळून झालं की अर्थातच भुकेने कावळे ओरडायला लागलेले असणार. त्यासाठी जास्त लांब जायला नको. फक्त तीन किमीवर हॉटेल एकदंत आणि हातखंब्याला हॉटेल अलंकार आहे. दोन्ही ठिकाणी राहण्याचीही सोय आहे.

## श्री क्षेत्र मार्लेश्वर

देवरुखपासून अवघ्या १७ किलोमीटर्स अंतरावर असणाऱ्या या स्वयंभू देवस्थानाची कीर्ती संपूर्ण महाराष्ट्रात आहे. केवळ उन्हाळा-हिवाळ्यातच नव्हे तर पावसाळ्यातही इथे पर्यटक येत असतात. सह्याद्रीच्या कुशीत एका गुहेत वसलेलं हे देवस्थान आणि त्याच्यासमोरच असलेला, बारमाही वाहणारा धारेश्वरचा धबधबा सर्वांनाच मोहात पाडतो. हिरव्यागार वनराईत कोसळणारा हा धारेश्वर धबधबा प्रत्यक्षात पाहण्यासारखं सुख नाही. इथे जाण्यासाठी जवळचं रेल्वेस्टेशन संगमेश्वर. शिवाय मुंबई-गोवा हायवेवरुन बसनेही जाता येतं.




# रम्य मार्लेश्वर

एखाद्या श्रावण सोमवारी रविवारला जोडून सुटी घेऊन कोकणात जाण्याचा बेत आखायला हरकत नाही. श्रावणात कोकण दृष्ट लागावी इतकं सुंदर दिसतं. हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा बघायच्या असल्या तर श्रावणात कोकणात जायलाच हवं. रत्नागिरी जिल्ह्यातलं मार्लेश्वर देवस्थानही असंच सह्याद्रीच्या कुशीत एका छानशा डोंगरावर आहे.

मार्लेश्वरला शंकराचं मंदिर लहानशा गुहेत आहे. या काळोखी गुहेत शंकराच्या पिंडीपुढे लावलेल्या निरांजनाचा मंद उजेड सोडला तर गुहेत प्रकाशाची व्यवस्था केलेली नाही. आतमध्ये जाण्यासाठीचा दरवाजाही फार मोठा नाही. यामुळे गुहेत शांत आणि प्रसन्न वाटतं.

मार्लेश्वरला जाणाऱ्यांचं मुख्य आकर्षण तिथले साप बघणं, हे असतं. गुहेच्या अंगाखाद्यांवर साप सरपटत असतात. गुहेबाहेरचे साप लगेच दिसतात. आतमध्ये कमी उजेडामुळे ते सहजासहजी दिसत नाहीत. पण आतले पुजारी बॅटरी घेऊन सापांचं दर्शन घडवतात. मंदिराजवळचा धबधबाही पर्यटकांना आणि भाविकांना खुणावतो. जवळजवळ बाराही महिने तिथे पाणी असतं. श्रावणात तर हिरव्यागार डोंगरातून पडणाऱ्या या धबधब्याचा आनंद घेण्यासाठी कुठूनकुठून पर्यटक येतात. दगडांतून, हिरवाईतून वाट काढच पुढे वाहत जाणाऱ्या या पाण्याचं रूपांतर सप्तलिंगी नदीत होतं.

पूर्वी मंदिराकडे जायचा रस्ता मस्त होता. एका बाजूला नुकतीच जन्माला आल्यानं लहान मुलासारखा खळखळाट करणारी सप्तलिंगी नदी आणि एका बाजूला हिरवागार डोंगर, अशा सुखद वाटेतून जावं लागे. रस्ताही ओबडधोबड, दगडांचा. आता गुहेपर्यंत पायऱ्या बांधल्यात. आजूबाजूचं सौंदर्य मात्र तेच आहे. जाण्याची वाट केवळ सुकर झालीय. पायऱ्याही रूंद आणि जवळजवळ आहेत. त्यामुळे चालण्याचं काहीच जाणवत नाही. वयस्क व्यक्तींना किंवा मुलांना घेऊन जाण्यासाठीही हे ठिकाण उत्तम. एका तासात शंकराचं दर्शन घेऊन आणि धबधब्याचा आनंद घेऊन परतता येतं. पाण्यात खेळायची इच्छा अनावर झाल्यानं कुणी रेंगाळलं तर मात्र कितीही तास कमीच पडतील. गुहेसमोर थोडी जागा आहे. तिथे उभं राहून धबधब्याचं सौंदर्य निरखत किंवा शांत वातावरणात त्याचा आवाज ऐकण्याचाही अनुभव अपूर्व असतो. अगदीच एकटं वाटलं तर सोबत करण्यासाठी माकडं असतात. गुहेच्या आसपास त्यांचा वावर असतो. पण त्याचा आपल्याला त्रास होत नाही.

**कसं जाणार?**

- मार्लेश्वर रत्नागिरी जिल्ह्यात संगमेश्वर तालुक्यात आहे. संगमेश्वरपासून ३२ अंतरावर आहे. १६ किमीवर असलेल्या देवरूख गावापासून बस आहे.

8

# महिनोन् महिने धबधब्याचा आनंद

मार्लेश्वर

दी कोकण एन्ड

पावसाळा संपला की, डोंगरात दिसणाऱ्या शुभ्र दूधगंगा लुप्त होतात. एरव्ही पावसाळ्यात सह्यकड्यांवरून कोसळणाऱ्या या शुभ्र रेषा पाहताना आणि त्या जलप्रपातांखाली मनमुराद चिंब होताना होणारा आनंद काय वर्णावा? अर्थात, महाराष्ट्रात काही ठिकाणी ही संततधार पावसाळा संपला तरी कित्येक महिने त्याच दिमाखात, त्याच आक्रमकतेने घोंघावत असते. खासकरून डिसेंबर-जानेवारीमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातल्या देवरुखजवळच्या मार्लेश्वरला भेट दिल्यास हा आनंद आपल्याला मिळू शकतो.

इथे चहूबाजूंनी सह्याद्रीच्या डोंगरांनी वेढलेला परिसर आहे. खुद्द मार्लेश्वराचा धबधबाही सहा-सात टप्पे पार करून खाली कोसळत असतो. मार्लेश्वराच्या नावावरून हे कोणतं देवस्थान आहे, ते कळलं असेलच. मार्लेश्वर हे शंकराचं देवस्थान. उंचावरच्या गुहेत विराजमान असलेले शंकर आणि त्यांच्याभोवती गुहेतच ठिकठिकाणी वावरणारे नागराज, हे तर मार्लेश्वराचं अंचाट रुप. इथे कितीही नाग असले आणि कितीही गर्दी झाली, तरी त्यांचा दंश आजपर्यंत कुणाला झालेला नाही. निसर्ग, पर्यावरण आणि माणूस यांच्यातलं नातं घट्ट टिकवून ठेवण्यात अनेकदा भक्तिमार्गाचा धाक कसा उपयुक्त ठरतो, तेही अशा ठिकाणीच आपल्याला पटतं. डाव्या हाताला समोरच रांगडा धबधबा दिसत असतो आणि क्षणार्धात समोर ती घनगंभीर गुहा येऊन ठेपते. इथे ध्यानस्थ होण्यासारखं मेडिटेशन नाही.

संक्रातीला दरवर्षी मार्लेश्वरची जत्रा भरते. जत्रेच्या वेळी या भागात चार-पाचशे दुकानं थाटली जातात. मग अर्थातच तिथे प्रसाद आणि कोकणच्या मेव्याची लयलूट असते. संक्रांतीला मार्लेश्वर आणि साखरप्यातली गिरीजादेवी यांच्या विवाहाप्रित्यर्थ ही जत्रा भरविली जाते. पूर्वी मे महिन्यापर्यंतही मार्लेश्वराच्या धबधब्याची धार कायम टिकून असायची. अर्थात अलिकडे सर्वच ठिकाणचे पाण्याचे स्रोत आटत चालल्याने हा धबधबाही नंतर रोडावतो. उंचउंच सह्यकड्यांनी वेढलेलं मार्लेश्वर, कोकणची लाल माती आणि तिथली गुंफा हा इथल्या सौंदर्याचा अफलातून संगम आहे.

मार्लेश्वरला जाण्यासाठी हाती मोटार असल्यास चिपळूणहून संगमेश्वरमार्गे देवरुखकडे यायचं. देवरुख-साखरपा मार्गावर हातीव गावाजवळ मारळ म्हणजेच मार्लेश्वर आहे. देवरुखपासून मार्लेश्वर हे अंतर १४ किलोमीटर आहे. रेल्वेने यायचं झाल्यास रत्नागिरीहून देवरुखकडे येणंही श्रेयस्कर ठरतं. रत्नागिरी ते देवरुख तास-दीड तासात 'यष्टी'ने येता येतं. देवरुखहून तिथे जाण्याची कोणतीही सोय होते. जनशताब्दी एक्सप्रेस रत्नागिरीला थांबते. त्यामुळे सकाळी निघून एक-दीड दिवसात मुंबईत परतणंही शक्य असतं. रात्रीची कोकणकन्या संगमेश्वरलाही थांबते. तिथूनही देवरुखला जाता येतं.

मार्लेश्वरला जायचं झाल्यास, खुद्द मार्लेश्वरला अजून रहायच्या खूप सोयी झालेल्या नाहीत. पण देवरुखमध्ये हॉटेल दीपक किंवा हॉटेल पार्वती (दूरध्वनी ९५-२३५४-२४०१०८) या लॉजवर रहायची सोय होऊ शकते. साधारण तीनशे-साडेतीनशे रुपयांपर्यंत रुम मिळते. एसीरुमही उपलब्ध आहे. नाहीतर रत्नागिरीतच रहायला यायचं. तिथे अनेक सोयी आहेत.

# मार्लेश्वर

## निसर्गाचं रम्य रूप

कोकणातली पावस, गणपतीपुळे, हेदवीचा गणपती अशी काही मोजकीच तीर्थस्थळं सर्वश्रुत आहेत. इथल्या छोट्या गावांमधून अनेक तीर्थस्थळंही आपल्याला पाहायला मिळतात. यापैकी एक म्हणजे मार्लेश्वर. भगवान शंकराचं मंदिर आणि नजिकचा धबधबा यामुळे आस्तिकांबरोबरच नास्तिकही इथे आवर्जून येतात. संगमेश्वर रेल्वेस्थानकापासून ३८ कि.मीटर अंतरावर हे तीर्थस्थान आहे. शंकराचं जागृत देवस्थान म्हणून मार्लेश्वर ओळखलं जातं. संगमेश्वर बस स्थानकावरून देवरूखला जाणारा रस्ता जातो. ही वाट मार्लेश्वरलाही जाते. देवरूखपासून अवघ्या १८ कि.मीटरवर हे तीर्थस्थान आहे.

देवरूख समुद्रसपाटीपासून उंच असल्यामुळे इथला बराचसा भाग ओसाड भासतो. मात्र पावसाळ्यात हाच परिसर घनदाट झाडांनी वेढला जातो. लांबवर पसरलेल्या सह्याद्रीचं दर्शन रस्त्यावरून जाताना होतं. देवरूख गावं मागं पडलं की काही मिनिटांतच आपण मार्लेश्वरला पोहोचतो.

सह्याद्रीच्या उंच पर्वतांच्या तुलनेत मार्लेश्वरचा डोंगर एका दमात चढण्याइतपतच उंच आहे. डोंगराला छोट्या आणि सपाट पायऱ्या आहेत. वृद्धानांही त्या चढताना त्रास होत नाही. वर्षभरापूर्वी मार्लेश्वरच्या डोंगराच्या पायथ्यापासून देवस्थान आणि धबधब्याला सांधणारा पूल बनवला आहे. डोंगर किंवा ब्रीज चढून गेल्यावर डोंगर पोखरून गुहा तयार केलेली दिसते. गुहेची उंची खूपच कमी असल्यामुळे वाकून आत प्रवेश करावा लागतो. आत गेल्यावर मिट्ट काळोखात समईच्या प्रकाशात मालेश्वराची पिंड आणि मूर्तीचं दर्शन होतं.

असं सांगितलं जातं की या गुहेत एकही विजेचा दिवा टिकत नाही.

नेकांनी इथे विजेचा दिवा लावण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळेस तो असफल ठरला असं इथले पुजारी सांगतात. त्यामुळे इथे बॅटरी, मेणबत्ती किंवा कंदिल घेऊनच यावं लागतं. मेणबत्तीने गुहेच्या कपारीत निरखून पाहिल्यास बरेच साप दिसतात. परंतु आजवर कुणालाही सापाने चावल्याचं ऐकण्यात आलेलं नाही. पावसाळ्यात डोंगर चढताना कायम पायाखाली पाहतच जावं लागतं. बरेचदा पायाखाली साप येण्याची शक्यता असते. विषारी, बिनविषारी अशा दोन्ही प्रकारच्या सापांच्या जाती इथे पाहायला मिळतात.





मार्लेश्वराच्या मंदिरानंतर डोंगराची सपाटी संपते. इथल्या सपाट भागाला लागूनच खाली घळी आहे. मंदिरातून बाहेर आल्यावर समोर पांढराशुभ्र धबधबा आपल्याला खुणावतो. घळीत उतरून या धबधब्याकडे जाता येतं. इतर मोसमात तुम्ही या धबधब्याच्या पाण्यात खेळू शकता. पण पावसाळ्यात मात्र त्या घळीत उतरणंही कठीण होतं. गुळगुळीत दगड आणि डोंगरकपारीतून वाहणारा तो शांत धबधबा अचानक उग्र रूप धारण करतो. आता ब्रीजवर उभं राहून पावसाळ्यातही जवळून धबधब्याचे बोचरे तुषार अंगावर घेण्याचा आनंद लुटता येतो. मार्लेश्वराच्या डोंगराला तिन्ही बाजूंनी डोंगरांनी वेढलं आहे.

मार्लेश्वरचा परिसर पावसाळ्यात अधिक खुलतो. त्यावेळेस तर इथे निसर्गप्रेमींनी आवर्जून यावं. त्याचबरोबर इतर दिवसांमध्येही मार्लेश्वरला आवर्जून भेट द्या. निसर्गाची भिन्न रूपं आपल्याला अनभवायला मिळतात.

**शंकराचे निस्सीम भक्त मार्लेश्वरची फेरी सहसा चुकवत नाहीत. मार्लेश्वरचं वैशिष्ट्य म्हणजे इथे नास्तिक मंडळीही रमतात. याचं कारण म्हणजे इथला रम्य निसर्ग. पावसाळ्यात इथला धबधबा रौद्र रूप धारण करतो. परंतु त्याचं ते रूपही मनाला भावतं. भाविक मंडळी शंकराचं दर्शन घेऊन तृप्त होतात तर निसर्गप्रेमींना इथे आगळीच भेट मिळते. म्हणूनच मार्लेश्वर हे ठिकाण लोकप्रिय आहे.**



## आंबा घाट

पन्हाळा आणि विशाळगडाच्यामध्ये वसलेला आंबा घाट हे असंच एक निसर्गरम्य ठिकाण. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली पावनखिंड इथून जवळच आहे. कोल्हापूर-रत्नागिरी हायवेवर असलेल्या या सुंदर स्पॉटवर अजून पर्यटकांची फारशी गजबज नसल्याने आंबाघाटातल्या जंगलांचं अबाधित असलेलं सौंदर्य टिपता येतं. इथल्या जंगलात अनेक दुर्मिळ प्रजातींची फुलपाखरं, पक्षी आढळतात. तसंच घाटापासून सुरू होऊन डोंगरमाथ्याशी संपणारा साधारण २ तासांचा ट्रेकही करत कोकण आणि दख्खनच्या पठाराचं विहंगम दृश्य न्याहाळता येतं.

कसं जाल? मुंबईपासून अंदाजे २४० कि.मी.वर. मुंबई-गोवा हायवेने संगमेश्वर-महाड-खेड-चिपळूण-साखरपे किंवा मुंबई-पुणे एक्सप्रेसवेनेही जाता येईल.

## आंबा घाट


आंबा घाट म्हणजे रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील एक सुंदर ठिकाण. दाट धुकं, भन्नाट वारा, गारेगार वातावरण असं इथलं वातावरण पाहिलं की मन फुलपाखरासारखं तरंगत राहतं. सह्याद्रीच्या कड्यावरुन कोसळणाऱ्या धबधब्याखाली मनसोक्त भिजण्याचा आनंद इथे लुटता येतो. घाटाच्या पायथ्याशी साखरपा इथे राहण्याची आणि भोजनाची सोय होऊ शकते. कोकण रेल्वेमार्गावरील संगमेश्वर रेल्वेस्टेशनवर उतरुन तासाभरात आंबा घाटात पोहोचता येतं.



अनु.

# रत्नागिरी

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते रत्नागिरी | | | | | 331 | | | | |
| **1** | गणपतीपुळे | समुद्रकिनारा | | | मंदिर | 26 | NW | | | |
| **2** | आरेवारे बीच | समुद्रकिनारा | लॉंग ड्राईव्ह | | | 15 | NW | 11 | S | |
| **3** | लक्ष्मीकेशव मंदिर | | | | मंदिर | 3 | SW | 14 | S | |
| **4** | भाट्ये किनारा | समुद्रकिनारा | | | | 3 | SW | 3 | SW | |
| **5** | पावस - भाट्ये | समुद्रकिनारा | | | आश्रम | 19 | S | 16 | SE | |
| **6** | विमलेश्वर मंदिर | | | | मंदिर | 23 | S | 7 | SE | |



नारळ सुपारीच्या हिरव्यागार बागा... फेसाळणारा... समुद्र... चंदेरी... सोनेरी किनारे... केवड्याची बनं... तांबडे... नागमोडी रस्ते... तुळशी वृंदावनं असलेली चंद्रमौळी घरं... त्यापुढची सारवलेली लख्ख अंगणं... किनाऱ्यावरची देवळं... हे सगळं स्वप्नवत वाटणारं... पण वास्तवातलं दृश्य आहे निसर्गरम्य कोकणातलं... उत्तरेतल्या उंबरगावपासून ते पार तेरेखोलपर्यंत पसरलेल्या कोकणकिनाऱ्यावर थोड्या बहुत फरकाने या दृष्यात विशेष फरक पडत नाही. असाच एक परिसर रत्नागिरीजवळच्या गणपतीपुळे- अऱ्हे - व्हेरे- मालगुंड- जयगडचा... एकदम निसर्गरम्य... मनाला सुखावणारा...

पूर्वीचा बोटीचा प्रवास... त्या बळकट्या... बंदरावरची धांदल... खास भाच्यांसाठी खिल्लारी बैलांची घुंगूर लावलेली बैलगाडी घेऊन येणारा मामा... हे सगळं जरी आता इतिहास जमा झालं असलं तरी सध्या कोकणात रेल्वेमुळे जाणं खूपच सुकर झालं आहे. त्यात आता देशावरुन जाणाऱ्या एक्सप्रेस वेने गेलं तर खूपच सुरक्षित आणि वेगवान झालं आहे. एक्सप्रेस वे वर साताऱ्यापुढे उंब्रज आहे. इथून उजवीकडे वळलं की आपण कोयनानगर मार्गे कुंभार्ली घाटातून चिपळूणला उतरतो. पुढे संगमेश्वर करत निवळीचा छोटा घाट पार केला की उजवं वळण घेऊन आपण गणपतीपुळ्याच्या रस्त्याला लागतो. उंब्रज-चिपळूण हा रस्ता सध्या बराच खराब झाला आहे. दुसरा पर्याय म्हणजे कराड शहर सोडलं की दोन कि.मी.वर परत उजवीकडे वळलं की आपण मलकापूरमार्गे विशाळगडाच्या बगलेतून आंबा घाटात जातो व हा रस्ता रत्नागिरीबाहेरच्या हातखंब्याला मिळतो. हा रस्ता मात्र अतिशय मस्त आहे. मात्र देशावरुन जाणाऱ्या या दोन्ही रस्त्यांमार्गे गेलं तर अंतर मात्र चांगलंच जास्त होतं. पण वरचे हे दोन्ही रस्ते एकेरी वाहतुकीचे असल्याने गोवा हमररस्त्यापेक्षा नक्कीच सुरक्षित आहेत.

गणपतीपुळे... मुंबईपासून गोवा रस्त्याने गेल्यास साधारण साडेतीनशे कि.मी. अंतरावर वसलेले... कोकणातलं विहंगम पर्यटनस्थळ... आणि गजाननाचं जागृत देवस्थान. गणपतीचं देऊळ एकदम किनाऱ्यावरच वसलेलं असून मागे एक छोटीशी टेकडी आहे. या टेकडीची चालत केलेली प्रदक्षिणा परंपरेने खूप पुण्यदायी मानली आहे. असं म्हणतात की, या भागात पूर्वी केवड्याची खूप बनं होती. भिडे नावाच्या एका भक्ताला गजाननाची ही मूर्ती केवड्याच्या बनातच मिळाली. पेशवेकाळात या देवस्थानात अनेक सुधारणा झाल्या. अण्णाजी सचिव यांनी देवळाचा घुमट बांधला तर सरदार गोविंदपंत बुंदेले यांनी सभामंडप बांधला. कोल्हे

# मन
# रंगले
# रंगले...

संस्थानचे कारभारी बर्वे यांनी सोन्याचा मुलामा दिलेला कळस चढवला. नानासाहेब पेशव्यांनी नंदादीपाची व्यवस्था केली तर चिमाजी अप्पांनी नगारखाना उभारला. सरदार गोविंदपंत बुंदेले यांनी डोंगरी फरसबंदीचा रस्ता बांधला. रमाबाई पेशव्यांनी देवस्थानाची धर्मशाळा बांधली. इथलं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे २ ते ८ फेब्रुवारी व २ ते ८ नोव्हेंबर या काळात मावळत्या सूर्याची किरणे गजाननाच्या मूर्तीवर थेट पडतात.



पुळ्याच्या जवळचं गाव म्हणजे केशवसुतांचं मालगुंड... पुळ्याला गणेशाच्या स्थानामुळे भक्तांची कायम वर्दळ... मालगुंड मात्र एकदम निवांत... मालगुंडच्या पुढे भव्य पठार... याला कोकणात सडा म्हणतात. या सड्यावरुन जायला लागलं की डावीकडे उंचावरुन दिसणारा समुद्राचा देखावा भान हरपून लावणारा. याच रस्त्यावर वरवडामार्गे पुढे गेल्यास आपण जयगड बंदरावर जातो. या किल्ल्यावर मोहमायादेवीचं देऊळ, गणेश मंदिर, श्रीकार्तेश्वराचं शंकराचं स्थान आहे. या किल्ल्यावर जयबा नावाचा स्मारकही आहे. पुळ्याला पर्यटनमंडळाचं किनाऱ्यावर असलेलं पर्यटन निवास आहे. अजूनही खूप हॉटेल्स आहेत. असं असलं तरी बाजूच्याच मालगुंडच्या किनाऱ्यासमोरही उत्तम आणि निवांत हॉटेल्स आहेत. त्यामुळे निसर्गप्रेमी मंडळींनी घाई न करता मालगुंडलादेखील एक फेरफटका मारुन मग ठरवावं.

पुळ्याच्या दुसऱ्या दिशेला समुद्राची सतत सोबत देणारा रत्नागिरीला अऱ्हे-वऱ्हे मार्गे जाणारा रस्ता आहे. हे अंतर असेल साधारण तीसएक कि.मी.

हा सगळा रस्ता समुद्राचे, सृष्टीचे अगणित रुपरंग दाखवणारा... बऱ्याच ठिकाणी चांगल्याच उंचीवरुन जाणारा... उजवीकडे सतत समुद्राची अथांग निळाई... तर एका बाजूला जणू कुबेराने मूठमूठ भरुन पाचू उधळावे तसा, अऱ्हे-वऱ्हेचा नारळी पोफळींनी बहरलेला हिरवागार परिसर... त्यात जर संध्याकाळ असेल तर बहार... मन रंगले रंगले अशी मनाची अवस्था आपसूक करणारा.... एकदम सही!

—

# नववर्षाचं स्वागत गणपतीपुळ्यात



**सुट्टीच्या दिवसांत गणपतीपुळ्याला जाणं होत असलं तरी पाडव्याला इथे जाण्याचा अनुभव खास असतो. पारंपरिक बाजातले कार्यक्रम, आकर्षक सजावट, गणरायाची पालखी, उत्साहाला आलेलं उधाण हे सारं रोमहर्षक वातावरण अनुभवायचं असेल तर पाडव्याला चलो गणपतीपुळे.**

पर्यटनातील एकूणच बूम बघता पर्यटनाचे निरनिराळे प्रकार आकर्षक रूपांत पर्यटकांसमोर येत आहेत. धार्मिक पर्यटन हा त्यातलाच एक प्रकार. धार्मिक स्थळी जाऊन, मंदिरं, देवाधर्माचं करणं इतकंच याचं स्वरूप मर्यादित नाही. धार्मिकतेशी संबंधित एखाद्या कारणानिमित्त उत्तम ट्रिप होऊ शकते. लगेचच समोर दिसणारं तसंच एक कारण म्हणजे गुढीपाडवा किंवा मराठी नववर्षाचा शुभारंभ!

एरव्ही सुटीच्या निमित्तानं गणपतीपुळ्याला जाणं होत असेल अनेकांचं. पण गुढीपाडव्याच्या दिवशी इथं जाण्याचा अनुभव खास असू शकतो. गणपतीपुळ्यातील गणेश मंदिरात या दिवशी आवर्जून उपस्थिती लावावी, असा कार्यक्रम असतो. सगळं काही पारंपरिक बाजात होत असतं. सकाळी लवकर गणेशमंदिराजवळ गुढी उभारली जाते. दिवसभर गणपतीचं आणि गुढीचं दर्शन घेता येतं. दुपारनंतर गणरायाची पालखी निघते. मंदिराजवळची टेकडीही श्रद्धास्थानच आहे. या टेकडीभोवती प्रदक्षिणा घातली जाते. ही पालखी याच मार्गाने दिमाखात फिरून येते. यावेळी उत्साहाला उधाण आलेलं असतं. पालखी पुन्हा मंदिरात येते. मग आरती, मंत्रपुष्प, प्रसाद होतो. यंदा इथे दुर्गेश परुळेकर यांचं माहितीवजा प्रवचनही होणार आहे. गुढीला फुलं वाहण्याची सोय केलेली असणार आहे. पारंपरिक प्रथेनुसार सगळ्यांना कडुनिंबाची चटणीही दिली जाणार आहे.

गणपतीपुळ्यातल्या या मंदिरातून वर्षातून १७ वेळा पालखी निघते. प्रत्येक वेळी तिचा थाटमाट निराळा असतो. दसऱ्याला पालखी निघते तेव्हा नगारे असतात पुढे. पाडव्याची पालखी मात्र खास असते. गुढी, मिरवणुकीत निशाणवाला, ग्रामस्थ, पारंपरिक वेशातले भाविक असं वातावरण जमून आलेलं असतं. एरवी इथे पालखीला तुफान गर्दी लोटते.पाडव्याला साधारणतः हजारभर लोकांची गर्दी असते. त्यामुळे पाडवा निराळ्या प्रकारे साजरा केल्याचा आनंदही मिळतो. शिवाय, गणपतीपुळ्याच्या आसपास प्राचीन कोकण, मालगुंड, पावस, रत्नागिरी अशी अनेक ठिकाणं आहेत. त्यामुळे मित्रमंडळी, कुटुंब किंवा एकट्यानं जायचं तरी मस्त प्लॅन होऊ शकतो. मग, नववर्षाची सुरुवात गणेशाच्या आशीर्वादानं करून रिचार्ज करणार का?

## जायचं कसं?

मुंबईहून रत्नागिरीला जायला भरपूर बस आहेत. रत्नागिरीहून गणपतीपुळ्याला जायला गाड्या मिळतात किंवा थेट गणपतीपुळ्याला जाणाऱ्या काही बसही आहेत. रत्नागिरीपर्यंत कोकण रेल्वेही सोयीची आहे.

## राहायचं कुठे?

गणपतीपुळ्यात राहण्यासाठी भरपूर पर्याय आहेत. मंदिराच्या आसपासही हॉटेल, लॉज आहेत. आयत्या वेळी जाऊनही बुकिंग मिळू शकेल. एमटीडीसीची सुंदर लॉजेसही इथे उपलब्ध आहेत.

अधिक माहितीसाठी संपर्क : ९८१९३९९५२७.

# आरेवारे बीच

**समुद्रकिनाऱ्याच्या** भोवताली लॉंग ड्राईव्हची मजा घ्यायची असेल तर आरेवारे बीचसारखा दुसरा पर्याय नाही. रत्नागिरी-गणपतीपुळेच्या नवीन रस्त्यावर हे गाव वसलं आहे आणि निळ्या पाण्याच्या अथांग समुद्रामुळे त्याला विशेष शोभा आली आहे. दुपारी ऊन असलं तरी सन बाथिंगसाठी हा स्पॉट लोकांना आवडतो. सकाळी लवकर आणि संध्याकाळच्या वेळी मात्र गार वाऱ्यातून समुद्राच्या लाटा बघायला मजा येते. रत्नागिरी आणि गणपतीपुळ्याच्या मध्यावर हा समुद्र असल्यामुळे कुठेही राहून इथे जाता येतं. व्यावसायिकरण झालं नसल्याने निसर्गाच्या कुशीत जाण्याचा अनुभव इथे मिळतो. मासेमारीसाठी हा बीच प्रसिद्ध असल्याने सी-फूडची इथं विशेष चलती आहे.

### कसं जाल ?

मुंबईहून रत्नागिरीला गेल्यावर रत्नागिरी-गणपतीपुळ्याच्या नवीन हायवे वर आरेवारे बीच लागतो.

### आणखी काय पहाल?

भगवती किल्ला, गणपतीपुळ्याचं मंदिर, थिबा पॉईंट ही पाहता येण्यासारखी काही ठिकाणं इथून जवळ आहेत.

# गर्द झाडीतलं लक्ष्मीकेशव मंदिर

रत्नागिरीपासून ४० किमी अंतरावर रत्नागिरी-जयगड या मार्गावर मुख्य रस्त्यापासून दोन किमी अंतरावर कोळीसरे गावात श्री लक्ष्मीकेशव देवस्थान आहे. मंदिराचा परिसर अतिशय रम्य असून एका बाजूस डोंगर, दोन बाजूस सपाट जमीन तर एका बाजूला खोल दरी आणि सभोवती निर्जन अशी दाट झाडी. महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून इथे दररोज भाविक येत असतात.

इ.स. ७५० ते ९७३ या काळी राष्ट्रकुल घराण्याचे राजे सध्याच्या मराठवाड्यातील मालखडे इथे राज्य करत होते. ते विष्णुभक्त असल्याने त्यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी उत्तम मूर्ती घडवून विष्णूची मंदिरे बांधली. पुढे कालांतराने मुसलमानी अंमल सुरू होऊन ते मूर्तींचा भंग करू लागले. त्यामुळे विष्णुभक्तांनी सदर मूर्ती सुरक्षित राहवी यासाठी कोल्हापूर इथल्या रंकाळा तलावात बुडवून ठेवली असावी असा कयास आहे. रंकाळा तलावात शोध घेतला असता ही मूर्ती सापडली. या मूर्ती कोल्हापूर - देवरूख - संगमेश्वर अशी पायवाटेने आणि त्यानंतर





अनु.



कोळीसरे गावापर्यंत जलमार्गाने आणली. रात्र झाल्याने विश्रांतीसाठी सर्व कोळीसरे इथे थांबले. दुसऱ्या दिवशी मजूर मूर्तीचा पेटारा उचलू लागले असता त्यांना तो उचलेना म्हणून तिथेच मूर्तीची स्थापना करण्यात आली.

लक्ष्मीकेशव देवाची चतुर्भुज मूर्ती ही नेपाळातील गंडकी नदीच्या काळसर तांबूस रंगाच्या शालिग्राम शिलेचा अप्रतिम कारागिरीचा नमुना असून ती अतिशय नितळ आणि तेजस्वी दिसते. मूर्तीची उंची सुमारे पाच फूट असून शाळुंकेची उंची दीड फूड आहे. शंख, चक्र, गदा, पद्म हातामध्ये असून अंगावर निरनिराळे अलंकार, यज्ञोपवित कोरलेले आहेत. मूर्तीच्या उजव्या बाजूला जय आणि गरुड तर डाव्या बाजूला लक्ष्मी आणि विजय यांच्या लहान पण रेखीव मूर्ती आहेत.

अनेक कुटुंबांचे श्री लक्ष्मीकेशव देवस्थान हे कुलदैवत असून अनेक भाविकांच्या देणग्यांतून नुकतेच २२ लाख रुपये खर्च करून मंदिराचे नुतनीकरण करण्यात आलं आहे. यासाठी लागणारे संपूर्ण लाकूड कामासाठी बर्मा साग वापरण्यात आला आहे. नुकताच मंदिराचा कलशारोहण समारंभ झाला.

संपर्क: ९४२११४२५८८

# भाट्ये किनारा


**रत्नागिरीपासून** अगदी जवळ असणारं भाट्ये हे छोटंसं गाव तिथल्या समुद्रकिनाऱ्यासाठी विशेष ओळखलं जातं. इथला लांबलचक समुद्रकिनारा मनाला विशेष भुरळ घालतो. हिरव्यागार निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या या समुद्राकडे तासनतास बघण्यात वेळ कसा छान जातो. साधारण दीड किलोमीटरच्या परिसरात हा समुद्रकिनारा पसरला असून सकाळच्या वेळी ओल्या वाळूवर चालून एक वेगळा आनंद घेत येतो. या बीचमधून रत्नागिरीचं लाईट हाऊस आणि मांडवी बीचदेखील दिसतो. समुद्रावरच्या भेळपुरीची मज घ्यायची असेल तर इथे जायलाच हवं. सगळ्या प्रकारच्या चाट बीचजवळ बसून खाता येत असल्याने पर्यटकांना हा किनारा आवडतो. एक संपूर्ण दिवस आराम करून निसर्गाच्या सोबतीनं राहायचं असेल तर भाट्ये बीच हा एक चांगला पर्याय ठरू शकतो.

## कसं जाल?

मुंबई ते रत्नागिरी सुमारे ३४० किमी अंतर आहे. भाट्ये समुद्रकिनारा हा रत्नागिरी-पावस मार्गावर आहे. रत्नागिरीपासून सुमारे १.५ किलोमीटरच्या अंतरावर असल्यामुळे रत्नागिरीत राहून या समुद्रावर जाता येते. खाजगी वाहनाने तिथं पोचता येतं शिवाय रत्नागिरी ते भाट्ये गाव अशा सरकारी बसेसचीदेखील सोय आहे.

## आणखी काय पहाल?

भाट्ये बीचच्या एका टोकाला झरी विनायक हे गणपतीचं देऊळ आहे. शिवाय रत्नागिरीत असणाऱ्या चांगल्या रिसोर्ट्स पैकी एक या बीचच्या अगदी जवळ आहे. रत्नागिरीत असलेल मत्स्यालय देखील या समद्रापासन जवळ आहे.






अनु.

एखादा हिरवागार वनश्रीने नटलेला डोंगर, निळाशार समुद्र, उंचच उंच माडाची झाडं, लालचुट्टक माती आणि त्यातून वाट काढणारा डांबरी रस्ता....हे सगळं एकाच वेळी कुठे सापडलं, तर बहारच येईल. असा स्पॉट दिसला, तर असेल त्या वाहनातून खाली उतरल्याशिवाय आपल्याला रहावणारच नाही.

रत्नागिरीजवळच्या भाट्यामध्ये जायचं, तर हाच अनुभव येतो. हळूहळू वर चढत जाणारी वाट आणि तिथून दिसणारं पूर्ण रत्नागिरीदर्शन हे तर खासच. आजकाल गोव्याकडे किंवा तळकोकणात जाताना रत्नागिरीवरून आपण भुर्रकन निघून जातो. अर्थात खास कोकणातली सहल करायची, तर रत्नागिरी वगळून चालत नाही. रत्नागिरीलाही आता शहराचा फील येत चालला आहे. पण 'रत्नांग्री'च्या सभोवतीची ठिकाणं आजही त्यांचं निस्सिम सौंदर्य राखून आहेत. पावस, पूर्णगड आणि भाट्येचा मुक्काम हे त्यामुळेच स्मरणीय ठरतं.


---

भाट्ये हे गाव रत्नागिरी-पावस रस्त्यावर आहे. खरं तर ते रत्नागिरीच्या वेशीवर आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. पावसकडे निघाल्यावर पंधरा-वीस मिनिटांतच एका निसर्गनिर्मित मरीन ड्राईव्हचा नजारा आपल्याला खुणावतो. गगनाला भिडलेले माड हे इथलं वैभवच. इथे नारळ संशोधन केंद्रही आहे आणि शास्त्रज्ञांनी वाढवलेल्या माडांच्या गर्दीत संध्याकाळी भाताच्या दळ्यांमध्ये लाखो बगळ्यांची शाळाही भरते. बगळ्यांच्या माळा कौलारू घरांवरून विहरत जातात, ते दृश्य मनोरम असतं. स्वामी स्वरुपानंदांच्या आश्रमामुळे पावस हे अलिकडे एक महत्त्वाचं श्रद्धास्थान बनलं आहे. पावस रत्नागिरीपासून साधारण २५ कि.मी.वर आहे. भाट्ये आणि पावसकडे गेल्यावर रत्नागिरीपासून साधारण ४० किलोमीटरवर असलेला पूर्णगड पाहून यायला विसरायचं नाही. पूर्णगडकडूनच राजापूरकडेही जाता येऊ शकतं.

## पावस-भाट्ये


कितीही फिरलं, तरी मुक्काम मात्र भाट्यातच करायला हवा किंवा फारतर पावसमध्ये घरगुती सोय झाल्यास तिथेही रहायला हरकत नाही.

**विमलेश्वर मंदिर :** देवगडच्या धार्मिक स्थानांमध्ये महत्त्वपूर्ण उल्लेख करावा असं हे पांडवकालीन विमलेश्वर मंदिर. इतर कोणतीही शिवलिंगं पाहण्यासाठी पायऱ्या उतरून जावं लागतं. परंतु हे शिवलिंग पाहण्यासाठी पायऱ्या चढून वर जावं लागतं. पांडवकालीन हे स्थान प्रतिकाशी म्हणून ओळखलं जातं. या ठिकाणी प्रथम गंगा, नंतर कालभैरव मंदिर, गणपती, नंदी अशी घुमट पद्धतीने रचना करण्यात आली असून या स्थानाला वाडा गावच्या ग्रामदैवताचा मान मिळाला आहे. हिरवागार झालेला डोंगर, समोरच कोसळणारं खळाळतं पाणी, सभोवार नारळी-फोफळीच्या बागा हे दृश्य विलोभनीय दिसतं. जांभ्या खडकामध्ये हे शिव मंदिर कोरलं असून शिल्पकलेचा अप्रतिम नजारा इथे पहायला मिळतो. इथली शिल्पे विखुरलेली.असून जे शिलालेख येथे सापडतात ते आणि कुठेही पहायला मिळत नाहीत. बारमाही वाहणारं स्वच्छ पाणी इथली २१ घरांतली कुटुंब वापरतात हा खास सांगण्यासारखा भाग आहे. महाशिवरात्री, त्रिपुरा पौर्णिमा हे उत्सव इथे होतात.



# राजापूर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते राजापूर | | | | | 372 | | | | |
| **1** | कनकादित्य मंदिर | | | | मंदिर | 32 | NW | | | |
| **2** | महाकाली मंदिर | | | | मंदिर | 28 | NW | 4 | SE | |
| **3** | गोडावणे बीच | समुद्रकिनारा | | | | 35 | NW | 10.5 | SW | |
| **4** | ओणीचा धबधबा | धबधबा | | | | 17 | NE | 47 | NE | |
| **5** | राजापूरची गंगा | | गंगाकुंड | | | 4.5 | SE | 16 | SW | |
| **6** | धूतपापेश्वर | धबधबा | | | मंदिर | 9 | SW | 13 | E | |
| **7** | आंबोळगड | समुद्रकिनारा | | किल्ला | आश्रम | 36 | SW | 32 | SE | |




***श्री कनाकादित्य मंदिर (२७ किमी)***

अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापासून देवतांच्या मूर्ती वाचवण्यासाठी सौराष्ट्रातील एक व्यापारी दक्षिणेकडे निघाला होता. दृष्टान्त झाल्याने त्याने सूर्यदेवाची मूर्ती कशेळीजवळच्या समुद्रात सोडली. ही मूर्ती गावकऱ्यांना गुहेजवळ सापडल्यानंतर तिथे कनकादित्य मंदिर बांधण्यात आलं. शके ११९३ मध्ये शिलाहारच्या भोजराजाने दानपत्र दिल्याचा उल्लेख इथल्या ताम्रपटावर आढळतो.

***महाकाली – आडिवरे (१९ किमी)***

या देवस्थानाची स्थापना शृंगेरी पिठाच्या आद्य शंकराचार्यांच्या हस्ते झाली. श्री नागेश्वर मंदिरात शेकडो वर्षांपूर्वीचं नागोबाचं वारुळ आणि लाकडीपटावर कोरलेली ९०० वर्षं जुनी चित्रं हे खास आकर्षण आहे.

**गोडीवणे बीच :** नाटे या गावामधलं एक रम्य आणि लोकांना फारसं माहित नसलेलं एक ठिकाण म्हणजे गोडीवणे. या समुद्र किनाऱ्याचं वैशिष्ट्यं म्हणजे सुमारे ८ किलोमीटर्सपर्यंत वाळूतून सलग चालत जाता येतं. तसंच समुद्र किनाऱ्याला लागून गोड्या पाण्याचा झरा आहे. या झऱ्याला बाराही महिने पाणी असतं. समुद्र किनाऱ्याला लागून एक घनदाट जंगल आहे. त्यामध्ये एक सुंदर पावसाळी धबधबा पण आहे. बीचला जाण्यासाठी एक पाखाडी आहे. ज्याला साधारण ५० पायऱ्या आहेत आणि तिथंच गावदेवीचं माहेर आहे. दरवर्षी तिथं गावदेवीची पालखी नेण्यात येते.

## ओणीचा धबधबा

रत्नागिरीहून राजापूरकडे जाताना वाटेत ओणी इथे धबधबा लागतो. थोड्याशा आडमार्गाला हा धबधबा असला तरी एकदा तिथे पोहोचल्यावर इतर सर्व विसरायला होतं. फेसाळतं पाणी आणि धुंद वातावरण मन मोहून टाकणारं असतं. इथून सावंतवाडीला पोहोचल्यावर आंबोली या प्रसिद्ध ठिकाणी पोहोचता येतं.

### *राजापूरची गंगा (३७ किमी)*

अचानक उगम पावणारी आणि तशीच अचानक थांबणारी राजापूरची गंगा हा सायफन तत्त्वावरील चमत्कार असावा. मोठ्या आकाराचे काशीकुंड, वरुणकुंड, हिराकुंड, वेदिकाकुंड आदी १४ कुंडे या भागात आहेत. वटवृक्षाच्या पायाशी जिथे गंगा उगम पावते तिथे मूळ गंगाकुंड आहे. ती पाहण्यासाठी कोणताही दिवस, तिथी, नक्षत्र, महिना किंवा मुहूर्त लागत नाही.

### *धूतपापेश्वर मंदिर (३७ किमी)*

निसर्गरम्य परिसरात वसलेल्या या मंदिराला १२०० वर्षांचा रंजक इतिहास आहे. मंदिराच्या निर्मितीची एक आख्यायिकाही सांगितली जाते. इथल्या दोन शिवलिंगांवर अभिषेक करणारा धबधबा बाराही महिने खळखळत असतो. त्यापलीकडे दत्तमंदिर आहे.

## धूतपापेश्वर

राजापूर तालुक्यातल्या राजापूर बसस्थानकापासून काही अंतरावरच धुतपापेश्वर हे प्रसिद्ध ठिकाण आहे. येथील शंकराचं मंदिर अगदी पुरातन असं आहे. मुख्य धबधब्यातून पडणाऱ्या पाण्याखाली लक्षपूर्वक पाहिलं तर पाण्याच्या मागे दोन शिवलिंगं दिसतात. मुख्य धबधब्याच्या मागे लहान धबधबे आहेत. नदीच्या पात्रातून वाहणाऱ्या पाण्याच्या ओघावर मात्र लक्ष ठेवणं आवश्यक.

## धूतपापेश्वर

मुंबई-गोवा महामार्गावर राजापूर तालुक्यातले जागृत देवस्थान म्हणून धूतपापेश्वरची ओळख आहे. सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या शंकरांच्या प्रमुख मंदिरांपैकीही धूतपापेश्वर एक मानले जाते. ज्याने भक्ताचे पाप धुवून स्वच्छ केले असा इश्वर तो धूतपापेश्वर अशी ओळख सांगितली जाते. या देवस्थानाचा उल्लेख पुराणातही आढळून येतो.

मिती माघ वद्य १० पासून मिती फाल्गुन शुद्ध १पर्यंत सात दिवस येथे शिवरात्रीचा जंगी उत्सव असतो. महाशिवरात्रीला कोकणातल्या उत्सवाला साजेशी यात्राही भरते. श्रावणातल्या सर्व सोमवारी धूतपापेश्वरला जत्रा असते आणि दक्षिण कोकणातले हजारो भाविक शंकराच्या दर्शनासाठी येतात. विजयादशमीलाही मोठा उत्सव भरत असतो. कोकणातल्या अनेकांचा धूतपापेश्वर हा कुलस्वामीही आहे. राजापूर येथून धूतपापेश्वरला चक्क पायी वा रिक्षानेही जाता येते. पायी जाण्यासाठी केवळ दहा मिनिटेही पुरतात.

## आंबोळगड

रत्नागिरीपासून केवळ ६० किलोमीटरवर असलेले समुद्राच्या काठी असलेलं हे गाव. इथं जाताना पावस, आडिवरे, महाकाली ही पर्यटनस्थळं पाहता येतात. स्वच्छ किनारा, डॉल्फिन, कोरल असलेला हा किनारा. शहराच्या कोलाहलापासून निवांत राहण्यासाठी इथे समिंदर बीच रिसॉर्टला पर्याय नाही.






अनु.

# एकुटवाणा आंबोळगड

माणसातल्या 'म'चा स्पर्शही नसणारा शांतनिवांत सिंधुसागराचा तीर... पाठिशी अनेक शतकांच्या इतिहासाचे भग्न अवशेष मिरवणारा दुर्गसखा... अविरतपणे सुरू असणारं लाटांचं हितगूज, एखाद्या पठारासारखा पसरलेला सडा, अस्ताला जाणारा सूर्यनारायण, काहीसं गूढरम्य तरीही सुखावणारं वातावरण. आंबोळगड... रत्नागिरी जिल्ह्याच्या जवळपास शेवटच्या टोकाला वसलेलं दुर्गरत्न.

रत्नागिरी जिल्ह्याच्या सागरी महामार्गानं पाहता येतील तेवढे जलदुर्ग आणि किनारीदुर्ग पाहायची मोहीम आंबोळगडाच्या साक्षीनं सुफळ संपूर्ण होणार होती. तत्पूर्वी आंबोळगडाविषयी काहीच माहिती हाताशी नव्हती. याच नावाचं गाव असून, रत्नागिरीहून दिवसभरात दोन-चार एसटी बस इथं जातात, 'रात्रीची यशटी मुक्कामी असत,' एवढीच जुजबी माहिती मनाशी साठवून आंबोळगडाच्या दिशेनं प्रवास सुरू होता. एखादं पडकं मंदिर नाहीतर तटबंदीच्या आसऱ्यानं मुक्काम करायचा बेत मनात डोकावत होता.

मंडणगडच्या गणरायाला वंदन करून या मोहिमेचा श्रीगणेशा झाला होता. दोन दिवसांत किनारी आणि सागरी दुर्गभ्रमंती हवी तशी झाली होती. तसं राहण्याजेवणाचं काहीही नियोजन न करता हिंडायचं, असा अवलिया विचार घेऊन बाहेर पडलेली चार टाळकी एकत्र होती. आंब्याच्या मोहराचे दिवस, मैलोनमैल घमघमणारा तो दरवळ उरांत साठवत रत्नागिरीहून आडिवरे, नाटेमार्गे आंबोळगडाच्या आसमंतात दाखल झालो. सागरी महामार्ग आणि खाडीपूल यामुळे हा प्रवास आता खूप सोपा झाला आहे.

आंबोळगड गावालाही चंद्राकृती किनारा लाभला आहे. मावळतीच्या किरणांचे रंग फेसाळत्या लाटांमध्ये उमटू लागले होते. मच्छीमारी करून परतीच्या बेतात नौकांची किनारा जणू वाटत बघत होता. तिथं थांबायचा मोह आवरून थेट सड्यावर दाखल झालो. गगनगिरी महाराज दत्तमंदिर आश्रम, आंबोळगड अशी पाटी लिहिलेली कमान पुढ्यात होती. या प्रवासात गडाच्या खुणा कुठंच दिसल्या नाहीत. सारवलेल्या दत्तमंदिरात पाऊल ठेवताक्षणी प्रसन्न वाटलं. तिथं असणारी मंडळी आपापल्या कामात गुंतलेली. देवपूजेचा मंदिरात भरून राहिलेला दरवळ.

बाहेर सूर्यनारायण क्षितीजावर दाखल झाले. मावळत्या दिनकराची भगवी झाक, आसमंत आणि सागरानं पांघरलेली त्याच रंगाची छटा, आश्रमातलं बैरागीपण आणि त्याच फकिरी वृत्तीनं तिथं दाखल झालेलो आम्ही. त्याक्षणी मनातलं सगळं जणू खोल सागरतळाशी विरघळून गेलं: कुठलाच विचार नाही, तो क्षण जगणं, एवढंच..! सूर्यनारायणानं स्वत:ला क्षितिजाच्या कवेत झोकून दिलं.

आश्रमातल्या चुलीवर आमटी-भाताचा प्रसाद झाला. देवाची आरती झाली. बाहेरच्या गूढरम्य वातावरणानं हाक दिली. बाहेरच्या सड्यावर छान वारा वाहू लागला. बाहेर पडलो. आसमंतात चांदण्यांची दाटी झाली होती. समोर पाहिलं, तर जणू समुद्रावर एखादं तरंगतं गाव असल्याचा भास झाला. काही क्षणांत हे गाव लुप्त झालं. या पठारावर अनेक ठिकाणी भेगा असल्यानं जपून वावरावं लागतं. आश्रमाकडून समुद्राकडे उतरणाऱ्या वाटेनं खाली गेलो.

काही क्षणांत आश्रमांतून टॉर्च आले आणि आम्हाला तातडीनं वर येण्याची सूचना. काय झालं असावं, आमच्या सभोवती कोल्ह्यांच्या दोन टोळ्या वावरत होत्या. भरतीनं किनाऱ्यावर आलेल्या खेकडे, कुर्ल्या, छोटे मासे मटकावण्यासाठी ही टोळी निवांत बाजूच्या झुडपांत फिरत होती. मग त्यांच्या सूचनेतली काळजी लक्षात आली. एव्हाना मुक्कामी एसटी दाखल झाली. ड्रायव्हर कंडक्टरांनी हेडलाइट सुरू ठेऊन जेवणं उरकली. त्या एकुटवाण्या पठारावर ती एसटी आणि आम्ही चार-पाच टाळकी, कोण कुठले, कधी न भेटलेले; पण संवाद सुरू झाला. त्यांचे किस्से ऐकतानाही मजा आली. चुकून दार उघडं राहिलं, तर एसटीतच कोल्हे कसे निवांत येऊन झोपतात हे त्यांनी



अनु.

सांगितलं. राज्य परिवहन मंडळानं एवढ्या टोकाशी गाडी पाठवावी, याचंच खूप कौतुक वाटून गेलं. भटक्यांना लाल डबा इतका प्रिय का असतो, ते अशावेळीच कळतं.

मंदिरातल्या तरुणानं झोपायला चटया आणि पांघरूणं दिली. शांत झोप लागली. पहाटे आश्रमातल्याच मंडळीसोबतच उठलो. 'तुम्ही आलात त्या वाटेलाच उजव्या बाजूला आंबोळगड, झाडीमुळे दिसला नसेल आता पुन्हा पाहा, शिवराजांच्या पाऊलखुणा उमटलेला,' साधूमहाशयांचे बोल कानात साठवून आश्रमाचा निरोप घेतला. झाडीझुडपातला आंबोळगड अखेर गवसला. तटबंदीवर चढूनच गडात प्रवेश करावा लागला. जीर्ण तटबंदी, गड व्यापून राहिलेला प्रचंड वटवृक्ष, खाऱ्या वाऱ्यानं पूर्णत: झिजलेली तुटलेली तोफ, काही जोत्यांचे अवशेष, चौकोनी आकाराच्या विहिरी हे अवशेष पाहात गडपण समजून घेतलं. ते दगडी चिरे खूप काही बोलाताहेत असं वाटलं. काही ठिकाणी शिल्लक असणारा खंदकही जाणवला. येतानाच्या वाटेवरचा यशवंतगडही असाच उपेक्षित. आंबोळगड तर कुणाच्या गावीही नाही. इथल्या मुसाकाजी बंदरावर लक्ष ठेवणारे हे दोन किनारीदुर्ग स्वराज्याचे खंदे शिलेदार. १८१८ मध्ये कर्नल इमलॉकनं आंबोळगड जिंकला आणि १८६३ नंतर आंबोळगडावरील वस्ती उठली. असं इतिहास सांगतो. ते आठवत परतीचा प्रवास सुरू झाला. दुर्लक्षाची धग सोसणारा आंबोळगड एकूणच दुर्गांबाबतच्या करंटेपणाचा आरसा दाखवून मन कुरतडत राहिला.



सागराच्या फेसाळत्या लाटांमध्ये स्वत:ला झोकून द्यायचंय... पण साऱ्या बीचवर घाण आणि दुर्गंधीचं साम्राज्य पसरलंय? समुद्राची गाज कानात साठवत आकाशातल्या चांदण्यांची मजा लुटायची आहे... पण समुद्रकिनारे पर्यटकांच्या गर्दीने गजबजलेत? रोजच्या धकाधकीच्या वेळापत्रकातून कुटुंबीयांसोबत चार निवांत क्षण घालवायचेत; पण मनासारखं पर्यटनस्थळच सापडत नाही? या सगळ्या विचारांनी डोक्यात गर्दी केली असेल आणि त्यातून सुटका करून घेण्यासाठी छानसं उत्तर हवं असेल तर तडक आंबोळगड गाठा!

सुंदर, स्वच्छ आणि निर्मनुष्य समुद्रकिनारा, घरातून थेट समुद्रदर्शनाचा अद्‌भुत अनुभव आणि निळ्याशार समुद्रात रंगणारा लाटा, वारा आणि ढगांचा अद्‌भुत खेळ पाहताना शहरात कोमेजलेलं मन कधी ताजंतवानं हातं हे कळतही नाही. बेडरूममधूनच थेट दिसणारा सूर्योदय पाहायचा आणि नंतर दिवसभर बेधुंद समुद्रावर धम्माल करायची. सभोवतालच्या निसर्गरम्य परिसरात हुंदडायचं. अस्सल मालवणी जेवणावर आडवा हात मारायचा. शंख शिंपले वेचत किनाऱ्यावर गप्पा मारताना अवकाशातले तारे तुमच्या डोक्यावर छत्री धरतील. दिवसभर फुल टू धम्माल केल्यानंतर रात्री समुद्राचं संगीत ऐकतच झोपी जायचं. कुठल्याही मुंबईकरासाठी स्वप्नवत वाटणारी ही धम्माल आंबोळगडमध्ये प्रत्यक्षात उतरवता येते.


अत्यंत स्वच्छ, निसर्गाचे भरभरून वरदान लाभलेल्या इथल्या बीचवर पाय ठेवल्यानंतर कुणीही त्याच्या प्रेमात पडतो. प्रवासाचा सारा क्षीण एका मिनिटात कुठच्या कुठे पळून जातो. इथून एक किलोमीटर अंतरावर गगनगिरी महाराजांचा मठ आहे. तिथल्या टेकडीवर उभं रहिल्यानंतर फेसाळत दगडांवर धडकणाऱ्या लाटांते तुषार अंगावर झेलण्याचा आनंदही अवर्णनीय आहे. तिथे जवळच असलेला गोडिवणे बीचही वेड लावतो. निसर्ग जेवढा उदार आहे तेवढीच इथली माणसंही प्रेमळ आहेत. मोठ्या आत्मीयतेने ते आदरातिथ्य करतात. पैसे कमावण्यापेक्षा आपल्याकडे आलेला पर्यटकाला संतुष्ट करण्याकडेच त्याचा ओढा असतो. मांसाहारी खवय्यांसाठी तर इथला बेत भन्नाटच असतो. आजवर कधी नावंही ऐकली नसतील असे मासे इथे चाखायला मिळतील.

निसर्ग, अथांग समुद्र आणि मिळणारं आदरातिथ्य यामुळे पर्यटकाची पावलं पुन्हा आंबोळगडकडे वळली नाही तरच नवल!

***जायचं कसं?***

स्वत:चं वाहन असेल तर मुंबई-गोवा हायवेने हातखांब्याला जावं. मुंबई ते हातखांबा अंतर ३४५ किमी. हातखांबा फाट्यावरून रत्नागिरीकडे वळावं. तिथून पावस, आडिवरे, नाटेमार्गे आंबोळगडला जाता येतं. रत्नागिरी ते आंबोळगड

*दिवसभर बेधुंद समुद्रावर धम्माल करायची. सभोवतालच्या निसर्गरम्य परिसरात हुंदडायचं. अस्सल मालवणी जेवणावर आडवा हात मारायचा. शंख शिंपले.वेचत किनाऱ्यावर गप्पा मारताना अवकाशातले तारे तुमच्या डोक्यावर छत्री धरतील. दिवसभर फुल टू धम्माल केल्यानंतर रात्री समुद्राचं संगीत ऐकतच झोपी जायचं. कुठल्याही मुंबईकरासाठी स्वप्नवत वाटणारी ही धम्माल आंबोळगडमध्ये प्रत्यक्षात उतरवता येते.*




अंतर ६० किमी. स्वतःचं वाहन नसेल तर कोकण रेल्वे किंवा बसने रत्नागिरीला उतरून एसटी किंवा खासगी गाडीने आंबोळगडपर्यंत जाता येईल.


**राहण्याची व्यवस्था**

समिंदर बीच रिसॉर्टमध्ये २५ पर्यटकांची व्यवस्था होऊ शकते. टेण्टमध्ये राहण्याची सोयही आहे. पॅकेज प्रत्येकी ५०० ते ७५० रुपये आहे. इथे राहण्यासाठी इतकी आरामदायी दुसरी व्यवस्था नाही. अन्यथा, राहण्यासाठी रत्नागिरी वा राजापूरला जायचा प्लान करावा लागेल.

# सिंधुदुर्ग जिल्हा
# देवगड

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते देवगड | | | | | 415 | | | | |
| **1** | विजयदुर्ग | | किल्ला | | | 28 | N | | | |
| **2** | रामेश्वर | | | | मंदिर | 27 | N | 3.5 | SW | |
| **3** | व्याघ्रेश्वर धबधबा | धबधबा | | | मंदिर | 38 | NE | 37 | SE | |
| **4** | पोखरबाव गणेश मंदिर | | | | मंदिर | 10 | SE | 33.5 | SW | |
| **5** | कुणकेश्वर | समुद्रकिनारा | | | मंदिर | 6 | S | 11 | SW | |



भारताचा पश्चिम किनारा हा देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत मोक्याचा प्रदेश. साहजिकच अनेक राजसत्तांनी संरक्षणासाठी या ४०० मैल लांबीच्या किनारपट्टीवर अनेक किल्ले बांधले. यातला मध्यवर्ती ठिकाणावर असलेला वाघोटनच्या खाडीवरचा विजयदुर्ग त्यावेळी खूपच नाव कमावून होता.

४० कि.मी. लांबीची खाडी असलेलं हे एक उत्तम बंदर होतं. त्या धामधुमीच्या काळात त्याच्याभोवती जबरदस्त घडामोडी घडल्या होत्या आणि या वास्तूने अफलातून मर्दुमकी गाजवली होती.

इतिहास सांगतो की, हा किल्ला शिलाहार वंशाच्या महाराजा भोज याने १२०५ मध्ये बांधला. तटबंदी ३६ मीटर उंच आणि १७ एकर १९ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या वीस बुरुजांच्या या वास्तूच्या बांधकामाला दहा वर्षं लागली. त्यावेळेचा दिवाण मिर्झा वली बेग याच्या मार्गदर्शनाखाली हा किल्ला बांधला गेला. नाव ठेवण्यात आलं, 'घेरीया'.

१२१८ मध्ये हा किल्ला देवगिरीच्या यादवांनी जिंकला. १३५४ मध्ये विजयनगरच्या साम्राज्याने कोकण प्रांतावर सत्ता मिळवल्याने हा त्यांच्या ताब्यात गेला. १४३१ मध्ये बहामनी सुलतान अल्लाद्दीन अहमदशहाने यावर ताबा मिळवला. नंतर बहामनी साम्राज्याचे तुकडे झाल्याने हा १५२६ मध्ये विजापूरकरांकडे गेला. १६५३ मध्ये महाराजांनी हा किल्ला जिंकला.

त्यानंतर महाराजांनी या किल्ल्याचं नाव बदलून 'विजयदुर्ग' ठेवलं. नंतर मात्र जवळजवळ १६५ वर्षं हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. अफाट मर्दुमकी गाजवलेले सरखेल कान्होजी आंग्रे यांनी हा किल्ला १६९८मध्ये परत जोरात कार्यरत केला. कान्होजींच्या काळात कोकण किनाऱ्यावर मराठ्यांचा खऱ्या अर्थाने अंमल असल्याने या काळात सतत अनेक मोठ्या घडामोडी होत राहिल्या. हा किल्ला आंग्र्यांचं मुख्य भांडार होतं.

आंग्र्यांनी विजयदुर्गच्या संरक्षणासाठी अफलातून बंदोबस्त केलेला होता. त्यांनी खाडीच्या तोंडावर भरभक्कम ओंडक्यांचा एक तरंगता बांध घातला होता. अचानक येणाऱ्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी ही प्राथमिक खबरदारी होती. या बांधाने जून १७१८ मध्ये एक जबरदस्त कामगिरी करून इंग्रजांचा अतिप्रचंड हल्ला यशस्वीरित्या परतवला होता. गव्हर्नर बूनने आपलं सारं व्यवस्थापन कौशल्य आणि सामर्थ्य पणाला लावून आखलेली झकास मोहीम या बांधामुळे चांगलीच फसली आणि किल्ल्यावरच्या तुटपुंज्या शिबंदीने इंग्रजांची अब्रू पार धुळीला मिळवली.

इंग्रजांनी सप्टेंबर १९२० मध्ये अशीच दुसरी मातब्बर मोहीम विजयदुर्ग घेण्यासाठी आखली आणि तिचेदेखील तीनतेरा वाजले. वॉल्टर ब्राऊनला सर्व फौजेचा कमांडर-इन-चीफ बनवून ॲडमिरलचा हुद्दा दिलेला होता. तो या मोहिमेवर १६ मोठ्या जहाजांचा ताफा घेऊन निघाला. ही जहाजं उत्तम तोफा असलेली होतीच पण या जहाजावरून

अनु.

बॉम्ब फेकण्याचीही सोय होती. यावेळी विजयदुर्गाचा किल्लेदार होता रुद्राजी अनंत.

रुद्राजी शांत डोक्याचा आणि लढाईत मुरलेला असामान्य शिपाईगडी होता. त्याने समोर उभ्या ठाकलेल्या गोऱ्यांचं लष्करी सामर्थ्य पुरेपूर आजमावल्यामुळे तो उघड्यावर टक्कर घ्यायच्या मोहाला बळी पडला नाही. वेढा खूप काळ टिकला तरी किल्ल्यावर दाण्यागोट्याची पुरेशी बेगमी होती. त्यामुळे इंग्रजांच्या आरमाराने केलेले अनेक हल्ले रुद्राजी अनंताच्या लहानशा शिबंदीने पचवले. अखेरीस गोऱ्यांना हात हलवत परतावं लागलं. या अजिंक्यपणामुळे इंग्रजांनी त्याला 'ईस्टर्न जिब्राल्टर' असं म्हटलं.

विजयदुर्ग किल्ला अजून एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेने जगभर प्रसिद्ध झाला. १८६८ मध्ये इंग्रज वैज्ञानिक सर नॉर्मन लॉकयर आणि फ्रेंच वैज्ञानिक पिअरे जुलस सिझर जान्सेन यांना या ठिकाणी सूर्यग्रहणाचा अभ्यास करताना सूर्यकिरणांच्या वर्णपटलावरच्या हेलियमची चाहूल लागली. हेलियमच्या शोधप्रक्रियेची ठोस सुरुवात या वास्तूत झाली. शेवटी १८९८ मध्ये विलियम रॅम्से यांनी या शोधाला निर्णायक स्वरूप दिलं. हेलियमच्या या शोध घटनेची विस्तृत माहिती करून घेणं, हा खास अभ्यासाचा विषय आहे. कारण आपल्या भूमीतली ही घटना सर्वसामान्य नक्कीच नाही.

आपण कोकणात फिरताना ही वास्तू एक सागरी किल्ला म्हणून सहज बघायला जातो. आपल्याला माहीत नसतं की केवढा प्रचंड इतिहास बाळगून आहेत या भग्न तटबंद्या आणि त्यांचे चिरे. त्यावेळचे काटक कोळी, भंडारी दर्यावर्दी डोळ्यांसमोर येतात. आपल्याला रुद्राजी अनंत त्या मर्दानी स्वरूपात तटबंदीवर उभे असलेले दिसतात. आपण निघतो तेव्हा आपल्याला या मातीतल्या चैतन्याचा, लढाऊ बाण्याचा ओझरता का होईना स्पर्श झालेला असतो. तो अनुभव नक्कीच थरारक असतो.





अनु.

# पेशवेकालीन रामेश्वर

देवगड-विजयदुर्ग मार्गावर गिर्ये गावात रामेश्वराचे मंदिर आहे. एका विस्तीर्ण माळावर उतरून मंदिराकडे जाताना नक्की काय समोरं येणार आहे याचा अंदाज येत नाही. रस्त्यापासून थोडे आत पायऱ्या उतरून गेल्यावर हे मंदिर दिसतं. मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे रामेश्वराची नंदीवर स्वार झालेली संपूर्ण चांदीची बनवलेली मूर्ती. मंदिरातील शिवलिंग कोकणातील पद्धतीप्रमाणे फुलांच्या आरासेने सजवलेले असते.

मंदिरात चार उंच दिपमाळा असून मंदिराला संपूर्ण फरसबंदी पटांगण आहे. पटांगणात सरखेल संभाजी आंग्रे यांची छत्री आहे. या मंदिराचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील पेशवे कालीन चित्रे. मराठा शैलीतील ही चित्रे अतिशय दुर्मिळ आहे. त्यातील अनेक चित्रांची दुलवस्था झालेली असली तरी अजूनही नीट काळजी घेतलयास या चित्रांचं आयुष्य वाढू शकेल.

मंदिरापासून दोन किमी अंतरावरील विजयदुर्ग किल्लाही या भेटीत पाहून होईल. दोन दिवस जायचा प्लान असेल तर शुक्रवारी रात्री 'कोकणकन्या एक्स्प्रेस'ने निघून कणकवलीमार्गे देवगड गाठता येईल. देवगड ते विजयदुर्ग एसटी आहे. दोन दिवस सिंधुदुर्गातली अन्य लोकप्रिय ठिकाणं आणि मंदिरं पाहता येतील.







अनु.

## मणचेचा व्याघ्रेश्वर धबधबा

मुंबई-गोवा हायवेवर कासार्डे-विजयदुर्ग रस्त्यावर कासार्डेपासून केवळ १५ किलोमीटरवर असलेला हा परिसर धबधब्यांमुळे निसर्गरम्स झाला आहे. सुमारे ३०० मीटर उंचीवरुन हा धबधबा कोसळत असतो.

**पोखरबाव गणेश मंदिर :** झुळूझुळू वाहणारं पाणी आणि जवळच उभं असलेलं स्वयंभू गणेश मंदिर खूप मोठं आहे. मंदिराच्या तळघरात शिवलिंग आहे. या मंदिराची अशी कथा सांगितली जाते की, पुजाऱ्याच्या स्वप्नात आलं की, या देवळाच्या खाली जिथून झरा वाहतोय तिथे पिंड आहे. ती काढून माझी स्थापना करावी. पिंडीचा आकार कासवाप्रमाणे आहे. मंदिराचा परिसर खूप शांत आणि रमणीय आहे.

## कुणकेश्वर

कुणकेश्वरला शंकराचं मंदिर आहे. इथली जत्रा तीन दिवस चालते ती शिवरात्रीपासून अमावस्येपर्यंत. ही जत्रा नुकतीच पार पडली. अमावस्येच्या दिवशी समुद्रात आंघोळ करून भाविक परतीच्या प्रवासाला लागतात. या जत्रेत शिवरात्रीला आजूबाजूचे देव येतात. यंदा आपल्या गावातल्या देवानं जायचं की नाही, याचा निर्णय घेतला जातो. काही जण देव तरंग स्वरूपात आणतात, तर काही पालख्यांच्या स्वरूपात देव आणतात. ही जत्रा प्रचंड मोठी असते. दोन किमीचा परिसर पूर्ण दुकानांनी, गर्दीनं भरलेला असतो. मेरी गो राऊंड, जाएंट व्हील, खेळण्यांची दुकानं अशी भरपूर मजा असते.


कुणकेश्वर देवगडहून १७ किमीवर आहे. हायवेनं गेलो तर देवगडच्या अलिकडे फाटा फुटतो. नाहीतर, देवगडपर्यंत बसनं येऊन तिथून बस सुटतात. जत्रेच्या काळात जांदा बसही सुटतात.



अनु.

# कणकवली

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते कणकवली | | | | | 431 | | | | |
| **1** | शेर्पे नापणे | धबधबा | गुंफा | | | 37 | N | | | |
| **2** | नापणे धबधबा | धबधबा | | | | 34 | N | 4 | SE | |
| **3** | सावडाव धबधबा | धबधबा | | | | 15 | NW | 27.5 | SW | |







अनु.

राजेराजवाडे आणि संस्थाने खालसा झाली आणि राजेमहाराजांचा आवडीचा पिकनिक स्पॉट सर्वसामान्यांसाठी खुला झाला. पूर्वी कोल्हापूरचे मालोजीराजे आणि शाहू महाराज यांच्यासारखी शाही मंडळी शिकारीसाठी या धबधब्याच्या परिसरात येत असत. शिकारी बंद झाल्या तरी राजेशाही स्नानाचा आनंद सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वैभववाडीजवळील शेर्पे नापणे धबधब्यात घेता येतो. फेसाळता बारमाही धबधबा, पावसाळा वगळता उर्वरित महिन्यात दिसणारं इंद्रधनुष्य, बिबळ्या वाघ व जंगली श्वापदांनी गजबजलेलं जंगल, रात्री सर्वत्र पडलेला चांदण्याचा सडा अनुभवायचा असेल तर शेर्पे नापणेच्या धबधब्याला आवर्जुन भेट द्यावी लागेल. अव्वल दर्जाच्या हॉटेलमध्ये

# आयुर्वेदिक जॅकुझी... शेर्पे नापणेच्या धबधब्यात



कितीही चांगल्या सुविधा मिळाल्या तरी निसर्गसौंदर्याने नटलेला हा परिसर आणि धबधब्याखाली बसल्यावर 'जॅक्युझी'चा आनंदा देणारा एकमेव धबधबा असल्याचे सांगण्यात येते. तेथील नादवल्याच्या परिरातून उगम पावणाऱ्या या खळाळत्या जलस्रोताचे शेर्पे नापणे परिसरात धबधब्यात रुपांतर होते. पन्नास फूट उंचीवरुन कोसळणाऱ्या या धबधब्याचे पाच छोटे धबधबे होतात. या धबधब्याचे पाणी अशा पद्धतीने खाली कोसळते की अंगावर पडल्यावर जॅक्युझीचे 'फिलिंग' येते. रक्ताभिसरण एकदम मस्त होते. त्यामुळे अनेक शारिरीक व्याधीवर आराम मिळतो. म्हणूनच त्याला 'आयुर्वेदिक जॅक्युझी' असे संबोधले जाते. धबधब्याच्या एकाबाजूला वज्रेश्वराचे स्थान आणि दुसऱ्या बाजूला गुंफा. या धबधब्याच्या समोरच्या टेकडीवर तंबूनिवासाची सोय होती. आता एम. आर. पॅरेडाईज नावाचं एकमेव हॉटेल आहे. धबधब्याच्या कड्यावर बसून रात्रीच्या निरव शांततेत अंगावर चांदणं घेत बसताना धबधब्याचा आणि जंगलातले वेगवेगळे आवाज पडण्याचा अनुभव घेणं हा एक वेगळा अनुभव आहे. वैभववाडी स्टेशनपासून पायी तीन किमीच्या अंतरावर आडमार्गाचा रस्ता आहे. ज्यांना ट्रेकची आवड आहे त्यांच्यासाठी हा रस्ता ठीक अन्यथा रिक्षा पन्नास रुपयात स्पॉटवर नेते.

मुंबई-गोवा महामार्गावरील खारेपाटण तळेरे दरम्यानच्या वारगावपासून नजीक असलेला नापणे धबधबा असून धबधब्याच्या वरच्या बाजूस नाधवडे तिथे महादेवाचं मंदिर आहे. त्या नजीक दगड कपारीतून पाण्याचा प्रवाह वर येतो. तीच ही नदी पुढे नापणे धबधब्यापर्यंत जाते. धबधब्याच्या खाली मोठा डोह असून तो खूप खोल आहे.

## नवे स्पॉट्स

हा धबधबा फक्त कड्यावरून पहावा लागतो. डोह धोकादायक असल्याने कोणी या डोहात आंघोळीसाठी जात नाहीत. मुख्य धबधबा ६ फूट उंचीचा आहे. धबधब्यापर्यंत डांबरी सडक आहे. गगनबावडा-करुळ घाटातून खाली उतरुन आल्यानंतर वैभववाडीपासून नजीक असलेल्या धबधब्यावर पर्यटकांची बारमाही वर्दळ असते.

तळेरेपासून पुढे गेल्यानंतर कणकवलीच्या १६ कि.मी. अलिकडे सावडावचा धबधबा आहे. महामार्गावरुन हे अंतर ५ कि.मी. आहे. या विस्तीर्ण धबधब्याचे राजा आणि राणी असे दोन भाग आहेत.

# सावडाव धबधबा


कणकवली तालुक्यातला सावडाव हा धबधबा पावसाळ्यात पर्यटकांनी बहरुन जातो. डोंगरपठारावरुन वाहणारा पाण्याचा प्रवाह अचानक पसरट कड्यावरुन खाली कोसळतो. सुमारे ७० फूट रुंदीचा आणि तेवढ्याच उंचीचा हा धबधबा म्हणजे गर्द हिरव्या झाडाझुडपांतला आनंदाचं उधाणच. प्रवाहाच्या बाजूला एक गुहा आहे. शिवाय प्रवाह कोसळतो तिथला तलावासारखा डोह विस्तीर्ण आहे. धबधब्याखाली आंघोळीचा आनंद लुटता येतो. सुरक्षित असा हा धबधबा आहे. कणकवली रेल्वेस्टेशनपासून १५ किलोमीटर्स हायवेवरुन ७ किलोमीटरवर सावडाव हे गाव आहे.




**सावडाव धबधबा :** कणकवलीपासून १० किमी अंतरावर हा निसर्गरम्य असा धबधबा आहे. पण हा धबधबा फक्त पावसाळी आहे. निसर्गरम्य अशा घनदाट जंगलात हा डोळ्यांचं पारणं फेडणारा हा धबधबा पाहून हरखून जायला होतं. पावसाळ्यात जाण्यासारखं एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून हा धबधबा नावारूपाला येतोय. सहकुटुंब येऊन इथे भिजायला खूप मजा येते.

# मालवण

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते मालवण | | | | | 458 | | | | |
| **1** | रामेश्वर आचरा | | | | मंदिर | 19 | N | | | |
| **2** | आंगणेवाडी | | | | मंदिर | 14.5 | NE | 26.5 | SE | |
| **3** | घुमडे | | | नदी | मंदिर | 6 | NE | 9 | SW | |
| **4** | सिंधुदुर्ग किल्ला | | किल्ला | | | 5 | S | 7 | SW | |
| **5** | तारकर्ली | समुद्रकिनारा | पक्षीजीवन | | डॉल्फिन | 7 | S | 9 | S | |
| **6** | कर्लीची खाडी | समुद्रकिनारा | वॉटरस्पोर्ट | | | 18 | S | 22.5 | S | |
| **7** | निवतीचा किल्ला | समुद्रकिनारा | | किल्ला | | 26 | S | 11.5 | S | |
| **8** | वालावल | | | | मंदिर | 30 | SE | 18 | NE | |



# रामेश्वर

आचरा इथे अंदाजे ३०० वर्षांपूर्वीचं शंकराचं जुनं देऊळ आहे. गुढीपाडव्यापासून रामनवमीपर्यंत उत्सव चालतो. इथे जत्रेच्या दरम्यान विष्णूची पालखी निघते. रामजन्मी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्या दिवशी महाप्रसाद असतो. या दरम्यान रोज कीर्तन, वेगवेगळे कार्यक्रम होतात.

आचऱ्याला जायला मालवण, कणकवली, कुडाळहूनही बस मिळतात. कुडाळ किंवा कणकवली रेल्वे स्टेशनही सोयीचं ठरू शकेल.

# आंगणेवाडी

भराडी देवीची यात्रा असलेल्या या जत्रेची तारीख निश्चित नसते. तारीख ठरवण्यासाठी देवीला कौल लावला जातो. गावकरी डुकराच्या शिकारीला जातात. डुकराची शिकार झाल्यावरच जत्रेची तारीख ठरवली जाते. शिकार झाल्याशिवाय ते घरी परतत नाहीत. यंदा ही जत्रा १९ फेब्रुवारी रोजी झाली. ही देवी मुख्यत्वे आंगणे कुटुंबियांची कुलदेवता म्हणून ओळखली जाते. मात्र, नवसाला पावणारी अशी तिची ख्याती पसरू लागली आणि काही शेकडोंपुरतीच मर्यादित असलेली ही यात्रा अल्पावधीतच लाखो भाविकांपर्यंत पोहचली. यात्रेच्या तारिख ठरल्याच्या दिवशी पहाटे चारपासून देवीच्या दर्शनाला सुरुवात होते. पाषाण स्वरूपात असलेल्या देवीला अलंकार, वस्त्रांनी सजवली जाते. सध्या तर दिवसाला दोन लाख भाविक या देवीच्या दर्शनाला येतात.

ही यात्रा मसुरा गावात भरते. कसाल आणि कणकवलीमार्गेही रस्ता आहे. एसटीनं जायचं असेल तर मालवणला जायचं. तिथून आंगणेवाडीला जायला या दिवशी खूप बस सुटतात. ट्रेननं जायचं असेल तर कुडाळ किंवा कणकवली स्टेशनला उतरायचं.

## घुमडे

मालवणला जाताना अलिकडे ५ किलोमीटरवर कुंभारमाठ इथून घुमडे फाटा आहे. येथील घुमडाई देवीच्या परिसरात सुपारी, नारळ, जायफळ आणि इतर मसाल्याच्या अनेक बागा पाहायला मिळतात. घुमडाई मंदिराच्या बाजूनेच जाणारी छोटी नदी, त्या नदीवरचा साकव आपलं भान हरपून टाकतो.




एका
मर्दानी
वास्तूत

महाराजांचं सह्याद्रीच्या पठारावर लढता लढता कोकण किनारपट्टीवरदेखील बारीक लक्ष होतं. सागरी सीमेच्या संरक्षणाच्या दृष्टीने सगळा किनारा स्वराज्याच्या हुकुमतीखाली असावा, ही त्यांची महत्त्वाकांक्षा होतीच. बरीचशी कोकणपट्टी आदिलशाहीच्या ताब्यात होती. मुसलमानांबरोबरच युरोपातल्या व्यापारी मंडळीचीही नियत स्वच्छ नाही, हे महाराज पुरेपूर ओळखून होते. महाराजांनी जरा उसंत मिळताच समर्थ आरमार उभारण्यास सुरुवात केली. आरमाराचे सुकाणू त्यांनी दर्यासारंग, दौलतखान, इब्राहिमखान आणि मायनाक भंडारी अशा कसबी दर्यावर्दीकडे देऊन मराठी नौदलाचा पाया घातला. त्याला आवश्यक म्हणून युद्धसामुग्रीने युक्त असे १३ समुद्रदुर्ग उभारले. असाच एक मातब्बर जलदुर्ग आजदेखील मालवणच्या उसळत्या दर्यात ताठ कण्याने उभा आहे. तो म्हणजे सिंधुदुर्ग!

मालवणच्या किनाऱ्यावरून मैल दीड मैल अंतरावरचं बेट महाराजांनी बघितलं. हे 'कुरटं' बेट बघून आणि मालवणचं भौगोलिक स्थान बघता त्यांनी इथे किल्ला बांधायची आज्ञा दिली. शके १५८६, मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेला म्हणजे १० नोव्हेंबर १६६४ या मुहुर्तावर बांधकाम सुरू झालं. इथला दर्या उसळता असल्याने त्यामुळे वास्तूचा पाया मजबूत हवा. कारागिरांनी पाच खंडी उसळतं शिसं ओतलं. तटबंदीचे दगड देखील मजबूत हवेत, म्हणून ते आंबोली, फोंड्याहून आणले गेले. पन्नासेक एक रात पसरलेल्या या किल्ल्याला तीसेक फूट उंच तर बारा फूट रुंद असे ३२ बुरूज बांधले.

**सिंधुदुर्ग किल्ल्याच्या डागडुगीसाठी आतापर्यंत काही ठोस काम केलेलं दिसत नाही. दहाबारा वर्षांपूर्वीच सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून सरकारने जाहीर केला आहे. दोन वर्षांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा रौप्यमहोत्सवदेखील मोठा गाजावाजा करून साजरा झाला. पण जिल्ह्यातल्या या महत्त्वाच्या वास्तूकडे कुणाचं खास लक्ष नाही, असंच खेदाने म्हणावं लागेल. किल्ल्याची तटबंदी दिवसेंदिवस कोसळत चालली आहे. किल्ल्याच्या सुशोभिकरणाचा जरी ठोस कार्यक्रम कागदोपत्री असला तरी डोळ्यांना मात्र त्यातलं काही दिसत नाही. एवढा देदिप्यमान इतिहास बाळगणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंची एवढी हेळसांड जगात अन्यत्र कुठे होत नसेल. हैद्राबादच्या गोवळकोंडा किल्ल्यात रोज लाइट अ‍ॅण्ड म्युझिक शो अतिशय दर्जेदारपणे चालतो. किल्ल्याभोवती घडलेल्या तेजस्वी घटना त्या कार्यक्रमात मोठ्या अभिमानाने ऐकवल्या जातात. सगळीकडे स्वच्छता आणि उत्तम निगराणी ठेवली जाते. आपल्याकडे हे का होऊ नये? पण सरकारी यंत्रणा आणि राजकारणी आपली पोळी भाजण्यात एकदम मश्गूल आहेत. त्यांच्या निलाजरेपणाचा एवढा कळस झाला आहे की मध्यंतरी त्यांनी अलिबागजवळच्या समुद्रातला आणि आपल्या पराक्रमाने इंग्रजांच्या इभ्रतीची लक्तरं केलेला उंदेरी किल्ला चक्क विकायला परवानगी दिली होती!**

अनेक तंत्रज्ञांच्या देखरेखीखाली तीन हजार कामगार अडीच वर्षं काम करत होते. असं म्हणतात की त्यावेळी या बांधकामाला एक कोटी होन एवढा खर्च आला होता. किल्ला बुलंद झाला आणि भर समुद्रात एवढी भव्य वास्तू उभी राहिली. किल्ल्याचा घेर अदमासे दोन ते अडीच मैल एवढा. तर तटाची उंची साधारण पंचवीस फूट एवढी प्रचंड आहे.

त्यावेळच्या वास्तूतज्ज्ञांनी कमाल केली ती म्हणजे गडाचा मुख्य दरवाजा इतक्या बेमालुमपणे बांधला की त्याचा सहज पत्ता लागू नये. गड चहूबाजूंनी समुद्राने वेढलेला असला तरी आत 'दूधबाव' आणि 'दहिबाव' या गोड्या पाण्याच्या दोन विहिरी आहेत. महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यात ज्या काही मोठ्या घडामोडी झाल्या त्याचा परिणाम इथल्या वास्तूवरही झाला. पण १७६५ मध्ये बॉम्बे मरीनच्या मेजर गार्डन आणि कॅप्टन वॉटसन यांनी हा किल्ला जिंकला आणि त्याचं नाव ठेवले 'फोर्ट ऑगस्टस'. अर्थात नंतर इंग्रजांनी तो कोल्हापूरकरांना परत केला.

मालवणच्या बंदरावरून किल्ल्याला जायला होड्या मिळतात. त्यांना 'पगार' म्हणतात. किल्ल्याच्या आजूबाजूला समुद्रात भरपूर खडक पसरलेले आहेत. या खडकांच्या अडथळ्यांतून हे जाणवते आणि कसबी नावाडी अतिशय कौशल्याने आपल्याला किल्ल्याच्या दरवाजापाशी पोहोचवतात. हा प्रवास थरारक असाच आहे. किल्ल्याच्या समोरचा मालवणचा किनारा रंगीबेरंगी झेंडे असलेल्या मच्छिमारी मचव्यांनी भरलेला दिसतो. एखाद्या कुबेराने मूठ मूठ भरून [illegible] देवबाग, तारकर्लीचा नारळी-पोफळींनी बहरलेला हिरवागार परिसर दिसतो. हा सगळा देवबागपर्यंतचा समुद्र प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ आहे. मुख्य म्हणजे या समुद्रात सजीव मोती आणि प्रवाळ आढळतात.

तटबंदीवरची मतलय अंगावर घेत, विराट सागराचा देखावा बघून मंत्रमुग्ध व्हायला होतं. वरती आकाश आणि चहूबाजूला तितक्याच विशाल समुद्राची निळाई... इथल्या तटबंदीच्या चिऱ्यांतून वाहताना दिसते ती मराठ्यांच्या शौर्याची गाथा. इथल्या स्मृतीत दरवळतो तो गंध त्यांच्या तळमळीचा.. अचाट धडपडीचा.. असीम आणि अमर्याद ताकद असलेल्या दर्यानी वेढलेली ही वास्तू तितकीच सामर्थ्यवान, मर्दानी. महाराजांच्या काळात या वास्तूच्या ३२ बुरूजांवर ३२ निशाणं मराठी ताकदीची ग्वाही देत मोठ्या दिमाखाने फडकत होती, तिथे आज सगळीकडे भग्नावस्था आहे. हे सगळे आठवून परतीच्या वाटेवर असताना मन विषण्ण होतं. मन सांजवेळी बेचैन होतं. त्यापैकी आज काहीही शिल्लक नाही आणि कोणाला त्याचं सोयरंसुतकही नाही. ना आम्हाला ना सरकारी यंत्रणेला. वास्तू मात्र एकाकीपणे उभी आहे, आपलं गतवैभव आठवत.





# चौऱ्याऐंशी बंदरांचा राजा

'चौऱ्याऐंशी बंदरी ऐसा जागा नाही', हे उद्गार खुद्द शिवाजी राजांनी ज्या किल्ल्याविषयी काढले तो म्हणजे सिंधुदुर्ग. मालवणच्या किनाऱ्यावर उभं राहून समोरच्या कुरटे बेटावर अजिंक्य जलदुर्ग उभारण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं आणि मराठी आरमाराला बळ देणारा सिंधुदुर्ग साकारला. फिरंगी या मातीत पाय रोवू शकले याचं कारण त्यांची समुद्रावर सत्ता होती, हे शिवरायांनी ओळखलं होतं. जंजिऱ्याचा सिद्दी, उत्तरेकडचा इंग्रज आणि गोव्याचा पोर्तुगीज यांना आव्हान देणारा बलाढ्य किल्ला उभारून त्यांनी समुद्रावर मराठी आरमाराचं वर्चस्व निर्माण केलं.

गेले चारशे वर्षं हा ओजस्वी इतिहास सांगत सिंधुदुर्ग मालवणच्या समुद्रात उभा आहे. किनाऱ्यावरून किल्ल्यापर्यंत होडीतून जावं लागतं. हे अंतर दीड किलोमीटर आहे. खडकाळ समुद्रातून वाट काढत किल्ल्यापर्यंत जाण्याचं कसब या होडीवाल्यांनी साध्य केलंय. किल्ल्याच्या अगदी जवळ जाईपर्यंत महादरवाजा दिसत नाही. हे शिवकालीन किल्ल्यांचं खास वैशिष्ट्य. तटबंदीत लपवलेल्या प्रवेशद्वारांमुळे शत्रूला चकवणं सोपं व्हायचं. महादरवाजातून आत गेल्यावर उजव्या हाताला हनुमानाचं मंदिर आहे. प्रवेशद्वाराजवळच्या तटबंदीत दोन देवळ्या आहेत. यात शिवाजी राजांच्या हात आणि पायाचे ठसे आहेत. या जलदुर्गाचं बांधकाम चालू असताना महाराज या ठिकाणी आले तेव्हा ओल्या चुन्यात हे ठसे घेतले गेले. त्या ठशांच्या

स्पर्शातूनही एका अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या जवळ गेल्याचा क्षणभर भास होतो.

तिथून बाहेर पडून गेल्यावर पायवाटेने चालत गेल्यावर डाव्या हाताला निसर्गाचा अद्भुत चमत्कार दिसतो. एरवी नारळाच्या झाडाला फांदी फुटणं अशक्य. इथे मात्र दोन शेंडे असलेला माड दिसतो. किल्ल्याच्या मध्यावर छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेलं शिवराजेश्वराचं मंदिर आहे. त्यात वीरासन घालून बसलेली छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती आहे. शिवाजी राजांचं कदाचित हे एकमेव मंदिर असावं. या मंदिराचा जीर्णोद्धार शाहू महाराजांनी १९०७ मध्ये केल्याची नोंद आहे. इथे शिवाजी महाराजांच्या वापरात असलेली तलवार म्यानबंद करून ठेवली आहे. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजेदिवशीच ती बाहेर काढली जाते.



चहुबाजूंनी खाऱ्या पाण्याने वेढलेल्या या किल्ल्यात गोड्या पाण्याच्या विहीरी आहेत. त्यांची नावंही मजेशीर ठेवली आहेत. दूधबाव, दहीबाव आणि साखरबाव. या विहिरींचं पाणी आत्ताही पिण्यासाठी वापरलं जातं. जवळच भगवती देवीचं मंदीर आहे.

सोळा हेक्टर क्षेत्रावर वसलेल्या आणि साडेतीन किलोमीटरचा घेर असलेल्या या किल्ल्याच्या तटबंदीला ४२ बुरूज आहेत. तटाची उंची १२ किमी आहे. तटबंदीला ४५ ठिकाणी दगडी जिने आहेत. ब्रिटिशांच्या तोफगोळ्यांना पुरुन उरलेला हा किल्ला आता मात्र ऊन, वारा, पावसाच्या माऱ्यानं थकून गेलाय. अनेक ठिकाणी तटबंदी ढासळली आहे. समुद्राचं पाणी भरतीच्या वेळी आतपर्यंत उसळ्या घेतं. सिंधुदुर्गाच्या संरक्षणासाठी पद्मगड, राजकोट, सर्जेकोट, भरतगड, भगवंतगड असे किल्ले आजूबाजूच्या समुद्रात उभारले आहेत.

महाद्वारासमोरच्या बेटावर पद्मगडावर वेताळाचं

मंदिर आहे.

किल्ल्यात दक्षिणेच्या बाजूला तटबंदीतून बाहेर पडायला छोटीशी जागा आहे. तिथून बाहेर पडलं की पांढऱ्या मऊशार रेतीची पुळण आहे. तिला राणीची वेळा म्हणतात. महाराणी

**मालवण ते मुंबई अंतर** : ५०५ किमी

**रेल्वे प्रवासासाठी** : कोकण रेल्वेने कुडाळ किंवा कणकवलीपर्यंत जायचं. तिथून बसने मालवण.

**निवास** : तारकर्लीत एमटीडीसीचं निवासस्थात तर मालवणमध्ये अनेक खाजगी हॉटेल्स उपलब्ध

ताराराणी या किल्ल्यावर वास्तव्याला असताना इथे समुद्रस्नानासाठी यायच्या असं सांगतात.

किल्ल्यात पाच-सहा कुटुंबं राहतात. किल्ल्यातल्या मोकळ्या जागेवर ते शेती करतात. पावसाळ्यात बाहेरच्या जगाशी संपर्क तुटतो म्हणून हे लोक घरांना कुलपं लावून मालवणात राहायला जातात.

मराठी आरमाराच्या उभारणीसाठी जलदुर्गांचं महत्त्व ओळखणाऱ्या शिवाजीराजांच्या



अनु.



दूरदर्शीपणाचं कौतुक आणि किल्ल्याच्या सध्याच्या दुरवस्थेचं शल्य अशा मिश्र भावना घेऊन आपण पुन्हा मालवणच्या किनाऱ्याशी येतो.

मालवण हे काजूंचं आगर. इथे भरपूर काजू कारखाने आहेत. काजूची खरेदी होईपर्यंत पोटातली भूक बोलू लागते. मत्स्याहारींसाठी मालवणचा मुक्काम ही पर्वणीच. खास मालवणी मसाल्यात बनवलेल्या ताज्या फडफडीत माशांचे असंख्य प्रकार खिलवणारी अनेक हॉटेलं मालवणात आहेत.

खाणं, फिरणं आटोपल्यावर मुक्कामाला तारकर्ली बीच गाठायचा. मालवणपासून अर्ध्या तासाच्या अंतरावर तारकर्ली आहे. एमटीडीसीची सुंदर निवासस्थानं आपल्याला मोहात पाडल्याशिवाय राहत नाहीत. इथे हवं असल्यास तंबूतही राहता येतं. दाट सुरूच्या बनात शीळ घालणारा भन्नाट वारा शीण घालवतो. समुद्रावर सोनेरी रंगाची उधळण करत अस्ताला जाणारा सूर्य आणि लांबलचक किनाऱ्याशी गूजगोष्टी करणाऱ्या लाटा आपल्याला खिळवून ठेवतात. रात्र पाण्यावर उतरते. लाटांचं धीरगंभीर संगीत ऐकताना झोप पापण्यांवर कधी उतरते कळतही नाही.



# तारकर्ली

वीकएन्ड

आपल्याला सहजपणे एखाद्या समुद्रकिनाऱ्याचं चित्र काढावासं वाटलं, तर खूप कौशल्य अंगी नसतानाही आपल्या हातून त्या रंगांच्या कुंचल्यातून कसा देखावा साकारेल? नारळी-पोफळीची झाडं, सोनेरी लकाकी ल्यालेला किनारा, सूर्यकिरणांची तिरीप, निळाशार समुद्र, त्यात एक नौका आणि तिचं प्रतिबिंब...हे अस्संच चित्रं पाहण्यासाठी आपल्याला वारंवार कोकणातले समुद्रकिनारे खुणावतात. कित्येकदा आपण चित्र काढताना कधी रंग कमी आहेत, म्हणून तर कधी आपली अदाकारी कमी पडते म्हणून, आपल्या मनांत ठसलेलं चित्र कागदावर उतरत नाही...हे मनांत साठवलेलं चित्रं आपल्याला तारकर्लीला पहायला मिळतं. त्यासाठीच इथवर जायचं.

तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं तारकर्ली वीकेन्ड ट्रीपकरता तसं लांब. पण आता कोकण रेल्वेमुळे ते जवळ आलंय. शिवाय, एखादा दिवस एक्स्ट्रा काढू शकलो किंवा नाताळच्या सुट्टीचा फायदा उठवू शकलो, तर इथवर जाणं लांब वाटत नाही.

अलीकडे तारकर्ली हे टुरिझमचा नवा स्पॉट म्हणून पुढे येत आहे. महाराष्ट्र सरकारकडूनही या स्पॉटचं मार्केटिंग आता केलं जाऊ लागलं आहे. अलिकडच्या काळात तिथे इंटरनॅशनल क्रूझ लायनर्सही येऊन गेल्या, अशी माहिती पर्यटनमंत्र्यांनी अलिकडेच एका कार्यक्रमातही दिली होती. त्यामुळे आता हा भाग गजबजू लागला आहे. थंडीचा मौसम आता सुरू झाला आहे.

**स्वच्छ-सुंदर बीच आणि खास तळकोकणाचा माहौल हे तारकर्लीचं वैशिष्ट्य. तारकर्लीला जवळपास आठ-नऊ किलोमीटरचा विस्तीर्ण किनारा लाभला आहे. जवळच असलेलं देवबाग हे अगदी टिपिकल मच्छिमारी गाव. अगदी वीस-वीस फुटांपर्यंत समुद्राचा तळ आपल्याला पाहता येऊ शकतो.**

स्वच्छ-सुंदर बीच आणि खास तळकोकणाचा माहौल हे तारकर्लीचं वैशिष्ट्य. कर्ली नदी आणि देवबागचा समुद्र यांच्यातील त्रिभज प्रदेश हे तारकर्लीचं आणखी एक वैशिष्ट्य ठरलं आहे, गोव्यामध्ये अनेक ठिकाणी नद्या आणि समुद्राच्या संगमावर बीच असल्याने तिथे समुद्रपर्यटनाला भरपूर वाव मिळाला आहे. इथेही आता तोच प्रयत्न सुरू आहे. तारकर्लीला जवळपास आठ-नऊ किलोमीटरचा विस्तीर्ण किनारा लाभला आहे. जवळच असलेलं देवबाग हे अगदी टिपिकल मच्छिमारी गाव. अगदी वीस-वीस फुटांपर्यंत समुद्राचा तळ आपल्याला पाहता येऊ शकतो, हे इकडचं वैशिष्ट्यं. कुडाळ आणि तारकर्ली यांच्या खाडीतला प्रवास ही एक रमणीय सफर ठरते. तारकर्लीपासून साधारण वीसेक किलोमीटरवर काळसे-धामापूर तलाव आहे. इथेही ग्रामस्थांच्या पुढाकाराने बोटिंग आणि इतर पर्यटन सुविधा तयार

करण्याचा प्रयत्न झाला आहे.

तारकर्लीची विश्रांती हाच इथला मनमुराद आनंद. तरीही आपल्याला अधिक वेळ असेल, तर सिंधुदुर्ग किल्ल्याची भटकंती सहज शक्य असते.

हा मालवणचाच भाग असल्याने तिथल्या सीफूड डेलिकसीजची लज्जत आहेच. शाकाहारींसाठी सोलकढीची मज्जा आहे.

इथे पोहोचण्यासाठी कुडाळहून थेट रिक्षानेही जाता येतं. कुडाळपर्यंत शुक्रवारी रात्री कोकणकन्या एक्सप्रेसने कोकण रेल्वेच्या मार्गाने पोहोचायला हरकत नाही. याच गाडीने कणकवलीला उतरूनही पुढे जाता येतं. सकाळी जनशताब्दीने गेल्यास कणकवलीला उतरायला लागेल. गाडीने गेल्यास मुंबई-गोवा महामार्गावर कणकवलीच्या पुढे कसाल गावाजवळ इथला फाटा फुटतो. मालवण किनाऱ्यापासून तारकर्ली अवघे सात-आठ किलोमीटरवर आहे. मुंबई सेन्ट्रल, ठाणे, बोरिवली, महाड, चिपळूण, इथून मालवणला एसटीबसनेही जाता येतं. गोव्याच्या बसगाड्यांनीही इथे पोहोचता येतं.

एमटीडीसीने विकसित केलेल्या पर्यटनस्थळांची लोकेशन्स अफाट सुंदर असतात. तारकर्लीचं तसंच आहे. इथे आता खाजगी रिसॉर्ट, हॉटेल्सही आली असली, तरी एमटीडीसीचा पर्याय सुंदर आहे. हे अगदी समुद्राच्या जवळ आहे आणि समुद्राची गाज ऐकत इथे आपल्या मनातील तरंगाला साद घालण्याचा आनंद अवर्णनीय असतो. दूरध्वनी : - ०२३६५-२५२३९०, इतर संपर्क : अपूर्व रिसॉर्ट : ०२३६५-२५३९२०, रमेश मिठबावकर : ०२३६५-२५२९४१.



अनु.

# कर्लीची खाडी

***कोकणातलं*** तारकर्ली हे ठिकाण स्नॉर्केलिंगसाठी प्रसिद्ध आहे. यासाठी पर्यटकांची तिथे गर्दी होत असतेच. याशिवाय आजुबाजूच्या अनेक सुंदर बीचेसवर वॉटरस्पोर्ट्सची व्यवस्था उपलब्ध झाली आहे. एका बाजूला देवबाग हे बेट तर दुसरीकडे भोगवे हे जवळपास २ हजार लोकसंख्येचं गाव. इथे कर्लीच्या खाडीत वॉटरस्पोर्ट्स सुरू झाले आहेत. या ठिकाणी १० कयाक, ३ वॉटरस्कूटर्स असून १०० फूट लांबीची एक फ्लोटिंग जेटी उभारण्यात येते. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यातच इथे वॉटरस्पोर्ट्सना सुरुवात झाली. वॉटरस्पोर्ट्ससाठी इथे पर्यटकांची गर्दी हळुहळू व्हायला लागली. लाइफजॅकेट्स वगैरे देऊन पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली जाते.

**कसं जाल?**

कुडाळहून सुमारे २५ किलोमीटर्सवर भोगवे हे गाव आहे. किंवा रस्तेमार्गे जायचं असेल तर मालवणहून तारकर्लीमार्गे इथे पोहोचता येतं.

**संपर्क :** ०२३६६२६९५६७



# सिंधुदुर्गाचा मुकुटमणी



अनु.

तारकर्ली नदी आणि देवबागचा समुद्र जिथे एकत्र येतो तो परिसर म्हणजे तारकर्ली! मुंबईपासून ५४६ आणि मालवणमधून अवघ्या सात किलोमीटरच्या अंतरावर वसलेला तारकर्लीचा समुद्रकिनारा म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा मुकुटमणीच! ज्यांना समुद्राच्या निळ्याशार (कोकणात ते बऱ्याचदा हिरवंगार दिसतं) पाण्याचं, लाटांच्या गाजेचं, नारळीफोफळीने नटलेल्या बागांचं आणि चविष्ट जेवणाचं आकर्षण असेल, त्यांनी एकदा तरी या परिसराला भेट द्यायलाच हवी.

तारकर्ली, देवबाग, भोगवे या समुद्रकिनाऱ्यांना लागून असलेला डोंगरावरचा निवतीचा किल्ला हे या परिसराचे वैशिष्ट्य. नारळी फोफळीच्या बागांतून वाट काढत चिंचोळ्या मार्गावरून गाडी देवबागच्या किनाऱ्यावर येते तेव्हा सर्वप्रथम नजरेत भरतो तो तिथला विस्तृत आणि पारदर्शी समुद्रकिनारा! तारकर्लीला तर केरळच्या धर्तीवर हाऊसबोटही बांधण्यात आली आहे. या हाऊसबोटीतून तारकर्ली, देवबाग, भोगवे आणि निवतीच्या किल्ल्याचा परिसर समुद्राच्या लाटांवर डोलत धुंडाळता येतो. बोटींमधून फिरण्याची सोय आहेच.



सकाळच्या वेळेस देवबागला डॉल्फीनही पाहता येतात. त्सुनामीची लाट आल्यानंतर डॉल्फीन या परिसरात आल्याचे स्थानिक कोळीबांधव सांगतात. सर्वाधिक लक्षात राहतात ते समुद्रपक्षी! मधल्या बेटासारख्या जमिनीवर हे पक्षी थव्याथव्याने बसलेले दिसतात. बोट थांबवून या बेटावर उतरलात तर हे पक्षी जवळूनही पाहता येतील. डोंगरावर वसलेल्या निवतीच्या किल्ल्यावरून सिंधुदुर्गचा संपूर्ण परिसर धुंडाळता येतो. परंतु, देखभालीअभावी आणि काहीशा याच्या नैसर्गिक बांधणीमुळे हा किल्ला ढासळत चालला आहे. वेंगुर्ल्यावरून २२ किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या भोगवे गावात देखील राहण्याची सोय आहे. नेरूतले कार्लेश्वर मंदिर, परूळ्याचे आदिनारायण मंदिर आणि दापोलीचा मठ ही येथील काही प्रेक्षणीय स्थळे!

तारकर्लीला एमटीडीसीतर्फे समुद्रकिनाऱ्याला लागूनच राहण्याची सोय करण्यात आली आहे. शिवाय काही घरांतूनही राहण्याची उत्तम सोय होते. जेवणासाठी येथल्या घरगुती खाणावळीचा दरवाजा कधीही ठोठवा. ताज्या माश्यांच्या कालवणाने आणि लुसलुशीत पोळ्यांनी भरलेले ताट तुमच्या पुढ्यात हजर होईल. तेही अत्यंत वाजवी दरात. जेवणाची ऑर्डर देऊन समुद्रात डुंबायला जायचं. समुद्राच्या लाटांशी मस्ती केल्यानंतर पोटात भुकेचा जो खड्डा पडतो त्याच्यावर केवळ हे गरम, चवदार जेवणच उतारा ठरू शकतं.

समुद्रकिनारे सिंधुदुर्गाची शान समजली जाते. मालवणची सर्वच गावे, समुद्रकिनारे अत्यंत साधे पण स्वच्छ आहेत. असाच एक किनारा म्हणजे चिवल्याचा! गावातील अनेक घरांमध्ये राहण्याची, जेवणाची सोय आहे. शिवाय येथे काही छोटीछोटी हॉटेल्सही आहेत. चिवल्याच्या किनाऱ्याला लागून असलेले बॅ. नाथ पै सेवांगण येथेही राहण्याची सोय होते. येथील घरगुती खानावळीत नारळाच्या गोड दुधाचा आणि गरमगरम आंबोळ्यांचा नाश्ता तर नॉनव्हेज जेवणावरही कडी असते.

मालवणमध्ये फिरण्यासाठी खास प्लॅन वगैरे आखावा लागत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा नकाशा समोर ठेवला की डोळे झाकून कुठल्याही समुद्रकिनाऱ्यावर बोट ठेवा. त्याचं आरसपानी सौंदर्य न्याहाळण्यासाठी मात्र डोळे उघडेच हवेत.


# वालावल

वालावलला लक्ष्मी-नारायणाचं मंदिर आहे. इथला देव म्हणजे विठोबाचं स्वरूप मानतात. वालावलला प्रतिपंढरपूर म्हंटलं जातं. पाडव्यापासून सुरु झालेली ही यात्रा अगदी द्वादशीपर्यंत सुरू असते. रोज कीर्तन, दशावतारी नाटक, बाकी कार्यक्रम अशी रेलचेल असते. रामनवमीला रामजन्माचा मोठा उत्सव असतो. एकादशीला देवाच्या समोर देवळाबाहेर मोठा आरसा ठेवला जातो. त्यात सूर्याचे किरण पडतात. हे किरण देवावर परावर्तित होतात. अशा प्रकारे देवाला किरणांचा अभिषेक केला जातो. द्वादशीला महाप्रसाद असतो. जत्रा इतके दिवस असली तरी दुकानं, गर्दी इतके दिवस असतेच असं नाही. तळ्याकाठचं हे मंदिर सुंदर आहे.

वालावल कुडाळपासून ६ किमीवर आहे. त्यामुळे मुंबईहून कुडाळला जाणं सोयीचं ठरेल.

# सावंतवाडी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते सावंतवाडी | | | | | 485 | | | | |
| **1** | आंबोली घाट | धबधबा | हिलस्टेशन | किल्ला | मंदिर | 27 | NE | | | |
| **2** | चौकुळ | धबधबा | | | मंदिर | 40 | E | 13 | SE | |
| **3** | सासोली धबधबा | धबधबा | | | | 29.5 | SE | 58 | SW | |
| **4** | मांगेली धबधबा | धबधबा | | | | 60 | SE | 31 | SE | |




## निसर्गरम्य अंबोली घाट



अनु.



# अंबोलीचा हिरवा निसर्ग



▲ इथे जागोजागी असे धबधबे पाहायला मिळतात

आपण काश्मिरचा उल्लेख 'भूतलावरच स्वर्ग' असा करतो. या स्वर्गाशी तुलना करण्याइतपत एकाहून एक सरस निसर्गरम्य स्थळं महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळतात. कोकण आणि गोवा यांच्या सीमारेषेवर वसलेलं छोटसं, टुमदार, सह्याद्री पर्वतरांगांनी वेढलेलं आंबोली हे असंच एक गाव आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामधल्या अंबोली गावामध्ये पर्यटकांसाठी उत्तम दर्जाच्या सोयीसुविधाही आहेत. असं असलं तरी अंबोली आजही अस्पर्शी आहे.

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा...' महाराष्ट्राविषयी असे गौरवोद्‌गार काढले जातात. महाराष्ट्राच्या कणाकणांत सौंदर्य भरून राहिलं आहे. हिमालयाच्या पांढऱ्याशुभ्र रांगांइतकीच सह्याद्रीच्या हिरव्यागार पर्वतरांगा देखण्या आहेत. शिवाजीमहाराजांनी तर सह्याद्रीला आपला सखा मानलं होतं. स्वराज्याच्या स्थापनेत तोही त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा होता.

लांबवर पसरलेल्या सह्याद्रीच्या हिरव्या तपकिरी पर्वतरांगा पाहताना मन हरवून जातं. या सह्याद्रीच्या कुशीत अनेक निसर्गरम्य पर्यटनस्थानं आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'अंबोली'.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातलं अंबोली समुद्रसपाटीपासून ६९० मीटर उंचीवर आहे. घनदाट झाडांनी आणि पर्वतरांगांनी वेढलेलं. सह्याद्री पर्वतांच्या दक्षिणेला अतिशय उंचावर हे ठिकाण आहे. ब्रिटिश अधिकारी कर्नल वेस्ट्रोप याने अंबोलीला हिलस्टेशनचा दर्जा मिळवून दिला. तेव्हाच दळणवळणासाठी पक्के रस्ते बांधले गेले. हा रस्ता घाटातून जातो. कोकणमार्गे वेंगुर्ले, बेल्गमला जाताना अंबोली लागतं. कोकणातून गोव्याला रस्त्याने जाताना काहीजण अंबोलीला एक दिवस मुक्काम करून पुढे जातात.

मुंबईपासून ५४९ कि.मी., पुण्याहून ३९० कि.मी., कोल्हापूर ११० कि.मी. आणि सावंतवाडीपासून २८ कि.मी. अंतरावर अंबोली गाव आहे. इथे बस, रेल्वे तसंच विमानमार्गे जाता येतं. बसमार्गे किंवा स्वतःचं वाहन असल्यास थेट अंबोलीला जाता येतं. रेल्वेने जाणार असल्यास सावंतवाडीला उतरावं लागतं. सावंतवाडीहून २८ कि.मी.वर अंबोली आहे. विमानाने जायचं झाल्यास बेल्गम विमानतळावर उतरून अंदाजे दोन तासांत अंबोलीला पोहोचता येतं. बेल्गमहून अंबोली ६४



अनु.

कि.मी. अंतरावर आहे.

अंबोली गाव अगदी छोटं असलं तरी तिथे बघण्यासाठी बरीच निसर्गरम्य ठिकाणं आहेत. हिवाळ्यात अंबोलीचं सौंदर्य विशेष खुलतं. अत्यंत दाट धुक्यात लांबवर पसरलेली डोंगररांग आणि आसपासचा परिसर लपला जातो. रस्ता संपून दरी कुठे सुरू होते हेच कळत नाही. म्हणूनच अंबोलीच्या सौंदर्याचं वर्णन 'किलर ब्युटी' असं केलं जातं. इथे अगदी मुसळधार पाऊस पडतो. वर्षाला सुमारे ७५० सेमी (२६९ इंच)!

हिवाळ्यात हा परिसर दाट धुक्याने वेढला जातो. तर पावसाळ्यात ढग आपल्या हाताशी येतात. पाऊस संपून हिवाळ्याला सुरुवात होताना अंबोलीचं सौंदर्य अवर्णनीय असतं. हिरव्यागार मखमलीवरून वाहणारे शुभ्र पाण्याचे असंख्य लहान-मोठे धबधबे पाहताना त्यावरून नजर हलत नाही.

अशा वातावरणात निसर्गाचा आस्वाद लुटत लांबवर चालत गेलो तरी अजिबात कंटाळा किंवा थकवा येत नाही. अंबोलीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते महाराष्ट्रातल्या अशा मोजक्या हिलस्टेशनमध्ये समाविष्ट होतं जिथून समुद्राचं दर्शन घडतं. लांबवर पसरलेला हिरवा, निळ्या रंगाचा समुद्र अतिशय सुंदर दिसतो.

अंबोलीला जाण्यासाठी जुलै ते फेब्रुवारी हा अतिशय चांगला सीझन मानला जातो. जुलै ते ऑक्टोबर हा काळ पावसाळा आणि धबधब्यांचा आनंद लुटण्यासाठी उत्तम आहे. तर नोव्हेंबर ते फेब्रुवारीमध्ये पावसाळ्यानंतर हिरव्यागार झालेल्या सृष्टीचं सौंदर्य डोळे दिपवून टाकतं. अंबोली अस्पर्शी असलं तरी पर्यटकांसाठी इथे उत्तम सोयी आहेत. चांगल्या दर्जाची हॉटेल्स, रिसॉर्ट्स तर आहेतच पण एमटीडीसीचं हॉटेलही इथे आहे. वीकएण्डबरोबरीने भरपूर मुक्कामाच्या सहलीसाठी हे ठिकाण अतिशय उत्तम आहे.



किितीही लांबवर चालत गेलं तरी थकवा काही येत नाही



दगडावरचा कार्वीच्या फुलांचा सडा



अनु.

# अंबोलीमधली प्रेक्षणीय स्थळं

### सनसेट पॉइण्ट:

संध्याकाळी सोनेरी किरणं गोळा करत अस्ताला जाणारा सूर्य पाहणं एक अविस्मरणीय अनुभव असतो. केशरी रंगाचा सूर्य आसमंतात लाल, गुलाबी, केशरी, निळा अशा अनेक रंगांची उधळण करतो. हे सगळे रंग लांबवर पसरलेल्या अरबी समुद्रामध्ये परावर्तित होतात.

### माधवगड किल्ला:

पुण्यातल्या शनिवारवाड्याच्या चौपट हा लाल दगडांपासून बनवलेला किल्ला आहे. ब्रिटिशांविरोधात लढण्यासाठी याचा उपयोग करण्यात आला.




### नागरतास धबधबा:

अंबोलीपासून अवघ्या ९ कि.मी. अंतरावर हा धबधबा आहे. पुण्याचे आणि बेल्गमचे बहुसंख्य पर्यटक पावसाळ्यात वीकएण्डला इथे येतात.

### हिरण्यकेशी:

या परिसरात हिरण्यकेशी नदीचं उगमस्थान आहे. त्यामुळे महाशिवरात्रीला मोठ्या संख्येने भाविक इथे येतात. अंबोलीपासून साडेपाच कि.मी.वर हा परिसर आहे. छोटे गळ तयार करून मासे पकडणं, हा इथे येणाऱ्या पर्यटकांचा आवडता छंद आहे. इथे डोंगरामधल्या छोट्या गुहेसारख्या भागात अतिप्राचीन स्वयंभू मंदिर आहे.

याखेरीज इथलं 'बोटॅनिकल गार्डन' पाहण्यासारखं आहे. सात वर्षांतून एकदा फुलणारी 'कार्वी'ची फुलं इथे पाहायला मिळतात.

# ही वाट दूर जाते...

आकाशाला भिडणारे सह्याद्रीचे कडे, घनदाट झाडीने व्यापलेल्या, दूरवर पसरलेल्या गूढरम्य हिरव्या-निळ्या डोंगररांगा, हिरव्यागार झाडीतून जाणाऱ्या विटकरी लाल पाऊलवाटा, अथांग धुक्याने पुरेपूर लपेटलेला परिसर, तिथला सुखद गारवा, एका अनामिक ऊर्मीने सरळ रेषेत कोसळणार धबधबा, तिथल्या डोंगरकड्यांवरून पार अरबी समुद्रापर्यंत दिसणारा कोकणचा विस्तीर्ण हिरवागार सळसळता मुलुख... हे स्वप्नवत वाटणारं दृश्य प्रत्यक्षात दिसतं आणि डोळ्यांचं पारणं फिटतं ते 'आंबोली'त.

आंबोली म्हणजे तळकोकणाचं महाबळेश्वर. अडीचेक हजार फुटांच्या उंचीवरचं दुमदार आणि हिरवंगार हिलस्टेशन. आंबोलीच्या घाटातून पहिली मोटार आणली ती सावंतवाडीच्या राजेसाहेबांनी. मग आंबोली घाट दळणवळणाचा रस्ता म्हणून लोकांना माहीत झाला. त्यांनी तिथे सर्वप्रथम बंगलाही बांधला. बेळगाव-चंदनगडकडच्या घाटावरच्या लोकांना वेंगुर्ले-सावंतवाडीला यायचा मार्ग म्हणजे हा घाट. निपाणी-कोल्हापूरकरांना 'फोंडा घाट', मुरगुड-गारगोटी इथल्या रहिवाशांसाठी 'रांगणा घाट' आणि पाटगावकरांसाठी 'घोटघे घाट'. सह्याद्रीला पालाण घालणारे हे तळकोकणातले पुरातन घाट. पण राजाचा मान मात्र 'आंबोली घाटा'ला. एकतर तो सर्वांपेक्षा उत्तुंग आणि त्याचं संधान थेट सावंतवाडीच्या राजघराण्याशी! सावंतवाडीकर खेमसावंत राजघराण्याने या घाटाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

आंबोलीने गोऱ्या साहेबालाही वेड लावलं. त्याला घाटमाथ्यावरचं थंडगार आणि बारमाही हिरवंकंच असणारं 'आंबोली' वरदानच वाटलं. या मुलखात सायबाने निवांतपणे पथारी टाकावी अशी थंडगार जागा दुसरी कोणतीच नव्हती. साहेब बेळगावहून सावंतवाडीला जायला निघाला आणि त्याचे पाय 'आंबोली'पाशीच अडखळले.


इथून दिसणारं तळकोकणाचं विहंगम दृश्य, पावसाळ्यात इंग्लंडसारखी हवा, धुकं आणि चेरापुंजीसारखा धुवाधार पाऊस! तरीही हवेतला गोड गारवा कायम. एवढ्या पावसात खरंतर हाडं फोडणारी थंडी हवी. पण 'आंबोली'चं वैशिष्ट्य म्हणजे भर डिसेंबर-जानेवारीतही चावरी थंडी तिथे नसते. थंडीत उबदारपणा आणि उन्हाळ्यात गारवा दोन्हीही! साहेबाला इथल्या निसर्गाची अद्भुतता जाणवली आणि त्याने इथे डाकबंगला बांधला.

इथल्या गाववाल्यांना 'इथे पाहण्यासारखं काय आहे,' असं विचारलं तर तो झटकन सांगेल, 'हिरण्यकेशी'! तीन-साडेतीन कि.मी.वर हिरण्यकेशी नदीचं उगमस्थान आहे. तिथलं शंकराचं पुरातन देऊळ पंचक्रोशीचं श्रद्धास्थान आहे. इथलं निसर्गसौंदर्य कोणालाही मोहात पाडेल असं आहे. या नदीला कोणा संवेदनशील पुराणपुरुषाने किती समर्पक नाव दिलं आहे... हिरण्यकेशी! म्हणजे सोन्यासारखे चमकणारे लांबलचक केस असणारी.., संध्याकाळच्या सोनेरी उन्हात शंभर-दीडशे फूट सरळ रेषेत कोसळणाऱ्या धबधब्याकडे पाहिलं तर त्याला हे सुरेख नाव कसं सुचलं असेल याची प्रचिती येते. तिचा तो चैतन्यशील तेजस्वी खळाळता प्रवास आपल्याला प्रकाशमान करतो. हा अनुभव शब्दांपलिकडचाच असतो.

आंबोलीत फारसे पॉइण्टस नाहीत. पण जे आहेत ते भन्नाट आहेत. पश्चिम कडेवरचा 'महादेव पॉइण्ट' हा सर्वात विलक्षण. तिथून खाली दूरवर पसरलेल्या तळकोकणाची शोभा खूपच न्यारी... क्षितीजरेषेपर्यंत पसरलेला अथांग मालवण-वेंगुर्ल्याचा हिरवाकंच मुलुख कितीही वेळ पाहत बसलं तरी मनाची तृप्ती होत नाही.

पावसाळ्यात दुधासारख्या शुभ्र धुक्यात आंबोली गुरफटलेली असते. तिथल्या बारीक पानांच्या झाडांच्या शेंड्यांवर ताशे वाजवत पाऊस धिंगाणा घालत असतो. डोंगररांगांवर मेघांचं साम्राज्य असतं. ढगांनी लपेटलेल्या इथल्या लाल मातीच्या रस्त्यांवर मनमुराद फिरून परत बाजारपेठेत आल्यावर हॉटेलातली तिखट कांदाभजी आणि लाल चहा पिणं म्हणजे स्वर्गसुखच!


आंबोली म्हणजे मनाला सुखावणारे निसर्गाचे नाना विभ्रम. प्रत्येक ऋतूतल्या वेगवेगळ्या रसरशीत रूपांचे. लाल माती, हिरवी झाडी आणि निळभोरं आकाश यांचा उत्कट अनुभव. आंबोलीला यायला सात-आठ तासांचा प्रवास करावा लागला तरी इथे पाऊल पडल्यावर तो शीण क्षणार्धात नाहीसा होतो. साधी आणि सुंदर आंबोली नक्कीच आपल्या स्वप्नातली आहे. एकदा जो कोणी इथे आला तो कायम तिथे जात राहिल, हे नक्की!



## चौकुळ

पावसाळा सुरु झाला की हजारो पर्यटक कोकणात आंबोलीला धाव घेतात. परंतु बेधुंद पर्यटक, गडबड-गोंधळ यामुळे इथलं कौटुंबिक पर्यटन कमी होत चाललं आहे. आंबोलीला जाणाऱ्या पर्यटकांसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. आंबोलीहून ११ किलोमीटर्सवर असलेलं चौकूळ हे गाव पर्यटनाचं केंद्र म्हणून विकसित होतंय. सह्याद्रीतल्या या निसर्गरम्य गावात राहून पावसाची विविध रुपं अनुभवता येतील. धबधबे आणि स्वच्छ-नितळ ओढे इथे बघायला मिळतील. कोळसुंड्याची पाजा, खडक वहाळ असे एकाहून एक सुंदर धबधबे या भागात आहेत. बोर धनगरवाडी/खडकवहाळ असे अनेक पॉइंटस या गावाचं आकर्षण ठरतात. याच गावात १६व्या शतकातलं भावई मंदिर आहे. आंबोली आणि चौकूळ इथल्या शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन हा पूर्ण परिसर पर्यटनासाठी विकसित करायचं ठरवलं आहे. त्यानुसार इथल्या शेतकऱ्यांच्या घरात पर्यटकांची निवासव्यवस्था होऊ शकते.

# धुक्यातले धबधबे





फोटो : राम नारकर

आंबोली हे थंड हवेचं ठिकाण. दर वर्षी पर्यटकांची झुंबड असणाऱ्या आंबोली घाटातल्या मुख्य धबधब्यासह लहान-मोठ्या अन्य धबधब्यांखाली पर्यटक यथेच्छ डुंबत असतात. गेल्या पर्यटकांना आता या धबधब्याकडे जाता येत नाही. दोडामार्गनजीक असलेला भेडशीनजीक असलेल्या मांगेली धबधब्याकडे सध्या पर्यटकांची पावलं वळत आहेत. मांगेली फणसवाडीतले धबधबे आता जोमाने वाहू लागले आहेत. कर्नाटक सरहद्दीनजीक असलेल्या या धबधब्यांची मोठी रांग उंचच उंच कड्यावरून कोसळताना पाहून भान हरपून जातं. सावंतवाडी तालुक्यातल्या सासोली इथेही धबधबा आहे. भुईबावडा-करुळ या घाटामध्येही आता अपारंपारिक धबधबे तयार झाले असून घाटाच्या उंच कड्यावरून कोसळणारे विलोभनीय धबधबे पर्यटकांना मोहित करीत आहेत.

# वेंगुर्ला

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते वेंगुर्ला | | | | | 486 | | | | |
| **1** | वेंगुर्ला बीच | समुद्रकिनारा | दीपगृह | | मंदिर | 4.5 | SW | | | |
| **2** | ग्रामरक्षक वेतोबा | | | | मंदिर | 14 | SE | 12 | SE | |
| **3** | किरणपाणी बेट | समुद्रकिनारा | बेट | | निसर्ग | 24 | SE | 10.5 | SE | |



## वीकएन्ड

पांढरीशुभ्र वाळू आणि निळाशार अथांग सागर...या समुद्रातून पांढऱ्याशुभ्र वाळूच्या भेटीला येणाऱ्या फेसाळणाऱ्या लाटा....सभोवती समुद्रात पाय रोवून उभे असलेले कणखर पाषाण आणि पुन्हा पुढे मैलोन् मैल दूर आपली नजर पोहोचते, तिथपर्यंत पसरलेला निळा रंग...हे चित्रच डोळ्यांना इतकं सुखावणारं असतं, की निसर्गातल्या या चमत्काराने आपण हरखून जातो. तळकोकणातलं वेंगुर्ला हे अजूनही आपल्याला असं हरखून टाकतं. रत्नागिरी, चिपळूण, गणपतीपुळ्यापासून अगदी सावंतवाडी, तेरेखोलपर्यंत तळकोकणात अनेक ठिकाणी आता गर्दी वाढू लागली आहे. पण वेंगुर्ला अजूनही शांत रमणीय स्थळ म्हणून आपल्याला कोणत्याही वेळी आकर्षित करू शकतं.

केवळ वेंगुर्ल्यासाठी वीकएन्डची ट्रिप करताना आपण जरा विचार करू. तळकोकणापर्यंत जायचं, तर त्याबरोबर इतरही ठिकाणं केली, तरच मजा आहे, असंही आपल्याला वाटून जातं. त्यामुळेच अनेकदा वेंगुर्ला हे केवळ अधेमधे उरकलं जातं. पण वेंगुर्ल्यात पूर्ण वीकएन्ड विसावा घ्यायलाही काही हरकत नाही. गेले काही दिवस तरी हा स्पॉट सुचविताना एक अडचण होती आणि ती म्हणजे रेल्वेने गेलं, तरी बारा तासांचा प्रवास करून तिथवर जावं का? आता ही समस्या बरीचशी मिटली आहे.

अजूनही कोकण रेल्वेच्या कोकणकन्या एक्सप्रेसने रात्री निघून दुसऱ्या दिवशी सकाळी सावंतवाडीमार्गे वेंगुर्ल्यात पोहोचण्याचा पर्याय तुम्हाला आहेच. पण त्याहीपेक्षा एक कमी वेळातल्या प्रवासाचा मार्ग म्हणजे सकाळची जनशताब्दी एक्सप्रेस ही गोव्यापर्यंत जाणारी जलदगती गाडी. दोन महिन्यांपूर्वी अपघातामुळे बंद ठेवण्यात आलेली ही गाडी आता पुन्हा सुरू करण्यात आली आहे, अशी खूषखबर आहे. त्यामुळे तुम्हाला दिवाळीच्या सुट्टीत किंवा डिसेंबरापर्यंत या सफरीचं प्लॅनिंग करता येईल.

रेल्वेने गेल्यास सावंतवाडीला उतरून पुढे बस किंवा रिक्षा, गाडीने वेंगुर्ल्यापर्यंत जायचं. जनशताब्दीने गेल्यास

कणकवलीला उतरून पुढचा मार्ग गाठता येतो. या गाडीने आल्यास दुपारच्या आत आपण वेंगुर्ल्यात

## वेंगुर्ला

पोहोचतो आणि दुसऱ्या दिवशी रात्री कोकणकन्याने निघून सोमवारी पहाटेच मुंबईत आपण परतू शकतो. या सर्व प्लॅनिंगसाठी खासकरून कोकणकन्या एक्सप्रेसची तिकिटं वेळेत बुक करणं आवश्यक असतं. वेंगुर्ल्यापर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या थेट बसगाड्याही असतात.

वेंगुर्ल्यात एसटी स्थानकापासून अवघ्या दोन-तीन किलोमीटरवर असलेला सागरेश्वर किनारा हे तिथलं खरं वैभव. त्याचबरोबर तिथलं शिवमंदिर आणि त्यापुढचं शिवार, त्यापुढची दीपमाळ हे अगदी शाळेतल्या चित्रातलं दृश्यं समोर दिसावं तसं वाटतं.

बोटीतून जाताना समुद्रात दूरवर दिसणारा दीपस्तंभ आपल्याला नेहमी खुणावत असतो. या दीपस्तंभावर आपण उभं राहिलो, तर आपल्याला कसं दृश्यं दिसेल, असंही नेहमीच आपल्या मनात येतं. हा दीपस्तंभ जवळून पाहण्याची संधी इथे मिळू शकते. वेंगुर्ल्याच्या बंदराजवळच दाट झाडीतून एक वाट एका छोट्या टेकडीवर जाते. याच टेकडीवर असलेल्या दीपस्तंभातून दिसणारा अथांग सागर हा डोळे दिपवून टाकणाराच भासतो. वेंगुर्ला रॉक्स हा एक भन्नाट प्रकार इथे पहायला मिळतो. दीपस्तंभासाठी पाच रुपये प्रवेश फी असून सायंकाळी चार ते साडेपाच याच वेळेत तो खुला असतो. दीपस्तंभाभोवतीचं पठार फेरफटका मारावा, असं आहे आणि त्यावरून खाली उतरून थेट बीचवरही जाता येतं.

वेंगुर्ल्यात आणखी पाहण्यासारखं ठिकाण म्हणजे इथलं फळ प्रक्रिया केंद्र. या केंद्राला जरूर भेट द्यावी.

शिरोड्याच्या रस्त्यावर आठदहा किलोमीटर अंतरावर मोचेमाड हे खास मच्छिमारीसाठी प्रसिद्ध असलेलं गाव आणि तिकडचा किनारा अवश्य बघण्यासारखा आहे. वेंगुर्ल्याच्या दक्षिणेकडे दहा-बारा किलोमीटर अंतरावर शिरोडा हे गाव आहे आणि तिथे माऊली देवीचं मंदिर आहे. जवळच अरवली गावात सागरतीर्थ हा रमणीय किनारा आहे.

अशीही वेंगुर्ल्याची सहल खासच. शिवाय तळकोकणातलं वैशिष्ट्यं म्हणजे इथला मत्स्याहार. मत्स्यप्रेमींसाठी इथे बांगडा, कोळंबी, खेकडे यांच्या अस्सल गावरान व्हरायटी मिळतात. सोलकढी आणि घरगुती शाकाहारी जेवणाची चवही तृप्त करणारी अशीच असते.

निवासासाठी राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्याचं सागर हे विश्रामधाम अत्यंत उत्तम आहे. सागर हे नावाप्रमाणेच खिडक्यातून समुद्राचं दर्शन घडविणारं निवासस्थान आहे. आजकाल ही विश्रामधामं खाजगी व्यक्तींनाही उपलब्ध होऊ शकतात. मात्र त्यासाठी सावंतवाडीत बुकिंग करावं लागतं. फळप्रक्रिया केंद्राजवळच्या समीर या विश्रामधामाचं बुकिंगही इथेच करता येतं. तिथला संपर्क : सार्वजनिक बांधकाम खात्याचं मुख्यालय, मोती तलाव, सावंतवाडी, दूरध्वनी : ०२६३-२७२२१४.

## वेंगुर्ला बंदर दीपगृह

कोकणातला सिंधुदुर्ग जिल्हा म्हणजे पर्यटकांचं आवडतं ठिकाण बनला आहे. इथला वेंगुर्ला परिसर तर अप्रतिमच आहे. वेंगुर्ल्याच्या बंदरामध्ये शेजारच्या टेकडीवरच 'वेंगुर्ला पॉइंट' हे दीपगृह आहे. वेंगुर्ला बंदराच्या टोकापर्यंत तुम्ही चालत गेलात की उजव्या हाताला १००-१५० पायऱ्या चढल्यानंतर हे सुंदर असं दीपगृह आपल्या नजरेस पडतं. षटकोनी आकारचं दगडी बांधकाम असलेलं हे दीपगृह आहे. संपूर्ण भारतात हे एकमेव दीपगृह असं आहे की त्या त्यातून बाहेर पडणारा प्रकाश हा लाल रंगाचा असतो. वेंगुर्ल्याला जाण्यासाठी कोकण रेल्वे तसंच बसचा पर्याय उपलब्ध आहे.



## वेंगुर्ल्याचा समुद्र

**पांढऱ्या** वाळूसाठी प्रसिद्ध असलेला वेंगुर्ला बीच एक स्वछ समुद्रकिनारा म्हणून ओळखला जातो. काजू, आंबे, फणस आणि नारळ यांच्या बागांनी भरून गेलेलं वेंगुर्ले निवांत फिरायला योग्य ठिकाण आहे. हे गाव सिंधुदुर्ग जिल्ह्यात असून इथल्या पाण्याचा रंग बरेचदा बदलताना दिसतो. वेंगुर्ले हे गोवा आणि कर्नाटक राज्याच्या जवळ आहे. इथल्या जवळपासच्या बीचेसवर वॉटर स्पोर्टस करता येत असल्याने धाडशी पर्यटकांसाठी हा पर्याय चांगला आहे. वेंगुर्ले हे तिथल्या सी- फूड साठी विशेष प्रसिद्ध असून माशांची आमटी हा तिथला फ़ेमस पदार्थ आहे.

### कसं जाल?

मुंबई आणि वेंगुर्ले हे अंतर सुमारे ५०० किमी असून खासगी वाहनाने, रेल्वेने किंवा बसने जाता येतं. गोवा हायवेवर हे ठिकाण आहे. याशिवाय विमानाने जायचं झाल्यास पणजी हे जवळचं विमानतळ आहे.

### आणखी काय पहाल?

हे गाव सातेरी देवी मंदिर आणि रामेश्वर मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. शिवाय सिंधुदुर्गचा किल्लादेखील बघायला जाता येऊ शकेल.


# ग्रामरक्षक

कोकणातलं निसर्गसौंदर्य जसं वैशिष्ट्यपूर्ण तशी तिथली देवळंही. असंच एक प्रसिद्ध देवस्थान म्हणजे वेंगुर्ल्याजवळच्या आरवली गावचं ग्रामदैवत असलेला वेतोबा. सत्तराव्या शतकाच्या उत्तरार्धात नाथपंथीय सिद्धयोगी श्री भूमैय्या यांनी साताखणाची डोंगरी येथे असलेल्या वेतोबाच्या मूर्तीची प्रथम स्थापना आरवलीत केली. वेतोबाचे मूळ रूप वेताळ आहे. पंचक्रोशीतले ग्रामवासी त्याला देवापेक्षा आपला ग्रामरक्षक म्हणून जास्त मानतात. वेतोबाची मूळ मूर्ती फणसाच्या लाकडापासून बनवली होती. सध्याची ९ फूट उंच मूर्ती पंचधातूची आहे. उजव्या हाती तलवार व डाव्या हाती वाटी घेऊन उभा असलेला वेतोबा पाहिला की, त्याला ग्रामरक्षक का म्हणतात याची खात्री पटते.

वेतोबाचा पुन:प्रतिष्ठा सोहळा पार पडला २२ एप्रिल १९९६ रोजी. तब्बल दहा दिवस सोहळा चालू होता. आठवड्यातले तीन दिवस मासे-मटणाशिवाय जेवण न जाणारे आरवली गाव दहा दिवस शाकाहारी बनले होते. दरवर्षी एप्रिलमध्ये वेतोबाचा वाढदिवस श्रद्धेने साजरा होतो. डिसेंबरमध्ये येथे जत्रा भरते. केवळ आरवलीकरच नव्हे, समस्त कोकणवासीय दोनापैकी एका सोहळ्याला आवर्जून हजेरी लावतात. ग्रामरक्षक असल्याने वेतोबा रात्री गावभर फिरून आपल्या भक्तांचे रक्षण करतो, असं म्हणतात. त्याच्या पादुका हे खास वैशिष्ट्य. वाढदिवस आणि जत्रेच्या वेळी नवस फेडायला आलेले भक्त वेतोबाला पादुका वाहतात. त्या देवळातच ठेवल्या जातात. आरवलीत आल्यावर वेतोबाला त्याच्या आवडत्या फळाचा- केळ्यांचा घड वाहिल्याशिवाय कोणीही भक्त माघारी फिरत नाही.

आरवली हे कादंबरीकार जयवंत दळवी यांचे गाव. त्यांच्यामुळेच हे गाव पर्यटन नकाशावर आले. त्यांच्याही लिखाणात वेतोबाचा उल्लेख आलेला आहेच. पहिल्या विमानप्रवासावेळी ते प्रचंड घाबरले होते. त्यांची सीट होती विमानाच्या पंख्याजवळची. भीती जाण्यासाठी त्यांनी वेतोबाचे नामस्मरण सुरू केले आणि विमानाच्या पंख्यावर उभा असलेल्या वेतोबाचे त्यांना दर्शन झाले. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे, असेच तो जणू दळवींना सांगत होता...

# किरणांचा खेळ,
## चमचमतं पाणी...




जाग आली तेव्हा कौलारू घराच्या छपरात उजेडासाठी बसविलेल्या काचेच्या तुकड्यातून चांगलं उजाडल्याचं लक्षात आलं. भिंतीवरल्या घड्याळात पाहिलं तर साडेसहा होऊन गेलेले. म्हणजे, सहा वीसची आरोंदा गाडी निघून गेलेली. स्वत:वरच चरफडत झटपट आवरून स्टँडवर गेलो. नंतर लगेच गाडी असली तर पहावं म्हटलं. चौकशी केली तेव्हा किरणपाणीकडे जाणारी गाडी नऊ वाजता आहे, असं कळलं. म्हणजे, खाडीवर पोहोचायला दहा वाजणार. परिणाम, फोटोग्राफीची वाट लागणार. सकाळच्या कोवळ्या उन्हात, ऊन अन् सावल्यांचा नाजूक, सुंदर आविष्कार कॅमेऱ्यात पकडण्यात फार मजा येते. आपलाही मूड मस्त असतो, मन एकाग्र असते, त्यामुळे निसर्गातल्या बारीक-सारीक गोष्टींचं सौंदर्यही चटकन लक्षात येतं.

तिथे पोहोचायला दुसरा काही मार्ग आहे का म्हणून कंट्रोलरला विचारलं. त्यांनी सांगितलं, इथून म्हणजे सावंतवाडीतून सरळ शिरोड्याला जा. तिथून तुम्हाला किरणपाणीची गाडी

मिळेल. काही मिनिटांतच शिरोडा गाडी मिळाली, लगेच सुटलीही. शिरोड्याला पोहोचलो तेव्हा सात-चाळीस झालेले. चौकशी करता वेंगुर्ला-किरणपाणी साडेआठ वाजता आहे, असं समजलं. म्हणजे तसा उशीरच, पण फारसा नाही.

कोकणातली असूनही गाडी वेळेवर आली. गाडीतून अधल्या-मधल्या जागा हेरत सव्वानऊला किरणपाणीला खाडीवर पोहोचलो.

अल्याड कोकण, पल्याड गोवा अशी किरणपाणीची खाडी. अलीकडच्या तीरावर लालभडक मातीची वाट दूरवर जाऊन उजवीकडे वळलेली. खाडीच्या पाण्याच्या बाजूने त्या वाटेची सोबत करणाऱ्या हिरव्या माथ्यांच्या माडांची रांग. दुसऱ्या बाजूला छोटंसं घर, चार-दोन माडांनी वेढलेलं. या निसर्गाची एक खोड असते. एखाद्या संवेदनशील माणसावर भुरळ टाकायची. त्याला आपल्या सौंदर्यानं झपाटून टाकायचं आणि आपल्या नादी लावायचं, कायमचं. मुळात 'किरणपाणी' या नावानंच माझ्यावर गारूड केलं होतं. फेरी (वाहनं, माणसं नेणारी बोट) पलीकडच्या तीरावर होती. काठावर उभं राहून समोर पाहिलं. गोव्यातल्या पालये गावाला हिरव्याकंच वनश्रीनं लपेटून घेतलं होतं. सूर्य बऱ्यापैकी वर आला होता तरी खाडीच्या पाण्यावर सकाळचा तलमपणा रेंगाळत होता. पलीकडच्या तीरावरून फेरीचा इशारा ऐकू आला. काही वेळातच फेरी खाडीच्या मध्ये आली आणि शांत पाणी खेळकर पोरासारखं झालं. पुढ्यातल्या जेट्टीवर फेरी थांबली. माणसांचे घोळके, वाहनं बाहेर पडली. जेट्टीवरची फेरीत चढली. इशारा झाला. पाच मिनिटात गोव्यात आलो. टपरीवजा हॉटेलात माणसं सुशेगात चहा पीत बसली होती. एका बाकड्यावर बसून किरणपाणीचं रूप न्याहाळलं. या तीरावर छोट्या-मोठ्या होड्यांची रांग लागली होती. काही पाण्यात तरंगत होत्या. होड्यांतून खाणमाती वाहून नेणाऱ्या मजूर बाया-बाप्यांच्या लयबद्ध हालचाली आकर्षक वाटत होत्या. समोर माडांची प्रतिबिंबं पाण्यात थरथरत होती.

हरमलच्या वाटेला लागलो. एक


छाया : विजय देसाई




अनु.

चढण चढून गेल्यावर वरून किरणपाणीचं आख्खं सौंदर्य नजरेत भरलं. आकाशाची निळाई पाण्यावर उतरलेली. लालसर जमिनीचे तुकडे. चार-दोन माड त्या तुकड्यांवर रेंगाळलेले. हिरवा-लाल-निळा रंग आपलं अस्तित्व व्यापून टाकतात. आपल्या मनावर उतरतात. शांत पाण्यातली छोटीशी बेटं. इतकी निरागस की उचलून घ्यावीशी वाटतात. बाजूला चमचमतं पाणी. आपल्या पाण्यावर किरणांना खेळवणारी किरणपाणी आपल्यावर भूल टाकते. कलत्या उन्हात किरणपाणी सोनेरी होते. वेळेचं भान राहात नाही. कातरवेळी फेरीचा इशारा कानावर पडतो तेव्हा समोरच्या तीरावर गावाकडची एसटी थांबलेली दिसते.

# पुणे जिल्हा
# लोणावळा


| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते लोणावळा | | | | | 83 | | | | |
| **1** | उढेवाडी | | खेडे | तलाव | जंगल | 17 | NW | | | |
| **2** | राजमाची | धबधबा | किल्ला | ट्रेक | | 17 | NW | 0.5 | NE | |
| **3** | कोंडेश्वर | धबधबा | नदी | मंदिर | | 38 | NE | 55 | NE | |
| **4** | कांबरे | धबधबा | | | | 23 | NE | 2.5 | SW | <-\| |
| **5** | कार्ला भाजे लेणी | धबधबा | लेणी | मंदिर | | 10.5 | NE | 18 | SW | \|<- \| |
| **6** | कामशेत | पॅराग्लायडिंग | | ट्रेक | निसर्ग | 17.5 | E | 12.5 | SE | 6 SE \| |
| **7** | इंदोरीगड | | किल्ला | | | 35 | E | 18 | SE | \| |
| **8** | भाजे लेणी | धबधबा | लेणी | | | 12 | SE | 32 | W | 7 SE |
| **9** | विसापूर | | किल्ला | ट्रेक | | 14 | SE | 2 | SE | |
| **10** | लोहगड | | किल्ला | ट्रेक | मंदिर | 15 | SE | 1 | SW | |
| **11** | तुंग | | किल्ला | मंदिर | | 24 | SE | 32 | SW | |
| **12** | कोराईगड | | किल्ला | मंदिर | | 24.5 | S | 17 | SW | <- \| |
| **13** | तिकोना | | किल्ला | ट्रेक | मंदिर | 38 | SE | 32 | NE | \| |
| **14** | ताम्हिणी घाट - भांबुर्डा-आंबवणे | लाँग ड्राईव्ह | | | | 33 | S | 41 | SW | 17 SW |






अनु.




# उढेवाडी

नाव कुठंतरी ऐकल्यासारखं वाटतंय ना, बरोबर पुणे जिल्ह्यातीलच हे एक गाव. राजमाची किल्ल्याच्या कुशीत वसलेली. खंडाळ्याहून राजमाचीला चालत जाणं सर्वांनाच भावतं. या दिवसांमध्ये उढेवाडीतला मुक्काम बहार आणतो. इथं राहाण्याचे फायदे म्हणजे राजमाचीचे दोन बालेकिल्ले, गडाच्याच कुशीतून कोकणात उतरणारी प्राचीन वाट, मस्त तलाव, जंगल अशा सगळ्या भटकंतीचा मनसोक्त आनंद लुटता येतो. स्वतःचं वाहन असेल, तर उढेवाडीत पोहोचणं अवघड नाही. तिथल्या मुक्कामात राजमाची रुरल डेव्हलपमेंट संस्थेचं काम पाहाच. तिथं अनेक वर्ष वास्तव्याला असणारे ट्रेकर्स मंडळींचे आदर्श मुकुंद गोंधळेकरकाका यांना नक्की भेटा.

# भटकंती राजमाचीची

**ग्रुपने भटकायला निघालं की नेहमीच्या ठिकाणांपेक्षा काही हट के ठिकाणांचा शोध घेतला जातो. 'भटकंती'ची पॅशन असलेला अभिनेता मिलिंद गुणाजी सांगतोय खंडाळ्यानजिकच्या अशाच एका स्पॉटबद्दल.**

महाराष्ट्रातली थंड हवेची ठिकाणं म्हटली की माथेरान-महाबळेश्वरनंतर खंडाळा-लोणावळा या ठिकाणांची नावं चटकन डोळ्यांसमोर येतात. खंडाळा हे ठिकाण पर्यटकांसाठी नवं नसलं तरी तिथून पुढे राजमाचीला जाणं हे एक मस्त भन्नाट अनुभव ठरू शकतो. खंडाळ्याहून ११ किलोमीटर्स अंतरावर असलेल्या राजमाची पॉइंट जायचं आणि तिथून पुढे राजमाचीचा किल्ला गाठायचा. हा तसा सोपा ट्रेक असल्याने कोणत्याही ट्रेकरसाठी त्याच्या आयुष्यातला ट्रेकिंगचा हा पहिला पॉइंट ठरू शकतो. माझ्या कॉलेजजीवनातला पहिला ट्रेक मी इथेच केला होता. पूर्वी ओबडधोबड रस्त्यावरून पायपीट करत तिथे पोहोचावं लागायचं. पण, आता राजमाचीच्या पायथ्यापर्यंत एक मातीचाच कच्चा रस्ता तयार झालाय. एसयूव्ही, जीपसारखं वाहन तिथपर्यंत जाऊ शकतं. गावाकडे पोहोचलं की तिथली पायवाट तुम्हाला किल्ल्याकडे घेऊन जाते.

पायथ्याशी उभं राहून पाहिलं की मनरंजन आणि श्रीवर्धन असे दोन बालेकिल्ले पहायला मिळतात. मनरंजन समुद्रसपाटीपासून साधारण २७०० फूट तर श्रीवर्धन ३ हजार फूट उंचीवर आहे. मनरंजनवर जाण्यासाठी साधारणतः २५-३० मिनिटं पुरतात. तिथं जायला निघालं की रखरखीत वाट हळुहळू हिरवीगार होऊ लागते. मनरंजनवर मजबूत दगडी भिंती, प्रशस्त बुरुज पहायला मिळतात. इथे अनेकदा भटकी मंडळी दिसून येतात. दोन्ही बालेकिल्ल्यांमध्ये बऱ्यापैकी घनदाट जंगल आहे. दोघांच्याही मध्ये एक भैरवाचं सुंदर देऊळ आहे. श्रीवर्धनला जाण्यासाठीही साधारणतः अर्धा-पाऊण तासाचा चढ आहे. राजमाची गावाजवळ गर्द देवराई बघायला मिळते. अगदी मोठमोठाले वृक्ष या देवराईत आहेत. अगदी बघण्यासारखी आहे ही देवराई. श्रीवर्धन उतरून खाली उतरलं की शिवाचं हेमाडपंथी देऊळ बघायला मिळतं. तिथे एक सुंदरशी पुष्करिणी आहे. मंदिराच्या पुढ्यात, तळ्याच्या काठी तंबू टाकून छानपैकी पथारी पसरता येते. निसर्गाच्या सान्निध्यात, तंबूत राहण्याचा अनुभव ज्यांना घ्यायचा असेल त्यांनी ग्रुपने जाऊन दोन दिवस या राजमाची पॉइंटची भटकंती करायला हरकत नाही.

राजमाची हे ट्रेकर्सचं पावसाळ्यातलं आवडतं ठिकाण आहे. अर्थात लोणावळ्यापासून राजमाचीपर्यंत चार तासांची ही रपेट केल्यानंतर श्रीवर्धन आणि मनोरंजन या बालेकिल्ल्यांचं जे काही दर्शन घडतं, ते विलोभनीय असतं. हे सगळे ट्रेक असल्यामुळे इथे खाद्य-पेयांची सोय काही नाही, एवढं मात्र लक्षात ठेवायचं. मनसोक्त भिजा, पण धबधब्यात उतरताना जपून. धबधब्यातल्या पाण्याला प्रचंड फोर्स असतो.




आला आला म्हणताना पाऊस दाराशी हसत उभा राहतो. उन्हाची तलखी संपते. आकाश भरून यायला सुरुवात होते. निळा रंग जाऊन काळपट राखाडी छटा सगळा आसमंत व्यापून टाकते. वाऱ्याचं ढगांशी सतत युद्ध सुरू होतं. आकाशात ढगांच्या गडगडाटाबरोबरच विजाही चमकू लागतात. सगळीकडे नव्या हिरव्या कोंबांची मुलायम मखमल पसरते. नंतर हळूहळू पाऊस जोर धरू लागतो. सरींवर सरी बरसू लागतात. हा तरणाबांड झालेला पाऊस सगळीकडे आपल्या प्रचंड ऊर्जेने घुमायला लागतो.

खरं म्हणजे सह्याद्रीत दरवर्षीच पावसाचा हा खेळ बघायला मिळतो. कडेकपाऱ्या, पठारांवर पावसाची हिरवी माया पुरेपूर पसरते. इथल्या तरुणांना हा गारवा, ही निर्व्याज माया ओळखीचीच असते. खरं म्हणजे ते वाटच बघत असतात निसर्गाच्या हाकेची.

हे सगळं अनुभवायचं असेल तर पहिल्या पावसात राजमाचीला जायलाच हवं. कारण राजमाचीचा डोंगर सगळ्यांनाच सामावून घेतो. अगदी पहिल्यांदा जाणाऱ्यांनाही तेवढ्याच प्रेमाने. लोणावळ्याहून जाणारी वाट थोडी लांब असली तरी सोपी. तसं कर्जतजवळच्या कोंदिवड्याहूनही जाता येतं. पण वाट उभ्या चढणीची आणि अरुंद खाचखळग्यांची. तरुणांसाठी मात्र बेस्ट. आणि दुसरं म्हणजे इथला इतिहासही तरुणांना प्रेरणा देणारा. त्यामुळे ही भटकंती दुहेरी आनंदाची.

किल्ल्याभोवती अनेक ऐतिहासिक घटनांचा पटच आहे. जेम्स डग्लस नावाचा इंग्रज म्हणतो राजमाची म्हणजे समोरून जाणाऱ्या प्रत्येक मित्राच्या आणि शत्रूच्या चेहऱ्यावर

उजेड पाडायला धरलेला कंदिलच. घाटमाथ्यावरच्या लोणावळ्याजवळचा हा किल्ला कोकण आणि पठार यांच्या हद्दीवरचा जागता पहारेकरीच. उत्तर कोकणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने खूपच मोक्यावरचा. विशेषतः महाराजांच्या मृत्यूनंतरच्या यादवीच्या काळात. त्याकाळात दख्खनच्या पठारापासून कोकणाला विभागणारे हे पर्वत सरहद्दीसारखे झाले होते. घाटावरून होणाऱ्या चढाया थोपवण्यासाठी मावळच्या पठारावर दोन बेलाग किल्ले होते. एक राजमाची आणि दुसरा लोहगड-विसापूर. घाटावर नेणाऱ्या बोरघाट या मुख्य मार्गावर या दोन किल्ल्यांचं नियंत्रण होतं. त्यातही राजमाचीचे ताबेदार या मार्गावर प्रचंड हुकूमत गाजवून या दोन्ही प्रदेशांच्या दळणवळणाच्या नाड्या आपल्या हातात ठेवत. या अतिमोक्याच्या जागेपायी राजमाची हा मानाचा किल्ला होता. या किल्ल्याभोवती महाराजांच्या नंतरच्या काळात खूप घडामोडी झाल्या. कारण त्यावेळी मराठ्यांत यादवी झाली. शाहू आणि ताराबाई यांच्यात सतत झुंजी होत राहिल्या. राजमाचीचा किल्लेदार खंबीरपणे शाहूंच्या पक्षाच्या बाजूने होता. ताराबाईने कान्होजी आंग्र्यांना हा किल्ला ताब्यात घेण्यास सांगितलं. जरी त्यावेळी कान्होजींनी शाहूंशी उघड शत्रुत्व घेतलं नाही तरी त्यांच्या डोक्यात अनेक योजना आणि तयारीही होती.

थोड्या दिवसांनी शाहूंच्या फौजा त्यांचा पेशवा बहिरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली आंग्रेंवर कोकणात चालून गेल्या. खरं म्हणजे आंग्रे त्यांच्या मागावर होते. त्यांनी पेशव्यांच्या फौजेला खिंड उतरू देऊन कोकणात जाऊ दिलं. नंतर त्यांनी सहजपणे घाट ताब्यात घेतला. शाहूंचे सैनिक गाफिल अवस्थेत पकडले







अनु.

गेले. कोकणात धोका असताना कान्होजीचं सैन्य घाटावर हल्ला करेल, असं त्यांना वाटलंच नाही. त्यामुळे राजमाचीसारखा महत्त्वाचा किल्ला कुठल्याही प्रतिकारविना कान्होजींना मिळाला. कान्होजींनी ताबडतोब चढाई करत लोहगडही जिंकला. कान्होजी हे केवळ दर्यावरचे सरखेल आहेत असं धरून चालणाऱ्यांना मैदानी युद्धातली त्यांची असामान्य कर्तबगारी बघायला मिळाली.

मराठ्यांचे सरखेल कान्होजींच्या स्पर्शाने पुनित झालेला हा किल्ला आहे.

लोणावळ्याहून साधारण २० कि.मी.वरच्या तुंगार्ली धरणाकडे जाणारी वाट धरत मधली वाडी पार केली की रस्ता थोडा खाली उतरतो. मग उजवीकडे सपाटीवरून जाणारी वाट एकदम सरळसोट आणि सोपी आहे. बराच वेळ चालल्यावर एक चढण लागते. चढण संपली की मात्र सावध राहायला हवं. कारण लगेच एक वाट डावीकडे जाणारी आहे. ही आहे दोन पठारांना जोडणारी वाट. यावरून गेलं की मात्र सरळ आपण किल्ल्याच्या पायथ्याला जातो. गावात राहायची आणि जेवायची सोय आहे. दोन शिखरांच्या मधल्या सपाटीवर काळभैरवाचं देऊळही आहे.

लोणावळ्याहून पहाटे लवकर निघालं तर तिन्हीसांजेच्यावेळी आपण परत येऊ शकतो. किंवा खाली कोंदिवड्याला उतरू शकतो. कोंदिवड्याला उतरताना पायथ्याच्या थोडंसं अगोदर एक वाट कोंदिवडे लेण्यांकडे जाते. हे ठिकाण नक्कीच भेट देण्यासारखं आहे आणि पावसाळ्यात इथे बऱ्यापैकी मोठा धबधबा आहे.

एक मात्र नक्की जो पावसाळ्यात एकदा इथे गेला, तो आयुष्यभर प्रत्येक पावसाळ्यात एकदातरी राजमाचीला जातोच. या डोंगराची प्रेम करण्याची ताकदच अमर्याद आहे. इथल्या पठारावरच्या भरारा वाऱ्यात आपल्या मनावरची साचलेली शहरी पुटं पळवून लावण्याची आणि मन लख्ख करण्याची कि मया अजब आहे. या मायेच्या स्पर्शाचा ओलावा जरूर अनुभवून बघा... भरून पावाल.

–

---

राजमाचीचा ट्रेक म्हणजे डोंगरभटक्यांचा एकदम जिव्हाळ्याचा आणि अत्यंत आनंदाचा विषय. सह्याद्रीच्या डोंगरपठारावरचा हा मुलुखच इतका वेगळा आहे की इथला समृद्ध आणि भव्य निसर्ग माणसाला वेडं करतो. या ट्रेकच्या वाटेवर विशाल पठार आणि त्यावर भरारा वाहणारा वारा आहे, इथे डोंगर आहेत, त्यांच्या कडेकपाऱ्यांतून फुसांडत कोसळणारे धबधबे आहेत, मस्त धुंदीत वाहणारे ओढे आहेत आणि घनदाट अरण्यही आहे. त्यामुळे या ट्रेकचं नुसतं नावही निघालं तरी भटक्यांची मनं आठवणींनी हळवी होतात. निसर्गप्रेमी आणि राजमाची यांच्यातली जवळीक आणि ऋणानुबंध काही वेगळेच आहेत.

पावसाळ्यात तर या पठारावर ढगांचं राज्य असतं. सगळं पठार आणि त्या बाजूच्या हिरव्यागार डोंगररांगा मेघांनी वेढलेल्या असतात. सगळीकडे धुंद कुंद वातावरण असतं. हा ट्रेक इतका लोकप्रिय असण्याचं मुख्य कारण म्हणजे हा ट्रेक कुठल्याही वयातल्या लोकांना करता येण्यासारखा आहे. दुसरं म्हणजे लोणावळ्यावरून जाणारी वाट थोडी लांब असली तरी सपाटीवरून जाणारी असल्यामुळे एकदम सोपी आहे. या निसर्गरम्य पठारावरून चालताना वाटेत हवे तेवढे ओढेही आहेत.

तसं कर्जतजवळच्या कोंदिवड्याहूनही जाता येतं. पण ही वाट खड्या चढणीची असल्याने बहुतांश लोक लोणावळ्याहून जातात आणि कोंदिवड्याला उतरतात.

लोणावळा स्टेशनहून हायवेवर आल्यावर पुण्याकडे थोडंसं चाललं की डावीकडे मोठा पेट्रोलपंप आहे. तिथून डावीकडे जाणारा रस्ता तुंगार्ली धरणाकडे जातो. साधारण २०-२५ मिनिटं डांबरी रस्त्यावरून चाललं की समोरच डोंगरावर जाणारी पायवाट लागते. ही हलकी चढण पार केली की उजवीकडे तुंगार्ली धरण आणि तलावं आहे. जवळच असलेली वाडी पार केली की वाट थोडीशी खाली उतरते. मग उजवीकडे सपाटीवरच्या रुंद वाटेने



अनु.

आपण पठारावरून चालत राहतो. पठारावरून डावीकडे लांबवर दिसणाऱ्या दरीपलिकडे पण थोडंसं पुढच्या अंगाला राजमाचीचे दोन सुळके सतत दिसत राहतात. आपण इकडच्या पठारावरून चालत असतो.

काही अंतर चालल्यानंतर दाट जंगलाच्या पट्ट्यातून जाणारी एकच हलकी चढण आहे. चढणीनंतर लगेचच एक वाट डावीकडे जाणारी आहे. ही आहे दोन पठारांना जोडणारी वाट. यावरून गेलं की मात्र आपण सरळ किल्ल्याच्या पायथ्याला जातो. मात्र चढण पार केल्यावर एकदम सावध राहिलं पाहिजे. कारण सरळ जाणारी वाट दुसरीकडेच जाते.

गावातल्या घरांतून राहण्याची आणि जेवणाची सोय होते. दोन शिखरांच्या मधल्या सपाटीवर काळभैरवाचं देऊळही आहे. ही जागा अतिशय शांत असून सभोवताली दाट झाडी आणि समोर मोठं अंगण आहे. देवळाजवळ पाण्याचं एक टाकंही आहे. किल्ल्याच्या एका सुळक्यावर वरती पाण्याच्या टाक्या आणि गुहा आहेत. याव्यतिरिक्त गावात दोन-तीन देवळं आहेत. बऱ्याच घरांमध्ये राहण्याची सोय होऊ शकते. मधल्या माचीवरच्या भैरवाच्या मोठ्या देवळातही दहा-पंधरा जण राहू शकतात. गावातून देवळात जेवण पोहोचवलं जातं.

किल्ल्याच्या दोन सुळक्यांवरही सर्वसामान्यांना जाता येतं. पण या वाटा ६०-७० फूट उंचीच्या ताशीव कातळातून जातात. पावसाळ्यात हा कातळ चांगलाच निसरडा होत असल्याने धोकादायक आहे. स्वतःला सांभाळत, धोक्याची जाणीव ठेवली तर वर जाणं तेवढं कठीण नाही. त्यात अशा ठिकाणच्या कडा, तटबंद्यांचे दगड केव्हाही निखळू शकतात, हे लक्षात ठेवलं तर अपघात होण्याची शक्यता खूप कमी असते.

मुंबई-ठाण्याचे बहुतांश ट्रेकर्स परतताना कोंदिवड्याला उतरतात. ही वाट बहुतेक टप्प्यांमध्ये अरुंद असून पावसाळ्यात प्रचंड निसरडी होते. त्यात शेवटपर्यंत सगळा मार्ग दाट जंगलातून जाणारा असल्याने कोंदिवड्याची दिशा उत्तम अवगत करून घेणं आवश्यक आहे. कारण रस्त्यात बरेचदा गुरांच्या वाटा आपल्याला गोंधळात टाकतात. त्यात पावसाळ्यातही वाटेत पाणी अगदी कमी ठिकाणी मिळतं. थोडी काळजी घेतली तर हा रस्ता एकदम थ्रिलिंग आहे.

कोंदिवड्याहून कर्जतला जायला एसटी आहेच पण सहा आसनी रिक्षादेखील मिळतात. लोणावळ्याहून पहाटे लवकर निघालं तर संध्याकाळी परतता येतं किंवा खाली कोंदिवड्याला उतरू शकतो. लोणावळ्याहून राजमाचीचा ट्रेक २०-२१ कि.मी.चा आहे.

पाऊस बहरू लागला की हाडाचा ट्रेकर एकदा तरी या पाचूच्या वाटेवर जातोच. इथला निसर्गही आपल्या या मित्रांची वाट पाहत असतो. राजमाचीच्या डोंगराचे आपल्या या मित्रांशी असलेले ऋणानुबंध आणि हिरव्या मायेची ओढच तेवढी विलक्षण आहे.

—



# राजमाची

सह्याद्रीच्या लोणावळा खंडाळापासून निघणाऱ्या डोंगररांगेमुळे निर्माण झालेला परिसर 'उल्हास नदीचे खोरे' म्हणून ओळखला जातो. याच परिसरातून उल्हास नदी उगम पावते. याच नदीच्या खोऱ्याच्या प्रदेशात लोणावळ्याच्या वायव्येस १५ किमी अंतरावर राजमाची किल्ला आहे.

## काय पहाल?

- राजमाची किल्ल्याच्या पोटात एक लेणं आहे यालाच 'कोंडाणे लेणी' असे म्हणतात. ही लेणी कोंडाणा गावापासून आग्नेय दिशेला २ किमी अंतरावर आहे. ही लेणी ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात म्हणजे सातवाहन कालाच्या सुरुवातीला खोदलेली आहेत. अखंड दगडात कोरलेल्या वास्तुशिल्पाचा हा उत्कृष्ट नमुना आहे. या लेणी समूहात एक चैत्यगृह आणि सात विहारांचा समावेश आहे. या लेण्यांची निर्मिती राजमाचीवर असणाऱ्या सत्तेखाली झाली. यावरूनच असे अनुमान निघते की हा किल्ला साधारण २५०० वर्षांपूर्वीचा असावा. राजमाची किल्ल्यास पूर्वी 'कोकणचा दरवाजा' असे संबोधण्यात येत असे.
- लोणवळ्याहून तुंगार्लीमार्गे राजमाचीला येताना वाटेतच गावाच्या वेशीजवळ एका योद्ध्याचे स्मारक, अर्धवट तुटलेली तटबंदी, दरवाजाचे अवशेष, गणपती आणि मारुतीरायाची मूर्ती आहे. किल्ल्यावरून आजुबाजूचा दिसणारा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. किल्ल्याच्या माचीवर वस्ती आहे तिला 'उधेवाडी' असे म्हणतात.
- राजमाचीला पूर्व आणि दक्षिण दिशांना जी खोल दरी आहे ती 'कातळदरा' या नावाने ओळखली जाते. या दरीतूनच उल्हास नदी उगम पावते. या नदीच्या पश्चिमेकडील डोंगराला 'भैरव डोंगर' म्हणतात. अशा निसर्गसौंदर्याने नटलेल्या राजमाची किल्ल्याचे खरे वैशिष्ट्य म्हणजे या किल्ल्याचे दोन बालेकिल्ले श्रीवर्धन आणि मनरंजन... बालेकिल्ल्याकडे जाताना वाटेत खडकात खोदलेल्या गुहा लागतात. श्रीवर्धन आणि मनरंजन बालेकिल्ल्यांच्या मध्ये एक सखल पट्टी आहे, यावरच भैरवनाथाचे एक मंदिर आहे. मंदिरासमोरच ३ दीपमाळा आणि लक्ष्मीची मूर्ती आहे. येथून डावीकडे जाणारी वाट मनरंजन आणि उजवीकडची वाट श्रीवर्धन या बालेकिल्ल्यांवर जाणारी आहे.

## कसे जाल?


**लोणावळ्याहून तुंगार्लीमार्गे:**

- लोणावळ्याहून तुगांर्लीमार्गे राजमाची गावात यावे. ही वाट एकंदर १९ किमीची आहे. वाटेने किल्ल्यावर जाण्यास ५ तास लागतात.

**कर्जतहून कोंदीवडे मार्गे:**

- कर्जतहून कोंदीवडे या गावात बसने यावे. इथून गडावर जाण्यास सुमारे ३ ते ४ तास लागतात.








अनु.

श्रावणसरी बरसू लागल्या की, सगळ्यांनाच वेध लागतात ते वर्षासहलीचे. पुणे-मुंबईकरांची पावलं मग सहजपणे लोणावळा-खंडाळ्याकडे वळू लागताता. पण इथल्या वाढत्या गर्दीमुळे निसर्गात रमायला आलेली शांतताप्रिय मंडळी बेचैन होतात. अशा लोकांसाठी थोडंसं वेगळं ठिकाण म्हणजे कोंढेश्वर! हे ठिकाण गर्दी-गोंगाटापासून दूर असलं तरी लोणावळ्याहून अगदी जवळ आहे. पण इथे पोहण्यासाठी थोडी पायपीट करण्याची तयारी असावी एवढंच.

पुणे-लोणावळा लोहमार्गावरचा महत्त्वाचा थांबा म्हणजे कामशेत. इंद्रायणी नदीच्या पात्राला अगदी लागून उभारलेल्या या स्थानकावर पाऊल ठेवल्याठेवल्याच निसर्गाशी जवळीक साधली जाते. बाहेर पडून एसटी स्टॅण्डवर आलो की सकाळी सव्वासातची एक गाडी आपल्याला जांभिवली गावात नेऊन सोडते. हा प्रवास साधारणतः १८ किमीचा आहे. कामशेत गाव ओलांडलं की, एका पाठोपाठ एक नयनरम्य दृश्यं समोर येऊ लागतात. दुतर्फा पसरलेली भातशेती, शेतीमधूनच धावणारी ओबडधोबड डांबरी सडक, खाली उतरलेले ढग, पावसाचे तुषार... असं नयनरम्य दृश्य पाहून कधी एकदा बसमधून खाली उतरून हे तुषार झेलून चिंब होतो असं वाटतं.

उतरल्यावर समोर येतं ते वडीवळे धरण. या धरणफुगवट्याच्या काठाकाठाने रस्ता धावतो आणि मग बराच वेळ त्याचं निळंशार पाणी आपल्याला खुणवत राहतं. अचानक दुतर्फा डोंगर आणि दाट वनश्री नजरेत भरते. अशातच कधी एखादा मोर आपला पिसारा फुलंवून भर रस्त्यावर थुई थुई नाचून चक्क 'रास्ता रोको आंदोलन' करतो तर कधी खंड्या, बगळे यांसारखे सुंदर पक्षी दर्शन देतात. असा हा सुखद निसर्गप्रवास संपू नये असं वाटत असतानाच आपण दाखल होतो ते 'जांभिवली'मध्ये.

राजमाची आणि ढाक बहिरी या दोघांच्यामधे हे गाव वसलेलं आहे. या गावातून अर्ध्या-पाऊण तासांची पायपीट करावी लागते. सुंदर भातशेतीला लागून जाणाऱ्या पाऊलवाटेवरून चालता चालता आपण कोंढेश्वर इथे पोहाचतो. हे मंदिर ११-१२ व्या शतकात बांधलेलं आहे. देखणं आणि टुमदार!

प्रशस्त गाभारा आणि सभामंडप अशी या देवळाची रचना आहे. अंधाऱ्या गाभाऱ्यात श्री कोंढेश्वर विराजमान आहेत. कुणी गावकरी कधीतरीच येऊन दिवाबत्ती करतात. सभामंडप मोठा असून त्यात ५० लोक सहज मुक्काम करू



अनु.

शकतील.

सभामंडपाच्या दारावर अतिशय रेखीव दगडी चौकट आहे. काळ्या पाषाणातल्या सुबक नक्षीकामावरून मंदिराच्या सौंदर्याची प्रचिती येते. प्रवेशद्वारासमोरच दोन नंदी आणि एक दीपमाळ आहे. आजूबाजूला कातळात कोरलेली शिल्पं विखुरलेली दिसतात. मंदिराच्या थोडं वर आणखी एक पडकं देऊळ आहे. कुणाचं ते नेमकं ध्यानात येत नाही. या परिसरात शोडषदलकमलांचे कोरीव अवशेष आढळतात.

मंदिराच्या मागे कुंडली नदीचा प्रवाह आहे. इथे कातळात एका खालोखाल तीन-चार रांजणकुंड तयार झाली असून, नदीचं पाणी एका कुंडातून दुसऱ्या कुंडात पडत राहतं. शेवटी हे पाणी एका सुंदर धबधब्याचं रूप घेतं. असं हे पाण्याचं रूप पाहून गंमतच वाटते. पांढरंशुभ्र फेसाळणारं पाणी एका कुंडातून दुसऱ्या कुंडात ओघळताना इवलेइवले धबधबे तयार होतात. पावसाच्या सुरुवातीला या धबधब्यांची धार अगदी छोटेखानी असते. पण जसजसा पाऊस वाढतो तसतसं या छोट्या धबधब्यांचं रूप पालटून त्यांची रौद्रभीषणता अनुभवयाला मिळते.

या कुंडांमुळे इथल्या महादेवाला स्थायिक लोकं कुंडेश्वर आणि कुंडली नदीकाठी असल्याने 'कुंडलेश्वर' असंही संबोधतात.

कुंडाच्यावर दाट झाडी आहे. या झाडीतून वाट काढत वर गेलो की नदीच्या तिच्या उगमाशी पोहोचतो आणि इथे सामोरा येतो तो एक सुंदर निसर्गाविष्कार! १२-१५ फुटी कातळकड्यावरून एका डोहात झेपावणारा सुंदर धबधबा! सभोवताली माजलेलं रान, काळेकभिन्न कातळकडे, त्यांवरून फेसाळणारं पावसाचं पाणी, ठायी ठायी फुललेली 'गौरीचे हात' ही फुलं... सह्याद्रीतल्या नंदनवनातच आपण नाही ना, असं वाटत राहतं. या धबधब्यात मनसोक्त भिजण्याचा आनंद काही आगळाच असतो.

जांभिवलीकरांचा मुख्य व्यवसाय म्हणजे भातशेती. कोंढेश्वरांचे दर्शन घेऊन इथल्या परिसरात मनसोक्त बागडल्यावर पुन्हा जांभिवलीत दाखल व्हावे. गावातल्या एखाद्या घरात जेवणाची सोय होऊ शकते. जाड लालसर तांदळाचा गरमागरम भात आणि आमटी यावर चांगलाच ताव मारावा आणि निसर्गाची भेट घेऊन घरी परतावं.

**कांबरे व्हिलेजमधला धबधबा** : धबधब्यावर ५०० फूट उंचीवर गुंफा आहे.

**कसं जायचं?** : मुंबईहून बसनं लोणावळ्याला उतरायचं. कान्हे फाट्यामार्गे लोणावळ्याहून खांडीला जाणारी बस कांबरे गावात सोडते. खासगी वाहनानं जाणार असाल तर जुन्या मुंबई-पुणे रस्ता पकडायचा. कामशेत गेल्यावर कान्हा फाट्याला डावीकडे वळणारा रस्ता कांबरे गावात नेतो.

# पाऊसलेणी







अनु.

पाऊस परतलाय खरा, पण काँक्रिटच्या रस्त्यावर कोसळत, शहराची इस्त्री मोडून, चाकरमान्यांच्या शिव्या खाणाऱ्या किरकिऱ्या पावसापेक्षा रानावनातला झिम्माड रांगडा पाऊस नक्कीच वेड लावतो. अशा पावसाची भेट, शिवाय दोन हजार वर्षांपूर्वीच्या इतिहासाची सफर अशा दोन्ही गोष्टी साध्य करायच्या असतील तर मुंबई-पुणे महामार्गावरची कार्ले आणि भाजे लेणी हे ऑल टाइम हिट डेस्टिनेशन ठरावं. शाळेत असताना एखाद्या सक्तीच्या सहलीत इथे येऊन गेल्याच्या आठवणी बहुतेकांच्या पोतडीत असतात. पण त्या शाळकरी वयात तिथल्या शिल्पांपेक्षा पायऱ्यांच्या वाटेवर खाल्लेल्या पेरूंच्या आठवणीच गडद असण्याची शक्यता जास्त. तेव्हा पुन्हा तिथे जाऊन तिथलं शिल्पसौंदर्य जरा जाणत्या नजरेने समजून घेण्यातही मजा आहे, शिवाय पाऊससहलीचं आकर्षणही आहेच.

मुंबई-पुणे रेल्वेमार्गावरचं मळवली हे छोटंसं स्टेशन. हिरव्यागार डोंगरांच्या कुशीतलं टुमदार गाव. काही दशकांपूर्वी लोणावळ्यातल्या पारशांना दूध घेऊन जाणाऱ्या गवळ्यांची चढउतार एवढीच या स्टेशनची चहलपहल. नवरात्रीत एकवीरा आईच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांमुळे वर्षातून एकदा गावाला जाग यायची तेवढीच. पण हळूहळू या पंचक्रोशीतले लोहगड विसापूर किल्ले आणि कार्ले भाजे लेणी या ठिकाणी येणाऱ्या भटक्यांची संख्या वाढली. एमटीडीसीचं रिसॉर्ट झालं, एकवीरेचे भक्तगण वाढले. भक्तनिवास आला. शहरी श्रीमंतांच्या सुबक फार्महाऊसेसचे ठिपके तिथल्या हिरवाईवर उमटू लागलेत पण अजूनही काही बिघडलेलं नाही. तिथला निसर्ग आजही ताजा आहे. आताही तिथले डोंगर हिरव्या मखमली रंगांवर धबधब्यांची शुभ्रधवल नक्षी गुंफून ढगांच्या राशीत हरवलेत. वीकेण्डचं निमित्त साधून सॅक पाठीशी लावायची. मळवली स्टेशनवर उतरायचं आणि डोंगरवाटांची दिशा पकडून मजेत चालू लागायचं...

मळवली स्टेशनवर उतरलं कार्ला आणि भाजे लेण्यांच्या बरोब्बर विरुद्ध दिशेला असलेले डोंगर दिसतात. आधी कार्ला लेण्यांची वाट पकडायची. हे अंतर पाच-सात किलोमीटर असेल. चालत जायची मजा औरच पण रिक्षाचा पर्यायही आहे. गडद आमराईतून पुढे गेलं की, जुना मुंबई-पुणे हायवे लागतो. लेण्यांच्या पायथ्याशी बेहरे गाव आहे. टपऱ्यांच्या गर्दीतून वाट काढत पायऱ्या गाठायच्या. घडीव

पायऱ्यांचा हा रस्ता अर्धा पाऊण तासात लेण्यांपर्यंत घेऊन जातो. उजवीकडे लेण्यांच्या डोक्यांवरून कोसळणारा धबधबा खुणावत असतो. वैजयंतीचा व्यापारी भूतपाल याने दोन हजार वर्षांपूर्वी हे बौद्ध लेणं खोदलं, असा उल्लेख आढळतो. सह्याद्रीतल्या लेण्यांपैकी हे सगळ्यात तरुण लेणं. इथलं प्रचंड उंचीचं, देखणं कोरीवकाम असलेलं चैत्यगृह खिळवून ठेवतं. मोठमोठे स्तंभ, अलंकरणं, गवाक्ष सगळंच विलोभनीय आहे. इथलं गजपृष्ठाकृती छप्पर आणि तब्बल दोन हजार

वर्षांनंतर आजही शाबूत राहिलेल्या लाकडी तुळया हे महद्आश्चर्य आहे. चैत्यगृहाच्या मध्यभागी स्तूप आहे. त्याच्या दोन्ही बाजूला शिल्पांकित स्तंभांची रांग प्रवेशद्वारापर्यंत दिसते. मुख्य लेण्याच्या आजूबाजूला आणखीही काही लेणी आहेत. लेण्यांबाहेर सिंहस्तंभ आहेत. त्यातला एक अजूनही चांगल्या स्थितीत आहे. दुसऱ्या चौथऱ्यावर एकवीरा देवीचं मंदिर आहे. देवीचं दर्शन घेऊन परतीची वाट गाठून पुन्हा मळवलीत यायचं आणि स्टेशनमागच्या रस्त्यावरून भाजे गावचा रस्ता चालू लागायचं.

भाजे गावातून जाताना कमानी असलेली एक वास्तू दिसते. प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांनी या निसर्गरम्य गावात प्रिण्टिंग प्रेस सुरू केली होती. आज उपलब्ध असलेल्या रविवर्म्याच्या चित्रांच्या बहुतेक प्रती याच प्रेसवर छापल्या गेल्यात. गावातून पुढे गेलेला रस्ता लेण्यांकडे घेऊन जातो. ही लेणी कार्ला लेण्यांच्या आधीची. चैत्य आणि विहार असे दोन्ही प्रकार इथे दिसतात. मुख्य चैत्यगृह भव्य आहे. स्तंभावर कलाकुसर आणि दरवाजावरचं चैत्यतोरण लक्ष वेधून घेतं. अनेक लेणी दुमजली आहेत. पुढची काही लेणी अर्धवट कोरून सोडून दिलेली दिसतात. दक्षिणेकडे प्रचंड मोठा धबधबा आहे. मात्र लेण्यांकडून तिथे जाणारी वाट कुंपण घालून बंद करण्यात आली आहे. सूर्यगुंफा हे भाजे लेण्यांचं खास वैशिष्ट्य. या गुंफेत रथारूढ आणि गजारूढ योद्ध्यांचे प्रसंग चितारलेत. कार्ले आणि भाजे या दोन्ही ठिकाणी ब्राह्मी लिपीत कोरलेले शिलालेख आढळतात.

भाजे लेण्यांवरूनच एक रस्ता लोहगड विसापूर किल्ल्यांकडे जातो. लेणी बघून किल्ला सर करण्यासाठी चढणीला लागलेले वीर इथून दिसतात. लांबवर नजर टाकताना पोपटी भातखाचरांचे पोपटी चौकोन नजर बांधून ठेवतात. चिंब पाऊसधारांमध्ये इरल्याच्या आडोशाने शेतातल्या बायकांची लगबग खुणावते. पाऊस संततधार कोसळत असतो. थंडगार वारा हुडहुडी भरवतो. लेण्यांच्या डोक्यावरून खाली पडणारा चिमुकला धबधबा अवचितपणे चिंब करून जातो.

दोन्ही लेण्यांच्या रस्त्यावर धबधब्यांची रेलचेल आहे तशी बेताल पर्यटकांचीही. भल्या माणसांनी तिथे रेंगाळावं, असं चित्रं दिसणं मुश्कील. हातात


सहजपणे दारूच्या बाटल्या आणि कॅन घेऊन फिरणारी मंडळी बघताना आधी वाटलेलं आश्चर्य नंतर निवळत जातं. पाऊस आणि लेण्यांचं मार्केट गावकऱ्यांनीही बरोबर हेरलंय. भज्यांची दुकानं, चहाच्या टपऱ्या तर दिसतातच, गाडी पार्क करायचे पैसे घेणंही समजू शकतं पण कपडे बदलायला आडोसे उभारून त्यातून पैसे मिळवण्याची कल्पकता मात्र अफलातून.

...पाऊस दरवर्षी येतो, तशी पावसाळी सहलही. पण वर्षभर मनावर साठलेला तोचतोपणा आणि कंटाळ्याची जळमटं घालवयाला असं रानावनात जाऊन पावसाला भेटावं. स्वत:ला विसरून मनसोक्त चिंब व्हावं आणि स्वच्छ ताजं होऊन परत फिरावं.

सकाळी घड्याळाला बांधून घेत कामावर जाताना शहरातल्या पावसाची किरकिरही मग सुंदर वाटू लागेल!

## कामशेत

मुंबई-पुणे मार्गावर लोणावळा आणि खंडाळा हे स्पॉट्स प्रसिद्ध आहेत. लोणावळ्यानजीक कामशेत हे गाव आहे. अप्रतिम निसर्गसौंदर्याने नटलेलं हे गाव पावसाळ्यात अधिकच खुलतं. या गावात पारंपरिक पद्धतीची घरं पाहण्यासारखी आहेत. मावळ भागातील सर्वात मोठी बाजारपेठ कामशेत या गावातच आहे. आजुबाजूच्या ६० ते ७० गावांतले लोक या गावात दर मंगळवारी खरेदीसाठी येतात. त्यामुळे मंगळवारी इथे गेल्यास तुम्हला बाजारपेठही पाहता येईल.



बुद्धकालीन लेण्या, विसापूर आणि लोहगड किल्ला इथे आहे. ट्रेकिंगसाठी उत्तम ठिकाण म्हणून ओळखलं जाणारं हे गाव आता परागलायडिंगसारख्या रोमांचकारी अनुभवासाठी नावारूपाला येतंय.

### कसं जाल?

स्वत:ची गाडी असेल तर अडीच-तीन तासांत कामशेत गाठता येईल. लोणावळा आणि खंडाळा या पिकनिक स्पॉटपासून अवघ्या १६ किलोमीटरवर कामशेत हे गाव वसलेलं आहे. ट्रेनने प्रवास करणार असाल तर लोणावळा आणि खंडाळा या आवडत्या पिकनिक स्पॉटनंतर कामशेत स्टेशनला उतरावं.


बुलंद इंदोरीगड

मावळ तालुक्यातल्या इंदोरी या गावात इंद्रायणी नदीकाठी सरसेनापती खंडेराव दाभाडे यांनी १७२०-२१ मध्ये भुईकोट किल्ला बांधला. अनेकांना ही माहिती आहे. इंदोरी गाव दाभाडे घराण्याकडे केव्हा आणि कसं आलं याची पार्श्वभूमी मात्र फारच कमी लोकांना माहीत आहे. पुण्याहून एका दिवसात निवांत पाहून होणारा हा गड वेळ देऊन पाहायला हवा.

छत्रपती शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीत खुद्द औरंगजेब बादशाह महाराष्ट्रात होता. अहोरात्र मराठी साम्राज्यातले किल्ले ताब्यात घेण्यासाठी तो झटत होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर बादशहानं दुर्ग रायगडाला वेढा घालण्यासाठी इतिकादखान याला पाठवलं. त्यावेळी राजाराम महाराज रायगडाहून निसटून प्रतापगड, तिथून पन्हाळा आणि नंतर कर्नाटकात जिंजीला गेले. जिंजी ही स्वराज्याची राजधानी झाली.

जिंजी हा दुर्गम गड तामिळनाडूमध्ये आहे. हा गड हस्तगत करण्यासाठी औरंगजेबानं पुन्हा इतिकादखानाला पाठवलं. जिंजी इथं राजाराम महाराजांना पुत्र झाला. पुत्रोत्सवार्थ स्वराज्यासाठी प्राणपणाने लढलेल्या दाभाडे घराण्यातील येसजी बिन बजाजी दाभाडे यांना ८ जानेवारी १६९७ रोजी राजाराम महाराजांनी इंदोरी हा गाव इनाम दिला. पुढे खंडाराव दाभाडे यांना छत्रपती शाहू महाराज यांनी सरसेनापतीपद दिलं. इंदोरीचं वतन त्यांना राजाराम महाराजांकडून आधीच देण्यात आलं होतं. पुन्हा शाहू महाराजांकडूनही इंदोरी गाव दाभाडे घराण्यास वतनात मिळालं. त्यानंतर इंदोरी गावात नऊ बुरूजांचा भुईकोट प्रकारातला गड खंडेराव दाभाडे यांनी नदीकाठी बांधून घेतला.

इंदोरी किल्ल्याचं मुख्य प्रवेशद्वार पूर्व दिशेला असून, पश्चिम तटबंदी इंद्रायणी नदीला समांतर रेषेत बांधलेली आहे. त्यामुळे हा गड चौकोनी किंवा एकसलग काटकोनात दिसणाऱ्या शनिवारवाडा किंवा अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यासारखा न दिसता थोड्या प्रमाणात त्रिकोणी आकारात दिसतो. महाराष्ट्रातील प्रत्येक किल्ल्याचं स्वतःचं असं वैशिष्ट्य आहे. त्यापैकीच एक वैशिष्ट्यपूर्ण आणि निसर्गसंपन्न गड म्हणून इंदोरीची गणना करता येते.

या गडाचं बांधकाम पाहून पहिले बाजीराव पेशवे यांनी १७३० मध्ये पुण्यात मुठा नदीकाठी शनिवारवाडा बांधून घेतल्याचे दाखले ऐतिहासिक कागदपत्रांत मिळतात. इंदोरी गड पश्चिम बाजूनं जलदुर्ग, तर पूर्वदिशेनं बलाढ्य भुईकोट असल्याचं दिसतं. सरसेनापती खंडेराव दाभाडे आणि

ऊमाबाईसाहेब दाभाडे यांचे काही काळ वास्तव्य या गडात होते.

गडाच्या प्रवेशद्वारावर गणपती आणि दोन्ही बाजूला सिंह कोरलेले आढळतात. या प्रकारातील शिल्पकला सेनापती घराण्याच्या प्रवेशद्वारांवर आढळून येते. सरसेनापती खंडेराव दाभाडेंच्या काळात ज्या वास्तू बांधल्या गेल्या आहेत अशा वास्तूंवर द्वारशिल्पं आढळून येतात. या प्रवेशद्वारांवरून लांबपर्यंत तोफेचा, बंदुकींचा आणि पेटतेबाण यांचा मारा करण्यासाठी जंग्या, खिडक्या ठेवलेल्या आढळून येतात.

गडाचं मुख्य प्रवेशद्वार वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतर कुठंही न आढळणारा दुहेरी संरक्षणाचा दरवाजा गडात प्रवेश करताना निदर्शनास येतो. पहिले प्रवेशद्वार शत्रूनं फोडले वा हस्तगत केलं, तरी दुसरा दरवाजा असल्यानं गडाचं संरक्षण करता येतं. तसंच, दुसरा दरवाजाही शत्रूनं ताब्यात घेण्याची चिन्ह निर्माण झाली, तर पश्चिम तटबंदीकडून बाहेर पडून

---

राजकुटुंबीयांना नदीमार्गे होडीतून निसटता यावं, अशी रचना नदीच्या बाजूला पायऱ्या ठेवून केली आहे. गडाच्या पश्चिम बाजूला नदीचा खोल डोह असल्याने तो नैसर्गिक खंदकच ठरला आहे. गडातील लोक आणि सैन्याला आवश्यक असणारा पाणीपुरवठा या बारमाही नदीतून होत असे. याच गोष्टीमुळे हा गड नदीच्या बाजूला बांधण्यात आला.

गडाच्या मुख्य प्रवेशद्वाराचं कामही अतिशय दर्जेदार पद्धतीनं केलेलं आहे. प्रवेशद्वारावर मोठा नगारखाना बांधण्यात आला आहे. १९७० पर्यंत मुख्य प्रवेशद्वाराची कवाडं शिल्लक होती. त्यांची उंची २० फूट आणि रूंदी सहा फूट होती. असा हा इतिहासाचा वारसा सांगणारा भक्कम दुर्ग आवर्जून पाहावा असाच आहे.

# भाजे लेणी

लेण्यांजवळचा आणखी एक धबधबा म्हणजे भाजे. लोणावळ्याजवळच्या प्रसिद्ध कार्ले- भाजे लेण्यांच्या जोडगोळीतील भाजे म्हणजे विसापूर किल्ल्याच्या पायथ्याची लेणी. साधारण जुलैनंतर इथला धबधबा सुरू होतो. पुणे- लोणावळा लोकलच्या मळवली स्टेशनला उतरून नव्या मुंबई-पुणे हायवेवरच्या फोटोजेनिक पुलावरून डांबरी रस्त्याने चालत अर्ध्यापाऊण तासांत भाजे गावात पोहोचता येतं. रिक्षाही मिळतात. पण आजूबाजूच्या ओल्या- हिरव्या- डोंगरी निसर्गसौंदर्यामुळे पावसाळ्यात हा 'डांबर ट्रेक'ही सुसह्य होतो. या रस्त्याने थेट पुढे लोहगडवाडीच्या दिशेने चालत जातानाही छोटे छोटे धबधबे येत राहतात. एकवीरा देवस्थानासाठी प्रसिद्ध असलेल्या कार्ले लेण्यांच्या छोट्या डोंगरावरही पायऱ्यांच्या बाजूने डोंगरावरून येणारे मिनी धबधबे अंगावर घेता येतात.



मुंबईहून पुण्याकडे जाताना लोणावळा सोडले की, लोहगड-विसापूर ही किल्ल्यांची जोडगोळी गिर्यारोहकांचे लक्ष वेधून घेते. मळवली रेल्वे स्थानकावर उतरल्यावर समोरच दिसतो तो लोहगड, मात्र डोंगरामागे लपलेला विसापूर किल्ला भाजे गावात गेल्यावरच नजरेस पडतो. पवनामावळात मोडणारा हा विसापूर किल्ला, लोणावळा (बोर) घाटाचे संरक्षण करण्यासाठी बांधण्यात आला होता. मराठे १६८२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात पुण्याच्या उत्तर बाजूला स्वारीसाठी गेले. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शहाबुद्दीन चाकणमध्ये होता. मराठे लोहगडाच्या बाजूला आल्याचे समजल्यावर तो तेथे पोहोचला. तेथे झालेल्या चकमकीत ६० माणसांची कत्तल झाली. तेथून मराठे विसापूर किल्ल्यावर गेल्याचे समजले, तो पाठलाग करत तेथे पोहोचेपर्यंत मराठे कुसापूर गावाजवळ पोहोचले. १६८२मध्ये मराठ्यांचा आणि मोगलांचा शिवाशिवीचा खेळ चालूच होता.

४ मार्च १८१८ला जनरल प्रॉथर लोहगड जिंकण्यासाठी आला. त्याने सर्व प्रथम विसापूर जिंकला. ज्या दिवशी विसापूर इंग्रजांनी घेतला त्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठे लोहगड सोडून गेले. पायऱ्यांच्या सहाय्याने किल्ल्यावर जाताना एक मारुतीचे देऊळ आहे. बाजूलाच दोन गुहा आहेत. यात ३० ते ४० जणांची राहण्याची सोय होते. मात्र पावसाळ्यात गुहेत पाणी साठते. गडावर पाण्याची तळी आहेत. गडावरील पठारावर लांबवर पसरलेली तटबंदी आपले लक्ष वेधून घेते. गडावर एक मोठे जातंही आहे.

## कसे जाल

मुंबई-पुणे लोहमार्गावर मळवली या रेल्वे स्थानकावर उतरावे. येथून भाजे गावात यावे. भाजे गावातून विसापूर किल्ल्यावर जाण्यास दोन वाटा आहेत.

- पहिल्या वाटेने गडावर जायचे झाल्यास वाटाड्या घेणे आवश्यक ठरते. भाजे लेण्यांना जाण्यासाठी पायऱ्या आहेत. या पायऱ्या सोडून एक पायवाट जंगलात गेलेली दिसते. उजवीकडची पायवाट धरल्यावर २० मिनिटे चालून गेल्यावर काही घरे लागतात. या वाटेने आपण मोडकळीस आलेल्या पायऱ्यांपाशी पोहोचतो येथे बाजूलाच एक मंदिर आहे.
- दुसऱ्याच वाटेने भाजे गावातून गायमुख खिंडीपर्यंत यावे. गायमुख खिंडीतून डावीकडे जंगलात जाणारी वाट थेट विसापूर किल्ल्यावर घेऊन जाते.
- मळवली स्थानकातून बाहेर आल्यावर वाटेत एक्स्प्रेस हायवे लागतो. हायवे पार करण्यासाठी बांधलेल्या पादचारी पुलावरून डावीकडे उतरणारा जिना उतरल्यावर पाटण गाव लागते. याच पाटण गावातून विसापूरवर जाण्याचा रस्ता आहे.

## लोहगड-विसापूर

नवख्यांसाठी ट्रेकिंगचा श्रीगणेशा करायला उत्तम ट्रेक म्हणजे लोहगड-विसापूर हे दोन जुळे किल्ले. हे किल्ले सहज आणि बऱ्यापैकी सोप्या चढणीमुळे एक चांगला पिकनिक स्पॉटही ठरू शकतात. लोहगड किल्ल्याची बांधणीही मस्तच आहे. या किल्ल्याचे चार मजबूत दरवाजे आजही शाबूत आहेत. तसंच या दरवाजांची रचनाही बघणाऱ्याला थक्क करेल, अशीच आहे. लोहगडावरचा सर्वात महत्त्वाचा आणि सुंदर पॉइंट म्हणजे विंचूकाटा. विंचूकाट्यापर्यंत पोहोचणं जरासं जिकीरीचं काम आहे, पण तिथे पोहोचल्यानंतर दिसणाऱ्या दृष्याची तुलनाच नाही.

लोहगडच्या पायथ्यापासून चालत अक्षरशः पंधरा मिनिटांत विसापूरच्या पायथ्याशी पोहोचता येतं. ही वाट पावसाळ्यात धम्माल आणि तितकीच रिस्की ठरू शकते. कारण वरून झकासपैकी पाणी कोसळत असतं. त्याशिवाय जरा फिरून दुसऱ्या वाटेनंही किल्ल्यावर जाता येतं. पण पाण्याचा मारा झेलत चढण्याची मजा काही औरच. पण या किल्ल्याची तटबंदी मात्र अजूनही ठणठणीत आहे.

लोहगडच्या पायथ्याशी असलेल्या गावात दोन-तीन हॉटेलं आहेत. तिथे नाश्ता करून जेवणाची ऑर्डर द्यायची आणि लोहगड पालथा घालून दोन-तीन तासांत खाली मस्त गरमागरम भाकरी आणि झुणक्यावर ताव मारायला यायचं.

### कसं जाल?

- मुंबईवरून लोणावळ्याला थांबणाऱ्या कोणत्याही मेल-एक्सप्रेसने लोणावळा. तिथून लोकल किंवा रिक्षा, बसने मळवली. मळवलीहून चालत भाज्याच्या लेण्यांजवळून दीड-दोन तासांत लोहगडचा पायथा.
- मुंबईहून पुण्याकडे जुन्या मुंबई-पुणे मार्गाने जाणाऱ्या किंवा एक्सप्रेस वेने लोणावळ्याला थांबणाऱ्या बसने लोणावळा.
- स्वतःची बाइक किंवा कार असल्यास लोणावळ्यावरुन थेट लोहगडाच्या पायथ्याशी पोहोचता येते.

### काय काळजी घ्याल?

- ऐतिहासिक स्थळांचं पावित्र्य जपा.
- ट्रेकिंग करताना नेहमी सावधपणे पावलं टाका.
- चांगली ग्रीप आणि सोल असलेले बूट घाला.
- दोन्ही किल्ल्यांवर पाण्याचा साठा जवळजवळ नसल्याने पाणी बरोबर ठेवा.



# इतिहासाचा शिलेदार

**इतिहासाची आवड असणारा प्रत्येक जण गडकिल्ल्यांना भेट देतोच. पावसाळ्यात अशा गडकिल्ल्यांवर भटकायचं असेल, तर लोहगडला जायलाच हवं.**

सह्याद्रीच्या रांगेत दडलेल्या प्राचीन लेणी, झाडावेलींनी झाकलेल्या डोंगररांगा, ऐन पावसात खळखळणारे झरे, बेधुंद डोंगररांगातून घोंगवणारा वारा... अशा वातावरणात एखादा मुक्काम करायला सगळ्यांनाच आवडेल. असा निसर्गाने परिपूर्ण असा पवनमावळचा छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यातील लोभस महत्त्वाचा दुर्ग म्हणजे लोहगड.

लोहगडला जाण्यासाठी मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या गाडीने लोणावळ्याला जायचं. पुढे लोकल ट्रेनने मळवली स्टेशन गाठायचं. मळवलीहून लोहगडाचा पायथा साधारण तीन किलोमीटर अंतरावर आहे. एक्सप्रेस हायवेवरील पूल पार करून जवळच भाजे गाव येतं. इथेच डाव्या हाताला डोंगररांगेत भाजे लेण्या दिसतात, तर समोरच लोहगडचा विंचूकडा आपलं लक्ष वेधून घेतो. पायथ्याशी असणाऱ्या भाजे गावात एमटीडीसीचं हॉटेल आहे. इथे मुक्काम करता येईल.

साधारण तासभराच्या पायपीटीनंतर लोहगड विसापूरच्या खिंडीत येऊन पोहोचतो. डाव्या हाताला जाणारी वाट विसापूरकडे जाते तर उजव्या हाताने मळलेली वाट थेट लोहगडवर जाते. मोठमोठ्या वृक्षांनी वेढलेल्या या वाटेवरुन जाताना अनोखा आनंद होतो. गड चढण्यास पायऱ्या असल्याने लहान मुलांना बिनधास्त नेता येतं. प्रथम लागतो, तो गणेश दरवाजा. इथून थोडं पुढे गेल्यावर नारायण दरवाजा येतो. इथेच दोन भुयारं दिसतात. या भुयारात भात आणि नाचणीचं धान्य कोठार होतं. पुढे येतो तो हनुमान दरवाजा आणि शेवटी मुख्य महाद्वार. हे चारही दरवाजे सुरळीत आणि कोरीव मूर्त्यांनी नटलेले असल्याने आपल्याला इथेच खिळवून ठेवतात.

महादरवाजातून मुख्य गडावर प्रवेश करताच समोर मशिदीसारखी इमारत दिसते. इथून तटाशेजारुन जाताना टेकडीखाली प्रशस्त गुहा दिसते. या गुहेला लोमेश ऋषींची गुहा म्हणून ओळखलं जातं. ही गुहा मोठी असल्याने मुक्कामासाठी उत्तम आहे. गुहेशेजारीच पिण्याच्या पाण्याचं तळं आहे. टेकडीवर तळे, वाड्यांचे अवशेष अशा अनेक ऐतिहासिक वास्तू पहायला मिळतात. तिथलं त्रिंबकेश्वर महादेवाचं मंदिर आपलं लक्ष वेधून घेतं.

इथून गडाच्या पश्चिम दिशेला चालत गेल्यावर विंचवाच्या नांगीसारखा कडा नजरेस पडतो. कड्यावरच पाण्याचे टाके दिसतात. याच कड्यावरुन संपूर्ण गडाच्या तटांवर नजर ठेवता येते. लढाईप्रसंगी गडाच्या रक्षणासाठी या कड्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असे. या विंचूकड्याच्या नैऋत्येला उंबरखिंडीत शाहिस्तेखानाचा सरदार करतलब खानाची मराठ्यांनी कोंडी केली आणि त्याला पिटाळून लावलं, असा इतिहास आहे.

साधारण दोन तासांच्या फेरफटक्यात गड पाहता येतो. गडावर वाहणारा थंड वारा अंगावर शहारे आणतो. तर रिपरिपणारा पाऊस, मधूनच येणारे ढग जणू स्वर्गातच आलोय की काय अशी जाणीव करून देतात.

लोहगड १६५७ च्या सुमारास स्वराज्यात सामील झाला. तर इ. स. १६६४ मध्ये सुरतेहून आणलेली लूट छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडावर ठेवली होती. तेव्हा या गडाचं अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येतं. तर पुढे पुरंदरच्या तहात २३ किल्ले मोघलांना देण्यात आले. त्यात लोहगडही सामील होता. पुढे १३ मे १६७० रोजी हा किल्ला पुन्हा स्वराज्यात सामील करून घेतला. अशा या निसर्गाने परिपूर्ण, रानावनांनी नटलेल्या, वेलीफुलांनी वेढलेल्या लोहगडाला या पावसाळ्यात आवर्जून भेट द्या.






# ट्रेकर्सचा हक्काचा लोहगड

पवना मावळात असणारा आणि लोणावळा (बोर) घाटाचा संरक्षक असणारा हा लोहगड पुणे-मुंबई हमरस्त्यावरून सहजच नजरेस पडतो. पुण्या आणि मुंबईपासून जवळ असल्या कारणाने येथे ट्रेकर्स मंडळींची नेहमीच ये-जा चालू असते.

लोहगड किल्ला हा अतिशय मजबूत, बुलंद आहे. गडावर चढताना आपल्याला सलग चार प्रवेशद्वारांमुळे तयार झालेल्या सर्पाकार मार्गावरून जावे लागते. त्या प्रवेशद्वारांची नावे पुढीलप्रमाणे:

■ **गणेश दरवाजा :** याच्याच डाव्या-उजव्या बुरुजाखाली सावळे कुटुंबाचा नरबळी देण्यात आला होता आणि त्याच्या बदल्यात त्यांच्या वंशजांना लोहगडवाडीची पाटीलकी देण्यात आली होती. येथे आतील बाजूस शिलालेख आहेत.

■ **नारायण दरवाजा :** हा दरवाजा नाना फडणीसांनी बांधला. येथे एक भुयार आहे. जिथे भात व नाचणी साठवून ठेवण्यात येई. या दरवाजाच्या दोन्ही बाजूस व्याघ्रशिल्प कोरलेली आहेत.

■ **हनुमान दरवाजा :** हा सर्वात प्राचीन दरवाजा आहे. या दरवाजाच्या दोन्ही बाजूंस शरभाच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत.

■ **महादरवाजा :** हा गडाचा मुख्य दरवाजा आहे. यावर हनुमानाची मूर्ती कोरली आहे.

महादरवाजातून आत शिरताच एक दर्गा लागतो. दर्ग्याच्या शेजारी सदर व लोहारखानाचे भग्न अवशेष आढळतात. याच दर्ग्याच्या बाहेर बांधकामाचा चुना बनवण्याचा घाणा आहे. उजवीकडे ध्वजस्तंभ आहे. याच्याजवळच एक तोफ काही हौश दुर्गप्रेमींनी सिंमेटच्या चौथऱ्यात बसवली आहे. अशीच एक तोफ तुटलेल्या अवस्थेत लक्ष्मीकोठीच्या समोर पडलेली आहे. ध्वजस्तंभाच्या उजवीकडे चालत गेल्यास लक्ष्मी कोठी आढळते. या कोठीत राहण्याची सोय होते. या कोठीत अनेक खोल्या आढळतात. दर्ग्याच्या पुढे थोडे उजवीकडे गेल्यास थोडा उंचवट्याचा भाग



अनु.

आहे, तिथे एक सुंदर शिवमंदिर आहे. पुढे सरळ चालत गेल्यावर एक छोटेसे तळे आहे. हे तळे अष्टकोनी आहे. त्याच्याच बाजूला पिण्याच्या पाण्याची टाकीदेखील आहे. ही गडावरील पिण्याच्या पाण्याची एकमेव सोय आहे. तिथून पुढे पंधरा ते वीस मिनिटे चालत गेल्यास एक मोठे तळे आढळते. नाना फडणवीसांनी या तळ्याची बांधणी केली होती. हे तळे सोळा कोनी आहे. मोठ्या तळ्याच्या पुढे विंचूकाट्यांकडे जाताना वाड्यांचे काही अवशेष दिसतात.

लक्ष्मी कोठीच्या पश्चिमेस विंचूकाटा आहे. या विंचूकाट्यास बघून आपल्याला आठवण येते ती राजगडाच्या संजीवनी माचीची. पंधराशे मीटर लांब आणि तीस मीटर रुंद अशी ही डोंगराची सोंड आहे. विंचुकाट्यावर जाण्यासाठी एक टप्पा उतरून पलीकडे जावे लागते. गडावरून पाहिले असता हा भाग विंचवाच्या नांगीसारखा दिसतो, म्हणून यांस विंचूकाटा म्हणतात. या भागात पाण्याची उत्तम सोय आढळते. गडाच्या आजूबाजूचा परिसर न्याहाळण्यासाठी या विंचूकाट्याचा उपयोग होत असावा. या गडावरून येताना भाजे गावातील भाजे लेण्या आवर्जून पाहाव्यात.

## कसे जाल :

### ■ पुण्याहून अथवा मुंबईहून :

पुण्याहून अथवा मुंबईहून येताना लोणावळ्याच्या पुढे असणाऱ्या मळवली स्थानकावर उतरावे. तेथून एक्स्प्रेस हायवे पार करून भाजे गावातून थेट लोहगडला जाणारी वाट पकडावी. वाट मोठी आणि प्रशस्त आहे. तिथून दीड तासांच्या चालीनंतर 'गायमुख'खिंडीत येऊन पोहचतो. खिंडीच्या अलीकडेच एक गाव आहे, त्याचे नाव लोहगडवाडी. खिंडीतून उजवीकडे वळले म्हणजे लोहगडास पोहोचतो आणि डावीकडे वळले म्हणजे विसापूर किल्ल्यावर पोहोचतो. या मार्गे लोहगडावर प्रवेश करताना चार दरवाजे लागतात.



अनु.

## लोणावळ्याहून

लोणावळ्याहून दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने थेट लोहगडावाडीपर्यंत जाता येते. पवना धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याने थोडे पुढे गेल्यावर डावीकडे एक रस्ता लागतो, तेथून ३ ते ४ किमी अंतरावर लोहगडावाडी आहे. उभा चढ आणि अतिशय धोकादायक वळणे आहेत. साधारण अर्धा तासाचा प्रवास आहे. मात्र येथे एसटी महामंडळाची सोय नाही. स्वत:चे वाहन असल्यास उत्तम अथवा लोणवळ्यातून जीपने जाता येते. मात्र जीपचे भाडे १००० रुपये आहे.

## काळे कॉलनीहून

काळे कॉलनी ही पवना धरणाजवळ वसलेली आहे. तेथून लोहगड आणि विसापूरमधील गायमुख खिंड परिसर व्यवस्थित दिसतो. पवना धरणाच्या खालून एक रस्ता गायमुख खिंडीच्या डावीकडील टेकडीवर जातो. तेथून एक मळलेली पायवाट आपणास लोहगडावाडीत घेऊन जाते. या टेकडीवर अग्रवाल नावाच्या इसमाचा बंगला आहे. या वाटेने किल्ल्यावर जाण्यास २ तास लागतात.



# किल्ले तुंग






*इतिहास ज्याची साक्ष देतो,*
*ज्याचं व्यक्तिमत्त्व उत्तुंग।*
*मऱ्हाठे ही ज्याच्या प्रेमात पडले,*
*हाच तो गड तुंग॥*

असं वर्णन असलेला सह्याद्रीच्या मुख्य रांगेवर बसलेला तुंग किल्ला होय. मुंबई-पुणे लोहमार्गावर लोणावळा इथे उतरून संध्याकाळी चारच्या मुक्कामाच्या एसटीने सरळ तुंगवाडीस जाता येतं. गडाची उंची साधारण ३५२६ फूट आहे. गड

पायथ्याशी भैरवनाथाचा मंदिर आहे. इथे आपण रात्री मुक्काम करू शकतो. मंदिराच्या समोरच काळ्या पाषाणात कोरीव काम केलेले दगड ठेवलेले दिसतात.

पायथ्यावरून गडावर जाणारी वाट सहसा दिसत नाही. पायथ्याशी घनदाट झाडी असल्याने पायवाटही दिसून येत नाही. जसं जसं पायवाटेने वर जावं तसे वाटेत दगडात खोदलेलं पाण्याच टाकं लागतं. थोडं पुढे गेल्यावर हनुमंताची पाषाणात कोरलेली मूर्ती दिसते. अगदी चिंचोळ्या पायवाटेने वर जाताना वाटेत कंबरेएवढं वाढलेलं गवत असल्याने प्रत्येक पाऊल जरा सांभाळूनच टाकावं लागतं.

पायथ्यापासून गडावर येण्यासाठी साधारण अर्धा पाऊण तास लागतो. किल्ल्याच्या दरवाजा जरी छोटा असला तरी सध्या सुस्थित आहे. थोडं पुढे गेल्यावर पहारेकऱ्यांसाठी देवड्या बांधलेला दुसरा दरवाजा लागतो. तर समोरच कातळात खोदलेले गोड्या पाण्याचे तलाव आणि त्या शेजारी गणपतीचे छोटेखानी मंदिर दिसतं. गडाच्या सर्वोच्च शिखरावर जाण्यासाठी अवघड अशी पायवाट साधारण पंधरा-वीस मिनिटांत पार करता येते. गडमाथ्यावर पोहोचताच चारही दिशांना जो निसर्ग सौंदर्य पाहावयास मिळते, ते पाहून मन भारावून जातं.

बालेकिल्ल्यात या शिखरावर तुंगाई देवीचं छोटं मंदिर आहे. या शिखरावर उभं राहण्यास जेमतेम जागा असल्याने शिखरावर वावरतांना योग्य ती काळजी घ्यावी लागते. गडावरून पावना धरण, उत्तरेस लोहगड, विसापूर हे जोड किल्ले तर पश्चिमेला त्रिकोणी आकाराचा तिकोना आपलं लक्ष वेधून घेतो.

किल्ल्याची पायवाट अरुंद आणि अत्यंत चिंचोळ्या जागेतून असल्याने शिवकाळात किल्लास कठीणगड हे नाव दिलं होतं. याची योग्य जाणीव होते. गडाची उंची आणि आकार लक्षात घेता गडाचा मुख्य वापर टेहाळणी बुरूज म्हणून होत होता. तर संस्थाने विलीन होईपर्यंत या किल्ल्याची व्यवस्था पाहण्याचं काम भोर संस्थानाकडे होतं. अशा या इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ल्याला एकदा तरी आवर्जून भेट द्यावी.



मुळशी धरणाच्या पश्चिमेकडील मावळ प्रांतात कोराई आणि घनगड हे किल्ले येतात. लोणावळा आणि पाली यांच्यामध्ये असणाऱ्या सवाष्णी घाटाच्या माथ्यावर कोरीगड आहे. हा किल्ला [illegible] आहे तो त्याच्या अखंड तटबंदीमुळे.

## काय पहाल?

पेठशहापूर गावातून कोराई एखाद्या भिंतीसारखा भासतो. गडमाथा म्हणजे एक भलेमोठे पठारच आहे. गडाची तटबंदी साधारणत: दीड किलोमीटर लांबीची आहे. तटबंदीवरून संपूर्ण गडाला फेरा घालता येतो. पेठशहापूरच्या वाटेने वर येताना मार्गात अनेक गुहा व पाण्याची टाके आणि श्री गणेशाची मूर्ती लागते. या गणेश दरवाज्याने अर्थात पेठ शहापूरच्या वाटेने वर आल्यावर समोरच वाड्यांचे अवशेष आढळतात. समोरच पठारावर दूरवर कोराईदेवीचे मंदिर आहे. मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. मंदिरासमोरच एक दीपमाळ आहे. कोराईदेवीच्या मूर्तीची उंची साधारणत: चार फूट आहे. गडावर दक्षिणेकडच्या बाजूस अनेक बुरूज आहेत. गडावर आजही सहा तोफा आहेत. त्यापैकी सर्वात मोठी 'लक्ष्मी ' तोफ कोराईदेवीच्या मंदिराजवळ आहे. याचप्रमाणे गडावर आणखी दोन मंदिरे आहेत. गडावर दोन विस्तीर्ण तळी आहेत. तळ्यांच्या पुढे आणखी दोन गुहा आहेत. येथेच शंखचक्र गदापद्मधारी श्री विष्णूची मूर्ती आहे. गडावरून समोरच नागफणीचे टोक, तुंग, तिकोना, माथेरान, प्रबळगड, कर्नाळा आणि माणिकगड असा सर्व परिसर दिसतो.

## पोहोचण्याचे मार्ग

**पेठशहापूर मार्ग:** कोराईला जाण्यासाठी लोणावळ्याला जाऊन तेथून आयएनएस शिवाजीमार्गे आंबवणे किंवा भांबुर्डेला जाणारी किंवा (ॲम्बी व्हॅली) सहारा प्रकल्पाकडे जाणारी बस पकडावी आणि भुशी धरणाच्या पुढे (आयएनएस शिवाजीच्या) पुढे २२ किमी. वरील पेठशहापूर गावात उतरावे. या गावातून सरळ जाणारी पायवाट आपल्याला गडाच्या पायऱ्यांपाशी घेऊन जाते. पायऱ्यांच्या सहाय्याने २० मिनिटांत गडावर पोहचता येते.

**आंबवणे गावमार्ग:** आंबवणे गाव हे पेठशहापूर गावाच्या अलिकडे आहे. या वाटेने जाण्यासाठी लोणावळ्याहून भांबुर्डेकडे अथवा थेट आंबवणेकडे जाणारी बस पकडावी. गावातून अर्ध्या तासात गडावर जाता येते.




# जाऊ ना तिकोणा

जुन्या मुंबई-पुणे हायवेवरुन लोहगड आणि विसापूरचा किल्ला दिसतो. मात्र दोन किल्ल्यांच्यामध्ये दिसणारा डोंगर म्हणजे पौना मावळ प्रांतातील तिकोणा म्हणजेच वितांगगड होय. नवीन एक्सप्रेस हायवेवरुन हा किल्ला स्पष्टपणे दिसतो. आकाराने त्रिकोणी असल्याने या किल्ल्याला तिकोणा नाव पडले आहे.




## काय पाहाल?

- किल्ल्याचं भव्य प्रवेशद्वार
- गडावरील त्रंबकेश्वराचं मंदिर
- गुंफा, तळं
- गडावरुन सहज दिसणारे लोहगड आणि तुंगागड

## इतिहास

सन १६५७मध्ये निझाम शहाच्या ताब्यात असणारा तिकोणा गड शिवाजी महाराजांनी जिंकला. या गडाबरोबरच माहुली, लोहगड, विसापुर, सोनगड, ताला आणि कर्नाळा असे सर्वच किल्ले जिंकत कोकणात आपला तळ पक्का केला. यामुळे माहराजांना पौना मावळ प्रांतमध्ये शत्रुच्या हालचालींवर लक्ष ठेवणं सोप्पं झालं. १६८२मध्ये राजे संभाजी आणि औरंगजेबचा मुलगा अकबर यांची या गडावर भेट झाली होती. तर १८१८साली मराठे आणि ब्रिटीश यांची लढाई या किल्ल्यावर झाली. त्यामध्ये या किल्ल्याची मोठी पडझड झाली.

## राहण्याची सोय

पावसाळा वगळता इतर दिवसांमध्ये गडावरील गुंफामध्ये १० ते १५ जण राहू शकतात. गडावर जेवणाची कसलीही सोय नाही. इथे जाताना काही स्नॅक्स किंवा जेवणाचा डबा सोबत नेणं बरं. तिकोणावर बारमाही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

## पातळी


सोप्पा, तिकोणा पेठपासून एक ते दीड तासामध्ये आरामात गडावर पोहचता येते. पावसाळ्यात तिकोणावर जाणं अधिक चांगलं आणि सोयिस्कर आहे.

## कसं जाल?

या गडाच्या पायथ्याशी गावंडे म्हणजेच तिकोणा पेठ नावाचं गाव आहे, जिथून खरा ट्रेक सुरु होतो. तिकोणा पेठला पोहचण्यासाठी लोणावळा स्टेशनपासून दोन स्थानकं पुढे असणा-या कामशेतला उतरुन बसने किंवा जीपने तुम्ही काळे कॉलनीजवळ उतरायचं. तिथून पुन्हा दुस-या गाडीने तिकोणा पेठला पोहोचू शकता. थेट तिकोणा पेठलाही जीप जातात. तिकोणा पेठपासून सरळ तुम्ही गडावर चढू शकता. यावर जास्त कठीण चढ नसून नवख्या ट्रेकरलाही हा ट्रेक आरामात जमेल. तुम्ही लोहगड, विसापुर, बिडसे गुंफा आणि तिकोणा असा ट्रेक ग्रूप करु शकतात. या ट्रेकच्या मार्गात बिडसे गुंफामार्गे तिकोणा जवळ आहे. याशिवाय तुंगा आणि तिकोणा असा दुहेरी ट्रेक करायचा असल्यास तुंगा किल्ला उतरल्यानंतर तुंगावाडीतून तुम्ही ब्राम्हणोली गावामार्गे अर्ध्या तासात तिकोणा पेठला पोहचू शकता.

# ट्रेक ब्रेक





# पवनाकाठची रमणीय सफर

हिरव्यागर्द झाडीसारखं रंगरूप धारण केलेल्या पाण्यामध्ये एका विशाल डोंगराचं प्रतिबिंब पडल्यावर ते किती मनोहर दिसू शकतं, हे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कळणार नाही. डोंगराची भव्यता कधी या पाण्यात आणखी डोळे दिपवणारी ठरते, तर कधी हा डोंगर अगदी हातभर अंतरावर भासू लागतो. हे सगळं चित्र जर आपल्याला तीन-साडेतीन हजार फूट उंचीवरून दिसलं, तर काय बहार येईल?

पवनेच्या पाण्यात तुंग किंवा तिकोना या जुळ्या डोंगरांचं प्रतिबिंब हे असंच विलोभनीय असतं. खरं तर हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी तिकोना डोंगरावरच जायला हवं आणि तिथूनच लोणावळा परिसरातल्या या गडकिल्ले आणि हिरव्या पाण्याचा रंग पहायला हवा. तिकोना या छोटेखानी किल्ल्यावरची भटकंती अगदी सहज एका दिवसात होण्याजोगी आहे. मुख्य म्हणजे नेहमी ट्रेकिंगचा सराव नसलेल्यांनाही या गडावर जाणं, हा एक निश्चितपणे आनंददायी प्रकारच असतो. इथे वाट चुकण्यालाही तसा फारसा स्कोप नाही. त्यामुळे एखाद्याने खूप खूप ठरवलं की, वाट सोडून जायचं, तरी शेवटी तो फार भरकटू शकत नाही आणि तिकोन्याला पोहोचतोच.

लोणावळा परिसरात कामशेतजवळ पवना डॅमच्या जवळ असलेला हा छोटेखानी किल्ला तुम्ही तासाभरात सहज सर करू शकता. किल्ल्यावरची वाट सहजसोपी आहे. किल्ला छोटा असला, तरी त्यावरची भटकंती मनमुराद आनंद देणारी आहे.

एका दिवसाच्या या सफरीसाठी मुंबईतून इंद्रायणी एक्सप्रेस ते इंद्रायणी एक्सप्रेस असं आयोजन होऊ शकतं. आदल्या दिवशी जाणं शक्य असेल, तर थेट कामशेतपर्यंत पोहोचायला काही हरकत नाही. अन्यथा इंद्रायणी एक्सप्रेसने लोणावळ्याला उतरून लोकलने कामशेतला पोहोचायचं. तिथे काळे कॉलनीकडे जाणाऱ्या बऱ्याच एसटी बसेस मिळतात. कामशेतहून काळे कॉलनीपर्यंत अर्ध्या तासाच्या आतच पोहोचता

वीकएन्ड

## तिकोना



अनु.

येतं. काळे कॉलनीहून तिकोना पेठ या तिकोन्याच्या पायथ्यापर्यंत जीपगाड्याही मिळतात. पण हे अंतर सहा-सात किलोमीटरच असल्याने पायी चालायला काहीच हरकत नाही. पौड-मुळशीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दिशेने आपण हळूहळू पवनेच्या काठाकाठाने चालू लागतो. समोर तुंग गडही दिसत असतो. तो उजव्या हाताला ठेवून आपण तिकोन्याकडे मार्गक्रमणा करतो. काळे कॉलनीपासूनच आपल्याला त्रिकोणी आकाराचा आणि त्यामुळेच हे नाव पडलेला तिकोना ऊर्फ वितंडगड आपल्याला सहज ओळखू येतो. तिकोना पेठ गावातून पाऊलवाट वर जाते. ही वाटही जोखमीची नाही आणि चढही ग्रॅज्युअल आहे.

सकाळच्या वेळी सूर्य डोक्यावर येऊ लागला, तरीही पवनेवरून येणारं वारं वातावरण सुखद करीत असतं. त्यामुळे कायम ताजंतवानं वाटतं. साधारण पाऊण तासातच आपण पहिल्या टप्प्यावर पोहोचतो. तिथे एक गुहा आणि तळं आहे. इथून एक पायवाट बालेकिल्ल्याकडे जाते. तिथे थोड्या पायऱ्यांच्या मार्गाने वर जाताना वाटेत एक छोटी गुहा आणि पाण्याचं टाकं लागतं. हे पाणी पिण्यासाठी चांगलं आहे. टाकं तसं आत असल्याने कातळातलं पाणी कायम थंडगार असतं. वर किल्ल्याच्या माथ्यावर गेल्यावर आपल्याला जे सभोवतीचं दृश्य दिसतं, ते खासच. त्यासाठीच तर इथे यायचं. इथून लोहगड-विसापूर,



जांभुळी, मोर्वी डोंगरांची रांग आणि अर्थातच पवना तलावाने वेढलेला तुंग यांचं सुंदर रूप न्याहाळता येतं. डोंगरमाथ्यावर प्राचीन शंकर मंदिर आहे. तिकोन्यावरून पुन्हा खाली उतरताना काळे कॉलनीत अर्ध्या तासातही परतता येतं. अशी ही सफर फारच सुंदर ठरते.

एका दिवसात ट्रेकची मजा आणि ट्रिपची सोय हे दोन्ही साधता येतं. वाटेत पाणी नसल्याने गडावरील पाण्याच्या टाक्यापर्यंत पोहोचेपर्यंत आपलं पाणी पुरवून वापरायचं, इतकी खबरदारी तुम्ही घ्यालच. शिवाय इथे खाण्यापिण्याची रसद तुम्हाला स्वतःलाच घेऊन जायला लागेल. एका दिवसाची सफर असल्याने गडावर पॅक्ड फूड नेणंच योग्य. रविवारी परतायचं असेल, तर येताना इंद्रायणी किंवा कोणत्याही गाडीचं आरक्षण बरोबर असलेलं बरं. थोडक्यात, गर्दीच्या दिवशी पुणे-मुंबई प्रवासात कामशेत, लोणावळ्यात गाडी पकडणं मोठ्या ग्रुपला त्रासाचं ठरू शकतं. त्याचा प्रबंध अगोदरच करावा, हे उत्तम.

## ५- गर्द झाडीचा थरारक रस्ता



घनगडावरून आंबवणे गावामार्गे लोणावळ्यापर्यंत येणारा रस्ता निसर्गाचं थरारक दर्शन घडवणारा आहे. पुण्याहून निघून ताम्हिणीच्या घाटातून घनगडचा रस्ता विचारत पुढं निघायचं. भांबुर्डा हे घनगडाच्या पायथ्याचं गाव. तिथपर्यंत न जाता, भांबुर्ड्याला पोहोचायच्या अलीकडेच आंबवणे विचारत निघायचं आणि थोडं पुढे आलं, की एक वळणावळणाचा रस्ता दिसतो. ही वळणंही साधीसुधी नाहीत, तर समोरून एखादा मोठा टेम्पो येत असूनही अत्यंत टोकदार वळणामुळं पत्ताही लागत नाही. तसंच गर्द झाडी इतकी, की वाहनांचे आवाज तर सोडाच; पण हॉर्नही धड ऐकू येतील, याची खात्री नाही. भर दुपारी चार वाजताही या वाटेवर बाइकचा हेडलाइट सुरू ठेवावा लागतो, इतका अंधार इथं असतो. त्या रस्त्यावरून जाताना अर्थातच त्यामुळे थंडीही वाजते. वातावरणच इतकं भन्नाट होत जातं, की 'एखादा थरारपट शूट करावा, तर इथंच' असंही वाटून जातं. मात्र, या रस्त्यावरून फिरताना विशेष मजा येते. मनापासून अतिप्रचंड भीती वाटणाऱ्या लोकांनी मात्र इथं येणं आवर्जून टाळाच.


ⓘ **कसं जाल?**

मुंबई - पुणे - ताम्हिणी - आंबवणे - लोणावळा

वर्तमानपत्रामध्ये जरी पुणे ते लोणावळा व्हाया ताम्हिणी घाट- आंबवणे यावे असे सुचविले असले तरी हा फेरा १२० किमी. एवढा होतो. ज्या रस्त्याबद्दल लिहीले आहे तो रस्ता फक्त भांबुर्डे लोणावळा हा ३३ किमी. एवढाच असून कोराईगडापासून तर फक्त १७ किमी.च आहे. त्यामुळे येथे लोणावळावरून जावे हे सोयीस्कर होईल.

# पुणे

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते पुणे | | | | | 148 | | | | |
| 1 | चिंतामणी थेऊर | | | मंदिर | | 24 | NE | | | |
| 2 | मल्हारगड | | किल्ला | मंदिर | ट्रेक | 31 | SE | 31 | S | |
| 3 | भुलेश्वर | | लेणी | मंदिर | | 56 | SE | 40 | NE | |
| 4 | मोरेश्वर मोरगांव | | | मंदिर | | 66 | SE | 26.5 | SE | |
| 5 | चांदर | खेडे | निसर्ग | | ट्रेक | 76 | SW | 131 | W | |
| 6 | पानशेत | बॅकवॉटर | निसर्ग | | पक्षीजीवन | 42 | SW | 34.5 | NE | |
| 7 | वरसगांव | बॅकवॉटर | निसर्ग | | | 45 | SW | 6 | N | |
| 8 | गारजाईवाडी | खेडे | | मंदिर | ट्रेक | 12.5 | NW | 55 | NE | |
| 9 | भंडारा डोंगर | | निसर्ग | मंदिर | | 41 | NW | 25 | NW | |




अजूनपर्यंत वास्तव्याच्या ठिकाणापासून(बेसपासून) उत्तर दिशेला जास्तीत जास्त अंतर असलेल्या ठिकाणावरून सुरुवात करून दक्षिणेकडे जात सर्वात लांबच्या ठिकाणापर्यंत जायचे याप्रमाणे स्थळांची यादी केली होती.परंतु पुण्यामध्ये अशा प्रकारे जायचे ठरविल्यास खूप जास्त अंतर प्रवास करावा लागतो. म्हणून येथे पुर्वेची स्थळे प्रथम आणि नंतर पच्छिमेच्या स्थळाना भेट द्यायची याप्रमाणे यादी केली आहे.



अनु.

## श्री चिंतामणी ( थेऊर )

श्रीं गणेशाची आराधना करून ब्रह्मदेवाचं चित्त स्थिर झालं ते स्थान म्हणजे



'स्थावर क्षेत्र' अथवा थेऊर. अत्याचारी राजा गणासुराचा वध केल्यानंतर कपिलमुनींनी विनायकाला चिंतामणी रत्न अर्पण केलं. ते गळ्यात धारण करणारा आणि मनीची चिंता हरण करणारा तो 'चिंतामणी विनायक' नावे प्रसिध्द झाला. पुणे जिल्ह्यात हवेली तालुक्यात थेऊर हे मुळा-मुठा नदींनी वेढलेलं क्षेत्र आहे. श्री चिंतामणीचं मंदिर भव्य असून सभामंडप लाकडी आहे. आवारात एक मोठी घंटाही आहे. मंदिरातील मूर्ती स्वयंभू असून पूर्वाभिमुख आणि आसन घातलेली आहे. डोळ्यात माणिक-रत्न आहेत. माधवराव पेशवे यांचं देहावसान इथं झालं आणि त्यांच्या पत्नी रमाबाई सती गेल्या. त्यांचं वृंदावन मुळा-मुठेच्या काठावर आहे. महाव्दारापासून पेशव्यांनी पक्की सडक बांधली आहे.






अनु.

ट्रेक म्हणजे अवजड सॅक, वर कॅरिमॅटचा रोलर लटकवलेला, दूरचा प्रवास... या साऱ्याला छेद देणारा छोटेखानी किल्ला म्हणजे सोनेरीचा किल्ला, म्हणजेच मल्हारगड तथा तरुण किल्ला! पुणे-सासवड मार्गावर 'दिवे' नावाचं गाव. तिथून पुढे 3 किमी अंतरावर सोनेरी गाव. दिवे घाटावर टेहळणीसाठी बांधला गेलाय सोनेरीचा किल्ला. गडाची उंची समुद्रसपाटीपासून ३१६६ फूट. पण आपण घाट चढून वरच्या अंगाला जात असल्याने चढाई केवळ ४० मिनिटांची.

किल्ल्याची तटबंदी अजून चांगल्या अवस्थेत आहे. दरवाजे, देवडी, पाण्याचं टाकं उत्तम स्थितीत आहे. जेजुरी, पुरंदर, वज्रगड व सिंहगड नजरेच्या टप्प्यात दिसतात. गडावर दोन सुबक मंदिरं आहेत. एक शंकराचं आणि एक खंडोबाचं. म्हणून याला मल्हारगड असंही म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळात वासुदेव बळवंत फडके आणि त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व इंग्रजांपासून बचाव करण्यासाठी याच गडाचा आश्रय घेतला. बरेच दिवस ते किल्ल्याच्या आधाराने बचाव करू शकले. पण फितुरीचा शाप भोवला. इंग्रजांना कुणकुण लागलीच व गडावर साहेबी सैन्य थडकलं. वासुदेव बळवंत फडके निसटून जाण्यात यशस्वी झाले पण त्यांचे काही एकनिष्ठ सहकारी इंग्रजांशी लढता धारातिर्थी पडले.

या गडाचे जनक, पेशवे दरबारातील मानकरी सरदार पानसे यांच्या वाड्याचे अवशेष सोनेरी गावात पहायला मिळतात. प्रवेशद्वाराची कमान, बुरुज, हत्ती बांधायची साखळी, देवडी,

वाड्यातील मंदिर, पायऱ्यांची विहिर प्रेक्षणीय आहे. थोरले माधवराव पेशवे येथे येऊन गेल्याची नोंद आहे. पानसे सरदारांचे वंशज सध्या हडपसर येथे असतात. गोकुळाष्टमीला मोठा उत्सव असतो. वाड्यातील मंदिरात दोनशेपर्यंत आत्पस्वकिय कृष्णजन्म सोहळ्यासाठी जमतात.

शनिवार-रविवार जोडसुट्टीसाठी पुरंदर व मल्हारगड हा छान पर्याय आहे, तर एक दिवसाच्या कौटुंबिक, ऐतिहासिक सहलीसाठी मल्हारगड सार्थ असेल.

गडावरील मंदिरं छोटी असून तेथे रहाण्याच्या उद्देशाने जावू नये. तसेच पाण्याची टाकी सुस्थितीत असली, तरी पाणी अस्वच्छ आहे. पाण्याचा पुरेसा साठा जवळ असणे आवश्यक आहे.



# भुलेश्वर

पुण्यात आणि आसपास भटकंतीची बरीच ठिकाणे प्रसिद्ध आहेत. अशाच ठिकाणांपैकी थोडेसे अपरिचित असलेले ठिकाण म्हणजे भुलेश्वर. तेराव्या शतकात बांधलेले हे प्राचीन हेमाडपंथी मंदिर स्थापत्याचा अजोड नमुना म्हणून ओळखले जाते. हा पूर्वी एक लहानसा किल्ला होता. दौलत-मंगलगड त्याचे नाव.

मंदिरात प्रवेश करण्यासाठी पायऱ्या चढून गेल्यावर एक लहान दरवाजा आहे. मुख्य बंदिस्त मंदिर वास्तूत प्रवेश केल्यानंतर आजूबाजूचे दृष्य हरखून टाकते. पुरुषभर उंचीचा नंदी, त्यावर एक दगडी मंडप, जिथे नजर जाईल तिथे अप्रतिम कोरीवकाम केलेली शिल्पे. हे सर्व वास्तूशिल्प लहान दरवाजाच्या आड लपवून परकीय आक्रमणापासून वाचवण्याची बुद्धिमत्ता मंदिर निर्मात्याने योजली आहे. काही मूर्ती भग्न अवस्थेत आहेत; पण आजही त्यांचे सौंदर्य तसूभरही कमी झालेले नाही. महाराष्ट्रात फक्त तीन ठिकाणी असणारे स्त्री-गणेशाचे शिल्प या ठिकाणी आहे. प्रत्येक शिल्प आणि खांब न्याहाळून पाहताना, त्याच्या निर्मात्या हातांना आपण आपोआपच नमन करतो.


तर मग कधी जाताय भुलेश्वरला?

**कसे जाल ?**

पुणे-हडपसर-उरुळीकांचन-यवत-भुलेश्वर.

**आसपासचा परिसर :**

सासवड, पुरंदर, जेजुरी, मल्हारगड, नारायणपूर, दिवेघाट, मस्तानी तलाव, थेऊर





अनु.



### श्री मोरेश्वर ( मोरगाव )

अष्टविनायकातील हा मानाचा गणपती. भूस्वानंद म्हणून ओळखलं जाणारं, मोरासारखा आकार असलेलं हे श्री क्षेत्र मोरगाव, पुरंदर तालुक्यात कऱ्हा नदीच्या तीरावर वसलेलं आहे. मोरावर बसून गणेशाने सिंधू दैत्याचं पारिपत्य केलं म्हणून मोरेश्वर (मयुरेश्वर) हे नाव प्राप्त झालं. भोवती तटबंदी असलेलं मोरेश्वराचं मंदिर एक प्रशस्त गढीच आहे. मयुरेश्वराची मूर्ती अत्यंत आकर्षक आहे. मूर्ती बैठी, डाव्या सोंडेची, पूर्वाभिमुख व त्रिनेत्री असून डोळ्यात आणि नाभित हिरे बसवलेले आहेत. मस्तकावर नागराजाचा फणा, डाव्या-उजव्या बाजूस आणि पुढे मूषक व मयूर आहेत. विशेष म्हणजे महाव्दारासमोर गणपतीकडे तोंड करून बसलेला काळ्या पाषाणाचा नंदी इथे दिसतो.

मोरगाव हे सिध्द साधू मोरया गोसावींचं जन्मस्थान आहे.

**पावसाच्या स्वागतासाठी सह्यकड्यांवर जायला हवं. कोकणातून देशाकडं सरकणारा पाऊस नेमका येतो कसा, ते पाहण्यासाठीचे हे काही पर्याय. यातले केळद, कुंड, राजमाची हे पर्याय सहकुटुंब जाण्यासारखे आहेत. चांदर आणि गारजाईवाडी हे हाडाच्या भटक्यांसाठी उत्तम.**

पावसाळ्याच्या सुरुवातीला पडणाऱ्या मुसळधार पावसाची मजा घेण्याकरीता काही ठिकाणे सुचविली आहेत. त्यापैकी चांदर, गारजाईवाडी येथे पुण्याहून तर केळद, कुंड येथे भोरवरून जाणे सोयीचे आहे. राजमाची लोणावळ्याहून जवळ आहे.

## चांदर वस्ती

चारही बाजूनं सह्याद्रीचे रौद्रभीषण कडे डोळ्यांत साठवत वसलेली चांदर वस्ती दुर्गम आणि देखणी. पानशेतच्या बॅकवॉटरमध्ये माणगाव, निवंगुणेवस्ती, दिघेवस्तीमार्गे चांदरला जाता येतं. जेवणाचा डबा आवश्यक.



रिचार्ज

# पानशेतचं बॅकवॉटर

पानशेत आणि वरसगावचं बॅकवॉटर अगदी कोकणात असल्यासारखाच फिल देणारं आहे. शहराजवळ असूनही प्रसन्न निसर्ग आणि हवी तशी शांतता या परिसरात अनुभवायला मिळते. बॅकवॉटरच्या अनुभवासह काही ठिकाणांची भटकंती करणंही शक्य आहे.

लाल माती...चमचमतं पाणी... हिरवीगर्द दाट झाडी आणि पक्ष्यांचं कूजन...नागमोडी रस्ते...शांत निवांत निसर्ग... हे वर्णन वाचलं, की कोकणात असल्यासारखं वाटतं ना? पण मुंबईपासून तीन तासांवर असलेल्या पुण्याच्या आसपासही अशी काही ठिकाणं आहेत, जिथं या मस्त वातावरणाचा अनुभव घेता येतो. सिंहगड, तोरणा, राजगड या गडांनी आणि सह्यकड्यांनी वेढलेल्या या पानशेत आणि वरसगाव बॅकवॉटरच्या परिसरात गेल्यावर अगदी कोकणात असल्यासारखंच वाटतं. वीकेंडला कुटुंबासह किंवा मित्रमंडळींना घेऊन एखादी सहल या भागात करायचा प्लॅन सहजच होऊ शकेल.

पुण्याच्या जवळ असूनही खडकवासल्याच्या धरण परिसरात पर्यटकांची जितकी गर्दी नियमितपणे असते, तितकी गर्दी पानशेत आणि वरसगाव धरणाच्या बॅकवॉटरच्या परिसरात दिसत नाही. गर्दीपासून मोकळा असलेल्या या भागात एका दिवसात भटकंती करणं सहज शक्य आहे. पानशेत धरणाच्या बॅकवॉटरनं पाबे घाटात जाता येतं. राजगड, तोरणा आणि सिंहगड हे तिन्ही गड पाबे घाटातून दृष्टिक्षेपात येतात अशी ती जागा आहे. एका अर्थानं, या तिन्ही सह्यकड्यांना पाहण्याचा केंद्रबिंदूही म्हणता येईल. या तिन्ही गडांवर चढाई करण्याचा हा अनवट मार्गही आहे. उदाहरणार्थ, सिंहगडावर जाताना बहुतेक सर्वजण हे पुणे दरवाजातूनच प्रवेशतात; पण पाबे घाटातून गेल्यावर कल्याण दरवाजाची वाट मिळते. याशिवाय सिंहगड व्हॅली ही एक उत्तम जागा आहे. बऱ्याचजणांना पक्षीनिरीक्षणाची आवड असलेल्यांसाठी आणि हौशी फोटोग्राफर्ससाठी ही जागा म्हणजे स्वर्गच जणू. थंडीच्या मोसमात बरेच देशी-विदेशी पक्ष्यांचं या व्हॅलीत आगमन होतं. या पक्ष्यांचं निरीक्षण करून त्यांचा अभ्यास करणं म्हणजे एक कला आहे. पक्षीनिरीक्षणाव्यतिरिक्त या परिसरात असलेल्या दुर्मिळ वनस्पती हादेखील संशोधनाचा विषय आहे. समृद्ध जंगलानुभव घेण्यासाठी सिंहगड व्हॅली हा उत्तम पर्याय ठरू शकतो.

वरसगाव धरणाचा परिसरही तसाच सुंदर आहे. शहराच्या जवळ असूनही इथं शहरी जगणं पोहोचलेलं नाही ही



अनु.


आणि सिंहगड हे तिन्ही गड पाबे घाटातून दृष्टिक्षेपात येतात अशी ती जागा आहे. एका अर्थानं, या तिन्ही सह्यकड्यांना पाहण्याचा केंद्रबिंदूही म्हणता येईल. या तिन्ही गडांवर चढाई करण्याचा हा अनवट मार्गही आहे. उदाहरणार्थ, सिंहगडावर जाताना बहुतेक सर्वजण हे पुणे दरवाजातूनच प्रवेशतात; पण पाबे घाटातून गेल्यावर कल्याण दरवाजाची वाट मिळते. याशिवाय सिंहगड व्हॅली ही एक उत्तम जागा आहे. बऱ्याचजणांना पक्षीनिरीक्षणाची आवड असलेल्यांसाठी आणि हौशी फोटोग्राफर्ससाठी ही जागा म्हणजे स्वर्गच जणू. थंडीच्या मोसमात बरेच देशी-विदेशी पक्ष्यांचं या व्हॅलीत आगमन होतं. या पक्ष्यांचं निरीक्षण करून त्यांचा अभ्यास करणं म्हणजे एक कला आहे. पक्षीनिरीक्षणाव्यतिरिक्त या परिसरात असलेल्या दुर्मिळ वनस्पती हादेखील संशोधनाचा विषय आहे. समृद्ध जंगलानुभव घेण्यासाठी सिंहगड व्हॅली हा उत्तम पर्याय ठरू शकतो.

वरसगाव धरणाचा परिसरही तसाच सुंदर आहे. शहराच्या जवळ असूनही इथं शहरी जगणं पोहोचलेलं नाही ही चांगली बाब म्हणता येईल. तसंच मातकट डांबरी रस्ते, गायी-म्हशींचं अधेमधे पडलेलं शेण, पाठीवर घोंगडं टाकून, शेळ्या-मेंढ्या चरायला आणणारे धनगर या भागात सहजपणे दिसतात. पानशेत बॅकवॉटरचा परिसर हा निव्वळ कोकणाची आठवण करून देणारा आहे. तशीच लाल माती, हिरवीगर्द बनराई, निळं आकाश आणि एकूणच मोकळं वातावरण. इथं असलेल्या बोटिंग क्लबमुळे आता बरेच लोक पर्यटनासाठी वीकेंडला पानशेतची सहल करू लागले आहेत. बोटिंग करण्याबरोबरच बॅकवॉटरला वनभोजन करायचं, पाण्यात मनसोक्त डुंबायचं, बोटिंग क्लबच्या कॅंटिनमध्ये बसून गरम कॉफी घेत सूर्यास्त पाहायचा असे अनेकोविध पर्याय इथं उपलब्ध होतात. पक्ष्यांचं नीरव कुजन सुरू असतानाच छान गाणी ऐकत (फक्त हेडफोनवरचं) पडून राहाणंही इथं शक्य आहे. कारण ती गाणी त्या नैसर्गिक शांततेचा भंग होणार नाही अशा प्रकारे ऐकली, तरच गंमत आहे.

बॅकवॉटरशिवाय जास्त भटकंती करायची असल्यास पानशेतच्या अलीकडचं नीळकंठेश्वर हे उंच डोंगरावर असलेलं ठिकाणही प्रेक्षणीय असंच आहे. ही चढण थकवणारी असली, तरी वर गेल्यावर दिसणारं दृश्य सगळा थकवा विसरायला लावतं. मावळचा सुंदर परिसर, धरणांचं चमचमतं पाणी आणि सुबक बांधणीचं मंदिर पाहून मन प्रसन्न होतं. इथूनच घोळची खिंड आणि ऐतिहासिक कावळ्या घाटातही जाणं शक्य आहे. या वीकेंडला नेहमीच्या प्लॅन्सना फाटा देऊन काही तरी वेगळं करायचं ठरवत असाल, तर इथल्या बॅकवॉटरचा पर्याय नक्कीच सर्वोत्तम म्हणता येईल असाच आहे.

## गारजाईवाडी

ट्रेकर्स मंडळींसह पायपीट करण्याची क्षमता आणि सह्याद्रीची सवय असणाऱ्यांसाठी हा पर्याय उत्तम. ऐन सह्याद्रीच्या कड्यावर नसली, तरी या वाडीतून तासाभरात कोकणदिव्यावर पोहोचता येतं. जेवणाचा डबा हवा. पानशेत-घोल-गारजाईवाडी असा मार्ग आहे.




प्रवास :

- देहू आणि भंडारा अशी दोन्ही ठिकाणं आपण एका सहलीत बघता येतील.
- देहू ते भंडारा अंतर ६ किलोमीटर.
- मुंबई ते देहू अंतर सुमारे १०० किलोमीटर.
- महाप्रसादाच्या वेळेत गेलात तर साधं जेवण भंडारा डोंगरावर मिळू शकेल, जेवणाची अन्य सोय नाही.
- राहण्यासाठी चाकणला हॉटेल्स आहेत.

मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे सोडून तळेगावमार्गे चाकणला जाताना इंद्रायणीचं दुथडी भरून वाहणारं पात्र सामोरं येतं. दूरवर देहूच्या शिवारात देऊळवाड्याची शुभ्र शिखरं दर्शन देतात. अगदी रस्त्याला लागूनच वळणावळणाची वाट पोटात घेऊन ढगांमध्ये हरवलेला हिरवागार डोंगर दिसतो. हा तुकोबांचा भंडारा.

देहूपासून पश्चिमेला दहा किलोमीटर अंतरावर हा डोंगर आहे. देहू गावातील इंद्रायणीच्या पुलावरुन भंडाऱ्याचं दर्शन होतं. डोंगरावर थेट वरपर्यंत गाडी जाऊ शकेल असा रस्ता आहे. देहू गावातून चालतही भंडाऱ्यापर्यंत जाता येतं. इथं वरपर्यंत चढून येण्यातच आगळी मजा आहे.


भंडारा डोंगराचे संदर्भ तुकारामांच्या चरित्रातून येतात. नामसंकीर्तनात रंगून जाणाऱ्या तुकोबांना हवा असलेला एकांत देणारा हा डोंगर. भक्तीभावाने चिंब झालेलं विठ्ठल नाम या डोंगरात घुमलं असेल. याच डोंगराच्या साक्षीने गाथेतील अनेक अभंगांचा जन्म झाला असेल. सकाळी उठल्याबरोबर तुकोबांचे पाय थेट भंडाऱ्याची वाट चालू लागत. तिथं एकदा भजनात रंगले की खाण्यापिण्याचं भान कुठलं? त्यांची पत्नी जिजाबाई मग त्यांना शोधत उन्हा पावसांत भाजीभाकरी घेऊन हा डोंगर अनवाणी चढून येत. एकदा भर उन्हात भंडाऱ्यावर येत असताना जिजाबाईंच्या पायात काटा घुसला. रक्ताची धार लागली. तेव्हा खुद्द भगवंतांनीच गुराख्याच्या रुपात अवतीर्ण होऊन त्यांच्या पायातला काटा काढला होता, असं सांगतात. ही आठवण जागवणारं एक मंदिर या डोंगरावर आहे. जिजाऊंच्या पायातून काटा काढणाऱ्या भगवंतांची साजरी मूर्ती या मंदिरात आहे. आणखी थोडं वर चढून गेल्यावर मुख्य मंदिर आहे. या मंदिराचा नुकताच जीर्णोद्धार झालाय. संगमरवरात घडवलेली तुकोबांची अतिशय सुंदर इथं आहे. पाठीशी विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्ती आहेत. भंडारा डोंगर देवस्थान समितीच्या वतीने या ठिकाणाची व्यवस्था पाहिली जाते. भाविकांसाठी तिथं दररोज महाप्रसादाची व्यवस्था असते. थकून आल्यावर तिथं अगदी अगत्याने वाढला जाणारा साधा आमटीभातही अत्यंत चवदार भासतो.

भंडारा डोंगर तसा फारसा उंच नाही, इतर डोंगररांगांशी थोडासा फटकून उभा असल्यामुळे पाचदहा किलोमीटरच्या परिघातील सगळा परिसर छान न्याहाळता येतो. चाकणची औद्योगिक वसाहत, हिरव्यागार शेतांमध्ये उभी असलेली शेकडो पॉली हाऊसेस, शेतांच्या चौकोनी तुकड्यांमधून वाहणाऱ्या नद्यांची चमकती पात्रं, पश्चिमेला गच्च भरलेलं भामाआसखेड धरण हे सगळं डोळ्यांत साठवून ठेवावं वाटतं. भंडाऱ्याच्या उत्तरेला भामचंद्र डोंगर आहे. या डोंगरावरच्या गुहेत तुकोबांना आत्मज्ञान झालं असं म्हणतात. भंडारा डोंगर उतरून थोडं खाली आल्यावर एक बौद्धकालीन कोरीव लेणं आहे. छोटी दालनं, काही चौथरे, मोकळे आवार अशा शांत वातावरणात आपण क्षणभर स्वत:ला हरवून बसतो.

चारशे वर्षांपूर्वीची भक्तीमार्गाची परंपरा सांगणारा भंडारा डोंगर उतरताना तुकोबांच्या मंदिरात हरीपाठाचे अभंग सुरू होतात. वीणेच्या मंद झंकारासोबत उमटणारे सूर संध्याकाळच्या वाऱ्यासोबत दूरवर वहात जातात.

# जुन्नर

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते जुन्नर | | | | | 155 | | | | |
| 1 | हडसर | | किल्ला | मंदिर | ट्रेक | 14 | NW | | | |
| 2 | नाणेघाट | घाट | | | ट्रेक | 28 | NW | 28 | NW | |
| 3 | जीवधन | | किल्ला | | ट्रेक | 30 | NW | 2 | S | |
| 4 | प्रसन्नगड चावंड | | किल्ला | मंदिर | ट्रेक | 16 | NW | 15.5 | SE | |
| 5 | चावंड | | खेडे | नदी | निसर्ग | 17 | NW | 1 | N | |
| 6 | दाऱ्या घाट | घाट | निसर्ग | मंदिर | ट्रेक | 21 | NW | 14.5 | NW | |
| 7 | ढाकोबा | | किल्ला | | ट्रेक | 21 | NW | 0.2 | SW | |
| 8 | अहुपे | हिलस्टेशन | घाट | मंदिर | ट्रेक | 63 | W | 49 | SW | |
| 9 | भीमाशंकर | | निसर्ग | मंदिर | ट्रेक | 73 | SW | 51 | SW | |
| 10 | भोरगिरी - राजगुरुनगर | लाँग ड्राईव्ह | निसर्ग | | | 102 | SW | 7 | SE | |
| 11 | विघ्नेश्वर ओझर | | | मंदिर | | 12 | SE | 96 | NE | |
| 12 | गिरिजात्मज लेण्याद्री | | | मंदिर | | 7 | NE | 15 | NW | |



# हडसर -चावंड एका दिवसात



महाराष्ट्रात साहसवीरांना खुणावणारे अनेक गड-किल्ले आहेत. त्यातील सारेच अवघड असतात असं नाही. काही गड-किल्ले तर अगदी एका दिवसात 'पादाक्रांत' करता येतात. आणि हे मुंबईपासून अवघ्या दीड-दोनशे किलोमीटर अंतरावर असेल तर आणखीनच मजा... असाच एक ट्रेक आहे हडसर-चावंडचा ट्रेक...

कल्याणपासून १२५ किलोमीटर अंतरावर असलेलं जुन्नर गाव... आणि इथूनच काही अंतरावर म्हणजे १५-१६ किमीवर ही दोन्ही ठिकाणं आहेत. मात्र दोन्ही दोन टोकांवर! म्हणजे तुम्हाला हडसरवरून चावंडला जायचं असेल तर त्यासाठी परत जुन्नरला यावं लागतं.

हडसरचा किल्ला सातवाहन काळातला. अवघ्या एक-दीड तासात तुम्ही हडसर 'सर' करू शकता. छोटा किल्ला असला तरी त्यावर पाहण्यासारखं बरंच काही आहे. दगडातून कोरलेल्या पायऱ्या, किल्ल्यात शिरण्यासाठी असलेले बोगद्यासारखे दोन भव्य दरवाजे...त्यावर असलेली कलात्मकता...या सगळ्याने भारावून जायला होतं. किल्ल्यावर असलेल्या प्राचीन शिवमंदिरामुळे वातावरण एकदम आध्यात्मिक झाल्यासारखं वाटतं. शिवमंदिर असलं तरी त्यात गणपती, हनुमान आणि गरूड यांच्याही मूर्ती आहेत. तसंच किल्ल्यावर एक छोटंसं तळंही आहे. गुहा असल्या तरी त्या बंद अवस्थेत आहेत. किल्ल्यावर एवढंच पाहण्यासारखं असलं तरी तिथपर्यंतचा प्रवास आल्हाददायक आहे. धकाधकीच्या जीवनातून थोडंसं हटके...आणि हो, तुमच्या ग्रुपला राहायचंच असेल तर किल्ल्यावरील शिवमंदिरात मुक्काम करता येतो. मात्र त्यासाठी संबंधितांची परवानगी आवश्यकच.

हडसरवरून तुम्हाला चावंडला जायचं झाल्यास पुन्हा जुन्नर गाठावं लागतं. जुन्नर ते चावंड यांच्यातील अंतर अवघं चार-पाच किलोमीटरचं. हे अंतर पायीच पार केलं तर मस्तच. चावंड किल्ला चढायला फार तर पाऊण तास लागतो. किल्ल्यावर पाण्याच्या सात टाक्या आहेत. या टाक्या एकमेकाला लागून आहेत. वरून अर्धगोलाकार असलेल्या या टाक्या आतून चौकोनी आहेत. त्या सातवाहन काळातील आहेत. या किल्ल्यावर भग्नावशेषातील शिवमंदिरही आहे. या दिवसांमध्ये चावंड गावात जत्रा भरते त्यामुळे किल्ल्यावर बऱ्यापैकी स्वच्छता असते. इथून हडसर किल्ला दिसतो. दोन्ही किल्ल्यांच्या दरम्यान माणिकडोह धरण असल्यामुळे वरून दिसणारं दृश्य सुखद असतं. किल्ल्याच्या पायथ्याशी चावंड गावात राहण्याची व्यवस्था होऊ शकते.

[redacted]

### कसं जायचं

- कल्याण इथून जुन्नर
- जुन्नरहून बसने हडसरला जाता येतं
- चावंडला जायचं झाल्यास पुन्हा जुन्नरला यावं लागतं
- दोन्ही ठिकाणी जायचं असल्यास किमान दोन दिवस तुमचा ट्रेक हवा
- स्वत:चं वाहन असल्यास दोन्ही ठिकाणं एका दिवसात कव्हर करता येतात
- हडसरला एसटी बसची फ्रिक्वेन्सी कमी आहे.

# आेढाळ नाणेघाटाचा ट्रेक



कल्याणहून एक रस्ता मुरबाड, टोकवाडी, माळशेज घाट करत नगरला जातो. कल्याणहून साधारण चाळीस-पंचेचाळीस कि.मी.वरचं सरळगाव सोडलं की सगळा मुलुख बदलतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दिसणारी भाताची शेतं, त्यात विसावलेली घरं हे दृश्य जाऊन निर्जन जंगल दिसू लागतं. बाहेरची विराटता आणि शांतता आपल्याला सगळं विसरायला लावून वेगळ्या प्रदेशात आल्याची जाणीव करून देते. त्यात उजवीकडे दूरवर दिसत असलेल्या सह्याद्रीच्या बेलाग डोंगररांगा आणि त्यातले काळेकभिन्न कडे आपल्याला होत असलेली जाणीव अधिक ठळक करत जातात.

हा आहे माळशेज घाटाच्या पायथ्याचा वैशाखरे, मोरोशी, सावर्णेचा ठाणे जिल्ह्यातला आदिवासी प्रदेश. या सगळ्यात उजवीकडच्या भल्यामोठ्या डोंगररांगेतून बाहेर आलेला एक मोठा कडा आपली नजर सतत



अनु.

वेधत असतो. विशेष म्हणजे खूप दूर असूनही त्याचं अस्तित्व आपल्याला ठळकपणे जाणवतं. त्याचं हे अस्तित्व नुसतं आकारामुळे नाही तर त्याच्या कित्येक वर्षांच्या अफाट कर्तृत्वामुळे आहे. हा कडा आहे 'नानाचा अंगठा' आणि त्याच्या बगलेतला त्यावेळच्या दख्खन पठारावरचा एक प्रमुख व्यापारीमार्ग 'नाणेघाट' आणि या दोघांच्याही मागे असलेला त्यांचा रक्षक 'जीवनधन' हा किल्ला.

आज या विराट आणि वैराण परिसराला आधुनिक सोयींचा पुसटसाही स्पर्श झाला नसला तरी फार प्राचीन काळापासून या परिसरात मोठ्या उलाढाली होत असल्यामुळे इथे मोठी सुबत्ता नांदत होती. सातवाहनांच्या आणि महाराजांच्या काळातही त्यावेळी जुन्नर ही दख्खनमधली मोठी बाजारपेठ होती. तर सोपारा आणि कल्याण ही नावाजलेली आंतरराष्ट्रीय बंदरं होती. या बंदरावरून उतरलेला सगळा माल नाणेघाटामार्गे देशावरच्या जुन्नरला जात असे. याची साक्ष पटवणाऱ्या अनेक खुणा आज भग्नावस्थेत असल्या तरी नाणेघाटाच्या तोंडावर एक माणूस आत बसू शकेल असा दगडी रांजण आजही इथे आहे. त्याकाळी यात रोजची जकात जमा होत असे.

नाणेघाटाचा ट्रेक हा डोंगरभटक्यांमध्ये अतिशय प्रिय आहे. मुरबाड-सरळगावच्या पुढे 'टोकावडे' हे या



मार्गावरचं थोडंस मोठं गाव आहे. मात्र नाणेघाटात जाणारी पायवाट याच रस्त्यावरुन तीनेक कि.मी. पुढे गेल्यावर उजवीकडे आहे. याची खूण म्हणजे इथे उजवीकडेच 'ओतुर ४५' असा मैलाचा दगड आहे. त्यामुळे बसचं तिकिट वैशाखऱ्याच्या पुढच्या स्टॉपचं म्हणजे मोरोशीचं काढावं. टोकावड्याला बस कण्डक्टरला या जागी बस थांबवण्याची खास विनंती केली की आपली ही तीन कि.मी.ची चाल वाचते.

इथून उजवीकडे तिरकं बघितलं की नानाचा अंगठा समोर दिसतो आणि त्याच्या बाजूला दोन मोठे हाय टेंशन वायरचे टॉवर दिसतात. या टॉवरमधून इलेक्ट्रिक वायर्स खालच्या दरीत आलेल्या दिसतात. वर जाणारी वाट ही या सतत या वायर्सच्या खालून जाते.




अनु.

त्यामुळे उतरल्यावर पहिल्यांदा आपली दिशा निश्चित करण्यासाठी या टॉवर्सचा अंदाज घेतला पाहिजे. कारण वर जाणाऱ्या या वाटेव्यतिरिक्त सगळीकडे ताशीव कडे असल्याने वर जायला दुसरी वाट नाही.

या वाटेवर आल्यानंतर अगदी थोड्याच वेळात दोन वाटा आहेत. यातली एक मळलेली वाट डावीकडे जाते व दुसरी थोडीशी खाली उतरते. इथे मात्र सावध राहून खाली उतरणारी वाट पकडली की आपण सरळ नाणेघाटात पोहोचतो. सगळा रस्ता एकदम रूंद असला तरी दगडधोंड्यांचा आहे. रात्री ट्रेक करायचा असेल तर प्रत्येकाजवळ दोन अधिक सेल्ससह उत्तम विजेरी हवी. रमतगमत वरच्या गुहेपर्यंत जायला अडीच-तीन तास लागतात. बसमधून उतरल्यावर वर पोहोचेपर्यंत वाटेत पाण्याचा एक थेंबही मिळत नाही. पावसाळ्यात मात्र या मार्गावर प्रचंड पाणी वाहत असतं. कोणीही कधीही घसरू शकतो. त्यामुळे सोबत प्रथमोपचाराचं साहित्य असणं जरुरी आहे.

याच नानाच्या अंगठ्याच्या कड्यात मध्यभागी एक मोठी चौकोनी गुहा आहे. यात सहज पंचवीस एकजण मुक्काम करु शकतात. गुहेच्या बाजूलाच पाण्याची पाच-सात टाकं आहेत. इथे बाराही महिने चांगलाच गारवा असतो. त्यात गुहेची जमीन म्हणजे कातळ असल्याने खाली अंथरायला कॅरीमॅट आणि पांघरायला स्लिपिंग बॅग असायला हवी. ही गुहा निर्जन असल्याने मुक्कामी असेल तर बरोबर पातेली, शिधा आणि मेणबत्त्याही हव्यात. मात्र जीवधनचा ट्रेक करायचा असेल तर सगळं सामान सोबत नेणं अत्यंत आवश्यक आहे.

नाणेघाटाच्या डोंगरमाथ्याहून उजवीकडे एक-दीड कि.मी.वर 'घटघर' हे छोटंसं खेडं आहे. इथून उजवीकडे साधारण पाऊणेक तास डोंगर चढल्यावर आपण 'जीवधन' (समुद्रसपाटीपासून ३७५४ फूट) या



किल्ल्यावर पोचतो. वर डोंगरात पाण्याची टाकी आणि काही डोंगरात खोदलेल्या खोल्या आहेत. डोंगराच्या एका कडेवरून खालच्या बाजूला 'खडा पारशी' किंवा स्थानिक भाषेत 'वांदरलिंगी' नावाने ओळखला जाणारा प्रचंड सुळका आहे. घाटघरहून वरती जाणारी वाट काही ठिकाणी निमुळती आहे. जीवधनवरून उत्तरेला कळसूबाई,

दक्षिणेला भीमाशंकरची पर्वतरांग, ईशान्येला हरिश्चंद्रगड, वायव्येला माहुलीचा किल्ला तर खालचं नाणेघाटाचं पठार, नानाचा अंगठा असा अतिशय भव्य आणि विराट देखावा दिसतो.

काहीजण याचबरोबर जुन्नरकडे असलेले चावंड, हडसर आणि शेवटी शिवनेरी असाही ट्रेक करतात. घाटघरहून जुन्नरला जायला दिवसातून ठराविक वेळी बसेस आहेत. ज्याने कोणी एकदा का नाणेघटचा हा भन्नाट ट्रेक आणि तिथल्या गुहेत मुक्काम केला की त्याचे सह्याद्रीतल्या या डोंगराशी ऋणानुबंध होतात. नाणेघाटची गुहा त्याला वारंवार बोलावत राहते. काही जागा असतातचं अशा ओढाळ आणि सह्याद्रीत तर अशा जागा अगणित आहेत.







अनु.


## मिलिंद गुणाजी यांच्या आवडीच्या ठिकाणाबद्दल त्यांनी केलेले वर्णन : नाणेघाट


मला मोहात पाडणारं आणखी एक ठिकाण म्हणजे नाणेघाट. अस्सल भटक्यांना नाणेघाट तसा नवीन नाही, पण पुन्हा पुन्हा जावं असं नाणेघाटाचं सौंदर्य आहे. हा परिसर फिरण्यासाठी थोडी सवड काढायला हवी. त्यासाठी जुन्नरला जाऊन राहता येईल. तिथंच बाजूला शिवनेरी, लेण्याद्री आहे. शिवनेरीच्या डोंगरावर मार्गावरच अनेक लेणी आहेत, जी गावातनं सुद्धा दिसतात. गावाच्या लगतच अंबा, अंबिका लेणी आहेत. त्याशिवाय, आर्वीची दुर्बिण आहे. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांसाठी चावंड, हडसर, जीवधन यांसारखे किल्ले आहेत. माणिकडोहसारखा विस्तीर्ण जलाशय आहे. नाणेघाटाला जाताना वाटेत पूर नावाचं गाव लागतं. याच परिसरात अप्रतिम असं





कुकडेश्वराचं प्राचीन मंदीर आहे, जे पूर्ण पांढऱ्या दगडातलं आहे. जुन्नरहून नाणेघाटाच्या मुखापर्यंत जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता आहे. हे अंतर फक्त ३२ किमी आहे. नाणेघाटाची सुरवातीची वाट फरसबंद असून सुरवातीच्या फरसबंद चिंचोळ्या वाटेला नाणेघाटाची नळी असं म्हणतात. तिथेच जकातीचा एक प्रचंड मोठा दगडी रांजणही दिसतो. पूर्वीच्या काळी पैठण आणि जुन्नर या महत्त्वाच्या बाजारपेठा होत्या आणि कोकणात श्रीस्थानक (आताचे ठाणे) व शूरपारक (नालासोपारा) इथं उतरवलेला माल नाणेघाटातून या बाजारपेठांकडे जाई. महाराष्ट्राचा एक अमूल्य असा ऐतिहासिक ठेवाही इथं आहे. सातवाहन कालातली सम्राज्ञी नायनिका किंवा नागनिका हिने गुहेत कोरून ठेवलेले काही शिलालेख इथं आहेत, ज्यात अख्ख्या सातवाहन कुलाचा इतिहास आहे. सातवाहनांनी महाराष्ट्रात ४०० वर्षं राज्य केलं व तो महाराष्ट्राचा अत्यंत भरभराटीचा काळ होता. नाणेघाटासारखाच बाजूलाच कोकणात उतरण्यासाठी 'दऱ्याघाट' आहे. सह्याद्रीमध्ये दिसणाऱ्या अजोड दृश्यांपैकी काही दृश्यं इथून पहावी. हे सारं पाहण्यात तीन-चार दिवस कसे जातात ते कळतही नाही. या परिसराला भेट देण्यासाठी जुन्नरला किंवा नारायणगावला मुक्कामाची सोय उपलब्ध आहे. नाणेघाटाच्या पायथ्याशी सगुण भडकमकरांचं मयुरा रिसॉर्ट आहे. तिथेही राहण्याखाण्याची उत्तम सोय आहे. मुरबाडवरूनही इथं जाता येतं. त्यासाठीही टॅव्हलऑर्गशी संपर्क साधता येईल.


३
दुर्गम चावंड उर्फ
जुंड उर्फ प्रसन्नगड हा
जुन्नरमधला एक देखणा दुर्ग. तसा
फारसा आडमार्गी नसूनही उपेक्षित
गडकोटांच्या यादीत त्याची गणना होते.
पावसाळा होऊन गेल्यावर हिवाळ्यात
तजेलदार रानफुलांची मेजवानी
देणाऱ्या या गडाला सध्याच्या
भटकंतीच्या खास ऋतूत
आवर्जून भेट द्यायला हवी.


चावंड

# दुर्गम पण देखणा

शिवछत्रपतींनी अनेक गडकोटांचं नव्यानं नामकरण केलं. स्वराज्यात दाखल झाल्यावर जुन्नरजवळच्या चावंडगडाचंही भाग्य उजळलं आणि आज तो प्रसन्नगड या सुंदर नावानं मिरवतो आहे. नावातच प्रसन्नपणा असणाऱ्या गडाची भेट त्याचं नाव सार्थ करणारी ठरते. काहीसा उपेक्षित आणि अपरिचित असला, तरी इतिहासप्रेमी भटक्यांसाठी मात्र त्याची भग्न वाट पर्वणीची ठरते. सह्याद्रीच्या काळ्या फत्तरात तासून केलेला कातळकोरीव पायऱ्यांचा भग्न मार्ग अन् महाद्वाराची रचना गडभेटीची प्रसन्नता द्विगुणित करते.

जुन्नर-आपटाळे मार्गावर तेरा किलोमीटर अंतरावर चावंडवाडी हे महादेव कोळी लोकांची वस्ती असणारं छोटेसं गाव आहे. चावंडवाडीला कुशीत घेऊनच दुर्गम आणि देखणा प्रसन्नगड उभा आहे. स्वतःचं वाहन असल्यास प्रश्नच नाही, मात्र लाल डब्याचं गणित व्यवस्थित जमवलं तर पुण्याहून निघून एका दिवसातही हा गड पाहून होऊ शकतो. दोन दिवसांचा वेळ हाती असेल, तर हडसर उर्फ पर्वतगडाची वारीही होऊ शकते. चावंडवाडी गावात प्रवेश केल्यावर शाळेजवळूनच प्रसन्नगडावर जाणारी वाट आहे.

पावसाळ्यानंतर विविध रानफुलांचं संमेलन गडवाटेवर भरतं. एरवीही या गडाची वाट तितकीच देखणी आहे. शाळेपासून गडमाथा गाठण्यास एक तासाचा वेळ पुरेसा ठरतो. चालण्यास सुरुवात केल्यावर साधारण अर्ध्या तासात आपण निम्म्या उंचीवर येऊन पोचतो. तिथून कौलारू छपराच्या घरांची चावंडवाडी अन् गावाच्या सीमेला येऊन भिडलेलं शहाजीसागर जलाशयाचं दृश्य डोळ्यांना सुखावतं. यापुढे कातळकोरीव पायऱ्यांचा टप्पा सुरू होऊन साधारण दहा बारा पायऱ्या चढल्यावर छोटी तोफ एका ठिकाणी आधारासाठी पुरलेली दिसते. जंबुरका जातीच्या या तोफेचा असा वापर गडाच्या उपेक्षितपणाचा एक दुवाच उलगडतो. कातळात खोदलेल्या या नीटस पायऱ्या १ मे १८१८ रोजी इंग्रजांनी सुरुंग लावून उडवल्या असल्या, तरी भग्नतेतही त्यांचं सौंदर्य टिकून आहे. दुर्गम वाटांची सवय नसणाऱ्यांचे पाय इथे लटपटू शकतात. आधारासाठी गावकऱ्यांनी शिडी लावलेली असल्यानं फार धोका नाही, तरीही काळजीपूर्वकच या पायऱ्या चढाव्यात.

अंदाजे वीसएक पायऱ्या चढून गेल्यावर गडाचं नैर्ऋत्यमुखी प्रवेशद्वार तुमचं स्वागत करतं. महाद्वाराच्या गणेशपट्टीवरील गणराय आणि दरवाजाचं देखणं काम स्तिमित करून टाकतं. महाद्वाराची उजवी बाजू अखंड कातळातली असून उजवा स्तंभही कातळातच कोरलेला आहे. हे देखणं काम करणाऱ्या कारागिरांना मुजरा ठोकून महाद्वाराचा उंबरा ओलांडावा. येथून उजवीकडे आणि डावीकडे अशा दोन वाटा आहेत. कातळकोरीव पायऱ्या चढून गेल्यावर समोर एका वास्तूचा चौथरा आणि गडावरील टेकडीचं दर्शन घडतं. येथे सर्वोच्च ठिकाणी चावंडाबाईचं जीर्णोद्धारीत मंदिर आहे. दुर्गम जागी वसलेली चावंडामाता

पंचक्रोशीच्या राहाळाची देवता.
आदिमायेसमोर डोकं टेकवून गडफेरीला सुरुवात करायची.

गडाच्या वायव्य भागात एकाशेजारी एक खोदलेली सात टाकी आहेत. गडफेरीतच भग्न शिवमंदिराचे अवशेष आणि त्या पलिकडे असणारं पाण्याचं टाकं आवर्जून पाहावं. मंदिराचं शिल्पकाम भग्नपणातही इतकं देखणं दिसतं, की मूळ मंदिर कसं असेल याचा अंदाज येतो. टाकी शेजारी कोरलेल्या एका कोनाड्यात गणरायाची भग्न मूर्ती विराजमान असून, इतर कोनाडे मोकळे आहेत. गडाच्या ईशान्य भागात असणाऱ्या गुहा पाहाण्यासाठी मात्र माहितगारांची सोबत हवी. या दिवसात गडावर भरपूर गवतही असल्यानं फिरताना खबरदारी घ्यावी. पाण्याची टाकी असल्यानं गडावरील कोठारांमध्ये मुक्काम करता येऊ शकतो; मात्र चावंडवाडीतला मुक्काम अधिक सुखदायी. वाडीतच जेवणाची व्यवस्थाही होऊ शकते.

इतिहासाचा धांडोळा घेतल्यास सन १४८५ पासूनचे गडाचे उल्लेख मिळतात. शहाजीराजांचाही गडाशी निकटचा संबंध होता. शिवछत्रपतींनी प्रसन्नगड असं नामकरण केल्यानंतर बराच काळ गड स्वराज्यात होता. पेशवाईतही गडाचा राबता सुरू होता. इंग्रजांनी गडमार्ग उद्ध्वस्त करूनही गडाचा देखणेपणा आजिबात उणावलेला नाही. त्यामुळेच आवर्जून वेळ काढून प्रसन्नगड पाहायला हवा.

## चावंड

**चावंड** हा जुन्नर या प्राचीन इतिहास लाभलेल्या गावाच्या जवळ असलेला किल्ला. 'प्रसन्नगड' असंही एक नाव या किल्ल्याचं आहे. गावात वीज, शाळा, मंदिर आहे त्यामुळे राहण्याची सोय होऊ शकेल पण किल्ला चढाईस फार वेळ लागत नसल्याने मुक्कामाची आपली योजना नसली तरी हरकत नाही. गावातून किल्ल्यावर जाणारी वाट दिसते त्यामुळे वाटाड्याची आवश्यकता नाही. बरीचशी वाट कातळावरून आहे आणि इंग्रजांच्या कृपेने चिंचोळी आहे. पण या कातळातील पाय-यांवर आधारासाठी लोखंडी गज लावले आहेत. त्यामुळे बिनदिक्कत चढाई करायची. वाटेत एक तोफ गाडून ठेवली आहे. तोफ ओतणा-याने विचार केला नसेल असा तोफेचा उपयोग करणा-याला लाखोली वाहात पुढे जायचे.

गावातून अर्ध्या पाउण तासात आपण किल्ल्याच्या दरवाजात येतो. दरवाज्यावरील गणेशला वंदन करून किल्ल्यात प्रवेश करायचा. माथ्यावर मधोमध एक गोलाकार टेकडी आहे. किल्ल्यावर पाणी मुबलक आहे. या गडाची अनेक नावं आहेत - चामुंड, चाऊंड, चावंड- ही नावे चामुंडा या शब्दाचा अपभ्रंश आहेत. चामुंडा हे देवीचे क्रूर रूप. टेकडीवर चावंडाई देवीचं मंदिर आहे. मंदिराच्या मार्गावर पाण्याच्या तीन टाक्या आहेत. बाकी सारे अवशेष किल्ल्याच्या उत्तर भागात आहेत. एक एकाकी कमान उभी आहे. बहुधा ती वाड्याची किंवा मंदिराची असावी. कमानीच्या दोन्ही बाजूस एक खोदीव आणि एक बांधीव टाके आहे. त्याच्या पुढे वाड्याचे अवशेष आणि नंतर एकमेकाला खेटून कोरलेली सात सुंदर टाकी आहेत. त्यात उतरण्यास पाय-या आहेत. उत्तरेकडील भागात थोडे खाली दोन - तीन गुहा आहेत. येथून माणिकडोह जलाशय आणि धरणाचं विहंगम दृश्य दिसतं.

### कसं जाल?

जुन्नरला बसने पोहोचायचं आणि पुढे जीपने. पायथ्याच्या गावाचं नावही चावंड आहे.

### आणखी काय पहाल?

वेळ आणि खाजगी वाहन असल्यास कुकडी नदीचा उगम, कुकडेश्वर मंदिर, लेण्याद्री , शिवनेरी ही ठिकाणेही पाहता येतील.



अनु.

## चावंड



कुकडी नदीच्या उगमापाशी असणारं हे सुंदर गाव वसलं आहे जुन्नर तालुक्यात. पुण्याहून शंभर किलोमीटर अंतरावर असणारं हे गाव सोयीसुविधांपासून काहीसं दूर असलं तरी एक छान अनुभव देणारं आहे. जुन्नर-आपटाळे रस्त्यावर हे गाव आहे. इथं जाण्यासाठी जुन्नरहून थेट एसटी तसंच जीपही मिळतात. चावंड गावात राहाण्या-जेवण्याची उत्तम सोय होते. नदीचा उगम, धरणाचं बॅकवॉटर आणि झाडीत वसलेलं सुंदर गाव पाहताना तुम्ही एका वेगळ्या विश्वास हरवून जाल.




# 'दाऱ्या'चा दरारा

महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या दोन भाग पडतात. देश आणि कोकण. देश आणि कोकण यांच्यामध्ये सह्याद्रीची मोठी भिंत उभी आहे. त्यामुळे या दोन भौगोलिक विभागादरम्यान व्यापारासाठी किंवा वाहतुकीसाठी ही अजस्त्र भिंत सर्वांनाच पार करावी लागते. हा प्रवास सुखकर आणि आरामदायी होण्यासाठी आपण नवनवे मार्ग बनवले. डोंगर फोडून बोगदे केले, गुळगुळीत रस्तेही साकारले; परंतु हजारो वर्षं आपण मागे गेलो; तर त्याकाळीही देश आणि कोकणाला जोडण्यासाठी घाटवाटांची निर्मिती झाल्याचं दिसतं. निसर्गसंरक्षणाचा नियम पाळून आपल्या पूर्वजांनी या वाटा जपल्या होत्या. विकासाच्या नावाखाली हे घाटरस्ते मोठे करण्यासाठी मानवानं निसर्गाचा ऱ्हास केला. काही वाटांना आजही आधुनिकीकरणाचा स्पर्श झालेला नाही. त्यातलाच निसर्गाचा देखणा अविष्कार दाखविणारा घाट म्हणजे दाऱ्या घाट.

पुणे जिल्ह्यातला जुन्नर तालुका आणि ठाणे जिल्ह्यातला मुरबाड तालुका यांना जोडणारा हा घाट म्हणजे भटक्यांसाठी पर्वणीच. जुन्नर परिसरात पाहण्यासारखी अनेक ठिकाणं आहेत. त्यांच्या भाऊगर्दीत दाऱ्या घाट हे नावंही असंच दरारा निर्माण करणारं वाटतं. प्रत्येक भटक्यानं आवर्जून पाहावा, असा हा दाऱ्या घाट आज काहीसा उपेक्षितच आहे.

दाऱ्या घाटाचं नुसतंच सुरेख दर्शन घ्यायचं असेल, तर घाटमाथ्यावर येण्याशिवाय पर्याय नाही. या बाजूनं कमी तंगडतोड होते. म्हणूनच बहुतेक भटके याच बाजूनं घाटाकडे येतात. आम्हीही हाच विचार करून पुणे जिल्ह्यातलं जुन्नर हे तालुक्याचं गाव गाठलं. जुन्नरहून आपटाळेमार्गे एक



अनु.

रस्ता आंबोलीला जातो. आंबोली हे तालुक्याचं शेवटचं गाव. या गावाचा रस्ता जिथं संपतो, तिथूनच दाऱ्या घाटाचा अद्वितीय प्रवास सुरू होतो. सभोवताली सह्यरांगांचे सुळके आणि दाट झाडी यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. पावसाळ्यात या गावी येणं म्हणजे डोळ्यांना मेजवानीच. डोंगरांवरून फेसाळत येणारं पांढरंशुभ्र पाणी हे जणू मोत्यांच्या हारासारखं वाटतं. शब्दही थिटे पडतील असं हे लावण्य पाहून आम्ही स्तिमित झालो. हा सगळा परिसर मीना मावळ म्हणून ओळखला जातो. आंबोलीपासून चालायला सुरुवात केल्यावर; आपण अर्ध्या तासात कारवीच्या दाट रानासमोर येतो. हे रान पार केलं, की आपण खिंडीतल्या भैरवाच्या देवासमोर पोहोचतो. सुरक्षित प्रवासाचं साकडं घालण्यासाठी घाटवाटांवरील खिंडीत पूर्वी अशा दैवतांची स्थापना होत असे. या दैवतासमोर माथा टेकून आपणही आपला प्रवास सुरू करायचा. भैरवनाथाच्या देवानंतर आम्ही आलो ते थेट खिंडीच्या तोंडाजवळच. इंग्रजी 'व्ही' आकाराची ही खिंड डोळ्यांत भरणारी आहे. इथून दूरवर कोकणाचं दर्शन घडतं. या खिंडीचं वैशिष्ट्य म्हणजे डाव्या बाजूला जो खडा कातळ दिसतो, तो आहे दुर्ग धाकोबाचं एक अंग. उजव्या बाजूला असणाऱ्या कातळाच्या बेचक्यातून एक छोटीशी पायवाट खाली हळूहळू कोकणात उतरताना दिसते. ही वाट सरळ खाली पळू गावावरून थेट धसई या गावात जाते. दाऱ्या घाट संपूर्णपणे पाहायचा असेल, तर आंबोलीवरून पळू या गावापर्यंत प्रवास करावा लागतो. हाच प्रवास उलटाही करता येतो. त्यासाठी संपूर्ण एक दिवस हाताशी हवा. या प्रवासादरम्यान मनुष्यवस्ती जवळपास नाहीच. दाट रान, उंच पहाड, भर्रा रानवारा, पक्ष्यांचा किलबिलाट यात आपण हरवून जातो. वाटांनाही काही एक अर्थ असतो, हे आपल्याला इथं जाणवून जातं.

नोकरी-धंद्यासाठी, शिक्षणासाठी, फिरण्यासाठी आपला परिचय या विविध घाटवाटांसोबत होत असतो. हा प्रवास फक्त दृश्य असतो. तो प्रत्यक्ष नसतो; कारण हा प्रवास सुखकर असला, तरी त्यातून मन:शांती मिळत नाही. पण हेच सगळं मागं सारू अशा जुन्या पायवाटेवर आलो, की म कसं तरतरून उठतं. दाऱ्या घाटासार सुंदर घाटरस्ते सुदैवानं निसर्गसंप वारसा टिकवून आहेत. त्यातच काय ते समाधान..!



नियोजन करून दुर्ग ढाकोबाकडे (जि. पुणे) मार्गस्थ झालो. सकाळच्या प्रसन्न वातावरणात नाडर सरांच्या गाडीनं आमचा प्रवास सुरू झाला. दाऱ्या घाटातील अप्रतिम निसर्गानं आम्हाला बराच वेळ थांबवून ठेवलं. सकाळी १०.३० वाजता हातविज गावात प्रवेश केला. जुन्नर ते हातविज या मार्गावर ग्रामीण जीवनशैली अगदी जवळून पाहाता येते. दुर्ग किल्ल्याच्या पायथ्याशी मैदानावर गाडी पार्क केली.

दुर्गा देवी मंदिरालगतच्या पाऊल वाटेनं मैदानात यावं लागतं. डाव्या बाजूनं थोडं अंतर पुढं गेल्यावर कोकण कड्यावरून सभोवतालचं विशाल मनोहारी दृश्य दिसतं. इथून ईशान्य दिशेला धाकोबा किल्ला अगदी उठून दिसतो; पण आमच्यामध्ये भलं मोठं जंगल होतं. गर्द झाडीतून मार्ग काढत असताना एके ठिकाणी १० फूट सापाची कात आढळली. छोटीशी घळ उतरल्यावर मळलेल्या वाटेत एक छानसं घर आणि भलं-मोठं माळरान दिसतं. खाली येताना बरीच पायपीट झाली होती. वाटांना फाटे फुटले होते. त्यामुळे नक्की कुठली वाट धरावी हे समजत नव्हतं. किल्ला समोर दिसत असला, तरी ढोर वाटा सर्वत्र होत्या. सुदैवानं ढाकोबा मंदिराकडे जाणाऱ्या दोन ग्रामस्थांची साथ लाभली आणि पुढचा मार्ग सुलभ झाला.

वाट बऱ्यापैकी ओढ्याकाठानं जाणारी आहे. उजव्या बाजूनं ओढा ओलांडून जंगल पार करून पठारावर पोहोचलो. इथून डाव्या बाजूची वाट किल्ल्यावर आणि मळलेली वाट ढाकोबा मंदिराकडे जाते. बाबांनी दूर एका डोंगराच्या खोबणीतील मोठ्या वृक्षाकडे बोट करत सांगितलं, की त्या वाटेने जावा



अनु.



# ढाकोबाची निसर्गसंपन्न वाट

आणि आम्ही निघालो.

घनदाट झाडीतून चढाई करत काट्याकुट्यातील रुटीतून मार्ग काढत पायथा गाठला. टेकाड चढून वर गेल्यावर डावी वाट निसर्गनिर्मित कपारीकडे जाते. त्यातल्या एका कपारीत १० जण बसू शकतात. उजवी वाट अतिशय अरुंद असून, माथ्यावर जाण्यासाठी नातीत पायऱ्या खोदल्या आहेत. दूरवर क्षितिजाला भेडलेल्या डोंगरांच्या लांबच लांब रांगा, डोळ्यांत न मावणारा विशाल कोकणाचा अप्रतिम नजारा आणि सभोवतालचं घनदाट जंगल अनिमिष नेत्रांनी पाहतच ाहावंसं वाटतं. माथ्यावरून नाणेघाट, जीवधन, कळसूबाई दिसतं.

गडमाथ्यावरून दक्षिणेला ढाकोबा मंदिर दिसतं. यानुसार मार्ग निश्चित करून आम्ही खाली निघालो. वाटेतील दगड धोंड्यांचा सडा पार करून मंदिर गाठलं. मंदिर पूर्वाभिमुख असून, कौलारू छत आहे. आजूबाजूला बरीच शिल्पं आणि छानशी विहीरही आहे. पावसाळ्याखेर इथला सारा भूभाग हिरवाईनं नटलेला सजलेला असतो.

### कसं जाल?

**मार्ग :** पुणे - जुन्नर - आपटाळे रोड - दऱ्याघाट मार्गे - हाताविज


**कालावधी :** बाराही महिने

दुर्ग आणि ढाकोबा मंदिर इथं पाण्याची सोय.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २.३० तास

स्थानिक वाटाड्या घेतला, तर उत्तम.

# सह्यकड्यांमधलं दुमदार आहुपे



निसर्गाने महाराष्ट्राला दिलेला अनोखा नजराणा म्हणजे 'सह्याद्री'! गगनचुंबी कातळकडे, हिरव्या वनश्रीत दडलेला रानमेवा, असंख्य किल्ले, घाटमाथे अन् देश कोकण जोडणाऱ्या अनेक घाटवाटा. सह्यकड्यांचं रौद्रभीषण सौंदर्य या घाटवाटांतून भटकताना पदोपदी जाणवतं. हे निसर्गाचं अनोखं आणि रौद्ररूप अगदी जवळून अनुभवयाचं असेल तर आहुप्याला आवर्जून भेट द्यायला हवी.

कल्याणहून माळशेज घाटाकडे जाताना मुरबाड सोडलं की, सह्याद्रीची प्रचंड भिंत दिसू लागते. वातावरण स्वच्छ असेल, तर उजव्या टोकाला मूळ रांगेपासून अलग झालेले व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे लक्षवेधी असलेले गोरख-मच्छिंद्रचे गगनचुंबी सुळके नजरेत भरतात. त्यांच्या पायथ्याच्या देहरी-खोपीवलीहून घाटमाथ्यावरील आहुपे गावात जाण्यासाठी आहुपेघाट वापरला जातो. देहरीतून खोपीवलीमार्गे साधारण दोन अडीच तासांची खडी चढाई केली की, आपण घाटवाटेनं आहुप्यात दाखल होतो. प्रथमदर्शनी भीतीदायक भासणारा हा घाट विशेष अवघड नाही. घाटातल्या दाट वनश्रीच्या सानिध्यात स्वच्छंद विहार करताना मन प्रसन्न होतं.

आहुप्याच्या वाटेवर डोणी नावाची छोटी वस्ती आहे. इथून तास-दीड तास जंगलातून केलेली भ्रमंती आपल्याला दुर्ग किल्ल्यापाशी घेऊन जाते. इथलं जंगल इतकं दाट आहे की, ऐन उन्हाळ्यातही सूर्यकिरणं जमिनीपर्यंत पोहचत नाहीत. या जंगलात रानडुकरांचा सुळसुळाट आहे. डोण्यातले लोक खूपदा या डुकरांची शिकार करतात. कुत्र्यांबरोबर भाले आदी अस्त्रं घेऊन जय्यत तयारीनिशी निघालेले डोणीवासी अनेकदा विचारतात, 'काय, येणार का शिकारीला ?'

आहुपे गावात शिरण्यापूर्वी छोटी; पण घनदाट देवराई लागते. इथून डाव्या बाजूला थोडं उतरून गेल्यास घोड नदीच्या उगमस्थानाशी आपण पोहोचतो. एक लहानसा ओढा म्हणजेच घोड नदी. देवराई संपल्यावर उजवीकडे भैरोबाचं मंदिर आहे. इथून पाठीमागच्या पाठारावर पाचच मिनिटं चालल्यावर आपण कड्याच्या टोकाशी



अनु.

पोहोचतो. या कड्यावरून सह्याद्रीचं अगदी अक्राळविक्राळ दर्शन घडतं. गावकरी य कड्याला 'ढग' या नावानं ओळखतात. 'ढग' कड्याच्या डाव्या, उजव्या अंगाल 'टेकतवणे' व 'वराडा' नावाचे कडे आहेत. इथूनही कोकण परिसराचा मोठा भाग डोळ्यास पडतो.

अवघी ६०० लोकवस्ती असणारे आहुपे गाव टुमदार आहे. शेती हा इथल्या लोकांच प्रमुख व्यवसाय; पण उत्पन्न रोजची मीठ-भाकरी मिळण्याइतपतच ! शहरी सुखसुविध त्यांच्यासाठी एक स्वप्नच आहे. नागली, वरई, भात पिकवण्याबरोबर ते हिरडा व मध गोळ करतात. या वस्तूंच्या बदल्यात त्यांना अडिवरे किंवा तळघर या गावातून मीठतेलासारखं जिन्नस मिळतात. आहुपे ते भीमाशंकर परिसर हा भीमाशंकर अभयारण्यात मोडतो.

आहुप्याजवळच्या दाट अरण्याला 'भट्टीचं रान' म्हणतात. इथे जाताना वाघमाचा धबधब लागतो. अगदी छोटेखानी असला, तरी पावसाळ्यात त्याचं सौंदर्य नजरेत साठवण्यासारख असतं. दाट अरण्य आणि खळखळ वाहणारी घोडनदी यामुळे आहुप्यातलं वातावरण बारमाही अल्हाददायी असतं. पावसाळ्यात इथे धुवांधार पाऊस पडतो.


महाबळेश्वर, माथेरानप्रमाणे इथल्या कड्यांना पाश्चात्य नावं नाहीत; पण कुठल्याही बाबतीत आहुपे या हिलस्टेशन्सपेक्षा उणे नाही. शहरापासून दूर एक दिवस निवांत विसावा घेऊन ताजेतवाने होऊ पाहणाऱ्यांना आहुपे नक्कीच एक आकर्षण ठरू शकेल.

## अहुपे

पुणे जिल्ह्याच्या एका टोकाला आंबेगाव तालुक्यात असणारं अहुपे हे एक नितांत सुंदर गाव. इथून उत्तर कोकणात कल्याणजवळच्या मुरबाडला एक वाट उतरते. ट्रेकर मंडळी ऑफबीट ट्रेकसाठी या गावाला पसंती देतात. मंचर - घोडेगाव - डिंभे धरण - (डावीकडं भीमाशंकर रस्त्याकडं न वळता) सरळ माळीण फाटा - अहुपे हा पुण्यातून जाणाऱ्यांसाठी जवळचा रस्ता आहे. स्वप्नातलं गाव असावं असं अहुपे सह्याद्रीच्या अक्षरशः कुशीत अंग चोरुन वसलेलं आहे. कोकणात उतरणारा सरळसोट साडेतीन-चार हजार फुटांचा कडा आणि मागे दुर्ग-ढाकोबाची रांग. विस्तीर्ण पठारावर घुमत असलेला रानवारा, देवराई, मंदिर, पाण्याचा तलाव अशा अनेक गोष्टी इथं पाहाण्यासारख्या. पुढ्यात असलेले गोरख-मच्छिंद्रचे सुळकेही लक्ष वेधून घेतात. या दुर्गम गावात राहाण्याची सोय होते. शक्यतो शिधा सोबत नेल्यास जेवण बनवून मिळतं. सध्या आदिवासी घरांतलं पर्यटन ही संकल्पना इथं रुजते आहे.



अनु.



# भीमाशंकर

भीमाशंकर हे थंड हवेचे ठिकाण असले तरी ते अधिक प्रसिद्ध आहे ज्योतिर्लिंग म्हणूनच. उंच डोंगरावर आणि अभयारण्यात वसलेले भीमाशंकर श्रावणात शंकर भक्तांसाठी आणि ट्रेकर्ससाठी खूपच लोकप्रिय आहे. पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यात येणाऱ्या भीमाशंकरला जाण्यासाठी मुंबई आणि पुणे दोन्ही ठिकाणांहून थेट बस आहेत. आजूबाजूच्या गावांतूनही बसगाड्या भरपूर आहेतच. मंचर गावापासून टेंपो, ट्रॅक्स आणि टूरिस्ट टॅक्सीही मिळतात. हौशी ट्रेकर्स मात्र खांडस गावावरून पायवाटांचा शोध घेत जाणे पसंत करतात. ट्रेकर्सचा मार्ग ऐन जंगलातून जात असलयाने माहितगार माणूस बरोबर असणे केव्हाही चांगले.

मंदिर हेमाडपंथी शैलीचे, भक्कम दगडी बांधणीचे असून, ते साधरणत:: ८०० ते ९०० वर्षांपूर्वीचे असावे. देवळाचा एकही चिरा अजूनही सुटलेला नाही. मंदिरात पाच मण वजनाची भक्कम पितळी घंटा असून, ती वसई जिंकणाऱ्या चिमाजी अप्पांनी आणून लावली असे इतिहास सांगतो. घंटेचा आवाज दूरपर्यंत ऐकू येतो. आसपासच्या परिसरात कमळजा देवीचे मंदिर, भीमा नदीचे उगमस्थान, मोक्षकुंड अशी काही स्थळे आहेत. निवासासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या खोल्या आहेत. विशेष म्हणजे त्या मंदिराजवळच आहेत. पुणे-भीमाशंकर अंतर केवळ ११२ कि. मी. तर मुंबईहून कल्याणमार्गे जाताना तेच अंतर २६५ कि. मी. आहे. वाटेत माळशेजचा सुंदर घट बघत जाता येते.

# भीमाशंकर

घनदाट अरण्य, सह्याद्रीचे गगनभेदी कडे जंगलातून वाहणारे ओढे, रंगीबेरंगी फुलपाखरं आणि उंच वृक्षांवर उड्या मारणारी शेकरू खार... असं आणि बरंच काही दडलं आहे भीमाशंकरच्या परिसरात. पुणे, रायगड व ठाणे जिल्ह्यामध्ये १०३ चौकिमीवर पसरलेलं भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य नंदनवनासारखं भासतं. बारमाही निसर्गसौंदर्याचा वरदहस्त लाभलेल्या भीमाशंकर परिसरात श्रावणात वनराई टिकून राहण्याचं श्रेय देवराई या निसर्ग संवर्धन संकल्पनेला जाईल.

जंगलांचं अनन्यसाधारण महत्त्व जाणून हा अनमोल ठेवा राखावा, या हेतूने पूर्वी देवराया सुरक्षित ठेवल्या जात. त्या परिसरात देवाचं वसतिस्थान आहे, असं मानून तिथे वृक्ष तोडणं, प्राण्यांना मारणं आदी कृत्य करण्यास पूर्णपणे मनाई असे. एवढंच नव्हे, तर त्या परिसरात चपलाही न घालता जाण्याची प्रथा असे. या सर्वांतून पूर्वजांच्या निसर्ग संवर्धनच्या दूरदृष्टीचं उत्तम उदाहरण आपल्यासमोर येतं. भीमाशंकर इथेही वाघोबा, खेतोबा खुद्द भीमाशंकर आदी देवतांच्या नावाने देवराया राखलेल्या आढळतात.

भीमाशंकर इथे महादेवाचं प्राचीन व प्रसिद्ध मंदीर आहे. या मंदिराचं वैशिष्ट्य असं की बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे एक तीर्थक्षेत्र आहे. इथूनच भीमा नदी उगम पावते. श्रावणातल्या सोमवारी देवदर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक भीमाशंकरची वारी करतात.

उंच डोंगरावर वसलेल्या भीमाशंकरची समुद्रसपाटीपासून किमान उंची ६५० मीटर तर कमाल उंची ११४० मीटर इतकी आहे. रस्त्याने इथे जाण्यास माळशेज घाटमार्गे किंवा तळेगाव-चाळणमार्गे पोहोचता येतं. माळशेज घाटातला मार्ग अधिक नयनरम्य असला तरीही रस्त्याची दुरवस्था पाहता, तळेगावमार्गे जाणं अधिक सोयीचं ठरतं. ट्रेकिंग करण्यात उत्सुक असणाऱ्यांनी खांडस गावातून भीमाशंकरचा डोंगर चढण्यास सुरुवात करावी. वाट डोंगरातली व रानातून असल्याने गावातून सोबत

वाटाड्या नेणं उचित ठरेल. या वाटेने साधारणपणे चढायला सहा तास लागतात. कर्जत इथून खांडसला जाण्यास एसटी उपलब्ध होऊ शकते.


भीमाशंकरच्या परिसरात अनेक प्रेक्षणीय स्थळं आहेत. यात गुप्तभीमाशंकर व नागफणी पॉइण्ट इथल्या ट्रेक्सचा विशेष उल्लेख करावा लागेल. आंबा, जांभूळ, करंबू, अंजन, शेंदरी, पिसा, उंबर, फणस आदी उंचच उंच वृक्ष आपल्या सभोवताली आढळतात. नाना तऱ्हेच्या पक्ष्यांचे आवाज व दुर्मिळ फुलपाखरांची साथ यामुळे चालण्याचा शीण जाणवत नाही. शेकरू किंवा मलबार जायण्ट स्क्विरल ही दुर्मिळ प्रजात इथे प्रामुख्याने आढळते. सुमारे दोन फूट लांबीची, लाल-पिवळ्या रंगाची ही देखणी खार उंच वृक्षांवर आपल्याला पाहावयास मिळते. नागफणीचा ट्रेक काहीसा खडकाळ व अरुंद पायवाटेतून जाते. श्रावणात या परिसरात फुललेली पिवळीजर्द सोनकी पाहून डोळ्याचं पारणं फिटतं. नागफणी पॉइण्टवर सोसाट्याचा वारा झेलत सभोवतालची दरी पाहण्यात निराळाच आनंद मिळतो.

वन्यजीवन अभयारण्याच्या परिसरात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती, अप्रतिम रंग व आकाराच्या आम्री रात्री चमकणारी बुरशीही इथे पाहायला मिळते.

निवासासाठी इथे अनेक धर्मशाळा व हॉटेल्स आहेत. जैविक विविधतेचा खजिना लाभलेल्या या अभयारण्यावर मात्र मानवी अतिक्रमणाची कुऱ्हाड पडू लागली आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत हे जंगल उत्तरेकडे नाणेघाट व दक्षिणेकडे खंडाळा राजमाचीला जोडलेलं होतं. मात्र मनुष्य वस्तीची वाढ व बेसुमार वृक्षतोडीमुळे या परिसरातील जंगल कमी होत चाललं आहे. त्यातच श्रावणात व सणासुदीच्या दिवशी हजारोंच्या संख्येने येणारे भाविक आपल्यासोबत प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या... अशा अनेक शहरी सामानाचा ताफा घेऊन येतात व परिसर प्रदूषित करून निघून जातात. या सर्वांचा विपरीत परिणाम इथल्या परिसंस्थेवर होतो. 'देवराई'सारख्या उत्तम संकल्पनेला जन्म देणाऱ्या आपल्या पूर्वजांनी निसर्गाचा हा खजिना मोठ्या विश्वासाने आपल्याला सुपूर्द केला आहे. हा ठेवा जतन करून पुढच्या पिढीकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. हे कर्तव्य आपल्या हातून घडावं हीच सदिच्छा!



अनु.


एक मस्त
पावसाळी हाइक

पावसाळ्यातली भीमाशंकरची हाइक हा सह्याद्रीत भटकंती करणाऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याला कारण आहे इथला संपन्न निसर्ग, घनदाट जंगल, भरपूर कोसळणारा पाऊस, मेघांनी वेढलेला आसंमत आणि ढगांनी वेढलेल्या कड्यांवरून कोसळणारे लहान-मोठे असंख्य धबधबे. साहजिकच परिसर मनाला सुखावणारा असतो. त्यामुळे ट्रेकही एकदम थरारक असतो. हाडाचा ट्रेकर पावसाळ्यात एकदा तरी या हाइकला जाण्याचा प्रयत्न करतोच.

भीमाशंकरच्या पायथ्याशी खांडस गाव आहे. कर्जत-मुरबाड रस्त्यावरच्या कशेळ्याहून खांडसला जाण्यासाठी फाटा आहे. तसंच खांडसला जाण्यासाठी कर्जतहून बस आणि सहा आसनी रिक्षा आहेत. तसं नेरूळहून वाऱ्यामार्गेदेखील इथे बसने जाता येतं. खांडसहून भीमाशंकरचा ट्रेक खड्या चढणीचा असून इथून वर जायला दोन वाटा आहेत. दोन्ही वाटा डोंगराच्या पहिल्या पठारावर मिळतात. एक मार्ग 'गणपतीघाट' या नावाने ओळखला जातो. हा रस्ता थोडं वळण घेऊन जाणारा असला तरी एकदम सोपा आहे. शिडीचा रस्ता म्हणून डोंगरभटक्यांना दुसरा मार्ग परिचित आहे. मात्र हा मार्ग कठीण आणि धोकादायक आहे. विशेषतः पावसाळ्यात या मार्गातली तीन-चार ठिकाणं जीवघेणी आहेत. या ठिकाणी कपारींमध्ये शिड्या लावलेल्या आहेत. हा मार्ग एका उभ्या कड्याच्या कपाऱ्यांमधून काढलेला असल्याने पावसाळ्यात पूर्णपणे निसरडा होतो. यातले बहुतेक टप्पे दरीच्या बाजूने आहेत. असं असलं तरी सह्याद्रीत नेहमी या आडवाटांवर भटकणाऱ्यांना या साहसी मार्गाने जाण्याची ओढ असते.

तरुणांना थरार अनुभवायला आवडतोच. मात्र जरा जपून गेलं पाहिजे. कारण सह्याद्रीतल्या डोंगररांगामध्ये कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे इथला कातळ अतिशय निसरडा झालेला असतो. बाजूला खोल दरी नसली तरी पाच-दहा फुटांवरून पडणंदेखील जीवावर बेतू शकतं. पठारावर वाटेपासून थोडी बाजूला एक छोटीशी वाडी आहे. इथून वर जाणाऱ्या दुसऱ्या टप्प्यात मात्र काहीही आसरा नाही. खांडसहून सुरक्षित असलेल्या गणपतीघाटाने रमतगमत वर पोहोचायला सर्वसाधारणतः पाच-सहा तास लागतात. शिडीच्या रस्त्याने गेल्यास अर्धा-पाऊण तास कमी लागू शकतो. खांडस सोडल्यावर वाटेत काहीही मिळत नसल्याने बरोबर खाण्याचे पदार्थ हवेत. पहिल्या पठारानंतरच्या वाटेत वर जाईपर्यंत पावसाळ्यातदेखील पाणी मिळत नाही.

या डोंगररांगेत खूपच गारवा असतो. त्यातच पठारावर भन्नाट वारादेखील असतो. त्यामुळे आपल्या सॅकमधले सगळे कपडे प्लास्टिकमध्ये गुंडाळून ठेवावेत. मुक्काम असेल तर रात्री काढलेले बूट सकाळी घालताना तपासावेत. कारण जंगल घनदाट असल्याने बाहेरच्या गारव्यामुळे



अनु.

किडी-किरडू उबदार बुटांचा आश्रय घेण्याची दाट शक्यता आहे. हा भाग दुर्गम असल्याने वीजदेखील अनेक वेळा जाते. त्यामुळे सोबत उत्तम बॅटरी आणि मेणबत्त्या ठेवाव्यात. बरोबर प्रथमोपचाराचं साहित्य अत्यावश्यक आहे.




सगळा ट्रेक दाट रानातून जात असल्याने मळलेल्या वाटांखेरीज गुरांच्या अनेक वाटा आहेत. या वाटांवर भरकटण्याची शक्यता दाट असते. खाली उतरताना जेव्हा आपण मधल्या पठारावर येतो तेव्हा वाट चुकण्याची शक्यता खूपच जास्त असते. बरेचदा या भागात ढग जमलेले असतात. लांबचं न दिसल्यामुळे दिशेचा अंदाज येत नाही. त्यात डावीकडच्या बाजूला घनदाट जंगलाचा परिसर आहे. इथे चुकलं तर खूपच पंचाईत होऊ शकते. प्रत्येकाकडे बॅगेत बॅटरी, पाण्याची बाटली आणि खाण्याचे पदार्थ हवेतच. कारण इथे वाट चुकली तर कितीही आरडा-ओरडा केला तरी मदत मिळायला अडचणी होऊ शकतात. त्यात प्रचंड पाऊस असेल तर धुक्यामुळे परिस्थिती अजून बिकट होऊन जाते. त्यामुळे पहिल्यांदा जाणाऱ्यांनी खांडसहून स्थानिक माणूस घेणं केव्हाही चांगलं.

पावसाळ्यात या परिसरात तुफान पाऊस पडतो. कर्जतला जाणाऱ्या रस्त्यावर अनेक लहान पुल असल्याने जास्त पाऊस पडला तर पुलावरून पाणी वाहू लागतं आणि रस्ता बंद होतो. खांडस सह्याद्रीच्या एकदम पोटात आणि दुर्गम भागात वसलं आहे. त्यात कर्जतला जाणारी शेवटची बस संध्याकाळी चार वाजताची आहे. सध्या सहा आसनी रिक्षा असल्या तरी पावसाळ्यात संध्याकाळी उशीरा रिक्षावाले या भागात येत नाहीत. त्यामुळे भीमाशंकरहून परतताना शक्यतो लवकर चालायला सुरुवात करावी आणि परतीचा प्रवास लवकर सुरू करावा.



अनु.



# भिजरं भीमाशंकर

पर्यटन स्थळांची जेव्हा यादी केली जाते त्यात पहिल्या पाचात एक नाव हमखास असतं ते म्हणजे भीमाशंकर. नैसर्गिक विविधतेबरोबरच या ठिकाणाला धार्मिक महत्त्वही आहे त्यामुळे पर्यटकांची ये-जा तशी बाराही महिने चालू असते. अशा या निसर्गरम्य भीमाशंकरपासून आपल्या पावसाळी सहलीला आपण सुरुवात करतोय. लेट्स गो...!



अनु.

भीमाशंकर हे ३२९६ फूटांवर निसर्गाच्या कुशीत वसलेलं ठिकाण. पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या सीमेवर असलेलं भीमाशंकर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याने धार्मिक स्थळ म्हणूनही प्रसिद्ध आहे. पुरातन वास्तू शास्त्राचे नमुने आणि नैसर्गिक सौंदर्य यांचा अनोखा संगम इथं पाहायला मिळतो. एकीकडे इथल्या पुरातन वास्तू मानवी वास्तूकलेचं दर्शन घडवतात तर दुसऱ्या बाजूला निसर्गाची लोभस रुपं आपल्यासमोर उभी ठाकतात. त्यामुळे इथे येणारा पर्यटक भगवान शंकरापुढे गाभाऱ्यात जसा नतमस्तक होतो तसाच तो मंदिराबाहेरच्या निसर्गापुढेही नतमस्तक होतो. महाराष्ट्रातील बरीचशी तीर्थक्षेत्रं ही निसर्गरम्य ठिकाणी वसलेली असल्याने देवदर्शनाबरोबरच निसर्ग भ्रमणाचाही आनंद मिळतो. भीमाशंकरचंही तसंच आहे. गाभाऱ्यातल्या देवाचं आणि गाभाऱ्याबाहेरचा निसर्ग अनुभवायला पर्यटक नेहमीच या ठिकाणाला भेट देतात. तीर्थक्षेत्र असल्यामुळे राहण्याची आणि जेवणा-खाण्याची इथे सोय होऊ शकते. खरंतर भीमाशंकरला ट्रेक करायचा असेल तर एक दिवस पुरेसा आहे पण ज्यांना हा सगळा परिसर सवडीने पाहायचा आहे अशांसाठी दोन दिवस पाहिजेतच.

पावसाळ्यात इथला निसर्ग आणखीनच खुलून येतो. शुभ्र पांढऱ्या रंगाचे बेभुंद कोसळणारे धबधबे, हिरवीकंच डोंगररांग, उलट-सुलट दिशेने वाहणारे थंडगार वारे, पायाला गुदगुल्या करणारं अर्धवट वाढलेलं पोपटी गवत आणि हुलकावण्या देत फिरणारे पक्षी असा निसर्गाचा सरंजामी थाट इथे पाहायला मिळतो. रिमझिम पाऊस सोबतीला असेल तर हे दृष्य अधिकच विलोभनीय असतं. शेकरू नावाचा प्राणीही या परिसरात आढळतो. पण तो सहजपणे दृष्टीस पडेलच असं नाही. तुमची आणि त्याची वेळ एक आली तर तुम्हाला हा शेकरू नावाचा गोंडस प्राणी दर्शन देईलही, पण त्याचा भरवसा नाही. भीमाशंकरकडे प्रामुख्याने तीन वाटा जातात. एक शिडी घाट, दुसरा गणेश घाट आणि तिसरा बैलघाट. यातील शिडी घाट मार्गे जाणारा रस्ता गणेश घाटाच्या तुलनेत जास्त कठीण आहे. विशेषत: पावसाळ्यात शिडी घाट मार्गे जाणं धोकादायकच आहे. या मार्गावर आव्हानं जास्त असल्यामुळे ट्रेकर्स मात्र शिडीघाट मार्गे जाणं पसंत करतात. ट्रेकिंगचं थ्रील अनुभवायचं असेल आणि ट्रेकिंगचा अनुभव असेल तर शिडीघाटाचा विचार करावा. अन्यथा गणेश घाट मार्गे जावं. गणेश घाट तुलनेने कमी कठीण आणि रोजच्या वापरातला असल्यामुळे शिखरावर पोहोचायला कमी वेळ लागतो. तिसरा मार्ग म्हणजे बैलघाट. हा सगळा मार्ग चढणीचा आणि ओढ्यातून जाणारा असल्याने कठीण मार्ग आहे. ज्यांना लवकर माथ्यावर पोहोचायचं असेल त्यांनी गणेश घाट मार्गे जावं. आणखी एक रस्ता सिद्धगडवरून

भीमाशंकरकडे उतरतो. त्यासाठी आधी सिद्धगडचा ट्रेक करून भीमाशंकरला येता येतं. पण सिद्धगडचा ट्रेक अवघड असल्याने एक दिवस पुरणार नाही.

मुंबई सेंट्रलहून रात्री बारा-साडेबाराच्या दरम्यान भीमाशंकरला जाणारी बस सुटते. ही बस पहाटेच्या सुमारास भीमाशंकरला पोहोचते. खांडास हे गाव भीमाशंकरच्या पायथ्याशी वसलं आहे. कर्जत बस डेपोतून खांडासला जाणारी बस मिळते. कर्जत ते खांडस हे अंतर सुमारे चौतीस किलोमीटर आहे. मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणहून भीमाशंकरला जाता येतं. दर एक तासाने भीमाशंकर-पुणे बसेस सुटतात तशीच मुंबईकडे येणाऱ्या बसेसचीही सोय आहे. अन्यथा कर्जतहून ट्रेनने येता येतं. याशिवाय मुरबाड-म्हसा-नांदगावमार्गेही भीमाशंकरला जाता येतं.

निसर्गाची विविध रुपं न्याहाळतं साधारणतः साडे-तीन चार तास वरती पोहोचायला लागतात. मात्र वरती पोहोचलं की तिथला परिसर पाहून थकवा निघून जातो आणि भगवान शंकरापुढे नतमस्तक व्हायला होतं. बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या या देवळात प्रवेश करतानाच तिथल्या धार्मिक वातावरणाने मन प्रसन्न होतं. याशिवाय या परिसरात लहान-मोठी इतर देवळं, कुंडंही आहेत जी प्राचीन वास्तूकलेचे उत्तम नमुने म्हणून ओळखली जातात त्याचबरोबर त्यांना ऐतिहासिक महत्त्वही आहे. ज्या ठिकाणी भीमा नदीचा उगम होतो ते म्हणजे गुप्त भीमाशंकर. नागफणी, गुप्त भीमाशंकर अणि इतर मंदिरं ही इथली प्रमुख ठिकाणं, जी पाहिल्याशिवाय भीमाशंकरची सहल पूर्ण होऊ शकत नाही. भीमाशंकरच्या डोंगरावरून पदर गडाचंही दर्शन होतं. मात्र मध्यंतरी लुटमारीचे प्रकार या परिसरात घडल्याने ग्रुपने याठिकाणी जावं. इथला निसर्ग, इथली देऊळ, इथलं निसर्गरम्य आणि धार्मिक वातावरण मनाला तजेला देणारं आहे. पावसाळ्यात भिजरं भीमाशंकर एकदा तरी पाहावं असंच आहे.

# वन्यप्रेमींचा लाडका ट्रेक...



वर्षाऋतू म्हणजे भटक्यांची चंगळच! हिरवाईने नटलेले डोंगर... पावसाचे बरसते तुषार... आल्हाददायी वातावरण... आणि त्यामुळे कितीही तंगडतोड केली तरी न जाणवणारा थकवा! म्हणूनच पावसाळा हा भटक्यांचा हंगाम... अशावेळी सर्वांचाच अगदी लाडका ट्रेक म्हणजे पेठ ते भीमाशंकर.

पहाटेच सिंहगडने कर्जतमध्ये दाखल व्हायचं. इथून आंबिवलीपर्यंत थेट एसटी आहे. १८ किलोमीटरचा हा प्रवास आहे. अगदी निसर्गसंपन्न. ऐन सह्यधारेला लागून असलेल्या डोंगराळ भागातून! या अख्ख्या प्रवासात आपल्याला सतत खुणवत असतो तो पेठ ऊर्फ कोथळीगडचा 'थम्सअप'च्या आकाराचा उत्तुंग गगनचुंबी सुळका! तो ढगात घुसलेला असताना त्याचं सौंदर्य न्याहाळत आपण येऊन पोहोचतो ते आंबिवलीत.

शे-सव्वाशे उंबऱ्यांचं छोटंसं पण टुमदार गाव म्हणजे आंबिवली. इथल्या घरांची सुबक रचना, टापटीप, कौलारू छपरं, समोर शेणानं सारवलेलं अंगण... सारं काही बघताना नजर खिळून राहते.

आंबिवली वसलं आहे चिल्हार नदीकाठी. याच नदीकाठच्या एका कड्यात लेणी आहेत . लेण्यांमध्ये विष्णू, हनुमान, श्रीकृष्ण व लक्ष्मीविष्णू आदी देवदेवतांच्या प्रतिमा आढळतात. लेणी आणि नदीच्या आजूबाजूचा प्रदेश इथल्या गावकऱ्यांनी वनविहार म्हणून फुलवला आहे. इथे दाट झाडी असून, फुलझाडांची लागवड केलेली दिसते.

पहाटे-पहाटे निघून आंबिवलीत दाखल व्हावं. चिल्हार नदीकाठचं सौंदर्य डोळ्यात साठवावं. मग वनभोजनाचा आनंद लुटून सायंकाळी परतावं. इथे एक उत्तम निसर्गसहल होऊ शकते.

आंबिवली गावात शिरण्याआधी एक रस्ता उजवीकडे आत वळतो. या रस्त्याने थोडं आत चालत गेलं की, एक प्रशस्त बैलगाडी रस्ता डोंगरचढणीला लागून थेट पेठच्या पठारावर घेऊन जातो. पण त्यासाठी चांगली दीड-दोन तासांची रपेट करावी लागते. या रपेटीत साथ देते ती हिरवी वनश्री अन् वर्षाराणी. त्यामुळे पेठ पठारावर पोहोचेपर्यंत पाय शिणले असले, तरी मनाची मरगळ मात्र दूर झालेली असते. या पठारावर पोहोचून सभोवती नजर फिरवली की, डोळ्यांचं पारणं फिटते. सभोवतालच्या कातळकड्यांवरून खोल दरीत अक्षरश: १५-२० धबधबे झेपावताना दिसतात. समोर खुणवत असतो तो पेठचा बेलग किल्ला.

निसर्गराजाची प्रशंसा करत आपली पावलं पुढे पडू लागतात ती पेठ गावाकडे. खरंतर याच पेठ गावामुळे गडाला हे नाव मिळालं आहे.

पेठ गावातूनच गड चढण्यासाठी पाऊलवाट आहे. साधारण अर्ध्या तासाच्या चालीनंतर आपण गडावर प्रवेश करतो. तिथे प्रवेश करताच अवघा सुळका आपल्या अंगावर येतो. या सुळक्याच्या पोटात असंख्य पाण्याची टाकं आणि गुहा खोदलेल्या आढळतात. प्रवेशद्वारापाशी असलेली गुहा इतकी प्रशस्त आहे की त्यात शे-सव्वाशे लोक आरामात मुक्काम करू शकतील. या गुहेत अनेक कोरीव प्रतिमा विखुरलेल्या दिसतात. गुहेत उजेड यावा म्हणून सुंदर नक्षीदार गवाक्षंही इथे कोरलेली दिसतात.

या शेजारच्याच गुहेत काळभैरवनाथाचं

मंदिर आहे. भैरोबाची प्रसन्न मूर्ती आपले डोळे दिपून टाकते. या मंदिराशेजारूनच पायऱ्या खोदलेल्या दिसतात. त्यांनी वर गेलं की आपण एका लहानग्या दरवाजातून सुळक्याच्या माथ्यावर पोहोचतो. इथे पाण्याची दोन मोठी टाकं आणि माजलेलं गवत एवढंच आहे. पण इथलं वातावरण मात्र अंगावर शहारे उभं करतं.

---

गार वारा आणि आजूबाजूचा प्रदेश न्याहाळण्यासाठी इथे यावं. इथून मुख्य सह्याद्री रांगेच्या रौद्रभीषण कड्यांचं अनोखं दर्शन होतं. इथून माथेरानचा प्रदेश अगदी सुस्पष्ट दिसतो. तसंच पदरगड, त्यावरचा कलावंतीणीचा महाल आणि त्यामागचं भीमाशंकरचं नागफणी टोकही नजरेत भरतं. उद्या आपल्याला ते गाठायचं आहे, या विचारानं अंगावर शहारे येतात!

पेठचा किल्ला तसा फारच छोटा आहे. कर्जतहून खेड-कडूसकडे जाणाऱ्या कोलिंबा आणि सावळ घाटावर दक्षतेने पहारा करणाऱ्या या किल्ल्याचा उपयोग शिवाजीराजांच्या नंतरच्या काळात शस्त्रास्त्रांचा साठा ठेवण्यास केला जाई. इथल्या खोदकामावरून हा किल्ला सातवाहन काळात बांधला गेल्याचा अंदाज आहे. संभाजीराजांच्या काळापर्यंत हा किल्ला अजिंक्य राहिला. नंतर किल्लेदाराने मुघल सैन्याला मराठे म्हणून गडात प्रवेश दिला अन् म्हणून हा अजिंक्य किल्ला मोगलांकडे गेला.

रात्रीचा मुक्काम पेठवरच्या गुहेत करून उजाडायच्या आत भीमाशंकरकडे प्रस्थान करावं. कारण हा चांगलाच पल्ला आहे. चांगली चार-पाच तासांची तंगडतोड करायची आहे. पेठ गावाच्याविरुद्ध दिशेने एक घाटवाट उतरून डुक्करवाडीमार्गे जांबरूंगला घेऊन जाते. इथून सुरू होतो गणपती घाट. माजलेलं जंगल, रौद्ररूपी कातळकडे आणि त्यावरून ओसंडून वाहणारं पावसाचं पाणी याखेरीज इथे

दुसरं काहीच दिसत नाही! चार-साडेचार तासांची चंगळच!

गणपती घाटाची वाट पदरच्या किल्ल्याला वळसा घालून जाते. पदरच्या पायथ्याला एक धनगरवाडा आहे. तो ओलांडला की पुढे आहे उभी चढण. इथे डोकं उंचावलं की ढगात घुसलेला नागफणी नजरेत भरतो. त्याच्या दिशेने चालत राहिलो की, स्वयंभू गणपतीचं सुबक कौलारू देऊळ दिसतं. या स्वयंभू गणेश मंदिरामुळेच या घाटाला 'गणपती घाट' म्हणून संबोधलं जातं.

घाटाचा चढ जसजसा संपत जातो तसतशी झाडी अधिकच गर्द होऊ लागतात आणि जंगलाचं अस्तित्व अधिकच जाणवू लागतं. त्यात भरीला दाट धुकं असल्यामुळे पाच फुटावरचंही काही दिसत नाही. मध्येच एखादं शेकरू आवाज करत एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी मारतं. शेकरू म्हणजे मोठ्या आकाराची उडती खार. शेखरूला भीमाशंकरची शान मानलं जातं. नशीब चांगलं असेल तर मोर किंवा अगदी एखादा बिबट्याही लांबून दर्शन देईल! असा भीमाशंकर अभयारण्याचा थ्रिलिंग अनुभव घेत आपण दाखल होतो ज्योतिर्लिंग मंदिरात.

भीमा नदीच्या उगमापाशी हे देखणं सुबक कोरीव कामाने नटलेलं मंदिर उभं आहे. यावरचं अप्रतिम कोरीवकाम बघताना आपण इतके गुंग होऊन जातो की, देवदर्शनासाठी आपण आलो आहोत, हे काही काळ विसरूनच जातो. मग मंदिरातून 'जय शंभो' असा पुजाऱ्याचा आवाज कानी पडला की, भानावर येऊन मंदिरात प्रवेश करतो.

देवळातल्या ज्योतिर्लिंगाचं इतकं सुंदर दर्शन झालं की धन्य झाल्यासारखं होतं. इथवर येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या पायपीटीचं चीज म्हणजे असं सुरेख भीमाशंकर दर्शन!

## ५- भोरगिरीच्या खोऱ्यातली वाट

पावसाळ्यात खळाळत्या सौंदर्याची अनुभूती घ्यायची असेल, तर भोरगिरीच्या खोऱ्यात उनाडणं हा एक सुंदर पर्याय आहे. पुणे-राजगुरुनगर हा पर्याय थोडा रुक्ष वाटेल; पण त्यापुढचा रस्ता तुमच्या भटकण्याचं सार्थक करणारा आहे. राजगुरुनगरला हुतात्मा राजगुरुंच्या स्मारकाला भेट द्यायची आणि पुढं निघायचं. राजगुरुनगरपासून सुमारे पन्नास किमी अंतरावर भोरगिरी आहे. तिथं पोहोचण्यासाठी साधारण दीड तास लागतो. भीमानदीच्या खोऱ्यात चासकमान धरण आहे. या धरणाजवळूनच भोरगिरीचा रस्ता जातो. या रस्त्यानं तुम्ही आत आत जाता, तसं निसर्गसौंदर्याची खाण उलगडत जाते. खळाळणारे ओहोळ आणि ओढे ही पर्वणी डोळ्यांत साठवत तुम्ही चालत राहता. ट्रेकिंगची हौस असेल, तर भोरगिरी गावात पोहोचल्यावर तुम्हाला भोरगिरी हा छोटासा किल्लाही चढून पाहता येईल. तिथल्या गुहेतून दिसणारा नजारा केवळ अप्रतिम. जेवणाचा डबा सोबत ठेवलात, तर हा 'सफर सुहाना' झालाच म्हणून समजा.



ⓘ **कसं जाल?**

मुंबई - पुणे - राजगुरुनगर - भोरगिरी



अनु.



## श्री विघ्नेश्वर ( ओझर )

पृथ्वीवरील सर्व वैदिक कर्मांचा नाश करणाऱ्या विनायकाचं हे स्थान, शरण आलेल्या विघ्नासुराने 'आपल्या नावाआधी माझं नाव उच्चारलं जावं' असा वर मागितल्याने विनायकाने 'विघ्नेश्वर 'नाव धारण केलं. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात ओझर हे गाव नारायणगावापासून ८ किमी अंतरावर आहे. श्री विघ्नेश्वराच्या मंदिरास चहुबाजूंनी संरक्षणार्थ दगडी तटबंदीवर पायवाट असून तेथून लेण्याद्री आणि शिवनेरी किल्ला दिसतो. श्री विघ्नेश्वराची मूर्ती पूर्वाभिमुख, पूर्णाकृती आणि आसन मांडी घातलेली आहे. मूर्तीच्या डोळ्यांत माणिक, कपाळावर चकचकीत हिरा आणि नाभीत खडा बसवला आहे. डौलदार महिरपी कमानीतील मूर्तीच्या दोन्ही बाजूस ऋध्दीसिध्दीच्या मूर्ती आहेत.


## श्री गिरिजात्मज ( लेण्याद्री )



डोंगरावर आणि बौध्द लेण्यांच्या सनिध्य असलेलं अष्टविनायक क्षेत्रांपैकी एकमेव क्षेत्र म्हणजे लेण्याद्री. इथला विनायक म्हणजे पार्वतीचा (गिरिजेचा) सुपुत्र गिरिजात्मज. पुण्याच्या उत्तरेस कुकडी नदीच्या उत्तर पश्चिम तीरावर लेण्याद्री वसलं आहे. इथल्या डोंगरावर संपूर्ण मंदिर एकाच दगडात कोरलेलं आहे. यालाच गणेश लेणीही म्हटलं जातं. मंदिरात पोहोचण्यासाठी पायथ्यापासून ३०७ पायऱ्या चढाव्या लागतात. गणेशाची मूर्ती दगडी भिंतीवर खोदलेली आहे. जी उत्तराभिमुख आहे. कोणीही स्वहस्ते या गणेशाची पूजा करू शकतो, हे इथल्या मंदिराचं वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला या मंदिराच्या समोरच आहे. त्यामुळे या स्थानाला ऐतिहासिक महत्त्वही आहेच.

# भोर

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते भोर | | | | | 198 | | | | |
| **1** | पुरंदर | | किल्ला | | | 30 | NE | | | |
| **2** | बनेश्वर | धबधबा | | मंदिर | ट्रेक | 21 | NE | 25 | SW | |
| **3** | खरीव खिंड - राजगड | | | | | 47 | NW | 26 | NW | |
| **4** | राजगड | | किल्ला | | ट्रेक | 40 | NW | 10 | S | |
| **5** | खरीव खिंड - भुतोंडे | | लाँग ड्राईव्ह | | | 51 | NW | 9 | SW | |
| **6** | केळद | | | | खेडे | 67 | NW | 15 | SW | |
| **7** | मांढरदेवी | धबधबा | लाँग ड्राईव्ह | मंदिर | | 24 | SE | 87 | SE | |
| **8** | केंजळगड | | किल्ला | | | 25 | SW | 48 | SW | |
| **9** | रायरेश्वर | | | मंदिर | ट्रेक | 29.5 | SW | 5 | NW | |
| **10** | कुंड | | | | खेडे | 43 | SW | 66 | NW | |











अनु.



मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत कडव्या झुंजीचे साक्षीदार असलेल्या किल्ल्यांपैकी एक किल्ला आहे पुरंदर. इसवी सन १६६५ मध्ये औरंगजेबाचा एक सेनानी दिलेरखान यांनी या किल्ल्याला वेढा घातला होता. औरंगजेबाने दिलेरखानला प्रचंड तोफ गोळा व सैन्यासह शिवाजी महाराजांवर हल्ला करण्यासाठी पाठवला होता. त्याला शिवरायांनी केलेल्या सुरतेच्या लुटीचा बदला घ्यायचा होता. या वेढ्याला शह देण्यासाठी शिवाजी महाराजांच्या मुरारबाजी या पराक्रमी सेनानीने निवडक ५०० मावळ्यांना घेऊन प्रचंड मोठ्या संख्येने असलेल्या मोगल सेनेवर हल्ला केला. मोगलांना बेसावध गाठून घनघोर युद्ध केले. मुराबबाजीने केलेला पराक्रम पाहून तर दिलेरखान आचंबित झाला आणि त्याने मुरारबाजीला आमिषं दाखवली. पण महाराजांच्या या एकनिष्ठ लढवय्याने त्याला भीक न घालता लढत-लढतच हौतात्म्य पत्करलं. या अचाट पराक्रमाची साक्ष देणारा सह्याद्रीतला हा किल्ला ट्रेकर्स आणि इतिहासप्रेमींना अभिमानास्पद वाटतो.

पुण्याजवळच्या सासवडजवळ हा किल्ला आहे. सासवडहून या किल्ल्यावर जाण्यासाठी खासगी वाहन मिळू शकतात. अन्यथा पायथ्याशी असलेलया नारायणपूरपर्यंत एटी बसेस आहेत तिथून चालत हा किल्ला सर करता येईल. सध्या हा किल्ला एनसीसीच्या ताब्यात आहे. किल्ल्यावर जाताना पुरंदरेश्वराचे मंदिर आहे. गडावर पोहोचल्यावर एक सुंदर तळ दिसतं. या किल्ल्यावर काही पराक्रमी योध्यांचा जन्म झाला. १६५७ साली संभाजी राजांचा, तर १७७४ साली सवाई माधवरावांनी इथं जन्म घेतला. गडाच्या बालेकिल्ल्यावर केदारेश्वराचं मंदिर आहे. गडावरून आजूबाजूचा दऱ्याखोऱ्याचा प्रदेश न्याहाळताना स्वतःला विसरायला होतं.

याच भेटीत पायथ्याशी असलेलं नारायणेश्वराचं मंदीर आणि नारयणपूरमधील प्रसिद्ध दत्तमंदीराचं दर्शनही घेता येईल.



## जंगलझाडीतलं बनेश्वर

श्रावणातील हिरवे निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी डोंगरकुशीतील एखाद्या शांत शिवालयाच्या शोधात असाल तर, पुण्याजवळच्या बनेश्वरला जा. डोंगरटेकड्यांनी वेढलेल्या गर्द वृक्षराजीत, पुण्याजवळील नसरापूर गावाजवळ हे शिवालय वसले आहे. एक दिवसाच्या कुटुंब सहलीसोबतच ट्रेकर्ससाठीही हे ठिकाण सोयीचे आहे. बनेश्वर पुण्यापासून दक्षिणेला सातारा हायवेवर सुमारे ३५ किलोमीटरवर आहे. मंदिराभोवती दाट बन, म्हणजेच जंगलझाडी आहे. त्यामुळेच या शिवालयाला 'बनेश्वर' नाव मिळाले आहे. १७व्या शतकात पहिल्या बाजीरावाने हे दगडी शिवमंदिर उभारले. निसर्गसौंदर्याचे वरदान लाभल्यामुळे, शिवभक्तांसोबतच पर्यटकही बनेश्वरकडे आकर्षित होऊ लागले आहेत.

मंदिराचे प्रवेशद्वार, तसेच आवारातील दिपमाळ, मोठी घंटा व स्वच्छ पाण्याची कुंडे लक्षवेधक आहेत. मंदिरातील श्री विष्णू, लक्ष्मी तसेच महादेवाच्या मूर्ती उत्तम शिल्पकृती पाहिल्याचे समाधान देतात. मंदिराच्या आवारात धर्मशाळा तसेच पायऱ्या असणारे स्वच्छ पाण्याचे खोल दगडी तळे आहे. खोलगट गाभाऱ्यात पाच शिवलिंगे आहेत.

मंदिर परिसरात विकसित केलेली बाग तसेच मंदिरामागील सुंदर धबधबा पर्यटकांचे आकर्षण आहे. खोल नदीत असणारा हा धबधबा पाहण्यासाठी लोखंडी मचाणही उभारलेले आहे. पाऊलवाटेने धबधब्याजवळही जाता येते. मात्र सुरक्षेची व्यवस्था नसल्याने हा धबधबा दुरूनच न्याहाळे योग्य. नदीच्या कडेला डुलणारी उसाची शेते, स्वच्छ पाण्याने खळाळणाऱ्या नदीकाठी चरणारी गुरे, विविध जातींचे पक्षी यांचे निवांत निरिक्षण करणे एक आनंदानुभवच.

ट्रेकर्सलाही हे ठिकाण सोयीचे आहे कारण, या ठिकाणापासून छत्रपती शिवाजीमहाराजांचा राजगड ५० तर तोरणा किल्ला ३५ किलोमीटरवर आहे.

बनेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे मंदिराची देखभाल करण्यात येते. ट्रस्टने मंदिर परिसराचीही निगा उत्तम ठेवली आहे. फारशी गजबज नसल्याने अद्याप तरी बनेश्वराचे निसर्गसौदर्य अस्पर्श राहिलेले आहे.

### कसं जाणार?

- पुणे शहरातील स्वारगेट बसस्थानकावरून वेल्हा गावाला जाणाऱ्या एसटी गाड्या नसरापूर फाट्यावर थांबतात. तसेच साताऱ्याकडे जाणाऱ्या अनेक गाड्याही या ठिकाणी थांबतात. तेथून बनेश्वरापर्यंत जाण्यासाठी सहा आसनी रिक्षा तसेच खासगी जीपगाड्या मिळतात. निसर्गसौंदर्य न्याहाळत फाट्यावरून मंदिरापर्यंत चालतही जाता येईल. फाट्यावरून मंदिर तीन किलोमीटरवर आहे. तर नसरापूर गावापासून अडीच किलोमीटरवर आहे.

## ५: नीरव शांततेचा रस्ता




पक्षांचं मुक्त गान, खळाळणारे ओहोळ आणि डोळ्यांना सुखावणारा निसर्ग हवा असेल, तर खरीव खिंड ते भुतोंडे हा सुंदर रस्ता तुमच्या स्वागतासाठी सज्ज आहे. दिवसातून एखाद-दुसरी एसटी आणि काही जीपगाड्या सोडल्या, तर या रस्त्यावरचा निवांतपणा कधीच पुसला जात नाही. डावीकडं राकट सौंदर्यानं लक्ष वेधणारा दुर्गराज राजगड, उजवीकडं अक्राळविक्राळ तोरणा आणि झाडीभरल्या वाटेवर गाणारे रानसोबती असा हा सुंदर प्रवास आहे. दूरवर जाताना राजगडाच्या संजीवनीचं कातळरूप एखाद्या महाकाय नौकेसारखं वाटतं. जेवणखाण मिळणं दुर्लभ असलं, तरी हा रस्ता तुम्हाला भरभरून खूप काही देतो. या पट्ट्यात गॅरेज नावाचा प्रकार नसल्यानं गाडीचं तेलपाणी व्यवस्थित करून मगच या रस्त्याकडं वळावं. पाबे घाटातून खाली उतरलात, की नसरापूर-वेल्हे रस्त्यावर खरीव खिंड दर्शन देईल.

### ⓘ कसं जाल?

मुंबई - पुणे - पाबे खिंड - पाबे गाव - खरीव खिंड - भुतोंडे

(मुंबईहून पुण्याला पोहोचलं की तिथून साधारणतः १०० किलोमीटरच्या परिसरातले हे रस्ते आहेत.)

# गडांचा राजा... राजियांचा गड




सुवेळा माची



सईबाईची समाधी





राजगड

राजगडचा ट्रेक हा डोंगरभटक्यांच्या एकदम जिव्हाळ्याचा आणि अत्यंत अभिमानाचा विषय. राजगडाचं नुसतं नाव घेतलं तरी व्यवहारीपणाची सगळी पुटं क्षणार्धात नाहीशी होतात. मन लगेच वाऱ्याच्या वेगाने गडावर पोहचतंदेखील. गड आहेच तसा एकदम बुलंद, पिळदार आणि सडसडीत. ज्याने कोणी एकदा सुवेळा माची बघितली की तो जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी विसरू शकत नाही. नैसर्गिकरित्या सुवेळा माचीएवढा लांबवर पसरलेला आणि बेलाग काळाकभिन्न कडा अन्यत्र मिळणं मुश्किल आहे. त्यात एवढ्या लांब कड्याला महाराजांनी दुपदरी तटबंदी केल्यामुळे त्याचं मुळातलं रूद्र रूप अजून रौद्र झालं.

मुरुंबदेवाच्या या बोडक्या डोंगराला महाराजांनी हे अतिशय देखणं दुर्गशिल्प साकारून सुंदर साज चढवला. सह्याद्रीच्या डोंगरकड्यावरचा हा मुलुखच वेगळा आहे. बालेकिल्ल्यावरून सह्याद्रीचं हे राकट आणि कणखर रूप अक्षरशः दिपवून टाकतं. साहजिकच राजगडाच्या नुसत्या आठवणीनेदेखील डोंगरभटक्यांची मनं एकदम हळवी होतात. एवढं त्याचं ऋणानुबंध राजियांच्या या किल्ल्याशी आहे.

गडावर जायला बऱ्याच वाटा असल्या तरी मुंबई-ठाणेकरांना गुंजवण्याहून निघून गडाच्या चोरदरवाज्याची वाट एकदम सोयीस्कर आहे. मुंबई- ठाण्याहून शनिवारी दुपारी साधारण अडीच तीन वाजता आपल्या गाडीने निघालो तर आठ वाजेपर्यंत आपण पायथ्याच्या गुंजवण्याला पोहोचतो. पुण्यानंतर कात्रजचा घाट पार केला की खेड-शिवापूर येतं. दोन्ही बाजूला खूप हॉटेल्स आहेत. बरोबर खाणं घेतलं नसेल तर इथे जेवलं पाहिजे. कारण नंतर काही मिळत नाही. हे एक आणि दुसरं म्हणजे हे ठिकाण सोडलं की एकदम सावध राहिलं पाहिजे. कारण साधारण पाच-सहा कि.मी.वर नसरापूरला राजगडाकडे जाणारा रस्ता असल्याने आपल्याला उजवीकडे वळावं लागतं. नसरापूरला उजवीकडे वळलं की सात ते आठ कि.मी. वर मार्गासनी हे तसं मोठं गाव आहे. गुंजवण्याला जायला इथे डावीकडे वळावं लागतं.

गुंजण्याला गाडी ठेऊन सरळ गावाबाहेर पडलं की एक मोठा रूंद बैलगाडी रस्ता आहे. गाव सोडल्यावर पाच ते सात मिनिटं चाललं की डावीकडे एक घर आहे. तिथे परत डावीकडे वळलं की परत रूंद रस्ता आहे. या चढणीवरून अर्धा तास चाललं की परत डावीकडे लहानशी पायवाट आहे. ही वाट मग सरळ राजगडावर जाते. मधल्या सपाटीवर समोर दिसणाऱ्या जंगलाच्या तोंडावर एक मोठं घर आहे. मात्र वाट समोरच्या भल्या मोठ्या सोंडेवरून सरळ किल्ल्यावरच्या चोरदरवाज्यातून पद्मावती माचीवर जाते. खरं म्हणजे एकदा या वाटेवर लागलं की समोर बालेकिल्ला सतत दिसत राहतो. कुठल्याही ऋतूत या वाटेवर अजिबात पाणी मिळत नाही. त्यामुळे सोबत प्रत्येकी किमान दोन लिटर पाणी नेलंच पाहिजे. या वाटेवर मध्येमध्ये स्थानिक गावकरी ताक विकतात. गडावरच्या पद्मावती माचीवर एक मोठं देऊळ आहे. यात पंधरावीस जण सहज राहू शकतात. अजून एक लहान देऊळ असून यात सहा-सात जण राहू शकतात. या व्यतिरिक्त दोन मोठ्या धर्मशाळा आहेत. यात दोन्ही मिळून ३०-४० लोक राहू शकतात. पिण्याचं पाणी मुबलक आहे. बालेकिल्ल्यावर दोन देवळं असून यात

दोन्ही मिळून १०-१२ जण राहू शकतात. बालेकिल्ल्यावरच्या टाक्यातलं पाणी एकदम मधुर आहे.

सुवेळा, संजीवनी माची, बालेकिल्ला सगळं व्यवस्थित बघायला किमान चार-पाच तास लागतात. गडावर ताक विकणाऱ्यांकडे आपलं सामान ठेऊ शकतो. शनिवारी गडावर मुक्काम करून रविवारी सकाळी साडेसहा ते सात वाजता फिरायला निघालो तर साधारणतः अकरा वाजेपर्यंत परत पद्मावती माचीवर पोहोचू शकतो. सर्वसाधारण ट्रेकर्सना खाली उतरायला तीन तास लागतात. कारण वाटेत थोडा वेळ कातळातून उतरावं लागतं आणि साधी पायवाटदेखील तशी घसरणीची आहे.

गरुड आकाशात विहार करताना आपले अजस्र पंख उघडून आकाशात विहार करताना दिसतात तसा राजगडचा आकार आहे. गडाला तीन माच्या आहेत. या तिघींच्या बरोबर मध्यावर ताशीव कड्याने सुरक्षित केलेला अवाढव्य उंच डोंगर आहे. यावर आहे बालेकिल्ला. उजळतीच्या दिशेला सुवेळा तर मावळतीला संजीवनी आणि उत्तरेकडे पसरट अशी पद्मावती. बऱ्यापैकी सपाटी असल्याने पद्मावतीवर सदर, राजवाडा, दारुखाना अशा इमारती. मात्र आज त्यांचे तुरळक अवशेष आहेत. बालेकिल्ला मात्र कुणाही माणसाला आपल्या उंचीने, तिथून दिसणाऱ्या सह्याद्रीच्या जबरदस्त दर्शनाने वेड लावणारा आहे. आजही बालेकिल्ल्याचं अष्टकोनी दगडी प्रवेशद्वार तेवढ्याच मज़बुतीने आपलं स्वागत करतं. बालेकिल्ल्याची वाट विशेष अवघड नसली तरी खूपच धोकादायक आहे. कातळात खोदून खोबण्या केलेल्या आहेत. त्याला एकीकडे आधारासाठी लोखंडी रुंद पाइप आहेत. मात्र अती पाऊस आणि वाऱ्यामुळे ते अनेक ठिकाणी खिळखिळीत झालेत. त्यांच्यावर संपूर्ण भरवसा ठेवता नये. मातबर मोंगल काय किंवा प्रबळ इंग्रज काय, या परकीय जबरदस्त शक्तीबरोबर यशस्वी टक्कर देण्यासाठी मराठी रक्त जितकं सांडलं तितकं अन्यत्र सांडलं नाही. याची साक्ष देत राजगडासारखे बुलंद किल्ले आजही तेवढ्याच समर्थपणे उभे आहेत. साहजिकच तरुणांना हे किल्ले अतिशय प्रिय आहेत. वर्षाच्या कुठल्याही ऋतूत जा, राजगडावर तरुणाईचा वावर कायम असतो. त्याचं ते रांगडं रूप त्यांना वेड लावत असतं. खरोखर राजगड गडांचा राजाच आहे आणि महाराजांना तो अतिशय प्रिय असल्याने तो राजियांचा गड आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या आवडत्या राजगडाच्या सौंदर्याबद्दल किती आणि काय लिहावं? त्याची अभेद्यता, त्याची सुंदरता खरोखर अवर्णनीय. पण त्याहीपेक्षा वेड लावणारी गोष्ट म्हणजे आजूबाजूला दिसणारा निसर्ग.

देवी भवानी माता आणि राजमाता जिजाऊंच्या आशीर्वादानं छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य तयार केलं. राजांच्या आवडत्या या गडाच्या, म्हणजे राजगडाच्या सौंदर्याबद्दल किती आणि काय लिहावं? त्याची अभेद्यता, त्याची सुंदरता खरोखर अवर्णनीय. पण, त्याहीपेक्षा वेड लावणारी गोष्ट म्हणजे आजूबाजूला दिसणारा निसर्ग. सुप्रसिद्ध इतिहासकार-लेखक स्व. गो. नी. दांडेकर यांनी जे म्हटलं आहे, ते अगदी खरं आहे. मनीमानसी जाणारा राजगड. गेली वीस-पंचवीस वर्षं विविध अंगानं पाहूनसुद्धा तो पाहून होत नाही. प्रत्येक वेळी असं वाटतं की काहीतरी राहिलंय, मागे उरलंय.

त्या निसर्गसौंदर्यात एक विलक्षण ओढ आहे, तिथल्या झाडांचे, फुलांचे विविध आकार-प्रकार आपल्याला सांगतात, 'इथेच राहा आमच्या सान्निध्यात आणि करा निरीक्षण आमचे हवे तेवढे.' मुळातच अभेद्य आणि सुंदर असलेल्या या ब्रह्मर्षीच्या डोंगराला महाराजांनी जे देखणं रूप दिलं ते पाहून आपणही स्तंभित होतो. तीनशेहून अधिक वर्षांपूर्वी कोण वास्तू-शिल्पकार असेल? असं कोणतं रसायन त्यामध्ये वापरलं असेल की आजतागायत त्या सुवर्णयुगाची साक्ष देत आपल्यासमोर तो आजही खंबीरपणे उभा आहे. पाचोर दिंड्या या महादरवाजावर वारा-पाऊस यांचा काहीही परिणाम होत नाही का? इथल्या वाटा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाऊलखुणा जपत अजून जशाच्या तशा आहेत.

पुणे जिल्ह्यात वसलेला हा किल्ला मुरुमदेवाचा डोंगर म्हणून ओळखला जायचा. तोरणा बांधताना सापडलेला खजिना राजगडनिर्मितीस कामी आला आणि महाराष्ट्राला मिळाला अजिंक्य किल्ले राजगड. रायगडाआधी जवळपास २६ वर्षं स्वराज्याची राजधानी किल्ले राजगड होता. हा नितांतसुंदर किल्ला रायगडाएवढा प्रसिद्ध नसला, तरी बुरुज माच्यानी नटलेला मनोहरी आणि निसर्गसौंदर्यानं नटलेला आहे. शिवछत्रपतींची पायधूळ मस्तकी धारण करून आणि शूर मराठ्यांच्या पराक्रमांची गाथा सांगत सुमारे ३५० वर्षांहून अधिक वर्षं दिमाखात उभा आहे.

पुण्याहून साठ किलोमीटर नैऋत्य दिशेस

# गडांचा राजा



नरसापूरच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या रांगांमध्ये राजगड वसलेला आहे. गडाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे तेराशे मीटर आहे. गडावर पद्मावती सुवेळा आणि संजीवनी या तीन माच्या असून बेलाग बालेकिल्ला आहे. पद्मावती माचीवर राहण्याची सोय होऊ शकते. पद्मावती देवीचं मंदिर असल्यामुळे या मातीला पद्मावती माची म्हणतात. यावर सईबाईंची समाधी आहे. माचीवर असलेला तलाव सुंदर असून पिण्याच्या पाण्याच्या टाक्याही आहेत. पूर्वेला सुवेळा आणि पश्चिमेला संजीवनी माची आहे. बालेकिल्ला बेलाग असून बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी दगडातच कोरलेल्या पायऱ्या आहेत. गडाची तटबंदी अजूनही भक्कम आहे. एका बाजूला सुवेळा एका बाजूला संजीवनी आणि मध्ये पद्मावतीच्या वरच्या बाजूला बालेकिल्ला जणू काही एक युगपुरुष सौंदर्याचं लेणं लेवून आपल्या स्वागतासाठी तयार आहे, म्हणतो आहे, 'या निसर्गाच्या या जणू स्वर्गात रममाण व्हा, आपल्या दऱ्याखोऱ्यातून फिरा आणि इतिहासाच्या त्या पानांची पुन्हा उजळणी करा' तेथे महाराजांनी काय केलं असेल, कुठून कुठून, कसे महाराज लढले असतील तसे ते प्रतापगडावरून परत आले असतील, या चोरदिंड्यांतून किती वेळा त्यांचं चढणं-उतरणं झालं असेल. इतिहास सदरेवर बसून अनेक मोहिमा-आराखडे आखले गेले असतील. एका युगपुरुषाच्या पदस्पर्शानं पावन झालेल्या भूमीवर आपण उभे आहोत हा विचारच मनात थरार निर्माण करतो.

राजगड पाहण्यासाठी राजगड प्रदक्षिणेचे ट्रेक्स काही संस्था रास्त शुल्क घेऊन आयोजित करत असतात. http://thenaturelovers.org या वेबसाइटवर त्याबाबत माहिती मिळू शकेल. इतिहासतज्ज्ञांच्या सोबतीनं हा गड पाहण्याचा आनंद काही और आहे. खालच्या जंगलातून संपूर्ण २० किलोमीटरची प्रदक्षिणा घालताना तेथून दिसणारे गडाचं दृश्य अवर्णनीय आहे. गडांचा राजा आणि राजांच्या गडाची प्रदक्षिणा म्हणजे इतिहासप्रेमींसाठी एक वेगळा अनुभव ठरू शकतो.

## केळद


पुण्यानजिकच्या वेल्ह्याजवळचं केळद हे नितांतसुंदर गाव. वेल्हा-भट्टी-पासली-केळदखिंड-केळद या मार्गे गाव गाठावं. इथून मढ्या आणि उपांड्या घाटवाटांच्या माथ्यावर उभं राहून पावसाचं स्वागत करता येईल. गावात चहा, नाश्ता, जेवणाची सोय होते.

## ८- घाटरस्त्याचा डौल

भोरहून मांढरदेवीला घाटरस्त्यानं जाणं हाही एक मस्त ड्राइव्ह आहे. भोरहून मांढरदेवीचा शांतनिवांत घाटरस्ता, सोबतीला पावसाच्या सरी आणि धुकं असं छान वातावरण तिथं असतं. दरीत दसणारे आखीवरेखीव शेतांचे चौकोन, पावसानं भरलेली भातखाचरं हे सगळं पाहताना डोळे सुखावतात. त्यासह मांढरदेवी मंदिरामागं थोड्या उतारावर एक छान धबधबाही आहे. तेव्हा या ड्राइव्हचाही विचार नक्की करा. मांढरदेवीहून परतताना तुम्ही वाईमार्गेही हायवेनं पुण्याला पोहोचू शकता.

**ⓘ कसं जाल?**

**मुंबई - पुणे - भोर फाटा - भोर - मांढरदेवी**



# सुरेख कातळलेणं

**भोरजवळचा केंजळगड हा एक उपेक्षित दुर्ग. उपेक्षित असला, तरी इथल्या दगडादगडावर उमटलेल्या इतिहासाच्या पाऊलखुणांचा मागोवा अवश्य घेता येतो.**

वैशिष्ट्यपूर्ण कातळावर वसलेला, या कातळातच खोदलेल्या पन्नास-पंचावन्न पायऱ्या, तटबंदीचे अवशेष, मोजकी तटबंदी, कधीकाळी देखण्या असणाऱ्या आणि आज वर्तमानात पूर्णपणे भग्न झालेल्या मंदिराची आठवण इथले कोरीव दगड करून देतात. महादरवाजाचा शिल्लक असणारा दगडी उंबरठा, गडावरील उभी असणारी आणि दारुकोठार हणून दाखविली जाणारी एकमेव वास्तू, दोन तळी, तळघरासार या खोलीचे अवशेष, चुन्याची घाणी हेच अवशेष आज केंजळगड आपल्या अंगाखांद्यावर अभिमानानं वागवतो आहे. गडाच्या दोन्ही बाजूला घळी आणि घारीची घरटी आहेत.

भोरहून कोर्लेच्या दिशेने निघालो, तेव्हा वातावरणातला रखरखीतपणा फारसा सुखावणारा नव्हता. उन्हाच्या झळांमध्ये केंजळगडाच्या खड्या चढणीची वाट खुणावत होती. कोर्ल्याला पोहोचलो तेव्हा दुपारचे साडेबारा वाजले होते. वळणावळणाचा मातीचा रस्ता कापत घेराकेंजळमध्ये मोडणाऱ्या पाखिरे वस्तीमध्ये पोहोचलो. शिवकालापासून महादेव कोळी लोकांची असणारी ही वस्ती त्यांच्या कामांमध्ये मग्न होती. गावातले तरुण क्रिकेट खेळण्यात रमले होते. घराघरावर लागलेल्या डिशची ही कृपा!

भोरच्या रायरेश्वर प्रतिष्ठाननं २००४ मध्ये पाठपुरावा करून या वस्तीवर वीज पोचविली. सध्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून गडाकडे जाणाऱ्या १४ किलोमीटरच्या रस्त्याचं काम सुरू आहे. भोरचा मित्र मकरंद शेळकेनं गावातल्या पाखिरे मामांना हाकारलं. मामांनी गडावर जाणारी वाट आ हाला दाखवली. घसाऱ्याची वाट खोदलेल्या पायऱ्यांपर्यंत घेऊन गेली. त्यापूर्वीची तुटक

## गडावर जाण्यासाठी काही टिप्स

- भोरहून सुमारे २० किलोमीटर अंतरावर
- पायथ्याच्या कोर्ले गावातून पायवाट व थेट कज्जा गाडीरस्ता
- गडावरील पाणी खराब झाल्यानं सोबत पाणी न्यावं
- मधमाशांची पोळी असल्यानं उग्र पदार्थ बाळगणं व गोंगाट टाळावा
- घेराकेंजळ या वस्तीमध्ये मुक्काम करता येईल
- रायरेश्वर-केंजळगड हा जोडट्रेक सोयीचा
- वाईच्या बाजूनेही रायरेश्वराकडे येणारा रस्ता झाला आहे

तटबंदी आणि दरवाजाचे अवशेष आज पूर्णपणे भग्न झाले आहेत. कातळात खोदलेल्या ७७ पायर्या पाहून आश्चर्याचा सुखद धक्का बसतो. प्रत्येक पायरी एक माणूस आरामात झोपू शकेल एवढी.

गडाचं महाद्वार पूर्णपणे भग्न असून केवळ दगडी उंबरठ्याचे अवशेष आज शिल्लक आहेत. वर जाताच दडावरील देवतांसमोर डोकं टेकलं. तटबंदीला फेरी मारून गडावरील अवशेष पाहणं आनंददायी ठरतं. अवघ्या तासाभरात गड पाहून होतो. रायरेश्वराच्या बाजूनं पाहिल्यास गड मान वर केलेल्या कासवासारखा, तर पायथ्यापासून टोपीच्या आकाराचा दिसतो. वर्तमानात उपेक्षित असला, तरी १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला या गडावर आवर्जून तिरंगा फडकवला जातो. इथे मुक्कामी असल्यास सायंकाळचा भन्नाट वारा अलगद इतिहासाच्या कुशीत घेऊन जातो. इतिहासाचा वारसा घेऊन खंबीरपणे उभा असणारा केंजळगड नकळत अंतर्मुख करुन जातो.

## इतिहास

शिवछत्रपतींनी राज्याभिषेकाच्या ४० दिवस अगोदर रातोरात हल्ला करून हा गड ताब्यात घेतल्याचं सांगितलं जातं. गडाच्या पायथ्याला टिटेघर आणि व्याहाळी ही गावे आहेत. गडाला केळंजा आणि मनमोहन अशीही नावं असल्याचं गावकरी सांगतात. गडावरून रायरेश्वर, नवरानवरीचा डोंगर, दक्षिणेला कमळगड, महाबळेश्वर, माकोशीचा बंधारा व भाटघर असा विस्तृत प्रदेश पाहता येतो. गड सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यात असला, तरी वाट ही पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातून आहे. वाईकडून धोम धरणाच्या बाजूनं गडाचे तीन बुरुज लक्ष वेधून घेतात.

# प्राचीन रायरेश्वर

आषाढाच्या शतधारांच्या स्नानानंतर बदललेल्या सृष्टीचे हिरवेगार रूप पाहण्यासाठी आवर्जून जावं असं मंदिर म्हणजे रायरेश्वर. भोर तालुक्यातल्या एका अप्रतिम आणि विस्तिर्ण पठारावर हे इवलंसं मंदिर आहे. ट्रेक आणि शंकराचं दर्शन, असा दुहेरी हेतू साधायचा असेल तर रायरेश्वरला जावं. शिवाय, या ठिकाणाला छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतल्याचा अभिमानी इतिहास आहे.

रायरेश्वराच्या पठारावर जाण्यासाठी अनेक वाटा आहेत. त्यापैकी एक मार्ग कोर्ले गावातून आहे. भोरहून तिथून दोन-अडिज तासात पठारावर पोहचता येतं. तिथून मंदिरात जायला छोटी लोखंडी शिडी आहे. शिडीवरून रायरेश्वराच्या पठारावर येता येतं. या सफरीत अनेक छोट्यामोठ्या धबधब्यांची, ओहोळांची साथ असतेच. रायरेश्वराला पोहचल्यावर मोठ्या मंदिरात जाऊन शंकराचं दर्शन घेण्याच्या विचारात असाल तर तुम्ही डोळ्यांपुढे रंगवलेलं मंदिर खूप शोधूनही दृष्टीस पडणार नाही. इथलं महादेवाचं मंदिर एकदम छोटुसं आहे. मंदिरातली पिंडी स्वयंभू आहे. अतिशय प्राचीन असलेलं हे मंदिर पूर्वाभिमूख आहे. दगडी बांधकामाच्या या देवळातल्या गभृगाहाला, सभामंडपाला चक्क पत्र्याचं छप्पर आहे. भिंतीवर शिलालेख आहे. मंदिर थोडंसं आतल्या बाजूला असल्यानं पटकन लक्षात येत नाही. मंदिराकडे जाताना तळंही आहे. दादाजी नरसप्रभू गुप्ते या शिवाजीराजांच्या सवगंड्यांबरोबर रायरेश्वराच्या आजूबाजूला पूजाअर्चेला सुरुवात केली. शिवासंगम याच्याकडे पूजा करण्याचे काम सोपवले. शिवरायांचे अनेक मावळे या परिसरातील असल्याने शिवरायांचा इथे बऱ्यापैकी वावर असायचा. मंदिराबरोबरच या पठारावर चिमुकलं गाव वसलंय. एक प्राथमिक शाळाही इथे आहे. थोडंसं चालायची, चढायची तयारी असेल या श्रावणात रायरेश्वराला यायला नक्की जाऊन या. पठार १५९६ मीटर उंचीवर असल्याने कोणत्याही ऋतूत इथलं वातावरण मस्त असतं.



**कसं जाणार?**


- रायरेश्वर भोरपासून १० किमी अंतरावर आहे. त्यासाठी परळ एसटी डेपोतून रात्री बस आहे. पुण्याहूनही बस आहेत. मुंबई-भोर अंतर साधारण २१० किमी आहे. पुणे-सातारा रस्त्यावर पुण्यापासून ४० किमीवर शिरवळ फाट्यावर उजवीकडे भोरकडे जाणारा रस्ता आहे. खासगी वाहन कोर्ले गावातच ठेवावे लागते. रायरेश्वरपर्यंत रस्ता करण्याचं काम सुरू झालं. पण ते अर्धवटच राहिलं. भोरहून कोर्ले गावासाठी बस आहेत, शिवाय रिक्षाही जाते. कोर्ले भोरपासून १० किमी अंतरावर आहे.

## कुंड

वरंधा घाटातलं कुंड गाव सह्याद्रीच्या कड्यावर वसलेलं. भोरमार्गे वरंधा घाट निम्मा पार केलात, की धारमंडप इथून उजवीकडं वळायचं. शिळीम गावाकडं न वळता सरळ कुंड गावात दाखल व्हा. कोकणाचं देखणं दृश्य डोळ्यांत साठवत पावसाचं स्वागत करा. जेवणाचा डबा आवश्यक.

# सातारा जिल्हा
## वाई

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते वाई | | | | | 241 | | | | |
| **1** | धोम धरण | लाँग ड्राईव्ह | नदी | धरण | | 9 | NW | | | |
| **2** | धौमेश्वर शिवालय | | | मंदिर | | 9.5 | NW | 1.5 | E | |
| **3** | मेणवली | | | | | 3.5 | NW | 5.5 | SE | |
| **4** | ढोल्या गणपती महागणपती | ऐतिहासीक स्थळ | | मंदिर | | 0.25 | W | 3.5 | SE | |






कृष्णाकाठचा रम्य परिसर, चहूबाजूंना पसरलेल्या सह्याद्रीच्या जांभळ्या हिरव्या डोंगररांगा आणि बरोबर बेचक्यात वसलेलं निसर्गरम्य श्रीक्षेत्र वाई आणि मेणवली धोम धरण.

पुणं सोडलं की कात्रज, खंबाटकी हे दोन घाट पार केले की अगोदर महाबळेश्वरला जायला उजवीकडे फाटा आहे. सातारा-महाबळेश्वर रस्त्यावर वाई वसलं आहे. गावाच्या एकीकडे पसरणीचा घाट तर दुसरीकडे धोम धरण. कृष्णामाईच्या आर्शीवादाने गावाच्या पंचक्रोशीत हिरवीकंच शिवारं वर्षभर मोठ्या दिमाखाने डोलत असतात. विस्मयाची गोष्ट अशी की निसर्गाच्या या समृद्धीबरोबरच गावाला एक वेगळाच भारदस्तपणा आलेला आहे तो इथल्या सांस्कृतिक, बौद्धिक संपन्नतेमुळे. नवनीतकार परशुरामतात्या गोडबोले, संशोधक ग. ह. लेले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यासारखी दिगंत कीर्ती मिळवणारी कर्तृत्ववान मंडळी इथलीच.

पेशव्यांचे सरदार रास्त्यांनी वाईचा बराचसा भाग सुरुवातीला वसवला. अनेक मंदिरं आणि नदीवर घाट बांधले. आजदेखील संस्कृतीचा तो प्रवाह अखंडपणे वाहत आहे. काळ एवढा बदलला तरी त्यात अजिबात खंड पडलेला नाही. देवळातून सकाळ संध्याकाळ मंगल घंटानाद ऐकू येतो. नदीकाठच्या गणपतीच्या विशाल प्रांगणात आणि गावात सतत आयोजित होत असलेल्या व्याख्यानमालांनी, कीर्तनांनी वाईकरांच्या मनावर उत्तम संस्कार केले आहेत. त्यामुळे इथलं धार्मिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक जीवन भरघोस, चौरस आणि निकोप राहिलं आहे. इथली प्रज्ञापाठशाला आणि विश्वकोषाचं काम अख्ख्या देशाला सुपरिचित आहे.

गावाला ऐतिहासिक वारसादेखील आहे. गावात आजही जुने वाडे बघायला मिळतात. गावातलं मुख्य दैवत म्हणजे इथला महागणपती. तो नवसाला हमखास पावतो, असं म्हणतात. गणपतीचं देऊळ नदीवर वसलेलं असून या गणेशाला ढोल्या गणपती म्हटलं जातं. गणपतीची मूर्ती नावाप्रमाणेच अवाढव्य आहे. त्यामुळे गणपतीला हार घालायचा झाल्यास शिडी वापरावी लागते.

या नद्यांवर बांधलेलं धोम धरण. वाईतून बाहेर पडलं की सगळा रस्ता हिरव्यागार शिवारातून जातो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शाळू, ऊस, हळदीचं पिक डोलताना दिसतात. वाटेत पेशव्यांचे कारभारी नाना फडणविसांचं मेणवली लागतं. वाडा बाहेरून जरी बऱ्यापैकी शाबूत वाटत असला तरी आतून सगळी पडझड झाली आहे. भानूंचा हा वाडा नानांनी १७८० च्या सुमारास बांधायला घेतला तसे नानांनी पुष्कळ वाडे बांधले. पुण्यात कोथरूडला पुण्यकर्मही खूप केली.



**ढोल्या गणपती**

पाणपोया बांधल्या, भीमाशंकराचं भव्य देऊळ बांधलं. धारी गावात गोदावरीवर घाट बांधला तसा मेणवलीला पाण कृष्णेवर सुरेख घाट बांधला. आज मेणवलीचा चित्रासारखा रेखीव घाट, देशातल्या सुंदर घाटांपैकी एक गणला जातो. गावातच नानांनी दोन सुंदर देवळंदेखील बांधली. एक शंकराचं आणि दुसरं विष्णूचं. नाना गेल्यावर त्यांची शेवटची पत्नी जिऊबाई १८१८मध्ये या वाड्यात राहायला आली. आपली संपत्ती परत मिळावी म्हणून तिने इंग्रजांकडे खूप खटपटही केली, असं म्हणतात. नानांनी बांधायला घेतलेलं भीमाशंकराचं देऊळ पूर्ण करण्यासाठी तिला आपल्या अंगठीतलं पुष्कराज विकावा लागला, असं म्हणतात

तर आठ दहा वेळाच इथे आठवडाभरासाठी मुक्कामाला आले होते.

मेणवलीहून जवळच एका छोट्याशा टेकडीवर पांडवगड आहे. गडावर चार-पाच घरांची वस्ती असून एक देऊळ आहे. मेणवलीहून मांढरदेवाच्या डोंगरावर जायला गाडीरस्ता आहे. डोंगरपठारावर सुरेख देऊळ असून आंबोडे खिंडीतून भोरला जाता येतं. तसंच इरूलीमार्गे लांब वळसा घेऊन केंजळगडही गाठता येतो.

मेणवली पार केलं की येतो धोम धरणाचा विस्तृत आणि रम्य परिसर. धोम गावातलं नरसिंहाचं प्राचीन देऊळ या परिसरात प्रख्यात आहे. धरणावर उभं राहिलं की आजूबाजूचा आसमंत नजरेत येतो. पाचगणीच्या टुमदार टेकड्या, त्यांचे सुंदर उतार, महाबळेश्वरच्या दूरवर पसरलेल्या मातब्बर डोंगररांगा, कमळगड, पांडवगड, मांढरदेवाचा डोंगर, बावधनचा किल्ला, वैराटगड असा अतीभव्य देखावा नजरेला सुखावतो.

कमळगड हा डोंगरभटक्यांचा आवडता गड. उत्तरेकडे असलेल्या वाळकी आणि दक्षिणेकडे असलेल्या कृष्णा खोऱ्यांना विभागतो. किल्ल्यावर तुरळक वस्ती असून परिसरात घनदाट अरण्य आहे. धोम धरणावरून चालत गेल्यावर वेळंग हे गाव लागतं. इथून वाळकी नदी ओलांडली की चांदवडी-आसनगाव साधारण सहाएक कि.मी.वर आहे. इथून किल्ल्याला जाणारी मुख्य वाट आहे. पाचगणीहून खाली उतरलं की चिखळूहून कृष्णा ओलांडून देखील किल्ल्याला जाता येतं.

वाई-सातारा रस्त्यावर साधारण आठएक कि.मी. वर आसले नावाचं गाव आहे. गावाच्या पश्चिमबाजूस सुप्रसिद्ध वैराटगड आहे. गावातून गडाला जाणारा रस्ता मात्र पूर्वेकडून जातो. गडावरचं बांधकाम आणि तटबंदी भग्नावस्थेत आहे. डोंगरपायथ्याला पाण्याची कुंडं आहेत.

वाई आजदेखील जुन्या ढबीचंच आहे. इथे लोकार्थाने बऱ्याच आधुनिक सुधारणा दिसत असल्या तरी गावातच शेतीवाड्या, देवळं त्यात होणारे उत्सव, नदीवरचे घाट, अंगणात दिसणारी वाळवणं यामुळे गाववजा शहर आपल्याला आजोळच वाटतं. वाई धोमचा परिसर मनावर कायमचा ठसा उमटवणारा आहे. महाबळेश्वर पाचगणीला जाणाऱ्या मराठी पर्यटकांनी वाईला आवर्जून जावं. पण

---

खास वाई-धोम बघायला गेलात तर ते जाणं आजही आपलं अस्सल मराठीपण जाणवून देणारा हा फेरफटका नक्की वेगळा आहे.

धोमला जावं, स्वच्छ निळा वारा अनुभवत, सह्याद्रीच्या डोंगररांगा बघत, हिरव्यागार शिवारांच्या बाजूने, कृष्णाबाईच्या या बावनकशी परिसरात मन भरेल एवढं भटकावं. वाईत येऊन गरम भाकरी खावी, महागणपतीचं दर्शन घ्यावं. आपल्या कचकड्याचं शहरीपण कुठल्या कुठे पळून जातं. ते कळत देखील नाही. अनुभव घेऊन पहा. नक्की भरून पावाल.

–



# कृष्णाकाठचं शिवालय

सातारा जिल्ह्यातील वाईपासून केवळ नऊ किलोमीटर अंतरावर दाट वनराईत वसलेले श्री क्षेत्र धौमेश्वर हे कोरीवकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. शंकराचं हे मुख्य धौमेश्वर मंदिर. शेजारीच श्री नृसिंहाचे गोल दगडी पाराच्या रुपातील मंदिर आहे. धौमेश्वराच्या प्रांगणात कृष्णामाईनेही थोडी वाट वाकडी करून हा निसर्गरम्य देवालयाचा परिसर आणखीनच सुदंर केला आहे.

प्रांगणात दगडाच्या कोरीव कलाकृतीतील पाण्याचा हौद असलेले कमळ, त्या कमळाच्या मध्यभागी पाण्यात तरंगणारे भव्य दगडी कासव आणि महादेवाच्या नंदीचे मंदिर, पर्यटकांना आकर्षित करतं. भिंतीवर व पुढील कोरीव कमानीत खिडक्यांतून कोरलेली नागमोडी नक्षीही खूपच सुरेख आहे. मंदिराचे बांधकाम अगदी पुरातन असले तरी पहिल्या बाजीराव पेशव्यांनी याचा जिर्णोद्धार केला. याच ठिकाणी धौम्य ऋषींचे वास्तव्य होते. स्कंद पुराणात कृष्णा नदीचे महात्म्य सांगणाऱ्या ६५व्या अध्यायाच्या पोथीत या क्षेत्राचे वर्णन आहे.

मंदिरच्या चारही बाजूंनी भक्कम तटबंदी असून पूर्व द्वाराच्या बाजूस खोल अंधारी विहीर आहे. पायऱ्यांवरून काही अंतरावर शुद्ध पाणी पाहायला मिळते. हेच पाणी दक्षिण बाजूस वाहणाऱ्या नदीत गोमुखाने सोडले आहे. या गोमुखास बारा महिने स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी या विहिरीत पांडवगडावरून पुरातन भुयारी जल योजनेतून आणलं असावं.

कृष्णा नदीवर बांधल्या गेलेल्या धोम



अनु.

धरणाच्या मोठ्या भिंतीत हे पुरातन शिवायल गाडले जाणार होते. मात्र गावकऱ्यांनी हे मंदिर वाचवण्यासठी उठाव केला व अखेर ही भिंत थोडी बाजूला घेण्यात आली. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या परिसरात सध्या हिंदी-मराठी चित्रपटांची अनेक चित्रीकरणं होतात. वाईपासून इथे येताना मेगवळीला नानासाहेब फडणवीसांचा भव्यवाडा व तिथल्या चित्रकृती पाहायलाही गर्दी होते. धोम गावात मुंबईकर व ग्रामस्थांनी गावात शिरताना बांधलेले विठ्ठल रुक्मिणी मंदिरही पाहण्यासारखे आहे. धोमच्या शिवालयात होणारा महाशिवरात्री व नृसिंह जयंतीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा होतो, या वेळी होणारी गर्दी सोडता इतर वेळी अगदी निवांत व निसर्गरम्य परिसर असतो, पर्यटक व भाविकांच्या प्रतीक्षेतच!

धोम धरण हे सर्व मातीचे बनविलेले आहे. धोम धरणाच्या समोर एक छान शिवमंदिर अन नृसिंहमंदिर आहे असे कळले. तेथे जायचे ठरविले. अहाहा, छान, फारच छान! आत्तापर्यंत मी ज्या काही गोष्टी बघितल्या आहेत त्यांतील हा एक सुंदर नमुना. शंकराचे मंदिर होतेच. परंतु शंकराच्या समोर नंदी, कासव असते. येथे

मंदिरासमोर कमळाच्या आकाराचा पाणी नसलेला एक पुष्कर्णी हौदच जणूकाही होता. त्यांत छान शिसवीचा पलंग पूर्वी जसा असेल तसे छानसे काळ्याभोर दगडातून कोरलेले भलेमोठे कासव होते. त्यावर छानसे सुबक छोटे नक्षीदार सात खांब व त्यात नंदी असे ते भलेथोरले, सुबक, काळेभोर नक्षीवजा कासव, कमळ, नंदी आम्ही सगळे बघतच राहिलो. एका बाजूला एक मल्लखांब असतो तसा परंतु चार फुटाचा एक लाकडी खांब व त्याच्या डोक्यावर पाच संगमरवरी मुखवटे. देवळाच्या बाहेर एकच महिला बसली होती. ती म्हणाली ते पाच पंचायतन आहेत. खांबासमोर गोल छोटे देऊळ होते. त्याला चार पायऱ्या होत्या. त्या चढून वर जायचे. पूर्व-पश्चिम अशा दोन्ही बाजूला दोन नृसिंहाच्या मूर्ती होत्या, एक उग्र मूर्ती व एक शांत मूर्ती. दर्शन घेऊन या मंदिराची काय कथा असेल, याचा विचार करीत आम्ही बाहेर पडलो.

समोर अतिशय दाट, हिरवेगार, डोंगर उतरणीच्या खाली प्रचंड घनदाट वेली किंवा छोटी छोटी झुडपवजा गर्दी होती. त्या पानांची गर्दी अशी होती की फुगीर बाजू पण आत काहीतरी भुयारीवजा खोबण. दोन मिनिटे उभे राहताच प्रथम भय वाटले. पटकन येथून निसटावे असे वाटावे असे ते दृश्य होते.

तेथून जेवून निघालो ते थेट मेणवली इथल्या नाना फडणविसांच्या वाड्यावर. केवढा भव्य वाडा! त्या वेळच्या अजूनही काही खुणा वाड्यात जिवंत आहेत. त्याचमुळे ती पटई, ती



अनु.

दारे, त्या कड्या पाहून त्या वेळचा 'वाडा' प्रत्यक्ष नजरेत येत होता. वाईच्या भोवताली कृष्णा नदीवर सात 'घाट' आहेत. एका घाटावरील फरशीवर ऋषी कपूर -जयाप्रदाने 'डफलीवाले' म्हणत घुंगराचे आवाज छुम छननन छन घुमविले आहेत. या ऐतिहासिक वाड्याचे, या घाटांचे मोल जपायला हवे आहे. पेण येथे विनोबा भावे यांचा वाडा जसा स्वच्छ ठेवला आहे तसेच याही वाड्याचे करायला हवे, असे नानांचा वाडा पाहताना मनात येऊन गेले.



अनु.


# कृष्णाकाठचा महागणपती



श्री गणेशाय नमः (वाई)

वाई भारताची दक्षिण काशी म्हणून ओळखली जाते. दोन हजार वर्षांचा प्राचिन इतिहास आजही त्याची वैभवशाली साक्ष देत आहे. आजूबाजूला सह्याद्रीच्या पर्वतरांगा, विलोभनीय कृष्णाकाठ, जुनी मंदिर, वाडे यामुळे तिथे कला विद्यार्थी, पर्यटक इतिहासप्रेमी यांची पावलं न वळली तरच नवल. स्वदेस, गंगाजल, मंगल पांडे या सिनेमांच्या यूएसपीमध्ये दिग्दर्शन आणि पटकथे प्रमाणेच वाईसारख्या उत्तम लोकेशनचाही मोठा वाटा आहे.

वाईचं ढोल्या गणपतीचं मंदिर १७६२ साली पेशव्यांचे सरदार गणपतराव भिकाजी रास्ते यांनी बांधवून घेतलं. खर्च आला एक लाख साठ हजार रुपये. देवळाची रचना नीओ यादव पद्धतीची. घोटीव मोठ्या दगडांमध्ये उखळी प्रमाणे खळगा करायचा. वरवंट्यासारख्या आडव्या दगडांनी असे दोन मोठे दगड एकमेकांत अडकवायचे. जिथे थोडी फार पोकळी राहिल ती जागा शिसं वापरून भरून काढायची. या प्रकारे हे देऊळ बांधलं गेलं. बेसॉल्ट दगड कर्नाटकातून आणवला. या दगडाचं वैशिष्ट्य म्हणजे तो खाणीतून काढला की मऊ असतो त्यामुळे आकार देण्यास सोपं जातं, पण जसा जसा सूर्यप्रकाश, पाऊस, वारा यांचा संपर्क येतो तसा तसा हा दगड कठीण घट्ट होत जातो. त्यामुळे दोनशे पंचेचाळीस वर्ष होऊन देखील हे देऊळ तितक्याच दिमाखात आजही उभं आहे.



गाभाऱ्यातील गणपतीची मूर्ती बैठक स्थितीतील असून सहा फूट उंच आणि सात फूट रुंद आहे. ही चार हातांची एकदंत मूर्ती नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे. नवस पूर्ण करण्यासाठी नारळाचं तोरण बांधण्याची प्रथा आहे.

विश्वकोष मंडळाचे सल्लागार आणि मंदिर स्थापत्याचे अभ्यासक डॉ. भय्यासाहेब देशपांडे यांनी या मंदिराच्या स्थापत्याविषयी माहिती दिली. गाभाऱ्यात नक्षीकाम आढळत नाही पण उंच कमानींमुळे भव्यता जाणवते. देवळाचे शिखर ७५ फूट उंच आहे. शंकूप्रमाणे निमुळत्या होत जाणाऱ्या शिखरावर उपडं कमळ, त्यावर उत्फुल्ल कमळ कोरलं आहे. फुललेल्या कमळातील आमलक, म्हणजे आवळ्यासारख्या भागातून अणकुचीदार लोखंडी पहार कळसापर्यंत नेलेली आहे. त्याचा वीजवाहक म्हणून उपयोग होतो आणि देवळाला वीजेचा धोका पोहोचत नाही. लांबून कळस स्त्रियांच्या वेणीच्या पेडाप्रमाणे दिसतो. देवळाचा मागील भाग त्रिकोणी असून कृष्णेच्या पुराचं पाणी अडवण्यासाठी त्याची अशी रचना केलेली आढळते.

या गणपतीचा 'ढोल्या गणपती' असा उल्लेख अप्रस्तुत वाटल्याने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वाईचा महागणपती असं संबोधण्याची रास्त सूचना केली. या देवळाच्या बाजूचं श्री काशीविश्वेश्वराचं मंदिर देखील तितकच महत्त्वाचं. याशिवाय कृष्णाकाठ, विश्वकोशाचं ऑफिस, अफझलखानचा वाडा, दत्तमंदिर, गोशाळा, पांडवगड यांचाही समावेश पर्यटकांच्या यादीत आवश्यक. 'गणेशा मला तुझा छंद' असं म्हणत सुरू केलेली ही वाई प्रदक्षिणा तरच खऱ्या अर्थाने सूफळ संपूर्ण होईल.

## हिरवागार रस्ता

मुंबईतून पुण्याला जाऊन तिथून वाईला जायला निघालं, की वाई फाट्याला वळून आत गेल्यावर गावाकडे जाणारी पाटी दिसते. या वाई गावाकडे नेणाऱ्या पाटीकडे चक्क पाठ फिरवून डावीकडे वळायचं. अर्थात, इथं येईपर्यंतही दुतर्फा मोठ्याच मोठ्या उंच झाडांच्या कमानींनी वाईत आपलं स्वागत केलेलं असतंच. सकाळीच घरातून निघून टप्प्याटप्प्यानं थोडं पुढं आलं, की धोम धरणाच्या शेजारून जाणाऱ्या वाटेवर आपण पोहोचतो.



धरणाचं पाणी आणि त्या शेजारून जाणारा रस्ता, त्यावरून जाणारी आपली बाइक आणि दोस्तांची कंपनी... आपसूकच गाणी सुचायला लागतात. बांधाच्या शेजारी डोलणारी हिरवीगार शेतं त्या निसर्गसौंदर्यात आणखीच भर घालतात. छोट्याशा तलावाच्या जागेत कुणी गावकरी म्हशी धूत असतो, तर दोन घरांच्या मधोमध नैसर्गिक पद्धतीनं तयार झालेल्या पाटाच्या पाण्याचा खळखळाट आपल्याला गाडीवरून उतरायला भाग पाडतो. या सगळ्या पावसाळी वातावरणात दिसणारे किडे-कीटक आणि फुलपाखरंही त्यांच्या रंगवैविध्यानं आपलं लक्ष वेधून घेतात. रोजच्या शहरी जीवनाचा, प्रदूषणाचा आणि वाहतुकीच्या खोळंब्याचा अगदी मनापासून वैताग आला असेल, तर एखाद्या अशा जबरदस्त रस्त्याला जरुर भेट द्या.

**कसं जाल?**

**मुंबई - पुणे - वाई - एकसर - धोम धरणाचा शेवट**



अनु.

# महाबळेश्वर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते महाबळेश्वर | | | | | 222 | | | | |
| **1** | महाबळेश्वर | हिलस्टेशन | तलाव | | | 0 | | | | |
| **2** | प्रतापगड | | किल्ला | | | 21 | W | 21 | W | |






मनातलं हिलस्टेशन

महाबळेश्वरचं नुसतं नाव जरी ऐकलं तरी अनेकांच्या मनातल्या आठवणींची सुगंधी कुपी क्षणार्धात उघडेल सर जॉन माल्कम या ब्रिटिश अधिकाऱ्याने सुमारे पावणेदोनशे वर्षांपूर्वी महाबळेश्वर नामक छोट्या गावाला हिलस्टेशनचा दर्जा मिळवून दिला. मुंबई-पुण्याकडची मंडळी वीकएण्डसाठी किंवा मे महिन्याच्या मोठ्या सुट्टीसाठी महाबळेश्वरला पसंती देतात. तिन्ही ऋतूंमध्ये महाबळेश्वरला जाण्याचा अनुभव वेगळा आहे.

पूर्वी महाबळेश्वरला जाण्याचा रस्ता फक्त पुण्याहून होता. खोपोली, सोडल्यानंतर दिसणारं निसर्गसौंदर्य डोळ्याचं पारणं फेडतं. खंडाळ्याचा छोटा घाट चढताना आसपासचा निसर्ग डोळे दिपवतो. पुणे सोडल्यानंतर लागणारा कात्रज घाट, त्यानंतर येणारा खंबाटकी घाट पार केल्यानंतर सुरू होणारा नागमोडी वळणाचा पसरणीचा घाट चढताना काळजात चर्र होतं. घाट चढून पाचगणी पार करून महाबळेश्वरचा पठारी भाग दिसल्यावर, जादूच्या गोष्टीत ऐकल्याप्रमाणे सात डोंगर पार करून आल्याचा भास होतो. कोकणातून अरुंद आणि वळणावळणांचा रस्ता कापत पोलादपूरमार्गे सह्याद्रीच्या पोटात घुसलो तरी आंबेनळी, रडतोंडीचा घाट पार करून महाबळेश्वरला जाण्याचा अनुभवही रोमहर्षक आहे. आता एक्सप्रेस मार्गामुळे हे सगळे घाट नामशेष झाले असले तरी महाबळेश्वराला पोहोचण्यासाठी लागणाऱ्या घाटातून जाण्याचा अनुभव थ्रीलिंग आहे. कोकणमार्गे महाबळेश्वरला जाताना आंबेनळी, रडतोंडी घाट पार करावे लागतात.

भगवान शंकर अर्थात महाबळेश्वर हा इथला स्वामी आहे. त्याच्या नावाप्रमाणेच इथला निसर्गही बलवान आहे. समृद्ध आहे. इथला सगळा परिसर गर्द झाडांनी आणि कडेकपाऱ्यांनी वेढलेला आहे. महाराष्ट्रातल्या कृष्णा, कोयना, सावित्री, वेण्णा आणि गायत्री या पाच प्रमुख नद्या महाबळेश्वरला उगम पावतात. यापैकी सावित्री नदी ही पश्चिम वाहिनी आणि बाकीच्या नद्या पूर्व वाहिन्या आहेत. सावित्री कोकणात जाऊन तर बाकीच्या पूर्वेला जाऊन उग्र रूप धारण करतात. चेरापुंजीनंतर सर्वाधिक पर्जन्यवृष्टी होणारा भारतातला हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रदेश आहे.

शिवाजी महाराजांनी अफजल खानाला याच परिसरात बोलावून घेऊन निसर्गाच्या मदतीने आणि गनिमी काव्याने मोघल सैन्याच्या बलाढ्य सेनापतीचा पराभव केला.

जावळीच्या या गर्द रानात मराठ्यांच्या मोजक्याच फौजांनी खानाच्या लाखोच्या फौजेचा धुव्वा उडवला.

महाबळेश्वर अतिशय विस्तृत हिलस्टेशन आहे. आर्थर सीट (१२ कि.मी.), केट्स पॉइण्ट (७ कि.मी.), बॉम्बे पॉइण्ट (३ कि.मी.), एलिफण्ट्स हेड (६ कि.मी.) ही महाबळेश्वरमधली काही निसर्गरम्य ठिकाणं आहेत.

इथल्या वेण्णा लेकमध्ये बोटिंगचा आनंद लुटता येतो. घोड्यावरून नजिकची निसर्गरम्य ठिकाणं पाहायला मिळतात.

खवय्यांसाठी महाबळेश्वर म्हणजे पर्वणीच आहे. इथली स्ट्रॉबेरी, रासबेरी, मलबेरीची शेती पाहण्यासारखी असते. नोव्हेंबरनंतर या फळांचा सीझन सुरू होतो. या सीझनमध्ये येऊन शेतातली फळं खाण्याचा अनुभव काही औरच आहे. (ऑस्ट्रेलिया,





अनु.

कॅलिफोर्नियामध्ये या फळांच्या विविध जाती पाहायला मिळतात.) स्ट्रॉबेरी, चॉकलेट फज, फेलेरो चॉकलेट, स्ट्रॉबेरी, रासबेरी, मलबेरीची जेली चॉकलेट्स तसंच त्यापासून बनवलेली सरबतं चवीला अतिशय सुंदर असतात.

महाबळेश्वरपासून अवघ्या २६ कि.मी. अंतरावर असलेला कोयना नदीवरचा 'तापोळा' तलावाचा परिसरही अतिशय सुंदर आहे. इथे जाणारा रस्ता उंचावरून जातो. या रस्तावरून जाताना दूरवर पसरलेल्या करड्या, हिरव्या रंगाच्या डोंगरांच्या लगत जाणारं कोयनेचं निळंशार पाणी असा नयनरम्य देखावा पाहणाऱ्याचं भान हरपून टाकतो. तापोळ्याच्या तलावातून कोयनेच्या पात्रात बामणोलीपर्यंतचा प्रवास मोटरलाँचनी करता येतो. या प्रवासात दुतर्फा पसरलेली गर्द हिरवीगार झाडी मन मोहून टाकतात. सातारा जिल्ह्यातलं महाराष्ट्रातलं हे ठिकाण अतिशय नयनरम्य आहे. त्याच्या वैविध्यतेमुळेच महाबळेश्वराला महाराष्ट्राचं वैभव मानलं आहे.



सह्याद्रीची महाबळेश्वर परिसरातली 'शंभू महादेव' डोंगररांग इतिहासकाळापासूनच स्वतःचा प्रचंड दरारा ठेवून आहे. सह्याद्रीची सगळी बुलंदी आणि काटकता या दुर्गम परिसरात पुरेपूर भरलेली आहे. पोलादपूरपासून महाबळेश्वरपर्यंतचा ९०-९५ कि.मी.चा सगळा परिसर घनदाट जंगलाचा, काळ्याकभिन्न कडे कपाऱ्यांचा, निळ्याकबऱ्या डोंगरांचा, गूढरम्य दऱ्याखोऱ्यांचा आणि सह्याद्रीतला सगळ्यात बेलाग म्हणून अगदी आजही ओळखतात.

या सगळ्या डोंगरी प्रदेशावर इथल्या पारघाटाच्या तोंडावर असलेला भोरप्याचा डोंगर रामोशासारखा डोळ्यात तेल घालून राखण करत आहे. याच भोरप्याच्या मस्तकावर सह्याद्री काय करू शकतो हे अख्ख्या जगाला दाखवून देणाऱ्या अफजल खानाच्या हकीकतीचा साक्षीदार किल्ले प्रतापगड गेली चार शतकं त्याच दिमाखात उभा आहे. सह्याद्री, महाराज यांचं नातं जरी नुसतं मनात आलं तरी पहिली आठवते ती महाराजांनी अफजलखानाला आपल्या वाघनखांनी मारल्याची घटना. एवढी ती प्रत्येक मराठ्याच्या रक्तात अभिमानाने भिनलेली आहे.

या परिसरातलं जावळीचं जंगल होतंच इतकं घनदाट. जंगलात फिरणारा हत्तीदेखील सापडणं महामुश्किल. म्हणूनच महाराजांनी मोरोपंत पिंगळ्यांना या भोरप्याच्या डोंगरावर प्रतापगड बांधायला सांगितला. किल्ला बांधायला दोन वर्षं लागली. पहिले किल्लेदार म्हणून अर्जोजी जाधव यांची नेमणूक केली.

परिसर एवढा बेलाग आणि दुर्गम की अफजलखानासारख्या महाबलाढ्य शत्रूशी झुंजायला महाराजांनी प्रतापगडाचीच निवड केली.

अफजलखानाबरोबर लाखाने सैन्य होतंच. त्यात तो अत्यंत कसलेला सेनापती होता. त्यामानाने मराठ्यांचं सैन्यबळ अगदीच नगण्य होतं. पण महाराजांचा जावळीच्या जंगलावर आणि आपल्या नेकजात शिंबंदीवर पुरेपूर विश्वास होता. या किर्र रानाच्या भरवश्यावर त्यांनी अफजलखानाला आणि त्याच्या बहुसंख्य सैन्याला नेस्तनाबूत केलं.

अफजलखानाने मराठी मुलखावर निर्दय अत्याचार केले होते. सगळी

देवळंरावळं पाडली होती. त्यामुळे जावळीच्या रानात दबा धरून बसलेला प्रत्येक मराठा फक्त इशाऱ्यांच्या तोफांची वाट पाहत होता. गडावरून इशाऱ्याच्या तोफा दणाणल्या आणि नेताजी पालकरांच्या या मावळ्यांनी खानाच्या सैन्याची धूळधाण केली. इतकी की पांगारकर या वीरांनी पराक्रमाची शर्थ केली, इतकी की परिसरातून उमग पावणाऱ्या कोयना-कृष्णा लाल होऊन वाहू लागल्या. प्रतापराव मोऱ्यांनी लोभाच्या आमिषाने वाटा दाखवल्या म्हणून खानाचा मुलगा फाजलखान आणि काही सैनिक वाईपर्यंत



# सह्याद्रीची शिवशक्ती

खानाच्या सैनिकांना जीव वाचवण्यासाठी त्या निबीड अरण्यात कुठे पळावं हेच समजेनासं झालं. झाडाझुडपांत लपलेल्या मराठ्यांनी हजारो शत्रूसैनिकांची खांडोळी केली. त्यांची एवढी प्रचंड दैना उडाली की प्रतापगडाच्या पायथ्यापासून महाबळेश्वरपर्यंत साधारण सोळा-सतरा कि.मी. एवढं अंतर असलेल्या परिसरात कान्होजी, बाजी जेधे, तानाजी मालुसरे, बांदल, शिळमकर, रामजी पोहोचले. अन्यथा मराठ्यांनी खानाचा एकही सैनिक विजापूरला जिवंत पोहचू दिला नसता.

असं म्हणतात की विश्वास नानाजी दिघे (मुसेखोरेकर) या महाराजांच्या हुषार हेराने त्यावेळी अत्यंत मोलाची कामगिरी केली. त्याने वाईत नाना वेष घेत अनेक हिकमती लढवत खानाच्या गोटातल्या जवळ जवळ सगळ्या बित्तबातम्यांचा छडा लावून

महाराजांना पोहोचवल्या. त्या आधारावर महाराजांचे हुषार वकिल पंताजी गोपीनाथांनी खानाला प्रतापगडाच्या माचीवर आणला. गडावर अष्टभुजा जगदंबा मातेचे जुन्या धाटणीचे सुरेख देऊळ आहे. असं म्हणतात की तुळजापूरला असलेल्या आपल्या कुलस्वामिनीचं दर्शन वारंवार घेणं महाराजांना शक्य नसल्यामुळे त्यांनी हे देऊळ बांधलं. गोमाजी नाईक पानसऱ्यांनी हिमालयातल्या नेपाळला जाऊन गंडकी शिळादेवीची मूर्ती घडवायला आणली. आपण मुख्यतः महाबळेश्वरला फिरायला जातो. आणि मग त्या ट्रीपमधला एक पॉइण्ट म्हणून जवळ असलेल्या प्रतापगडावर जातो. हा देदिप्यमान इतिहास जर आपल्याला माहित असेल, आपली नजर, मन त्यातली प्रत्येक गोष्ट शोधत राहते. मग मात्र गडाची तटबंदी, मावळ्यांच्या विजयाच्या असामान्य पराक्रमाच्या रोमहर्षक गोष्टी आपल्याला सांगू लागते. आपल्याला त्या काळात घेऊन जाते. पंताजी गोपीनाथ, विश्वास दिघे, नेताजी पालकर, जीवा महाला नजरेसमोर उभे राहतात. एका हातात रक्ताने निथळणारी तलवार आणि दुसऱ्या हातात खानाचे मस्तक नाचवत क्षणार्धात घोड्यावर झेप घेऊन जिजाऊंना दाखवायला नेणारे संभाजी कावजी कोंढाळकर तर काळभैरवाच्या आवेशात आपल्याला दिसतात. धिप्पाड अफजलखान, दांडपट्ट्यावर असमान्य कसब असलेला सय्यद बंडा, धन्याशी अजिबात प्रतारणा न करणारे



खानाचे वकील कृष्णाजी भास्कर हेही नजरेसमोर येतात. गडाच्या तटबंदीचा प्रत्येक चिरा या गोष्टी सांगताना तेजाने चमकत असतो. हा आवेश इतका असतो की आपल्याला सहज कळतं की तो अजून कित्येक वर्ष मराठ्यांच्या या असमान्य पराक्रमांच्या कहाण्या पुढच्या पिढ्यांना सांगायला अजून तेवढ्याच मजबूती आणि दिमाखात टिकून राहणारा आहे. सह्याद्रीची शिवशक्ती आणि तिचा आशीर्वाद त्यांचं रक्षण करत राहणार आहे.

जावळीचं अरण्य एवढं घनदाट आहे की सह्याद्रीतला हा सगळ्यात बिकट परिसर म्हणून आपला दबदबा आजही राखून आहे. म्हणूनच महाराजांनी मोरोपंत पिंगळ्यांना भोरप्याच्या डोंगरावर प्रतापगड बांधायला सांगितला. खजिना ठेवायला महाराजांना ही जागा एकदम सुरक्षित वाटली. पंतानी किल्ला बांधायला सुरुवात केली. पंतांनी आपली सारी बुद्धी ओतून गड घडवला. खरोखरच किल्ला मोठा तालेवार झाला. गडावर बांधकाम चालू असताना एक स्वयंभू शिवलिंग मिळालं. तिथेच पंतांनी देऊळ बांधलं. महाराजांनी त्याचं नाव ठेवलं 'केदारेश्वर'.

# सह्याद्रीची शिवशक्ती

एक्स्प्रेस वे झाल्यामुळे कोकणातल्या पोलादपूरजवळच्या अंबेनळी घाटातून हल्ली फारच थोडे लोक महाबळेश्वरला जातात. एक्स्प्रेसवेने गेल्यास नक्कीच दोन-तीन तास लवकर महाबळेश्वर गाठता येतं. मुंबई-गोवा हायवेवरच्या पोलादपूरनंतरचा महाबळेश्वरपर्यंतचा पन्नास-पंचावन्न कि.मी.चा सगळा परिसर घनदाट जंगलाचा, काळ्याभिन्न, आकाशाला भिडणाऱ्या कडे-कपाऱ्यांचा, डोंगररांगाचा, गूढरम्य दऱ्याखोऱ्यांचा... सह्याद्रीतला सगळ्यात बेलाग.

सह्याद्रीची ही शंभू महादेव डोंगररांग इतिहास काळापासूनच आपलं स्वतंत्र अस्तित्व राखून आहे. घनदाट अरण्याने वेढलेल्या या पारघाटाच्या तोंडावर एक डोंगर रामोशासारखा डोळ्यात तेल घालून राखण करत बसलेला आहे. हा आहे 'भोरप्याचा डोंगर'. जावळीचं अरण्य एवढं घनदाट आहे की सह्याद्रीतला हा सगळ्यात बिकट परिसर म्हणून आपला दबदबा आजही राखून आहे. असं म्हणतात की एकवेळ हिडिंबेच्या केसातली ऊ मिळेल पण या जंगलात लपलेला हत्ती सापडणं महामुश्कील! म्हणूनच महाराजांनी मोरोपंत पिंगळ्यांना या भोरप्याच्या डोंगरावर प्रतापगड बांधायला सांगितला. खजिना ठेवायला महाराजांना ही जागा एकदम सुरक्षित वाटली. पंतानी किल्ला बांधायला सुरुवात केली. पंतांनी आपली सारी बुद्धी ओतून गड घडवला. खरोखरच किल्ला मोठा तालेवार झाला. गडावर बांधकाम चालू असताना एक स्वयंभू शिवलिंग मिळालं. तिथेच पंतांनी देऊळ बांधलं. महाराजांनी त्याचं नाव ठेवलं 'केदारेश्वर'.

गडाच्या उगवतीला महाबळेश्वरचा प्रचंड पहाड, दक्षिण आणि उत्तरेला सह्याद्रीच्या कर्दनकाळ डोंगररांगा, पश्चिमेस जबरदस्त जंगलांनी वेढलेल्या दऱ्याखोऱ्या... सबंध सह्याद्रीत एवढ्या अडचणीचा आणि बिकट किल्ला दुसरा नाही. घोणसपुराजवळ मकरंदगड, तानाजी मालुसऱ्यांच्या उमरठ गावाजवळचा चंद्रगड, गोठवाडीजवळचा मंगलगड असे जबरदस्त गडकोट जावळीच्या मुलुखाचं रक्षण करायला होते. त्यात जावळीचा सगळाच मुलूख गहन आणि बिकट जंगलदऱ्यांचा होता.

परिसर एवढा बेलाग की अफजलखानासारख्या महाबलाढ्य शत्रूशी दोन हात करायला महाराजांनी प्रतापगडाचीच निवड केली. अफजलखान अत्यंत कडवा आणि बुद्धिमान सेनापती होता. त्यात त्याच्याबरोबर



अनु.

बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ, अजस्त्र तोफा असा जामानिमा होता. जावळीतल्या जंगलाच्या भरवशावर महाराजांनी अफजलखानाला नेस्तनाबूत केलं. तो दिवस होता मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवार १० नोव्हेंबर १६५९. दुपारी दोनच्या सुमारास खानाला महाराजांनी गर्दीस मिळवला.

मान्य झालेल्या ठरावाप्रमाणे संभाजी कावजी कोंढाळकर, जिवा महाला, सिद्धी इब्राहिम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूरजी काटके, विसाजी मुरुंबक आणि संभाजी करवर असे दहा अत्यंत शूर आणि निष्ठावंत मावळे महाराजांनी बरोबर घेतले आणि अर्थातच पंताजी गोपीनाथ बोकील. खानाकडचे सय्यद बंडा, पहिलवानखान, रहिमखान, शंकरजी मोहिते असे सगळे दहाच्या दहाजण ठार झाले. खानचे वकील कृ ष्णाजी भास्कर कुलकर्णी हेही मारले गेले.

गडावरून इशाऱ्याच्या तोफा उडाल्या आणि नेताजी पालकरांच्या मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. इतकी की खानाच्या सैनिकांना जीव वाचवण्यासाठी त्या निबीड अरण्यात कुठे पळावं हेदेखील अजिबात समजत नव्हतं. झाडाझुडपात लपलेल्या मराठ्यांनी खानाचा एकही सैनिक विजापूरला जिवंत पोहोचू दिला नसता.

असं म्हणतात की विश्वास नानाजी दिघे (मुसेखोरेकर) या महाराजांच्या हुषार हेराने त्यावेळी अत्यंत मोलाची कामगिरी केली. त्याने वाईत भिरभिर हिंडत नाना वेष घेत, अनेक हिकमती लढवत खानाच्या गोटातल्या जवळ जवळ सगळ्या बित्तंबातम्यांचा छडा लावून महाराजांना दिल्या. त्या आधारावर महाराजांच्या हुषार वकिल पंताजी गोपीनाथांनी खानाला प्रतापगडाच्या माचीवर आणला.

आजही गडावरुन जावळीचं जबरदस्त अरण्य बघितलं तर त्या लढाईची कल्पना येते. गडाची आजही बऱ्यापैकी शाबूत असलेली, एका वेगळ्याच तेजाने चमकणारी तटबंदी मावळ्यांच्या असामान्य पराक्रमाच्या रोमहर्षक गोष्टी सांगू लागते. आपण आपसूकच त्या काळात जातो. पंताजी गोपीनाथ, विश्वास दिघे, नेताजी पालकर, जीवा महाला नजरेसमोर उभे राहतात. खानाचं मस्तक एका हातात नाचवत क्षणार्धात घोड्यावर झेप घेऊन ते जिजाबाईंना दाखवायला नेणारे संभाजी कावजी कोंढाळकर तर त्याच कालभैरवाच्या आवेशात दिसतात.

**या वास्तूभोवती असे जबरदस्त ऐतिहासिक संदर्भ आणि आपल्या उज्ज्वल परंपरेचे ऋणानुबंध आहेत. प्रतापगड आपल्या देदिप्यमान इतिहासातली एक प्रमुख वास्तू आहे. आज इतकी वर्षं गेली तरी महाराजांनी प्रतापगडावर अफजलखानाला मारल्याची गोष्ट आजच्या तरुणांनाही तेवढीच भुरळ घालते.**



जीपने गोवा रस्त्याने महाड सोडलं आणि जवळच असलेल्या पोलादपूरला एसटी स्टॅण्डच्या बगलेतून डावीकडचं वळण घेतलं. हा रस्ता आहे महाबळेश्वर जाणारा. थोड्याच वेळात सपाटी संपून घाटरस्ता सुरू झाला. दिवस पावसाळ्याचे असल्याने वातावरणात गुलाबी गारवा... खरं म्हणजे हा भाग सह्याद्रीतला सगळ्यात बेलाग... सगळीकडे अस्ताव्यस्त पसरलेल्या डोंगररांगा... त्यातले काळेकभिन्न आकाशाला भिडणारे कडे... आणि खोल दऱ्या-खोरी. या आंबेनळी घाटात

पावसाळ्यात प्रचंड प्रमाणात कोसळणाऱ्या पावसामुळे भरपूर निसरडे असतात. मंडळींना याची चांगलीच कल्पना असल्याने आणि प्रवासाच्या कार्यक्रमाची काही ठोस आखणीची अपेक्षा नसल्यामुळे ते हळू प्रवास करत या डोंगररांगेतल्या निसर्गाची मजा लुटत चालले होते. सगळीकडे डोंगरातून वाहणारे ढग आणि धुकं! धुकं तर किती दाट... जास्तीत जास्त व्हिजिबिलिटी पंधरा-सोळा फूट. सोबतीला दरीत पसरलेल्या धुक्यातून पडणाऱ्या पावसाचा लयदार आवाज. या धुक्याची मोहिनी एवढी की गाडी एखाद्या वळणावर थांबवून मंडळी त्याचा स्पर्श... तरलता... वारंवार अनुभवत होती... सगळं वातावरणं कसं एकदम स्वच्छ... ताजंतवानं... टवटवीत! निसर्गाचा हा विलक्षण अनुभव घेत... रायगड जिल्हा ओलांडून... घाटमाथ्यावरच्या वाडा या सातारा जिल्ह्यातल्या गावात चहाला थांबली... आणि एकाच्या डोक्यातून भूट निघाला की... नथिंग हुइंग... आपण प्रतापगडावर जाऊ या... तीन चार किमी तर जायचंय... झालं सगळ्यांचा नंदीबैल झाला आणि जीपने आपलं तोंड वरच्या डोंगराकडे वळवलं.

सह्याद्रीची ही 'शंभू महादेव रेंज' पूर्वीपासून आपलं स्वतंत्र अस्तित्व ठेवून आहे. हा सगळा प्रदेश घनदाट अरण्याचा आणि डोंगररांगांचा. जावळीच्या या प्रदेशात पारघाटाच्या तोंडावर एक डोंगर रामोशासारखा राखण करत बसलेला आहे. हा आहे भोरप्याचा डोंगर. संपूर्ण सह्याद्रीत एवढी बिकट आणि अडचणीची जागा नाही. असं म्हणतात की एकवेळ हिडिंबेच्या डोक्यातील ऊ मिळेल पण या जंगलात लपलेला हत्ती सापडणं मुश्किल. म्हणूनच मोरोपंत पिंगळ्यांनी महाराजांच्या सांगण्यावरून यावर प्रतापगड बांधला. म्हणतात की किल्ला बांधायला दोन वर्षं लागली. किल्लेदार म्हणून नेमलं अर्जोजी यादवांना. नंतर अफजलखानासारख्या बलाढ्य शत्रूला महाराजांनी याच जावळीच्या जंगलाचा उपयोग करून नेस्तनाबूत केलं. खरं म्हणजे

प्रतापगडावरची ही प्रसिद्ध लढाई जगातल्या पाच अव्वल लढायांमध्ये गणली जाते, याची आपल्यापैकी खूप जणांना कल्पना नाही. महाराजांनी आपल्या अचाट बुद्धिमत्तेच्या जोरावर ही महाकठीण कामगिरी पार पाडली. त्यांनी या बिकट प्रसंगी आपली सगळी यंत्रणा उत्तम प्रकारे वापरली. असं म्हणतात, की विश्वास नानाजी दिघे (मुसेखोरेकर) या महाराजांच्या अतिशय हुशार हेराने त्या वेळी मोलाचं काम केलं. त्याने वाईट भिरभिर हिंडत, अनेक हिकमती लढवत खानाच्या गोटातल्या बऱ्याच बातम्यांचा पत्ता लावून त्या महाराजांना दिल्या. त्या आधारावर नंतर महाराजांचे वकील पंताजी गोपीनाथांनी आपल्या अनुभवी व्यवहारपणाच्या जोरावर खानाला जावळीत खेचून आणायची बेफाट कामगिरी केली.

गडावर अष्टभुजा जगदंबा भवानीमातेचं एक जुन्या धाटणीचं सुरेख देऊळ आहे. देवीची सजवलेली मूर्ती आपल्याला नतमस्तक करते. असं म्हणतात की महाराजांना आपल्या तुळजापूरला असलेल्या कुलस्वामिनीचं दर्शन वारंवार घेणं शक्य नव्हतं. या कारणासाठी त्यांनी गडावर देवीचं देऊळ बांधलं. मूर्तीसाठी गंडकी शिळा आणायला त्यांनी गोमाजी नाईक पानसऱ्यांना त्या वेळी हिमालयातल्या नेपाळला पाठवलं होतं, असं म्हणतात.

गडावरून सभोवताली पसरलेल्या डोंगररागांचा आणि जावळीच्या घनदाट अरण्यांनी वेढलेल्या दऱ्याखोऱ्यांचा देखावा मनाला वेगळ्याच उंचीवर नेतो. गडाच्या परिघात रसाळ, सुमार आणि महिपत ही गडांची त्रयी तर मकरंदगड आणि चंद्रगड आहेत. गडाच्या एका सोंडेवर बऱ्यापैकी सपाटी आहे. याला 'जनीचा टेंबा' म्हणतात. इथेच त्या वेळी अफजलखानाबरोबरचा प्रसंग घडलेला होता. आज इथे त्याची कबर अतिशय उत्तम अवस्थेत जपलेली आहे.


मंडळींचा गड बघून झाला. नि दोघांच्या डोक्यातून परत एक कल्पना निघाली की आपण इथेच गडावर राहिलो तर? पण या वेळी काही सगळ्यांनी माना डोलावल्या नाहीत. कारण अजूनही लोकांच्या मनावरचं शहरी संस्कृतीचं गारूड कमी झालेलं नाही. पण काहीही म्हणा... या गडावरचं महाराजांचं अस्तित्व, त्यांचा पराक्रम आणि या सर्वांचा साक्षीदार हा प्रतापगड... मन व्यापून टाकणारा!

# पारघाटाचा रामोशी...



# सातारा


| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते सातारा | | | | | 253 | | | | |
| **1** | वासोटा | | किल्ला | मंदिर | ट्रेक | 40 | NW | | | |
| **2** | कास पठार | फुलांचे गालिचे | | | | 24 | NW | 16 | SE | |
| **3** | यवतेश्वर | | | मंदिर | | 10 | NW | 14 | SE | |
| **4** | ठोसेघर | धबधबा | | | | 27 | SW | 27.5 | SW | |
| **5** | पाटेश्वर | लेणी | तलाव | मंदिर | आश्रम | 10 | SE | 36.5 | NE | |
| **6** | लिंब - शेरी | खेडे | निसर्ग | | | 16 | N | 25 | NW | |






अनु.

# घनदाट झाडीतला वासोटा



कुडकुडायला लावणारी गुलाबी थंडी अनुभवायची आहे आणि तीही चांदण्या रात्री, घनदाट जंगलात लपलेल्या एखाद्या गडावर? सातारा जिल्ह्यात कोयनेच्या शिवसागर जलाशयाच्या बाजूला सह्याद्रीच्या महाबळेश्वर कोयना डोंगररांगेत असलेल्या वासोट्यावर जाणं, हा भन्नाट अनुभव आहे.

वासोट्याला जाण्यासाठी साताऱ्याला जाऊन बसनं साधारण ३५ किमी अंतरावर असलेल्या बामणोली गावात पोहोचायचं. तिथून वासोट्याच्या पायथ्याचं गाव मेट-इंदवली इथे जाणाऱ्या लाँच असतात. मेट-इंदवली गावातून साधारण अडीच-तीन

तासात गडावर पोहोचता येतं. इथे जाण्यासाठी अजूनही इतर मार्ग आहेत. सातारा-बामणोली मग लाँचने कुसापूर गावात उतरूनही वासोटा गाठता येतो. महाबळेश्वरहून तापोळे गावी येऊन लाँचने कुसापूर गावात जाता येतं. आणखी एक मार्ग म्हणजे

चिपळूमधून बसने चोरवणं या गावी जाऊन पाच-सहा तासात गडावर पोहोचता येतं. पण हा मार्ग तसा अवघड आणि दमछाक करणारा आहे. मेटइंदवलीहून वासोट्यावर पोहोचल्यावर माथ्यावर जायच्या आधी दोन वाटा लागतात. उजवीकडची वाट नागेश्वर गुंफांकडे जाते तर डावीकडची वासोट्याच्या माथ्यावर घेऊन जाते.



गडावर प्रवेश करताना दरवाजासमोरच छप्पर नसलेलं मारुतीचं मंदिर आहे. मंदिराच्या डावीकडे जाणारी वाट पाण्याच्या जोडटाक्याकडे जाते. हे पाणी पिण्यायोग्य आहे. समोरच हरिश्चंदगडाच्या कोकण कड्याची आठवण करून देणारा बाबुकडा दिसतो. मारुती मंदिराच्या उजवीकडे जाणारी वाट माचीकडे जाते. ती ठाणे म्हणून ओळखली जाते. वाटेत देवीचं मंदिर लागतं. माचीवरून समोर घनदाट जंगल, कासचं विस्तीर्ण पठार, कोयनेचा विस्तीर्ण जलाशय, महिपत गड, महिमंडनगड, सुमारगड, पालगड यांचं नयनरम्य दृश्य दिसतं.



अनु.

पायपीटीनंतर नागेश्वराला पोहोचता येतं.

नागेश्वर सुळक्याच्या पोटात एक गुहेत महादेव मंदिर आहे. दर वर्षी शिवरात्रीला हजारो भाविक इथे येतात. बाराही महिने पाण्याच्या थेंबांचा अभिषेक शिवलिंगावर होत असतो. गुहा चांगली ऐसपैस आहे. २५-३० जण यात सहज राहू शकतात. वासोट्यावरील देवीच्या मंदिरातही चार-पाच जण राहू शकतात.

इथे जाताना खाण्यापिण्याची सोय मात्र न विसरता करायला हवी. अधेमधे कुठेही काही मिळण्याची सुतराम शक्यता नाही. पिण्याच्या पाण्याची सोयही वासोटा गडावर आणि नागेश्वर गुंफेजवळच आहे. त्यामुळे चढताना पाण्याचा साठाही बरोबर असायलाच हवा. एक गोष्ट मात्र अजिबात विसरायची नाही. इथे जाताना सहा-सात जणांचा ग्रूप घेऊनच निघायचं. घनदाट जंगल असल्यामुळे एकट्यादुकट्याने जायचं साहस न केलेलंच बरं!




अनु.

# एक थरारक ट्रेक









प्राचीन काळी एवढ्या गर्द रानात हा किल्ला बांधणाऱ्या कोल्हापूरच्या पन्हाळगडावरच्या शिलाहार राजवटीच्या भोजराजाची (सन ११७८-११९३) किती समर्थ दूरदृष्टी असेल, याची कल्पना येते. त्यावेळच्या जावळी मुलुखातला हा किल्ला नंतर शिर्के आणि मोरे या मातब्बर मराठी घराण्यांकडे होता. नंतर तो जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांकडून शिवाजी महाराजांनी आपल्या ताब्यात घेतला. महाराजांनी या किल्ल्याचं नाव ठेवलं-'व्याघ्रगड.' पन्हाळ्याच्या वेढ्याच्या वेळी राजापूरच्या इंग्रज वखारीतल्या हेन्री रिव्हिंग्टनने सिद्दी जोहरला आपल्या तोफखाना आणि गोलंदाजासह मदत केली होती. त्यामुळे पन्हाळ्यावरून सुटल्यावर म्हणजेच १९६१च्या मार्च महिन्यात महाराजांनी राजापूरवर स्वारी करून इंग्रजांची वखार लुटली आणि हेन्री रिव्हिंग्टन, रॅण्डॉफ टेलर, फेरॉण्ड, गिफर्ड, रिचर्ड नेपिअर, सॅम्युअल अशा बऱ्याच इंग्रज अधिकाऱ्यांना कैद केलं. यापैकी निम्मे कैदी महाडजवळच्या सोनगडावर तर निम्म्यांना वासोट्यावर ठेवलं. याला मुख्य जबाबदार असलेल्या रिव्हिंग्टनला गंभीर आजारी पडल्यामुळे सहा-सात महिन्यांनी महाराजांनी सोडलं. बाकीचे मात्र जवळ जवळ दोन वर्ष वासोट्यावरच्या कैदखान्यात खितपत पडले होते.

वासोटा हा बामणोली-आष्टा या सातारा परिसरातल्या सह्याद्रीच्या डोंगररांगेतला एक अतिदुर्गम किल्ला. मुरलेले ट्रेकर्सही इथे जाताना बराच विचार करतात. त्याला कारण कोयना नदीच्या भोवतीचं घनदाट जंगल, सह्याद्रीचे प्रचंड कडे, गहनगूढ दऱ्या, त्यातली हिंस्त्र श्वापदं... त्यातही मुक्त संचार करणारी अस्वलं आणि मैलोन्मैल पसरलेली निर्जनता. निसर्गाच्या या अतिबळकट कोंदणामुळे पूर्वीपासूनच हा किल्ल्याची स्वत:ची वेगळी ओळख आहे. त्याचा दरारा आजही कायम आहे. साहजिकच निधड्या छातीच्या मुंबई-ठाणे-पुण्याच्या ट्रेकर्सचं खास आकर्षण असलेला हा ट्रेक आहे.

कोकणातल्या खेड, चिपळूण-कराड रस्त्यावरच्या कुंभार्ली घाटमाथ्यावरच्या कोयनानगरपासून ते पार साताऱ्याच्या कास-बामणोलीपर्यंतच्या अतिविस्तृत पट्ट्यात पसरलेलं कोयना आणि तिच्या दोन्हीबाजूचं घनदाट अरण्य, कसलाच थांगपत्ता न लागणारं शेकडो मैलांचं जंगल आणि त्यातली गूढरम्यता... आजही कोयनेच्या या पट्ट्यात हे सगळं अनुभवता येतं. त्यामुळे

नंतरच्या पेशव्यांच्या काळात मराठ्यांमध्ये



अनु.

फूट पडल्यावर हा किल्ला साताऱ्याजवळच्या औंध संस्थानाच्या पंतप्रतिनिधींच्या ताब्यात होता. त्यावेळी ताई तेलीण नावाची स्त्री या संस्थानाची स्वामिनी होती. पेशव्याचं सेनापती बापू गोखल्यांनी वासोटा घेण्यासाठी या किल्ल्यावर चढाई केली. या जबरदस्त परिसरापुढे गोखल्यांसारख्या कसलेल्या सेनापतीलाही सहा महिने निकराने लढावं लागलं. ताई तेलीणाने या जबरदस्त जंगलाच्या साहाय्याने गोखल्यांच्या फौजेला दीर्घकाळ असामान्यपणे झुंझवत ठेवलं. त्यावेळच्या एका कवीने रचलेल्या *'ताई तेलीण मारील सोटा... बापू गोखल्या सांभाळ कासोटा'*


या ओळी आजही लोकांच्या चांगल्याच लक्षात आहेत.

वासोट्याला जायचा सगळ्यात सोपा मार्ग आहे साताऱ्याहून. साताऱ्याहून २५ कि.मी. आहे कास तलाव. किल्ल्याला जायला नदी पार करावी लागते. कास परिसरातल्या हुमणे, वागळे इथून जरी होडी मिळत असली तरी बामणोलीहून नियमित मोटरलाँचची सोय आहे. परत याच मार्गाने यायचं असल्यास होडीच्या वेळ आणि तशी विनंती त्यांना करून ठेवायला हवी. नदीच्या पलिकडच्या खिरकुंडीमार्गे गेल्यावर पायथ्याचे मेट इंदवली येतं. होडीत बसल्यावरच समोर दिसणारं गर्द रान आणि कोयनेचं प्रचंड पात्र बघूनच आपण वेगळ्या प्रदेशात शिरत असल्याची जाणीव व्हायला लागते. त्यात कास सोडलं की मनुष्यवस्ती अजिबात नाही. किल्ल्याला जाणारी वाट सोपी असली तरी घनदाट जंगलातून जाणारी आहे. वर जायला अडीच-तीन तास लागतात. या सगळ्या परिसरात हिंस्त्र श्वापदांचा वावर आहे. त्यातही अस्वलांचं प्रमाण मोठं आहे. मोठमोठ्या शिळांच्या बेचक्यातून त्यांची वस्ती आहे. त्यामुळे स्थानिक लोक मोठ्या जाडसर काठीला मोठं कापड गुंडाळून त्याला काळं तेल आणि रॉकेल लावून त्याची मशाल करून ती सोबत



ठेवतात. त्यामुळे इथे फिरताना अतिसावधच असायला हवं. गडावर पाण्याची टाकी आणि देऊळ आहे. किल्ल्यावरून पूर्वेला कोयनेवरचा शिवसागर जलाशय, दूरवर पसरलेलं हिरवंगार जंगल आणि त्यातून वाहणारी कोयना असा वेगळाच नजारा दिसतो.

गडावरून कोकणाच्या म्हणजे पलिकडच्या बाजूने दोन-अडीच तासांचा ट्रेक केल्यावर एका प्रचंड कड्यातल्या गुहेत नागेश्वराचं जागृत आणि सुंदर स्थान आहे. इथल्या शंकराच्या पिंडीवर गुहेच्या वरच्या कातळातून पाण्याचा अभिषेक नैसर्गिकपणे अखंड चालू असतो. इथून डोंगराच्या पलिकडच्या बाजूने उतरलं की कोकणातल्या खेड तालुक्यातलं चोरवणे हे पायथ्याचं चार-पाच वाड्यांचं गाव आहे. इथून मुंबई गाठायची असल्यास उतेकरवाडीत मुक्काम करावा लागतो. या गावातून मुंबईकरता सकाळी थेट बस आहे. नाहीतर गोवा रस्त्यावरच्या चिपळूण किंवा खेडला येऊन पुढचा प्रवास करावा लागतो.



मुंबई-ठाणेकरांना हा ट्रेक खरं म्हणजे खूप लांबचा असल्याने तसा गैरसोयीचा आहे. परंतु हाडाच्या ट्रेकर्सना याचं खूप आकर्षण आहे आणि एकदा वासोट्याला जायचंच, असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. मात्र वासोट्याच्या जंगलातला रात्रीचा शेकोटीभोवतीचा मुक्काम, रात्री ऐकलेले विविध प्राण्यांचे आवाज, भीती, थरार, नागेश्वराहून खाली उतरायला लागलं की माणसांच्या जगाच्या दिसणाऱ्या खुणा... अशी भय आणि थरारमिश्रित मजा संपल्याची हुरहुर परतीच्या प्रवासात बोचत राहते. घरी आलं तरी मन मात्र बरेच दिवस वासोट्याच्या जंगलातच फिरत असतं... त्या रात्री वाटलेली भीती आठवून स्वत:शीच मिश्किलपणे हसत राहतं...

-प




पर्यटकांची फार गर्दी अजून इथे होत नाही. त्यामुळे निवांतपणा असतो. फोटोग्राफर्ससाठी तर हा स्वर्गच. किती प्रकारची फुलं इथे आहेत त्याची गणतीच नाही. त्यांचा आकार बारीक मोहरीपासून मोठ्या लिंबापर्यंत असतो. अनेक दुर्मिळ जातीतली फुलं इथे भरभरून आढळतात. या फुलांना आपल्या अंगावर अभिमानानं वागवणाऱ्या झाडांची उंची तर आपल्या पायाच्या घोट्यापर्यंतही येत नाही. अमरी, दीपकाडी (पांढरी), सीतेची आसवं (जांभळी), एरियोकॉलन (पांढरी), तेरडा (गुलाबी), सोनकी (पिवळी), आभाळी (निळी), माळ-कारवी (निळी), इफिजिनिया (गुलाबी जांभळी), पंद (पांढरी), ऑर्किड शिवाय किटकांचा चट्टामट्टा करणारी ड्रॉसेरा इंडिकासारखी किटकभक्षी अशी अनेक तऱ्हेची फुलं इथे फुलतात. आषाढ, श्रावण, भाद्रपद या तीन ओल्या महिन्यांत कासचा हा रंगसोहळा रंगलेला असतो.

या रंगसोहळ्याच्या काळात कासच्या या पुष्पपठारावर जे वातावरण असतं, त्याचं वर्णन शब्दात होऊच शकत नाही. शब्दांचं तोकडेपण अशावेळी जाणवतं. त्यामुळे कासचा हा रंगसोहळा स्वत: जाऊन अनुभवण्याची चीज आहे. साताऱ्याहून बामणोलीला जाताना कासचं हे पठार लागतं. पठार उतरून थोडं पुढे गेल्यावर कासचा सुंदर तलाव आहे. साताऱ्यावरून बामणोलीला जाणाऱ्या एसटी बसेस नियमित अंतराने आहेत. खासगी गाडीने गेल्यास सज्जनगडाच्या रस्त्यावर कमानीच्या अलीकडे उजवीकडे जाणारा रस्ता कासकडे घेऊन जातो. सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत अलगद लपलेल्या छोट्याछोट्या वाड्यांना मागे टाकत आपण कासच्या पठारावर येतो. पावसाळ्यात इथे अक्षरश: लाखोंच्या संख्येनं फुलं उमलतात. आकाराने छोटी, पण इतकी विविधरंगी की मन वेडावतं. शहरी धामधुमीत वेड लागण्यासारखी परिस्थिती अनेकदा येते. पण मन वेडावणंही किती सुंदर आणि हवंहवंसं असू शकतं, याचा अनुभव घेण्यासाठी एकदा तरी कासला जा. पुन्हा पुन्हा जाल, हे निश्चित!






## कासच्या जोडीने तांबी..

साहसी, उत्साही तरुणाईने ठोसेघर-सज्जनगड या कासच्या 'जोडट्रीप'ऐवजी कास गावातून 'तांबी' गावाकडे जाण्याचा रस्ता पकडून भांबवली-वनराई धबधब्याचा छोटासा ट्रेक करण्यास हरकत नाही किंवा ठोसेघरच्या वाटेवरील 'मोरघळ'मध्ये चक्कर मारता येईल. थोडेसे पूर्वनियोजन केल्यास उरमोडी जलाशयामध्ये येऊन मिळणाऱ्या सांडवली, केळवली धबधब्यांचा ट्रेक करायला हवा. थोडे जास्त दिवस थांबणाऱ्यांनी सडावाघापूर, भारसाखळे आणि धारेश्वर या ठिकाणी जाऊन 'वेगळे' काहीतरी बघितल्याचा आनंद घ्यावा.



अनु.

भल्या पहाटे कास पठारावर जायचे, डांबरी सडक सोडून उजव्या हाताला महाबळेश्वरकडे जाणाऱ्या लाल लाल मातीच्या 'राज'रस्त्याची वाट धरायची, आणि सूर्य चांगला हातभर वर येईपर्यंत भटकंती करायची, हा माझा मोठा आवडीचा छंद आहे. बरोबरीचे मित्र, नातीगोतीची दोन-चार मंडळी कुठेतरी हे फूल बघ, तो फोटो काढ, या नादामध्ये केव्हाच मागे पडतात, आणि मी शांतपणे पुढे एकटाच सरकलेला असतो. हिरव्यागार गवताच्या शेंड्याला कुणीतरी चिकटवल्यासारखी लाल, निळी, पांढरी, पिवळी, जांभळी फुले वाऱ्याच्या झोताबरोबर हलत-डुलत असतात. धुक्याची दाट चादर संपूर्ण सड्याने पांघरलेली असते. लाल सड्याच्या त्या रस्त्यावर आता माझ्याशिवाय कोणीही मला दिसत नसते. पठारावरील फुलांशी दंगामस्ती करून दमलेल्या ग्रहतारका दमून-भागून केव्हाच लपायला निघून गेल्या असतात. जांभा दगडाच्या त्या सड्यावर अधूनमधून खळाळतं पाणी वाहात जात असते. चंडोलाची गाणी अगदी जवळून ऐकायला मिळतात. परंतु दाट



धुक्यामुळे ते दिसत नाहीत. माझ्या त्या 'मेडिटेशन वॉक'मध्ये अचानक अडथळा येतो, तो पहाटवाऱ्याच्या एका झोतासरशी माझ्या देखत धुक्याची शाल पूर्वेकडील कोपऱ्याकडे दूर होते, आणि त्या फटीतून कोवळे कोवळे किरण त्या रंगबिरंगी गालिच्यावर पडतात, आणि त्या विलक्षण क्षणी 'बालकवीं'च्या 'ती फुलराणी'चे स्मरण न राहून होते. तो मंगळ प्रसंग मी अक्षरशः जगत असतो!

'पर्यटन' हा विषय बंदी घालावी असा नक्कीच नाही. उलट त्यासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यातून परकीय चलन मिळावे म्हणून स्वतंत्र मंत्र्यांचे खाते आहे, सुलभ वाहनांची सोय, मिडियामार्फत मिळणारी प्रसिद्धी, डिजिटल फोटोग्राफीमध्ये झालेली क्रांती, नवे नवे बघण्याची समाजमनाची हौस यामुळे पावसाळ्याच्या उत्तरार्धामध्ये 'पुष्पपठार कास' हा 'ड्रीम डेस्टिनेशन'चा मोठाच विषय बनून राहिला आहे. अर्थात वाढत्या पर्यटनामुळे स्थानिक पर्यावरणाला हानी पोहोचण्याचा धोका वेळीच ओळखून काही स्वयंसेवी संस्था, वनखाते, पर्यावरण खाते आणि सर्वच शासकीय यंत्रणा जाग्या झाल्या आणि माहिती पुस्तके, पुस्तिका, माहिती फलक, व्याख्याने, स्लाइड शो याद्वारे जनजागृती सुरु झाली.

पिवळी सोनकी, सोनपिवळी मिकी माऊस, निळी सीतेची आसवे, पांढरेशुभ्र गेंद, लाल तांबडी तेरडा आणि जांभळी मंजिरी या फुलांचे ताटवेच्या ताटवे या पठारावर फुललेले आहेत. बारकाईने बघणाऱ्याला विविध ऑर्किडस्, गौरीहार, कंदीलपुष्पे आणि ड्रॉसेरासारख्या फुललेल्या टिचभर उंचीच्या वनस्पती दिसू शकतात. माना उंचावून बघणाऱ्या तुताऱ्या दिसतात, आकाश गेंद, निळी-जांभळी चिरायतीची फुले दिसतात. कुमुदिनीची फुले अद्याप उमलायची आहेत, पण कमळाचे तळे मात्र गोलगोल पानांनी संपूर्ण भरुन गेले आहे.





# प्रदेश गवतफुलांचा

दूरवर पसरलेला सह्याद्री जगप्रसिद्ध आहे आपल्या काळ्याकभिन्न आणि आकाशाला भिडणाऱ्या कडेकपाऱ्यांसाठी. पण याच राकट डोंगररांगेत विश्वास बसणार नाही एवढी नाजूक आणि अप्रतिम ठिकाणंसुद्धा आहेत. सह्याद्रीच्या बुलंद व्यक्तिमत्वातली ही हळवी आणि कलात्मक बाजू तेवढीच ओढाळ आहे. असाच एक परिसर आहे साताऱ्याजवळचा कास पठारचा.

साताऱ्याच्या परिसरात सह्याद्रीची आष्टा-बामणोली डोंगररांग पसरलेली आहे. हा परिसरच मुळी एकदम निराळा आहे. निराळा अशासाठी की इथे सह्याद्रीचे आकाशाला भिडणारे बुलंद कडे नसून लहान लहान टेकड्या आहेत. त्यातही विशेष म्हणजे यातल्या बहुतेक टेकड्यांवर विस्तीर्ण सपाटी आहे. खरं म्हणजे ही लांब पसरलेली पठारंच आहेत. या परिसरात कोयनेच्या नदीकाठचा गूढरम्य प्रदेशही आहे. घनदाट जंगल आणि परिसर इतका दुर्गम आहे की आजही त्यात घुसायला वाघाचं काळीज हवं. अशा या मंतरलेल्या प्रदेशात कास पठारावरच्या रंगीबेरंगी गवतफुलांचं जादुई विश्व आपल्या विलक्षण बहराने सगळ्या जगाचं लक्ष वेधत असतं.

कास पठारावर जाणारा रस्ता सातारा शहरातल्याच बोगद्याच्या उजव्या बाजूने चालू होतो. रस्त्याच्या डाव्या बाजूला सज्जनगड



आणि उरमोडी धरण तर उजव्या बाजूला वेण्णा नदीवरचं कण्हेरी धरण आहे. बोगद्याला लागूनच उजवीकडे वळण घेतलं की हलक्याशा चढणीनंतर वाटेतलं यवतेश्वर पार केलं की हवेत सुखद गारवा जाणवू लागतो. आपसूकच आपली नजर गवतफुलांचा वेध घेत भिरभिरू लागते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना इवल्याशा पिवळ्या 'मिकी माऊस' फुलांचे गालिचे दिसू लागतात.

जगात जैवविविधतेच्या दृष्टिकोनातून जे काही मोजके 'हॉट स्पॉट्स' आहेत त्यात कास पठारचा समावेश होतो. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून साधारणतः महिनाभर या पठारावर शेकडो जातीची गवतफुलं-रानफुलं उमलतात. यातली मजा अशी की यात दर आठवड्याला नवीन फुलं उमलतात. यातली बरीचशी फुलं बोटाच्या पेराएवढी चिमुकली असतात. काही फुलं पठारावरच्या डबक्यातही उमलतात. अनेक रंगांच्या चिमुकल्या तुऱ्यांचेही गालिचे पठारावर तोऱ्याने उभे राहतात. पठारावर कारवीचीही लांबवर पसरलेली बनं आहेत. ही कारवी सह्याद्रीच्या डोंगरउतारांवर आढळणाऱ्या कारवीसारखी उंच नसून दोन-सव्वादोन फूट उंचीची झुडपं आहेत. रंग मात्र साधारणपणे तसाच जांभळा आहे. ही कारवी सात वर्षांतून एकदाच फुलते. गेल्या वर्षीच या कारवीचा बहर येऊन गेला.

कास तलावाच्या परिसरात ऑर्किडचेही विविध प्रकार दिसतात. याव्यतिरिक्त इथे अनेक प्रकारच्या औषधी वनस्पतीही विपुल प्रमाणात आढळतात. इथे नाना प्रकारचे चमत्कारही आहेत. यातल्या काही चिमुकल्या रोपट्यांची मुळं कीटकभक्षक आहेत! झाडापानांच्या अभ्यासकांसाठी कास पठार म्हणजे एक मोठी प्रयोगशाळाच आहे.

या महिन्याभरात कास पठारावर मैलोन्मैल या गवतफुलांचे पिवळे, गुलाबी, किरमिजी, जांभळे, पांढरे गालिचे पसरलेले दिसतात. मात्र भन्नाट वारा आणि सरत्या पावसाचे दिवस असल्याने अनेकदा प्रचंड धुकं आणि पाऊस असतो. वातावरणात सहन न होण्याइतका गारवा असतो. ही फुलं बघायला चालतच जावं लागतं. त्यामुळे स्वेटर, कानटोपी आणि रेनकोट हवाच. फोटोग्राफी करायची असेल तर कॅमेऱ्यासाठी प्लॅस्टिक आणि छत्री हवीच. शिवाय खाण्यापिण्याचे पदार्थही सोबत न्यावेत.

*रंग रंगुल्या सान सानुल्या गवत फुला रे गवत फुला... असा कसा रे मला लागला... सांग तुझा रे लळा...* इंदिरा संतांनी आपल्या कवितेत म्हटल्याप्रमाणे आपल्यालाही या गवतफुलांचा लळा लागतो.

..........................................



अनु.


गवतफुलांचा
जादुई प्रदेश



सा साताऱ्यात सह्याद्रीची आष्टा-बामणोली डोंगररांग दूरवर पसरलेली आहे. हा परिसरच मुळी निराळा आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून सगळ्यांना माहीत झालेलं 'कास पठार' याच परिसरात असून इथलं रंगीबेरंगी गवतफुलांचं जादुई विश्व आपली वेगळी नजाकत राखून आहे.

'कास' तलाव साताऱ्यापासून २०-२२ कि.मी. वर आहे. 'कास पठारा'वर जाणारा रस्ता सातारा शहराच्या पश्चिमेकडे असलेल्या बोगद्याच्या उजव्या बाजूने सुरू होतो. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या डोंगराच्या पलीकडे 'सज्जनगड' आणि 'उरमोडी धरण' तर उजव्या बाजूला वेण्णा नदीवरचं 'कण्हेरी' धरण आहे. बोगद्याला लागूनच उजवं वळण घेतलं की हलक्या चढणीनंतर वाटेतलं यवतेश्वर पार केलं की हवेत सुखद गारवा जाणवू लागतो. म्हणजे साताऱ्यापासून साधारण ६-७ कि.मी. गेल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी ही गवतफुलं आपल्याला दिसू लागतात. नंतर जसजसं आपण पुढे जाऊ लागतो तसं आपण या नाजूक विश्वाचा भाग होऊन जातो. सगळीकडे विश्वास बसणार नाही असे नाना रंगांच्या फुलांचे गालिचे मैलोन्‌मैल पसरलेले दिसतात.

सर्वसाधारणपणे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून महिनाभर या पठारावर शेकडो जातीची गवतफुलं-रानफुलं उमलतात. यावर्षी मात्र मुसळधार पाऊस अजूनही सुरूच असल्याने सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून या बहराला सुरुवात होईल, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. यातही गंमत अशी की यात दर आठवड्याला काही नवनवीन फुलं उमलतात. यातली बरीचशी फुलं चक्क बोटाच्या पेराएवढी चिमुकली आहेत. काही फुलं पठारावरच्या डबक्यातही उमलतात. याचबरोबर अनेक रंगांच्या चिमुकल्या तुऱ्यांचेही अनेक गालिचे पठारावर या दिवसात तोऱ्याने मिरवत असतात. पठारावर कारवीची लांबवर पसरलेली बनं आहेत. ही कारवी एरवी आढळणाऱ्या कारवीपेक्षा खूपच वेगळी आहे. सह्याद्रीच्या डोंगरउतारावर आढळणाऱ्या कारवीसारखी ही उंच नसून दोन-सव्वादोन फूट उंचीची झुडपं आहेत. रंग मात्र साधारणपणे तसाच जांभळा आहे. मात्र दोन वर्षांपूर्वीच या कारवीचा बहर येऊन गेल्याने पुढल्या बहरासाठी अजून पाच वर्षं वाट पाहावी लागणार आहे. कास तलावाच्या परिसरातल्या झाडांवर विविध प्रकारची ऑर्किडची फुलंही फुलतात. इथल्या काही चिमुकल्या रोपट्यांची मुळं कीटकभक्षी आहेत!

या एक-दीड महिन्यात कास पठारावर मैलोन्‌मैल गवतफुलांचे पिवळे, गुलाबी, किरमिजी, जांभळे, पांढरे गालिचे पसरलेले दिसतात. मात्र भन्नाट वारा आणि सरत्या पावसाच्या मोसमामुळे अनेकदा पाऊस पडत असतो. वातावरणात सहन न होणारा गारवा असतो. ही फुलं बघायला चालतच जावं लागतं. त्यामुळे स्वेटर, कानटोपी आणि रेनकोट हवाच. फोटोग्राफी करायची असेल तर कॅमेऱ्यासाठी प्लॅस्टिक आणि छत्री हवीच. या दिवसात इथे धुकंही खूप असतं. शिवाय इथे खाण्यापिण्यासाठी विशेष सोय नसल्याने सोबत पोळी-भाजीचा डबाही हवा.

३०-४० कि.मी. लांब आणि ७-८ कि.मी. रुंदीचं हे गवतफुलांचं विश्व म्हणजे सृष्टीचा अलौकिक आविष्कार आहे. सह्याद्रीतलं हे 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'च आहे. त्यामुळे सह्याद्रीच्या या अनोख्या निसर्गाची सगळ्यांना ओळख झाली पाहिजे, हे निश्चित. मात्र एखाद्या पिकनिक स्पॉटवर व्हावी तशी गर्दी आजकाल इथे उसळते. इतकी की मोटारींची रांग पार अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याच्या बोगद्यापर्यंत जाते. या मंडळींना फुलांशी हितगुज करण्याशी काही देणंघेणंच नसतं. असे बहुसंख्य हुल्लडबाज पर्यटक निर्दयीपणे या नाजूक फुलांना तुडवत बेगुमान फिरत असतात. आपल्या या वागण्याने आपण सृष्टीच्या अनोख्या आविष्काराला नष्ट करत आहोत, हे त्यांच्या गावीही नसतं. या भयंकर प्रकारामुळे पठाराचं निसर्गरम्य रूप विद्रूप व्हायला वेळ लागणार नाही. इथलं निसर्गसौंदर्य प्रत्येकाने बघितलं पाहिजेच पण अत्यंत हळूवारपणे आणि जबाबदारीने.

ही रानफुलं रस्त्याच्या दुतर्फा फुलतात. अती उत्साहाने म्हणा किंवा बेदरकारपणे, आपण या फुलांच्या गलिच्यात घुसता कामा नये. कडेकडेने फिरलं तर हे गालिचे अजिबात विस्कटणार नाहीत. जोर-जबरदस्तीने नाही तर निसर्गाशी सन्मानपूर्वक आणि जबाबदारीने वागण्याची आवश्यकता आहे.

# रानफुलांच्या गावा...

एक काळ असा होता जेव्हा रानफुलं आणि त्यांच्या नयनरम्य रंगाची उधळण म्हटलं की डोळ्यासमोर यायचा तो हिमाचल प्रदेश. दूरवर पसरलेल्या पर्वतरांगा, बर्फाच्छादित शिखरं, त्यावर पडलेल्या सूर्यकिरणांमुळे सोन्याचा मुलामा दिल्यासारखे चमकणारे शिखरांचे मुकुट, अंगाला झोंबणारे गार वारे... अशा पार्श्वभूमीवर अनेकरंगी रानफुलांचा मन वेडावणारा रंगसोहळा साजरा करणारी 'पुष्पघाटी' म्हणजेच 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'.

पण आज महाराष्ट्रासाठी तरी ही परिस्थिती बदलेली आहे. रानफुलं म्हटलं की पहिल्या झटक्याला डोळ्यासमोर येतं ते कासचं पुष्पपठार. Bute आणि Messa structure ने बनलेली नैसर्गिक तटबंदी लाभलेल्या, besat ने बनलेल्या सज्जनगड, अजिंक्यताऱ्यासारख्या पसरलेल्या हिरव्या-काळ्या डोंगरांच्या कुशीत विसावलेलं, बेसीनसारख्या आकाराचं हे पुष्पपठार सहजासहजी दृष्टीला पडत नाही आणि पडलं तरी फारसं लक्ष दिलं जात नाही. खास थांबून काही पाहावं असंही वाटत नाही. मोठमोठे कासवाच्या पाठीसारखे कातळ आणि क्वचित कुठे-कुठे खुरटी झाडं.



पण पाऊस संपत आला आणि सप्टेंबर महिन्याची चाहूल लागली की वर्षातले ११ महिने निवांत असणारं हे पठार एकदम कात झटकून टाकतं आणि पुष्पपठार बनतं. निरनिराळ्या फुलांच्या गालिच्यांची पखरण करून रंगाची उधळण करतं. खरंतर कास पठारावर येणारी बरीचशी फुलं महाराष्ट्रात इतर भागातसुद्धा सापडतात. अगदी खंबाटकी घाटापासून कासपठारावर जाणाऱ्या रस्त्यातही ती दिसतात. पण कास पुष्पपठाराचं हेच वैशिष्ट्य आहे की इथे होणारं मास लॉवरिंग म्हणजे खूप मोठ्या संख्येने एकाच वेळी फुलणारी अनेक प्रकारची आणि अनेक रंगाची फुलं.

सर्वांगाने फुलून आलेल्या या पठारावर नजर पोहोचेल तिथपर्यंत कुठेही पाहिलं तरी फुलांचे गालिचे पसरलेले सतात. १०-१५ फुलांचा ताटवा पाहिला तरी मन कसं उत्साही होतं. इथे तर मैलोनमैल पसरलेले फुलांचे पट्टे! ाय नाही त्यात? 'सोनकी' आणि 'मिकीमाऊस'चा पिवळा-सोनसळी रंग आहे. 'तेरड्या'चा आणि 'मंजिरी'चा ाभळा रंग आहे. 'सीतेच्या आसवां'ची निळाई आहे आणि 'पागोटा' आणि 'पंद'च्या फुलांची शुभ्रता आहे. फुलं सलेल्या पण आकर्षक आणि मऊ पानाच्या हिरव्या, पालथ्या घातलेल्या 'कारवी'च्या टोपल्या आहेत.



कधी एखाद्या रंगाचा एक अख्खा पट्टाच पसरलेला तर कधी या सर्व रंगाची मिळून झालेली सरमिसळ. डोळ्याचं पारणं फेडणारं हे दृश्य सप्टेंबर संपत आला की कमी व्हायला लागतं. पण कासचं पुष्पपठार या एकाच महिन्यात सौंदर्याची जी लयलूट करतं तेव्हा हातचं काही राखून ठेवत नाही.

आता तर पश्चिम घाटाचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झाल्यामुळे कासपठारालाही चांगलं संरक्षण मिळालं. हाताच्या बोटावर मोजल्या जाणाऱ्या स्थळांपैकी एक असणाऱ्या, रंगांची उधळण करणाऱ्या या पुष्पपठाराला एकदाच काय, अनेक वेळा भेट दिली तरी कमीच.

# यवतेश्वर



सातारा हे पुण्याच्या जवळ असल्यामुळे तिथं एका दिवसात जाऊन तीन- चार ठिकाणं पाहाता येतात किंवा तीन- चार दिवसांसाठी राहता येतं. साताऱ्याजवळ कास पठाराकडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्याच्या अलीकडेच यवतेश्वराचं मंदिर आहे. हे शंकराचं हेमाडपंथी बांधणीचं मंदिर आहे. या मंदिराकडे जाणारा रस्ता खूपच सुंदर आहे. मंदिराच्या शेजारीच एक बारव (मोठी विहीर) आहे.

कधी कुटुंबाला घेऊन दीड किंवा दोनच दिवसांत एखादी छोटीशी ट्रीप करायची इच्छा असते. त्यात ट्रेक, ट्रीप, देवदर्शन आणि नुसतीच पायी भटकंती असं सगळंच छोट्या स्वरूपात करायचं असतं. यवतेश्वरचा पर्याय अशा वेळी उत्तम आहे. इथं मंदिराबरोबरच शेजारची विहीर, छोटासा डोंगर, घाटाचा रस्ता आणि दरी हे सगळंच एंजॉय करता येतं.





अनु.

# हा निसर्ग मनाला लावी पिसे...



पाऊस पडू लागला की हौशी पर्यटकांच्या पायाला भिंगरी लागते. जिथे म्हणून हिरवळ, धबधबे दिसतात तिथे तिथे ते जातात. मग ती जागा मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असो किंवा दूरवर. ठोसेघर धबधबा मुंबईपासून बराच लांब म्हणजे साताऱ्याला आहे. पण इथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत दिवसेन्‌दिवस वाढच होतेय. उंचावरून कोसळणारा हा धबधबा पाहून प्रथमदर्शनी छातीत धडकीच भरते. पण त्याचं रौद्रभीषण सौंदर्य नंतर मनाला भुरळ पाडू लागतं. सध्या पावसाने दडी मारली असली तरी या धबधब्याचं सौंदर्य काही कमी झालेलं नाही. आजूबाजूच्या परिसरातही चांगलीच हिरवळ असल्याने इथे आल्यावर मनाला पिसं लागतात, हेच खरं.



अनु.



# सृष्टीचा आविष्कार!

निसर्गाला सर्वांग सुंदर बनवणारा श्रावण दाखल झालाय. आता जमिनीचा प्रत्येक तुकडा बहरून येऊ लागेल. याच काळात सुटी असली, तर मस्त फिरून यायचा बेत आखायला हरकत नाही. त्यातही सज्जनगड आणि ठोसेघरला गेलात तर, क्या बात है। इथली हिरवाई.. इथला धबधबा... इथला कातळ सगळं अचंबित करणारं आहे.

प्रगतीच्या ओघात आपण कितीही बदललो तरी धुवाँधार कोसळणारा पाऊस आपलं मन व्यापून टाकतोच. बाहेर पाऊस बरसत असला, की प्रत्येकालाच मनापासून वाटतं, की आज ऑफिसला जाऊच नये... गॅलरीत बसून मस्त पाऊस बघत राहावा... ही किमया असते सृष्टीच्या मनमुक्त आविष्काराची.

त्यात आज श्रावणाचा पहिला दिवस. श्रावण म्हणजे सृष्टीचा रसरशीत आविष्कार. अनेक रंगांच्या नाना छटा देऊन अवघ्या आसमंताला रंगात बुडवून टाकणारा रंगीला श्रावण... मनाला हिरवाकंच करून आनंदाची बरसात करणारा श्रावण... सह्याद्रीच्या कणखर कड्यांना मखमली अस्तरं लेवून मृदू करणारा... त्यावर इंद्रधनुष्याची नक्षी कोरणारा श्रावण... आणि मुख्य म्हणजे पक्क्या शहरी झालेल्या आपल्या मनालाही क्षणात हळवं... ओलंचिंब करणारा हा श्रावण.

श्रावणातल्या निसर्गाचा हा अविष्कार सह्याद्रीत खूप ठिकाणी दिसत असला तरी साताऱ्याच्या परिसरात तो अधिक सुरेख असतो. देशावरचा हा प्रदेशच मुळी वेगळा आहे. आष्टा-बामणोली डोंगररांग आपलं स्वतंत्र अस्तित्व ठेवून आहे. इथल्या छोट्या-छोट्या डोंगरमाथ्यांवर मोठमोठी पठारं आहेत. सातारा गावाबाहेरच्या बोगद्यातून पलीकडे गेलं की निसर्गाचा हा विराट देखावा आपल्या नजरेसमोर येतो. सगळ्या डोंगररांगा... त्यातून जाणारे नागमोडी घाटरस्ते अगदी चित्रातल्यासारखे दिसतात. त्यात इथे आहे आपल्याला वेड लावणारा ठोसेघरचा धबधबा. खरंच पूर्ण भरात कोसळणारा हा धबधबा बघणं, हा एक अविस्मरणीय आनंदाचा भाग आहे.

मुंबईहून सातारा आहे साधारण अडीचशे किमी साताऱ्याहून सज्जनगड अगदी समोर आहे. हाच रस्ता पुढे ठोसेघरला जातो. सज्जनगडाचा फाटा ओलांडला की उजवीकडच्या दरीत उमरोडी धरणाचा विहंगम देखावा दिसतो. थोडंसं पुढे गेलं, की चाळकेवाडी हे ठोसेघरच्या धबधब्याचं गाव लागतं. साताऱ्याहून हे अंतर आहे बावीस किमीचं.

सव्वाशे-दीडशे फूट सरळ रेषेत कोसळणारा ठोसेघरचा धबधबा आहे नारळी नदीवर. धबधबा बघायला दहा एक मिनिटं पायवाटेनं उतरावं लागतं.



अनु.

शेवटी इथे रेलिंग्ज केलेली आहेत. मात्र रेलिंग्जच्या बाजूचा स्लोप महाभयंकर आहे व सगळा कातळ खूप निसरडा असल्याने कोणीही या रेलिंग्जच्या पलीकडे अजिबात जाऊ नये. कारण त्याखाली दोन-एकशे फूटांचा सरळसोट कडा आहे आणि त्यातही सावरण्याची अजिबात संधी नाही. खरं म्हणजे पुढे जाण्याची गरजच नाही. या जागेवरूनच धबधबा व्यवस्थित दिसतो. आपण ज्या डोंगरावर उभे असतो तिथून समोरही डोंगर आहे. या दोन डोंगरांना जोडणाऱ्या उजवीकडच्या मधल्या जागेवरून हा धबधबा कोसळतो. प्रचंड ताकदीने कोसळणाऱ्या वेगामुळे पाणी तळात पोहोचल्यावर परत उलटं फिरतं. त्यात दरीतून भणाणत वाहणारा वारा हे पाणी आपल्याबरोबर दरीतून वर फिरवत असतो. खूप हटके दृश्य असतं हे.

खरं म्हणजे पुणं सोडलं, की या दिवसांत वेगळा निसर्ग आपल्याला आजूबाजूला दिसायला लागतो. टेकड्यावर... माळरानांवर हिरव्या मखमली रंगाचं साम्राज्य असतं. त्यात जांभळ्या, गुलाबी, पांढऱ्या रंगांची तेरड्याची गुंफण या कॅन्व्हासला रंगत आणत असते. मधूनच नाना प्रकारचे रानतुरे तोऱ्याने मिरवत असतात. सगळ्या आसमंतात घुमलेला गवताचा आणि मातीचा गंध आपल्याला तरतरीत करत असतो. आणि हे सगळं अनुभवताना सातारा कधी येतं ते कळतही नाही. खरं म्हणजे सध्याच्या एक्सप्रेस वे मुळे मुंबईहून पहाटे आपल्या गाडीनं लवकर निघालं तर सहज दहाच्या आसपास आपण ठोसेघर गाठू शकतो. संध्याकाळी चार साडेचार वाजता जरी सातारा सोडलं, तरी नऊच्या दरम्यान आपण घरी परतू शकतो. परतताना जर वेळ मिळाला तर सज्जनगडावरही काही वेळ जाता येतं.

एक मात्र खरं की सरत्या पावसातल्या निसर्गाची सगळी रूपं इथे बघायला मिळतात. त्यात इथे पर्यटकांची गर्दीही विशेष नसल्याने निसर्ग आपल्याला मनापासून भावतो. ठोसेघरला पोहोचल्यावर गाडी थेट बंद करावी. धुक्याने वेढलेल्या वाटांवरून... भुरभुरत्या पावसात दोन-चार तास मनमुराद चालत भटकावं. हवं तर, कड्यावर निवांतपणे बसून बेभान कोसळणाऱ्या धबधब्याला डोळ्यात साठवावं आणि पुन्हा ताजंतावानं होऊन मुंबई गाठावी.

# शिवलिंगांच्या प्रदेशात...





सातारा शहरापासून केवळ १५ किलोमीटर अंतर, घनदाट झाडीचा प्रदेश, अल्लडपणे उड्या मारत जाणारे धबधबे, सातत्याने ऐकू येणारे मोरांचे आवाज आणि वाटेवर दिसणारी हजारो शिवलिंगे...ही वाट आपल्याला श्री पाटेश्वराच्या मंदिराकडे घेऊन जाते.

सातारा शहरापासून १० किलोमीटरवर असलेल्या देगांव गावापासून पाच किलोमीटरवर अंतरावर असलेले पाटेश्वर समुद्रसपाटीपासून तीनहजार फूट उंचीवर हे क्षेत्र आहे. देगांवनंतर दोन किलोमीटर अंतरानंतर या ठिकाणी पायीच जावे लागते. पाटेश्वराच्या डोंगरात असलेली हेमाडपंथी लेणी वास्तुशिल्पाचे आदर्श नमुने आहेत. डोंगरावरच्या घनदाट झाडीत महाकाय आकाराची शेकडो शिवलिंगं आहेत. मोठ्या पिंडींवर अनेक छोट्या पिंडी कोरलेल्या दिसतात. यातल्या प्रत्येक पिंडीचा आकार, रचना आणि नक्षीकाम वेगवेगळे आहे. लेण्यांमधील नंदीच्या मूर्तीही अतिशय वेगवेगळ्या आहेत.

गाडीचा मार्ग संपल्यावर घनदाट झाडीतून चालायला सुरुवात केल्यावर डोंगराच्या कपारीत रिद्धीसिद्धी सोबत असलेली गणेशाची सुंदर मूर्ती दिसते. थोडसं पुढे गेल्यावर निळ्याशार पाण्याचं, कमळांच्या फुलांनी भरून गेलेलं सुंदर तळं दिसतं. या तलावातही अनेक शिवपिंडी आहेत. हे तळं वर्षभर पाण्याने भरलेलं असतं. तळ्याच्या बाजूलाच सद्‌गुरू गोविंदनाथ स्वामी महाराजांचा समाधी आश्रम आहे. तळ्याला वेढा घालून मुख्य मंदिराकडे जातानाही दोन्ही बाजूंना अनेक शिवपिंडी दिसतात.

हा परिसर पाहताना कंबोडियाच्या अंकोर मंदिराची आठवण येते. मंदिराच्या बाजूला दगडी तटबंदी आहे. तसेच मोठे दगडी खांब आणि नक्षीदार छत आहे. मंदिराबाहेर दोन दगडी दीपमाळा आहेत. मध्यभागी नंदीचे मंदिर आहे. हा नंदी म्हणजे शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. ४५ फट उंची असलेलया या मंदिराचं



अनु.

बांधकाम घडीव दगडांनी केलेलं आहे. मंदिरात पाटेश्वराची पिंड आहे. उत्तरेला गणपती आणि दशमालतीच्या समोरासमोर तोंड असलेल्या मूर्ती आहेत. शंकर आणि शेषधारी विष्णूच्या मूर्तीही दिसतात. याच परिसरात अष्टभूजा देवीचंही एक मंदिर असून दक्षिणेला भैरवाची मूर्ती दिसते. प्रवेशद्वाराजवळ रोकडोबाची मूर्ती आणि मानवी शरीर असलेला गरुड आहे. याच परिसरात कार्तिक स्वामी आणि बलिभद्राची मंदिरं आहेत. सात एकरांपेक्षा अधिक परिसरात असंख्य शिवलिंगं आणि अनेक सुरेख मूर्ती आढळतात.

मंदिराचं बांधकाम १७०८ ते १७४९ या काळात परशुराम तारायण अनगळ या प्रसिद्ध वासतुविशारदाने केल्याचा उल्लेख सातारा गॅझेटमध्ये आढळतो. पाटेश्वर डोंगरावरून संपूर्ण परिसराचे विहंगम दृष्य दिसतं. एकीकडे जरंडेश्वर तर दुसरीकडे सज्जनगडाच्या परिसराचा रमणीय देखावा दिसतो.

## प्रवास :

- पाटेश्वर इथे जाण्यासाठी सातारा बसस्टँडवरून देगावला जाणारी बस पकडावी. खासगी वाहन असल्यास पाटेश्वराच्या पायथ्याशी ठेवावे लागते
- या ठिकाणी जेवणाची सोय नाही
- जवळच असलेल्या सातारा शहरात जेवण असंच राहण्याची सोय होऊ शकेल.






अनु.

# लिंब आणि शेरी

सातान्याच्या जवळच लिंब-शेरी नावाची दोन गावं आहेत. इथंच १२ मोटांची विहीर आहे. वीरुबाईसाहेब भोसले यांनी या विहीरीची बांधणी केली. ही विहीर अष्टकोनी आहे. ११० फूट खोल आणि ५० फूट व्यास असलेल्या विहिरीत उतरण्यास उत्तम कमानीतून पायऱ्या आहेत. विहिरीचे दोन भाग करणारा सज्जा असून त्यास सुंदर नक्षी असलेले खांब आहेत. सज्जावर जाण्यासाठी दोन्ही बाजूंनी जिना आहे. विहीर हे इथलं प्रमुख वैशिष्ट्य असलं, तरी लिंब हे गावही नैसर्गिक सौंदर्यानं संपन्न आहे. शहरात राहाणाऱ्यांना एरवी शेतीच पाहाणं दुर्मिळ, त्यात त्यातून वाहाणारं पाटाचं पाणी, आलेली पिकं तर अतिदुर्मिळ. हे सारं पाहाण्याची संधी इथं मिळते. या विहिरीच्याच समोर एक भला मोठा वाडा आहे. जो खासगी मालकीचा असला, तरी विनंतीवरुन तो आतूनही आवर्जून पाहावा असा आहे. लिंब गावावरून पुढे सातारा रोड स्टेशनमार्गे कल्याणगड उर्फ नांदगिरी हा किल्लाही पाहाता येऊ शकतो.

# कोयनानगर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते कोयनानगर | | | | | 281 | | | | |
| **1** | कोयनानगर | धबधबा | अभयारण्य | नदी | धरण | 57 | NW | 38 | SW | |
| **2** | रामघळ - हेळवाक | धबधबा | | निसर्ग | ट्रेक | 58.5 | NW | 5.5 | SW | |
| **3** | घेरादात्तेगड (सुंदरगड) | | किल्ला | | | 51 | NW | 52 | SW | |
| **4** | भैरवगड | | किल्ला | मंदिर | ट्रेक | 52 | NW | | | |
| **5** | चांदोली | | अभयारण्य | नदी | | 56 | SW | 83 | SE | |






अनु.

# थरारक

दोन-तीन दिवस हातात असतील तर कोयना परिसर एक उत्तम पर्याय आहे. इथलं घनदाट जंगल, कोयनेचं विशाल पात्र आणि कोयनानगर धरण प्रकल्प यामुळे हा परिसर तुमचं मन हरखून टाकतो.



महाराष्ट्रातील सर्वात वरच्या क्रमांकावर जी वनं येतील त्यातलं एक म्हणजे कोयना वन्यजीव अभयारण्य. सातारा जिल्ह्यात दूरवर पसरलेले डोंगर आणि त्यांच्यामधल्या दरीत कोयना नदीचा विस्तार आहे. तिच्यावर बांध घातला त्या कोयनानगरपासून ते थेट तिच्या उगमापर्यंत, म्हणजे महाबळेश्वरपर्यंत हे घनदाट सदाहरित जंगल पसरलेलं आहे. महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरू आणि राष्ट्रीय पक्षी मोरयांबरोबरच वाघ, बिबटे , तरस, रानकुत्रे, भेकर, गवे, गरूड, गोड्या पाण्यातील अनेकविध मासे, दुर्मिळ पक्षी, कीटक आणि फुलपाखरं इथे मुक्त संचार करतात.

सह्याद्रीच्या या दुर्गम भागात पण कुंभार्ली घाट आणि कोयनानगर धरण प्रकल्पामुळे दूरपर्यंत रस्त्यांचं जाळं निर्माण झालं आहे. वेगळ्या भूरचनेमुळे अनेक किल्ले, गुहा, मंदिरं या परिसरात आहेत. धरणाच्या वरील डोंगरावर छोटी रिसॉर्टस आहेत. तिथूनही सुंदर निसर्गदृश्य दिसतं. या भटकंतीत तुम्ही पुण्याहून निघालात कात्रज, कुंभार्ली घाटांची भेट होते, तर मुंबईहून येताना कशेडी आणि कुंभार्ली घाट लागतात. रस्ता चांगला असल्यानं ड्रायव्हिंगला मजा येते. उंब्रज नंतर डोंगर रांगा, उसाची शेती, कोयनेचं पात्र

आणि रस्त्यावर झुकलेले वृक्ष तुमची सोबत करतात. या सफरीत पाटणचा वडापाव आणि कोयनानगरची फणसाची भाजी(सिझनल)खायलाच हवी! जंगल सफारीसाठी पुढील ठिकाणी जावं.

कोयनानगर ते नवजा, कोयनानगर ते गाढव खोप आणि पुढील कच्चा रस्ता इथे छान नदीकाठ आहे. गावात वाटाड्याही मिळेल. हेळवाक ते रामघळ हा पायी ट्रेकही जंगलातून जातो. एखादा दिवस हातात असेल आणि थ्रील हवं असेल, तर त्याच्या पुढे भैरव गडाचा ट्रेक एकदम मस्त. पण वाटाड्या हवाच; अतिशय दाट जंगलातून पायवाट जाते. उन्हाळ्यात आंबे, फणस, जांभूळ, करवंद विपुल प्रमाणात सर्वत्र आढळतात. कोयनेच्या जंगलातील वनस्पतींपासून बनविलेली आयुर्वेदिक औषधं हवी असतील, तर राममळा इथल्या 'कोयना हर्बल को-ऑपरेटिव्ह'ला नक्की भेट द्या. तिथे स्थानिक महिलांनी बनविलेले चवदार पदार्थही मिळतात आणि वेत-बांबूपासून केलेल्या वस्तूही.

कोयनेचं विशाल पात्र, घनदाट जंगल आणि आत गेलेला रस्ता असं सगळं निसर्गवैभव असल्याने फोटोग्राफर्ससाठी हे ठिकाण म्हणजे पर्वणीच आहे. संध्याकाळी कुंभार्ली घाटात जाऊन मस्तपैकी चहा-भजी घेत वाऱ्यावर बसण्यासारखं सुख नाही. अस्ताला जाणारा सूर्य, उंच हिरवे डोंगर आणि चिपळूणपर्यंत पसरलेलं जंगल मनावर गारुड करतं. कोयना परिसराचे वैशिष्ट्य म्हणजे इथला कोकण कडा आणि तिथून दिसणारे सूर्योदय व सूर्यास्त. पुणे-चिपळूण मार्गे जाणारे प्रवासी न चुकता इथे थांबतात. नशीब असेल तर वाघ, बिबट्या, तरस किंवा भेकरही दिसू शकतं. नदीत बोटिंग करताना दोन्ही बाजूंना पसरलेलं जंगल खुणावतं पण सावधान तो वाघांचा 'कोअर झोन' आहे. तिथे प्रवेश नाही. दूरवर पाटणच्या वर सडा वाघापूर परिसरात शेकडोंनी भिरभिरणाऱ्या पवनचक्क्या लक्ष वेधून घेतात. कार असेल, तर जाताना सडा वाघापूर मार्गे पुण्याला जाऊ शकता. मुंबईकरांना चिपळूण मार्गे कोयनानगरला येणं सोइस्कर आहे. कोयनानगर जवळ नवजा परिसरात ओझर्डे धबधबा आहे. तीन मोठ्या जलधारा एकत्र येऊन हा प्रपात कोयनेत विसर्जित होतो. महाराष्ट्रातील सर्वांत मोठा विद्युत प्रकल्प कसा आहे, हे इथे आल्यावरच कळतं. धरणावरचं नेहरू गार्डन पाहाणं आणि बोटिंग करणं पर्यटकांत प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील या शांत पर्यटनस्थळाला एकदा तरी भेट द्यावी.



अनु.

**काय पाहाल?**

ओझर्डे धबधबा, हुम्बर्लीचा डोंगर, राम मळा सेंटर (केन बांबू, आयुर्वेदिक औषधी प्रकल्प, बचत गट उत्पादने), नेहरू गार्डन, बोटिंग (धरण), कुंभार्ली घाट, राम घळ (जंगल भ्रमंती), कोयना नदी पात्र (पाटण परिसर), भैरव गड - हेळवाक मार्गे (जंगल ट्रेक)

**कसे जाल?**

**पुणे** : सातारा रोड - उंब्रज फाटा - पाटण - कोयना नगर
**मुंबई** : कशेडी घाट - खेड - चिपळूण - कुंभार्ली घाट - कोयनानगर

**अंतर :**

२०० किमी (पुणे ते कोयनानगर)
२९५ किमी (मुंबई ते कोयनानगर)

## कोयनानगर

दोन-तीन दिवस हातात असतील तर कोयना परिसर एक उत्तम पर्याय आहे. इथलं घनदाट जंगल, कोयनेचं विशाल पात्र आणि कोयनानगर धरण प्रकल्प यामुळे हा परिसर मन हरखून टाकतो. कोयना नदीवरचं धरण, त्याचबरोबर येथील जलविद्युत प्रकल्पही पाहता येईल. आयुर्वेदिक औषधांचं उत्पादन करणारं राममला सेण्टर, ओझडेर धबधबा प्रसिद्ध आहेत. रामघळीतली जंगल भ्रमंती, जंगलातले वाघ, बिबटे, तरस, अनेक दुर्मिळ फुलपाखरं यामुळे इथे फोटोग्राफीला भरपूर वाव आहे. जरा थ्रिलिंग अनुभव हवा असल्यास दोस्त कंपनीसोबत जवळच्या भैरवगडाचा ट्रेकही करता येईल.

**कसं जाल?**

कशेडी घाट-खेड-चिपळूण-कुंभार्ली घाटमार्गे कोयनानगरला जाता येतं. मुंबईपासून हे अंदाजे २०० किलोमीटर्सवर आहे.

**मिलिंद गुणाजी यांच्या आवडीच्या ठिकाणाबद्दल त्यांनी केलेले वर्णन : कोयनानगर**

नव्या ठिकाणांची आवड असलेल्यांनी कोयनानगरला आवर्जून भेट द्यावी असं मी सुचवीन. हा भाग माझ्या विशेष आवडीचा. नव्याने डेव्हलप होत चाललेला. महाबळेश्वरहून सुमारे २६ कि.मी.वर तापोळे आहे. तिथून तीन तासांत लाँचने कोयनानगरला जाता येतं. कोयनानगरच्या बाजूला पाटण नावाचं गाव आहे. संस्थानिक विक्रमसिंह पाटणकर यांचं ते गाव. २० वर्षं ते आमदार होते आणि काही काळ पर्यटनमंत्रीही. त्यांनी ते बऱ्यापैकी डेव्हलप केलंय. पाटणहून कोयनाप्रकल्प साधारण २० किमीवर आहे. पण, कोयनानगरला जाण्याचा हा प्रचलित मार्ग नव्हे. मुंबई ते सातारा

२६० किमी आणि सातान्याहून उंब्रजच्या अलिकडून पाटण-कोयनानगर या मार्गाने कोयनानगरला सहज पोहोचता येतं. मुंबईहून हा प्रवास साधारण सहा तासांचा आहे. ६५ किमी लांबीच्या शिवसागर जलाशयावर कोयनानगरचं धरण आहे. जलाशयाची समुद्रसपाटीपासूनची उंची एकवीसशे फूट असून त्याच्या दुतर्फा उंचच्या उंच डोंगराच्या रांगा आहेत. त्यातल्या अगदी लगतच्याच डोंगरावर आठशे ते हजार फुटांवर अनेक रिसॉर्टची एक सोसायटी बनवलेली आहे. तिथून त्या धरणाचं आणि जलाशयाचं विहंगम दृश्य दिसतं. त्यातच पाटणकरांचं विंड शॅले नावाचं वेगळ्या धर्तीचं हॉटेल आहे. स्विझंलंडमधले शेतकरी अशी लाकडाची घरं बांधतात. त्याला शॅले म्हणतात. संपूर्ण परिसराचा व्ह्यू तिथून दिसतो. समोर पसरलेलं विस्तीर्ण जलाशय आणि जलाशयात घुसलेल्या गर्द झाडीने भरलेल्या डोंगराच्या रांगा अगदी पाहण्यासारख्या. निसर्गसौंदर्याची लयलूट इथे पाहायला मिळते. इथून दिसणारा सूर्योदय केवळ अप्रतिम. संपूर्ण जलाशयात फेरफटका मारण्यासाठी निसर्गकन्या नावाची लाँच केरळहून मुद्दाम मागवण्यात आली आहे. फेरफटका मारताना वासोट्यासारखा दुर्गम किल्लासुद्धा निरखता येतो. किल्ल्याच्या भागात मैलोन् मैल कुठेही मनुष्यवस्तीचे नाव नाही. अत्यंत घनदाट जंगल असल्याने वाइल्डलाइफचा आनंदही लुटता येतो. अरण्यामध्ये सांबर, गवेरेडे, अस्वलं, उडत्या खारी, जायंट स्क्विरल्स असे दुर्मिळ प्राणी पाहता येतील. त्याचबरोबर ट्रेकर्सना पाहण्यासाठी भैरवगड आहे. कोयनानगर हे घाटाच्या टोकावर असल्यामुळे दुहेरी फायदा आहे. घाट उतरून खाली फक्त ४० किमीवर कोकणातलं चिपळूण आहे.

त्यामुळेच कोल्हापुरी मटन, चिकन, तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोकणातले मासे यांसारखं दोन्ही प्रकारचं म्हणजे घाटावरचं आणि कोकणातलं उत्तम जेवणही मिळू शकतं. नव्या ठिकाणांची आवड असलेल्यांनी कोयनानगरला भेट द्यावीच. यासाठी एमटीडीसी किंवा 'ट्रॅव्हल ऑर्ग' या संस्थेशी संपर्क साधता येईल.





# धबाबा तोय आदळे

एका गूढ, अद्‌भूत अशा नीरवशांततेचा भेद करत, जलप्रपाताचा घनगंभीर नाद जवळ आल्याचा भास होतो. काही क्षणातच डोंगराच्या एका कपारीवर पूर्ण जलपटलाच्या स्वरूपाच्या प्रपाताचा साक्षात्कार होतो.



सह्याद्री - महाराष्ट्राचा सखा आणि बुलंद पाठीराखा. ज्याच्या अंगाखाद्यांवर शिवयारांनी आपल्या मावळ्यांसोबत फिरताना, स्वराज्याच्या शपथेपासून राज्याभिषेकापर्यंत सर्व सोपस्कार केले आणि सह्याद्रीचे दुर्गमत्व आपल्या साहसी मोहिमांमधून सिद्ध केलं.

अशा या सह्याद्रीच्या माथ्यावर अनेक दुर्ग, तीर्थस्थाने, पुण्यसरितांची उगमस्थाने तर आहेतच परंतु याच्या गिरीकंदरातून अनेक घाटवाटाही प्रचलित झाल्या. त्यापैकी नाणेघाटासारखे स्थान अजूनही ऐतिहासिक वास्तुंच्या खूणा जपत आपले प्राचिनत्व सिद्ध करते. व्यापार-उदिम वाढत गेला तसा या घाटवाटांना अधिक सुकर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. असे असूनही आजही या करवतकाठी घाटवाटांची वळणं पार करताना भल्याभल्यांची छाती दडपते. इतरवेळी ओसाड भासणारे हे घाट, पर्जन्यऋतूत मात्र हिरवाईने तरुणाईने बहरून जातात ते त्यांना मिळणाऱ्या वरुणराजाच्या जलसंजीवनीने!

*जितुके गिरी तितुक्या धारा। कोसळती भयंकरा।*
*पाभळ वाहाळा अपारा। उकळ्या सांडिती॥*

परशुरामभूमीत प्रवेश केल्यावर अशा दृष्यांची ठाईठाई अनुभूती येते. कोकणचा निर्माता असलेल्या परशुरामाचे मंदिर आणि त्यासमोरील वळणावरून दिसणारा वसिष्ठी नदीचा नागमोडी प्रवाह बघत आपण घाट उतरून चिपळूणच्या प्रवेशद्वारी येतो. इथल्या चौररस्त्यावरून उजवीकडे गुहागरचा फाटा जातो तर डावीकडे कराडकडे जाणारा रस्ता वळतो. सुरुवातीचा काही रस्ता सपाटीवरून गेल्यावर कुंभार्ली घाटाची अवघड वळणं सुरू होतात. डावीकडे कोयनेच्या जलविद्युत प्रकल्पाचे पोफळी केंद्र राहते. घाटातून बरेच वर आल्यावर, दरीतील मेघमंडळ हळूहळू आपल्यामागून वर चढतानाचे विलोभनीय दृश्य दिसू लागते. अखेरच्या टप्प्यात तर ठिकठिकाणी स्वच्छंदपणे झेपावणाऱ्या प्रपातधारा दिसतात. घाटमाथा जवळ येतो आणि तिथल्या हनुमानमंदिरापाशी विसावून कोकणात उतरणाऱ्या दरीचे आणि आपण चढून आलेल्या नागमोडी रस्त्याचे विहंगम दृश्य बघायला मिळते. थोडे पुढे आल्यावर रस्त्यालगतच एक प्रचंड जलौघ आपल्याला सचैल स्नानासाठी खुणावतो. अचानक दरीतून वर आलेल्या मेघांची दाटी होते आणि अवघा आसमंत धुक्यात हरवून जातो. काही क्षणात मेघपटल दूर होताच कोयनानगरचा परिसर हळूहळू दृष्टोत्पत्तीस येतो. मात्र त्याआधी हेळवाक गावाजवळील समर्थस्पर्शाने पावन झालेली रामघळ आपल्याला खुणावत असते. गावातील वाटाड्या सोबतीला घेऊन या घळीपर्यंत जाता येते. कापना नदीवरील छोटा पूल ओलांडून चढणीची पायवाट सुरू होते. वर आल्यावर मागे वळून पाहता, कोयनेचे धरण, त्यामागील शिवसागर जलाशयाचे पात्र दिसते. कोंढावळ्याच्या धनगरवाड्याजवळ क्षणभर विश्रांती घेऊन चहुकडे दाटलेल्या हिरवळीतून मार्गक्रमण सुरू राहते. हळूहळू झाडी इतकी गर्द होत जाते की, अक्षरशः दोन्ही हातांनी ती बाजूला सारतच वाट शोधावी लागते. मध्येच खळाळणारा ओढ्याचा प्रवाह आपली सोबत करतो. एका गूढ, अद्भूत अशा नीरवशांततेचा भेद करत, जलप्रपाताचा घनगंभीर नाद जवळ आल्याचा भास होतो. काही क्षणातच डोंगराच्या एका कपारीवर पूर्ण जलपटलाच्या स्वरूपाच्या प्रपाताचा साक्षात्कार होतो.

हीच ती हेळवाकची रामघळ! समर्थ रामदासांनी चिंतनासाठी ज्या काही रामघळी निवडल्या, त्यापैकी हिचे सौंदर्य व सभोवतालचा परिसर केवळ अवर्णनीय! सुमारे सव्वाशे फूट उंचीच्या या घळीत महादेवाच्या पिंडीशिवाय अन्य काही खूणा आढळत नाहीत. संपूर्णपणे निसर्गनिर्मित अशा घळीसमोरील जलाभिषेकाची संततधार आपले चित्त खिळवून ठेवते. समर्थांनी शिवथरघळीविषयी केलेले वर्णन इथे यथार्थपणे लागू पडते...

*गिरीचे मस्तकी गंगा। तेथूनि चालिली बळें।*
*धबाबा लोटती धारा। धबाबा तोय आदळे॥*

इथून खरे तर परत फिरण्याची इच्छाच होत नाही परंतु जमेल तेवढे दृश्य डोळ्यात व कॅमेरात साठवून परतीच्या वाटेवर, धनगरवाड्यातील सवंगड्याशी गुजगोष्टी करत मुक्कामी यावे लागते कोयनानगर इथे.

पावसाळ्यात तर अवघे कोयनानगर धुक्याची दुलई पांघरून बसलेले असते. शासकीय विश्रामगृहात मुक्कामाची सोय झालीच तर तिथल्या खानसाम्याच्या हातचे गरमागरम जेवण, तसंच भटकंती करताना एस.टी.

स्टँडच्या टपरीवरील गरमा-गरम वडा-उसळ व आलेयुक्त चहा या मोसमात आणखी लज्जत आणतात. कोयना धरणाच्या वरच्या बाजूस विविधरंगी फुलांनी नटलेले उद्यान बघता येते. धरणामागचे शिवसागराचे विस्तीर्ण पात्र, सभोवतालच्या टेकड्यांच्या पायथ्यापर्यंत पसरून सुरेख जलरंगावलीचा आभास निर्माण करते. हे सर्व पाहून पाटण मार्गे कराड कडे जाता येते अन्यथा परत चिपळूणला उतरून रत्नागिरीकडे प्रस्थान ठेवता येते.

वर्षाविहाराचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठी स्वत:चे वाहन, गप्पीस्ट सोबती (गोड गळ्याचा असल्यास दुधात साखर!) आणि छान मूड (आपला आणि अर्थात पावसाचा) असल्या, परशुरामभूमीतील अशा घाटवाटांना आणि निसर्गसान्निध्याला पर्याय नाही. फक्त अशा ठिकाणी विहार करताना, स्वच्छंदाचा अतिरेक न होऊ देता अशा निसर्गनिर्मित अथवा ऐतिहासिक संचितांचे पावित्र्य अबाधित ठेवून, नव्हे तर त्यांना आपल्या पूजनीय तीर्थाइतकंच महत्त्व देऊन निसर्गाचा खरा आस्वाद घेता आला तर तो एक आदर्शच ठरेल. कारण समर्थांच्याच शब्दात सांगायचे झाले तर...

*तीर्थे येकाहून येक। महापवित्र पुण्यदायक।*
*अगाध महिमा शास्त्रकारक। बोलोनि गेले॥*

# अनोळखी वाटेवरचा घेरादात्तेगड





अनु.

**महाराष्ट्रात अनेक प्रसिद्ध ऐतिहासिक गडकिल्ले आहेत. या गडांशी सातवाहनांपासून छत्रपती शिवाजीमहाराजांपर्यंत अनेकांचं नातं आहे. ज्या गडकिल्ल्यांचा इतिहास इतिहासकारांनी मांडला ते किल्ले महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले. मात्र इतिहासामधे महत्त्वाची कामगिरी करूनही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातले अनेक किल्ले प्रसिद्धीपासून वंचित राहिले. त्यापैकी सातारा जिल्ह्यातील सह्याद्रीच्या माथ्यावर तलवारीचा भव्य आकार असलेली विहीर असलेला घेरादात्तेगड.**

पाटणपासून केवळ सहा किमी अंतरावर कोयनेपासून केवळ २५ किमी अंतरावर असलेला घेरादात्तेगड शिवप्रेमी आणि पर्यटकांचे आकर्षण ठरू शकेल. या गडावर तलवारीचा आकार असलेली भव्य विहीर आहे. ती इतिहासकालीन शिल्प कलेची चुणूक दाखवते. किल्ल्याच्या पश्चिम टोकावर अखंड खडकात खोदलेली ही विहीर किल्ल्याच्या दक्षिणेला आहे. अखंड खडकात विहिरीत उतरण्यासाठी ४१ पायऱ्या आहेत. त्यापैकी काही पायऱ्या ढासळलेल्या अवस्थेत आहेत. या पायऱ्या उतरून विहिरीत उतरल्यानंतर विहिरीच्या मध्यभागी पश्चिम बाजूला महादेवाचे मंदिर खोदले आहे. त्याचा आकार सुमारे आठ फूट लांब, सात फूट रुंद सहा फूट उंच आहे. या मंदिरावरूनच या तलवार विहिरीची भव्यता जाणून येते. मंदिरात शिवलिंग आहे. मंदिरापासून खाली काही अंतरावर पाणी आहे. तलवार विहिरीची खोली किती हे सांगता येत नाही. मात्र वरून पाण्यात दगड टाकला की विशिष्ट आवाज येतो. हे ऐकून माहीत झाल्याने गडावर येणारा प्रत्येक माणूस विहिरीत दगड टाकून आवाज ऐकण्याचा प्रयत्न करतो आणि विहीर दगडाने भरून काढण्यास हातभार लावतो. तलवार विहिरीपासून जवळच गडावर प्रवेश केल्याबरोबर अखंड खडकात खोदलेले गणपती मारुतीचे मंदिर आहे. या मंदिरात उतरण्यासाठी २९ पायऱ्या उतराव्या लागतात. या मंदिरावर कोणतेही आच्छादन नाही. चौकोनी आकाराच्या खोदकामात उत्तर भिंतीवर दक्षिणाभिमुख गणपती आणि पूर्व भिंतीवर पश्चिमाभिमुख मारुती अशा मूर्ती आहेत. मारुतीच्या समोरच्या बाजूस दगडात कोरलेली कमान आणि भुयारी मार्ग आहे. मंदिराचे एक वैशिष्ट असं, की सूर्योदय होत असताना सूर्यकिरण गणपतीच्या मूर्तीवर पडतात आणि सायंकाळी सूर्यास्त होत असताना सूर्यकिरण मारुतीच्या मूर्तीवर येतात. अशा रचनेत खोदलेलं हे मंदिर पूर्व इतिहासातील शिल्प कलाकारांची बौद्धिकता जाणवून देतं या व्यतिरिक्त गडावर

आणखी काही इतिहासातील अवशेष आहेत. गडाच्या समोरच्या एक उंच टेकडी आहे. या टेकडीवरून गडाच्या आजू बाजूना पसरलेल्या निसर्गाचे विहंगम दृश्य पर्यटकांना न्याहाळता येतं. या टेकडीचा पूर्वी टेहळणी टेकडी म्हणून उपभोग केला जात होता. इथून कोयनेचा नागमोडी प्रवाह, पाटण शहर, पवनचक्की प्रकल्प, सह्याद्रीच्या अफाट पसरलेल्या रांगा पर्यटकांना आकर्षित

## संपूर्ण दुर्लक्ष

सुंदरगडाकडे महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग आणि पुरातत्त्व विभागाचं पूर्णतः दुर्लक्ष आहे. या गडापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता, पायऱ्या, रेलिंग, प्रवेशद्वार उभारणी तटावर गरजेनुसार रेलिंग, लोखंडी पूल, पॅगोडा आदी सुविधा उपलब्ध होणे गरजेचं आहे.


## कसं जाल

मुंबईहून बंगलोर हायवेने पाटण. तिथून २५ किमीवर किल्ला. पाटणला राहण्यासाठी चांगली हॉटेल्स.

करतात. या गडाचं दुसरं नाव आहे सुंदरगड, आपलं नाव सर्वार्थाने सिद्ध करणारा हा किल्ला पर्यटकांना खुणावतोय.

# भैरवगड

## दाट रानातला सवंगडी...



**एखादा जुना मैतर खूप दिवसांनी अचानक भेटल्यावरचा आनंद जसा शब्दांत वर्णन करता येणार नाही, तसंच काहीसं भैरवगडाचं आहे. भैरवगड नावाचे एकूण चार गड आहेत ; मात्र चांदोली अभयारण्यातला भैरवगड हा आडवाटेवर भटकणाऱ्यांचा खास सवंगडी.**

सह्याद्री व्याघ्रप्रकल्प जाहीर झाल्यापासून भैरवगडाला जाणं थोडं कष्टाचं झालं असलं तरी दुर्गप्रेमींना या गडावर जाण्याची ओढ असतेच असते. कोयनानगर-हेळवाकची-रामघळ-भैरवगड-कंधारडोह-प्रचितगड-श्रृंगारपूर असा भला मोठा ट्रेक करणं शक्य नसलं तरी सातारामार्गे भैरवगडाचा ट्रेक दोन दिवसांत निवांपणे होऊ शकतो.

पाटण तालुक्यात गर्द रानाने वेढलेल्या या वनदुर्गावर भैरोबाचं प्रशस्त राऊळ पंचक्रोशीतल्या नागरिकांनी बांधलं आहे. विशेष म्हणजे, या गडावरून रत्नागिरी जिल्ह्याच्या दुर्गम भागात उतरता येतं. या भैरोबा देवासाठी कोकण आणि देशावरची माणसं गडावर येत असतात. कोयनेतल्या भूकंपांमुळे इथले दुर्गावशेष नष्ट झाले असले तरी इथली नीरव शांतता मनाला एक वेगळाच तजेला देऊन जाते.

गर्द रानाचं कवच असणारा हा भैरवगड देश आणि कोकणाच्या हद्दीवरचा पहारेकरी. अनेकांना वनदुर्ग म्हणून वासोटा उर्फ व्याघ्रगड परिचित आहे; मात्र भैरवगडाचं रान अनुभवणं हासुद्धा तितकाच रोमांचक अनुभव ठरतो.


भैरवाचं स्थान तो भैरवगड अशी नावामागची कहाणी सांगितली जात असली तरी याला 'सारंगगड' असंही एक वेगळं नाव आहे. त्यामागचा इतिहास मात्र आज अज्ञातात हरवलेला. साताऱ्याचा पाटण आणि रत्नागिरीच्या चिपळूण या तालुक्यांच्या सीमेवर गड वसला आहे. पाटणच्या नैऋत्येला ३२ किलोमीटरवर मळा टेकड्यांच्या बाजूला ६.५ किलोमीटर अंतरावर गडाचं स्थान आहे. भैरवगडला जाण्यासाठी प्रथम सातारा गाठावं. साताऱ्याहून उंब्रज, चाफळमार्गे उरुल घाटातून

कराड-चिपळूण मार्गावर आलात की मल्हारपेठ, पाटण अशी गावं लागतात. धक्का इथून डाव्या बाजूला वळलात की मळे व पाथरपुंजची वाट विचारत आपला गर्द रानात प्रवेश होतो. पाथरपुंज हे गडाजवळचं अवघ्या काही उंबरठ्यांचं गाव. कुडाच्या कुंपणात वसलेल्या या गावात निसर्गपुत्रांची विचारपूस करून गडाकडे प्रयाण करावं.

भटकी मंडळी कोयनानगरमार्गे हेळवाकची रामघळ बघून भैरवगडाकडे जातात; मात्र या दोन्ही रस्त्यांवर माहितगार माणूस सोबत असेल तर निर्विघ्नपणे ट्रेक पार पडू शकतो. अन्यथा रानवाटांचा चकवा असा काही चकवतो की भैरवगड हे नाव कुलदैवतांची आठवण करून देतं. त्यामुळे प्रथमच जाणार असाल तर माहितगार व्यक्तीची सोबत हे पथ्य आवर्जून पाळावं. कारण या गर्द रानात माणसं औषधालासुद्धा सापडत नाहीत. या भागाला 'चांदोली अभयारण्याचं कॉरिडॉर' असंही म्हटलं जातं.

विविध प्रकारच्या वृक्षवल्लींची सोबत आणि रानपाखरांच्या कुजनात भैरवगडाची वाट अलगद गडावर आणून सोडते. पाथरपुंजपासून सरळ कच्चा गाडीरस्ता असल्याने चालण्याशिवाय इतर कष्ट पडत नाहीत. नशीब फारच जोरावर असेल तर बिबट्या, अस्वल नाहीतर गवा यांच्यापैकी कोणीतरी दर्शन देतोच देतो. बाकी शेकरू, हरळटोळ, भेकर आणि विविध प्रकारचे पक्षी या ट्रेकचा आनंद द्विगुणित करतात.

भैरवगडावर दुर्गावशेष फार कमी आहेत. भग्न महाद्वार, एक बुरुज आणि पाण्याचे टाके एवढेच अवशेष या गडाचे दुर्गत्व जपून आहेतच मात्र गडाची व परिसराची माहिती देणारा फलक आणि शिवछत्रपतींचा पुतळा तुम्हाला इतिहासात घेऊन जातो. भैरवाचं प्रशस्त देऊळ मुक्कामासाठी योग्य. इथे मुक्काम केल्यास रात्री बोलणारे रान मनसोक्त अनुभवण्याची मजा वेगळीच. भूकंपाचा एखादा धक्का बसलाच तर कोयनेत असल्याची खात्री पटते. फक्त रानाचे नियम काटेकोरपणे पाळण्याचं कर्तव्य इथे करावं लागतं. आडेवाटेवर भटकणाऱ्यांच्या खास आवडीचा भैरवगड मग आणखीच दिलदार दोस्तासारखा जवळचा वाटू लागतो.



# चांदोलीच्या रानात

झपाट्याने होणारं औद्योगिकीकरण आणि ठिकठिकाणी प्रस्तावित असलेले एसईझेड यामुळे महाराष्ट्र सिमेण्टच्या जंगलात तर हरवणार नाही ना, असा शहरी लोकांचा ग्रह होणं स्वाभाविक आहे. विशेषत: जंगलतोडीचा धडाका बघता तर अधिकच. पण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागावर नजर टाकल्यास सुदैवाने हे चित्र दिसत नाही. तसं होऊ न देण्यात महाराष्ट्राच्या विविध भागांत असलेल्या अभयारण्यांचा मोठा वाटा आहे. वीकेण्डसाठी इथे गेलेल्यांना याचा अनुभव आला असेलच आणि नसेलही तर तो घ्यायला हरकत नाही.

सातारा, सांगली, रत्नागिरी आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांच्या मध्यावर असलेले 'चांदोली' अभयारण्य असाच आल्हाददायी अनुभव देतं. सह्याद्रीच्या उत्तरेकडील पर्वतरांगांच्या माथ्यालगतचा जवळपास ३१० चौरस किमीचा परिसर चांदोली अभयारण्याने व्यापला आहे. मोठ्या विस्तारामुळे वन्यजीव आणि निसर्गाची बहुविध रूपं इथे पाहायला मिळतात.

चांदोलीचं अभयारण्य सर्वसामान्यांच्या परिचयाच्या तसंच कधीही न पाहिलेल्या दुर्मिळ अशा असंख्य प्राणी आणि पक्षांनी गजबजलेलं आहे. वाघ, बिबटे, हरीण, खारी, सांबर, रानडुक्कर, अस्वल, हरीण, रानगवे हे प्राणी इथे पाहायला मिळतात. याशिवाय कोकिळा, बोबडा, पानकावळा, तत्तर, घार हे शहरात चकटफू असलेले पक्षीही 'चांदोली'त मोठ्या संख्येने आहेत. त्यातही बिबटे आणि गवा हे इथलं सर्वात मोठं आकर्षण आहे. गेल्या १२ वर्षांपासून इथल्या वन्यजिवांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढच होत आहे.

चांदोलीचं जंगल अंजनी, जांभूळ, पिसा, कोकम, आवळा, उंबर, आंबा, फर, हिरडा, कालाक आणि चिवा जातीचा बांबू अशा विविध प्रकारच्या वृक्षांनी समृद्ध आहे. त्यामुळे प्राणीप्रेमींबरोबरच निसर्गप्रेमींसाठीही चांदोली आकर्षणाचं ठिकाण ठरलं आहे.

चांदोलीच्या अभयारण्यातून खळाळत वाहणारा वारणा नदीचा प्रवाह हा निसर्गाचा आणखी एक चमत्कार. वारणेचा उगम इथूनच होतो आणि तिचा प्रवाह जंगलाला दोन भागांमधे छेदत जातो. त्यामुळे तिथल्या

सौंदर्यात पडणारी भर मनाला भुरळ घालते. चांदोलीचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे इथली ओसाड आणि रखरखीत खडकाळ जमीन. पावसाच्या पाण्यामुळे खडकांची झीज होऊन झालेल्या लहान-मोठ्या घळी आणि इथली थंड हवा फिरस्त्यांना सुखद धक्का देते.






शिवकालीन प्रचितगड आणि भैरवगड हे इथलं आणखी एक आकर्षण. कोकण दर्शन, झोलांबीचा सडा आणि रंदीवचे रान ही स्थळं पर्यटकांचा मूड फ्रेश करतात. प्रचितगडावरील राजवाडासदृश भवानी मंदिर आणि 'कलावंतीण विहीर' मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देते. कंधारडोह, तिथला तनाली धबधबा आणि वसंत सागर जलाशय ही ठिकाणंही बघायलाच हवीत अशी.

**कधी जाल?**

सप्टेंबर ते मार्च या काळात चांदोली अभयारण्याला भेट दिल्यास उत्तम. जून ते सप्टेंबरमधे इथे मुसळधार पाऊस सुरू असतो. त्यामुळे या काळात जाणं टाळावं.

**कसं जाल?**


कराड (४५किमी) आणि इस्लामपूर (५५किमी) ही सर्वात जवळची शहरं आहेत. इथे उतरून चांदोलीला जाता येतं. रेल्वेने जायचं झाल्यास कोल्हापूर स्टेशनवर उतरावं. चांदोलीपासून हे स्टेशन ८० किमीवर आहे. जवळचं विमानतळही कोल्हापूरच आहे.

**निवासाची व्यवस्था :**

पाटबंधारे खात्याचं विश्रांती गृह इथे आहे. तिथे निवासाची सोय होऊ शकते.

# कोल्हापुर - सोलापूर
## कोल्हापुर जिल्हा
### कोल्हापुर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते कोल्हापुर | | | | | 387 | | | | |
| **1** | पन्हाळगड | | किल्ला | | | 23 | NW | | | |
| **2** | ज्योतिबा | | | मंदिर | | 22 | NW | 14 | SE | |
| **3** | कोल्हापूर | | | मंदिर | तलाव | 0 | | | | |
| **4** | कणेरी मठ | | खेड्याचे म्युझियम | | | 11.5 | SE | 11.5 | SE | |
| **5** | दाजीपूर | | अभयारण्य | ट्रेक | मठ | 50 | SW | 46 | SW | |
| **6** | फोंडाघाट | घाट | | | निसर्ग | 93 | SW | 46 | SW | |
| **7** | सामानगड | | किल्ला | | | 79 | SE | 113 | SE | |
| **8** | नेसरी खिंड | खिंड | ऐतिहासीक स्थळ | | | 85 | S | 26 | SW | |
| **9** | चित्री बॅकवॉटर | मंदिर | धबधबा | ट्रेक | निसर्ग | 96 | SW | 26.5 | W | |
| **10** | गंधर्वगड | | किल्ला | | | 110 | S | 36 | SE | |
| **11** | महिपालगड | | किल्ला | | | 112 | SE | 24 | SE | |
| **12** | कलानंदीगड | | किल्ला | | | 126 | S | 21 | SW | |
| **13** | पारगड | | किल्ला | | | 142 | SW | 33 | SW | |






अनु.



# किल्ले पन्हाळा

शिवछत्रपतींच्या जीवनातील प्रमुख घटनांपैकी एक म्हणजे पावनखिंडीचा इतिहास. त्याच्याशी निगडीत दुर्गराज-पुन्हाळगड आणि विशाळगडही सर्वांना माहीत असतील. यापैकी पन्हाळगड आता थंड हवेचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाले आहे.

नुसत्या शिवकालाचा विचार केला तरी हा इतिहास सुमारे ३५० वर्षे मागे नेतो. २ मार्च १६६० रोजीचा गुढीपाडवा. महाराज नुकतेच अफझलखानाचे पारिपत्य करून पन्हाळ्यावर स्थिरावले होते तोच विजापूरहून सिद्दी जौहरचे सैन्य स्वराज्यावर चालून येत असल्याची वार्ता आली. खुल्या मैदानावर लढण्यापेक्षा गनिमी काव्यानेच शत्रुसैन्याचा मुकाबला करावा या हेतूने महाराजांनी पन्हाळगडचीच निवड केली. अखेर सिद्दीने पन्हाळगडाला वेढा घातलाच! सर्व शक्तीनिशी त्यांच्या फौजेने गडावर तोफांचा मारा सुरू केला, पण मावळ्यांच्या चिवट झुंजीपुढे तो कमकुवत ठरू लागला. दिवस सरत होते तसा वेढा अधिकच पक्का होत होता. आता महाराज वाट बघत होते. आषाढातील वरुणराजाच्या कृपेची निदान पाऊस सुरू झाल्यावर तरी वेढा कमी होईल या आशेने. परंतु महाराजांची ही आशा फोल ठरली. सुमारे चार महिने वेढ्यात अडकलेल्या स्वतःची आणि मावळ्यांची सुटका कशी करावी याच्याविचारविनिमयासाठी महाराजांनी बाजीप्रभू देशपांडे, गंगाधरपंत अशा बुजुर्ग व अनुभवी मंडळींचा सल्ला घेतला, आणि पावसाळा सुरू असतानाच १२ जुलै १६६० च्या रात्री निवडक मावळ्यांसोबत पन्हाळगड सोडला. एका अतिशय बिकट वाटेने व ज्या ठिकाणी वेढ्याचे सैन्य थोडे पांगलेले होते अशा संधीचा फायदा घेत महाराज आणि त्यांचे मावळे, वीस कोस दूर असलेल्या

विशालगडाकडे कूच करू लागले. तोपर्यंत सिद्दीच्या फौजेत महाराज निसटल्याची वार्ता लागल्याने पाठलाग सुरू झाल्या नव्हे त्यांनी पालखी गाठलीच. पालखी बंदोबस्तात छावणीत आणली आणि त्यातून उतरला तो महाराजांच्या वेषातील प्रतिशिवाजी शिवा काशीद. अर्थात महाराजांच्या संरक्षणार्थ त्याने आपली कुर्बानी दिली. इकडे महाराजांच्या पालखीने गजापूरचीखिंड गाठली होती. इथे मात्र बाजीप्रभूंनी महाराजांना त्वरीत विशालगडी जाण्याची विनंती केली आणि

---

स्वत: सर्व शक्तीनिशी त्या खिंडीत, सिद्दीच्या सैन्याशी लढत राहिले... अगदी अखेरच्या क्षणापर्यंत. महाराज विशाळगडी पोहोचल्याची खूण पटली तोफाच्या आवाजाने आणि बाजीप्रभूंनी त्या खिंडीत आपल्या देह ठेवला. त्यांच्या रुधिराभिषेकाने ती खिंड पावन झाली.

आजही पन्हाळगडाच्या वास्तूमधून फिरताना या घटनांची स्मृती जागृत झाल्याशिवाय राहत नाही. गडावर प्रवेश करताच समोर उभा ठाकतो भाला रोवलेला शिवा काशिद याचा पूर्णाकृती उभा पुतळा. पन्हाळगडाच्या पंचक्रोशीतील नेवापूर गावचा हा धाडसी वीर शिवचरणी विलीन झाला. तसंच पुढे आल्यावर मुख्य चौकात दिसतो बाजीप्रभू देशपांडे यांचा आवेशपूर्ण स्थितीतील पुतळा. आपण नकळत त्यासमोर

---

नतमस्तक होतो. इथे असलेल्या वास्तुंपैकी आजही वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना दर्शवणारी वास्तू म्हणजे तीन दरवाजा एकाआड एक कमानींच्या प्रवेशद्वाराच्या कमानींच्या रचनेमुळे या दरवाज्याची शोभा अधिकच खुलून दिसते. बालेकिल्ल्यातील अंबरखाना या इमारती गंगा, यमुना व सरस्वती कोठ्या दिसतात. जवळच असलेली अंधारबाव ही विहीर सुमारे तीन मजल्यांची आहे. वास्तुशैलीचा आणखी एक नमुना आपले अस्तित्व कालौघात टिकवून आहे तो म्हणजे सज्जाकोठी. याचा वापर शिवकालात खलबतखाना म्हणून होत असे तसंच इथून गडाच्या पायथ्याकडील प्रदेशावर नजरही ठेवता येत असे. तारारार्णीच्या राजवाड्याचा उपयोग आता सरकारी कार्यालयासाठी होतो. याशिवाय राजदिंडी, पुसाटी बुरुज, पराशर गुहा, कलावंतिणीचा सज्जा, सोमेश्वर तलाक अशी अनेक ठिकाणे पाहता येतात. मराठीतील कवी

मोरोपंत पन्हाळ्याचेच. पन्हाळगडावरील विस्तृत इतिहासाची दखल इथल्या इतिहासप्रेमी मु.गो. गुळवणी यांच्या संग्रहालयातून घेतलेली दिसते.


समुद्रसपाटीपासून सुमारे ३१०० फूट उंच असलेल्या पन्हाळगडावर हवा अतिशय आल्हाददायक असते. इतर वास्तूंचे अवलोकन करताना संध्याबाग तसंच तबकबाग यासारखी उद्यानेही पर्यटकांच्या क्षणभर विश्रांतीसाठी विकसित केलेली आढळतात.

निवासभोजनाच्या सोयींनी युक्त महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने निवास तर आहेतच शिवाय इतर अनेक खाजगी हॉटेल्सही आहेत.

जावे कसे? कोल्हापूर - पुन्हाळ सुमारे २५ किमी नियमित बससेवा. कोल्हापूर हे मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी प्रमुख इतरांशी रेल्वेनेही जोडलेले आहे.



# किल्ले पन्हाळा






अनु.

कोल्हापूर म्हटलं की, महालक्ष्मी किंवा पन्हाळा एवढंच, आपल्याला आठवतं. पण रहायचं कुठे विचाराल, तर कोल्हापुरात असाच आपला ग्रह असतो. पण नितांतसुंदर पन्हाळ्याच्या सान्निध्यातही आपल्याला मुक्काम करता येतो. त्यामुळे कोल्हापूरची ट्रिप करायची आणि पन्हाळ्यात रहायचं, हा कार्यक्रम झकास होऊ शकतो.


अजूनही सहलीच्या



मंत्रमुग्ध करतो. पन्हाळ्यावर सज्जाकोठी, तीन दरवाजे, एक बोटॅनिकल गार्डन, सनसेट पॉईन्ट ही प्रेक्षणीय स्थळं आहेत.

थेट पन्हाळ्यावर जायचं झाल्यास कोल्हापूरला उतरायचं. कोल्हापूरपासून पन्हाळा अवघं २० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे तिथे एसटी बस, टॅक्सी यांची सोय होऊ शकते.

पन्हाळ्यावरून ज्योतिबाचा डोंगर तसंच कोल्हापूर फिरायचं झाल्यास तेही जमू शकतं. मग अर्थातच छत्रपती शाहू महाराज म्युझिअम, रंकाळा तलाव, महालक्ष्मी मंदिर, चंद्रकांत मांढरे यांचं म्युझियम ही सर्वपरिचित





ठिकाणं फिरता येतात. कोल्हापुरी चपला आणि जमल्यास काकवीची खरेदी ही अगदी हवीच. शिवाय जाता-येताना वाटेवर एखाद्या चालू गुऱ्हाळ्यातून ऊसाचा तजेलदार रस पिण्यातली मजा औरच.

ठिकाणांबरोबर येणाऱ्या थिल्लर आकर्षणांपासून कित्येक कोस दूर राहिलेल्या पन्हाळ्यावर सायंकाळच्या वेळी उन्हाची सरती तिरीप अंगावर घेत आणि गुलाबी थंडीच्या वाऱ्यांना हलकेच साद घालत तिथे फेरफटका मारण्यातली मौज काही न्यारीच असते.

पन्हाळ्यावरचा इतिहास इथे देण्याची गरज नाही. पण पन्हाळ्यावरून फिरतानाच शिवरायांनी १६५९ मध्ये आदिलशाहकडून हा गड काबीज केला, तेव्हापासून बाजीप्रभू देशपांड्यांची शर्थीची झुंज आपल्या डोळ्यासमोरून अक्षरश: तरळून जाते. हा इतिहासच अशा थराराने भरलेला. बाजीप्रभू देशपांड्याचा पुतळा आणि त्यातील आवेश आपल्याला अधिकच

कोल्हापुरातले खाद्यपदार्थही अगदी लज्जतदार.

**निवास** : एमटीडीसी हॉलिडे रिसॉर्ट : रूमभाडं ३०० ते ५०० रुपये. दूरध्वनी : ०२३२८-२३५०४८. कोकण रत्न हॉलिडे रिसॉर्ट : रूमभाडे ३०० ते ५०० रु. दरम्यान, दूरध्वनी ०२३२८-२३५०९१, २३५५९१.

**हॉटेल हिल टॉप** : रुमभाडे ६०० ते १००० रुपये, दूरध्वनी ०२३२८-२३५०५४, २३५३५४. व्हॅली व्ह्यू ग्रॅन्ड : रुमभाडं ९०० ते १६०० रुपये. दूरध्वनी : २२६१८२११, २२६१३५५८. महालक्ष्मी रिसॉर्ट : रुमभाडे ३०० ते ७५० रुपये. दूरध्वनी ०२३२८-२३५३३३.



अनु.

# ज्योतिबाच्या नावानं 'चांगभलं'



**मराठी माणसासारखेच त्यांचे देवही रांगडे ! घोड्यावर बसून शिलेदारी करणं ही लढाऊ मराठ्यांची परंपरा. याचं प्रतिबिंब ज्योतिबाच्या रूपातही दिसतं. कोल्हापूरच्या अंबाबाईचं दर्शन घेतल्यावर भाविक ज्योतिबाच्या डोंगरावर हमखास जातात. वाडीचा ज्योतिबा केवळ देवस्थानच नाही तर सुंदर निसर्गरम्य ठिकाणही आहे.**

*ज्योतिबा देवस्थान कोल्हापूरपासून फार दूर नाही. त्यामुळे देवस्थानाच्या परिसरात तशी मोठी हॉटेल्स नाहीत. मात्र मंदिराच्या गुरवाच्या घरी राहण्याची व्यवस्था होऊ शकते. कोल्हापूर मध्यवर्ती बसस्थानक आणि रंकाळा स्टॉप इथून दर तासाला ज्योतिबाला जाण्यासाठी एसटीची सोय आहे.*



अनु.

गुलालाची उधळण आणि ज्योतिबाच्या नावाने चांगभलं... म्हणत भाविकांचा लोंढा ज्योतिबाच्या डोंगरावर चालत राहतो. गुलाल, दवणा, चिरमुरे-बत्तासे यांच्या सजलेल्या दुकानांचा रस्ता थेट मंदिराकडे जातो. एरवी अनेक देवांच्या दर्शनासाठी पायऱ्या चढत जाव्या लागतात. इथे मात्र तसं नाही. पायऱ्या उतराव्या लागतात.

लहानपणी अनेकदा या पायऱ्या मोजत उतरताना मजा यायची. उधळलेल्या गुलालाची चादर सगळ्या पायऱ्यांवर पसरलेली असायची. दर्शनाला अनवाणी पायाने जाताना पावलं गुलाबी होऊन जायची. आणि 'चांगभलं' म्हणजे काय म्हणत देवळात उतरण्याची मजा वाटायची.

कोल्हापूर शहरापासून साधारण वीस-पंचवीस किलोमीटर अंतरावर ज्योतिबाचं देवस्थान आहे. पूर्वी अगदी सकाळी एक आणि संध्याकाळी एक अशा दोनच बस, या डोंगरावरच्या देवस्थानाला जायच्या. उजाड वाटणाऱ्या डोंगरावर जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घायपाताच्या रांगा दिसायच्या. मुरुमी मातीच्या डोंगरावर ज्योतिबाच्या मंदिराची पाचही शिखरं दिसायची. आजच्या इतकी घरांच्या गर्दीत ती हरवली नव्हती.

पायऱ्या आणि भिंती दोन्हीही काळ्याशार दगडांच्या. मंदिराचा संपूर्ण परिसर दगडी आहे. शिखरांचा पांढरा आणि पिवळा रंग दुरूनही डोळ्यांना थंडावा देतो. मंदिराचा परिसर विस्तीर्ण असून दगडी चारही बाजूंनी दगडी कठडा आहे. तोही चांगलाच रूंद. मंदिराचा गाभाराही चौकोनी आहे. मंदिराच्या भिंतीवर केलेलं कोरीव काम ठसठशीत असल्याने प्रदक्षिणा घालताना सहज पाहता येतं. मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या जिथे संपतात, तिथे दोन दीपमाळा आहेत. त्याच्या कठड्यावरचं हत्तींचं कोरीवकाम देखणं आहे. मंदिराच्या आवारातल्या दोन गोष्टी इथे येणाऱ्या बाळगोपाळांचं मन वेधून घेतात. एक नंदी आणि दुसरा हत्ती.

प्रत्येक मंदिराच्या प्रसादाच्या थाळीची काही वैशिष्ट्यं असतात. बालाजीचे लाडू, जेजूरीचं सुकं खोबरं हे प्रसाद असतात. इथे पूजेच्या थाळेत असतो तो दवणा. दवणा नावाची सुकलेली वनस्पती सुगंधी असते. सुकलेल्या या दवण्याच्या फांद्या अनेकजण घरातल्या पूजाघरात किंवा अगदी कपड्यांच्या कपाटातही ठेवतात. देवस्थानाची सुगंधी आठवण ठेवणारं, असं ठिकाण विरळाचं म्हणायला हवं.

डोंगरावर उन्हाळ्याचे दोन-तीन महिने सोडले तर एरव्ही छान गारवा असतो. डोंगरावर उभं राहून कोल्हापूर शहराचा नजारा पाहता येतो. शहराच्या परिसरातले मोठे प्रकल्पांची छान झलक इथून मिळते.

संधीप्रकाशाचे खेळ पाहता येतात. दूरवरची शेतं आणि गावतलं घर पाहता येतं. अर्थात संध्याकाळी किंवा सकाळची वेळ सगळ्यात उत्तम. त्यामुळे नुसतं देवदर्शनच नाही तर एखाद्या हिल स्टेशनला भेट दिल्याचाही आनंद मिळेल.

आता मात्र ज्योतिबाच्या डोंगराचं रूपचं बदललं आहे. पायथ्यापासून ते थेट वरपर्यंत वृक्षराजी जोमाने वाढली आहे. त्यामुळे मंदिराकडे नेणारा प्रवास सुखद कोणत्याही मोसमात सुखदच होतो. वाडी रत्नागिरी ग्रामपंचायतीत असलेलं ठिकाण आधी केवळ चैत्रात भरणाऱ्या यात्रेच्या वेळी डोंगर 'चांगभलं'च्या गजरात हे गाव दुमदुमत राहायचं. उधळलेल्या गुलालाने आभाळही गुलाबी होत राहतं.

आजूबाजूचा भागही बऱ्यापैकी विकसित होतोय. रस्ता तर थेट मंदिराच्या दारापाशी पोहोचलाय. त्यामुळे पायऱ्या उतरण्याचाही त्रास आता वाचलाय. राहण्यासाठी एक मोठ गेस्टहाऊसही उभं राहतंय. अर्थात ते काम रखडलंय, ही वस्तुस्थिती आहे. पण कोल्हापूरपासून हे ठिकाण फार दूर असल्याने तिथे राहायलाच असंही नाही. गाडी घेऊन गेल्यास पंधरा रुपयांची पावती फाडून आपली गाडी कुठेतरी लावावी लागते. त्यामुळे थोडा मनस्ताप होतो. पण नियमित इथे येणाऱ्यांना त्यावरचा उपाय कदाचित माहिती होऊन जातो.

अनेक मंदिरात तेल, नारळ वाढवणं यामुळे परिसर अस्वच्छ असतो. इथे मात्र नारळ वाढवण्याची जागा वेगळी असल्याने परिसर स्वच्छ राहतो. त्यामुळे देवदर्शनाला आल्यावर घटकाभर विश्रांती घेण्याचा मोह टाळता येत नाही. केवळ देवदर्शनच नाही तर मनही शांत करणाऱ्या या स्थानाची आठवण प्रसादाच्या ताटातल्या सुगंधी दवण्याच्या रुपाने घरी गेल्यावरही दरवळत राहते.


[redacted]

# कोल्हापूर एक्स्प्रेस



मराठी चित्रपटसृष्टीची पंढरी, अंबाबाईचं पवित्र स्थान, मराठी बाणा जपणारं ठिकाण अशा विविध प्रकारे कोल्हापूरची ओळख सांगता येते. कोल्हापूर आपल्याला नवीन नाही. म्हणूनच की काय, एका टिपिकल पद्धतीने इथे जाण्याचा बेत आखला जातो. वास्तविक या शहरात अनुभवण्यासारखं बरंच काही आहे. फ्लाइट जर्नीमुळे आता ते वीकेण्ड डेस्टिनेशनही झालं आहे. कोल्हापूरमध्ये काय बघायचं आणि नेहमीपेक्षा वेगळा अनुभव कसा घ्यायचा हे सांगणारे लेख...







महाबळेश्वर, माथेरान, पाचगणी अशा नेहमीच्याच ठिकाणी जाऊन कंटाळला असाल, तर वेगळा पर्याय म्हणून कोल्हापूरचा विचार करायला हरकत नाही. तसंही या वर्षी खूप सुट्ट्या आणि त्याही जोडून आल्यामुळे चांगलंच भटकता येणार आहे. त्यामुळे एखादा वीकेण्ड कोल्हापूरमध्ये घालवावा, इतकं छान ते नक्कीच आहे.

कोल्हापूरला गेल्यावर आधी महालक्ष्मीचं दर्शन घ्यावं. महालक्ष्मी अनेकांचं कुलदैवत असेल. कितीही एन्जॉय करण्याच्या मूडमध्ये असू किंवा देवधर्म न मानणारे असू, अंबाबाईच्या देवळात गेल्याशिवाय बरं वाटणार नाही. देवळाचा परिसर अगदी गजबजलेला आहे. खरेदीची हौस असेल, तर देवळाला लागून असलेल्या दुकानांत बांगड्या, टिपिकल कोल्हापुरी साज, खण, साड्या, रांगोळी अशा अनेक वस्तू घेण्यात वेळ कसा जातो, ते कळत नाही. देवळाजवळ कंदी पेढे घ्यायलाही विसरायचं नाही. असे चविष्ट पेढे मुंबईत शोधून सापडणार नाहीत.

कोल्हापूर म्हटलं, की शाहू महाराज, राजाराम महाराज ही नावं आपोआप तोंडी येतात. या दोन्ही व्यक्तींबद्दल आपण इतिहासात वाचलं असेल. कोल्हापुरात फिरताना या इतिहासाच्या पाऊलखुणा पावलोपावली दिसतात. मग ते छत्रपती शाहू म्युझिअम असो, टाऊन हॉल असो वा शालिनी पॅलेस. इतिहासकालीन घटना आठवतात. त्या प्रत्यक्ष पाहत असण्याचा प्रत्यय यावा, अशा पद्धतीने वास्तू जतन केल्या आहेत. गेल्या काही वर्षांत कोल्हापूरचं रूप बदलतंय. मोठमोठी हॉटेल्स, बिल्डिंग, हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था इथे असल्या, तरी शहरातला गोडवा अजूनही टिकून आहे.

संध्याकाळी पाय रंकाळा तलावाकडे वळतात. तिथलं गार्डन, तलाव यांचा आनंद घेतलाच पाहिजे. विशेषतः मुलं सोबत असतील, तर रंकाळा मस्ट! टिपिकल पर्यटनस्थळासारखं कोल्हापूरचं रूप नसेल, तरी या शहराला स्वतःचा चेहरामोहरा आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि अंबाबाईसारख्या अन्य काही मंदिरांमुळे प्रसन्नता, शांतपणा





जाणवतो. शिवाजी विद्यापीठाचा परिसरही खूप देखणा आहे.

थोडं लांब जायचं असेल, तर पन्हाळा किल्ला, ज्योतिबाचा डोंगर, नरसोबाची वाडी ही ठिकाणंही बघण्यासारखी आहेत. दाजीपूर अभयारण्य, आंबोली असं आणखी दूरही जाता येईल. घाटावरून कोकणात उतरणाऱ्या एका बाजूवर आंबोली वसलं आहे. वर्षभर पर्यटकांना खुणावणारं हे हिल स्टेशन दिवसभराची दगदग शांत करेल.

पन्हाळा तर बाजीप्रभू देशपांडे, संभाजीराजे यांच्या इतिहासाने समृद्ध आहे. किल्ल्यावर पाहण्यासारखंही खूप आहे.



अनु.

महालक्ष्मी एक्स्प्रेसचा रात्रभर प्रवास करायचा, सकाळी कोल्हापूरला पोहोचायचं आणि आंघोळ करून सर्वप्रथम अंबाबाईच्या दर्शनाला जायचं, दुपारच्या जेवणात पांढरा रस्सा/तांबडा रस्सा टेस्ट करायचा आणि रात्रीची गाडी किंवा बस पकडून थेट मुंबई गाठायची... कोल्हापूरला भेट देण्याचा हा मुंबईकरांचा हमखास यशस्वी फॉर्म्युला. असं घाईघाईत, गडबडीत कितीसं कोल्हापूर बघून होतंय? पण वेळेअभावी काही गोष्टी जमत नाहीत, हेच खरं.

कोल्हापूरचा प्रवास हाच मुळात जरा लांबलचक. दिवसा जायचं असेल, तर कोयना एक्स्प्रेस आहे, पण दिवसभर प्रवास करायचा आणि थकूनभागून कोल्हापूरला जायचं, यात काय मतलब? रात्रभराचा प्रवास ज्यांना झेपत नाही, ते बसने जायलाही तयार नसतात. त्यातल्या त्यात महालक्ष्मी एक्स्प्रेस बरी, म्हणून की काय, ही गाडी नेहमीच हाऊसफुल्ल असते.

यावर एक तोडगा म्हणजे फ्लाइटने जाणं. एअर डेक्कनने अवघ्या एका तासात तुम्ही मुंबई-कोल्हापूर प्रवास करू शकता. क्वालिटी आणि फ्रिक्वेन्सी मात्र कधीही अडचणीत टाकू शकते. त्यामुळे बिझनेस मीटिंगला (वेळेत) पोहोचणं, कनेक्टेड फ्लाइट वगैरे प्लान ठरवताना जरा जपून. एअर डेक्कनचा एक फायदा म्हणजे, दहा तासांचा प्रवास एका तासावर येतो आणि कोल्हापूरमध्ये अधिक वेळ घालवण्याची संधी मिळू शकते. (तिकिटाची किंमत विचारू नका. फ्लाइट भरत जातं, तशी कधीकधी किंमतही वाढत जाते...)

हॉटेल्सची इथे जराही कमतरता नाही. एकट्यांसाठी, कुटुंबासाठी आरामदायी वास्तव्य कुठेही करता येईल. स्टार ग्रेडेड हॉटेल शोधत असाल, तर रुक्मिणी नगरवरचं 'व्हिक्टर पॅलेस' ट्राय करा. कोल्हापूरच काय, एकूणच त्या भागातलं हे एकमेव थ्री स्टार हॉटेल. टॉप फ्लोअरवर रूम घ्या आणि बाल्कनीतून संपूर्ण कोल्हापूर नजरेत सामावण्याचा प्रयत्न करा...

कोल्हापूर म्हणजे खवय्यांची यथेच्छ चंगळ. व्हेज आणि नॉनव्हेजची कोल्हापुरी व्हरायटी केवळ अफलातून! मिसळपासून मटण-भाकरीपर्यंत प्रत्येक पदार्थ अविस्मरणीय. मटण-भाकरी इथल्या जवळपास सगळ्याच हॉटेल्समध्ये दिसते. पांढरा रस्सा आणि तांबडा रस्सा मुंबईकरांसाठी तसा नवखा. त्यामुळे तो चपाती, भाकरी किंवा भाताबरोबर खायचा असतो, असा समज असणारे अजूनही आहेत. पण जेवता जेवता तांबडा किंवा पांढरा रस्सा गरम गरम पिण्यातच खरी मजा असते.

कोल्हापूरच्या हॉटेल्सना मटण अधिक प्रिय असलं, तरी चिकनचंही वावडं नाही. फरक इतकाच, की इथल्या हॉटेल्सच्या मेन्यू लिस्टवर कोकणसारखा 'कोंबडी-वडा' मिळत नाही. कोल्हापूरात 'वडा-कोंबडा'च असतो!! ताराबाई पार्कवरचं 'पंचतारा' हॉटेल यासाठी प्रसिद्ध आहे. हॉटेलचा परिसर बऱ्यापैकी हॅपनिंग आहे. मुंबईत फास्ट फूड सेण्टरच्या बाहेर गप्पा मारत जसे सगळे उभे राहतील, तसा भास इथेही होतो.

प्युअर व्हेजवाल्यांसाठी स्टेशन रोडवरचं 'राजपुरुष' बेस्ट! थाळी म्हटलं, की ती गुजरातीच असली पाहिजे, अशी मुंबैय्या समजूत इथे दूर होते. इथे फक्त मराठी थाळी मिळते. कांदाभजीपासून मसालेभातापर्यंत आणि बटाट्याच्या भाजीपासून पुरणपोळीपर्यंत सगळं काही अगदी घरच्यासारखं.

स्वादिष्ट कोल्हापुरी जेवणानंतर 'सोळंकी'चं आइस्क्रीम खाल्लंच पाहिजे. कोल्हापूरच्या नाक्यानाक्यावर 'सोळंकी' आइस्क्रीमच्या पाट्या दिसतील.



यांच्याकडे मिल्कशेक, ज्यूस आणि आइस्क्रीम खाल्ल्यानंतर शहरी थाटाच्या 'नॅचरल' वगैरे गोष्टी लक्षातही राहणार नाहीत.

'सोळंकी'व्यतिरिक्त कोल्हापुरात 'पाटील्स कूल हाऊस' आहे. जिथे अप्रतिम स्पेशल कॉकटेल आइस्क्रीम मिळतं. फालुदा स्टाइल ग्लासमध्ये मिक्स फ्रूट्स,

ड्रायफ्रुट्स आणि मिक्स फ्लेवर आइस्क्रीम स्कूप्स असं टेस्टी कॉम्बिनेशन अन्यत्र मिळणं जरा कठीणच. मुंबईची चौपाटी विशेषत: ओळखली जाते, ती भेळेमुळे. भय्याकडे जे चार पदार्थ गोळा करून दिले जातात, त्याला जर भेळ म्हणायचं असेल, तर रंकाळा तलावाजवळच्या स्टॉल्सवर मिळणाऱ्या भेळेवर अन्याय होईल. रंकाळ्याची चटपटीत भेळ एकदा खाल्लीत, तर तुम्ही मुंबईच्या भय्याकडे पुन्हा कधीही फिरकणार नाही!!

कोल्हापूरहून येताना भडंग आणलीच पाहिजे. पण शहरात मिळणारी भडंग ओरिजिनल असेलच, असं नाही. त्यामुळे थोडा वेळ काढून जयसिंगपूरला जा. हातकणंगलेचा फाटा एकीकडे सोडून सरळ पुढे गेलं, की अर्ध्या तासावर जयसिंगपूर लागतं. इथे घराघरात, फॅक्टरीत भडंग तयार केली जाते. ही खरी प्युअर भडंग. त्याची चव घेतलीत, की लगेचच फरक कळून येईल. नुसती खायची किंवा बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर टाकून वर लिंबू पिळून एकेक घास एन्जॉय करायचा...

इतकं केलं, तरी कोल्हापूरचा केवळ पाच टक्के आनंद घेतल्यासारखं आहे. त्यामुळे पुढच्या वेळी तिथे गेल्यावर घाई करू नका. सुट्टीचा पुरेपुर आनंद घ्यायचा असेल, तर कोल्हापूरच्या स्थानिक रंगात रंगून जायलाच हवं.

# Destination Kolhapur....





जिल्ह्यातील जवळपास दोन तालुके वगळल्यास दहा तालुक्यांमध्ये डोंगररांगा आहेत. या डोंगररांगांमधून कोसळणारे धबधबे, बांधलेली धरणे, छोटे तलाव, अभयारण्य, रोमांचक इतिहास असलेले किल्ले, त्या किल्ल्यांवर धुके व पावसाचा आनंद लुटण्यास मिळणारी संधी, ट्रेकिंगसाठीचे मार्ग, नागमोडी वळणांचे घाट व त्या रस्त्यांवर अंगावर झेलायला मिळणारे धबधबे अशी एक नव्हे अनेक व बहुविध अशा पावसाळी पर्यटनांची ठिकाणे जिल्ह्यात प्रतिक्षा करत आहेत.

## आंबा-विशाळगड

विशाळगड परिसर म्हणजे निसर्गाने मुक्त हातांनी केलेली सौंदर्याची उधळण होय. हिरवीगर्द झाडी, उंच डोंगरकडे, खोल खोल दऱ्या, त्यातच भर घालणारे जलाशय, धबधबे, निर्झर, मुक्त वनसंपदा विहंगम दर्शन यामुळे 'आंबा' हे ठिकाण 'मिनी महाबळेश्वर' म्हणून ओळखले जाते. आंबा-विशागडमधील वीस किलोमीटरचा घाट म्हणजे सह्याद्रीच्या रांगड्या सौंदर्याची ठेव आहे. विसावा पॉईंट, कोकण दर्शन, विशाळगड दर्शन, घोडखिंड, आंबा घाट, गायमुख, सनसेट पॉईंट, आंबा घाट, गायमुख, सनसेट पॉईंट, पर्यटन मार्गदर्शन केंद्र आदी ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करते. खरब्याच्या गावदारी धबधबा, हुंबवलीचा गंगोबा धबधबा, कोकणचा सडा, पंचक्रोशीतील श्री आदिष्टीदेवी, भैरी देवी, मारुती मंदिर, श्री गणेश मंदिर, आंबेश्वर मंदिर ही दैवत वनराईने हा घाट नटला आहे.

## राऊतवाडी, बर्की धबधबे

राधानगरी धरणाजवळील राऊतवाडी धबधबा, खिंडी व्हरवडे घाटातील धबधबे नयनरम्य आहेत. बर्कीचा धबधबाही प्रसिद्ध आहे. आंबोली, करुळ घाटातील रस्त्यावरील धबधबे अवर्णनीय आनंद देतात.



अनु.

## आंबा-विशाळगड

विशाळगड परिसर म्हणजे निसर्गाने मुक्त हातांनी केलेली सौंदर्याची उधळण होय. हिरवीगर्द झाडी, उंच डोंगरकडे, खोल खोल दऱ्या, त्यातच भर घालणारे जलाशय, धबधबे, निर्झर, मुक्त वनसंपदा विहंगम दर्शन यामुळे 'आंबा' हे ठिकाण 'मिनी महाबळेश्वर' म्हणून ओळखले जाते. आंबा-विशागडमधील वीस किलोमीटरचा घाट म्हणजे सह्याद्रीच्या रांगड्या सौंदर्याची ठेव आहे. विसावा पॉईंट, कोकण दर्शन, विशाळगड दर्शन, घोडखिंड, आंबा घाट, गायमुख, सनसेट पॉईंट, आंबा घाट, गायमुख, सनसेट पॉईंट, पर्यटन मार्गदर्शन केंद्र आदी ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करते. खरब्याच्या गावदारी धबधबा, हुंबवलीचा गंगोबा धबधबा, कोकणचा सडा, पंचक्रोशीतील श्री आदिष्टीदेवी, भैरी देवी, मारुती मंदिर, श्री गणेश मंदिर, आंबेश्वर मंदिर ही दैवत वनराईने हा घाट नटला आहे.


## पाटगाव, भुदरगड किल्ला

पाटगाव हे मातीचे धरण व याजवळच असलेला भुदरगड किल्ला, भटकंतीसाठी जंगल, जोरदार पाऊस येथेही मन आल्हाददायक करते.



## खिद्रापूर

शिरोळ तालुक्यातील कृष्णा नदीच्या काठावरील खिद्रापूरचे मंदिर अद्वितीय प्राचीन कलात्मकतेचा उत्कृष्ट नमूना आहे.



## गगनबावडा

गगनबावडा तालुक्याची ओळख म्हणजे तेथील पाऊस. करुळ घाटातून वर येणारे ढग व सोबतीला धो धो या शब्दालाही लाजवणारा पाऊस अशा पावसाळी वातावरणासाठी आसुसलेल्यांसाठी सुवर्णसंधीच आहे. गगनगिरी गडावर जाऊन कोकणाचे होणारे विहंगम दृश्य सर्वांना परत परत गगनबावड्याला यायला लावते. तसेच घाटातील नागमोडी वळणे व त्या रस्त्यांवर पडणारे धबधबे पावसाळ्याचा पूरेपूर आनंद देतात.

## दाजीपूर, राधानगरी

शाहूकालीन राधानगरी धरण, त्यावरील स्वयंचलित दरवाजे या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पसरलेले दाजीपूर अभयारण्य, त्यातील गवे व इतर वन्यप्राण्यांचा वावर यामुळे येथे पावसासोबत रोमांचकताही अनुभवता येते. पावसाळ्यात पर्यटकांची गर्दी असते. पावसाचे जोरदार रुप अनुभवता येते. या परिसरातील जंगल वेगवेगळे आहे.





अनु.

# महालक्ष्मी मंदिर

हेमाडपंथी शैलीमध्ये बांधलेले आणि पाच कळसांचा देखणा साज असलेले करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर म्हणजे वास्तूकलेचा अप्रतिम नमुना आहे. नवरात्रौत्सवात भाविकांच्या गर्दीने फुलणारे आणि वर्षातून सहा दिवस थेट सूर्यास्ताच्या किरणाने उजळणारे हे मंदिर म्हणजे दक्षिणकाशी कोल्हापूरला पूर्ण शक्तीपीठाचा दर्जा देणारे मंदिर. इथे येणारा पर्यटक भाविक आई अंबाबाईच्या दर्शनाने तृप्त होतो.



## आजरा, रामतीर्थ परिसर

आजरा तालुक्याजवळील आंबोली हे ठिकाण सर्वांच्या परिचित आहे. येथील जंगल, मोठ्या डोंगररांगा व रामतीर्थचा धबधबा प्रसिद्ध आहे.

## बाहुबली, रामलिंग डोंगर

हातकणंगलेजवळील बाहुबलीचे तीर्थक्षेत्र विशेष आहे. हा परिसर हिरवाईने नटलेला असतो. रामलिंग डोंगरावरुनही शांतता अनुभवता येते.

## राऊतवाडी, बर्की धबधबे

राधानगरी धरणाजवळील राऊतवाडी धबधबा, खिंडी व्हरवडे घाटातील धबधबे नयनरम्य आहेत. बर्कीचा धबधबाही प्रसिद्ध आहे. आंबोली, करुळ घाटातील रस्त्यावरील धबधबे अवर्णनीय आनंद देतात.

## पन्हाळा किल्ला

थंड हवेचे ठिकांण म्हणून परिचित असलेल्या पन्हाळ्याचे पावसातील रुप विलोभनीयच असते. दिवसभर धुक्याने लपेटून गेलेला परिसर, अधूनमधून झोडपून काढणारा पाऊस अशा वातावरणात पन्हाळ्याच्या सिद्दी जोहरच्या वेढ्यातून निसटून विशाळगडाकडे रवाना झालेल्या शिवाजी महाराजांच्या रोमांचक इतिहासाची आठवण म्हणजे फुल टू कॉम्बिनेशन आहे.

## जोतिबा

महाराष्ट्रातील बहुसंख्य नागरिकांचे जोतिबा हे कुलदैवत आहे. वर्षभरात केंव्हा ना केंव्हा दर्शनासाठी येत असतात. पावसात या जोतिबा डोंगराचे रुप वेगळे असते. सतत धुक्यात हरवलेला जोतिबा व पावसाची भुरभुर धार्मिक व पावसाळी अशा दोन्ही पर्यटनाचा आनंद देते.

# हे गाव लई न्यारं!

शंभर वर्षांपूर्वीचं महाराष्ट्रातलं खेडं काही निराळंच होतं. त्याची अर्थव्यवस्था, बलुतेदार-अलुतेदार, हेवा वाटावा असं तेव्हाचं खेड्यातलं आटोपशीर आणि सुखी आयुष्य, रुढी परंपरा, पाहुण्यांचं आदरातिथ्य, थोरामोठ्यांचा आदर, पारंपरिक खेळ, सण सगळंच आता फक्त पुस्तकांत आणि जुन्या चित्रपटांत उरलय. त्या काळच्या जीवनशैलीच्या केवळ कल्पना करण्यापेक्षा ते पुन्हा बघायला, अनुभवायला मिळालं तर? हाच ध्यास घेऊन कोल्हापूरजवळच्या एका खेड्यात कणेरीच्या सिद्धकला मठानं शतकापूर्वीचं हे वैभव पुन्हा जिवंत करायचा प्रयत्न केलाय. सिद्धगिरी म्युझियमच्या रूपानं.

स्वातंत्र्यपूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. प्रत्येक जण आपले काम निष्ठेनं करी. पायातला जोडा, शरीराला कपडा, पोटाला भाकरीचा तुकडा आणि डोक्यावरचा आसरा - परस्पर स्नेहार्द सहकार्यातून गावातच होत असत. ग्रामीण जीवन म्हटलं की तेव्हाची समृद्ध शेती, त्यावरची माया, शेतात पिकलेलं सकस धान्य आणि फळं, दारी गुरंढोरं, दुधातुपाची रेलचेल, खमंग भाजीभाकरी याचे विचार मनात येतात. याच ग्रामस्वराज्याचं स्वप्न गांधीजींनी बघितलं होतं. काळाच्या ओघात आपण ही संस्कृती विसरलो. निर्मळ, निरामय अशा या भारतीय संस्कृतीची ओळख नव्या पिढीला व्हावी, निसर्गाच्या सान्निध्यात स्वतः कष्टानं पिकवलेल्या अन्नाची, शुद्ध पाण्याची गोडी चाखणाऱ्या सहज सुंदर ग्रामीण जीवनाबाबत त्यांना जिव्हाळा वाटावा म्हणून हा प्रकल्प साकारतोय. त्याबरोबरच खेड्यापाड्यातील कलाकारांना उभारी देण्याचा प्रयत्न त्यात आहेच.

## या खेड्यात आहे काय काय...

शहरी कृत्रिमपणातून नाहीसं होत चाललेलं सगळंच या खेड्यात आहे. २५ एकराच्या या गावात धर्माचरणाची शिकवण देणारे ब्राह्मण आहेत. पंचकर्म आदी उपचार करणारे वैद्य आहेत. सालंकृत करणारे सोनार आहेत. मातापित्यांची सेवा करणारा मुलगा आणि सून, घाण्यावर तेल काढणारा तेली, कापसापासून कपडा विणणारा कोष्टी, घरोघरी जाऊन स्ट्रेस रिलीफ देणारा पिंगळा जोशी, पाटलाचा वाडा, चांबडे कमावणारे मांग, ढोर, पत्रावळी विणणारे गुरव, बांबूच्या वस्तू करणारे बुरूड, गावात संदेश देणारे तराळा, परिट, शौर्यिक, कासार, घोंगडी विणणारे सणगर, भांडी तयार करणारे तांबट, फुलमाळी, वनमाळी, धनगर, सनगर, पिंजारी अशा १२ बलुतेदार आणि अलूतेदारांची घरं या गावात आहेत. प्रत्येकाच्या घराची ठेवण वेगळी. त्यांचे कपडे वेगळे, समाजातला मानसन्मान वेगळा. ही जीवनशैली अत्यंत बारकाईनं शिल्पांतून साकारलीय. शरीर कमावण्यासाठीचे कुस्तीचे आखाडे, गावाच्या वेशीबाहेरची धर्मशाळा, सासरी जाणाऱ्या नववधूला सोडण्याचा रिवाज, बाळबाळंतिणीची काळजी घेण्यासाठीची खास व्यवस्था, महादेवाच्या मंदिरात भरणारी शाळा, मंदिरेही आहेत.





अनु.

बिटा, रेती आणि सिमेंटच्या प्रतिकृतीतून हे गाव जिवंत होतं. रंगसंगती आणि लाईट इफेक्ट्सचाही सुंदर वापर केलाय. खुल्या आभाळाखालचं हे म्युझियम बघताना मन थक्क होतं. टी. आर. सोलबकनर यांच्या मार्गदर्शनाखाली हुबळीच्या 'उत्सव आर्ट्स'चे १०० कलाकार गेली चार महिने या प्रकल्पावर तहानभूक विसरून राबत आहेत. जामखंडी येथील इतिहास अभ्यासक डॉ. संगमेश बिरादर यांचेही मार्गदर्शन त्यांना आहे.

प्रकल्पाचा २५ पैकी सात एकरावरचा पहिला टप्पा पूर्ण झालाय. नुकतंच पर्यटनमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन झालं. पुढील टप्प्यात सिंधू नदीच्या खोऱ्यात फुललेल्या मानवी संस्कृतीपासून आजवरच्या वाटचालीत अनेक शास्त्रज्ञांनी भारताचं नाव रोशन केलंय. गावाभोवती उभारलेल्या ७०० फुटांच्या गुहेत खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट, गणितज्ज्ञ भास्कराचार्य, अणुशास्त्रज्ञ कणाद महर्षि, वैद्य वाग्भट्ट, पातंजली, सुश्रुत, चरक, वाल्मिकी आणि व्यास ऋषी, शूर योद्धे, तसेच संतांच्या प्रतिकृती उभारल्या जाणार आहेत. त्यानंतर फेस्टिव्हल गॅलरी उभी राहणार आहे. झाड, माकड, विटीदांडू, लगोरी, सूरपारंब्या, आट्यापाट्या अशा पारंपरिक खेळांची माहिती देणारा एक स्वतंत्र विभाग या म्युझियममध्ये असेल. गारूडी, मदारी, कडकलक्ष्मी, नंदीबैल, डोंबारी आदी लोकपरंपरा सांगणारी एक वेगळी गॅलरी असेल. म्युझियमसाठी तिकिट नाममात्र असेल. त्या पैशातून सुसज्ज हॉस्पिटल उभारले जाणार आहे.

या गावासाठी कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरापासून पालिकेच्या बस सुटतात. तिथून ते फक्त १० किमी आहे. प्रवेश तिकिट २५ रुपये आहे. ते मठाच्या गेटवरच घ्यावं लागतं.

कोल्हापूर शहरापासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावरील कणेरी येथे श्री क्षेत्र सिद्धगिरी मठ हे महादेवाचे प्राचीन देवस्थान आहे. जनमानसांचे प्रबोधन करणे, त्यांना धर्माचरणास प्रवृत्त करणे आणि विविध सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणे, हे या मठाचे कार्य. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याची शिकवण देणाऱ्या या मठाने आजवर महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोव्याचे लाखो भाविक जोडले आहेत. एमबीएची पदवी घेतल्यानंतरही समाजसेवेला वाहून घेतलेले मठाचे मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामींच्या कल्पनेतून सिद्धगिरी म्युझियमचा प्रकल्प आकार घेत आहे.





अनु.

# ऐतिहासिक खेड्याचा पुनर्जन्म



**उज्ज्वल** परंपरांनी नटलेल्या महाराष्ट्रातील एका महाराष्ट्रातलं खेडं केव्हाच इतिहास जमा झालं आहे. इथलं ग्रामजीवन, लोकांचे आचार-विचार, तिथल्या रुढी परंपरा, समृद्ध शेतीच्या पद्धती, पाहुण्यांचे आदरातिथ्य, थोरामोठ्यांचा आदर, खेळ, सण साजरे करण्याच्या पद्धती सारं लोप पावलं असलं तरी या ऐतिहासिक खेड्याला कोल्हापुरच्या कणेरी सिद्धकला मठाने पुनर्जन्म दिला आहे... एका भव्य म्युझियमच्या रूपाने. डोळ्यांची पारणे फेडणारे आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान जागवणारं हे म्युझियम कोल्हापूर शहरापासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावरील आहे. कधीही खेड्याचा चेहरा न बघितलेल्या बच्चेकंपनीला २५ एकर जागेवर थाटलेले हे म्युझियम दाखवणं ही एक पर्वणीच आहे.

ब्राह्मण, वैद्य, सोनार, वृद्ध मातापित्यांची सेवा करणारा मुलगा आणि सून, घाण्यावर तेल काढणारा तेली, कोष्टी, पिंगळा जोशी, पाटलाचा वाडा, चामडं कमावणारे मांग, ढोर, पत्रावळी विणणारे गुरव, बांबूच्या वस्तू करणारे बुरूड, गावात संदेश देणारे तराळ, परीट, शौर्यिक, कासार, घोंगडी विणणारे सणगर, भांडी तयार करणारे तांबट, फुलमाळी, वनमाळी, धनगर, सनगर, पिंजारी अशा १२ बलुतेदारांची आणि अलुतेदारांची घरं या गावात आहेत. त्यांच्या जीवनशैलीची माहिती अत्यंत बारकाईने या म्युझियममध्ये मांडण्यात आली आहे.

कुस्तीचे आखाडे, वेशीबाहेरची धर्मशाळा, नववधूला सासरी सोडण्याचा रिवाज, बाळ—बाळंतिणीची काळजी घेण्यासाठीच्या खास व्यवस्था, महादेव मंदिरात भरणारी शाळा या गावात आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागातील विहिरींवर पाणी भरण्याच्या पद्धती, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातले पोषाख, पायातल्या वहाणा, शेतीच्या पद्धती, सारं काही या गावात पाहायला मिळेल.

कालिदासांच्या शाकुंतलात वर्णन असलेले उद्यानही इथल्या तीन एकर जागेवर उभे राहिले आहे. प्रत्येक राशीच्या माणसांसाठी या गार्डनमध्ये वेगवेगळी झाडं आहे.

इथल्या मानवी आणि प्राण्यांच्या प्रतिकृती विलक्षण जिवंत भासतात. रंगसंगती आणि लाइट इफेक्ट्सचाही सुंदर वापर करण्यात आलाय.
संपर्क : ९५२३१२६७१९९८

# दाजीपूरचा गव 'गवा'

दाजीपूर हे गव्यांसाठी राखीव असलेलं असं अभयारण्य. शेकडो गवे एकत्र पाहायचे असतील तर दाजीपूर अभयारण्याला जरूर भेट दिली पाहिजे. फुलपाखरंही इथलं विशेष आकर्षण ठरतात. या जंगलात चालत फिरणंही सहज शक्य आहे. याशिवाय वन विभागानं इथं टॉवर बांधले असल्याने निवांत बसून निरीक्षणही करता येतं.



जंगलात फेरफटका मारत असताना अचानक तुमच्या समोर साधारणतः एक हजार किलो वजनाचा अवाढव्य गवा आला तर काय होईल? घाबरू नका... दिसायला अजस्त्र असला, तरी गवा हा माणसाला घाबरणारा प्राणी आहे. विशेष म्हणजे, असे शेकडो गवे एकत्र पाहायचे असतील, तर एकदा तरी दाजीपूर अभयारण्याला भेट दिली पाहिजे. खास गव्यांसाठी राखीव असलेलं असं हे अभयारण्य आहे. अर्थातच इथे इतरही अनेक प्राणी आहेत. या अभयारण्यात वाघही असल्याचं सांगितलं जातं; पण त्याचा ठोस पुरावा अद्याप मिळालेला नाही. एकूण काय तर, गवे या अभयारण्यातले राजे आहेत.

**अभयारण्याची वैशिष्ट्यं**

दाजीपूरमध्ये सदाहरित आणि निमसदाहरीत

असे दोन प्रकारचे वृक्ष आढळतात. घनदाट झाडी असल्यानं गवे सहजासहजी दिसत नाहीत. त्यांना बघायचं असेल तर वन कर्मचाऱ्याला बरोबर घेऊन जायचं..या मंडळींची नजर कमालीची असते. जंगलातल्या अतिशय छोट्या छोट्या हालचाली ते टिपत असतात. त्यामुळे ही मंडळी बरोबर असली, तर गवा दिसणारच.

पूर्ण वाढ झालेल्या गव्याचं वजन साधारणतः नऊशे ते हजार किलो असतं. एवढं वजन कमावण्यासाठी त्याचा आहार काय असेल असा विचार मनात येतो; पण निसर्गाची गंमत पहा, गवा एवढा धिप्पाड प्राणी असला, तरी तो फक्त गवतच खातो. हा प्राणी तसा लाजाळू; पण तुम्ही जर त्याला चिडवलं किंवा त्याच्या कळपातील एखाद्या पिल्लाला त्रास दिला, तर मात्र तुमच्या वाहनाला त्याची धडक बसलीच म्हणून समजा. त्यामुळे तो लांबून पाहण्यातच समाधान मानावं.

दाजीपूरमध्ये गव्यांबरोबरच बिबट्या, सांबर, भेकर, रानकुत्री, रानकोंबडी, साळिंदर, उदमांजर, शेकरुही आहे. याशिवाय पक्ष्यांमध्ये सर्प गरुड, घुबड, धनेश, हळद्या, ट्रीपाय, हुप्पो, सुतार, स्वर्गीय नतर्क असे असंख्य प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात. सकाळी लवकर उठून भटकंतीला गेल्यास पक्ष्यांबरोबरच कोवळ्या उन्हात चरणारे गवेही पाहायला मिळतात. फुलपाखरंही इथलं आकर्षण ठरतात. या जंगलात चालत फिरता येतं आणि गाडीही घेऊन जाता येते. अभयारण्यात गेल्यावर सांबर कोंड, वाघाचे पाणी, सावराचा सडा, पाट्याचा डांग, लक्ष्मी तलाव ही ठिकाणं आवर्जून पाहिली पाहिजे. वन विभागानं इथं टॉवर बांधले आहेत. त्यामुळे निवांत बसून निरीक्षण करता येतं.

## कुठं आहे दाजीपूर?

कोल्हापूरहून राधानगरी मार्गे मालवणला जाणाऱ्या फोंडा घाटात दाजीपूर अभयारण्य आहे. रस्ता ओलांडला, की पलिकडे राधानगरी अभयारण्य. दाजीपूर अभयारण्यानं नुकतीच पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत. कोल्हापूरहून ८० किलोमीटरवर, तर राधानगरीपासून ३० किलोमीटर अंतर आहे. इथे जाण्यासाठी एसटी आहेत. स्वतःचं वाहन असेल, तर जंगलात फिरताना अडचण येत नाही.

## राहण्याची सोय

वन विभागानं जंगलामध्ये राहण्याची उत्तम सोय केली आहे. विश्रामगृहांबरोबरच तंबूही आहेत. एमटीडीसीच्या छोट्याश्या कॅन्टिनमध्ये उत्कृष्ट जेवण आणि नाष्टाही मिळतो. मालवण जवळच असल्यानं काही मंडळी कोकणी थाळी खाण्यासाठी घाट उतरतात. दाजीपूरमध्ये राहायचं असल्यास कोल्हापूर येथील वन विभागाच्या कार्यालयात बुकिंग करावं लागतं.



वर्षातून एकदा कुठेतरी मस्त भटकायला जाण्याचा आमच्या ग्रुपचा शिरस्ता. दरवर्षी एखादं नवं ठिकाण... या पैकीच एक दाजीपूर अभयारण्याची भटकंती! जुलै २००८ मधे आम्ही या धुकं पांघरलेल्या रानवाटा पालथ्या घातल्या होत्या. तीनच दिवस होतो तिथे. पण त्या रानवाटांमधे सारं काही विसरून गेलो होतो.

कोल्हापूर आणि सिंधुदुर्गच्या सीमेवर हे गव्यांचं अभयारण्य वसलं आहे. आजूबाजूच्या गावांमधे आदिवासींची वस्ती असली तरीही प्रत्यक्ष अभयारण्यात माणसांचा वावर तसा नगण्यच. रात्री अंधार पसरला तरीही लाइट लावून काम करत बसणाऱ्या आपल्यासारख्या शहरी माणसांना रानाच्या पोटात काय दडलंय हे कसं कळणार. काजवा हा प्रकार माझ्या आयुष्यात पहिल्यांदा पाहण्याची संधी मला या अभयारण्याने दिली. काळोख पांघरून झोपलेल्या झाडांच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या आणि काळ्या मिट्ट अंधारातही आपल्या इवल्याशा अस्तित्वाची सतत जाणीव करून देणाऱ्या त्या काजव्यांचं दृश्य कायमचं स्मरणात कोरलं गेलं. काजवे पकडण्याचे आणि त्यांना बाटलीमधे भरून सोबत घेऊन जाण्याचे 'पराक्रम'ही आमच्या टोळक्याने न विसरता केले, हे करायला नको होतं असं आता वाटतंय.

आम्ही गेलो ते पावसाळ्यात. कोणतंही

माझ्या आयुष्यात पहिल्यांदा पाहण्याची संधी मला या अभयारण्याने दिली. काळोख पांघरून झोपलेल्या झाडांच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या आणि काळ्या मिट्ट अंधारातही आपल्या इवल्याशा अस्तित्वाची सतत जाणीव करून देणाऱ्या त्या काजव्यांचं दृश्य कायमचं स्मरणात कोरलं गेलं. काजवे पकडण्याचे आणि त्यांना बाटलीमधे भरून सोबत घेऊन जाण्याचे 'पराक्रम'ही आमच्या टोळक्याने न विसरता केले, हे करायला नको होतं असं आता वाटतंय.

आम्ही गेलो ते पावसाळ्यात. कोणतंही

रान या काळात हिरवंगार झालेलं असतं. त्यात इथे तर सगळं धुक्याचं साम्राज्य. मुक्तपणे वाढलेली झाडं-झुडपं-वेली तुडवत आणि धुक्यातून मार्ग काढत डोंगरदऱ्यांमधे मुक्त पाखरांसारखं तासन्तास फिरण्याची सगळी हौस त्या तीन दिवसांत भागवून घेतली. हरीण, अस्वलं, वाघ, सरपटणारे प्राणी आणि पक्षांच्या शेकडो प्रजाती इथे आहेत. मैलोन् मैल माणसाचा मागमूसही नाही. केवळ या प्राण्या पक्षांचीच साथसोबत. त्या तीन दिवसांत वाघांच्या पावलांचे ठसे शोधत त्यांचा माग घेत किती मैल



चालतो याचा हिशेब लावता येणार नाही. त्याची गरजही नाही.

राधानगरी धरणाचं बॅकवॉटर ही या अरण्याला लाभलेली खास देणगी. ट्रेकिंग, रॉक क्लायम्बिंगची आवड असणाऱ्यांसाठी तर येथे पर्वणीच आहे. साहसाची आवड असणाऱ्यांना वारंवार यावसं वाटेल असंच हे ठिकाण आहे. या साऱ्या शांत रम्य वातावरणात गगनगिरी महाराजांचा मठ वसलेला आहे. निसर्ग आणि अध्यात्म! मानवाला प्रेरणा देण्याची क्षमता असलेल्या या दोन गुरूंचा संगम इथे पाहता-अनुभवता येतो. बॉटनीच्या विद्यार्थ्यांसाठी तर इथे पावलोपावली सांडलेली वनसंपत्ती म्हणजे पर्वणीच आहे.

एमटीडीसीचं इथे रिसॉर्ट आहे. त्यामुळे राहण्या-खाण्याची सोय होते. मात्र, तरीही कुटुंबाबरोबर येणं जिकिरीचंच. आपल्या महाराष्ट्राच्या खेड्यांमधे दडलेली ही वनसंपत्ती सर्वांना पाहता यावी यासाठी सरकारने या अभयारण्याच्या विकासाकडे अधिक लक्ष देणं गरजेचं आहे, असं कुठेतरी वाटून गेलं. पण तरीही धुकं पांघरलेल्या आणि गर्द वनराईत दडलेल्या त्या तीन दिवसांत आमच्या भटक्या टोळक्याने खूप धम्माल केली.




पावसाळ्यात दुधासारख्या शुभ्र धुक्यात राधानगरी, दाजीपूर गुरफटलेलं असतं. तिथल्या उंच झाडांच्या शेंड्यांवर ताशे वाजवत 'छडीदार' पाऊस धिंगाणा घालत असतो. सगळा परिसर, डोंगररांगांवर मेघांचं साम्राज्य असतं. बहरलेल्या पावसाळ्यात धुवांधार पाऊस आडदांडपणे कोसळत असतो. त्यात या तीन-चार महिन्यांत हा सगळा परिसर धुक्यात दडलेला असतो.

सह्याद्रीचे आकाशाला भिडणारे कडे, घनदाट झाडीने व्यापलेल्या, दूरवर पसरलेल्या गूढरम्य हिरव्या-निळ्या डोंगररांगा, हिरव्यागार झाडीतून जाणाऱ्या विटकरी लाल पाऊलवाटा, अथांग धुक्याने पुरेपूर लपेटलेला परिसर, घाटमाथ्यावरून पार अरबी समुद्रापर्यंत दिसणारा कोकणचा विस्तीर्ण हिरवागार सळसळता मुलुख... हे अपूर्व दृष्य दिसतं आणि डोळ्याचं पारणं फिटतं ते फोंडाघाटाच्या माथ्यावरून.

फोंड्याचा घाटमाथा आहे साधारण तीनएक हजार फूट उंचीवर. सह्याद्रीला पालाण घालणारे जे काही तळकोकणाला जोडणारे पुरातन घाट आहेत त्यापैकी राधानगरी, दाजीपूर, कोल्हापूरकरांना भिरवंडे, नांदगाव, वेंगुर्ले यांना जोडणारा फोंडा घाट घाट खूप महत्त्वाचा आहे. दाजीपूर जे घाटमाथ्यावरचं लहानसं गाव आहे तिथे पूर्वी दस्तुरी नाका म्हणजे ऑक्ट्रॉय नाका असे. कोकणातून घाट चढला आणि दस्तुरी आली की त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानची हद्द सुरू होत असे. इथून पुढे मग कोल्हापूरला जायला त्या संस्थानातल्या सर्व्हिस मोटारी असत. फार वर्षांपूर्वी पावसाळ्यात कोकणातल्या लोकांचा प्रवास याच मार्गाने होत असते. कारण पावसाळ्यात मुंबईकरता बोट वाहतूक बंद असे. कोकणातले लोक फोंडा घाटाच्या मार्गाला 'वरची वाट' म्हणत. मग या वाटेने ते कोल्हापूर गाठून मग पुढे रेल्वेने मुंबई गाठत.

फोंडाघाटाच्या घाटमाथ्याच्या परिसरातले राधानगरी हे टुमदार गाव पूर्वीपासूनच कोल्हापूर संस्थानातलं महत्त्वाचं ठिकाण होतं. दक्षिणेतल्या फोंडाघाटापासून उत्तरेतल्या कोल्हापूरपर्यंतच्या डोंगरपट्ट्यातलं सगळ्यात मोठं सरंजामी गाव आणि बाजारपेठदेखील. एक्स्प्रेस वेवरून कोल्हापूरच्या वेशीपाशी आलो आणि पहिली उजवी घेतली की शहराच्या मध्यभागातून राधानगरीला जाणारा रस्ता आहे. पहिले १०-१२ कि.मी. शहराच्या मध्यभागातून जात असल्याने रस्ता विचारत जावं लागतं. मग मात्र राधानगरीला जाणाऱ्या रस्त्याला आपण लागतो. साधारण ५०-५५ कि.मी.वर राधानगरी वसली आहे.

कोल्हापूर शहरातून बाहेर पडलो की थोड्याच वेळात पठारावरचा वारा आपल्याला वेगळ्या परिसरात आल्याची जाणीव करून देतो. पठारावरून दिसणारा दूरवरचा वेगवेगळ्या रूपाचा प्रदेश आपल्याला भुरळ घालतो. त्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ऊस, ज्वारीची शिवारं... हा [illegible] कॅनव्हास अजून रंगीत करतात. मात्र जसजशी राधानगरी जवळ येऊ लागते तसं सृष्टीचं रूप बदलू लागतं. सह्याद्रीची शिखरं स्पष्ट दिसू लागतात. सरळ रस्ता जाऊन वळणं वाढू लागतात. रस्त्याच्या बाजूची शिवारं जाऊन दाट रान दिसू लागतं आणि आपण राधानगरीला पोहोचतो.

राधानगरीपासून बघाल तिथे चहूकडे निबीड अरण्य दिसत राहतं. त्यात राधानगरी धरणाच्या पाण्याचा पसरलेला लांब पट्टा थेट दाजीपूरपर्यंत आपली सोबत करतो. या परिसराचं सगळंच निसर्गवैभव विशेषतः हिरवागार रंग डोळ्यात भरू लागतो. थोडी वाकडी वाट करून चहूदिशांना फेरफटका मारला तर उंच टेकड्या, कारवी, ऐन, किंजळीचं घनदाट अरण्य, सह्याद्रीची आकाशाला भिडलेली असंख्य शिखरं... या पार्श्वभूमीवर वसलेली राधानगरी आणि काळम्मावाडीची धरणं.

हा परिसर इतका वनसमृद्ध की कोल्हापूरच्या महाराजांनी याच कोंदणात बंगला बांधला. महाराज दाजीपूरच्या जंगलात शाही शिकारीसाठी वारंवार येत. या तलावाकाठच्या बंगल्यात महाराज मुक्कामाला असले की संस्थानचं भगवं निशाण बंगल्यावर फडकत असे. मुक्काम हलला की हे निशाण उतरवलं जाई. आजही दाजीपूरचं जंगल समृद्ध आहे. गव्यांसाठी इथलं जंगल राखीव आहे.

पावसाळ्यात दुधासारख्या शुभ्र धुक्यात राधानगरी, दाजीपूर गुरफटलेलं असतं. तिथल्या उंच झाडांच्या शेंड्यांवर ताशे वाजवत 'छडीदार' पाऊस धिंगाणा घालत असतो. सगळा परिसर, डोंगररांगांवर मेघांचं साम्राज्य असतं. बहरलेल्या पावसाळ्यात धुवांधार पाऊस आडदांडपणे कोसळत असतो. त्यात या तीन-चार महिन्यांत हा सगळा परिसर धुक्यात दडलेला असतो. घाटमाथ्यावरच्या दाजीपूरच्या खिंडीतून कोकणाच्या दऱ्याखोऱ्या अथांग धुक्याने वेढलेल्या असतात.

सह्याद्रीचं हे दिमाखदार रूप, हिरव्या रंगाचं निर्विवाद साम्राज्य... राधानगरी, दाजीपूर, फोंडाघाटाचा हा मातब्बर मुलुख कुठल्याही ऋतूत पाहावा. पावसाळ्यात मात्र अतीरुद्र रूप. छडीदार, धुवांधार पाऊस, प्रचंड धुकं आपल्याला वेड लावतं. असा हा निसर्ग आपल्या स्वागतासाठी सदैव तयार असतो. अनुभव तर घेऊन बघा!

—

कोल्हापुरवरून सामानगड आणि त्याच्या दक्षिणेकडील सर्व ठिकाणांना भेट देणे अंतराच्या आणि वेळेच्या दृष्टिने खूप गैरसोयीचे होते. त्यामुळे पन्हाळा ते फोंडाघाट कोल्हापुरवरून व सामानगड ते पारगड हि स्थळे चंदगड अथवा गडहिंग्लज या तालुक्याच्या ठिकाणाहून पाहायला जाणे सोयीस्कर होईल.


पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा म्हटलं, की डोळ्यासमोर येतात ते ठरावीक किल्ले. जसे की पन्हाळा, विशाळ आणि रांगणा किल्ला; पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रस्थापित स्वराज्याचा विस्तार प्रचंड आहे, याची अनुभूती घेत आम्ही मावळे दौडलो. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील किल्ले महिपालगड, कलानिधीगड तथा कलानंदीगड, पारगड, गंधर्वगड, सामानगड, वल्लभगड आणि तसंच पारगडजवळील पार्ले गावानजीक पांडव गुहा, नेसरी खिंड इथलं सरसेनापती प्रतापराव गुजर यांचं स्मारक, सुंडी धबधबा ऐसी भरभक्कम मोहीम फत्ते केली आणि तीही केवळ दोन दिवसांत.


## सामानगड

सामानगडाचा माथा हा कातळ माथा आहे. गडावरून भुदरगड आणि वल्लभगडांचं दर्शन होतं. याही गडावर गाडी जाते; पण गडाचा आवाका बऱ्यापैकी मोठा असून, स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना म्हणावा लागेल, कारण गडावर पाणी साठवण्यासाठी सात कमानीची मोठी विहीर खोदलेली आहे. अतिशय सुंदर अशी ही विहीर बघूनच आपली तहान भागते.

## नेसरी खिंड

'वेडात मराठे वीर दौडले सात' हे युद्धाचं यथार्थ वर्णन म्हणजे नेसरी खिंड. शिवरायांनी पन्हाळा जिंकल्यानं विजापुरच्या आदिलशाहनं पुन्हा किल्ला परत घेण्यासाठी बहलोलखानाला सैन्यानिशी पाठवलं. स्वराज्यावरील या संकटाला संपवण्याची जबाबदारी खुद्द सरसेनापती प्रतापराव गुजर यांनी घेतली. खानाच्या सैन्याला उमराणीजवळ वेढा दिल्यानं खान शरण आला. प्रतापरावांनी त्याला जीवदान दिलं; परंतु खानाचा नाश केल्याशिवाय आपल्यासमोर येऊ नये असा निरोप राजांनी प्रतापरावांना पाठवला. छत्रपतींच्या आदेशानुसार प्रतापरावांनी खानाचा पाठलाग करून नेसरीच्या खिंडीत केवळ सहा साथीदारांसह तुटून पडले. खानाच्या अवाढव्य सैन्यासमोर सात मराठे कामी आले. या ऐतिहासिक स्मारकाला भेट देत आम्ही वल्लभगडला निघालो.





**कसं जाल?**

**चित्रीकडे जायचे असेल तर कोल्हापुरातून कागल, निपाणी, बहिरेवाडी, उत्तूर मार्गे आजरा येथे जाता येते.**

# चित्री

***आजरा*** तालुक्यातील चित्री बॅकवॉटर म्हणजे अगदी सुरेख डेस्टिनेशन आहे. निसर्ग आणि तुम्ही यांच्यामध्ये इथे काहीच येऊ शकत नाही, अगदी मोबाईलची रेंजही. कोकणचा दरवाजा असलेल्या आजरा गावापासून नऊ किलोमीटर अंतरावर चित्री नदीवर दोन डोंगरांच्या बेचकीत देऊळवाडी गावानजीक ३.७५ टीएमसीचे चित्री धरण आहे. सुमारे सात किमी लांबीचे बॅकवॉटर, घनदाट जंगल, हिरवेगार डोंगर आणि निबिड जंगलातील शांतता इथे अनुभवता येते.

मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांचे आजरा गाव आजवर रामतीर्थासाठी प्रसिद्ध होते. कोकण आणि घाटाच्या मध्यरेषेवर ते वसले आहे. गावानजीक असलेल्या हिरण्यकेशी नदीमध्ये रामतीर्थ देवस्थानजवळ बारमाही मोठा धबधबा आहे. हे धरण तसे आडवळणाला असल्याने अद्याप तिकडे फारशी गर्दी नाही आणि या परिसराचे बाजारीकरणही झालेले नाही. आजरा गावात राहण्या-खाण्याची चांगली सोय होते. चित्री परिसरात पांडवकालीन मंदिरं, घनदाट जंगल, शुद्ध हवा आणि भरपूर पाणी असल्याने दुर्मिळ पशु आणि पक्षी पाहायला मिळतात. जंगल ट्रेकिंगचा चांगला अनुभव मिळतो. मात्र जेवण बरोबर घेऊन गेलं पाहिजे. दिवाळीनंतर या परिसरात बैलांचा चिखलघुट्ट्यांच्या शर्यतीचा खेळ रंगतो. तोही पाहण्यासारखा असतो. या परिसरात काजू, आंबा, करवंद, बोरं, जांभळांची भरपूर झाडं असल्याने रानमेव्याचही आस्वाद घेता येतो. इथे हिरवाई भरपूर असल्याने उन्हाचा त्रासही जाणवत नाही.

## गंधर्वगड

गंधर्वगड हा कोल्हापूर-गडहिंग्लज-चंदगड मार्गावर जवळ येतो. गडावरून दूरवर महिपाळगड आणि कलानिधीगड दिसतो. माथ्यावर चोळोबाचं देऊळ आहे. सपाटी तुडवत दक्षिणेच्या तटावर गेलं, की ताम्रपाणीचं निसर्गरम्य खोरं दिसतं. या गडाच्याही माथ्यावर गाडी जाते. गडावर फार काही अवशेष नाहीत, गडावरच गाव वसलेलं असल्यामुळे गडाची अवस्था फार वाईट आहे. पुढं सामानगड आमची वाट बघत होता.



अनु.

## महिपालगड

महिपालगड हा कर्नाटक हद्दीलगत येतो. गडावरून कलानिधीगड, गंधर्वगड आणि राजहंसगड (कर्नाटक) दिसतात. गडाच्या माथ्यापर्यंत गाडी जाते. गडावर तुटपुंजे अवशेष शिल्लक आहेत. टेहाळणी बुरुजावरून संपूर्ण बेळगाव दृष्टीस पडतं. गडाशेजारी एक गुहा आहे, या गुहेमध्ये विशेष काही नसून, फक्त काही कोरीव खांब आहेत. इथून पुढं आम्ही वाटेतील सुंडी धबधबा इथं गेलो, या वर्षी पाऊस भरपूर प्रमाणात झाला असल्यामुळे धबधब्याला बऱ्यापैकी पाण्याची धार आहे. एका वाडीतील मामासाहेब लाड विद्यालयात घेऊन गेले. या शाळेचं वैशिष्ट्यं म्हणजे मुलांना पहिलीच्या वर्गापासून साप ओळखणं तसंच हताळणं याचं प्रशिक्षण दिलं जातं. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक सदाशिव पाटील व टकेकर हे वर्ग घेतात. त्यांनी आम्हालाही वेगवेगळ्या विषारी (मण्यार, घोणस, नाग, फुरसे) आणि बिनविषारी (धामण, हिरवी टोळ) या सापांची आणि काही अजगरांची ओळख करून दिली.

नंतर साधारण ११:३० वाजता आम्ही कलानिधीगड तथा कलानंदीगड (कारण दुरवरून बघितल्यास गड काळ्या नंदीसारखा भासतो.) पायथा गाठला. भातशेतीतून वाट काढत आम्ही धनगर वाड्याभोवती वाटेवरून मार्गक्रमण करत एक तासाची खडी चढाई पार करत मुख्य दरवाज्यापाशी पोहोचलो.

## कलानिधीगड

कोल्हापूर जिल्ह्यातील कलानिधीगड हा देखणा किल्ला आहे. सभासद बखरीतील उल्लेखानुसार हा किल्ला शिवरायांनी वसवलेल्या किल्ल्यांच्या यादीत आहे. सिंधुदुर्ग आणि गोमंतकात उतरणाऱ्या घाटवाटांवर लक्ष ठेवण्यासाठी या किल्ल्याची निर्मिती केली गेली असावी. गोमुखी मुख्य प्रवेशद्वार अजूनही सुस्थितीत आहे. गडावर दोन तोफा, शिव मंदिर आणि चांगल्या परिस्थितील तटबंदी, बुरुज आहेत. पुढं पार्ले गावानजीक पांडव गुहेत आम्हाला जायचं होतं. ठाकुरवाडी इथं गाडी लावून आम्ही गुहेकडे जाण्याची सफर सुरू केली. ही सफर अद्वितीय अनुभव ठरली, कारण अत्यंत घनदाट जंगल तसंच असंख्य वन्यप्राण्यांचे जसे हत्ती, अस्वल, वाघ, सांबर, सालिंदर यांचे ठसे आणि विष्ठा आम्हाला नजरेस पडली. गुहेचा आवाका पाहून आम्ही


हादरलो. गुहा तशी समोरून बघितल्यावर ५० फूट खोल आणि २०० फूट रुंद दिसते; पण आत गेल्यावर अजून २५-३० फुटांचं भुयार आहे. गावातील हरहुन्नरी तरुण सिताराम सीतापनं गुहेत मशाल पेटवली आणि आम्हाला ती दाखवली. डॉ. पाटील यांनी आम्हाला जेवायला थांबवलं. फणसाची भाजी आणि तांदळाची भाकर खाऊन जीवात-जीव आला.

## पारगड

किल्ले पारगड हाही इतिहासप्रसिद्ध गड आहे, छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६७४ साली या गडाला वसवलं. गोव्यातील पोर्तुगीजांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी या गडाची निर्मिती केली असावी. या गडाचा पहिला किल्लेदार म्हणून नरवीर तानाजी मालुसरेंचा पुत्र रायाजी मालुसरे यांचं नाव घेतलं जातं. पारगडावरून कलानिधीगड तसंच गोव्याचं दर्शन होतं. गडाच्या सुरुवातीला काही तोफा आढळतात आणि सुंदर मारुती मंदिरही आहे. पारगड तसा मोठा गड असून, दोन विहिरी, विरगळ तसंच तटबंदी पाहायला मिळते. आता आम्हाला खुणवत होता तो गंधर्वगड.

# सोलापूर जिल्हा
## सोलापूर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते सोलापूर | | | | | 402 | | | | |
| **1** | तुळजा भवानीमाता मंदिर | | | | मंदिर | 46 | NE | | | |
| **2** | सिद्धरामेश्वर मंदिर | | | | मंदिर | 2 | N | 47 | SW | |
| **3** | मंगळवेढा | | किल्ला | | मंदिर | 58 | SW | 57 | SW | |







अवघ्या महाराष्ट्राचं कुलदैवत असणाऱ्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेचं बळ देणाऱ्या आई भवानीचं तुळजापूर आणि सुरेख प्रकार असलेलं सोलापूरचं सिद्धेश्वर मंदिर एका सहलीत सहज होऊ शकतील अशी ठिकाणं. या ठिकाणी जाऊन नतमस्तक होणं हे नक्कीच बळ देणारं ठरतं.

एखाद्या वीकेंडला थोडं धार्मिक होण्याचा, एखाद्या देवाचं दर्शन घेण्याचा मूड आला तर सोलापूर हा उत्तम पर्याय आहे. एका दिवसात किंवा दोन दिवसांत जाऊन येण्यासारखी अनेक ठिकाणं या जिल्ह्यात आहेत.

सोलापुरसाठी 'सिद्धेश्वर एक्सप्रेस' एकदम सोयीची आहे. शुक्रवारी रात्री मुंबईहून निघायचं आणि पहाटे पहाटे सोलापूर गाठायचं. आपण उतरतो तेव्हा स्टेशनला नुकतीच जाग येत असते. शनिवार आणि रविवारच असे अख्खे दोन दिवस सोलापूर जिल्ह्यात भटकून रात्री पुन्हा सिद्धेश्वरनेच मुंबईला परत!



आम्हाला फक्त तुळजापूर आणि सिद्धेश्वर मंदिरात जायचं होतं. त्यामुळे शनिवारी रात्री निघायचा बेत आम्ही आखला.

सिद्धेश्वर मंदिर स्टेशनपासून जवळ असलं तरी बाकी ठिकाणं बऱ्यापैकी लांब आहेत. त्यामुळे दिवसभरासाठी एखादी ट्रॅक्स किंवा सुमो ८००-१२०० रुपयांपर्यंत भाड्याने करावी लागते. गाडी ठरवताना



अनु.

घासाघीस करावी लागते. नवख्यांची फसवणूक होण्याची शक्यता इथेही असतेच.

थोड्याशा घासाघीसीनंतर आम्ही गाडी ठरवली आणि तुळजाभवानीच्या दर्शनाला निघालो. गाडीवाल्याशी बोलताना कळलं की, रविवार-बुधवार इथे बाजार अंशत: बंद असतात. लोडशेडिंगचा जबरदस्त फटका इथेही बसतो. कापड व्यवसायांत आंधकडच्या लोकांचं वर्चस्व आहे. स्टेशनवर उतरल्यावर एक उंच चिमणी सोलापूरच्या सुप्रसिद्ध कापड व्यवसायाची आठवण करून देत होती. सोलापुरचा अभिमान असलेल्या बाकी गिरण्या मात्र गायब होऊ लागल्या आहेत.

सोलापूर ते तुळजापूर हा जवळपास पाऊण तासाचा रस्ता. वाटेत ऊस आणि द्राक्षाचे मळे अधूनमधून दिसत होते. पाण्याचा पुरवठा व्यवस्थित नसल्याची खंत गाडीवाल्यानं व्यक्त केली.

तुळजापूर म्हणजे साडेतीन शक्तीपीठांपैकी महाराष्ट्राचे एक कुलदैवत. दसरा हा इथला मोठा आणि महत्त्वाचा उत्सव असतो. बाकी देवस्थानांच्या ठिकाणी जसे गुलालाचे, हळदीचे, कुंकवाचे ढीग ओळीने मांडलेले असतात, तसेच ते तुळजापूरलाही दिसतील. पूजासाहित्य, मूर्ती अशा वस्तूही मांडलेल्या असतात. एक भाट पुजारी ठरवून

त्याच्याकडून पूजा आणि गोंधळ करून घेता येतो. पुजारी आपल्या उतरण्याची आणि जेवणाचीही व्यवस्था करतात. त्यामुळे त्यासाठी शोधाशोध करावी लागत नाही. त्यानेच केली. अनेक श्रद्धाळू साकडे घालण्यासाठी, नवस फेडण्यासाठी मंदिरात येतात. मग ते श्रद्धास्थान तुळजापूर असो, पंढरपूर असो वा सिद्धिविनायक. तिथं लोकांची अखंड गजबज असते. शिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेसाठी भवानीमातेनंच आशीर्वाद दिला होता. मग इथं भाविकांचा ओढा किती असेल, याची कल्पना करता येईल. शिवाय, ही देवी केवळ मराठी भाषिक भाविकांची नाहीये. गुजराती, मारवाडी, कानडी भाषिकांचीही इथे मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

महाद्वारांतून आत गेल्यावर पूर्वाभिमूख हेमांडपंती देऊळ दिसतं. मंदिराच्या आसपासची घरं जुन्या पटडीची आहेत. दगडाच्या भिंती, मोठं प्रवेशद्वार लक्ष वेधून घेतं. मंदिराचा कळस दुरून पटकन दिसत नाही. कपाळावर मळवट भरलेल्या आणि आपल्या प्रभावी नेत्रांनी अरिष्ट दूर करणाऱ्या देवीची लोकं मोठ्या भक्तीभावाने खणानारळाने ओटी भरतात.

नवपरिणीत जोडपी देवीचा गोंधळ घालण्यासाठी येतात. काही जण तर संपूर्ण मंदिराला साष्टांग नमस्कार करून फेऱ्या मारतात. देवीचा जोगवा मागतात. यज्ञपंड्यात अग्नी सतत तेवत राहावा म्हणून भक्तांची रीघ सुरुच असते.

सकाळी लवकर येऊन दर्शन, गोंधळ हे सगळं आटपल्यावर जेवण करून इतर ठिकाणं बघण्यासाठी निघता येतं. पण कुटुंबकबिला सोबत असला तर सगळं करतं आरामात, कासवाच्या गतीनं सुरू असतं. त्यामुळे अर्धा दिवस इथेच जातो. तरी थोडी विश्रांती घेऊन सोलापुला परतल्यावर परतीच्या गाडीला बराच अवकाश असल्यानं सोलापुरचं सिद्धेश्वर मंदिर पाहता येतं.

या भागात फिरताना राहूनराहून कोकणातल्या रस्त्यांची आठवण होते. इथले रस्ते कसे सरळसोट, बाजूला माळरान. ऊस-द्राक्ष यांचे मळे- बहुतांशी ओसाड. कोकणातील रस्ते याच्या अगदी विरुद्ध. नागमोडी झाडांनी आच्छादित.

तुळजापूरच्या

गुलालउधळणीपुढे सिद्धेश्वर मंदिर बऱ्यापैकी शांत आहे. सिद्धेश्वर हा गुराख्याचा मुलगा. जन्मतःच मुका. एके दिवशी याला देवाचा साक्षात्कार झाला आणि देवाला अन्न देण्यासाठी घरी मागणी करत आला. त्याला बोलतं झालेलं पाहून आईवडिलांनी त्याला यात्रेला धाडलं. मात्र, खऱ्या परमेश्वराचं दर्शन अगोदरच झाल्यानं तो परतला. येताना देवानं त्याला तांदळाचे दाणे दिले आणि गावात प्रवेश करताना मागे न पाहता हे तांदळाचे दाणे वेगवेगळ्या ठिकाणी फेकायला सांगितलं. त्यातून ६८ शिवलिंगे तयार झाली. सोलापूर शहरात जुनीनवी बाजारपेठ, बुधवार पेठ अशा वेगवेगळ्या ठिकाणी ही शिवलिंग विखुरली आहेत. यातील काही मुख्य मंदिरापाशी आहेत. संक्रांतीचे तीन दिवस हा सिद्धेश्वराचा महासोहळा. सिद्धेश्वराशीच लग्न करण्याचा अट्टाहास धरलेल्या एका मुलीचं योगी सिद्धेश्वरांनी त्यांच्या काठीशी लग्न लावून दिलं. हा काठीशी लग्न लावण्याचा सोहळा अतिशय पारंपारिक पद्धतीनं जल्लोषात साजरा केला जातो. त्या काळात संपूर्ण मंदिर परिसर माणसांनी फुलून जातो. परिसरात मध्यभागी सिद्धेश्वरांची समाधीची जागा आहे.

या मंदिराचे आणखी वैशिष्ट्यं म्हणजे पांडुरंगाचे छोटेसे मंदिर. ज्ञानेश्वरांच्या आजीआजोबांना लांबच्या प्रवासाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी सिद्धेश्वरांनी बांधलेलं हे छोटसं मंदिर. यातील विठ्ठलाची मूर्ती इतकी सुंदर आहे, की प्रत्यक्ष पंढरपूरच्या कीर्तनकारांनी त्याचं कौतुक केलं आहे. सुमारे ८०० वर्षे जुनं मंदिर आहे. पर्यटकांसाठी इथे प्रसाद, जेवणाची सोय आहे.

वेगळा अनुभव म्हणून एखाद्या देवस्थानी नातलगांसोबत विकेंड घालवायला काही हरकत नाही!



अनु.

# मंगळवेढा

[redacted]

## लयाला जाणारं इतिहासवैभव

पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, ही मराठी मनाची भावभोळ्या भक्तिची ठिकाणं. इरावती बाईंचा बॉयफ्रेण्ड तर जर्मनीच्या डॉ. गुंथर सोन्थायमर यांची श्रद्धा जिंकणारा कानडा विठ्ठलू पाहाण्याची तीव्र ऊर्मी मनात होती. पंढरपूर बरोबरच तुळजापूर, अक्कलकोट आणि मंगळवेढा या जळच्या ठिकाणांनाही धावती भेट देण्याचा बेत होता. तुळजापूरची काळवृत्ती दगडांतील देवी, भव्य मंदिर पाहून मन साडेतीनशे वर्ष मागे जातं.

मंगळवेढा हे पर्यटनाच्या दृष्टीने काहीसं अप्रचलित ठिकाण

कवि राजा मंगळवेढेकर इथलेच.

असे कसे असे कसे – रात्रीचेच चांदणे दिसे॥<br>
असे कसे असे कसे – मोरालाच सुंदर पिसे॥<br>
असे कसे, असे कसे – पाण्यातच झोपती मासे॥<br>
असे कसे, असे कसे – आईसारखे कुणी नसे॥

त्यांची ही नादमय आणि नाट्यमय कविता गुणगुणतच आम्ही मंगळवेढ्यात प्रवेश केला. तिथल्या दामाजीपंतांचं मंदिर आवर्जुन पाहायचं होतं. सन १४५८ मधील गोष्ट. दामाजी पंत मंगळवेढ्यात महसूल



अधिकारी म्हणून नियुक्त होते. पण त्या वर्षी प्रचंड दुष्काळ पडला. अन्न तुटवड्यामुळे भुकबळी जाऊन आतोनात मनुष्यहानी होत होती. अशा वेळी दामाजीपंतांनी सद्विवेकाला स्मरून सरकारी धान्य कोठारं जनतेसाठी खुली केली. लोक भरभरून धान्य घेऊन जात होते. दामाजीपंतांना दुवा देत होते. तेव्हाचा राज्यकर्ता, बहमनी सुलतान हुमायुन याला ही वार्ता समजताच त्याने पंतांना अटक करून दरबारात पेश करण्याचे आदेश दिले. बिदरच्या दरबारात जात असताना दामाजीपंतांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले अन् ठाम पण शांत चित्तवृत्तीने ते सुलतानाला सामोरे गेले. दुसऱ्या दिवशी साक्षात पांडुरंग एका साध्या गावकऱ्याच्या वेशात दरबारी गेले आणि दान दिलेल्या धान्याइतकी रक्कम अदा करून दामाजीपंतांची सुटका केली. ही सारी कथा लहानपणापासून ऐकलेली. त्याच दामाजीपंतांचं मूळ मंदिर आणि नवीन मंदिर, दोन्ही, आजूबाजूला आहेत. मंदिरात पादुका आहेत. विशेष म्हणजे आजही तिथे अन्नकूट चालवलं जातं. सकाळच्या वेळी येणाऱ्या प्रत्येक पांथस्थाला तिथे भात-भाज-भाकरी असा साधा पण पौष्टिक प्रसाद दिला जातो.

या मंदिराच्या बाहेरच एक भारदस्त दगडी शिवलिंग उघड्यावर ठेवलेलं आहे. तिथे एक गर्दुल्ला आपली भावसमाधी लावून बसला होता. आजूबाजूला विचारणा केली तर असं कळलं की ते शिवलिंग पहिल्यापासून उघड्यावर पडलेलं आहे. त्याबद्दल फारसं गैर कोणाला वाटलं नाही.

ही सारी भटकंती सुरू असताना चष्म्याची काच अवचित निखळली आणि मंगळवेढ्यातील बारिकश्या गल्लीतील चष्म्याच्या दुकानात मी हजर झाले. दुरुस्ती सुरू असतानाच गप्पांची देव-घेव झाली व इथे जवळच एक प्राचीन शिवमंदिर आहे, असा महत्त्वाचा दुवा मिळाला. आणि खरोखरच दहा मिनिटात आम्ही एका तळ्यापाशी आलो. तळ्याला खोदीव पायऱ्या होत्या, पाणी हिरवकंच! बाजूच्या भिंतीवर झाडांनी जोरदार मुक्काम ठोकला होता. काठाच्या बाजूला मूर्ती नसलेली रिकामी घुमटी होती तर बाजूच्या दगडावर देवीची अर्धीमुर्धी पण रेखीव मूर्ती होती. आम्ही सारेच अस्वस्थ झालो.





अनु.

बाजूच्या शिवमंदिरात पाय दुमडलेला सालंकृत नंदी होता. देवळाचं बांधकाम हेमाडपंती पद्धतीचं. हे देऊळ तब्बल आठव्या शतकात बांधलं गेलं. तर पंधराव्या शतकात त्याची पुर्नबांधणी केली गेली. तिथे एक शिलालेखही आहे. गणपती आणि शंकराचं दर्शन घेऊन आम्ही प्रदक्षिणेच्या मार्गाला लागलो. तर प्रदक्षिणेच्या वाटेवर मानवी विष्ठा, आजूबाजूला उमसलेले वास! देवळाच्या आवारात मोठी-मोठी भांडी ठेवली होती. खव्यासाठी मोठ्या घमेल्यात घाणा लावला होता. देवळाच्या नक्षीवर बिनदिक्कत कपडे वाळत घातले होते. कोण्या एका अमराठी हलवायाने या पवित्र शिवालयाचा दुग्धालय ते शौचालय असा सुलभ वापर करून साक्षात सर्वोत्तमकालाच वेठीला धरलं होतं. आमची मती कुंठीत झाली.

तीच गोष्ट भुईकोट किल्ला व सरदार बापू गोखले यांच्या घराबद्दल म्हणता येईल. सन १५७२ साली हा १२४५ फूट लांबीचा भुईकोट किल्ला बांधला गेला. त्याची तटबंदी आजही चांगल्या अवस्थेत आहे. बिदरमध्ये १५ व्या शतकात अनेत जैन मंदिर होती. ती मंदिरं क्रूरपणे उद्धस्त करून त्याच भग्र अवशेषांचा वापर करून हा सात बुरुजांचा भुईकोट किल्ला बिदरच्या मुसलमानी राज्यकर्त्यांनी बांधला. या किल्ल्याच्या आत अजून एक छोटा किल्ला बांधला त्याचं नाव चौबुर्जी. नावाप्रमाणेच त्याला चार बुरूज आहेत. आकार चौरस असून २३० फूट लांबी आहे. आष्टी इथल्या इंग्रजांबरोबरच्या लढाईत कामी आलेले पेशव्याचे




शेवटचे सरदार बापू गोखले यांचं घरही मंगळवेढा इथे भंगलेल्या स्थितीत आहे.


संत चोखोबा आणि कान्हापोत्रा यांचं मंदिर केवळ मंगळवेढा इथेच आढळतं. मंगळवेढा ही संतांची भूमी. दामाजीपंत, चोखोबा, कान्होपात्रा इथलेच. श्री अक्कलकोट स्वामींचं बारा वर्ष इथे वास्तव्य होतं. अशा धार्मिक अधिष्ठानाच्या भूमीत ऐतिहासिक मानचिन्हांची अशी हेळसांड पाहून मन खिन्न झालं. आज पर्यटनाची चांगली मागणी आहे. राज्यकर्ते, रहिवासी, स्थानिक संस्था यांनी पुढाकार घेऊन इथे स्वच्छता केली, घुसखोरीला आळा घातला. पुरातत्व खात्याच्या मदतीने डागडुजी केली तर मंगळवेढा हे पर्यटनाच्या नकाशावर आपला ठसा उमटवलेला हे नक्कीच. त्यातील काही ठिकाणांना वर्ल्ड हेरिटेज फाउण्डेशनच्या मदतीने सुरक्षा व निधीची तजवीजदेखील करता येईल. गरज आहे ती कृतीशील व कळकळीच्या कार्यकर्त्यांची अन् इतिहासप्रेमी हृदयाची!

# नाशिक-नगर- जळगांव
# नाशिक जिल्हा
# ईगतपुरी

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते ईगतपुरी | | | | | 120 | | | | |
| **1** | कावनई | | किल्ला | | आश्रम | 16 | NE | | | |
| **2** | त्रिंगलवाडी | गुंफा लेणी | किल्ला | | | 10.5 | NW | 21 | SW | |
| **3** | त्रिंगलवाडी धरण | | | निसर्ग | धरण | 7 | N | 4 | SE | |
| **4** | अलंग, मदन, कुलंग | | किल्ला | | ट्रेक | 20 | SE | 27.5 | SE | |
| **5** | अलंग | | किल्ला | | ट्रेक | 22 | SE | 1.5 | E | |





**दडी मारुन बसलेल्या पावसाने पुन्हा एकदा दमदार आगमन केलंय. पावसाच्या अशा या वातावरणात सह्याद्रीच्या डोंगररांगेत पसरलेल्या कावनई किल्ल्याला भेट देता येईल.**

सह्याद्रीच्या रांगेत बेलगाम कडे, उंच डोंगररांगा, घनदाट जंगलं, मंदिर, लेण्या आणि नैसर्गिक शिबंदी असणारे किल्ले पाहायला मिळतात. नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी परिसरातून सह्याद्रीची रांग पश्चिमेकडे पसरलेली दिसते. या रांगेवर स्वतःचं अस्तित्व दाखवणारे अनेक गडकिल्ले, लेण्या आहेत. असाच स्वतःचं अस्तित्व जपणारा किल्ला म्हणजे कावनई किल्ला. विस्ताराने लहान असणारा हा किल्ला समुद्रसपाटीपासून ९१४ मीटर उंचीवर वसलेला आहे.

कावनई किल्ला गाठण्यासाठी इगतपुरी मार्गावर असणाऱ्या घोटी गावात पायउतार व्हायचं. घोटी गावातून त्र्यंबकेश्वरकडे जाण्यासाठी मोठा फलक लावलेला दिसतो. घोटी फाट्यावरून ७ किमी अंतरावर कावनई किल्ला आहे. या मार्गावर अनेक खाजगी वाहनं आणि बससेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे सहज गडापाशी पोहोचता येतं. पायथ्याशी श्री



अनु.

क्षेत्र कपिलधारा तीर्थ आश्रम हे तीर्थक्षेत्र आहे. कपिलमुनींचा हा आश्रम आहे. इथे मुक्कामही करता येतो.

पायथ्याशी कावनई गावातून गडावर जाणारी पायवाट आहे. या वाटेवर पाण्याची मोठी टाकी दिसते. इथूनच सोंडेवरून गडमाथा गाठता येतो. पावसाने वाट ढासळली असल्याने गावकऱ्यांनी इथूनच नवीन पायवाट तयार केली आहे. साधारण २० मिनिटांत गडाच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराच्या पायथ्याशी असणाऱ्या कातळकड्याजवळ येऊन पोहोचतो. समोरच पण उंचावर असणाऱ्या या प्रवेशद्वारावर जाण्यासाठी सध्या लोखंडी शिडी लावलेली आहे. इंग्रजांनी गडाच्या पायऱ्या फोडलेल्या आहेत. त्यामुळे गडावर पोहोचण्यासाठी १५ फूट उंच ही लोखंडी शिडी चढावी लागते.

गडाच्या प्रवेशद्वारात पोहोचताच समोरच अंगावर येणाऱ्या ३० पायऱ्या आहेत, तर उजव्या हाताला कातळात छोटी गुहा आहे. प्रवेशद्वारातून समोरचा प्रदेश न्याहाळता येतो. या पायऱ्यांनी गडमाथ्यावर पोहोचताच एक वाट डाव्या हाताकडे जाते. या वाटेने जाताना वाड्याचे चौथरे, पाण्याचे टाके दिसतात. उजव्या हाताला पाण्याचं मोठं तळं आहे. याच वाटेने पुढे गेल्यावर तलावाच्या काठावर नागदेवतेची कोरीव प्रतिकृती आहे. इथेच पुढे शंकराची पिंड आणि त्रिशूळ दिसतो. तलावाला वळसा मारून कावनई देवीच्या छोटेखानी मंदिरात जाता येतं.

गडावरून कळसूबाई रांग, उत्तरेला त्रिंबक रांग, पूर्वेला वैतरणा जलाशय असा आजूबाजूला पसरलेला प्रदेश न्याहाळता येतो. साधारण तासाभरात आपली गडफेरी पूर्ण होते. कावनई किल्ल्याचा नामोल्लेख रामायणातही आहे.

छत्रपती शिवाजीमहाराजांनी गुप्त वेषात कावनई किल्ल्याला भेट दिली होती. राज्याभिषेकापूर्वी शिवरायांनी या किल्ल्याला स्वराज्यात सामील करून घेतलं. तर पुढे १८१८ मध्ये या गडाचा इंग्रजांनी ताबा घेतला. गडपायथ्याशी असणाऱ्या श्री क्षेत्र कपिलधारा या आश्रमाला संत ज्ञानेश्वर, गजानन महाराज आणि चीनी प्रवासी युआन श्वाँग यांनी भेट दिली आहे. युआन श्वाँगने या आश्रमाला पितळी घंटा भेट म्हणून दिलेली आहे.

# मस्ट वॉच



**फारसा प्रसिद्ध नसला, तरी गडकिल्ल्यांची आवड असणाऱ्यांनी आडवाटेवरच्या त्रिंगलवाडी किल्ल्याला आवर्जून भेट द्यावी, असाच हा किल्ला आहे.**

प्रशस्त प्रवेशद्वार, प्रवेशद्वाराच्या चौकटीवर कोरीव काम, द्वाराच्या दोन्ही अंगास जाळीदार अवाक्ष, गुहेच्या छतावर वर्तुळात कोरलेली मानवाकृती, गुहेच्या गाभाऱ्यात भगवान बुद्धांची ध्यानस्थ मूर्ती... हे सारं ऐतिहासिक वर्णन आहे, त्रिंगलवाडी किल्ल्याचं. किल्ल्याच्या पायथ्याशी दहाव्या शतकात खोदलेली जैनधर्मीय गुहा सध्या पांडवलेणी म्हणून ओळखली जाते. या गुहेच्या अंगावर वसला आहे रांगडा त्रिंगलवाडीचा किल्ला.

इगतपुरी-नाशिक महामार्गावर इगतपुरीच्या पुढे चार किमी अंतरावर टाकेघोटी गाव आहे. इथून सात किमीवर त्रिंगलवाडी गाव आहे. या गावापासून एक पक्का रस्ता त्रिंगलवाडी किल्ल्याच्या पायथ्याशी जातो. त्रिंगलवाडी गाव ते किल्ल्याचा पायथा हे अंतर तीन किमी आहे. या वाटेच्या डाव्या हाताला प्रशस्त त्रिंगलवाडी जलाशय आहे. गावातून चालत जाणाऱ्यांनी जलाशयाच्या भिंतीवरून जाता येतं. जलाशयाच्या पार्श्वभूमीवर त्रिंगलवाडीचा किल्ला आ वासून उभा असलेला दिसतो. पायथ्याच्या ठाकर वस्तीत पोहोचल्यानंतर एक छोटी पायवाट किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गुहेजवळ येते. चारही बाजूनी डोंगररांगनी वेढलेलं हे ठिकाण पाहताना डोळ्याचं पारण फिटतं, असंच म्हणावं लागेल.

त्रिंगलवाडी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली ही गुहा दहाव्या शतकात निर्माण केलेली आहे. सुरेख नक्षीदार अशा या गुहेत थोडी विश्रांती घ्यावी. लेण्यांचा आतील भाग काही वर्षांपूर्वी संपूर्ण चिखलाने भरलेला होता. पण २००८ मध्ये पुरातत्व विभागाने याची साफसफाई केल्याने ही गुहा पाहण्यासाठी आणि विश्रांतीलायक झाली आहे. गुहेच्या डाव्या हाताने गडावर जाण्यासाठी पायवाट आहे. साधारण अर्ध्या तासाच्या चढाईनंतर गडाच्या माचीवर पोहोचता येतं. माचीवर एक छोटेखानी झोपडी आहे. थोडी विश्रांती घेत बाजूचा सुंदर परिसर न्याहाळता येतो. इथूनच उजव्या हाताने गडमाथ्यावर जाणारी सोंड आहे. या सोंडेच्या वाटेने चालत जाताना थोडे जपूनच. या वाटेवर डाव्या हाताला दगडाला शेंदूर लावलेले स्थानिक देवस्थान आहे. इथून डाव्या हाताने ढासळेल्या तटातून एक वाट वर गेलेली दिसते. इथे कातळात खोदलेल्या पायऱ्या आहेत. या पायऱ्या आता फुटलेल्या अवस्थेत आहे. इथेच डाव्या हाताला कातळात खोदलेला पाण्याचा टाका आहे. थोडं पुढे गेल्यावर गडाचं ढासळलेलं प्रवेशद्वार दिसतं.

प्रवेशद्वारांतून गडावर प्रवेश करताच गडाच्या मध्यभागी दक्षिणोत्तर पसरलेली छोटी टेकडी पसरलेली दिसते. डाव्या हाताला किल्लेदाराचा भग्नावस्थेतील वाड्याचा चौथारा दिसतो. याच वाटेने पुढे गेल्यावर टेकडीच्या मध्यभागी गडमाथ्यावर



अनु.

जाणारी वाट आहे. याच वाटेवर पुढे डाव्या हाताला दोन प्रशस्त गुहा आहेत. काही काळापूर्वी या गुहा स्वच्छ होत्या. पण, सध्या गुरांचा वावर या गुहेत असल्याने इथे मुक्काम करता येत नाही. गडाच्या उत्तर टोकावर एक छोटेखानी मंदिर आहे. या मंदिरात गणपती, शंकर-पार्वती यांच्या शेंदुर लावलेल्या मूर्ती आहेत. या वाटेने गडाच्या सर्वोच्च भागावर जाता येतं. गडमाथ्यावरून सह्याद्रीची अतिशय सुंदर रांग दिसते. इथून त्रिंगलवाडीचा जलाशय, दक्षिणेला इगतपुरी, वैतरणा खोरे, त्र्यंबकरांग, कावनाई, मोरधन असा संपूर्ण प्रदेश न्याहाळता येतो.

कडा आणि टेकडीच्या मधून गेलेल्या पायवाटेने पुढे गेल्यावर कातळात खोदलेल्या पायऱ्या आहेत. तर द्वारावर चंद्र-सूर्याच्या कोरलेल्या प्रतिमा आहे. इथून उजव्या हाताला बारा फूट उंच मारुतीरायाची मूर्ती आहे. त्रिंगलवाडीची गडफेरी पूर्ण करण्यासाठी साधारण दोन तास पुरेसे होतात. त्रिंगलवाडी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात केव्हा आला, याची इतिहासात नोंद नाही. पण १६८८ च्या अखेरीस मोघलांनी फितुरी करून हा किल्ला मराठ्यांकडून घेतला. फारसा प्रसिद्ध नसला, तरी गडकिल्ल्यांची आवड असणाऱ्यांनी आडवाटेवरच्या या गडाला आवर्जून भेट द्यावी असाच हा किल्ला आहे.

## त्रिंगलवाडी धरण

त्रिंगलवाडी धरणसुद्धा लोकांच्या नजरेपासून लांब आहे. पण इथलं निसर्ग सौंदर्य केवळ अप्रतिम आहे. कसाऱ्याहून इगतपुरीला जाताना त्रिंगलवाडी हा बस स्टॉप आहे. सकाळी जाऊन संध्याकाळी किंवा रात्री येणं शक्य असलं तरी हा प्रवास खूप त्रासदायक ठरु शकतो. त्यामुळे रात्री शेवटची कसारा लोकल पकडून कसारा स्टेशनवर उतरावं. मग सकाळी चारची इगतपुरीला जाणारी पहिली बस पकडावी. इथे हॉटेल्सची व्यवस्था नाही. पण गावकरी भोजनाची सोय करतात.

# एएमके (अलंग मदन कुलंग)



जर तुम्हाला दोन तीन दिवस भटकंतीसाठी जायचं असेल तर अलंग मदन कुलंग यासारखा दुसरा पर्याय नाही. ट्रेकर्सच्या शब्दांत सांगयचे तर या ट्रेकला AMK हा कोड आहे. महाराष्ट्रातील सर्वात कठीण ट्रेक अशी AMKची ओळख आहे. राज्याबाहेर किंवा हिमालयात ट्रेकला जाण्यापूर्वी आपली शक्ती आजमावून पाहण्यासाठी हा ट्रेक 'मस्ट' आहे. तसेच हा ट्रेक म्हणजे महाराष्ट्रात तुम्ही कुठेही ट्रेक करू शकता याची पोचपावती आहे असे ट्रेकर्स म्हणतात. नाशिकमधील इगतपुरी जवळील डोंगर रांगांमध्ये सर्वात कठीण असे तीन किल्ले आहेत. AMK ट्रेक करण्यासाठी प्रस्तरारोण (रोप्सच्या मदतीने चढाई) तंत्राची व साहित्याची माहिती असणे आवश्यक आहे. घोटीवरून भंडारदऱ्याच्या दिशेने जाताना कळसूबाई शिखराच्या रांगेतून डोकावणारे अलंग, मदन आणि कुलंग हे किल्ल्यांचे त्रिकूट सहज ओळखता येते. घनदाट जंगलातील प्रदेश आणि विरळ लोकवस्तीमुळे हा भटकंती करणाऱ्यांसाठी उत्तम तर, नवख्यांचा कस पाहणारा आहे.

## काय पहाल?

किल्ल्याचा माथा म्हणजे एक प्रशस्त पठारच आहे किल्ल्यावर राहण्यासाठी दोन गुहा आहेत. पाण्याची ११ टाकी आहेत. किल्ल्यावर इमारतीचे काही अवशेष आहेत. एक छोटेसे मंदिर आहे. किल्ल्यावरून आजुबाजूचा खूप मोठा परिसर दिसतो. पूर्वेला कळसूबाई, औंढाचा किल्ला, पट्टा, बितनगड, उत्तरेला हरिहर, त्र्यंबकगड, अंजनेरी तर, दक्षिणेला हरिश्चंद्रगड, आजोबाचा गड, खुट्टा सुळका, रतनगड, कात्राबाईचा डोंगर हा परिसर दिसतो. किल्ल्याचा माथा फिरण्यास ४ तास पुरतात.

## पोहोचण्याच्या वाटा:

### आंबेवाडी मार्गे:

- अलंग किल्ल्यावर जाण्यासाठी इगतपुरी किंवा कसारा गाठावे. इगतपुरी/ कसारा- घोटी- पिंपळनेरमोरमार्गे आंबेवाडी गाठावी. घोटी ते आंबेवाडी एस.टी. सेवादेखील उपलब्ध आहे. घोटी ते आंबेवाडी हे साधारण ३२ किमीचे अंतर



आहे. घोटीवरून पहाटे आंबेवाडीला सकाळी ६ वाजताची बस आहे.

- आंबेवाडीतून समोरच अलंग, मदन आणि कुलंग हे तीन किल्ले दिसतात. गावातूनच अलंग आणि मदन किल्ल्याच्या खिंडीपर्यंत जाण्यासाठी वाट आहे. वाट फारच दमछाक करणारी आहे. खिंड गाठण्यास ३ तास लागतात. खिंडीत पोहचल्यावर डावीकडचा अलंग किल्ला, तर उजवीकडचा मदन किल्ला. येथून अलंगवर जाण्यासाठी दोन वाटा आहेत.
- एक वाट खिंडीतून समोरच्या दिशेने खाली उतरते. १ तासात आपण खालच्या पठारावर पोहोचतो. येथून अलंगचा कडा डावीकडे ठेवत १ तासात आपण किल्ल्यावरून येणाऱ्या तिसऱ्या घळीपाशी पोहोचतो. या घळतीच एक लाकडी बेचका ठेवला आहे. या बेचक्यातून वर गेल्यावर थोडे सोपे प्रस्तरारोहण करावे लागते. पुढे थोडीशी सपाटी लागते. येथून डावीकडे कड्यालगत जाणारी वाट पकडावी. १० ते १५ मिनिटांत आपण किल्ल्यावरील गुहेत पोहोचतो. आंबेवाडीतून येथपर्यंत पोहचण्यास ८ ते ९ तास उलटून गेलेले असतात.
- खिंडीतून डावीकडच्या वाटेने थोडे पुढे गेल्यावर सोपे प्रस्तरारोहण केल्यावर काही पायऱ्या लागतात. या पायऱ्या चढून गेल्यावर एक ८० ते ९० फुटांचा सरळसोट तुटलेला कडा लागतो. या कड्यावर प्रस्तरारोहणाचे साहित्य वापरून किल्ल्यावर प्रवेश करता येतो. प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असल्याशिवाय या वाटेने जाण्याचे धाडस करू नये. या वाटेने किल्ला गाठण्यास ६ तास लागतात.



# रांगडा दुर्ग

दुर्गम वाटा, गगनभेदी रांगा, अजस्त्र असा सर्व अनुभव आपल्याला या सह्याद्रीच्या रांगेत अनुभवायला मिळतो. ऐन पावसात धुक्यात हरवलेल्या वाटा, दाटून येणारे ढग आणि रिपरिपणारा पाऊस हे सारं अनुभवायला मिळेल ते महाराष्ट्राच्या सर्वोच्च शिखराशेजारील 'अलंग, कुलंग, मदन' या किल्ल्यांवर.

अलंग गडावर जाण्यासाठी इगतपुरी बस स्थानकापासून घोटी मार्गे पायथ्याच्या आंबेवाडी गावात पायउतार व्हायचं. गावातून एखादा वाटाड्या घेतला तर फार बरे. गावातून मदन गड डाव्या हाताला ठेवून अलंग-मदन खिंडीत यायला साधारण तासाभर लागतो. राकट आणि रौद्र शब्द कशासाठी वापरतात याची प्रचीती इथे आल्यावर येते. खिंडीत घोंघावणारा वारा, दाटून येणारे ढग सारं काही स्वप्नवत वाटतं. मदन गडाप्रमाणे इंग्रजांनी याही किल्ल्याच्या पायऱ्या सुरुंग लावून फोडलेल्या आहेत.

अलंग चढाईसाठी प्रस्तरारोहण (रॉक क्लाबिंग)आवश्यक आहे. रॉक क्लायबिंगचा अनुभव असेल, तर चढाईला सुरुवात करा नाहीतर खिंडीतून दक्षिणेकडील जाणारा सोपा मार्ग वापरणं अधिक सोपं. वाटेत धबधबे, ओढा, दाटलेली झाडी हा सारा निसर्ग न्याहाळता येतो. हा प्रवास गिर्यारोहकांची परीक्षाच घेत असतो. नैसर्गिक तटबंदी असलेली या किल्ल्याची वाट अगदी मुंगीच्या पावलाने चढावी लागते. साधारण पंधरा फूटाचं रॉक क्लायबिंग केल्यावर गडावर प्रवेश मिळतो. एवढा आटापिटा केल्यानंतर गडप्रवेश म्हणजे स्वर्गाच्या दारातून प्रवेश केल्यासारखंच वाटतं.

इगतपुरीपासून अलंगची डोंगररांग साधारण १५ किमी आहे. पायथ्याचं आंबेगाव हे नाशिक जिल्ह्याच्या इगतपूरी तालुक्यात येतं, तर एक वाट नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील घाटघर या गावातून आहे. अलंग गडाची नागमोडी वाट पार करताना

**राकट आणि रौद्र शब्दांचा प्रत्यय अनुभवायचा असेल, तर गिर्यारोहकांसाठी अलंग, कुलंग आणि मदन किल्ले परफेक्ट ऑप्शन आहेत.**




सह्याद्रीच्या रांगडेपाणाची प्रचिती येते. गडावर पोहोचण्यासाठी वळणावळणाचं साधारण दोन किमी अंतर कापावं लागतं. गडावर पोहोचताच समोरच दिसणारा मदन गड हाताच्या अंतरावर असल्यासारखा भासतो. पण या दोन्ही किल्ल्यांच्या तटाच्या मध्ये तीस मीटरची खोल दरी आ वासून बघत असते. अलंग गडच्या माथ्यावरून कळसूबाई शिखररांग, माहुली, नानेघाट, सिद्धगड अशी संपूर्ण डोंगररांग नजरेस पडते.

अनेक वर्षांपासून मोजकेच गिर्यारोहक या दुर्गांकडे वळतात. यामुळे निसर्ग अजून टिकाव धरुन असलेला दिसतो. गडावर प्रवेश करताच माथ्यावर कातळात बौद्धकालीन कोरीव गुहा आहेत. गुहेकडे जाण्यासाठी कातळात कोरलेल्या उंच पायऱ्या आहेत. इथेच वरच्या भागात प्रशस्त गुहा आहे, तर शेजारीच पाण्याचे टाके आहेत. इथेच एक दगडावर गणेशाची ताशीव मूर्ती आहे. या शांत वातावरणात भयाण गुढता जाणवते. पावसात घोंघावणारा वारा, पाऊस सारं काही फोटोत कॅच करावंसं वाटतं. या पठरावावर दहा-बारा पाण्याने भरलेले टाके तुडुंब भरलेले दिसतात.

शिवकाळात या गडाचा फारसा उल्लेख आढळत नाही. १६२९ मध्ये ख्वाजा अबुल हसन आठ हजाराचं घोडदळ घेऊन नाशिक-संगमनेर काबीज करण्यासाठी आला होता. तेव्हा पावसाळा संपेपर्यंत जवळच्या धालिया गावात त्याचा मुक्काम होता. पुढे इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी तोफा डागून या किल्ल्याच्या वाटा फोडल्या. पण, या दुर्गम गगनभेदी गडावर जाण्याचं धाडस आजही सह्याद्रीचा मावळा मोठ्या श्रद्धेने करतो.

# नाशिक

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते नाशिक | | | | | 168 | | | | |
| 1 | बिष्टागड | किल्ला | | | ट्रेक | 119 | NE | | | |
| 2 | साल्हेर - सालोटा | किल्ला | | मंदिर | ट्रेक | 110 | NE | 42 | W | |
| 3 | सापुतारा | हिलस्टेशन | बोटॅनिकल गार्डन | | तलाव | 79 | N | 55 | SW | |
| 4 | हातगड | किल्ला | | | | 74 | N | 7 | SE | |
| 5 | अचला | किल्ला | | | | 57 | N | 26.5 | SE | |
| 6 | सप्तशृंगीगड | | | मंदिर | | 65 | NE | 25.5 | SE | |
| 7 | धोडप | किल्ला | | | ट्रेक | 73 | NE | 45.5 | E | |
| 8 | रामसेज | किल्ला | | | | 15 | NW | 78.5 | SW | |
| 9 | सुला वाईनरी | | वाईनरी | | | 15 | NW | 26 | SW | |
| 10 | दावलेश्वर | समाधी | धबधबा | नदी | ट्रेक | 76 | NW | 69 | NW | |
| 11 | दुगारवाडी | | धबधबा | | | 37 | SW | 54 | SE | |
| 12 | त्र्यंबकेश्वर | | | मंदिर | | 29 | SW | 9 | E | |
| 13 | ब्रम्हगिरी | किल्ला | | | | 32 | SW | 3 | SW | |
| 14 | सिन्नर | | शिल्पे | मंदिर | | 29 | SE | 59 | SE | |






अनु.



बिष्टागड, साल्हेरपासून पूर्वेला पसरलेल्या डोंगररांगेवर उभा असणारा एक किल्ला. नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात समुद्रसपाटीपासून १०३० मीटर उंचीवर असलेला हा गड स्थानिक लोकांमध्ये 'गवळी राजाचा किल्ला' या नावाने परिचित आहे. प्राचीन गुहा, कातळकोरीव टाकी व वाड्याचे चौथरे बाळगून उभा असणारा हा गड याच्या अवघड नाळेच्या वाटेमुळे दुर्गम आहे.

# अवघड नाळेचा बिष्टागड

बिष्टागडास भेट देण्यासाठी प्रथम नाशिक जिल्ह्यातील सटाणा या तालुक्याच्या गावी पोहोचावं लागतं. येथील बसस्थानकावरून सटाणा-नामपूर बस पकडून मार्गावरील खिरमणी गावाच्या फाट्यावरून पायउतार व्हायचं. या फाट्यावरून साधारण एक किलोमीटर चालल्यावर पहिल्यांदा खिरमणी गाव व तेथून पुढे आणखी दोन किलोमीटरवर बिष्टागडाशेजारचं कोटबेल गाव लागतं. कोटबेलमधून बिष्टागडाचा माथा चांगला दोन तासाच्या पायपीटीचा आहे. गावाच्या पिछाडीस टेलिफोनचा टॉवर असून तेथून डांबरी सडकेच्या डाव्या बाजूनं जाणारी पायवाट बिष्टागडाकडे जाते. पहिल्यांदा एक ओढा पार करून पुढे शेतवडीतून बांधाबांधाच्या वाटेनं पुढे वाटचाल करावी लागते. टॉवरपासून
साधारण पाऊण तासात गडाशेजारच्या एका टेकडीच्या पायथ्याला येऊन पोहोचतो.

## दक्षिण बाजू बरी

बिष्टागडाला त्याच्या उत्तरेच्या खिंडीतून वर चढणारी वाट आहे. पण ही वाट काटेरी निवडुंगाच्या नाळेतून वर चढणारी व बऱ्यापैकी अवघड असल्यामुळे या नाळेतून न जाता दक्षिण बाजूनं वर चढायचं. त्यासाठी गडाच्या डोंगराला डाव्या हातानं पूर्ण वळसा मारून खालच्या बाजूकडील पठारावर पोहोचायचं. गडाच्या पिछाडीस म्हणजे पश्चिमेला गडाला खेटूनच एक डोंगर उभा असून हा डोंगर व गड यांच्यामधून वर जाणाऱ्या वाटेने गड जवळ करायचा. ही वाट तशी सहजसोपी असल्यामुळे १५-२० मिनिटांत माथ्याशेजारी पोहोचता येते. या ठिकाणी डाव्या हाताला गडाच्या पोटाच्या कातळात खोदून काढलेल्या चार प्रशस्त गुहा असून त्यांच्या खालचा टप्पा कोसळल्यामुळे या गुहेत जाण्यासाठीची पायवाट थोडी अवघड झाली आहे. गुहा लांबूनच बघून गडमाथ्यावर पोहोचणं सोयीस्कर ठरतं.

## गवळी राजाच्या वाड्याचे चौथरे

माथ्यावर वाटेच्या डाव्या हातासच पिण्यायोग्य थंडगार पाण्याचं टाकं असून त्याचं पाणी मात्र थोडं खालच्या बाजूस आहे. हे टाकं पाहून त्याच्या शेजारून वर चढणाऱ्या कातळकोरीव पायऱ्यांनी अंतिम माथा गाठायचा.

माथा बराच मोठा असून त्याच्या मध्यभागी सपाटीवर शिबंदीच्या घरट्यांचे चौथरे पाहायला मिळतात. हे १५-२० काळ्या पाषाणातील वाड्यांचे चौथरे पाहिल्यानंतर या गडावर इतिहासकाळात बऱ्यापैकी शिबंदी असेल याची कल्पना येते. या चौथऱ्यांना गवळी राजाच्या वाड्याचे चौथरे म्हणतात.

## नैसर्गिक कातळकडे

हे चौथरे पाहून गडावरील सपाट पठाराच्या काठाकाठाने सहज एक गडफेरी मारायची. या फेरीत नैसर्गिक कातळकड्यांमुळे या गडास तटबंदी बांधण्याची गरजच भासलेली नाही, हे पटकन लक्षात येतं. गडाच्या माथ्यावरून भवानी मातेचं मंदिर व कोरडी टाकी असणारा कऱ्हागड, अजमेरा किल्ला, दुंधागड, पिसोळगड व डेरमाळ असा बराच लांबवरचा मुलुख न्याहाळता येतो. वर वर्णन केलेल्या अवशेषांशिवाय बिष्टागडावर तसे फारसे दुर्गअवशेष नसल्यामुळे गडाच्या फेरीस पाऊण तासाचा वेळ पुरतो. बिष्टागडाची एकंदरीत बांधणी पाहता हा गड शिवपूर्वकालीन आहे, हे सहज ओळखता येतं. स्थानिक लोक या गड 'गवळी राजाचा किल्ला' म्हणतात.

शिवकाळात बिष्टागड मोगलांच्या ताब्यात होता. या व्यतिरिक्त या ग फारसा इतिहास उपलब्ध नाही. बिष्टागड पाहून आपणास सटाण्याला पर वाटेतील दोधेश्वर हे रम्य झाडीतील महादेव मंदिर पाहता येईल. हे ठिकाण सुंदर असून येथे बारमाही पिण्याच्या पाण्याची सोय व शेजारीच धर्मशाळा आ भागातील हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथे आजूबाजूच्या लोकांचा नेहमी असतो.






अनु.

ते अनुभवलेले क्षण मला आजही आठवतात. नाशिक इथला ऐतिहासिक बागलाण प्रदेश, पाठीवर १५ किलो वजन घेऊन जवळपास ३८ तासांची चढाई, सोसाट्याचा वारा, निर्मनुष्य प्रदेश, पूर्ण किल्ल्यावर आम्ही दोघंच, डाव्या बाजूला पहिलं तर एकावर एक डोंगररांगांचं दृश्य, उजव्या बाजूला गुजरात बॉर्डर आणि एखादं दुसऱ्या गाडीचा लांबवर दिसणारा मिणमिणता प्रकाश. हातात गरमा गरम मान्चाऊ सूप. चमच्यात घेतलेलं गरम सूप तोंडापर्यंत येतानाच गार व्हायचं इतका वारा. अशा स्वप्नवत ठिकाणी मी येऊन पोहोचलो होतो. अशा सुखाची अनुभूती ज्याची त्यानंच घ्यायला हवी. नाशिकच्या बागलाण तालुक्यातली डोंगररांग म्हणजे भटक्यांसाठी पर्वणीच. साल्हेर, सालोटा, मुल्हेर, मोरागड, हरगड, मांगी-तुंगी, तांबोळया, न्हावी, रतनगड असे एकापेक्षा एक देखणे किल्ले या भागात असल्यानं ट्रेकर्सची इथं चैन असते. या दुर्गांचा इतिहास ऐकल्यावर मन वेडं होऊन जातं.

## साल्हेर-सालोटा

आमच्या स्वप्नातीत ट्रेकची सुरुवात झाली ती साल्हेर सालोटा ट्रेकनं. एका शनिवारी पूर्ण दिवस प्रवास करून (पुणे- सटाणा- वाघाम्बे) साल्हेर किल्ल्याच्या पायथ्याच्या गावाशी पोहोचलो. साल्हेर हा महाराष्ट्रातला सर्वांत उंच किल्ला आहे. उंची ५१४१ फूट (१५६७ मीटर) आहे. सालोटा हा तिसरा उंच किल्ला असून उंची ४९८६ फूट आहे.

साल्हेरचा किल्ला सटाण्याच्या पश्चिमेला आहे. अंदाजे ३५ ते ४० कि. मी. अंतरावर असलेल्या साल्हेर किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी दोन गाडीमार्ग आहेत. एक ताहराबाद-मुल्हेरकडून वाघांबे या पायथ्याच्या गावापर्यंत जातो. तर, दुसरा मार्ग सटाणे-तिळवणकडून साल्हेर किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या साल्हेर गावापर्यंत जातो. वाघाम्बे गावातून जाणारा रस्ता हा थोडा अवघड असला तरी कमी वेळात आपण किल्ल्यावर पोहोचतो. या वाटेनं गेल्यास सालोटा किल्ला पण करतां येतो. सामान जास्त असेल, तर किंवा सालोटा किल्ल्यावर जाताना सामान घेऊन न जाता साल्हेर सालोटा मधल्या खिंडीमध्ये ठेवून जायचं असेल तर २०० रुपये देऊन गावातून माणूस येऊ शकतो. सालोटा किल्ल्यास दोन दरवाजे आहेत. पहिला दरवाजा दरड पडल्यामुळे जवळपास बंद होण्याच्या मार्गावर आहे. कातळ खोदून केलेल्या वाटा जास्त उंचीच्या असल्याने सुमारे एका तासात आपल्याला किल्ल्यावर घेऊन जातात. या किल्ल्याचा पूर्वी साठवणीसाठी उपयोग होत असावा. इथं पाणी मात्र नाहीये. इथून दिसणारं साल्हेर किल्ल्याचं पिरॅमिडसारखे रुप डोळ्यात भरतं. साल्हेर किल्ला सह्याद्रीतलं कळसूबाई नंतरचं दुसऱ्या क्रमांकाचं शिखर आहे.

सालोटा उतरून खिंडीत आल्यावर, तिथून आपण चार ते पाच तासात साल्हेर किल्ल्यावर मुक्कामी जाऊ शकतो. साल्हेरवर जाण्याच्या मार्गात अनेक गुहा आणि पाण्याची टाकी दिसतात. किल्ल्यावर दोन गुहा असून राहण्यासाठी योग्य आहेत. किल्ल्यावर पाण्याच्या टाक्या असून गुहेच्या समोरच गंगासागर तलाव आहे. या किल्ल्यावरचं सर्वात बघण्यासारखं ठिकाण म्हणजे महाराष्ट्रातील सर्वात उंच असं परशुराम मंदिर. गुहेपासून ४५ मिनिटे चालून गेल्यावर छोटी टेकडी दिसते. त्यावर हे मंदिर बांधलेलं आहे. तिथून आजूबाजूच्या परिसराचं विहंगम दृश्य आपले डोळे दिपवून टाकतं. थंड गार वारा, महाराष्ट्रातील सर्वात उंच असं मंदिर, तिथून दिसणारा सालोटा, सूर्यास्ताला पश्चिमेकडे येणारी केशरी झळाळी, क्षितिजावर लुप्त होणारा सूर्य. केवळ अप्रतिम असा अनुभव. या किल्ल्याच्या दोन्ही वाटांनी जाताना प्रत्येकी ६ दरवाजे लागतात. वाटेत प्रवेशद्वाराजवळ कोरलेले शिलालेख, दगडात कोरलेले गणपती, कातळात कोरलेल्या पायऱ्या आणि बुलंदी असे बुरूज अन तटबंदी आपल्याला इतिहासाची साक्ष देतात. वाघाम्बे गावातून चढाई करून दुसऱ्या दिवशी साल्हेरवाडी गावातून उतरावं. वाघाम्बे गावातून पश्चिमेकडून चढाई असल्यानं उन्हाचा त्रास होत नाही. येथे पाहण्यासारखे अनेक स्पॉट असल्यानं जास्त वेळ हाताशी ठेवावा. एकूणच बागलाणचे शिलेदार तुम्हाला खूप अविस्मरणीय अनुभव देतील एवढं मात्र नक्की.

### सापुतारा

नाशिकमधलं सापुतारा हे हिलस्टेशन म्हणजे मिनी महाबळेश्वर. पण महाबळेश्वरच्या गलक्यापासून ते दूर आहे. इथला रोपवे आणि त्या स्पॉटवरून दिसणारा सूर्यास्त फारच स्मरणीय असतो. लेकमध्ये बोटिंग, उंटावरची राइड आणि बोटॅनिकल गार्डन तसंच डांगच्या आदिवासींचं म्युझिअम इथे पाहण्यासारखं आहे. नाशिकहून सापुताऱ्याला जाण्यासाठी एसटीची बस मिळू शकते. स्वत:ची गाडी असल्यास मुंबईहून पाच-साडेपाच तासात सापुताऱ्याला पोहोचता येतं. खवय्यांसाठी इथे गुजराथी फूडची लज्जत असते आणि बहुतांश हॉटेल्समध्ये निवास आणि न्याहरी-भोजन यांचं एकत्रित पॅकेज असतं. गुजरात टुरिझमच्या गेटवे ऑफ इंडियाजवळच्या ऑफिसातही याचं बुकिंग होऊ शकतं. तसंच खाजगी टुरिस्टवाले इतर हॉटेलांचं बुकिंग देतात.

# सीमेवरचा चौकीदार



नाशिक जिल्हाही सह्याद्रीच्या अनेक रांगा, उपरांगांच्या कुशीत वसलेला आहे. अजंठा सातमाळ, गाळणा टेकड्या, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर आणि औंढापट्टा यांचा भक्कम आधार नाशिकला आहे. अजंठा सातमाळ रांगेची सुरुवात हातगडापासून होते. वणी सापुतारा मार्गावरचा महाराष्ट्राच्या सीमेवरचा सगळ्यात शेवटचा गड म्हणजे 'हातगड'. नावाप्रमाणेच तो नाशिकहून सापुताऱ्याला जाणाऱ्यांना हात दाखवून महाराष्ट्राला निरोप देतो.

अजंठा सातमाळ रांगेतल्या किल्ल्यांच्या उंचीचा आलेख काढला तर यात हातगडाची उंची सर्वात कमी. समुद्रसपाटीपासून ३५०० फूट. गडावर जाण्यापूर्वी पायथ्याशी हातगडवाडी गाव लागतं. ते बरंच जुनं असावं. आजही या गावानं आपल्या काही ऐतिहासिक खुणा जपल्यात. गावात बरेच जुने वाडे आढळतात. रस्त्याच्या बाजूलाच विटांची बांधलेली फार जुनी दिसणारी अशी विहीर आहे. चुन्याचा मोठा घाणाही आहे. या सर्व गोष्टी पाहून हा गडाच्या खाली असणारा मेटाचा भाग असावा असं वाटतं.


हातगवाडीमधून गडाला वळसा घालून एक रस्ता कळवणलासुद्धा जातो. गाव गडाला वळसा घालून येणारं आहे. गावातून गडाच्या डाव्या टोकाकडे पाहिल्यावर छोटंसं प्रवेशद्वार दिसतं. हेच गडाचं मुख्य द्वार, पण इथपर्यंत पोहचण्यासाठी आपल्याला शाळेत शिकलेल्या भूमितीचा आधार घ्यावा लागतो. गडाच्या उजव्या टोकापाशी मोठा डेरेदार वृक्ष आहे. गावातून तिथपर्यंत पोहोचायला पंधरा मिनिटं लागतात. या झाडापासून प्रवेशद्वारापर्यंत एक तिरपी रेघ मारायची. ही तिरपी रेघ म्हणजे गडावर जाण्याची वाट. अर्ध्या तासात आपण गडाच्या पहिल्या दरवाज्यापाशी पोहोचतो.

प्रत्यक्ष हातगडावर प्रवेश करण्यापूर्वी तीन दरवाजे पार करावे लागतात. पहिला दरवाजा खूपच ढासळलेल्या अवस्थेत असल्यानं त्याचा एकच खांब शिल्लक आहे. प्रवेशद्वाराच्या अलिकडेच, वर उजवीकडे कातळात खोदलेली पाण्याची टाकी आहे. टाक्याच्याच खालच्या बाजूला एक शिल्पसुद्धा कोरलेले आहे. प्रवेशद्वारातून आत शिरलो की वाट उजवीकडे वळते. येथे कातळात खोदलेली प्रशस्त गुहा

**उंची : ३५०० फूट ( समुद्रसपाटी )**
**पायथ्याचे गाव हातगडवाडी**
**डोंगररांग : अजंठा सातमाळ**
**जवळचे ठिकाण : नाशिकपासून १०० कि.मी.**

## कसं जायचं ?

**हातगडाला जाण्यासाठी नाशिक बस स्थानकावरून सापुताऱ्याला जाणाऱ्या एसटीमध्ये बसायचं आणि नाशिकपासून ९६ कि. मी. अंतरावरच्या बोरगावला उतरायचं. आपलं नशिब चांगलं असलं तर बोरगावपासून हातगडवाडीपर्यंत जाण्यासाठी काही वाहन मिळू शकतं, नाहीतर आपली पायगाडी चालू करायची आणि ४ कि. मी. अंतरावरच्या हातगडवाडीत दाखल व्हायचं.**



आहे. तीन खोल्या असलेली. काहीशी खोल. कदाचित या गुहा म्हणजे पाण्याची टाकं असावीत. ती फुटल्यामुळे सध्या कोरडी पडलेली आहेत. गडाचा दुसरा दरवाजा हा संपूर्ण कातळात खोदलेल्या बोगद्यासारखा आहे. गडावरून येणारे बरेचसे दगड वाटेत पडलेले असल्याने जरा जपूनच चालावं लागतं. हा मार्ग पार केला की, गडाचं तिसरं प्रवेशद्वार लागतं. ते अजूनही चांगल्या स्थितीत उभं आहे. प्रवेशद्वारातून थोडं वर चढलं की आलाच गडमाथा.


गडमाथ्यावर आल्यावर आपण क्षणभर बुचकळ्यातच पडतो कारण आपण ज्या मार्गाने किल्ल्यावर आलेले असतो तो मार्ग मागे वळून पाहिल्यावर दिसतच नाही. गडमाथा बराच विस्तिर्ण आहे. माथ्यावरून एक पायऱ्यांची वाट डावीकडे खाली जाते. तटावर कमानीसारखा भाग कोरलेला दिसतो यालाच महिरपी म्हणतात. गडावरच्या बांधकामावरून तो मोगलांच्या वर्चस्वखाली बराच काळ असावा असं वाटतं. या भागात सुकलेलं एक पाण्याचं टाकं आहे. या सर्व गोष्टींच्या मनात आणि शक्य असल्यास वहीत नोंदी करायच्या आणि प्रवेशद्वाराच्या उजवीकडची वाट धरायची. गडाचा हा भाग बराच प्रशस्त आहे. समोरच पडक्या इमारती दिसतात. यापैकी एक इमारत अजूनही चांगल्या अवस्थेत उभी आहे. या इमारतीच्या बांधणीवरून ते धान्यकोठार असावं असं वाटतं. याच्या मागच्या बाजूला एक सुटावलेला बुरुजसुद्धा आहे पण त्याचं प्रयोजन काय असावं, ते समजत नाही. इथल्या तलावाच्या मध्यभागी एक खांब उभा आहे. इमारतीच्या बाजूला असलेल्या ध्वजस्तंभापासून एक वाट गडाच्या पश्चिम टोकापाशी जाते.

पश्चिम टोकाकडे जाताना वाटेत काही पाण्याची टाकी लागतात. घरांचे आणि वाड्यांचे अवशेषही विखुरलेले दिसतात. गडाच्या या शेवटच्या टोकाला थोडीफार तटबंदी शिल्लक असलेली दिसते. येथून दूरवर असणाऱ्या साल्हेर आणि सालोट्याचं दर्शन होते. महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवरचा हा किल्ला. त्यामुळे शिबंदी जास्त असणं सहाजिकच आहे.

इतकं वणवण फिरून झालं की एखादं डेरेदार झाड किंवा पडक्या इमारतीचा आसरा शोधायचा आणि पोटातले कावळे शांत करण्यासाठी डबा उघडायचा!

# अपरिचित 'अचला'

नाशिक जिल्ह्याच्या मध्यभागातून अजंठा-सातमाळा ही सह्याद्रीची एक उपरांग पूर्वपश्चिम अशी पसरली आहे. या पूर्वपश्चिम पसरलेल्या रांगेमध्ये अनेक दुर्ग आहेत. या गिरीदुर्गांच्या मालिकेमध्ये नामवंत दुर्गांबरोबरच काही अपरिचित दुर्गही सामावलेले आहेत. अजंठा-सातमाळा रांगेची सुरवात होते, तीच अचला नावाच्या अपरिचित किल्ल्यापासून.



रांगेच्या सर्वांत पश्चिमेकडे असणाऱ्या अचला किल्ल्याला नाशिकमधून राज्य परिवहनच्या बसची सोय आहे. नाशिक ते सापुतारा, अशा बस धावतात. सापुतारा हे थंड हवेचं ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालं आहे. सापुताऱ्याच्या रस्त्यावर सप्तश्रृंगगडाच्या दक्षिण पायथ्याला वणी हे प्रसिद्ध गाव आहे. वणीच्या पुढे पिंपरी अचला या गावाचा फाटा लागतो. या फाट्यावर उतरून आपल्याला पिंपरी अचला हे किल्ल्याच्या पायथ्याचं गाव गाठावं लागतं.

गावच्या उत्तरेलाच समुद्रसपाटीपासून १२५० मीटर उंचीचा अचलाचा किल्ला दिसतो. किल्ल्याच्या पश्चिम अंगाला त्रिकोणी आकाराचा तवल्या डोंगर आपलं लक्ष वेधून घेतो. पूर्वपश्चिम पसरलेला अचला किल्ल्याच्या पूर्वेकडे एक लहानशी खिंड दिसते. या खिंडीमधून अचलावर जाण्याचा सोयीचा मार्ग आहे. गडावर पोहोचेपर्यंत वाटेत पाणी नाही. म्हणून गावातूनच पाणी सोबत नेणं सोयीचं आहे. गावातून अर्ध्या-पाऊण तासात आपण खिंडीत पोहोचतो. खिंडीतून डावीकडे (पश्चिमेकडे) जाणाऱ्या वाटेनं चढाई सुरू केल्यावर आपण अचलाच्या कड्याजवळ पोहोचतो. अचलाचा माथा डावीकडे ठेवून आपण त्याच्या उत्तरअंगाला येतो.

अचलाच्या उत्तरअंगाला येऊन पश्चिमेकडे चालत गेल्यावर एका घळीतून माथ्यावर जाण्याचा मार्ग आहे. या मार्गाशिवाय अन्य बाजूनं अचलागडावर जाण्यासाठी मार्ग नाही. अचला गडाच्या माथ्यावर पोहोचेपर्यंत साधारण दोन तास तरी लागतात. अचलागडाचा डोंगर चारही बाजूनं ताशीव असल्यामुळे गडाला संरक्षणाच्या दृष्टीनं फारश्या तटबंदीची आवश्यकता नाही. गडाचा उत्तर भाग बंदिस्त केल्यास गडाचं संरक्षण होऊ शकतं. गडावर गड असल्याच्या तुरळक खाणाखुणा आपल्याला पाहायला मिळतात. अचलागडापासून तवल्या उत्तम दिसतो. सापुतारा व हातगड उत्तरेकडे दिसतात. दूरवर साल्हेर सालोरा तसेच कंडाण्याचे दर्शन होते. पूर्वेला सातमाळा रांगेतील अहिवंत, सप्तश्रृंगी, धोपड इत्यादी किल्ले तसेच रामसेज, देहेरही दिसतात. या गडदर्शनासाठी अर्धा तास पुरतो. पुन्हा आल्यावाटेनंच खाली उतरून खिंड गाठावी लागते. या खिंडीतून अहिवंतगडाला जाता येतं. अथवा पुन्हा पिंपरी अचला गाठून परतीच्या मार्गाला लागता येतं.

## महिषासूरमर्दिनी...

# सप्तश्रृंग भगवती



दूरवर पसरलेली अजंठा-सातमाळ डोंगररांग प्राचीन काळापासून आपलं स्वतंत्र अस्तित्व ठेऊन आहे. परंपरा सांगते की हा दंडकारण्याचा भाग होता. उत्तरेला सालबेरी-डोलबेरीच्या पर्वतरांगा, दक्षिणेला त्र्यंबकेश्वर पश्चिमेला जव्हार तर पूर्वेला चांदवड आहे. या डोंगररांगांच्या महाकाय कातळांवर मार्कंड्या, रावळ्या-जावळ्या, धोडप, इकारिया, अहिवंत असे अनेक बेलाग किल्ले या प्रदेशाच्या मातब्बरीची साक्ष देत आजही मोठ्या गर्वाने उभे आहेत. अशा या जबरदस्त मुलखाची स्वामिनी आहे सप्तश्रृंगवासिनी भगवती.

लोककथा सांगते की महिषासूर या अतिशक्तीशाली आणि निर्दयी राक्षसाने पाताळाचे आणि मृत्यूलोकाचे सर्व राक्षस जमा करून पृथ्वीवर धुमाकूळ घातला. यज्ञांचा विध्वंस, गायी-ब्राह्मणांचा संहार करून सगळं जनजीवन अस्ताव्यस्त करून टाकलं. इतकंच नव्हे तर त्यांनी इंद्राच्या अमरावतीवरदेखील चाल करून इंद्राचा पराभव केला.

शेवटी सगळ्या देवांनी कैलासावर जाऊन शंकराची प्रार्थना केली. भगवान शंकर म्हणाले की हा दुराचारी असूर आपल्या हातून मरणार नाही. आपण सर्वांनी आपलं आत्मतेज शक्तीमायेच्या रूपाने एकत्र केलं तरच हे कदाचित शक्य आहे. त्यानुसार मग या आत्मतेजाच्या तेजोलयातून एक सुंदर अष्टदशभुजरूप निर्माण झालं. तीच ही सप्तश्रृंग माता. तिने महिषासूराबरोबरच इतरही सर्व दैत्यांचा निःपात केला.

परंपरा असंही सांगते की सप्तश्रृंगगडावर प्रभू रामचंद्रांनी शक्तीची उपासना केली होती. अलिकडच्या काळात संत ज्ञानेश्वर आणि नामदेव हे संतशिरोमणी देवीच्या गडावर आले होते. याचा पुरावा म्हणजे नामदेवांचा 'आता त्वरे चला तुम्ही सप्तश्रृंगा... कार्य पांडुरंगा सिद्धी न्यावे' हा अभंग. ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताई या भावडांनी समाधी घेतल्यावर सर्वात वडील असलेल्या निवृत्तीनाथांना फार खंत लागली होती. त्यांना लवकरात लवकर सप्तश्रृंगडावर पोहोचायचा ध्यास लागला होता. रामदासस्वामीही देवीच्या दर्शनाला आले होते. महाराजांनी सुरत लुटल्यावर परतीच्या प्रवासात गडावर जाऊन दर्शन घेतलं होतं. नाथसंप्रदायासाठी तर हे स्थान अत्युच्च श्रद्धेचं आहे. मच्छिंद्रनाथांनी इथे देवीची एकदम कडक उपासना केली होती. देवीने प्रसन्न होऊन त्यांना दर्शन दिलंच पण पुढचा मार्गही दाखवला.

नाशिकपासून सप्तश्रृंगीगड उत्तरेला ५०-५५ कि.मी.वर आहे. हे साडेतीन पीठातलं एक स्थान असून एका उंच डोंगरावर आहे. खरं म्हणजे हा डोंगरावर डोंगर आहे. त्यातही वरचा डोंगर म्हणजे महाप्रचंड कडा आहे. नांदूरीहून पाच-सात कि.मी. अंतराचा घाट पार केला की एक भव्य पठार आहे. या पठारावर गडाचं गाव वसलेलं आहे. गडावर नांदूरीमार्गे वाहनाने जाता येतं. असं असलं तरी बहुसंख्य भाविक वणीहून गडावर पायीच चालत जातात. काही तर अनवाणी गड चढतात.

देवीचं देऊळ कड्याच्या पोटात आहे. वर जायला दगडाच्या पायऱ्या असून संपूर्ण मार्गावर भाविकांच्या सोयीसाठी त्यावर पत्र्याच्या शेडचं आच्छादन आहे. या पायऱ्याचं सुरुवातीच काम उमाबाई दाभाडे यांनी केलं. देऊळ कड्यात असल्याने तेवढं मोठं नाही. मात्र गाभारा आणि प्रांगण त्यामानाने मोठं आहे. या प्रांगणातून समोरचा मार्कंड्याचा भव्य डोंगर आणि त्याभोवतीचं भव्य पठार, दूरवरचे रावळ्या-जावळ्या हे जोडकिल्ले, धोडप असा भव्य नजारा दिसतो. देवीची रोज तीन वेळा आरती केली जाते.


खानदेश हे देवीचं माहेर असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे बाजूच्या खानदेशातल्या बऱ्याच कुटुंबाची ती कुलदेवता आहे. खानदेशात लग्न झाल्यावर वधू-वर देवीची पूजा करायला येतात. गुढीपाडवा झाला की, खानदेशात गडावर जायची तयारी सुरू होते. कोणी चौथाईचा नवस करतो. नवीन लग्नाच्या 'ओहोर यात्रा' निघतात. पाचशे पायऱ्यांवर नारळ फोडण्याचे नवस तर शेकडोंनी होतात. भगवतीला साडी, चोळी, ओटी भरण्याचे नवस असतात. याशिवाय तेल वाहणं, निंब नेसवणं, चांदी-सोन्याचे काही नवस असतातच. एकादशीपासून गडावर गर्दी व्हायला सुरुवात होते. सह्याद्रीच्या या कड्याचा परिसर जगदंबेच्या घोषणांनी दुमदुमू लागतो. भगवतीला पुरणपोळीच्या नैवेद्याबरोबर हळदमिश्रित कणकेचे दिवे, मुटके, मायेची वेणीफणी असे पुष्कळ प्रकार असतात.

गडाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे देवळाच्या कड्यावर फडकणाऱ्या ध्वजाविषयी स्थानिकाकडून अनेक गूढ कथा ऐकायला मिळतात. दरेगावचे मानकरी हा ध्वज लावतात. सामान्य नजरेने पाहिलं तर या कड्याच्या शेंड्यावर जाणं अशक्यप्राय आहे. हे मानकरी रात्री कसा कडा चढतात हे कोणालाही माहित नाही. मात्र पौर्णिमेच्या सकाळी हा ध्वज लागलेला असतो. काळ कितीही बदलला तरी सप्तश्रृंगीचं स्थान मात्र भाविकांच्या हृदयात वेगळं स्थान ठेवून आहे. बागलाणाचा हा मुलूखच मंतरलेला आहे. नवरात्रात इथे मोठा उत्सव असतो. भाविक अहोरात्र 'अनादी निर्गुण प्रगटली भवानी, आईचा जोगवा जोगवा मागेन' अशी देवीची आळवणी करत गडाचा मार्ग जवळ करत असतात.




अनु.

# रांगडा आणि देखणा



धोडप
हा किल्ला एकदम
देखणा आणि रांगडा
आहे. त्याची भेट खरोखर
आपल्याला काहीतरी देऊन जाते.
तंगडतोड करायला लावणारा, पण
मुक्कामाच्या वेळी तितक्याच मायेनं
जवळ घेणारा हा गड प्रत्येकानं
चढायलाच हवा
असा आहे.



सध्या भटकंतीचा बेस्ट ऑफ बेस्ट सीझन सुरू आहे. त्यामुळे चांगली तंगडतोड करणारा आणि गड़ावर मुक्काम असेल, असा ट्रेक व्हायलाच हवा, अशी चर्चा सुरू झाली. बऱ्याच चर्चेनंतर नाशिक जिल्ह्यातील कळवणजवळील किल्ले धोडप इथे जायचं ठरलं.

बरेच ट्रेक अनेकदा स्वतःच्या बाइकवर किंवा कारमधून ठरलेल्या ठिकाणी जाता. आम्हीही त्यातलेच. या ट्रेकला मात्र आपण एसटीनंच जायचं, असं ठरवून टाकलं. धोडपविषयीची माहिती पुस्तकांतून घेतली. एस.टी. स्टँडवरून कळवण गाडी पकडून सरळ कळवण गाठलं. गाडीला गर्दी जास्त होती; पण जागा पकडताना जुन्या दिवसांची आठवण झाली. धमाल आली. कळवणहून ओतूर मार्गे वडाळा फाट्यावर उतरलो. तिथं चौकशी केली असता धोडपवर जाण्यासाठी बऱ्याच वाटांची माहिती मिळाली. एक होती वडाळा गावातून गोलवाडी मार्गे. दुसरी ओतूर गावातून. तिसरी वाट होती हट्टी या गावातून. आणखी एक वाट होती मेहरानवाडीतून. आम्ही मेहरानवाडीतून गडावर जायचं ठरवलं. गावातून गडावर जाण्याच्या वाटेची माहिती घेऊन आम्ही निघालो. गावात सकाळी शेतीकामाची लगबग सुरू होती. गावातून धोडपचं रांगडं रूप दिसत होतं. धुक्याची चादर पसरली होती. सूर्यकिरणं गडामागून, धुक्यातून वाट काढत होती. ते अप्रतिम दृश्य बघत साधारण तासभराची चढण चढत आम्ही धोडपमाची किंवा अलंग या वस्तीवर पोहोचलो. गडाच्या डाव्या हाताला वेढा मारून आम्ही सोनार वस्तीजवळ पोहोचलो. सोनारवस्तीच्या अलीकडे आम्हाला बऱ्यापैकी सुस्थितीत असलेलेल दोन बुरुज आणि दरवाजाची कमान दिसली. या दरवाजाला जोडून बालेकिल्ल्याला केलेल्या तटबंदीचे अवशेष दिसतात. या कमानीच्या उजव्या हाताला एक शिलालेख दिसतो. सोनार वस्तीकडूनच धोडपच्या बालेकिल्ल्याला जाण्याची वाट आहे. साधारण पाऊण तासाच्या खड्या चढाईनंतर आपण बालेकिल्ल्याच्या पहिल्या दरवाजाजवळ पोहोचतो. आज फक्त दोन बुरूज आणि तटबंदीच चांगल्या स्थितीत आहे. तिथून पुढे कोरीव पायऱ्यांच्या वाटेनं पुढे गेल्यावर गडाचा दुसरा, कातळात कोरलेला दरवाजा लागतो. संरक्षणाच्या दृष्टीनं लपवलेल्या प्रवेशद्वाराशेजारी आपल्याला दोन शिलालेख दिसतात. दरवाजातून पुढे गेल्यानंतर बालेकिल्ल्यावरील वाड्याचे अवशेष दिसतात. या वाड्याची बरीच पडझड झालेली आहे. छतही



अनु.

कोसळलं आहे. त्यावरील बारीक नक्षिकाम आपल्याला गडाच्या गतवैभवाची झलक दाखवतं.

वाड्याशेजारीच पाण्याची दोन टाकी आहेत. तिथून समोरच बालेकिल्ल्याचा डोंगर दिसतो. माथ्यावर जाण्याचा मार्ग तुटल्यामुळे प्रस्तरारोहण करत जावं लागतं. बालेकिल्ल्याच्या डाव्या हाताच्या वाटेनं पुढे गेल्यावर आपल्याला डोंगराच्या पोटात अनेक गुहा कोरलेल्या दिसतात. यातील एका गुहेत भवानीमातेचा तांदळा दिसतो. या गुहेबाहेरच पिण्याच्या पाण्याचं टाकं आहे. गडावरील मुक्कामासाठी ही गुहा उत्तम आहे.

इथून पुढेच धोडपची प्रसिद्ध माची आहे. तिथून सूर्यास्त फारच सुंदर दिसतो. या माचीचा काही भाग चौकोनी आकारात वेगळा केलेला दिसतो. रात्रीचा मुक्काम आम्ही गुहेतच केला. मस्तपैकी पावभाजी आणि मसालेभाताचा मेन्यू होता. स्वयंपाकाची तयारी करायला मजा येत होती. रुटिन सोडून दोन दिवस निसर्गाच्या सान्निध्यात जगणं खरंच अप्रतिम असतं. सकाळी लवकर उठून आम्ही गड परिसर फिरून आल्या वाटेनं सोनार वस्तीजवळ पोहोचलो. तिथून गडमाचीच्या उजव्या हाताला धोडपचा महादरवाजा दिसतो. गडाचा हा दरवाजा आणि त्यातील घुमट पाहाण्यासारखे आहेत. या महादरवाजाला जोडूनच आपल्याला तटबंदी आणि बुरुजाचे अवशेष दिसतात. सारे अवशेष आणि धोडपचं रांगडं रूप मनात साठवत आम्ही परतीच्या वाटेला लागलो.

# 'शकुनाचा किल्ला'
# रामसेज

औरंगजेबाने २२ फेब्रुवारी १६८२ रोजी बुऱ्हारणपूरचा मुक्काम हालवला आणि सर्व सार्मथ्यानिशी महाराष्ट्रात उतरला. पहिली स्वारी केली ती किल्ले रामसेजवर. १६३५-३४ मध्ये शहाजहान बादशहानंही प्रथम रामसेजच सर केला होता. नंतर बाकीचे किल्ले त्याच्या ताब्यात आले. म्हणूनच औरंगजेबाच्या मते रामसेज हा 'शकुनाचा किल्ला' होता. त्यामुळे दक्षिणेत आल्यावर त्यानं रामसेज किल्ल्याला वेढा घातला. पण औरंगजेबाला या किल्ल्यानं चांगलंच दमवलं. हा किल्ला सर करायला मोगलांना पुरती पाच वर्ष लागली!



रामसेज म्हणजे राम की सेज! म्हणजे रामाची शय्या. इतिहासात याही किल्ल्यानं आपलं नाव गाजवलं.


पायथ्याच्या आशेवाडी गावातून किल्ल्याच्या नैसर्गिक तटबंदीचं दर्शन होत असल्यानं किल्ल्याचा रांगडेपणा चांगलाच जाणवतो. किल्ल्यावर जात असताना अलीकडेच कातळात खोदलेलं पाण्याचं टाकं दिसेल. पुढे पाचच मिनिटांवर प्रशस्त राममंदिर आहे. मंदिराचं बांधकाम अलीकडेच केलेलं असावं. आतील मूर्ती मात्र बऱ्याच जुन्या असाव्यात. मंदिराच्या मागच्या बाजूला जमिनीत खोदलेलं टाकं आहे. टाक्यातलं पाणी पिण्यायोग्य असल्यानं पाणी भरून घ्यायचं आणि राम-सीतेचं दर्शन घेऊन पुढची मार्गक्रमणा करायची.

वर जाताना कधी काळी असलेल्या प्रवेशद्वाराचे खांब दिसतात. गडमाथ्यावर पोहोचल्यावर समोर भुयारात खोदलेला गुप्त दरवाजा आहे. इथून खाली उतरणारी वाट कठीण आहे. डावीकडे माची आहे तर उजवीकडे किल्ल्याचा माथा आहे. माची म्हणजे एक प्रशस्त निमुळते होत जाणारे पठारच. तिथे काही पडक्या घरांचे अवशेष, वाड्यांचे अवशेष, चार-दोन सुकलेली पाण्याची टाकी आणि निवडुंगाची अतिरूक्ष झाडं इतकंच आहे. हे पाहिल्यावर माघारी फिरून गुप्त दरवाजापर्यंत यायचं. तिथून माथ्याकडे जायचं. एक वाट कड्याला डावीकडे ठेवून पुढे गेलेली आहे. तिथं कातळात खोदलेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा आहे. सध्या तो ७५ टक्के



अनु.

गाडला गेलेला आहे. कमानीवर सुंदर कमळपुष्पे कोरलेली दिसतात. मात्र या प्रवेशदारातून खाली उतरणारी वाट पूर्णपणे नष्ट झालेली आहे. मागे वळून माथ्याकडे जात असताना वाटेत पाण्याच छोटसं टाकं लागतं. यातील पाणीसुद्धा पिण्यासारखं आहे. याच्याच पुढं एक मोठं पाण्याचं तळं आहे. थोड्याच अंतरावर देवीचं सुंदर मंदिर आहे. देवीच्या मंदिरामध्ये मुक्काम करता येऊ शकतो. मंदिराच्या मागच्या बाजूलासुद्धा एक गुप्त दरवाजा आहे. हा दवाजा अशा ठिकाणी लपवला आहे, की तो शत्रुलाच काय गडावर राहणाऱ्या लोकांनासुद्धा सापडणं कठीण. इथून खाली उतरणं म्हणजे एक दिव्यच आहे. कदाचित हाच तो दरवाजा असावा जिथून मराठ्यांना कुमक मिळाली असेल. या दरवाजावरूनच एक वाट किल्ल्याच्या पश्चिम टोकाशी जाते. वाटेत वाड्यांचे अनेक, अवशेष दिसतात. दगड मातीची तटबंदी बांधण्यापेक्षा नैसर्गिक कड्यांमुळेच तटबंदी निर्माण झाल्याने रामसेज किल्ला भौगोलिकदृष्ट्या खूपच दुर्गम आहे.



**कसं जायचं?**

नाशिकपासून १५ किमी अंतरावर दिंडोरी तालुक्यात हा किल्ला आहे. नाशिकवरून पेठला जाणारी कोणतीही एस.टी. पकडायची आणि २० मिनिटांतच आशेवाडी थांब्यावर उतरायचं. आशेवाडी हे किल्ल्याच्या पायथ्याचं गाव. गावातून एका सरळवाटेने पाऊण तासात किल्ल्यावर पोहोचता येतं.



**एकट्या नाशिक जिल्ह्यात जवळपास ३५ वायनरीज सुरू झाल्या आहेत. त्यामुळेच नाशिक शहराला 'वाइन कॅपिटल ऑफ इंडिया' अशी नवी उपाधी मिळाली आहे. आपण या वाइन कल्चरला तितकेसे सरावलेलो नसलो तरी या निमित्ताने भारतीय तसंच परदेशी पर्यटक नाशिकमध्ये येऊ लागले आहेत. फेब्रुवारी ते मार्च या काळात वाइन मेकिंग पाहायला ही मंडळी खास येतात. या काळात काही ठिकाणी वाइन फेस्टिवल्सचं आयोजनही केलं जातं.**

वाइन ही द्राक्षापासून बनवतात, हे सर्वसाधारणपणे आपल्याला माहित असतं. पण, ही माहिती अपुरी आहे असं म्हणावं लागेल. कारण, सरसकट कुठल्याही द्राक्षांपासून वाइन तयार होत नाहीत. आपण जी द्राक्षं खातो त्यापेक्षा वाइनची द्राक्षं वेगळी असतात. त्यांच्या ठराविक जाती असतात आणि त्यावरूनच वाइनची जातकुळीही निश्चित होते. वाइनविषयी अनेक गैरसमज लोकांच्या मनात असतात. त्यामुळेच या 'वाइन कल्चर'ची ओळख लोकांना व्हावी यासाठी काही वायनरीजने प्रयत्न सुरू केले आहेत. त्यातूनच नाशिकमध्ये वाइन पर्यटनाची नवी वाट रुळते आहे.

नाशिक शहराला 'वाइन कॅपिटल ऑफ इंडिया' अशी नवी उपाधी मिळाली आहे. कारण, एकट्या नाशिक जिल्ह्यात आज सुमारे ३५ वायनरीज आहेत. या प्रवासाची सुरुवात राजीव सामंत या सिलिकॉन व्हॅलीतून लट्ठ पगाराची नोकरी सोडून आलेल्या तरुणाने १९९७ साली नाशिकमधूनच केली होती. नाशिकजवळच्या गंगापूर धरणाच्या कुशीत सामंतांची ३० एकर जागा होती. तिथे राजीव यांनी वाइनच्या द्राक्षांची लागवड केली. कॅलिफोर्नियातून केरी डॅमस्की नावाचा वाइनमेकर घेऊन आलेल्या राजीवचं वायनरीचं स्वप्न त्यावेळी अनेकांना वेडेपणा वाटत होता. पण, त्यांची 'सुला विनयार्ड' देश-विदेशातील पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र बनलं आहे.

वाइन कशी तयार होते इथपासून ते ती प्यायची कशी आणि त्यासोबत खायचं काय? हे सगळं जाणून घ्यायचं तर 'सुला'ला भेट द्यावी लागेल. मुंबईपासून अवघ्या १८० किलोमीटर अंतरावर असलेल्या नाशिकला लागूनच गंगापूर धरणाचा विस्तीर्ण जलाशय पसरलेला आहे. त्याच्या कुशीत छोट्या लोभस टेकड्यांशी अंगत-पंगत घालून 'सुला विनयार्ड' पसरलेलं आहे. याच परिसरात तीन वर्षांपूर्वी 'यॉर्क' नावाची वायनरीही सुरू झालेली आहे. 'यॉर्क'मध्येही वाइन बार आणि रेस्टॉरंट सुरू झालं आहे. वायनरी पहायला आलेल्या लोकांना मुक्काम करता यावा म्हणून 'सुला'ने याच परिसरात 'बियाँड' नावाचं रिसॉर्टही सुरू केलं आहे. लांबवर पसरलेलं हिरवंगार 'विनयार्ड' आणि त्याच्यामागे गंगापूर धरणांच्या लखलखत्या पाण्यात डुंबत असल्याप्रमाणे मावळता सूर्य निरखत वाइनचा आस्वाद घेण्याची सोयही 'सुला'च्या टेस्टिंग रुममध्ये आहे. ताजी वाइन तिथे चीजच्या खाद्यपदार्थांसोबत चाखता येते.

## कुठे पाहाल वाइन मेकिंग ?

जगात सर्वाधिक वाइन तयार केली जाते आणि प्यायली जाते ती इटलीत. हेच नातं लक्षात घेऊन 'सुला'ने 'लिटल इटली' नावाचं प्युअर व्हेज इटालियन खाद्यपदार्थांचं 'लिटल इटली' नावाचं रेस्टॉरंटही वायनरीला लागून सुरू केलं आहे. अर्थात भारतीय पदार्थ मिळतील असं 'सोमा' रेस्टॉरण्टही तिथे आहे. मुंबई-आग्रा हायवेवर नाशिकपासून अवघ्या पंधरा ते वीस किलोमीटर अंतरावर वाडीवऱ्हे गाव आहे. तिथून काहीसं आत गेलं तर 'व्हॅली द वीन' वायनरी आहे. वेळ कमी असेल आणि धावती भेट द्यायची असेल तर हाही एक पर्याय आहे. याच रस्त्यावर नाशिकच्या अगदी अलिकडे नारायणगावच्या 'शॅट्यू इंडेज' वायनरीचं 'टायगर हिल' रिसॉर्ट आहे. तर ओझरजवळ खास रिनायसन्स वाइन्सचं रेस्टॉरंट आहे.

## वाइन टेस्टिंग आणि फेस्ट

ग्रेप स्टॉपिंग - लाकडी वॅटमध्ये द्राक्ष टाकून ती पायाने क्रश करायची. फेब्रुवारी ते मार्चच्या साधारणतः तिसऱ्या आठवड्यापर्यंत हे क्रशिंग सुरु असते. या काळात तीनशे रुपये मोजून कुणीही हे द्राक्षमर्दन करु शकतो.

वाइन टेस्टिंग- विनयार्डमध्ये जाऊन वेलीवरची द्राक्षं दाखवली जातात. त्यानंतर मॅन्युफॅक्चरिंग



सुरु असल्यास तेही दाखवलं जातं. बॉटलिंग (जे वर्षभर सुरु असतं) दाखवलं जातं. त्यानंतर 'सुला'च्या रेड, व्हाईट, रोझे, स्पार्कलिंग, डेझर्ट या वाइन टेस्ट करायला दिल्या जातात. कुठल्या वाइनसोबत काय खायचं याचंही मार्गदर्शन मिळतं.

सुलाफेस्ट- फेब्रुवारीत ॲन्युअल हार्वेस्ट सुरु होताना गेल्या चार वर्षांपासून हा फेस्टिवल आयोजित केला जातो. सेलिब्रेटी, नामांकित लाइव्ह बँड आणि खूप धमाल या काळात असते.



अनु.

# दावलेश्वर



***नाशिकपासून*** ८० किलोमीटरवर असलेलं दावलेश्वर गिर्यारोहक व हौशी पर्यटकांचा आवडीचा स्पॉट आहे. दमणगंगा व दावलीगंगा नदीचा संगम व देवडोंगरीकर महाराजांचे समाधीस्थळ म्हणून ते ओळखलं जाते. नदी संगम असल्याने संगमस्थळाचं पात्र विस्तीर्ण आहे. त्याचबरोबर इथे एक छोटा धबधबादेखील आहे. त्याखालचा डोह पाण्याने भरलेला असतो. खडकाळ परिसराला दाट झाडांनी घेरलेल्या या परिसरातील दृष्य विलोभनीय आहे. ठाणापाडा ते दावलेश्वर दरम्यानचा घाट अप्रतिम आहे. ड्रायव्हींगची आवड असणाऱ्यांसाठी हा घाट चांगला पर्याय आहे. इथे जवळच खैराई किल्ला आहे. दावलेश्वरी असलेली देवडोंगरीकर महाराजांची समाधी मन प्रसन्न करणारी आहे. इथे खाण्यापिण्याची विशेष सोय नाही. हरसूल किवा ठाणापाडा वगळता जवळपास हॉटेलही नाहीत. त्यामुळे स्वतःचं जेवण स्वतःच आणावं लागतं. टू व्हिलरने जाणार असला तर सकाळी लवकर निघा. दावलेश्वर नाशिक हे अंतर दीड ते दोन तासांचे आहे. त्यामुळे संध्याकाळी परतीची वेळी त्या हिशोबाने प्लॅन करा. काहीसं दुर्लक्षित असल्याने परिसरात पंक्चर, गॅरेज, पेट्रोल अशी कुठलीही सुविधा नाही. त्यामुळे निघताना तयारीनिशी निघा. हरसूल आणि ठाणापाड्यात या सुविधा आहेत.



**कसं जाल?**

मुंबईहून नाशिकला आल्यावर पुढे, हरसूल, ठाणापाडामार्गे दावलेश्वरला जाता येतं. मुंबईहून त्र्यंबकेश्वर, हरसूलमार्गेही इथे पोहचू शकता. दावलेश्वरला जाण्यासाठी एसटी- रेल्वेची सुविधा नसल्याने स्वतःचं वाहन असणं आवश्यक आहे.



# दुगारवाडीचा धबधबा

निसर्गाचं आरस्पानी सौंदर्य पहायचं असेल तर दुगारवाडीचा धबधबा एकदम बेस्ट! नाशिकच्या जवळ असलेला हा धबधबा पावसाळ्यात पिकनिकसाठी एकदम मस्त आहे. महाराष्ट्रातील टॉप टेन धबधब्यांमध्ये ह्याचं नाव घेतलं जातं. महाराष्ट्रात बेस्ट असला तरी खूप प्रसिद्ध नसल्याने शांतता इथे अनुभवता येते. दररोजच्या कामाच्या धबडग्यात एक दिवस विश्रांतीसाठी काढायचा असेल तर दुगारवाडी धबधबा तुम्हाला तो अनुभव नक्की देईल. धबधब्याला जाणारा रस्ता हा नदीच्या जवळून आणि डोंगरा-डोंगरातून जातो. त्यामुळे हिरवळ अनुभवत, त्याची मजा घेत घेत जाता येतं. स्वच्छ हवा, भिजायला भरपूर पाणी आणि घनदाट जंगल हेच इकडचं मुख्य आकर्षण आहे. पण मुसळधार पावसात जाताना पाण्याची पातळी एकदम वाढण्याची शक्यता असल्याने ग्रुपनेच जाण्याचा सल्ला दिला जातो. वाईन सिटीपासून ३० किमीवर आणि जव्हार रोडपासून २ किमीवर असलेला हा धबधबा आहे. इथे जाण्यासाठी स्वतःचं वाहन असलेलं चांगलं.


# त्र्यंबकेश्वर

नाशिकच्या महात्म्यामुळे त्र्यंबकेश्वराचे ज्योतिर्लिंग मंदिर ख्यातनाम आहे. शिवाय त्याला कुंभमेळ्याची पार्श्वभूमी असल्याने साधू



आणि भाविकांच्या मनात त्याबद्दल अतीव आदराची भावना वसलेली आढळते. त्रिनेत्र शंकरामुळे त्र्यंबकेश्वर असे नाव पडले असे सांगण्यात येते. हे देवस्थान नाशिकपासून अवघे २६ कि. मी. अंतरावर असल्याने भाविकांची तेथे सतत वर्दळ असते. भीमाशंकरप्रमाणेच हे मंदिरदेखील भक्कम बांधणीचे व पूर्वाभिमुख आहे. नगारखाना, दीपमाळ, देवाची काठी आणि अमृतकुंभ तीर्थ ही काही हेमाडपंथी देवळाची वैशिष्ट्ये याही देवळात दिसतात. आसपास ३० हून अधिक देवळे असल्याने ती दिवसभरात पहाता पहाता दमायला होते. मंदिराचे निव्वळ शिखर आठ फूट उंचीचे असून, तयावर आणि आतील बाजूस डोळ्यांचे पारणे फेडणारे कोरीव काम केलेले दिसते. स्वच्छ पाणी असल्यास कुशावर्त तीर्थ बघण्यासारखे आहे. जवळच्याच डोंगरावरून गंगा नदीचा उगम झालेला असून, ७० पायऱ्या चढून वर गेल्यावर चांगलीच दमछाक होते. वरून गावाचे टिकलीएवढे रूप आकर्षक दिसते. त्र्यंबकेश्वरात गावात निवासाची उत्तम सोय आहेच शिवाय नाशिक शहरात विविध दर्जाच्या उत्तम हॉटेलांची संख्या भरपूर आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर अशी टॅक्सी सेवाही उपलब्ध असतेच.

# बुलंद गड ब्रह्मगिरी



### कसं जाल?

मुंबई ते त्र्यंबकेश्वर गाडीने जाता येईल. ब्रह्मगिरी हे त्र्यंबक मंदिराच्या मागेच आहे. म्हणून याला त्र्यंबकचा डोंगर असं म्हणतात.

जटा मंदिराच्या उत्तरेला भंडारदुर्ग आहे. दोन्ही किल्ल्यांवर पाणी उपलब्ध आहे. ब्रह्मगिरीवर माकडं त्रास देत असल्याने ती काळजी घ्यावी.


बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक, गोदावरी नदीचं उगमस्थान, संत निवृत्तीनाथांची समाधी असं सशक्त धार्मिक अधिष्ठान असलेला ब्रह्मगिरी सर्व सामान्यांसाठी आतापर्यंत काहीसा असाध्य असा वाटत आला आहे. १९०८ साली लालचंद बंबानी या कराचीच्या व्यापाऱ्याने किल्ल्याच्या अवघड वाटेवर ५०० पायऱ्या बांधण्याचं मोठं पुण्यकर्म केलं. त्यामुळे ब्रह्मगिरीच्या आसमंतात हजारो भक्तांच्या पाऊलखुणा उमटल्या. गुडघाभर उंचीच्या ठणठणीत पायऱ्या, शेजारी धरता येईल असा लोखंडी आधार, वाटेत चहा, सरबत, बिस्किटांचे ठेले यामुळे लहान मुलं, वयस्कर यात्रेकरूंची मोठीच सोय होते. गडाची उंची ४२४८ फूट असून प्रचंड विस्तार, आजूबाजूला हरिहर, ब्रह्मा, अंजनेरी, डांग्या सुळका हे अवघड सह्यकडे आहेत. थोड्या-थोड्या अंतरावर कोरलेल्या विविध देवतांच्या मूर्ती म्हणजे रसिक पांथस्थांकरीता पर्वणीच. ब्रह्मगिरी म्हणजेच त्र्यंबक डोंगरावर शंकराचं स्थान आहे. क्रोधित महादेवाने तांडवनृत्य करताना जिथे जटा आपटल्या त्याच्या खुणा खोलवर उमटल्या तीच ही जागा. या जटामंदिराच्या मागील बाजूने एक बारिकशी वाट डोंगराच्या पार उत्तर टोकाकडे जाते. सुमारे अर्धा तास ही चिंचोळी पाऊलवाट पार करायची. उजव्या हाताला त्र्यंबकचा राकट डोंगर तर डाव्या हाताला घसारा व पायथ्याची गावं, शेतं, तळं असं चित्रमय दृश्य. जसं पुढे जावं तसं ब्रह्मगिरीच्या मूळ डोंगरापासून सुटलेला छोटेखानी किल्ला दिसतो.



अनु.

ताकाच्या रवीला जशी सुबक, धारदार गोलाई असते तशा आकाराचा हा किल्ला-खड्या, बुलंद कातळाची जन्मजता कवचकुंडलं लाभलेला हाच भंडारदुर्ग नीट पाहिला की या दोन डोंगरांना जोडणारी चिंचोळी पट्टी दिसते. ही वाट पार केली की आपण पायऱ्यांशी पोचतो. या जडशीळ कातळा तब्बल साठ लांब-रुंद पायऱ्या खोदल्या आहेत. भिंतीवर छिन्नी, पहारीचे घाव स्पष्ट दिसतात. या पायऱ्या उतरून खाली गेलो की, चौकोनी भगदाड दिसतं. हा गडाचा 'पहिला प्रवेश'! गुडघ्यावर ओणवं होऊन मार्जारासन करून आत गेलं की परत साठ ऐसपैसं पायऱ्यांची उंच चवड आपलं स्वागत करते. या पायऱ्या पार केल्या की उभ्या कातळाचा टवका उडालेला दिसतो. ही पोकळी म्हणजे गडाचा 'दुसरा प्रवेश' होय.

जमिनीलगत सरपटत आत गेलं म्हणजे अखेर आपण गडावर पोचतो. तिथे स्वच्छ, गार पाण्याच्या चौकोनी टाक्या दिसतात. बुरुजावरून संपूर्ण नाशिक शहर व बाजूच्या ब्रह्मगिरीचा वेध घेता येतो. गडावर घरांची एक-दोन ज्योती दिसतात. पण नावाला अनुसरून भंडारदुर्ग प्रामुख्याने साठवण व टेहळणी यासाठीच योजला असावा असं वाटतं. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना सुरक्षित ठेवण्यासाठी हा किल्ला पूर्ण भरवशाचा. पण दुर्दैवाने कुणालाही या किल्ल्याबद्दल एक-दोन ओळींपेक्षा अधिक काहीही माहिती असल्याचं आढळलं नाही. इंटरनेटवरदेखील याबाबतच्या माहितीचा दुष्काळच आहे. युद्धनीती, स्थापत्यशास्त्र व अनोखी भौगोलिक रचना याचा उत्तम मेळ म्हणजे भंडारदुर्ग. देवदर्शन आणि साहस असा दुहेरी आनंद देणारा ब्रह्मगिरी-भंडारगडचा अजोड ट्रेक अविस्मरणीयच ठरावा.





# सिन्नरचं दुर्मिळ शिल्पवैभव

मुंबईकरांच्या लाडक्या शिर्डीकडे जाताना नाशिकपासून २८ किलोमीटर अंतरावर असलेल्या सिन्नर गावातील दोन अनमोल अशी श्री ऐश्वर्येश्वर व श्री गोंदेश्वर ही शिल्पसमृद्ध मंदिरं चुकवू नयेत अशी आहेत.

नाशिककडे जाताना 'सिन्नर १ कि.मी.' लिहिलेला दगड ज्या ठिकाणी आहे, तिथून डावीकडे एक रस्ता जातो. त्या रस्त्याने चालत पाच मिनिटांच्या अंतरावर पांढरा चुना फासलेली दर्ग्याची भिंतही दिसते. तिच्या पाठीमागे छोट्या ओढ्याच्या काठी पुरातत्त्व खात्याने कुंपण घालून बंदिस्त केलेलं श्री ऐश्वर्येश्वराचं चालुक्य शैलीतलं भग्नावस्थेतलं मंदिर दिसतं. या शैलीतील मंदिरं महाराष्ट्रात कमी आहेत. श्री गोंदेश्वर मंदिराच्याही आधी म्हणजे इ. स. ११व्या शतकात हे मंदिर बांधलं गेलं असावं. मंदिराचा कळस आता राहिलेला नाही. सभामंडपात दोन ओळीत बारीक कोरीव काम केलेले प्रत्येकी चार खांब आहेत. गाभाऱ्याकडे जाताना प्रवेशव्दारावर असलेला अर्धगोलाकृती शिल्प पाषाण निरखून पहावा असा आहे. दोन बाजूस दोन मकर, तांडव करणारा शिव आणि त्याच्याकडे पाहणारी पार्वती शिल्पांकीत केलेली आहे. गाभाऱ्याच्या दर्शनी भागावर सप्तमातृकांची ओळ दिसते. गाभाऱ्यात मात्र काहीही कोरीव काम नाही. मंदिराला प्रदक्षिणा घालत असताना नजरेस पडणारं शिल्पवैभव त्याकाळी केवढं सुरेख दिसत असेल याची कल्पना आपण करु शकतो.

सिन्नर गावात शिरणाऱ्या रस्त्याने गेल्यावर ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिरापाशी आपण येतो. या ठिकाणी सात मीटर उंचीची श्री गणेशाची शेंदरी भव्य मूर्ती लक्ष वेधून घेते. गजबजलेल्या ठिकाणी असूनही दोन घटका शांतपणे बसता येईल असं हे ठिकाण आहे. भैरव मंदिराशेजारीच शनीदेव व मारुतीचंही मंदिर आहे. पैकी शनीदेवाची

मूर्ती मुद्दाम जवळ जाऊन निरखावी अशी आहे. गावच्या वेशीतून आत शिरुन पंचायत समिती कार्यालयाच्या बाजूने जाणारा रस्ता आपल्याला मंदिरापर्यंत आणून सोडतो.

शुध्द भारतीय शैलीचा अजोड आविष्कार असलेल्या या मंदिराची बांधणी सिन्नरचा संस्थापक राव सिंगुनीचा उत्तराधिकारी राव गोविंदने दोन लाख रुपये खर्चून केली. मंदिराभोवती विस्तृत जागा ठेवून तट बांधलेला आहे. सुमारे नऊशे वर्षांपूर्वीचा हा शिवपंचायतनचा बांधणीपट प्रत्येक कोनातून पाहताना वेड लावतो. छातीपेक्षाही उंच जोत्यावर मध्यभागी शिव, आग्नेयेस विष्णू, नैऋत्येस गणपती, वायव्येस देवी आणि ईशान्येस सूर्य असे पंचायतन उभारले आहे. जोत्यावरच पूर्वेला नंदीचाही चौपाळा आहे. मुख्य मंदिर पूर्वाभिमूख असून आतील बाजूस म्हणजे सभामंडपात नक्षीकाम केलेले चार खांब आहेत. त्यावर काही ठिकाणी आणि मंदिराच्या बाहेरील बाजूसही मैथूनशिल्पे कोरलेली दिसतात. रामायणातले प्रसंगही कोरलेले आढळतात. शिवलिंगातील तीर्थ बाहेर पडण्याचा मार्ग गोमुखाऐवजी मकरमुखातून आहे. पूर्वेच्या दरवाजातून दिसणारा मंदिरसमुहाचा शिल्पमंच दृष्टी खिळवून ठेवतो. मुख्य मंदिराच्या बाहेर अनेक देवता, नर्तकी विविध मुद्रेत शिल्पबध्द केलेल्या आहेत. पूर्वेला व दक्षिणेला मुख्य दरवाजे आहेत.

पर्यटकांची जास्त गर्दी नसल्याने हे सारं आपल्याला निवांतपणे पाहता येतं. गोंदेश्वराचे अधिष्ठान ठेवून मंदिरपरिसरात अभ्यासाला बसलेल्या मुलांना विचलित न करता दोन घटका झक्कपैकी विसावा घ्यावा. मनस्तापाचा ताण थोडा कमी करण्याची शक्ती या दोन स्थळात आहे हे नक्की!

s



अनु.

# अहमदनगर जिल्हा
# भंडारदरा

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते भंडारदरा | | | | | 164 | | | | |
| **1** | भंडारदरा | धबधबा | हिलस्टेशन | तलाव | निसर्ग | 0 | | | | |
| **2** | भंडारदरा धरण | | | धरण | | 2.5 | NW | 2.5 | NW | |
| **3** | रतनगड | किल्ला | | | ट्रेक | 13 | SW | 14 | SW | |
| **4** | अमृतेश्वर | शिल्पे | मंदिर | तलाव | | 15.5 | SW | 3 | NE | |
| **5** | सांधण व्हॅली | | | | ट्रेक | 26 | SW | 9 | W | |
| **6** | भैरवगड (शिरपुंजे) | किल्ला | | | | 37 | SE | 52 | SE | |




## भंडारदरा

सह्याद्री पर्वताच्या कुशीत बसलेलं अहमदनगर जिल्ह्यातलं निसर्गसंपन्न छोटंसं गाव. पावसाळी सहलीचे ठिकाण म्हणून भंडारदरा प्रसिद्ध आहे. भंडारदरा छोटंसं गाव असलं तरी सुमारे २०-२५ किलोमीटर परिसरात अनेक स्थळं पाहण्यासारखी आहेत. भंडारदरा धरण, रंधाफॉल, अमृतेश्वर मंदिर, कोकणकडा, कळसूबाई शिखर, अलंग-मलंग-कुलंग किल्ला, घाटघर प्रकल्प यांचा यात समावेश आहे. धरणाच्या पायथ्याशी सुंदर बगिचा आहे. धरणापासून १० किलोमीटरवर रंधाफॉल हा धबधबा आहे. पावसाळ्यात हजारो पर्यटक याचा आनंद लुटतात. सह्याद्री पर्वतातील सर्वोच्च कळसूबाई शिखरसुद्धा भंडारदरा परिसरात आहे. रतनगड हा किल्लाही गिर्यारोहकांच्या पसंतीचं ठिकाण. भंडारदऱ्यापासून ८ किलोमीटरवर प्राचीन असं अमृतेश्वर मंदिर आहे. याच परिसरात वीजनिर्मिती केंद्र असलेला घाटघर प्रकल्पही आहे.

### कसं जाल?

भंडारदऱ्याला जायला जवळचं रेल्वेस्टेशन आहे इगतपुरी. तिथून ४५ किलोमीटरवर भंडारदरा आहे. मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगरपासून एसटीच्या बसची सोय आहे. एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये राहण्याची उत्तम व्यवस्था होऊ शकते.

# प्रेमाच्या गावा जावे



*अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यामध्ये असलेलं भंडारदरा हिलस्टेशन एक निसर्गरम्य ठिकाण आहे. इगतपुरी स्टेशनपासून ते साधारण ४५ किमी अंतरावर आहे. तिथून जवळपास असलेल्या काही स्पेशल स्पॉटसची माहिती खास तुमच्यासाठीही*

## कोंकण कडा

हरिश्चंद्र गडाच्या अर्ध्यात असणाऱ्या कोकण कड्यावरून खाली वाकून पाहिल्यास आपण गुगल अर्थ वरून पाहतोय की काय असा भास होतो! इथं काहीशी वर्दळ असली तरी हा कडा बराच मोठा असल्याने त्यामुळे शांतता आणि एकांताची फुल्ल गॅरेन्टी.



## रतनगड

ट्रेकींगची आवड असलेल्या कपल्सासठी रतनगड परफेक्ट स्पॉट आहे. पायथ्यापासून साधारण २ तासांत या गडावर चढता येतं. वर गेल्यावर रतनू बाईचं एक गुहेतील देऊळ आहे. शिवाय अनेक गुहाही आहेत. इथे जवळच्या गावांमध्ये तुमच्या राहण्या-खाण्याची सोय होऊ शकते.

**आर्थर लेक :** निळेशार पाणी असलेल्या या तलावाच्या काठी बसून गप्पा मारण्यासारखं सुख नाही. या तलावाच्या सभोवताली गर्द झाडी असल्याने, तर काय सोनेपे सुहागाच. इथं बोटींगचीही सोय आहे.

**रंधा फॉल्स :** फक्त पावसाळ्यातच नव्हे तर इतरवेळीही रंधा फॉल्सच्या प्रवाहाकडे पाहात राहणं हा एक अलौकीक अनुभव असतो. एखाद्या धुंद संध्याकाळी जोडीदारासोबत हातात हात घालून धरणाच्या भिंतीजवळून चालताना 'अशीच यावी वेळ एकदा' सारखी कविता तुम्हाला न सुचली तर नवलंच.



## इतर आकर्षणं

कळसूबाई शिखर, विल्सन फॉल्स, शेंडी गाव अशी इतर प्रेक्षणीय स्थळंही तुम्ही भंडारदऱ्याच्या ट्रिपमध्ये पाहू शकता. साधारण एक ते चार दिवसांची ट्रिप तुम्ही प्लॅन करु शकता.

**कसे जाल?** मुंबईजवळच्या कसाऱ्याहून भंडारदऱ्याला जाण्यासाठी बसेसची सोय आहे. खाजगी वाहनानेही तुम्ही जाऊ शकता.

इगतपुरी स्टेशनवरुनही वाहनांची, बसेसची सोय आहे.

**कुठे राहाल?** आगाऊ बुकिंग केल्यास एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये चांगली सोय होऊ शकते. नाहीतर अनेक खाजगी हॉटेल्सचे पर्याय आहेतच.

# निसर्गाच्या कुशीत...

भंडारदरा...सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेलं अहमदनगर जिल्ह्यातलं निसर्गसंपन्न छोटंसं गाव. बॉलिवुडही या गावाच्या प्रेमात पडलं होतं. काही सिनेमांचं शुटिंग या गावात झालं आहे. भंडारदरा छोटंसं गाव असलं तरी त्याच्या जवळपासच्या २०-२५ किलोमीटर्सच्या परिसरात अनेक स्थळं पाहण्यासारखी आहेत. त्यात भंडारदरा धरण, रंधाफॉल, अमृतेश्वर मंदिर, कोकणकडा, कळसूबाई शिखर, घाटघर प्रकल्प आदिंचा समावेश आहे. मुळात भंडारदरा धरणामुळे हा परिसर पर्यटनस्थळ म्हणून नावारुपाला आला. या धरणाच्या पायथ्याशी असलेला सुंदर बगीचा पर्यटकांना आकर्षित करतो. बगिच्यातून धरणाच्या भिंतीवर नजर टाकल्यावर मानवाने जणू निसर्गाशी स्पर्धा केली की काय इतकी भव्यता जाणवते. धरणापासून सुमारे १० किलोमीटर्सवर असलेला रंधाफॉल पर्यटकांना आकर्षित करतो. सह्याद्री पर्वतरांगेतलं सर्वोच्च कळसूबाई शिखरसुद्धा भंडारदरा परिसरातच आहे. गिर्यारोहकांचा आत्मविश्वास बळकट करणारं ठिकाण म्हणून या शिखराकडे पाहिलं जातं.





इथला रतनगड हा किल्ला शिवरायांच्या आवडत्या किल्ल्यांपैकी एक होता. इथली स्थानिक देवता रतनेश्वरी देवीच्या नावावरून या किल्ल्याला नाव पडलं रतनगड. निसर्गाची अद्भुत निर्मिती असलेल्या कोकणकड्याची अनुभूती घेणं हासुद्धा एक आगळा-वेगळा आनंद आहे. भंडारदऱ्यापासून साधारण ८ किलोमीटर्सवर प्राचीन अमृतेश्वर मंदिर आहे. या परिसरात घाटघर प्रकल्पही असून ९इथेच वीजनिर्मिती केंद्रही आहे. पर्यटकांसाठी काही हॉटेल्स तसंच एमटीडीसीचं रिसॉर्टही इथे आहे.

**कसं जाल?**

मुंबईपासून सुमारे १७० किलोमीटर्सवर हे ठिकाण आहे. भंडारदऱ्याला जाण्यासाठी जवळचं रेल्वेस्टेशन आहे इगतपुरी. मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर इथून एसटी बसेसची व्यवस्था आहे.

m




अनु.

शांत तळ्याकाठी अलवारपणे येणाऱ्या लाटांना न्याहाळण्याचा आनंद औरच असतो. विस्तीर्ण तळ्याच्या जणू संरक्षणासाठी उभ्या असलेल्या हिरव्यागार डोंगररांगा तितक्याच सुखकारक ठरतात. तिथल्या निःशब्द शांततेचा अनुभव घेतल्यावर त्यात बोटिंग करण्याची हौस या सगळ्याचा कळस ठरतो. सकाळच्या प्रहरी बोटिंग करण्याची अपूवाई नक्कीच भुलवणारी असते. समोरच्या हिरवाईचे आणि निळ्या आकाशाचे पाण्यात पडणारे प्रतिबिंब वेगळेच समाधान देणारे ठरते.

दुसरीकडे प्रचंड आवेगाने जमिनीवर उतरणारे धबधबे डोळ्यांचे पारणे फिटणारे क्षण असतात. शुभ्र पाण्याची ही बरसात आसमंत भेदत कित्येक फूट खाली असलेल्या काळ्या पत्थरावर कोसळत असते. धबधब्यांचा आकार, त्याचा वेग, तीव्रता एका क्षणी हृदयात कालवाकालव निर्माण करतो. एक क्षण त्या प्रवाहात झोकून देण्याची इच्छा व्हावी इतकी ती सुंदर अनुभूती असते. झुळझुळू वाहणारे झरे, शांत तळे ते धबधब्यांची मौज असे विविध अनुभव देणारे ठिकाण म्हणजे 'भंडारदरा'.

निसर्गाचा मुक्त आविष्कार पाहण्याची अपूर्व संधी अनुभवण्यासाठी पावसाळा हा उत्तम मौसम ठरतो. निसर्गाची जादू आपल्याला किती स्तिमित करू शकते, हे अनुभवणे अविस्मरणीय क्षणांची बरसात असते. हे अनुभवण्यासाठी मुंबईपासून काही तासांच्या अंतरावर अशा कैक जागा असतात, फक्त त्या






# कोलाहलापासून दूर...

आपणास ठाऊक असाव्या लागतात. भंडारदरा त्यापैकीच एक. मुंबईपासून सहाएक तासांवर असलेल्या या पर्यटनस्थळाच्या नावावर जाऊ नका. तिथे गेल्यावर आतापर्यंत इथे का आलो नाही, ही चुटपूट लागावी इतकी ही लाघवी जागा.

भंडारदऱ्याच्या प्रसिद्ध तळ्याचे भल्या पहाटे दर्शन घेताना निसर्गाने येथे दिलेल्या दानाचे कौतुक करावे तितके कमीच वाटते. प्रदूषणापासून शेकडो मैल दूर असणारी ही जागा मरगळलेल्या मनाला एका क्षणात तरतरी आणण्याची नखरेल जादू करते. पक्ष्यांच्या किलबिलीने ती पहाट अधिकच रम्य भासते. त्यापुढे फिरायला जाताना निश्चितच चांगला अनुभव मिळणार याची खात्री पटत जाते. नगर जिल्ह्यात येणारे भंडारदरा मुंबईपासून १८५ किमी अंतरावर आहे. भंडारदऱ्यात येण्यापूर्वीच निसर्गाचा आविष्कार खुश करणारा असतो.


भंडारदऱ्यात फिरताना कित्येक गोष्टी धम्माल आणतात. प्रवरा नदीच्या प्रवाहावर बांधण्यात आलेल्या विल्सन धरणापासून प्रत्येक गोष्ट फिरण्याची मौज अधिकच वाढवते. रंधा, अंब्रेला किंवा आर्थर धबधबे असोत, त्यांचे प्रत्येकाचे वैशिष्ट्य खुश करून टाकते. या धबधब्यांच्या गावात फिरताना डोंगरदऱ्यातील धबधबेही दूरवरून पाहायला मिळतात. शिवाय, हे प्रचंड धबधबे पाहतानाच प्रवरा नदीचे विशाल पात्र पाहायला मिळते. इथे फिरण्यासारखे खूप काही आहे. गाडी कुठेही थांबवावी, तिथे काही काळ रेंगाळावे, मनसोक्त फोटोग्राफी करत पुढे जावे. वेळाकाळाचे बंधन न बाळगता खूप भटकण्याची ही संधी असते. फक्त पावसातच नव्हे केव्हाही इथली हवा

तशीच ताजेतवाने करते.

फार प्रसिद्ध नसलेल्या भंडारदऱ्यात पर्यटकांची संख्या तशी कमीच असते. अशी कित्येक ठिकाणे मुंबईच्या आसपास आहेत. अशा ठिकाणी पर्यटकांनी जावे यासाठी आरझू डॉट कॉमसारख्या काही पोर्टल्स पुढे सरसावल्या आहेत. दूरदेशात जाण्यापूर्वी भंडारदऱ्यासारख्या कैक ठिकाणांना भेट द्यावी, यासाठी आरझू डॉट कॉम सातत्याने पुढाकार घेत आहे. मग तिथे वास्तव्यापासून साऱ्या जबाबदाऱ्या ते उचलतात.

इथल्या प्रसिद्ध असलेल्या अमृतेश्वर मंदिरात जायचे असेल तर पुन्हा बोटिंगची मजा घेता येते. पात्रातील वळणे घेत अमृतेश्वर मंदिरात जायला मिळते. त्यासह सह्याद्रीच्या कड्यांमधील सर्वाधिक उंच असे कळसूबाई शिखर पाहता येते. धुक्याच्या पसरलेल्या दुलईत या रांगा प्रसन्नतेचा अनुभव देतात. त्याबरोबर रतनगड हादेखील फिरण्याची अप्रतिम जागा आहे.

वळणावळणाचा प्रवास करत कोकणकड्याकडे जाणे हा वेगळाच अनुभव ठरतो. घाटनदेवी मंदिराच्या शेजारीच असणारी विशाल दरी चक्रावून टाकते. त्या टोकाच्या खडकावर बसून खाली मैलोनमैल पसरलेली हिरवीगार भूमी सुखावून टाकते. माणसे, बिल्डिंग यांच्या कोलाहलातून मुक्ती देणारी संधी असते. हेच क्षण नेहमीच्या दगदगीच्या आयुष्यात सुखावणारी स्मृती असतात. तोच धागा पकडून भंडारदऱ्याच्या पसरलेल्या अप्रतिम सौंदर्यात स्वतःला हरवून टाकायचे.



हवेत हवहवासा गारठा आहे. ख्रिसमसला विकेण्डची सुट्टी जोडून आलीये. कुठेतरी बाहेर जायचे प्लॅन करताय? मग एक मस्त ठिकाण आहे... भंडारदरा. टुमदार निवासात मनसोक्त 'पडी' टाकणं, शांत जलाशयाशी हितगूज, पुरातन मंदिरातले भग्न अवशेष धुंडाळणं आणि जमल्यास महाराष्ट्राचं 'एव्हरेस्ट', कळसूबाई शिखरावर चढाई...हे सगळं तुमच्या भंडारदरा सहलीत सहज साध्य होईल.

भंडारदरा अहमदनगर जिल्ह्यात आहे. मुंबईहून नाशिक हायवेनं इगतपुरीपर्यंत जायचं, तिथून ४५ किमी अंतरावर भंडारदरा. मुंबई ते भंडारदरा हे अंतर साधारण १८० किमी. ट्रेनने जाणार असाल तर सीएसटीवरून कसारा ट्रेन पकडा. इगतपुरीवरून एसटीने भंडारदरा गाठता येईल. खिसा थोडा सैल सोडलात तर टॅक्सीचा पर्याय आहेच.

इगतपुरी जवळ येऊ लागते तशी सह्याद्रीची बालेश्वर रांगेतली शिखरं दिसू लागतात. महाराष्ट्राचं सगळ्यात उंच शिखर कळसूबाई धुक्याची शाल लपेटून गुडुप झालेलं असतं. याच पर्वतरांगांच्या कोंदणात भंडारदरा धरणाचा जलाशय विसावलाय. ब्रिटिशांच्या काळात १९१० मध्ये प्रवरा नदीवर समुद्रसपाटीपासून २४०० फूटांवर हे धरण बांधलंय. धरणाच्या पाण्याने २३ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येतं, इथून वीजनिर्मितीही केली जाते. या जलाशयाला विल्सन डॅम म्हणतात. धरणाच्या खालच्या बाजूला एक छानसं उद्यान केलंय. पावसाळ्यात इथलं सौंदर्य ऐन भरात असतं, ते इथल्या धबधब्यांमुळे. इफ यू आर लकी, पावसाळ्यानंतरही धरणात पुरेसं पाणी असेल तर या धबधब्यांची मजा घेता येते. धरणाखाली छत्रीसारखा आकार घेऊन कोसळणारा अंब्रेला फॉल आहे. तिथून १२ किमीवर असणारा रंधा फॉलही खास आहे. ४५ मिटर उंचीवरून फेसाळतं शुभ्र पाणी आवेगानं खाली कोसळतं. दूरपर्यंत हा धीरगंभीर आवाज घुमत राहतो. धबधब्याच्या मागच्या कपारीत घोरपडा देवीचं मंदीर आहे. पुढे

सहस्त्र धारांनी धबधबा कोसळत असूनही आत हे मंदिर मात्र कोरडं राहतं.

जवळच अगस्ती ऋषींचा आश्रम आहे. वनवासात असताना श्रीराम, लक्ष्मण आणि सीतेसह या ठिकाणी येऊन गेल्याचं सांगतात. अगस्ती ऋषींनी दिलेल्या अमोघ बाणानेच रामाने रावणवध केल्याची कथा आहे.

भंडारदरा जलाशयाच्या पश्चिमेकडे रतनवाडी नावाचं गाव आहे. तिथं चालुक्य शैलीतलं अमृतेश्वराचं प्राचीन शिवमंदीर आहे. झंझ राजानं बांधलेल्या बारा शिवालयांपैकी हे एक. काळ्या पाषाणातल्या हेमाडपंती धाटणीच्या या मंदिरावरचं



शिल्पसौंदर्य आपल्याला अचंबीत करतं. तलावाच्या काठाकाठाने प्रवास करत मंदिरापर्यंत पोहचावं लागतं. गर्द झाडीतून जलाशयाच्या पाण्याशी लपंडाव खेळत, जलाशयाच्या पाण्यात शेजारच्या डोंगरकड्यांची प्रतिबिंबं बघत या रस्त्याने केलेला वीसेक किमीचा प्रवास अविस्मरणीय ठरतो. मंदिरासमोर एक घडीव दगडांची पुष्करणी आहे. तिच्या कोनाड्यांत अनेक विष्णूमूर्ती आहेत.


डोंगरकडे पायदळी तुडवणाऱ्या भटक्यांसाठी हा परिसर म्हणजे पर्वणी आहे. रतनवाडीवरुन दोन तासाच्या चढाईनंतर रतनगडावर पोहचता येईल. गडावर भरपूर पाण्याची अनेक टाकी आहेत. गडावरच्या रत्नाबाईच्या गुहेतून प्रवरा नदी उगम पावते. पेशव्यांच्या दप्तरांत या परिसराचा उल्लेख आढळतो.


कळसूबाई इथून जवळच आहे. भंडारदऱ्याहून बारी गावापर्यंत यायचं. हे आदिवासी गाव म्हणजे कळसूबाईचा पायथा. माथ्यावर कळसूबाईचं छोटेखानी मंदिर आणि कधीही न आटणारी विहीर आहे. डीकन गेल नावाच्या गोऱ्या साहेबानं कळसूबाई चढून गेल्यावर 'धिस इज दी किंग ऑफ डेक्कन हिल्स' असे उद्गार काढले होते. कळसूबाईच्या पायथ्यापासून अगदी नवखे ट्रेकर्सही दोन अडीच तासात वर चढून जाऊ शकतात.

थकून भागून आल्यावर एमटीडीसीचं टुमदार निवासस्थान आपला शीण घालवतं. कडाडून भूक लागलेली असते. चवदार जेवणावर येथेच्छ ताव मारल्यावर गोठवून टाकणाऱ्या थंडीत गुडुप झोप लागून जाते. सकाळी उठल्यावर समोरचा जलाशय दाट धुक्यात हरवून गेलेला असतो. हळूहळू वर येणाऱ्या सूर्याबरोबर धुकं वितळत जातं. सोनेरी प्रकाशात सगळा जलाशय झळाळून उठतो...

सामान बांधून मुंबईचं चाकावरचं आयुष्य गाठायला आपण परत फिरतो तेंव्हा आजूबाजूचे अलंग, कुलंग, मदन आणि कळसूबाईचे डोंगर माना उंच करकरून आपल्याला निरोप देत असतात... संपर्क : www.maharashtratourism.gov.in

अलंग, कुलंग आणि मदनगड या दुर्गत्रयीच्या सान्निध्यात रतनगड उभा आहे. थिलिंग वाटेवरून गडावर चढाई करता येते. अमृतेश्वर, रत्नुबाईच्या अशा जुन्या मंदिरं, हिरवीगार पठारं, नागमोडी नद्यांच्या रतनगडची भव्यता आश्चर्यचकित करते. इथल्या गुहेतलं जेवण आणि गप्पांचा फड तर अविस्मरणीय अनुभव. रतनगडाला जंगलातलं रानवेडं रत्न म्हणतात, ते म्हणूनच.





महाराष्ट्रात सह्याद्रीच्या रांगांमध्ये इगतपुरीजवळ अनेक उत्तुंग शिखरं आहेत. त्यांच्या पर्यटन विषयक महत्त्वाविषयी तर सगळ्यांनाच माहीत आहे. या रांगांमध्ये एकाहून एक सरस शिखरं आहेत. महाराष्ट्र भूमीवरचं सर्वोच्च शिखर पाहून कुलस्वामिनी कळसुबाईसुद्धा इथेच विसावली आहे. उत्तरेकडे धिप्पाड अलंग/कुलंग आणि मदनगड या दुर्गत्रयीच्या पहाऱ्यात व दक्षिणेला कात्रा आणि घनचक्कर या शिखरांच्या कुशीत भंडारदरा धरणाचं पाणी अलगद पहुडलं आहे. हा साराच परिसर मनाला वेड लावणारा आहे. याच

---

डोंगररांगेमध्ये 'जंगलातलं रत्न' म्हणजेच रतनगड दिमाखानं उभा आहे.

रतनगडाला भेट द्यायची असेल, तर सॅक पाठीवर टाकून रात्री मुंबईहून नाशिककडे जाणाऱ्या गाडीतून इगतपुरीला भल्या पहाटे उतरायचं. इगतपुरीहून शेंडी किंवा भंडारदऱ्याला जाण्यासाठी पहाटे पाच वाजता बस आहे. या गाडीने सकाळी सातच्या सुमारास आपण शेंडीला पोहोचतो. सकाळच्या



अनु.

# रानवेडा रतनगड

थंडीत सूर्याची कोवळी किरणं अंगावर घेत, इथे मस्तपैकी चहा घ्यायचा. इथून भंडारधरा धरणाचा प्रशस्त जलाशय दिसतो. हा देखावा नजर लागण्याइतका सुंदर दिसतो.


रतनगडच्या पायथ्याशी असलेल्या रतनवाडीला पोहोचण्यासाठी शेंडीहून तीन किमी चालत गेल्यावर, मुरशेत नावाचं सुंदर खेडं लागतं. इथून वल्हवायच्या नावेने एक तासात आपण जलाशय पार करून रतनवाडीला पोहोचतो. पावसाळा वगळता, होडी कायम उपलब्ध असते. अन्यथा जीपने धरणाला वळसा घालूनही रतनवाडीला जाता येतं. परंतु धरणाच्या पाचूच्या रंगांच्या पाण्यातून आजूबाजूचा परिसर न्याहाळत बोटीने जाण्याचा आनंद काही वेगळाच आहे. हा अनुभव एकदा तरी घ्यावाच. रतनवाडीला गेल्यानंतर आपलं लक्ष वेधून घेतं, ते तिथलं अमृतेश्वराचं देखणं मंदिर. इतक्या दुर्गम भागात असं अप्रतिम शिल्प कसं, असा प्रश्न पडतो. या मंदिरात कोरीव काम केलेले अनेक खांब आहेत. सभामंडप खांबावर यक्ष/किन्नरांच्या मूर्ती, पुराणातील प्रसंग कोरले आहेत.

रतनवाडीतून गडाकडे जाताना तीन वेळा नागमोडी ओढा ओलांडावा लागतो. ओढे नजर खिळवून ठेवणारे आहेत. अडीच/तीन तासांची चढण पार केल्यानंतर गडाचं दार दिसतं. दाराची बरीच पडझड झालेली आहे. थोडं वर गेलं, की एक वाट उजवीकडे रत्नुबाईच्या मंदिराकडे जाते. या मंदिराच्या बाजूलाच मोठी गुहा आहे. हल्लीच या गुहेला लोखंडी जाळी बसवण्यात आली आहे. रात्रीच्या मुक्कामासाठी ही जागा अत्यंत उपयुक्त आहे. इथे जवळच पाण्याच्या दोन टाक्या आहेत. गडाच्या माथ्याकडे दुसरा दरवाजा लागतो. या दरवाजावर हनुमान, गणपती व काही प्राण्यांच्या मूर्ती कोरलेल्या आढळतात. थोडे पुढे गेलं, की विस्तीर्ण गवताचं पठार दिसतं. पावसाळ्यात इथे कमरेइतकं उंच गवत वाढलेलं असतं. या गडाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, पावसाळ्यानंतर संपूर्ण गडावर पिवळीधमक फुलं असलेलं गवत उगवतं. संपूर्ण गडच पिवशी शाल पांघरूण

पहुडल्यासारखा दिसतो.

गडावर पाणी मुबलक आहे. अलंगगड, कुलंगगड, कळसुबाई, घनचक्कर, कात्रा अशी शिखरं इथून नजरेस पडतात. गडावरचा सूर्यास्त पाहूनच गुहेत परतायचं. चुल पेटवून रात्रीचं जेवण शिजवून पोटपूजा करायची. रात्री मित्रांबरोबर गप्पा आणि गाण्यांचा फड जमवायचा. दिवसभर गड फिरून आलेला थकवा कधी निघून जातो, ते कळतही नाही.

रतनगडावरून परतण्यासाठी दुसरा थोडासा थ्रिलिंग मार्ग आहे. गडाच्या उत्तरेला उभा कातळ खोदून एक दरवाजा तयार केला आहे. या दरवाजातून खाली उतरून अरुंद वाटेवरून गडाच्या कडेकडेने एक वाट पश्चिमेला खालच्या जंगलात उतरते. माहिती नसल्यास एखादा वाटाड्या बरोबर घ्यावा. या वाटेने साम्रद या गावी यावे. तिथून चार किमी अंतरावर भाटघर हे गाव आहे. तिथून पुन्हा दोन तासाची पायपीट करत अख्खा डोंगर खाली उतरलो, की आपण थेट कोकणात पोहोचतो. इथल्या डोळखांबे या गावातून आसनगाव इथे पोहोचून मुंबईस येता येतं. असा हा रतनगड एकदातरी पाहावाच असा आहे. परतीच्या वाटेवर आगगाडी मुंबईकडे धावत असते आणि आपण आपलं रानवेडं मन मात्र रतनगडावरच हरवून आलेले असतो.



मुंबई-नाशिक हायवेवरच्या इगतपुरीहून सध्या एक नवीन रस्ता झालाय. हा रस्ता शिर्डीजवळच्या सिन्नरला जातो. इगतपुरीहून उजवीकडे या रस्त्यावर वळून साधारण दहाएक किमीवर अजून उजवीकडे वळलं की आपण सह्याद्रीच्या डोंगररांगात शिरतो.


आपल्याला ठाणे-मुंबईकर सर्वसामान्यांना हा परिसर माहीत आहे तो फक्त भंडारदऱ्याच्या आणि रंधा धबधब्याच्या पावसाळी सहलीपुरताच. पण हा बेलाग डोंगरकडे कपाऱ्यांचा मुलुख सह्याद्रीची सगळी बुलंदी एकवटलेला आहे. याची पुसटशीही कल्पना आपल्याला नसते. पावसाळ्यात हे सगळे डोंगर ढगांनी वेढलेले असतात. या डोंगररांगांत वसलेले अलंग-कुलंग-मदन, मोरधन, बितनगड, अवंधपट्टा, रतनगड, घनचक्कर, आजोबा असे एकाहून एक सरस किल्ले गेली कित्येक वर्ष दिमाखात उभे आहेत. यातली काही ठिकाणं सोडली तर बहुतेक ठिकाणी पावसाळ्यात ट्रेकला जाणे, हा मोठा आनंदाचा ठेवा असतो. हाडाचे निसर्गप्रेमी अशा जागींच जाणं पसंत करतात. या जागी जायाला चार-पाच तास चालावं लागतं. आपलं सामान स्वतःलाच न्यावं लागतं. इथे हॉटेल वगैरेंच्या सोयी तर नसल्यामुळे पिकनिकवाल्यांचा स्वतःलाच न्यावं लागतं. इथे हॉटेल वगैरेंच्या सोयी तर नसल्यामुळे पिकनिकवाल्यांचा प्रादुर्भाव अजिबात नसतो. मुक्तपणे अनुभवता येतो. त्याला मनापासून भेटता येतं. या परिसरातला असाच एक ट्रेक आहे... रतनगडाचा.

भंडारदरा परिसरातलं मुख्य गाव आहे शेंडी. ही या परिसराची प्रमुख बाजारपेठही असल्याने सोयीही इथेच एकवटलेल्या आहेत. इथून आजूबाजूच्या खेडेगावात जायला जीप मिळतात. शेंडीहून धरणाच्या कडेने निघाले की उजवीकडे एक सडक तलावाला वळसा घेत रतनवाडी या किल्ल्याच्या पायथ्याच्या गावापर्यंत जाते. रतनवाडी जरी अगदी आडमार्गावर वसलेलं लहान गाव असलं तरी हे गेल्या कित्येक शतकांपासून महाराष्ट्रात खूप प्रसिद्ध आहे ते इथल्या अमृतेश्वराच्या देवळासाठी. त्यातही याच्या तिन्ही बाजू जबरदस्त आहे ते इथल्या अमृतेश्वराच्या देवळासाठी. त्यातही याच्या तिन्ही बाजू जबरदस्त डोंगरांनी वेढलेल्या आहेत आणि एका बाजूला भंडारदऱ्याचा विस्तीर्ण या परिसराची जीवनदात्री प्रवरा गडावरूनच उगम पावते.

रतनगडही नावाप्रमाणेच सह्याद्रीतलं एक अनमोल रत्न आहे. गावातून किल्ल्यावर रमतगमत जायला चार-पाच तास लागतात. किल्ल्यात घुसण्यापूर्वी एक छोटीशी अरुंद चिमणी पार करावी लागते. आता इथे रेलिंग्ज लावल्याने खडकात खोदलेल्या पायऱ्यावरून जाण्यात तसा धोका नाही. गडावर मोठी गुहा असून त्यात सहज वीस-पंचवीस जण मुक्काम करू शकतात. रतनगड घाटाच्या शेवटी असल्याने इथून

कोकण, भंडारदरा जलाशय, अलंग-कुलंग-मदनची त्रयी, पुराणपुरुष आजोबाचा डोंगर, घनचक्कर, कात्राबाईची खिंड, रतनगडाचा खुंटा असा भव्य नजारा दिसतो. गडावरून पलीकडच्या बाजूनेही परतायला वाट आहे. गडाच्या खालच्या सपाटीवर घाटघर वसलंय. इथून उधवणेमार्गे परत भंडारदऱ्याला येता येतं. आणि करोली घाटातून कोकणातल्या साकुर्ली-डोळखांबला पोहोचता येतं. मात्र पहिल्यांदा जाणाऱ्यांनी कोणीतरी स्थानिक माणूस बरोबरीला घेणं, अत्यंत गरजेचं आहे. या कोकणात उतरणाऱ्या वाटेवरून पायथ्याला पोहोचायला खूप वेळ लागतो. त्यामुळे पहाटे लवकर गड सोडणं चांगलं. हल्ली साकुर्लीहून किंवा डोळखांबहून शहापूरला जायला सहा आसनी रिक्षा मिळतात. अजून एक म्हणजे गडावर माकडं बरीच आहेत. त्यामुळे गुहेत आपलं सगळं सामान व्यवस्थित बंद बॅगातून ठेवणं खूप आवश्यक.

पावसाळा सुरू झाला की सगळ्या हायकर्सना वेध लागतात ते अशा हटक्या जागांचे बहरत्या पावसात त्यांची पावलं आपसूकच वळू लागतात मेघांनी वेढलेल्या सह्याद्रीत. या दिवसांतलं सह्याद्रीचं हे मनोहारी रूप निसर्गवेड्यांना पूर्वीपासून साद घालत आलं आहे. कारण पावसाळा हा सह्याद्रीच्या ऋतूचक्राचा राजाच आहे. मात्र थोडसं... मग मात्र तुम्ही ढगांना वेडंवाकडं घुमवणाऱ्या भरारा वाऱ्यात... बेभान कोसळणाऱ्या पावसात... धबधब्यात हुंदडायला मोकळे.





अनु.


रतनवाडीचा
अमृतेश्वर



मुंबई-नाशिक महामार्गावर कसारा घाट ओलांडून इगतपुरीहून उजवीकडे वळलं की आपण सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये शिरतो. इथून साधारण पस्तीसेक कि.मी.वर भंडारदरा जलाशय आहे. धरणाच्या भिंतीबाजूच्या रस्त्याने थोडंसं पुढे गेलं की एक सडक उजवीकडे तलावाच्या बाजूनेच समोरच्या डोंगररांगेत खोलवर घुसते. जलाशयाला वळसा घालत पलीकडच्या तीरावर जाणारी ही २०-२२ कि.मी.ची सडकही गेल्या काही वर्षांपूर्वीच झाली आहे. पूर्वी होडीने जावं लागे. आजही रतनवाडीसाठी भंडारदरा धरणाच्या बाजूने ठराविक वेळी होडी सुटते. इतक्या खोलवरच्या भागात जाण्याचं कारण म्हणजे रतनवाडी वसलीय सह्याद्रीच्या एका बेलाग किल्ल्याच्या, रतनगडाच्या, पायथ्याला. रतनवाडी त्याही पूर्वीपासून प्रसिद्ध आहे ती अमृतेश्वराच्या देखण्या मंदिरासाठी.

कळसूबाई-बालेश्वर डोंगररांगेतल्या अवंध-पट्ट्यापासून सुरू होणारी एकाहून एक सरस किल्ल्यांची साखळी पार रतनगड-आजापर्वतापर्यंत पसरलेली. जबरदस्त कडेकपाऱ्यांनी वेढलेला हा वेडापिसा मुलूख सह्याद्रीची सगळी बुलंदी एकवटलेला. रतनगडावरून उगम पावणारी प्रवरा या प्रदेशाची जीवनदात्री. दक्षिण खंडात सर्वप्रथम नांगर घालणारा अगस्तीदेखील हा मुलूख पाहून भारावला आणि इथे काही काळ विसावला. अशा या भन्नाट निसर्गाचा मोह प्राचीन काळापासून आपल्या पूर्वजांना होता आणि त्याची ग्वाही देत हे अमृतेश्वराचं मंदिर गेली कित्येक शतकं उभं आहे.

परंपरा सांगते की दहाव्या शतकात हे मंदिर बांधलं गेलं. त्यावेळच्या शिलाहार वंशातल्या ठाण्याच्या झंझराजाने बांधलेल्या बारा शिवमंदिरापैकी हे एक. नाशिकजवळचं त्र्यंबकेश्वर, सिन्नरजवळचं गोविंदेश्वर, जुन्नरजवळचं कुकडेश्वर, माळशेज घाटातल्या हरिश्चंद्रगडावरचं केदारेश्वर अशी काळ्या पाषाणातली बारा देवळं या राजाने बांधली.







अनु.

अमृतेश्वराचं हे देऊळ चालुक्यकालीन मंदिर वास्तूशिल्पकलेचा उत्तम नमुना आहे. देऊळ १२ मीटर रुंद, २३ मीटर लांब तर २२ मीटर उंच असून गाभारा, सभामंडप आणि शिखर अशा रचनेचं आहे. देवळाचं अजून एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे इथे गाभाऱ्याला बाहेरच्या बाजूलादेखील एक दरवाजा आहे. सर्वसाधारणपणे देवळाच्या बाहेरच्या सभामंडपातून आत जायला दरवाजा असतो. देवळात चालणारे मंत्रघोष, प्रार्थना यातून निर्माण होणाऱ्या ध्वनीच्या उत्तम कंपनांसाठी ही व्यवस्था असल्याचं नोंदी सांगतात. त्यावेळच्या तंत्रज्ञांनी देवळात उत्तम नैसर्गिक ध्वनीव्यवस्थेची कमाल केली होती. माणसाच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला ध्वनींची ही कंपनं खूप बलवान करतात, यावर आपल्या पूर्वजांचा अपार विश्वास होता.

देवळाच्या बांधकामात छायाप्रकाशाचा सुरेख मेळ साधलेला असून शैलीचा भारदस्तपणा प्रकर्षाने जाणवतो. देवळाला १५ उपशिखरं असून सगळीकडे नाजूक वेलबुट्ट्यांचं बारीक नक्षीकाम आहे. मंदिराच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूला प्रमाणबद्ध मिथुनशिल्पं कोरलेली आहेत. देवळाला प्रशस्त प्रांगण आहे. मंदिराच्या बाजूला विष्णुतीर्थ नावाची एक देखणी पुष्करणी आहे. पुष्करणीच्या भिंतीवर दहा कोनाडे असून त्यात गणपती, शेषशायी विष्णू अशा सुरेख मूर्ती कोरलेल्या आहेत.

रतनवाडी हे डोंगरांच्या बेचक्यातलं, भंडारदरा जलाशयाच्या काठावरचं लहानसं खेडेगाव आहे. अमृतेश्वराचं देऊळ अतिशय मोकळ्या, हवेशीर जागी आहे. देवळाच्या तिन्ही बाजू डोंगरांनी वेढलेल्या असून एका बाजूला जलाशयाची निळाई आहे. ही निसर्गसमृद्धी आपलं मन व्यापते आणि आपसूकच श्रद्धेची एक निराळी अनुभूती मनाला स्पर्श करते.

भंडारदऱ्याहून रतनवाडीला जाणारी सडक जलाशयाला मोठा वळसा घेत जाते. हा सगळा भाग आडरानाचा असल्याने मस्त आहे. संध्याकाळ असेल गप्पा मारत चार-पाच कि.मी. पायी चालायला एकदम मजा येते. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि सुबत्तेमुळे आपण अशा लख्ख मोकळ्या हवेत चालत जाण्याचा आनंद हरवलेला आहे. इथे मात्र तो आपल्याला नक्की परत मिळतो.


दूरवर पसरलेला जलाशय, नितळ आणि निश्चल पाण्यातल्या प्रतिबिंबांचे नाना विभ्रम, आभाळाची निळाई, डोंगरपठारावर बेभान वाहणारा ताजा वारा, मनाला वेगळीच अनुभूती देणारी शांतता, डोंगरकडांनी जाणारा रस्ता... सगळंच एकदम स्वप्नवत. खरोखर या समृद्ध निसर्गात चालत फिरताना आपण खऱ्या अर्थाने अमृतेश्वराला भेटतो.

–



# हा खेळ सावल्यांचा!

मातीचा जराँही स्पर्श नाही की रस्त्याशी संबंध नाही... मोठमोठ्या दगडांमधून वाट काढत आणि त्यावरून उड्या मारत पुढे जायचं... सोबतीला उंच, उभाच्या उभा काळाकभिन्न कातळ... या कातळभिंतींची उंची इतकी आहे की सूर्यकिरण शेवटपर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळेच तिथे सावल्यांच्या विविध छटा आणि प्रकाशाचे खेळ प्रत्येक वळणावर दिसतात. तसेच डोंगराच्या कुशीत उगम पावणाऱ्या धबधब्याच्या मार्गानं चालायला सुरुवात करून थेट नदीपर्यंत जाण्याचा अनुभव हा शब्दांच्या पलीकडचा आहे! हे वर्णन आहे सांधण व्हॅलीचं.



दऱ्याखोऱ्यांतून ट्रेकिंग, रॅपलिंगसाठी लोकप्रिय आणि सवयीच्या असलेल्या ठिकाणांपैकी सांधण व्हॅली हे ठिकाण नक्कीच नाही. ही जागा म्हणजे चकित करणाऱ्या अनेक गोष्टी, सावल्यांचा खेळ, थरार यांचा खजिनाच आहे. या ट्रेकला सुरुवात व्हॅली उतरायला सुरुवात करण्यापासूनच होते. कुठेही चढावं लागत नाही. पण हे उतरणंही अन्य ट्रेक किंवा किल्ले उतरण्यासारखं नसतं. उड्या मारत, काही वेळा मोठी पावलं टाकत उतरायचं असतं. ट्रेकला सुरुवात झाल्यावर दोन कपारींच्या कप्प्यांमधून मजल दरमजल सुरू असते. या कातळभिंतींची उंची इतकी आहे की सूर्यकिरण शेवटपर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळेच तिथे सावल्यांच्या विविध छटा आणि प्रकाशाचे खेळ प्रत्येक वळणावर दिसतात. या उंचीपुढे आपण तर कितीतरी खुजे वाटतो.

थोडं अंतर चालल्यावर व्हॅलीचा थरार सुरू होतो. आतापर्यंत गंमत, सोपा वाटणारा मार्ग कठीण होऊ लागतो. दगडावर नेमका कुठे पाय द्यायचा, कशी ग्रिप घ्यायची, याचा विचार करत एक एक रॉक पार करायचा असतो. कपाऱ्या पार करून पुढे आल्यावर सूर्याच्या किरणांना आपल्याला स्पर्श होऊ लागतो. व्हॅली उतरत येताना मोठा रॉक दिसेल तिथे तंबू ठोकून मुक्काम करायला हरकत नाही.

जवळच ओढा आणि डोह आहे. तिथून गाव तसं लांब असल्यानं रॉकवर राहण्याचा अनुभव मस्त वाटतो. सरळ वार पाहिलं तर 'बाण'चा सरळसोट सुळका पहारा देत असतो. दगडावर २० एक जण सहज राहू शकतात. जेवणाचा शिधा बरोबर ठेवला तर दगडांची चूल मांडून त्यावर खमंग जेवण करण्याचा आनंद मिळू शकतो. नाहीतर खाली गावापर्यंत येऊन सोय करावी लागते. वाटेत प्यायचं पाणी तसं उपलब्ध होत नाही. त्यामुळे पाण्याची बाटली बरोबर हवीच. या रॉकजवळून वाहणाऱ्या ओढ्यात थंडगार पाणी मिळेल.

## हे लक्षात ठेवावं

उतरायचंच तर आहे, असं म्हणून गाफील राहू नये. घड्याळाकडे लक्ष ठेवायला हवं. जास्त वेळ घालवला तर पुढची गणितं बिघडतात आणि अनोळखी रस्ता अंधारात कापणं अवघड होतं. तसंच, तीन ठिकाणी टेक्निकल सपोर्ट लागतो. एके ठिकाणी तर उभा पॅच आहे. तो रॅपलिंगनेच उतरावा लागतो. त्यामुळे पुरेसा ग्रूप बरोबर घेऊन हा ट्रेक करायला हवा. इथे येणारे भटके गावातूनच सगळी सोय करून येतात. दत्ता भांगरे नावाचा ग्रामस्थ सांधण व्हॅली आणि आजूबाजूच्या कठीण ट्रेकमध्ये खूप मदत करतो. मोठा पॅच उतरण्यासाठी रॅपलिंगसाठी त्याच्या



अनु.

मदतीची तरतूद आधीच करून ठेवलेली बरी. पण, एक नक्की आहे की, पहिला टेक्निकल पॅच तसा लांबवर आहे. त्यामुळे केवळ व्हॅलीतला सावल्यांचा खेळ आणि उंच कपाऱ्या अनुभवण्यासाठी त्या पॅचच्या पूर्वीपर्यंत जाता येतं. त्यामुळे ट्रेकिंगची सवय नसलेल्यांनाही व्हॅलीचा आनंद घेता येईल.

## सांधण व्हॅली आहे कुठे?

अहमदनगर जिल्ह्यात आणि अकोला तालुक्यात भंडारदऱ्यापासून जवळच साम्रद गावापासून ही व्हॅली सुरू होते. हे गाव तीन वाड्यांचं आणि समुद्रसपाटीपासून तब्बल ३००० फूट उंचीवर वसलेलं. गावात पहाटे उतरलं की समोर आडवी पसरलेली उंच शिखरांची डोंगररांग दिसते. एका बाजूला रतनगड, खुट्टा सुळका, तर दुसरीकडे घाटघर. पलीकडे अलंग-मलंग-कुलंग, कळसुबाई अशी ५ हजार फुटांवरची शिखरं.


## केव्हा जायचं?

सांधण व्हॅलीचा थरार अनुभवण्याची संधी वर्षभर मिळत नाही. ही व्हॅली म्हणजे मोठ्या धबधब्याचा मार्ग आहे. त्यामुळे पाऊसपाण्याची स्थिती बघून तिकडे जायचा बेत आखावा लागतो. पावसाळ्यात हा मार्ग बंदच असतो. पाऊस सरला की नोव्हेंबरच्या दरम्यान हा मार्ग खुला होऊ लागतो. व्हॅलीतून जाताना तीनदा पाणी ओलांडून जावं लागतं. त्यामुळे पाण्याचा अंदाज घेऊन पुढे गेलेलं बर.

## कसं जायचं?

लोकलनं कसाऱ्याला उतरायचं. तिथून साम्रद गावाला जाण्यासाठी गावातून जीप मागवावी. अन्यथा सकाळी इगतपुरीला जायचं आणि तिथून राजूरला जाणारी बस पकडून शेंडी या गावात उतरायचं. शेंडीवरून स्थानिक वाहनांनी साम्रदला जाता येईल. तिथूनच आपण व्हॅली उतरायला सुरुवात करतो. व्हॅली उतरून साकुर्ली गावात यायचं. त्या गावातून दहाएक मिनिटांवर डेहणे गाव आहे. या गावातून शहाडपर्यंत बस किंवा खासगी वाहन मिळतं.

9



**भैरवगड** या नावाने ओळखले जाणारे चार किल्ले महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी दोन अहमदनगर जिल्ह्यात, एक ठाणे जिल्ह्यात, तर एक सातारा जिल्ह्यात आहे. भैरवगड (शिरपुंजे) हा किल्ला अहमदनगर जिल्ह्यात, अकोले तालुक्यात शिरपुंजे गावाजवळ आ[illegible] थोडा आडवाटेला असल्याने इथे जाण्याची साधनं तशी कमीच. या परिसरात किल्ल्याला भैरोबाचा डोंगर म्हणून ओळखतात. शिरपुंजे गावातील घरांच्या डावीकडील वरती जाणारी वाट हीच भैरवगडची रुळलेली वाट. ही वाट दाट झाडीतून आणि कारवीच्या

# भैरवगड (शिरपुंजे)

रानातून असल्यामुळे उन्हाचा विशेष त्रास होत नाही. हा संपूर्ण परिसर कळसुबाई - हरिश्चंद्रगड अभयारण्यात येत असल्यामुळे येथे बेहडा, जांभूळ, हिरडा , आवळा , करवंद इत्यादी झाडे मोठ्या प्रमाणात आढळतात. शेताडीतून काही वेळ चालल्यावर " श्री क्षेत्र भैरवनाथ देवस्थान, शिरपुंजे " असे लिहिलेली एक कमान समोर येते. कमानीतून भैरवगडाच्या पाय-या सुरु होतात. येथून जी खडी चढण सुरु होते ती पार माथ्यापर्यंत कायम राहते. दीड - दोन तासात आपण भैरवगड - घनचक्कर मधील खिंडीत पोहोचतो. तेथू[illegible] कातळावरील खोदीव पाय-या चढून लगेचच माथ्यावर पोहोचतो. गडावर विशेष अवशेष नाहीत. एका गुहेत भैरोबाची अश्वारूढ मूर्[illegible] आहे. कोरीव काम केलेले शीला स्तंभ आहेत. भैरोबाची स्थानिक मंडळी पूजा करतात. शेजारी दोन गुहा आहेत पैकी एकात पाणी आहे. किल्ल्यावर इतरत्रही पाण्याच्या टाक्या आहेत. माथ्यावरून आसमंतात नजर टाकल्यास कळसुबाई, हरीश्चंद्रगड, कलाडगड, कुंजरगड, नाणेघाट असा खूप मोठा भाग नजरेस पडतो. एक दिवसाच्या निवांत भेटीसाठी भैरवगड हे उत्तम ठिकाण आहे. आणि मुक्काम करायचा असेल तर गुहा आहेच.

## कसं जाल?

इगतपुरी जवळील घोटी येथून राजूर किंवा अकोले येथे जाणा[illegible] बस पकडायची. राजूरला उतरायचं आणि तेथून आंबित गावी जाणारी बस घेऊन, शिरपुंजे गावी उतरावं. स्वतःचं वाहन असेल त[illegible] उत्तम कारण एसटी आणि जीपची सेवा या भागात कमी आहे.

## आणखी काय पहाल?

वेळ आणि खासगी वाहन असल्यास भंडारदरा धरण आणि जलाशय, रतनवाडीतील अमृतेश्वर मंदिर, घाटघरचा कोकणकडा पाहता येईल.

## मिलिंद गुणाजी यांच्या आवडीच्या ठिकाणाबद्दल त्यांनी केलेले वर्णन : भंडारदरा






छाया : मिलिंद गुणाजी

कोयनानगर इतकंच भंडारदरा हेसुद्धा माझं आवडीचं ठिकाण. भंडारदऱ्याचा जलाशय अतिशय देखणा. समुद्रसपाटीपासून सरासरी २४०० फुटांवर असलेला हा महाराष्ट्रातला सगळ्यात उंचावरचा जलाशय. भंडारदऱ्याच्या तलावाला वेढणाऱ्या बालाघाट रांगेतल्या अजस्त्र डोंगरांची सरासरी उंची साधारण साडेचार हजार फुटांपेक्षा जास्त आहे. त्यामुळेच या तलावाला अत्यंत सुंदर पार्श्वभूमी लाभली आहे. उजवीकडे अलंग, कुलंग, मदन, कळसुबाईचे डोंगर तर डावीकडे घाटाच्या कडेला दिसणारा दुर्गम गड रतनगड... पाहून थक्क व्हायला होतं. रतनगड ओळखू येतो तो त्याला लागून असलेल्या निमुळत्या सुळक्यामुळे. महाराष्ट्रातलं सर्वोच्च कळसूबाईचं शिखर (५५०० फूट) चढण्यासाठी 'बारी' या गावातून चढाई करावी लागते. भंडारदऱ्याच्या जलाशयाच्या पातळीपेक्षा थोड्या अधिक उंचावर एमटीडीसीचं रेस्ट हाऊस आहे. तिथून जलाशय अतिशय सुरेख दिसतो. तर संध्याकाळच्या वेळी रतनगडावरून दिसणारा सूर्यास्त केवळ अविस्मरणीय असा. भंडारदऱ्याचा रंधा फॉल हे पर्यटकांचं आकर्षण आहेच, त्याचबरोबर भंडारदऱ्याच्या पश्चिम तीरावर रतनगडाच्या पायथ्याशी एक विलोभनीय आणि देखणं काळ्या पाषाणातलं प्राचीन शिवमंदीर आहे. फारच कमी पर्यटकांना हे ठिकाण माहित असेल. काळ्या पाषाणात घडवलेल्या ३०-३२ फूट उंचीच्या या मंदिरातील खांबांवरील आणि छतावरील काम अप्रतिम म्हणावे असेच. एमटीडीसीकडे बुकिंग करून इथे राहण्याची सोय करता येते. त्याशिवाय एमटीडीसीच्या मागच्या बाजूला काही हॉटेल्सही आहेत. हा संपूर्ण परिसर पाहण्यासाठी दोन ते तीन दिवस तरी हवेतच.

# शिरुर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
| | मुंबई ते शिरुर | | | | | 201 | | | | |
| **1** | अळकुटी गढी | ऐतिहासीक स्थळ | गढी | | | 41 | NW | | | |
| **2** | रांजणखळग्यांचं निघोज | रांजणखळगे | | मंदिर | पक्षीजीवन | 23 | NW | 14 | SE | |
| **3** | महागणपती रांजणगांव | | | मंदिर | | 17.5 | SW | 26.5 | SW | |
| **4** | सिध्दिविनायक सिध्दटेक | | | मंदिर | | 75.5 | SE | 83 | SE | |



# अपरिचित गढी
# अळकुटी



आपल्या महाराष्ट्रात वैभवशाली इतिहासाच्या खुणा ठिकठिकाणी आढळून येतात. असाच एक ऐतिहासिक जिल्हा म्हणजे अहमदनगर. आसपासच्या नावारूपाला आलेल्या जुन्नर पासून तसा जवळच, पण तरीही पर्यटकांमध्ये तितका ओळखीचा न झालेला. एरवी जुन्नर हे नाव ऐकले की नेहमीची परिचित ठिकाणे डोळ्यापुढे येतात. शिवनेरी, लेण्याद्री, माळशेज घाट ही ठिकाणे तर पर्यटकांच्या चांगल्या ओळखीची. पण बऱ्याच प्रमाणात दुर्लक्षित अशा अनेक ऐतिहासिक वास्तू जवळच्याच अहमदनगरात आहेत. त्यापैकीच एक म्हणजे - अळकुटी. आळे - पारनेर रस्त्यावर वसलेले हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात आहे. जाताना, रस्त्याच्या दोन्ही बाजूस सोनेरी गवताने उजळून गेले माळ, डोळे दिपवून टाकतात. क्षणभर आपण कुठल्या तरी नव्या परिसरात आल्याचे जाणवते.



**अहमदनगर जिल्ह्यातील आळे-पारनेर रस्त्यावर वसलेल्या अळकुटी गावाला वैभवशाली इतिहास लाभला आहे. एकेकाळी कल्याण-जुन्नर-पैठण या व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे ठाणे असलेल्या या ठिकाणी गतकाळाची महती सांगणारी गढी अजूनही भक्कमपणे उभी आहे. मात्र हा ऐतिहासिक वारसा गड-किल्ल्यांना नेहमी भेट देणाऱ्यांच्याही फारसा ओळखीचा नाही.**

प्राचीन समजल्या जाणाऱ्या कल्याण - नाणेघाट - जुन्नर - पैठण या व्यापारी मार्गावरील 'अळकुटी' हे महत्त्वाचे ठाणे. गावाचे पूर्वीचे नाव अमरापूर असून येथे कपड्याचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. पुढे गाव आवळकंठी म्हणून ओळखले जाऊ लागले. ब्रिटिशांनी उच्चारण्यास सोपे जावे म्हणून बदलून त्याचे नाव केले - अळकुटी ! गावास उत्तर व दक्षिण भागात दोन वेशी असून, त्याला जोडून पूर्वी तटबंदी व आठ बुरुज होते. गावातील बहुतांश ऐतिहासिक खुणा आता नामशेष झाल्या असल्या तरी सरदार कदमबांडे यांची चार एकर जमिनीवर पसरलेली भक्कम गढी आजही गतकाळाची महती सांगत उभी आहे.


गढीचे भव्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून दणकट आहे. कमानीवर कमळपुष्पे आणि शरभशिल्पे आढळतात. प्रवेशद्वाराचा खालचा भाग दणकट घडीव दगडांचा आणि वरील दोन मजली बांधकाम विटांचे पण अत्यंत सुबक आहे. त्यात रेखीव जाळ्यांची, सुंदर गवाक्षे आहेत. प्रवेशद्वाराच्या आत दोन्ही बाजूस प्रशस्त देवड्या आहेत. वरील भागात जाण्यासाठी डावी-उजवीकडून जिने आहेत, पैकी एक बुजलेला आहे. गढी साधारण १८ व्या शतकाच्या सुरुवातीस बांधण्यात आली पण तटबंदी आजही शाबूत असून आपल्या दणकटपणाची कल्पना देत ताठ उभी आहे. तटाची रुंदी सहा फूट आहे. तटबंदीतील वैशिष्ट्यपूर्ण जंग्या आजही


राजन महाजन / अमेय गोखले

सुस्थितीत आहेत. गढीला चार भक्कम बुरुज आहेत व प्रत्येकात एक मजली बांधकाम आहे. आग्नेय दिशेच्या बुरुजातील वर जाणा-या पाय-या सुस्थितीत आहेत. वरील भागात गोलाकार पक्के बांधकाम असून मध्यभागी खळगा आहे. बहुदा याचा वापर, ध्वजस्तंभ उभारण्यासाठी केला जात असावा. इतर तीन बुरुजांच्या आतील भागाची खूप पडझड झाली आहे. पायऱ्या आणि वरील मजल्याचे वेगळे अस्तित्वही नाहीसे झाले आहे. गढीच्या आतील दुमजली चौसोपी वाडा आज अस्तित्वात नाही. वाड्याची काही जोती पहावयास मिळतात. त्यावरील एक सोपा जेमतेम उभा आहे. बाजूलाच बारमाही पाणी असलेली विहीर आहे. वाड्यातील भुयार, दालने, नक्षीकाम असलेले खांब, सिंहासन अशा अनेक गोष्टी काळाच्या ओघात नष्ट झाल्या आहेत. शहाजीराजे भोसले आणि कृष्णाजी व व्यंकोजी कदमबांडे हे निजामशाहीतील मातब्बर सरदार होते. पुढे कदमबांडे, मोघलांचे जहागीरदार झाले व स्वतःचे पायदळ आणि घोडदळ बाळगून होते. मल्हारराव होळकर हे सरदार कांताजी कदमबांडे यांच्या घोडदळात होते आणि तेथून त्यांच्या पराक्रमाचा उदय झाला. पुढे बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीत, गुजरात मोहिमेतील पराक्रमाबद्दल सरदार कांताजी कदमबांडे यांना धुळे, रनाळा, कोपर्ली, तोरखेड भाग मिळाला. त्यांचे पराक्रमी बंधू रघोजीराव हे त्यांच्या 'मल्हारराव' या पुत्रासोबत, तोरखेडला स्थायिक झाले तर त्यांचा दुसरा पुत्र 'कमळाजी' हा अळकुटी येथेच राहिला. आजही गढीत सरदार कदमबांडे यांचे वंशज वास्तव्य करून आहेत. गढी शेजारीच महादेवाचे मंदिर सरदार कदमबांडे यांनी बांधून घेतले. त्यात देवनागरीत खालीलप्रमाणे शिलालेख आहे -

**' श्री सीवचरणि दृढभाव**
**कमळाजी**
**सुत रघोजी कदमराव पाटिल**
**मोकदम मौजे आमरापूर**
**उर्फ आवळकंठीप्रगणे**
**कर्डे सरकार जुन्नर**
**सके १६७२**
**श्री सुखनाम संवत्सरे**
**मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदा**
**र _ _ _ _ _ _ _शुभं भवतु'**

एका दिवसात अळकुटी-सोबत लोणी मावळा येथील तटबंदी, प्रवेशद्वार तसेच वडगाव दर्या गुहेतील देवीच्या मंदिरातील 'लवण-स्तंभ' , निघोज येथील रांजणखळगे ही ठिकाणे देखील पहाता येऊ शकतात.





असे हे वैभवशाली इतिहास लाभलेले अळकुटी, ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले पाहणाऱ्यांनाही परिचित नाही. इतिहासाच्या या दुर्लक्षित पानावर अनेक महत्त्वाच्या नोंदी असल्याने त्याचे महत्त्व मात्र अबाधित आहे.

**संदर्भ** - १. लोकहित (अळकुटी परिसर विशेषांक - २०१०)२. डॉ. सदाशिव शिवदे यांचा लेख - ' सरदार कदमबांडे यांचा वाडा '



अनु.

# रांजणखळग्यांचं गाव...







राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
प्रणाम घ्यावा पहिला माझा महाराष्ट्र देशा...

गोविंदाग्रजांनी केलेलं महाराष्ट्राचं हे वर्णन जसं इथल्या माणसांना लागू होतं, तितकंच इथल्या भूगोलाला आणि निसर्गालाही. राकट स्वभावाच्या मराठी माणसांचा अनुभव तसा आपल्याला नित्याचाच. पण दगडांचं काय? मुंबई, पुण्यासारख्या शहरांत राहून तो थोडाच येणार! त्यासाठी किमान एकदा तरी सिमेंटच्या जंगलातून बाहेर पडून महाराष्ट्र सफरीवर निघायला हवं. पण नुसते दगड बघण्यासाठी दोन दिवसांची सुटी वाया घालवायची? पटत नाही ना! दगडासारखे दगड ते आपला शीण काय घालवणार? असंच ना!

पण नगर जिल्ह्याच्या पारनेर तालुक्यातील निघोजकडं तुमची पावलं कधी वळलीच तर ही शंका सहज दूर होईल. शिरूर शहरापासून काही अंतरावर असलेलं हे गाव. रांजणखळग्यांचं गाव म्हणून ओळखलं जातं. रांजणखळगेही कसे? तर चित्रविचित्र पण मनमोहक आकारांच्या दगडांनी तयार झालेले. निघोजच्या दक्षिणेला वाहणाऱ्या कुकडी नदीच्या पात्रातच हे रांजणखळगे पाहायला मिळतात. वर्षानुवर्षे येथील खडकांतून वाहणाऱ्या कुकडीच्या पाण्यानं या दगडांना एक आकार दिलाय. तोही इतका साचेबद्ध की, एखाद्या गवंड्याने आपल्या छिन्नीने येथील दगडांवर जणू फुरसतीने कलाकुसर केली असावी. निसर्गाचा हा अविष्कार डोळे भरून पाहावा असाच आहे.

कुकडी वाहतेच मुळी खडकांतून. कुकडीच्या पाण्याच्या माऱ्याने येथील खडकाचा कमकुवत भाग वाहून गेलाय आणि आता येथील ३०० चौरस मीटर प्रदेशात रांजणखळगे तयार झालेत. निवळशंख पाण्याने भरलेले हे खळगे डोळ्यांचं



अनु.

पारणं फेडतात. या खळग्यांमध्ये मासेमारीचा आनंदही लुटता येतो. इतकंच नव्हे तर घराबाहेर राहून बाथ टबच्या आंघोळीची मजा लुटायची तर निघोजला पर्याय नाही. सपाट खडकाला कापत कापत कुकडीचा प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतो. वाहणाऱ्या पाण्याचा जिथं वेग आहे, तिथं खडकांना भोक पाडून पाणी आरपार गेलं आहे. एखाद्या कृत्रिम बोगद्यातून गाडी पार व्हावी तसं.

नदीच्या पश्चिमेला बांधलेल्या बंधाऱ्यापासून रांजणखळग्यांना सुरुवात होते. या ठिकाणी कुंडांचा आकार इंग्रजी पाचसारखा वाटतो. निसर्गाचा हा अविष्कार बघताना समाधी कधी लागते हेच कळत नाही. ही भव्यदिव्यता डोळे दिपवून टाकतेय, असे वाटलं तर कुंडमाऊली या स्थानिक देवतेचं सुंदर मंदिर डोकं टेकायला आहेच. या देवीला मळगंगा असंही म्हणतात. मळगंगा देवीनेच हे रांजणखळगे तयार केले, अशी दंतकथा सांगितली जाते. एका रात्रीत देवीने आपल्या नखाने नदीचे पात्र ओरखडून खळगे बनवले असे भाविक मानतात.

धार्मिक वृत्तीच्या पर्यटकांसाठीही हे स्थळ तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक चैत्रात इथे देवीचा उत्सव साजरा होतो. हजारो लोक यात्रेसाठी येतात. पण कुकडी आणि तिच्या कुशीतल्या निसर्गाशी हितगुज करायचं तर यात्रेचा काळ वगळून आल्यास उत्तम. पक्षी निरीक्षकांसाठीही निघोज भेट बऱ्याच कारणांनी अर्थपूर्ण ठरते. मळगंगा मंदिराच्या दक्षिणेला काही अंतरावर चीप स्वॅलोबर्ड या पक्षांची वसाहत आहे. चिमणीपेक्षा काहीसे मोठे व करडे-निळसर पक्षी पाहण्यातील मजा औरच. या पक्षांची अनेक घरटी नदीतील खडकांच्या कपारीला पाहायला मिळतात. वर्षातून कोणत्याही वेळी निघोजला भेट देता येते. पण डिसेंबर ते मार्चच्या काळात कुकडीचे पाणी

## कसं जाल ?

**मुंबई ते पुणे रेल्वेने जाऊन नंतर पुणे-नगर हायवेवरून शिरूरमार्गे निघोजला जाता येते. कल्याण-शिरूर एसटीने निघोजला जाता येते. कल्याणवरून दिवसाला किमान तीन गाड्या शिरूरला जातात.**

ओसरत असल्यानं खडकांची कुसर चांगली अनुभवता येते. उत्कृष्ट पर्यटनस्थळांमध्ये नोंद झाल्यानं इथं पर्यटकांचाही राबता असतो. मुक्काम करायचा झाल्यास शिरूर या तालुक्याच्या ठिकाणी लॉजची सोय आहे. मुंबईपासून पाच तासांवर असल्याने एका दिवसाची रपेटही शक्य आहे. महाराष्ट्रातील दगडांच्या रांगडेपणाची नजाकत बघायची तर निघोजसाठी एखादा विकेण्ड रिझर्व्ह करायलाच हवा.

## श्री महागणपती ( रांजणगाव )



महागणपती म्हणजे शक्तीयुक्त गणपती. महागणपती आठ, दहा अथवा बारा भुजांचा (हातांचा) असतो. भगवान शिवशंकरांनी महागणपतीचं ध्यान करून त्रिपुरासुरावर विजय मिळवला. पुणे-नगर महामार्गावर पुण्यापासून ५० किमी अंतरावर, महागणपतीचं मंदिरही मुख्य रस्त्यापासून जवळच आहे. मंदिराचं प्रवेशव्दार भव्य आणि प्रेक्षणीय आहे. मंदिराचं दिशासाधन केलेलं असल्याने दक्षिणायनात (संक्रांतीनंतर) गणेशमूर्तीवर सूर्याची किरणं पडतात. पूर्वाभिमुख असलेली मूर्ती अत्यंत मोहक असून दोन्ही बाजूंनी ऋध्दी सिध्दी उभ्या आहेत.


## श्री सिध्दिविनायक ( सिध्दटेक )



कार्य सिद्धीस नेणारा हा सिध्दिविनायक अष्टविनायकांपैकी एकमेव उजव्या सोंडेचा गणपती. श्री विष्णूला इथं सिध्दी प्राप्त झाली होती अशी कथा आहे. चिंचवडच्या मोरया गोसावींना आणि केडगावच्या नारायण महाराजांना इथंच सिध्दी प्राप्त झाली. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात भीमा नदीच्या काठावर सिध्दटेक वसलं आहे. सिध्दिविनायकाचे मंदिर टेकडीवर असून त्यास पेशवेकालीन महत्त्व लाभलं आहे. मंदिराचा गाभारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेला आहे. सिध्दिविनायकाची उत्तराभिमुख मूर्ती स्वयंभू आहे. मखर पितळेचं असून सिंहासन पाषाणाचं आहे. गणेशाने एक मांडी घातलेली असून त्यावर ऋध्दी-सिध्दी बसलेल्या आहेत. मागील प्रभावळीवर चंद्र, सूर्य आणि गरूडाच्या आकृती असून मध्यभागी नागराज आहे. गणपती उजव्या सोंडेचा असल्याने तो कडक असल्याचं भाविक मानतात.

# जळगांव जिल्हा
# जळगांव

| | - | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – अंतर किमी. | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते जळगांव | | | | | 414 | | | | |
| **1** | पारोळा | किल्ला | | | | 60 | SW | | | |
| **2** | सुतोंडा | किल्ला | | | | 81 | SW | 66 | SE | |



# पारोळ्याची गढी

'पारोळा' हे नाव इतिहासाच्या अथवा दुर्गभ्रमणाच्या कुठल्याच पुस्तकात कधी वाचलं नव्हतं किंवा कोणाकडून ऐकलंही नव्हतं. पारोळा किल्ला पाहायला जाणार म्हटल्यावर पारोळा, हा कुठे आहे, असे प्रश्नही विचारण्यात आले. मला पारोळ्याची माहिती अपघातानेच मिळाली. रोड एटलास-महाराष्ट्र या पुस्तकात जळगाव जिल्ह्याचा नकाशा पाहत असताना, लोकसंख्या, नद्या, प्रेक्षणीय स्थळं इत्यादी माहितीच्या कोष्टमध्ये दुर्ग : पारोळा असं वाचलं आणि उत्सुकता चाळवली गेली. इण्टरनेटवर शोध घेतला तेव्हा महाराष्ट्र जिल्हे गॅझेटिअरमध्ये परोला फोर्टची थोडी माहिती मिळाली. पारोळ्याला जाण्यासाठी ती पुरेशी होती.



एका रविवारी जळगावला पोहोचलो. तिथून एसटीने दीड तासात पारोळा इथे पोहोचलो. जळगाव सुरत मार्गावर पारोळा गाव आहे. एसटी स्टॅण्डपासून चालत दहा मिनिटात पारोळाच्या भुईकोट किल्ल्यात गढीत आलो.



किल्ल्याच्या सर्वात बाहेरील तटबंदीला लागून वस्ती असल्याने जवळ गेल्याशिवाय किल्ला नजरेस पडत नाही. या तटातील दरवाजा सुस्थितीत आहे. या दरवाज्यानंतर सुकलेला खंदक लागतो आणि पुढे मुख्य दरवाजा. उत्तराभिमुख

मुख्य दरवाजा दोन बुरुजांनी संरक्षित आणि भक्कम केलेला आहे. दरवाज्याची कमान आणि बुरूज शाबूत आहेत पण दरवाजा गायब आहे. कमानीतून आत आल्यावर एक भव्य बुरुज आपलं स्वागत करतो. या बुरुजाच्या आकार वेगळा म्हणजे वर चिंचोळा होत जाणारा आहे. पूर्वेकडील खंदकामध्ये बांधीव तलाव आहे. तिथून पुढे आग्नेय दिशेचा बुरुज प्रचंड मोठा तसंच मजबूत आहे. किल्ल्याच्या तटबंदीची उंची ३५-४० फूट आहे. ती शाबूत असून किल्ल्याच्या भक्कमपणाची जाणीव करून देते. आतमध्ये एक महादेवाचे मंदिर आहे. किल्ल्याचं वैशिष्ट्य म्हणजे साधारण चार फूट लांब, चार फूट रुंद आकाराच्या १०-१५ विहिरी. त्यातील बहुतांश विहिरी कोरड्या आहेत. ज्यांना पाणी आहे त्यांचा वापर तिथे राहणारी कुटुंबं करतात. बाल्लेकिल्ल्याची थोडीशी तटबंदी वगळता सर्व वास्तूंची पडझड झाली आहे.

जळगाव जिल्हा गॅझेटियरप्रमाणे हा किल्ला इ.स. १७२९ मध्ये जहागीरदार हरी सदाशिव दामोदर यांनी बांधून घेतला. इतर माहितीप्रमाणे राणी लक्ष्मीबाई (झांशी) यांचं गाव पारोळा. त्यांच्या वडिलांनी हा किल्ला बांधून घेतला पण या माहितीस आधार नाही. पारोळा इथलं ३५० वर्षं जुनं बालाजी मंदिर खूप प्रसिद्ध आहे. सध्या तीन कोटी रुपये खर्चुन त्याच्या जीर्णोद्धाराचं काम सुरू आहे.

पारोळा हे गाव धुळ्याहून ३० किमी आणि जळगावहून ४५ किमी दूर आहे. दोन्ही ठिकाणांहून एसटी किंवा जीपने तीन ते चार तासात किल्ला पाहून परतता येईल.



# भव्यदिव्य सुतोंडा

सुदर्शन कुलथे

अजिंठा रांगेतील अंतुर आणि लोंझ्याची सफर केल्यानंतर त्याच्याच पुढे अनोखा सुतोंडा उभा आहे. सुतोंड्याला नायगावचा किल्लाही म्हटलं जातं. अर्थातच पायथ्याला असलेल्या नायगावमुळे. नाशिकहून चाळीसगाव-नागद-बनोटी असा सरळ रस्ता आहे. चाळीसगाव ते बनोटीगाव हे साधारण ४५ किमी अंतर भरतं. गावाला लागून नदीकाठावर शंकराचं अतिशय सुंदर देवालय आहे. त्यात भटक्यांची झोपण्याची व्यवस्था होऊ शकते.

बनोटी गावालगत साधारण ३ किमी अंतरावर नायगाव हे सुतोंडा किल्ल्याच्या पायथ्याचं गाव. बनोटी ते नायगाव रस्ता थोडा कच्चा असला, तरी फार खराब नाही. नायगाव हे शेती, पशुपालन आणि दूधदुभत्याचं गाव. एका समृद्ध किल्ल्यावर असावं असं तटबंदी, बुरूज, प्रवेशद्वार, खंदक, भुयारी मार्ग, चोर दरवाजा, लेणी, गुहा, वाड्याचं बांधकाम, पुरातन मशीद आणि मोजतानाही दमछाक होईल इतके पाण्याचे टाके! किल्ला चढाईला सोपा असला आणि वर जाण्याची वाट सोपी असली, तरी किल्ल्याच्या सर्व दिशांना पसरलेला हा दुर्गपसारा व्यवस्थित बघण्यासाठी गावातून सोबतीला वाटाड्या घ्यायलाच हवा. किल्ला चढण्यासाठी दोन वाटा आहेत. एक समोर दिसणाऱ्या भागातून म्हणजे किल्ल्याच्या उत्तरेकडून आहे, तर दुसरी वाट समोर दिसणाऱ्या भागातून किल्ल्याला उजवीकडून वळसा घालत किल्ला डावीकडे ठेवत पलिकडच्या म्हणजेच दक्षिण बाजूनं कातळ फोडून केलेल्या खंदकासारख्या भागातल्या प्रवेशद्वाराने माथ्याकडे जाते.

सुतोंडा किल्ला दक्षिणेकडे एका उंच डोंगराला जोडलेला आहे. त्या डोंगराला त्यावर असलेल्या देवीच्या मंदिरावरून 'रक्ताईचा डोंगर' असं म्हटलं जातं. गडमाथ्याच्या या दिशेला थोडं पुढं गेलं, की पायऱ्या उतरून जाण्याचा भुयारी मार्ग आपल्याला आत खेचून घेऊन जातो. आत मिट्ट काळोख असतो. त्या काळोखात आतली वाट वळण घेते आणि अंधारातून काही प्रकाशकिरणं आत येताना दिसतात. या प्रकाशाच्या दिशेने आपण एका दरवाजातून बाहेर पडतो, ते एका मोठ्या खंदक मार्गात. मुख्य पर्वतरांगेतील रक्ताईचा डोंगर आणि सुतोंडा यांना अलग करणारा हा खंदक. खंदकाचं काम म्हणजे अतिशय अवघड; कारण त्यासाठी संपूर्ण कडा फोडून त्यातून पुन्हा वर जाण्याच्या या मार्गाची रचना कोरण्यात आली आहे. खंदकातून प्रवेशद्वार आणि त्यावरच्या तटबंदीवर नजर मारल्यास वरच्या भागात 'केवल शरभ' हे वैशिष्ट्यपूर्ण शिल्प दिसून येतं, तर एका ठिकाणी तोफ खंदक मार्गावर तोफ डागण्यासाठी गोलाकार छिद्र असलेला दगड बसवलेला दिसतो. हे विलोभनीय दुर्गस्थापत्य बघून येणारा प्रत्येकजण याच्या निर्मात्याची आठवण काढतोच. खंदकमार्गातून गडाच्या पश्चिम दिशेने वळसा घालत खाली उतरत पुन्हा नायगाव गाठता येतं. मराठवाडा आणि अजिंठारांगेचा हा परिसर तसा कायमच पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेला आहे.


सुतोंडा किल्ल्यावर दुर्गस्थापत्यानुसार केले जाणारे सर्व प्रकारचे पाण्याचे टाके बघायला मिळतात आणि त्यात प्रचंड पाण्याचा साठाही आहे. आकाराने लहानगा; पण गडावषेशांनी समृद्ध असलेला सुतोंडा बघताना आपण आचंबित होतो.



अनु.

# विदर्भ - मराठवाडा
## औरंगाबाद जिल्हा
## औरंगाबाद

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते औरंगाबाद | | | | | 369 | | | | |
| **1** | अजिंठा | गुंफा लेणी | | | | 102 | NE | | | |
| **2** | वेरुळ | गुंफा लेणी | | | | 34 | NW | 104 | SW | |
| **3** | म्हैसमाळ | | हिलस्टेशन | तलाव | मंदिर | 39 | NW | 15 | N | |
| **4** | ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर | | | | मंदिर | 31 | NW | 1.5 | W | |
| **5** | दौलताबाद (देवगिरी) | किल्ला | | | | 17.5 | NW | 13.5 | SE | |
| **6** | लोणार | | पक्षीजीवन | सरोवर | मंदिर | 136 | NE | 157 | E | |
| **7** | औरंगाबाद | पाणचक्की | बिबी का मकबरा | गार्डन | | 0 | | 17.5 | SE | |
| **8** | पैठण | | धरण | गार्डन | मंदिर | 51.5 | S | 51.5 | S | |




अलौकिक



अनु.

औरंगाबादपासून १०० किमीवर अजिंठा लेण्या. घोड्याच्या नाल आकारातील एकूण २९ लेण्या आहेत. दक्षिणेतील औरंगाबादपासून ३० किमीवर बौद्ध, हिंदु आणि जैन धर्मांशी नातं सांगणाऱ्या वेरुळ लेण्या आहेत. १६ क्रमांकाची कैलास लेणी खास आहे. जवळच बारावं ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर आहे.



सगळ्यांनाच वेरूळची लेणी माहीत असतील. आपण सगळेजण शाळेच्या सहलीमधून किंवा इतर ट्रीपच्या माध्यमातून वेरूळची लेणी पाहिलेली असतात. अशावेळी इतरांसोबत बोलता बोलता, गप्पा मारत या लेण्यांचा फेरफटका मारतो. गाइड सांगत असलेल्या गोष्टी ऐकत असतो. इतर पर्यटनस्थळांप्रमाणेच या लेण्या पाहतो आणि परततो. परंतु वेरूळच्या लेण्या म्हणजे वास्तूशिल्पशास्त्रातला आणि अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या 'रॉक कट' बांधकामातला, मानवाने गाठलेला परमोच्च टप्पा आहे, हे बऱ्याच जणांना ठाऊक नसतं. मात्र परदेशी 'जाणते' पर्यटक इथे चार दिवस मुक्काम ठोकून या अलौकिक निर्मितीचा पुरेपूर आनंद घेतात.

वेरूळला हिंदूंच्या १७, बौद्धांच्या १२



अनु.

आणि जैनांच्या ५ अशा एकूण ३४ गुंफा आहेत. अखंड पाषाणातून घडवलेलं, भव्य 'कैलास लेणं' ही त्यावेळच्या शिल्पकारांनी घडवलेली पृथ्वीवरची आजवरची सर्वश्रेष्ठ कलाकृती असावी. त्याचा निर्मितीकाळ इ. स. ६०० ते ७६० असा आहे. त्यावेळी महाराष्ट्रात राष्ट्रकुटांची सत्ता होती. ते सुराज्यासाठी प्रख्यात असल्याने त्यांच्या काळात धर्म, शास्त्र, कला मोठ्या प्रमाणावर विकसित होऊन त्यांची ख्याती जगभर पसरली. त्याकाळी बनारस, नालंदा, श्रीवस्ती, अमरावती अशी प्रसिद्ध विद्यापीठं होती. त्यातूनच तयार झालेल्या प्रज्ञावान पदवीधरांनी अजोड कलाकृती निर्माण केल्या. विशेषतः शिल्पकलेत कमावलेलं त्यांचं कसब तर आजच्या तंत्रज्ञानाच्या प्रगत काळालाही अवाक करणारं होतं.



हे लेणं 'आधी कळस मग पाया' या तत्त्वावर निर्माण केलं आहे. त्यांनी अशी उलटी सुरुवात का केली असावी? कैलास लेण्याची जागा साधारणपणे अडीचशे फूट लांब, सव्वाशे ते दीडशे फूट रुंद आणि मागच्या डोंगराच्या कड्याची उंची शंभरेक फूट इतकी भव्य आहे. एवढा प्रचंड आकारमान असलेला अखंड पाषाण शिल्पकारांनी छिन्नी-हातोड्याने कसा काय खोदला असेल? असं म्हणतात की हे लेणं खोदताना शिल्पकारांनी तीन लाख क्युबिक टन जांभ्या दगड (बेसॉल्ट) केवळ छिन्नी हातोड्याने खोदून काढला. तोही वरून खाली म्हणजे उलट येत! हे सगळं भव्य-दिव्य काम सव्वाशे ते दीडशे वर्षं अत्यंत चिकाटीने सुरू होतं. त्याचा मास्टरमाइण्ड कोण असेल? शिल्पकारांच्या चार-पाच पिढ्या हे





काम करत होत्या असं गृहीत धरल्यास हा मास्टरमाइण्ड पुढच्या पिढ्यांना कसा सोपावला असेल, अगदी सुरुवातीला त्या विद्वान शिल्पकारांचे काय अंदाज असतील, त्याचं व्हिज्युअलायझेशन कसं असेल, त्यात पुढच्या पिढ्यांनी काय कसं व्हॅल्यू ॲडिशन केलं असेल, या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचं काम सुरू आहे. तरी आज जे अतिशय भव्य पाषाणशिल्प मूर्त स्वरूपात दिसतंय ते सगळ्या जगाने 'अलौकिक' म्हणून निर्विवाद मान्य केलंय.

या परीघामध्ये त्यांनी देवळाच्या तीन बाजूंना 'गल्ल्या' (tranches) खोदलेल्या आहेत. या गल्ल्यांच्या डाव्या बाजूंना साधारणत: १० ते १२ फूट रुंदीच्या ओवऱ्या असून त्या अनेक दगडी खांब आहेत. यातली सगळ्यात विलक्षण गोष्ट म्हणजे कुठलाही आधार नसलेला प्रचंड कॅण्टिलीवर. ओवऱ्यांच्या वरचा बाहेरच्या बाजूचा भाग सहज १२ ते १५ फूट बाहेर अधांतरी आहे. या अधांतरी भागावरचा लाखो टन वजनाचा पहाड ७० ते ७५ फूट इतक्या प्रचंड उंचीचा आहे. सध्याच्या प्रगत बांधकामशास्त्रात घराबाहेरच्या लहानशा गॅलरीलाही आतल्या बाजूला शिगांचा आठ फुटांचा भक्कम आधार असतो. त्यामुळे हा कॅण्टिलीवर म्हणजे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने असामान्य 'उंचीचा' आहे.

ओवऱ्या आणि मंदिर यातलं अंतर सहज १८ ते २० फूट आहे. या गल्ल्या त्यांनी



अनु.

कशा खोदल्या असतील हा प्रश्न अवाक करतो. या गल्ल्या खोदल्यावर जो मोठा पाषाण निघाला त्यात त्यांनी मंदिर अखंडच ठेऊन खोदलं आहे.



देवळासमोर साधारणतः ४५-५० फूट उंचीचे दोन स्तंभ कोरले असावेत जेणेकरून त्यांना मंदिराची उंची निश्चित करता आली असेल. मंदिर साधारणतः पहिल्या मजल्याच्या उंचीवर आहे. देवळाचा मुख्य दरवाजा मंदिराच्या मध्यभागी असून समोर नंदीमंडप आहे. त्यापलिकडे प्रवेशद्वाराच्या दिशेने एक मोठं दालन एका दगडी पुलाने जोडलं आहे. मंदिराचा दरवाजा साधारण सात फूट उंचीचा असून चार फूट रुंद आहे. या दरवाजातून ते दगड फोडत आत गेले आणि त्यांनी गाभाऱ्याबाहेर ५० फूट लांबी-रुंदीचा हॉल खोदला. त्याच्या चारही कोपऱ्यांत प्रत्येकी चार-चार असे सोळा खांब खोदले. आतमध्ये गाभारा आणि मोठी पिंड आहे. या सगळ्यांची प्रमाणबद्धता अचूक आहे. मंदिराबाहेरच्या भिंतींवर रामायण-महाभारतातले अनेक प्रसंग अत्यंत कल्पकतेने कोरले आहेत. बाजूच्या ओवऱ्यांतून अनेक सालंकृत शैव आणि वैष्णव शिल्पं कोरली आहेत.

असं म्हणतात की लेण्यांचं काम पूर्ण झाल्यावर प्रमुख शिल्पकार लेण्यांसमोर उभा राहिला. त्याने अनिमिष नेत्रांनी आपली अतिभव्य कलाकृती डोळे भरून बघितली आणि उस्फूर्तपणे म्हणाला, 'काय हे आम्ही केलं? छे छे, देवकृत्यमिदम्!' देवांनी आमच्या हातून करवून घेतलं!

खरंच कैलास लेणं जाणत्या वयात वेगळ्याच मनस्थितीत घेऊन जाते. नकळत मन, बुद्धी या निर्मितीचा खोल विचार करू लागते. ही निर्मिती आपल्या पूर्वजांनी केलीय यामुळे डोळे भरून येतात. हे कैलास लेणं एकदा जरून बघा पण 'जाणत्या' नजरेतून!

-





अनु.

# म्हैसमाळ

**औरंगाबाद** जिल्ह्यातील म्हैसमाळ हे थंड हवेचं ठिकाण आहे. (औरंगाबादपासून ३५ कि.मी.) मराठवाड्याचे थंड हवेचे ठिकाण म्हणूनही ते प्रसिद्ध आहे. गोलाकार पर्वतरांगामध्ये वसलेल्या म्हैसमाळला बारमाही पाणीसाठा असलेला प्रचंड मोठा तलाव आणि घाट रस्ता आहे. हे ठिकाण गिरिजादेवी मंदिरासाठी प्रसिद्ध असून दरवर्षी येथे नवरात्र व माघ पौर्णिमेच्या दिवशी यात्रा भरते. श्री बालाजी मंदिर, गोरक्षनाथांची गुहा, दूरदर्शनचे सहप्रक्षेपण केंद्र, गिरिजा नदीचे उगमस्थान ही या स्थानाची काही वैशिष्ट्ये. वेगवेगळ्या ऋतूत म्हैसमाळचं नैसर्गिक सौंदर्य वेगवेगळी अनुभुती देतं. हिवाळ्यात बहरलेली हिरवाई आणि उन्हाळ्यात रणरणत्या उन्हात थंडीचा परिचय करून देणारे हे एकमात्र पर्यटनस्थळ. तरुण जोडप्यांसाठी हे ठिकाण आल्हाददायी ठरते. सनसेट पॉइंट, व्ह्यू पॉइंट ही पर्यटकांची आवडती ठिकाणं आहेत. निवासासाठी खाजगी संस्थेचे चालविलेले रिसोर्ट आहे. वन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृहही आहे.




## घृष्णेश्वर

सर्व ज्योतिर्लिंगांची यात्रा केल्यावर सर्वात शेवटी घृष्णेश्वराचे दर्शन घेतल्यावर खऱ्या अर्थाने यात्रेची समाप्ती होत असा समज आहे. जगप्रसिद्ध वेरूळ लेणीपासून अवघ्या एक कि. मी. अंतरावर असलेले हे मंदिर पर्यटकांत आणि भाविकांत चांगलेच लोकप्रिय आहे.



वेरूळला आलेले पर्यटक कैलास लेणी जशी चुकवित नाहीत, तसेच घृष्णेश्वरचे दर्शनही चुकवित नाहीत. हेही मंदिर चांगलेच भव्य असून, आतले प्रांगण विशाल आहे. थोर शिवभक्त मालोजीराजे भोसले आणि अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केलाय. मंदिराचा सभामंडप तब्बल २४ दगडी खांबांवर पेलला गेलाय. श्रावणी सोमवार, प्रदोष, शिवरात्र व पर्वणेच्यावेळी जत्रा भरते. औरंगाबादहून वेरूळ लेणी केवळ २१ कि. मी. अंतरावर असल्याने तेथेच मुक्काम करून टॅक्सी सेवा घेता येते. टॅक्सी सेवा घेतल्यास दिवसभरात वेरूळ लेणी तर पाहून होतच शिवाय घृष्णेश्वर आणि वाटेतला दौलताबादचा किल्लाही बघता येतो. कैलास लेणीसमोरच भोजनासाठी वेगवेगळ्या दर्जाची हॉटेल्स आणि काही धाबेही आहेत.



**घृष्णेश्वर :** वेरुळच्या रस्त्यावर घृष्णेश्वराचं मंदिर आहे. हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. याचा जीर्णोद्धार शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले आणि त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केला. मंदिराच्या बाह्यभागावर अनेक देवदेवतांची शिल्पं आहेत. आत खोल गाभाऱ्यात श्री. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग आहे. मंदिर पाहून मन प्रसन्न होते. त्याजवळच मालोजीराजांची गढी आहे.



प्राचीन काळापासून 'वास्तू' माणसाच्या आकर्षणाचा विषय आहे. आपल्या घरापासून ते थेट एखाद्या जीर्ण वाडे पाहिल्यावर त्याची आपल्याला साक्ष पटते. माणसांचे वास्तूंभोवती अनेक ऋणानुबंध असतात. मग ते गावाकडचं घर असेल किंवा किल्ला असेल. या वास्तू मनात घर करून असल्याने कधी ना कधी त्यांना भेट द्यायचा मोह होतो. तिच्या विषयी ऐकलेल्या... इतिहासात नमूद केलेल्या घटनांचा संदर्भ आठवून प्रत्यक्ष ती वास्तू पाहून भारावून जायला होतं. असाच एक किल्ला म्हणजे देवगिरी. सह्याद्रीच्या पूर्वेकडच्या अजंठा डोंगररांगेतला हा किल्ला गेली आठशे वर्षं आपल्या आवेशपूर्ण विजयांचं, वैभवाचं रोमहर्षक भांडार सांभाळून दिमाखात उभा आहे. किती जबरदस्त घडामोडी या किल्ल्याने पाहिल्या असतील. त्या प्रदीर्घ अनुभवांचं तेज या किल्ल्याच्या चिऱ्यांवर असल्याचं दिसतं!

एकेकाळी दख्खनच्या पठारावर या किल्ल्याचा विलक्षण दरारा होता. हा पूर्वी 'देवगिरी' या नावाने देशाला परिचित होता. आता मात्र तो 'दौलताबाद' म्हणून ओळखला जातो. आजही मजबूत असलेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा बघून आपण एका निराळ्याच विश्वात... गतकाळात जातो. किल्ल्याची बुलंद तटबंदी किल्ल्याच्या गोष्टी सांगू लागते...बाराव्या शतकातल्या. मराठ्यांना त्यावेळी खूपच प्रतिष्ठा होती. भिल्लम यादवने ११८७ मध्ये बांधलेला हा अतिबळकट दुर्ग त्यावेळच्या दख्खनचं ऐश्वर्य होता. देवगिरीनगरात तीन मजली घरं, मोठे ऐसपैस वाडे आणि सुरेख कलाकुसर असलेली देवळं होती. फळा-फुलांनी बहरलेल्या बागा होत्या. देवगिरी ही दख्खनच्या पठारावरची सर्वात वैभवशाली राजधानी होती. किल्ल्यावर यादवांचा गरुडध्वज दिमाखात फडकत होता.

हा दुर्ग प्रसिद्ध होता तो अभेद्यपणासाठी. गडाची रचना अशी करण्यात आली आहे ज्यामुळे आत प्रवेश करणं केवळ अशक्य होतं. किल्ल्याभोवती पसरलेली सहा कि.मीची तटबंदी, त्या भोवती मोठं खंदक. बहुतेक ठिकाणी आतमधली तटबंदी दुपदरी आणि काही ठिकाणी तीनपदरी. सगळ्या दरवाजांची रचना अशी की हत्तीला धडक




अनु.

मारण्यासाठी जागा नाही. या सगळ्यांना पार करून शत्रू आत आला तरी वर जाण्यासाठी एक मोठी मोट पार करावी लागायची. त्यावेळी अत्यंत चतुरपणे 'पुली'चा वापर केला होता. या मोटेवरचा चामड्याचा पूल उचलून आत घेण्याची सोय होती. एवढेही करून शत्रू खोलवर घुसला तर पुढे जाण्याचा मार्ग एका अंधाऱ्या गुहेतून जाणारा. या गुहेत फसव्या वाटादेखील होत्या. या गुहेच्या वाटेवर विशेष पद्धतीने विकसित केलेले अणकुचीदार टोकं असलेले लोखंडी खिळे पसरलेले असत. हे काटे कसेही टाकले तरी त्यांचे एक टोक वर राहायचं. हे सगळं करून शत्रूने जर गुहा पार केलीच तर गुहेच्या वरच्या तोंडावर एक मोठा लोखंडी तवा ठेवलेला असायचा. त्यावर जाळ केला जायचा किंवा उकळतं तेल ओतलं जायचं. गुहेमध्ये धूर सोडायचे. आजही काकड्याच्या उजेडात आपण त्या भुयारी मार्गाने जाऊ शकतो.

१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी या अफगाणाने देवगिरीवर आक्रमण करून किल्ला ताब्यात घेतला. १३२७ मध्ये महमंद तुघलक याने तर पातशाहीची दिल्लीची राजधानी हलवून देवगिरीला स्थापन केली. देवगिरी हे नाव बदलून दौलताबाद केलं. त्याने त्याचा सगळा लवाजमा दिल्लीहून हलवून इथे आणला. त्यानंतर हा किल्ला जवळ जवळ दोनशे वर्षं बहामनी सुलतानांच्या अधिपत्याखाली होता. नंतर मुघल सम्राट अकबराकडे तो काहीं काळ होता. ज्याने त्यावेळचं 'खरकी' म्हणजे आताचं औरंगाबाद शहर वसवलं.

इथला 'चांद मिनार' हा दिल्लीच्या कुतुबमिनारच्या खालोखालचा भारतातला दुसऱ्या क्रमांकाचा उंच मिनार आहे. हा मिनार २१० फूट असून पायाचा घेर ७० फूट आहे. १४३५ मध्ये अल्लाउद्दीन बहामनीने बांधला. याच्या लाद्या पर्शियाहून आणल्या होत्या. टेकडीवरचा चिनी महाल त्यावेळी अत्यंत सुंदर म्हणून प्रसिद्ध होता. औरंगजेबाने या महालात गोवळकोंड्याचा शेवटचा राजा अब्दुल हसन ताना याला १३ वर्षं कैदेत ठेवलं होतं. शेवटी इथेच तो मरण पावला. किल्ल्यातली १०६ खांब असलेली जामी मशीद खिलजी राजवटीच्या कुतुबद्दीन मुबारकने १३१८ मध्ये बांधली.

या वास्तूशी अनेक ऐतिहासिक संदर्भ निगडित आहेत. खोलेश्वर, बिच्चंणदेवासारख्या पराक्रमी सेनापतींच्या, महाप्रतापी महादेवराय यादवाच्या स्पर्शाने पुनित झालेली ही वास्तू ऐतिहासिक मानबिंदू आहे.




शिवपुराण आणि पद्मपुराणात वर्णन केलेल्या देवपर्वत या डोंगरात बांधलेला हा किल्ला केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतातील अद्वितीय किल्ला आहे. देवगिरी किल्ला सारीपाटातल्या सोंगटीसारखा दिसतो. राष्ट्रकूट राजा श्रीवल्लभ याने या दुर्गाची उभारणी इ.स. आठव्या शतकात केली. राष्ट्रकूटांनी यादवांना या किल्ल्याचा अधिपती म्हणून नेमले. ते राष्ट्रकूट राजवंशाचं मांडलिक घराणं होतं. राष्ट्रकुटानंतर महाराष्ट्रावर चालुक्यांची सत्ता आली. पण देवगिरी दुर्गावर यादवांचीच नियुक्ती झाली. पुढे दुबळ्या चालुक्यांच्या (केंद्रसत्तेचा) फायदा घेऊन चालुक्यांची ताबेदारी झुगारून भिल्लम यादवाने या बलाढ्य दुर्गाच्या साहाय्याने आपली स्वतंत्र राजवट सुरू केली. इ.स. १२९६ ला देवगिरीवर अल्लाउद्दीन खिलजीचं आक्रमण झालं. देवगिरीवर मग क्रमाने खिलजी आणि तुघलक यांच्या राजवटी झाल्या. महम्मद तुघलक यांच्याविरुद्ध बंड करून अल्लाउद्दीन बहमनी याने देवगिरी, दौलताबादलाच स्वतंत्र बहामनी साम्राज्याची घोषणा केली. पुढे बहामनी राज्याची पाच शकलं झाली आणि देवगिरी आणि आजूबाजूचा परिसर अहमदनगरच्या निजामशाही राज्यात होता. मोगलांनी दक्षिणेत स्वारी करून निजामशाही नष्ट केली आणि औरंगाबादेवर मोगलांचा अमल चालू झाला.

चोरवाटा, भुयारं, फसवे रस्ते, डोंगर कोरून कडे तासून चहुबाजूंनी खंदक असलेला आणि खास तंत्राने बांधलेला हा किल्ला 'अजिंक्य', 'बुलंद' अशा विशेषणांना पात्र झाला आहे. त्या काळातल्या युरोपियन प्रवाशांनी याची तुलना युरोपमधल्या मध्ययुगीन लढाऊ किल्ल्याशीच केलेली आहे. प्रत्येक ठिकाणी हत्तींच्या धडकांना पुरून उरतील अशी टोकदार काट्यांची लोखंडी महाद्वारे आहेत. गडाच्या पहिल्या कमानीतून आत शिरल्यावर भिंतीजवळ ओळीनी मांडून ठेवलेली पुरातन शिल्पे आपल्या मोहवून टाकतात. डाव्या हाताला पन्नास मीटर लांब आणि तीस मीटर रुंदीचा दगडी हाथी हौद आहे. या प्रांगणाच्या बाहेर उजव्या हाताला दिल्लीच्या कुतूबमिनारची दक्षिणेतील प्रतिकृती चांदमिनार पाहायला



अनु.

मिळते. याला तीन मजले आहेत. स्थानिक लोकांच्या मते, अल्लाउद्दीन बहामनीने बांधला आहे. दुसऱ्या तटबंदीतून आत जाताच सात मीटर लांबीची अजस्त्र मेंढातोफ नजरेस पडते. या तोफेच्या शेपटावर मेंढयाच्या मुंडक्याची प्रतिकृती तोफ बनवतानाच केलेली आहे. इथे एका महालाचा काही भाग आहे त्याचं नाव चिनी महाल. संभाजी राजांच्या पत्नी येसूबाई अन् युवराज शाहू यांनी इथेच बंदीवास भोगला. तसंच गोवळकोंड्यांचा सुलतान अबु हसन तानाशहाच्या नशिबीही इथे तुरुंगवास आला.

देवगिरी किल्ल्याचा बालेकिल्ला एकमेवाद्वितीय असा आहे. इथे जाण्यासाठी असलेल्या अक्राळविक्राळ खंदकावर उचलता येणारा पूल आहे. पूर्वी शत्रू येताच तो वर उचलला जाई. आता मात्र तो पक्क्या स्वरूपात खंदकावर ठेवलेला आहे. त्या अरुंद पुलावरून जाताना खाली पहिल्यास छातीत धस्स होते. या किल्ल्याचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अगदी माथ्यावर असणाऱ्या गुहेत श्री जनार्दन स्वामी यांचं स्मृतिस्थान आहे. हे संत एकनाथांचे गुरू होते. दौलताबाद किल्ला औरंगाबादपासून फक्त १२ किलोमीटर अंतरावर आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर सुरुवात करून दौलताबाद किल्ल्यापासून दोन ते अडीच तासात किल्ला फिरून होतो आणि जर आदल्याच दिवशी किल्ला पाहून झाला असेल तर सरळ खुल्दाबाद गाठायचं. इथे अनेक सुफी संताच्या कबरी आणि दर्गा आहेत. मौलाना मुंतजमोद्दीन जरजरीबक्ष यांची दर्गा आहे.




**एकेकाळी दख्खनच्या पठारावर या किल्ल्याचा विलक्षण दरारा होता. हा पूर्वी देवगिरी या नावाने देशाला परिचित होता. आता मात्र तो दौलताबाद म्हणून ओळखला जातो. आज यातलं काहीही अस्तित्वात नाही. मात्र आजही मजबूत असलेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा बघून आपण एका अनोख्या विश्वात आल्याची जाणीव होते आणि आपण अलगदपणे गतकाळात जातो.**

घरापासून थेट एखाद्या प्राचीन जीर्ण वाड्यांपर्यंतची प्रत्येक वास्तू माणसाला विचारप्रवृत्त करते. माणसांचे या वास्तूंभोवती अनेक ऋणानुबंध असतात. कित्येक वेळेला न बघताही त्यांच्या मनात या वास्तू घर करून असल्याने कधी न कधी हे सगळे तिला भेटायला जायचा प्रयत्न करतात. तिच्याविषयी या ऐकलेल्या इतिहासात नमूद केलेल्या घटनांचा संदर्भ आठवून प्रत्यक्ष त्या जागा पाहून भारावून जातात. अशीच एक अजिंक्य, बळकट आणि बलदंड वास्तू म्हणजे देवगिरीचा किल्ला.

सह्याद्रीच्या पूर्वेकडच्या अजंठा डोंगररांगेतला हा किल्ला गेली ८०० वर्षं आपल्या आवेशपूर्ण विजयाचं, वैभवाचं रोमहर्षक भांडार सांभाळून दिमाखात उभा आहे. केवढ्या जबरदस्त घडामोडी या वास्तूने बघितल्या! या प्रदीर्घ अनुभवाचं तेज या वास्तूच्या प्रत्येक चिऱ्यावर प्रकर्षाने दिसतं. इतकी कीं या सामर्थ्यवान किल्ल्यावरच हिंदुस्थानची राजधानी स्थापून सगळ्या देशाचा कारभार पाहावा असा महमद तुघलकाचा मनसुबा होता आणि त्याने तो साकारदेखील केला. अर्थात किल्ला लढून जिंकणं शक्यच नाही, हे त्याला चांगलंच माहित असल्याने त्याने तो फंदफितुरीने जिंकला.

एकेकाळी दख्खनच्या पठारावर या किल्ल्याचा विलक्षण दरारा होता. हा पूर्वी देवगिरी या नावाने देशाला परिचित होता. आता मात्र तो दौलताबाद म्हणून ओळखला जातो. आज यातलं काहीही अस्तित्वात नाही. मात्र आजही मजबूत असलेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा बघून आपण एका निराळ्या विश्वात आल्याची जाणीव होते आणि अलगदपणे गतकाळात जातो.

किल्ल्याची आजही बुलंद असलेली तिहेरी तटबंदी आपल्याला किल्ल्याच्या रोमहर्षक गोष्टी सांगू लागते. अगदी बाराव्या शतकातल्या! मराठे त्यावेळी खूप प्रतिष्ठा बाळगून होते. भिल्लम यादवाने ११८७ मध्ये बांधलेला हा अती बळकट दुर्ग त्यावेळच्या दख्खन पठाराचं ऐश्वर्य होता. देवगिरीनगरात तीन तीन मजली घरं, मोठे ऐसपैस सोपे असलेले वाडे आणि सुरेख कलाकुसर असलेली देवळं होती. देवगिरी ही महाराष्ट्राची सर्वात वैभवशाली राजधानी होती. किल्ल्यावर यादवांचा गरुडध्वज दिमाखात फडकत होता.

हिंदू राजवटीचा हा प्राचीन दुर्ग आपल्या अभेद्यपणासाठी प्रसिद्ध होता. गडाची रचना इतकी बिकट की आत प्रवेश करणं केवळ अशक्य. किल्ल्याभोवती पसरलेली सहा कि.मी. तटबंदी. या तटबंदी भोवतीचा मोठा खंदक


बहुतेक ठिकाणी आतमधली तटबंधी दुपदरी तर काही नाजूक ठिकाणी तीन पदरी. सगळ्या दरवाजांची रचना अशी की हत्तीला धडक मारण्यासाठी अजिबात जागा नाही. अशा अडथळ्यांतून शत्रू आत आला तरी वरती जाण्यासाठी एक मोठी मोट पार करावी लागते. त्यावेळी या लोकांना पुलाचा उपयोग चांगलाच ज्ञात होता. या मोटेवरचा चामड्याचा पूल उचलून आत घेण्याची सोय होती. एवढंही करून शत्रू खोलवर घुसला तर पुढे जाण्याचा मार्ग एका भयानक अंधार असलेल्या गुहेतून जाणारा. या गुहेत फसव्या वाटादेखील होत्या. या गुहेच्या वाटेवर त्यांनी विकसित केलेले चार अणकुचीदार टोकं असलेले लोखंडी खिळे पसरलेले असतं. हे काटे कसेही टाकले तरी त्यांचं एक टोक वरती राहत असे. हे सगळं करून शत्रूने गुहा पार केली तर गुहेच्या वरच्या तोंडावरती एक मोठा लोखंडी तवा ठेवलेला असे. त्यावर जाळ आणि वरून उकळतं तेल सोडणं अथवा धूर सोडत असत. आजही काकड्याच्या उजेडात आपण त्या भुयारी मार्गाने जाऊ शकतो. आत शिरल्यावर काकडा विझवून भयानक अंधारदेखील अनुभवू शकतो.

इथला चांद मिनार हा दिल्लीच्या कुतुबमिनार या खालोखालचा भारतातला दुसऱ्या क्रमांकाचा उंच मिनार आहे. हा मिनार १४३५ मध्ये अल्लाउद्दीन बहामनीने बांधला.

१२७४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी या अफगाणाने देवगिरीवर आक्रमण करून किल्ला ताब्यात घेतला आणि किल्ल्यावरचा यादवांचा गरूडध्वज जाऊन चांद सितारा चमकू लागला. नंतर महंमद तुघलकाने तर पातशाहीची दिल्लीची राजधानी हलवून देवगिरीला स्थापन केली. यानेच देवगिरी नाव बदलून दौलताबाद केलं.

अटकेपार मराठी जरीपटका झळकवणारे राघोबादादा, मराठी मनावर ज्यांची मोहिनी अगदी आजही असे सदाशिवभाऊ यांनी हा अजिंक्य किल्ला परत जिंकला. गोष्टी आहे पानिवत मोहिमेवर निघायच्या अगोदरच्या रंगपंचमीची आणि त्याचवेळची अजून एक घटना मराठी मनात शल्य ठेवून आहे. देवगिरीवर सदाशिवभाऊंनी परत मराठी भगवा फडकवला आणि उत्तरेतून बातमी आली की दत्ताजी शिंदे पडले. देवगिरी जिंकल्यावर एका वेगळ्याच कैफात रंगपंचमी साजरी करायचं मराठी लष्कराचे मनसुबे उधळले गेले. आपल्याला आजही अस्वस्थ करणारं जे पानिपतचं युद्ध आहे त्याची बीजं याच दौलताबादच्या परिसरात पडली. दत्ताजी शिंद्यांच्या वधाचा बदला घेण्यासाठी आणि मग सदाशिवभाऊ मराठी मनात कायमचे हुरहूर लावून गेले. असा हा मराठी मनात कायम हुरहूर लावणारा अजून एक प्रसंगदेखील याच वास्तूशी निगडित आहे.

इथे अगणित ऐतिहासिक संदर्भ आणि ऋणानुबंध आहेत. खोलेश्वर, बिच्चणदेवासारखा पराक्रमी सेनापतींच्या, महाप्रतापी महादेवराय यादवाच्या स्पर्शाने पुनीत झालेली ही सामर्थ्यवान वास्तू आपली मानबिंदू आहे, हे नक्की.



आ ऊ टिं ग

## औरंगाबाद, लोणार

तब्बल पन्नास हज्जार वर्षांपूर्वी उल्कावर्षावातून तयार झालेलं लोणार सरोवर हे इथलं आणखी एक वैशिष्ट्य. औरंगाबादपासून हे पावणेदोनशे किलोमीटरवर आहे. औरंगाबादहून जालनाकडे राज्य महामार्गावरून सिंदखेडराजामार्गे इथे जाता येतं. लोणार सरोवराच्या परिसरातच एमटीडीसीच्या टुरिस्ट कॉम्प्लेक्समध्ये राहण्याचा पर्यायही खुला आहे.

औरंगाबादला जाण्यासाठी रात्री ९.२०ला छत्रपती शिवाजी टर्मिनसहून सुटणाऱ्या देवगिरी एक्सप्रेसने जाता येतं. गाडी पहाटे पावणेपाच-पाचच्या सुमारास औरंगाबादला पोहोचते.

औरंगाबाद, अजंठा-वेरुळ व लोणार परिसरातली निवास व्यवस्था, संपर्क :

स्टेशनाजवळ एमटीडीसी रिसॉर्ट : रुमभाडे : ४०० ते हजार रुपये. संपर्क : ०२४०-२३३१५१३ २७२४१७६. हॉटेल रविराज : मुख्य शहरात. रुमभाडे : साडेचारशे ते नऊशे रुपये. संपर्क : ०२४०-२३५२१२४-२५. खेमीज इन : रुमभाडं : हजार ते साडेसतराशे रुपये. संपर्क : ०२४०-२४८४८६८.

अजंठा-वेरुळमध्ये सुविधा : वेरुळजवळ : कालिदास हॉटेल : रुमभाडं सातशे ते बाराशे रुपये.

संपर्क : ०२४३७-२४४५४३, २४४४४६, अजंठा लेण्यांजवळ : ट्रॅव्हलर्स लॉज : रुमभाडं : २०० ते ३०० रुपये.

संपर्क : ०२४३८-२४४२२६. लोणार सरोवराजवळ : एमटीडीसी टूरिस्ट कॉम्प्लेक्स : रुमभाडं साडेतीनशे ते बाराशे रुपये. संपर्क : ०७२६०-२२१६०२.

# भुरळ घालणारं लोणार

## प्रेक्षकांचा लाडका नट प्रशांत दामले सांगतोय लोणारच्या नैसर्गिक सरोवराची गोष्ट !



अनु.

नाटकाच्या दौऱ्यांच्या निमित्ताने मी संपूर्ण महाराष्ट्र फिरलोय. अनेक ठिकाणं पाहिली. पण त्यातल्या कोणत्याही ठिकाणाने मनावर इतकी जादू केली नव्हती तितकी या लोणारच्या तळ्याने मला भुरळ घातली. हे तळं थोडंथोडकं नाही तर ५० हजार वर्ष जुनं आहे. एक उल्का पडल्याने या तळ्याची निर्मिती झाली. संपूर्ण जगभरात हे तिसऱ्या क्रमांकाचं मोठं सरोवर आहे. भारतातलं मात्र एकमेवाद्वितीय! बुलढाणा जिल्ह्यातल्या १३२ मीटर खोली असलेल्या या तळ्याला कधीही न आटण्याचं वरदान लाभलंय. काळ्या बसाल्टच्या खडकात वसलेलं हे तळं खाऱ्या पाण्याचं आहे. त्यळ्याचं पाणी खारं असलं तरी तळ्याकाठी नैसर्गिक समृद्धतेची रेलचेल आहे. पाणीही अतिशय युनिक रंगाचं - पोपटी तपकिरी - आहे. तळ्याकाठी वास्तव्याला असणारे फ्लेमिंगोसारखे सगळे पक्षी इथे आढळतात.

'लोणार' नक्की कुठे वसलंय हा प्रश्न तुमच्या मनात एव्हाना रुंजी घालायला लागला असेल आणि त्याचं वर्णन ऐकून तिकडे जाण्याचा बेतही मनात शिजू लागला असेल. मुंबईपासून याचं अंतर ५५० किलोमीटर आहे, तर औरंगाबादेपासून अवघं १६० किलोमीटर. जगप्रसिद्ध अजंठाच्या लेण्यांपासून इथे रस्तामार्गे जायला अवघे साडेचार तास लागतात. त्यामुळे औरंगाबाद दर्शनाचा विचार असेल तर त्याच फेरीत महाराष्ट्राचं हे वैभवही पाहून या. रेल्वेने जायचा विचार करत असाल तर



अनु.



भुसावळ-नागपूर मार्गावरचं मलकापूर हे अत्यंत जवळंच स्टेशन.

पायऱ्या वगैरे बांधण्याचे असफल झालेले प्रयत्न बघतो. तळ्याकाठी झालेलं पायऱ्यांचं बांधकाम खरं तर पावसाच्या जोरदार तडाख्याने उद्ध्वस्त झालेलं आहे. मग वर कसं जायचं हा विचार लगेच मनात डोकावला असेल. काळजी करू नका, दगडाचा एक मार्ग आहे.

तळ्याला लागूनच असलेल्या जंगलामध्ये साधारण १२-१३ व्या शतकात बांधलेली मंदिरं आहेत. जंगलामध्ये भल्यामोठ्या बुंध्याची वृक्षराजीही आहे. एकूणच लोणारची सफर हा नयनरम्य अनुभव आहे. एक खंत मात्र आहे ती म्हणजे या जागेला आपण म्हणावं तसं एक्सपोजर देत नाही. आता अमेरिकेत गेलेल्या माणसाला नायगारा धबधबा बघितल्याशिवाय निघता येत नाही तसं या लोणारच्या तळ्याबाबत व्हायला हवं. लोणारची नैसर्गिक विविधता सगळ्यांपर्यंत पोहचायला हवी, असं कळकळीने वाटतं.




लोणारच्या या तळ्याबद्दल इथले स्थानिक लोक आख्यायिका सांगतात की, या तळ्याच्या परिसरात लोणार देवीचं वास्तव्य आहे आणि तिचा वावर आजही इथे असतो. या देवीच्या वास्तव्यामुळे तळ्याचं कृत्रिम बांधकामापासून संरक्षण होतं. हे आपल्याला खरंही वाटू लागतं जेव्हा आपण इथे

**पन्नास हजार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे तयार झालेलं लोणार सरोवर बुलढाणा जिल्ह्यात आहे.**

**पर्यटनाची व्याख्या विस्तारून वैज्ञानिक महत्त्व असलेल्या अशा ठिकाणांचा आपल्या पर्यटन यादीत समावेश व्हावा.**





## जायचं कसं ?

मुंबई-औरंगाबाद-जालना-लोणार
अंतर : ६०० किमी

जवळचं विमानतळ : औरंगाबाद (१२२किमी)

जवळचं रेल्वेस्टेशन : जालना (९० किमी)

राहण्यासाठी...

सारोवराच्या जवळच एमटीडीसीचं रिसॉर्ट

पन्नास हजार वर्षांपूर्वीची गोष्ट...पृथ्वीवर हिमयुगाची सांगता होतेय. मानवी उत्क्रांतीच्या एका टप्प्यावरच्या होमोइरेक्टस, केसाळ मॅमथ हे पृथ्वीवर राज्य करताहेत. आकाशात एकाएकी प्रकाश दाटतो, ईशान्य दिशा उजळून निघते. आकाशातून एक प्रचंड आकाराचा तेजोगोल पृथ्वीकडे झेपावतो. वेगाने जमिनीच्या दिशेने झेपावणाऱ्या त्या तेजोगोलाच्या प्रकाशाने लक्ष सूर्य एकाच वेळी उगवल्याचा भास होतो. तो अग्निगोल पृथ्वीवर आदळतो. दशदिशा दणाणून टाकणारा आवाज होतो. धूळ, दगड आभाळात उडतात... २० लाख टन वजनाच्या महाकाय उल्केनं पृथ्वीच्या पोटात शिरत आपली जागा बनवलेली असते. दिडशे मीटर खोलीचं महाकाय विवर तयार करून ती लुप्त होऊन जाते...

जमिनीच्या पृष्ठभागावर साधारण २१०० मीटर व्यासाचं आणि तळाशी १४०० मीटर व्यासाचं विवर तयार होतं. आखून घ्यावं असं वर्तुळाकार. गोल या विवराच्या तळाशी हजारो वर्षांत आसपासच्या प्रदेशातून वाहून येणारं पाणी क्षार घेऊन येतं. बाष्पीभवनामुळे पाणी उडून जातं. क्षार मागे राहतात. दिवसेंदिवस त्या पाण्याचा खारटपणा वाढत जातो. त्यातून एक विशाल खाऱ्या पाण्याचं सरोवर आकाराला येतं...

हे सरोवर आजही आपण बघू शकतो. हे जगातलं तिसऱ्या क्रमांकाचं मोठं उल्का सरोवर, तर अग्निजन्य खडकांच्या प्रदेशात उल्काघाताने बनलेलं हे जगातलं एकमेव सरोवर आहे. ते आहे आपल्याच राज्यात. बुलढाणा जिल्ह्यातल्या लोणार सरोवराने जगभर आपली खास ओळख बनवली आहे. आपली पर्यटनाची व्याख्या थंड हवेची ठिकाणं, समुद्रकिनारे, किल्ले यापलीकडे गेलेली नसल्याने खूप जणांना असं काही खगोलशास्त्रीय आश्चर्य आपल्यापासून हाकेच्या अंतरावर असू शकेल याची कल्पनाच नसते. १८२३ मध्ये सी.जे.ई. अलेक्झाण्डरने या सरोवराविषयी पहिल्यांदा अभ्यासपूर्ण नोंद केल्याचं आढळतं.

विदर्भातल्या बुलढाणा जिल्ह्यात लोणार आहे. तालुक्याचं गाव असलेल्या लोणारला जाण्यासाठी जालना, परभणी आणि अकोला इथून गाड्या आहेत. लोणार गावाच्या थोडं बाहेर हे ठिकाण आहे. सरोवराच्या अगदी जवळ गेल्याशिवाय त्या ठिकाणाची कल्पना येत नाही. हिरव्यागार दाट झाडीने सगळा परिसर व्यापून गेलाय. सरोवराच्या पाण्यापर्यंत

पोहोचण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. या पायऱ्या उतरून खाली गेल्यावर आपण पाण्याजवळ पोहोचतो. एरवी समुद्राच्या पाण्याची चव आपण घेतलेली असते. पण या सरोवराचा खारटपणा प्रचंड आहे. शेकडा ३५ ते ३८ टक्के क्षार इथल्या पाण्यात असल्याचं संशोधनानंतर सिद्ध झालंय. हा परिसर निजामाच्या ताब्यात असताना या पाण्यातून हजारो रुपयांचा सोडा आणि मीठ काढून विकल्याची नोंद आढळते. अगदी १९७२ पर्यंत या पाण्यातून मोठ्या प्रमाणात हे क्षार काढले जात. हे पाणी अत्यंत अल्कधर्मीय आहे. पीएच पेपरने टेस्ट केल्यास याचा पीएच बारा असल्याचं आढळलं. पन्नास हजार वर्षांपूर्वीच्या एका खगोलीय घटनेत तयार झालेल्या सरोवराजवळ आपण उभे आहोत ही जाणीवच थरारून टाकणारी असते.

लोणार गावातलं दैत्यसूदनाचं मंदिर अतिशय सुंदर मंदिर आहे. टेम्पल्स ऑफ दख्खन हा ग्रंथ लिहिणाऱ्या हेन्री कझिन्सच्या मते हे मूळचं सूर्यमंदिर असावं. मंदिराच्या बाह्यभागावर अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्याच्या छतावर लवणासुराच्या वधाचं सुरेख चित्र आहे. पुराणात यासंदर्भातली कथा आढळते. लवणासुर नावाचा दैत्य खूप मातला होता, म्हणून मोहिनीरूपात प्रकट होऊन विष्णूने विराजतीर्थात लपलेल्या लवणासुराचा वध केला असं या कथेत म्हटलं आहे.


सरोवराभोवती रामगया मंदिर, वाघ शंकर मंदिर, मोर शंकर मंदिर आणि कमलजादेवीची मंदिरं आहेत. तलावाच्या पाण्यात सतत गोड्या पाण्याची धार पडत असते. या ठिकाणाशेजारीही अनेक मंदिरं आहेत.

ही सगळीच मंदिरं हेमाडपंती प्रकारची आहेत. दोन पाषाणाचे चिरे एकत्र बसवताना कोणताही जोडणारा पदार्थ बांधकामात वापरलेला दिसत नाही, तरीही बरंचसं बांधकाम आजही शाबूत आहे.

या ठिकाणाचं वैशिष्ट्य केवळ खगोलीय किंवा पौराणिक मंदिरांपुरतं नाही. लोणार सरोवराच्या काठी असलेला निसर्ग खास अनुभवण्यासारखा आहे. या परिसरात अनेक मोर आहेत. पहाटेच्या निवांत वेळी या परिसरात गेलात तर अगदी जवळपास मोराचा तो खास 'मियाँव' हमखास कानी पडतो. नशीब जोरावर असेल तर आपला राजेशाही पिसारा सावरत लांडोरींच्या कळपात रुबाबात हिंडणारा मोर हमखास दर्शन देतो. हिवाळ्यात अनेक स्थलांतरित पक्षीही आढळतात. याशिवाय भारद्वाज, कवडा, बुलबुल, कोतवाल, कोकीळ, मुनिया, सुगरण, चातक हे पक्षीही दिसतात. पाण्याच्या आसपास फ्लेमिंगो, चक्रवाक, पाणबुडे, बदकं, बगळे यांचं दर्शनही नेहमीचं.

लोणारच्या या अनेकविध वैशिष्ट्यांमुळे अमेरिकेतल्या अनेक संस्था, भारतातल्या सागर आणि इतर काही विद्यापीठातले संशोधक लोणारवर संशोधन करीत आहेत. संशोधक, निसर्गप्रेमी, खगोलशास्त्रज्ञ या सर्वांबरोबर सामान्य पर्यटकाला आकर्षित करण्याची क्षमता या ठिकाणात आहे. आपली पर्यटनाची व्याख्या विस्तारून हे आगळंवेगळं ठिकाण नक्कीच बघायला हवं.

# इतिहासाचा फेरफटका



औरंगजेबाची राजधानी असलेल्या औरंगाबादमध्ये तत्कालीन मुघल साम्राज्याच्या खुणा आजही आहेत. जगप्रसिद्ध अजिंठा-वेरुळची लेणी पाहण्यासाठीही याच औरंगाबादेत यायचं आणि निसर्गातील नवलाईचा चमत्कार ठरलेलं लोणारचं सरोवर पहायचं, तरी औरंगाबादेतून जाता येतं. आजही औरंगाबाद शहराला दिल्ली-आग्रा परिसराचा फील येतो.


सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा. इतिहासातील प्रत्येक कालखंडाच्या पाऊलखुणा... दोन हजार वर्षांहून जुनी परंपरा जपणारा प्रदेश. या जिल्ह्यात २५ किलोमीटरला एक तरी पर्यटन स्थळ आहे. औरंगाबाद शहरात मुघलकालीन मकबरा, निजामकालीन पानचक्की, बौद्धधर्मीय लेण्या आहेत, नवीन पर्यटन स्थळांमध्ये सिद्धार्थ उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालय यांचा समावेश आहे.

शहरालगत १४ किमीवर इ.स. ११८७चा भिल्लम राजाने उभारलेला देवगिरी किल्ला आहे. यादव कालीन अजिंक्य मानलेल्या या दुर्गला मुघलकाळात अल्प काळासाठी देशाच्या राजधानीचा मान मिळाला. नंतर त्याचं दौलताबाद असं नामकरण झालं. दौलताबाद मार्गावरच खुल्दाबाद इथं औरंगजेब कबर आणि बनीबेगम की बाग हे दोन मुघलकालीन संदर्भ आढळतात. भद्रा मारोतीही खुल्दाबादमध्ये आहे. म्हैसमाळ हे जिल्ह्यातलं थंड हवेचं ठिकाण. तिथे छोटा बालाजी देवस्थान आहे.

औरंगाबादपासून ३० किमीवर बौद्ध, हिंदु आणि जैन धर्मांशी नातं सांगणाऱ्या वेरुळ लेण्या आहेत. १६ क्रमांकाची कैलास लेणी खास आहे. जवळच बारावं ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर आहे. वेरुळमार्गावरच कन्नड तालुक्यात पितळखोरा लेणी, पाटणा देवी, कालीमठ, गौताळा अभयारण्य आहे.


औरंगाबादपासून १०० किमीवर अजिंठा लेण्या. घोड्याच्या नाल आकारातील एकूण २९ लेण्या आहेत. दक्षिणेतील काशी म्हणून ओळखलं जाणारं पैठणही इथलंच. सातवाहन युगातली प्रतिष्ठान नगरीही जवळच आहे. नाथमंदिर, नाथजलाशय- जायकवाडी धरण, काश्मिरच्या शालीमार उद्यानावर आधारित संत ज्ञानेश्वर उद्यान, संत ज्ञानेश्वरांचं जन्मस्थान आपेगाव, पैठणी साड्यांचं माहेरघर ही आणखी काही प्रेक्षणीय स्थळं.

**सिद्धार्थ उद्यान** - शहराच्या मध्यवर्ती बस स्थानकाजवळ असलेले हे उद्यान म्हणजे सर्वांचं आकर्षणाचं ठिकाण आहे. इथे प्राणी संग्रहालय, मत्स्यालय, सर्पालय असून लहान मुलांना खेळण्यासाठी अनेक खेळही आहेत. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात प्राचीन चित्रं, भाजलेल्या मातीच्या मूर्ती, नाणी, शस्त्रं, भांडी, कागदपत्रं, धातूमूर्ती यांचा अमूल्य संग्रह आहे.



**पाणचक्की :** औरंगाबाद शहरात वसलेलं हे ठिकाण. ही कल्पना अहमदनगरच्या निजामशहराचा वजीर मलिक अंबरची. शहराच्या वायव्येस डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी चर खणून साठवले ते वक्रनलिका तंत्राच्या साहाय्याने पातळी वाढवीत खापरी नळांनी शहरात आणले. ते पाणचक्कीत उंचावरून खाली पडते. त्यामुळे एक पंखा फिरतो, त्यावर बसवलेलं जातं फिरतं आणि त्यावर धान्य दळलं जातं. या पाणचक्कीच्या परिसरात शाह मुसाफिर आणि बाबा शाह पलंगपोस यांच्या कबरी आहेत. नयनरम्य अशा परिसरात सुंदर हौद, कारंजी, अनेक फुलझाडांची, वृक्षवेलींची दाटी आहे. विशेष म्हणजे हौदाच्या खाली बांधकाम केलेली हॉलप्रमाणे जागा आहे. वरून पडणाऱ्या पाण्यामुळे तिथे नैसर्गिक वातानुकूलन, म्हणजे थंडावा तयार झाला आहे.

**बीबी का मकबरा :** ताजमहालाची प्रतिकृती औरंगजेब बादशहाची इराणी बेगम दिलरासबानू हिच्या स्मरणार्थ बांधलेला हा मकबरा, तिचा मुलगा आजमशहाने बांधला. मुख्य वास्तूत संगमरवरी धुमटाखाली तळघरात दिलरासबानू बेगम यांची कबर आहे. तिच्याभोवती नाजूक संगमरवरी जाळी आहे. या मकबऱ्याला दख्खनचा ताज म्हणतात. पूर्ण वास्तूची जागा प्रशस्त असून सर्वबाजूंनी तटबंदी आहे. आत अनेक मिनार आहेत. आतील सुंदर बागा, आतल्या वास्तुवरील नक्षीकाम, शांतता आणि भोवतालचा थंड वारा एक वेगळाच अनुभव देऊन जातो. या बांधकामासाठी त्या काळी आलेला खर्च होता, रुपये ६,६६२३४ आणे ६ फक्त!



# डेस्टिनेशन औरंगाबाद

दख्खनची खिडकी म्हणून ओळखलं जाणारं औरंगाबाद हे प्राचीन काळापासून महत्त्वाचं सांस्कृतिक केंद्र आणि मराठवाड्यातलं महत्त्वाचं शहर. अजिंठा आणि वेरुळ लेण्यांशिवायही इथे बघण्यासारखं बरंच आहे. औरंगाबाद शहर आणि परिसरातील ठिकाणांचा *संतोष भिडे* यांनी घेतलेला धांडोळा.

राष्ट्रकूट राजांच्या काळात औरंगाबादचं नाव होतं कटक. हे नगर भिल्लम यादव सार्वभौम राजे झाल्यानंतर यादवांच्या राजधानीचं ठिकाण बनलं. पुढे या कटकचं नाव झालं खडकी. जेव्हा शहजादा औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार म्हणून इथे आला तेव्हा त्याच्या नावावरून या नगरीचं नाव बदलेलं गेलं आणि झालं औरंगाबाद. औरंगजेब सुभेदार असताना आणि नंतर मराठ्यांशी लढताना त्याचे अनेक सरदार इथे वास्तव्यासाठी आले होते. त्यांनी अनेक पुरे वसवले. जयसिंगपुरा, जसवंतपुरा, पदमपुरा, औरंगपुरा हे त्यातील काही पुरे. इथला शिवपुरा हा युवराज संभाजीराजे यांनी वसवला होता.

## हे लक्षात ठेवा



या सर्व क्षेत्रांना मध्यवर्ती असलेलं ठिकाण म्हणजे औरंगाबाद. जिल्ह्याच्या सर्व प्रमुख ठिकाणी मुंबई-पुण्याहून थेट बस आणि रेल्वेसेवा आहे. राहण्यासाठी औरंगाबादेत आर्थिक क्षमतेप्रमाणे चांगली व्यवस्था आहे. अजिंठा व वेरुळ येथे स्वतंत्र निवास व्यवस्था उपलब्ध. वेरुळचे कैलास हॉटेल आणि अजिंठ्याच्या पायथ्याशी पर्यटन महामंडळाचे सर्व सोयींयुक्त विश्रामधाम आहे. माहूर, अंबाजोगाई, तुळजापूर, परळी या ठिकाणी धर्मशाळा व चांगली हॉटेलं आहेत. औरंगाबादहून या सर्व ठिकाणी पॅकेज टूर आहेत. साईबाबांचे शिर्डी, देवीचे काच मंदिर असलेले सोनई, शनिशिंगणापूर, दत्तधाम देवगड ही देवस्थानं जवळ असून अनेक पर्यटक औरंगाबादला राहूनच या क्षेत्रांना भेट देतात. ही चारही ठिकाणी अहमदनगर जिल्ह्यात असली तरी औरंगाबादला लागून आहेत. औरंगाबादला लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील लोणार पर्यटन क्षेत्र म्हणून झपाट्याने पुढे येतंय.



अनु.





# एका मातब्बर राजधानीत

आजसारखा वैराण असलेला मराठवाड्याचा मुलुख तेव्हा मात्र एक वेगळाच कैफ आणि वैभव बाळगून होता. प्राचीन काळी सातवाहनांची राजधानी याच प्रदेशातली. १३२७मध्ये मोहम्मद तुघलकाने दिल्लीहून भारताची राजधानी दौलताबादला हलवली एवढी या मुलखाची मातब्बरी. या परिसरातलं एक जबरदस्त शहर म्हणजे औरंगाबाद.

आज या शहराची ओळख महाराष्ट्रातलं एक मोठं शहर यापलीकडे नाही. परंतु सोळाव्या शतकात या शहराभोवती झगमगतं वलय होतं. मोगलांची दख्खनमधली ही राजधानी. त्यावेळी या शहरात दख्खनच्याच नव्हे तर देशातल्या अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घडामोडी दीर्घकाळ होत राहिल्या. तसं औरंगाबाद १६१०मध्ये मुर्तुझा निजामशाहचा पंतप्रधान मलिक अंबरने वसवल्याचं इतिहास सांगतो. त्यावेळी खिरकी या नावाने ते ओळखलं जायचं. खाम नदीच्या तीरावर या शहरावर मलिक अंबरच्या मुलाचा, फतेहखानचा अंमल होता. त्याने याचे नाव बदलून 'फतेहपूर' असं केलं. त्याने हे शहर उत्तमरित्या वसवायचा प्रयत्न केला. शहरात सगळ्या वेशींवर भव्य दरवाजे बांधले. शहरात पिण्याच्या पाण्यासाठी जमिनीखालून १४ भुयारी कालवे बांधले.

१६५३ मध्ये शहजादा औरंगजेब दख्खनचा सुभेदार म्हणून इथे आला. त्याने

इथेच आपली राजधानी वसवली आणि या शहराचं नामकरण 'औरंगाबाद' असं केलं. खरंतर औरंगजेबाने आपलं बस्तान औरंगाबादला बसवलं आणि दख्खनमध्ये एका नव्या मोगलाई पर्वाला सुरुवात झाली. बनारसचं काशीविश्वेश्वराचं पवित्र मंदिर उद्ध्वस्त केल्याने हिंदूंना हादरा बसला होता. मराठे औरंगजेबाविरुद्ध पेटून उठले होते. तेव्हापासून या भूमीत मराठे आणि मोगल यांच्यात कडव्या लढायांचे बुलंद सूर दीर्घकाळ उमटत राहिले.



औरंगाबाद मुख्यत: आपल्याला माहीत आहे ते 'बिबी का मकबरा'मुळे. याला दख्खनचा ताजमहाल म्हणतात. उर्दूमध्ये बिबीचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे पत्नी आणि दुसरा वंदनीय स्त्री. या स्मारकाची खासियत म्हणजे हे मुलाने आईच्या सन्मानासाठी ते बांधलं. औरंगजेबाची पत्नी राबीया-उल-दुराणी हिच्या सन्मानार्थ तिचा मुलगा आझमशाह याने हा मकबरा १६५१ मध्ये बांधायला घेतला. ही वास्तू बांधायला पाच वर्षं लागली. अता उल्ला आणि हंसपत राय या वास्तू-शिल्पशास्त्रज्ञांनी हा मकबरा उभारला. मकबऱ्याचं मुख्य शिखर संगमरवराचं असून त्याभोवती मोठे चार मिनार आहेत.

असं म्हणतात की त्यावेळी ज्ञात असलेल्या पृथ्वीच्या एक पंचमांश भागाचे मोगल सम्राट होते. असंही म्हणतात की एखाद्या उंटाच्या काफिल्यालाही हे साम्राज्य पार करण्यास दोन वर्षं लागली असती. वीस मैल लांब आणि सहा मैल रुंद, इतकं मोठं त्यांचं सैन्य. एवढं असूनही मोघल दख्खनचे स्वामी कधीही झाले नाहीत. मराठ्यांनी जबरदस्त टक्कर दिलेला औरंगजेब हा बाबरने स्थापन केलेल्या बलाढ्य राजघराण्याचा सहावा आणि शेवटचा मोठा मुघल. विशेष म्हणजे भोवताली अफाट ऐश्वर्य असूनही महाविद्वान शहेनशाह आयुष्यभर फकिरासारखाच राहिला. मराठ्यांना दख्खनमधून पूर्ण उद्ध्वस्त करण्याच्या ध्यासाने तो आयुष्यभर लढला. शेवटी या भूमीतच त्यान अखेरचा श्वास घेतला. पर्यटक त्याच्या मुलाने बांधलेल्या स्मारकाला हमखास भेट देतात. तिथून १६-१७ कि.मीवर असलेल्या देवगिरीलाही भेट देतात. पण तिथून दोन-चार कि.मी लांब असलेल्या खुल्ताबादला त्याच्या कबरीला भेट द्यायला मात्र जात नाहीत. शेवटी नियतीच्या योजना आपल्या आकलनापलिकडच्या असतात, हेच खरं.



अनु.

**पैठण :** पैठण ही सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान. ही संतांची भूमी. गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर नाथसागर धरण आणि जवळच असलेल वृंदावन गार्डनच्या धर्तीवर उभारलेलं नाथसागर धरण, ज्ञानेश्वर उद्यान बघण्यासारखं आहे. उद्यानातच श्री ज्ञानेश्वरांचं सुंदर मंदिर आहे. पैठण गावात श्री एकनाथांचं मंदिरही आहे. या परिसरात पैठणीनिर्मितीची केंद्रही चालवली जातात.






अनु.

सर्वसाधारणपणे लोक प्रेक्षणीय स्थळे पाहायला जातात तेव्हा ३-४ दिवस ते आठवड्याचा कालावधी मजेत घालविण्याच्या इराद्याने. एखाद्या शहरात (बेस) मुक्काम करून जवळपासची जास्तीत जास्त ठिकाणे या काळात बघून घ्यायची अशाप्रकारे कार्यक्रम आखला जातो. अजूनपर्यंत एकेका जिल्ह्यात किमान २-३ किंवा जास्तच मुक्कामाची  ठिकाणे (बेस) आणि तेथून जवळपास भेट देण्यायोग्य अशी काही स्थळे होती ज्यामुळे जिल्हावार स्थळांची माहिती दिलेली आहे. परंतु विदर्भ मराठवाड्यामाध्ये माहिती असलेली स्थळे खुपच कमी आहेत. काही जिल्ह्यात एकही ठिकाण नाही, काही जिल्ह्यांमध्ये एखादेच ठिकाण आहे. अशा वेळेला जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन फक्त एकच स्थळ पाहून यायचे हा वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होतो. त्यामुळे एकाच बेसवरून त्या जिल्ह्यातील आणि जवळच्या जिल्ह्यामधील एखादे ठिकाण अशी माहिती दिली आहे - उदा. लोणार सरोवर बुलढाणा जिल्ह्यातील एकच प्रेक्षणीय स्थळ आहे. त्यामुळे तेवढ्याकरीता बुलढाण्याला न जाता औरंगाबादवरून लोणार येथे जावे असे लिहीले आहे. अपवाद चंद्रपुर आणि गोंदिया जिल्ह्यांचा कारण तेथून अभयारण्याला भेट द्यायची आहे जेथे ३-४ दिवस घालविता येतील. जालना येथील दोन ठिकाणांची फक्त नांवेच मिळाली, परंतु त्याबद्दल कोणतीही लेखी माहिती नाही. ज्यांना उत्सुकता असेल त्याना अशी स्थळे आहेत हि माहिती असावी म्हणून त्या स्थळांचा उल्लेख केला आहे.

# जालना जिल्हा
# जालना

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते जालना | | | | | 428 | | | | |
| **1** | राजूर महागणपती | | | | मंदिर | 28 | N | | | |
| **2** | शिवमंदिर अन्वा | | | | मंदिर | 74 | N | 47 | N | |




जिजाऊचे जन्मस्थान सिंदखेड राजा इथलं महत्त्वाचं ठिकाण. गणेशभक्तांसाठी श्री क्षेत्र राजूर, भोकरदन तालुक्यातलं बाराव्या शतकातलं यादवकालीन शिवमंदिर आन्वा हेही पाहण्यासारखं आहे.

जालना येथील दोन ठिकाणांची फक्त नांवेच मिळाली, परंतु त्याबद्दल कोणतीही लेखी माहिती नाही. ज्यांना उत्सुकता असेल त्याना अशी स्थळे आहेत हि माहिती असावी म्हणून त्या स्थळांचा उल्लेख केला आहे.

# परभणी जिल्हा
# परभणी

अनु.

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते परभणी | | | | | 503 | | | | |
| **1** | औंढ्या नागनाथ | | | | मंदिर | 51 | NE | | | |
| **2** | पारदेश्वर | | | | मंदिर | 3 | NW | 52 | SW | |
| **3** | परळी वैजनाथ | | शिल्पे | | मंदिर | 67 | SW | 70 | SW | |









अनु.



जिल्हा हिंगोली. औंढा नागनाथ हे तालुक्याचं ठिकाण. बालाघाट पर्वतरांगांच्या कुशीत औंढा नागनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक देवस्थान आहे. डोंगरांच्या रांगा औंढ्यावरून २८ ते ४८ किमी लांबवर पसरलेल्या आहेत. त्यांची उंची आहे, ५४९ मीटर. हा संपूर्ण परिसर विलोभनीय निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. चार डोंगरांच्या मध्यभागी शिवमंदिर आहे.

महाराष्ट्रात इसवीसनाला सुरुवात झाल्यापासून ते चौदाव्या शतकापर्यंतच्या कालावधीत सातवाहन, वाकाहक, पूर्व चालुक्य, उत्तर चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहर आणि यादवांचं राज्य होतं. औंढा नागनाथचं मंदिर यादवांनी बांधल्याची नोंद आढळते. हेमाडपंथी, सुंदर, आकर्षक वास्तुशिल्प तेराव्या शतकात बांधल्याचा उल्लेख असला तरी त्याबाबत संशोधकांमध्ये एकवाक्यता नाही.

या पौराणिक स्थळाची एक दंतकथा, कथा सांगितली जाते. ती अशी. यज्ञात (दक्ष) सती पार्वतीने देहत्याग केला. हे शिवशंकरांना समजताच ते पत्नी विरहाने शोकाकूल झाले. ते द्वारकावनात आले. भिक्षेसाठी जवळच्या वस्तीत गेले, म्हणून तिथल्या ऋषींना राग आला. त्यांनी शिवास लिंगपतनाचा शाप दिला. शिवशंकरांचं एका तेजोमय लिंगात रूपांतर झालं. भगवान विष्णूंनी या लिंगास इच्छादित केल्यानंतर ते पूजनीय बनलं. कालांतराने द्वापारयुगात पांडव तीर्थयात्रा करत करत या ठिकाणी औंढा नागनाथला आले. धर्मराजाने हे मंदिर बांधण्याचा निश्चय केला. ही झाली कथा.

मंदिराचा परिसर ६६९ चौमी आहे. मंदिराभोवताली सहा मीटर उंचीची संरक्षक भिंत आहे.प्रवेशासाठी चार भव्य दरवाजे आहेत. या दरवाजातील सुंदर नक्षीकामाच्या कलाकृती दर्शकांना आकर्षित करून पाहण्यासाठी

खिळवून ठेवतात. प्रमुख प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना जय-विजय आहेत. काळ्या पाषाणातून शिलाकलेचा उत्कृष्ट नमुना सादर करत मंदिर आकर्षकरीत्या साकारलेलं आहे. मंदिराची उभारणी भव्य अशा ऐतिहासिक हेमाडपंथी द्वादशकोनी उतरत्या कंगोऱ्यांनी युक्त अशा चौथऱ्यावर केलेली आहे. मंदिराबाहेर आणि आतमध्ये असंख्य शिल्पमुद्रा असून स्वर्ग, मृत्यू, पाताळ यांबद्दल वर्णनकथा शिल्प लावलेली (बसवलेली) आहेत. ही शिल्पं रामायण—महाभारतातील आहेत.

मंदिराच्या पायाखालील भागात हत्ती, घोडे, [illegible] आहे. शिवपार्वती, गणेश या देवदेवतांच्या रेखीव मूर्ती काळ्या पाषाणात कोरलेल्या आढळतात. बुद्ध, यक्ष, यक्षिणींचं सौंदर्य डोळे भरून पाहण्यासारखं आहे. मंदिराला द्वादशकोनी रचनेचा हात गोलाकारात बसवलेला आढळतो. आतमधील वर्तुळाकार मंडप आणि त्यावरील घुमट अष्टकोनी आहे. तो अष्टकोनी खांबावर आधारित असून त्यावरील नक्षीकाम अप्रतिम आहे. ठिकठिकाणी गोपुरं, तोरणं, आधिप्रत्ययाधिदेवता नवग्रह, गणांचे स्वामी विष्णू, अग्नी, कश्यपादी ऋषी, इंद्र, ब्रह्म त्रिदेव आणि शिवाच्या विविध भावमुद्रा असलेली रेखीव शिल्पं भक्तांना खिळवून टाकतात. ज्योतिर्लिंगाची मूर्ती तळघरात असून शिवलिंगावर चार खांबावर उभारलेला मंडप आहे. खांबावर वरच्या बाजूला खाली डोकं वर शेपूट असलेली नाग शिल्पं आहेत. या उलट्या नागावरूनच औंधा त्याचं पुढे औंढा होऊन या परिसराला औंढा नाव पडलं असावं.

औंढा नागनाथ मंदिराच्या ४.५ किमी परिसरात श्री विश्वेश्वर, रविवर, वैद्यनाथ, रामेश्वर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, घृणेश्वर, सोमनाथ, ओंकारेश्वर, महाकाल, केदारनाथ लिंग छोट्या-मोठ्या देवळांत मोडतोड झालेल्या अवस्थेत विखुरलेली आढळतात. मंदिर परिसरात विविध देव-देवतांची १०८ लहान—मोठी मंदिरं आहेत. मुख्य मंदिराच्या बाहेरच या परिसरात [illegible] मंदिरातील शिवलिंग स्वयंभू आहे [illegible]

याच मंदिरासमोर पूर्वेला चिंतामणी खिडकी आहे. ती बारीक छिद्रांची दगडात कोरलेली असून पूर्वेला सूर्य क्षितिजावर येताच त्याची पहिली किरणं चिंतामणी खिडकीतून थेट निळकंठेश्वर लिंगावर पडतात.

औंढा गावात खळेश्वराचं मंदिर आहे. इथलं शिवलिंग मुख्य मंदिरातील नागनाथाच्या शिवलिंगाचा मामा समजलं जातं. त्यामुळे नागनाथाची पालखी मिरवणूक दरवर्षी दोन वेळा खळेश्वराच्या भेटीला काढली जाते. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. औंढा गावात पांडवांचं वास्तव्य होतं. ते स्थळ गावात असून पांडववाडा नावाने ओळखलं जातं. रामतीर्थ हे पर्यटनस्थळही औंढ्यापासून ३ किमी अंतरावर आहे. इथे प्रभू रामचंद्र राहता होते. रामसमुद्र नावाचं पाण्याचं तळं आहे. त्याच्या बाजूला एक खोल दरी असून तिला सीता नाहाणी म्हटलं जातं. इथे महिला भाविक आवर्जून स्नान करतात. औंढा परिसरात हरिहर, नागर, प्रयाग, मणक, खद्रगया, अमलक, सूर्य, वासुकी आदी लहान-मोठी दहा तीर्थ आहेत. त्यांची बरीच पडझड झाली असून सध्या ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

केंद्र आणि राज्य सरकारने औंढा नागनाथ तीर्थस्थळाला पर्यटनस्थळाचा दर्जा देऊन कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. पण त्याचं प्रतिबिंब फारसं दिसत नाही हे दुर्दैव!

## कसं जाल?

जवळचं रेल्वे स्टेशन: चौंडी: अंतर २१ किमी

अंतरे:

मुंबईहून: ५७९ किमी

नागपूर: ३५९ किमी

औरंगाबाद: २१० किमी

# औंढ्या नागनाथ

परभणी जिल्ह्यात औंढ्या गावी हे ज्योतिर्लिंग असून, ते नागेश ज्योतिर्लिंग म्हणूनही परिचित आहे. शिवपुराणातही त्याचा उल्लेख सापडतो. स्थानमहात्म्याच्या तीन ते चार कथा सांगितल्या जातात. नागनाथ मंदिराभोवती दगडी तटबंदी असून, चार प्रवेशद्वारे आहेत. मंदिर पांडवकालीन असल्याचे गावकरी सांगतात. भाविकांना निवासासाठी धर्मशाळाही आहे. मुख्य मंदिराच्या आसपासच १२ लिंगांची छोटी छोटी मंदिरे आहेत, पण काळाच्या तडाख्यात ती नष्ट होत आहेत. महाशिवरात्र, चैत्र वद्य एकादशी, श्रावण शुद्ध पंचमी, सोमवती अमावस्या, श्रावणी सोमवारी मोठी जत्रा भरते. परभणी हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने निवासाची सोय तेथे चांगली होऊ शकते. मुंबई-नांदेड मार्गावर वाटेत परभणी रेल्वे स्टेशन आहे. सडकमार्गे जाण्यासाठी मुंबई-नाशिक-औरंगाबाद-जालना-परभणी मार्गे जाता येते.

# परळी वैजनाथ

मराठवाड्यातल्या तीन प्रसिद्ध ज्योतिर्लिंगांपैकी परळी वैजनाथ हे एक. बीड जिल्ह्यातल्या अंबेजोगाईपासून केवळ १३ कि. मी. अंतरावर असलेले हे देवालय ऐन गावातच आहे. मंदिरात जाण्यासाठी दगडी पायऱ्या चढून जावे लागते. आता मंदिराभोवती गाव वाढलेले जाणवते. हेही मंदिर चिरेबंदी असून, त्याला तीन प्रवेशद्वारे आहेत. दीपमाळ, गवाक्ष, भक्कम तटबंदी, प्रशस्त प्रांगण, ओवऱ्यांमुळे मंदिराची भव्यता चटकन ध्यानात येते. गाभाऱ्यात अखंड नंदादीप तेवत असतो. या मंदिराचा उल्लेख पद्मपुराणातही आहे. श्रावणात तर महिनाभर उत्सव चाललेला असतो. तेव्हा सारे गाव सजून तयार झालेले असते. परळीला जाण्यासाठी बीड, औरंगाबाद, पुणे आणि नगर येथून एस. टी. च्या भरपूर गाड्या आहेत. रेल्वेने जायचे असल्यास जवळचे रेल्वेस्टेशन परभणी आहे व ते मुंबई-नांदेड मार्गावर आहे. अंबाजोगाईला हॉटेले आहेत, मात्र पुण्या-मुंबईहून आलेली भक्तमंडळी औरंगाबादला मुक्काम करतात.

# परभणीचा पारदेश्वर

मराठवाडा म्हणजे संतांची पवित्र भूमी. या परिसरात अनेक तीर्थस्थळं आहेत. त्यापैकी परभणी शहरात श्री मृत्युंजय पारदेश्वर महादेव मंदिर भाविकांचं श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्धीस येतंय. शहराच्या उत्तरेला असलेल्या या मंदिरात देशातील बहुधा सर्वांत मोठं साधारणतः २५१ किलो वजनाचं पारद शिवलिंग आहे. अशा प्रकारचं पाऱ्यापासून बनवलेलं दुसरं एकमेव शिवलिंग फक्त हरिद्वार इथेच आढळतं.

दर महिन्याच्या सोमवारी आणि विशेषतः श्रावण महिन्यात भक्तांच्या गर्दीने पारदेश्वर मंदिर फुलून जातं. दर्शनासाठी लांबच्या लांब रांग लागलेली असते. बारा ज्योतिर्लिंगांपैकी महाराष्ट्रात पाच ज्योतिर्लिंगं आहेत. त्यापैकी औंढ्याचा नागनाथ, परळीचा वैजनाथ, वेरुळचे घृष्णेश्वर ही तीन ज्योतिर्लिंगं मराठवाड्यात आहेत. बालाघाट डोंगररांगांच्या कुशीतल्या औंढा नागनाथ या तीर्थस्थानाप्रमाणेच परभणीतील पारदेश्वर मंदिरही भाविकांचं श्रद्धास्थान बनलंय.

पारदेश्वर मंदिरातल्या पाऱ्याच्या पिंडीची प्राणप्रतिष्ठा स्वामी सच्चिदानंद सरस्वती यांनी १९९३ मधे केली. त्यानंतर भव्य मंदिर उभारलं. भक्तिमार्गाद्वारे शिवआराधना करण्यासाठीच विशाल पाऱ्यापासून बनवलेल्या शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्याचं स्वामी सच्चिदानंद स्वामी यांनी सांगितलं.




पाऱ्याच्या शिवलिंगाबद्दल शिवपुराणाच्या रुद्र संहितेमधील बाराव्या अध्यायात वर्णन केलेलं आहे. भगवान विश्वकर्मा यांनी देवदेवतांना शिवआराधनेसाठी विविध लिंगांची स्थापना केली होती. त्यात बाणासूर हा एक शिवभक्त होता. त्याला शिवाच्या साधनेसाठी पाऱ्याचं शिवलिंग मिळालं होतं. या भक्तिमार्गाने बाणासुराने अल्पावधीतच शिवशंकराला प्रसन्न केलं आणि वरदान मिळवलं होतं, असं ३५ व्या अध्यायात म्हटलं आहे. प्राचीन काळापासून आयुर्वेदाप्रमाणेच विज्ञानातही पाऱ्याचा उपयोग केला जात आहे. पाऱ्याच्या लिंगापासून निघणाऱ्या किरणांमुळे व्याधी दूर होतात, असं मानलं जातं. पाऱ्यापासून निघाणाऱ्या किरणांचा प्रभाव दोनशे फुटांपर्यंत कायम राहतो, असं सांगतात. इथे महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश तसंच आंध्र प्रदेशातून भाविक येतात.

श्रावणात सोमवारी मंदिर परिसरात विशेष देखावा तयार करतात. महालक्ष्मी, अन्नपूर्णा, महाकाली, राधाकृष्ण, सरस्वती आदी देवतांच्या मूर्ती मंदिर परिसरात आहेत. गुरुपौर्णिमा, महाशिवरात्रीला मोठा उत्सव असतो. मंदिर ट्रस्टने धार्मिक पुस्तकं आणि साहित्याचं दालन सुरू केलं असून भक्तनिवास विकसित करण्यात येणार आहे. एकदा आवश्यक भेट द्यावी, असं हे धार्मिक स्थळ आहे.

# नांदेड जिल्हा
## नांदेड

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते नांदेड | | | | | 572 | | | | |
| 1 | माहूर गड | | | | मंदिर | 128 | NE | | | |
| 2 | गुरुद्वारा | शिख गुरुद्वारा | | | | 8 | SW | 135 | SW | |




शीखधर्मियांचं सुवर्ण मंदिरानंतर दुसऱ्या क्रमांकाचे पवित्र स्थळ इथे आहे. किनवट तालुक्यात देवीच्या साडेतीन पीठांपैकी माहूरगड आहे. दाट वनराईत माहूर गड आहे.

# माहूरची रेणुकादेवी

भारतात शक्तीदेवतांची ७१ जागृतस्थानं आढळतात. देवीची प्रमुख साडेतीन शक्तिपीठं तर सर्वज्ञातच आहेत, श्रीक्षेत्र माहूर हे देवीच्या प्रमुख साडेतीन शक्तिपीठांपैकी एक महत्त्वाचं शक्तिपीठ मानलं जातं.

धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेलं माहूर हे क्षेत्र श्रीरेणुका देवीचं वसतीस्थान म्हणून आणि घनदाट, गर्द जंगलातल्या डांबरी रस्त्यांच्या नागमोडी वळणावरून प्रवास करत आपण माहूरला पोहोचतो.

माहूरगडावर मंदिराच्या पायथ्यापर्यंत गाडीने जाता येतं. २५५ पायऱ्या चढून गेल्यावर समोर मंदिराचा कळस दिसतो आणि त्यापाठोपाठ वास्तुशास्त्रानुसार बांधलेलं कमळाच्या आकाराचे श्रीरेणुकादेवीचं मंदिर. मंदिराच्या आवारात वानरांच्या टोळ्या आणि हुप्पे आपलं लक्ष वेधून घेतात. मंदिराच्या प्रवेशद्वाराआधी रेणुकामाईसाठी आवर्जून नेण्यात येणारा विड्याचा नैवेद्य तयार करून दिला जातो. श्रीरेणुकामातेला तांबुलभक्षण अतिशय प्रिय आहे. इथे मोठ्याल्या दगडी रोवळ्यामंधून विड्यांची पानं तसंच तांबूल बनवण्यासाठीचं साहित्य कुटलं जातं. विशिष्ट गंध आणि चव असलेला हा तांबूल पुढे आपल्याला देवीच्या प्रसादरूपाने परत केला जातो.

श्रीरेणुकादेवीच्या मंदिराचा सभामंडप आकाराने फारसा मोठा नसला तरी गाभाऱ्यात प्रवेश करताच समोर श्रीरेणुकादेवीचं सिंदुरचर्चित मुखकमल पाहून मन प्रसन्न होतं. इथे आपल्याला देवीचा भव्य तांदळा अर्थात देवीचा फक्त चेहरा पाहता येतो. या तांदळ्यावर चांदीचा मुकुट चढवलेला आहे. श्रीरेणुका देवीची मुद्रा करारी असून नजर अतिशय भेदक आणि उग्र आहे. विविध उत्सवादरम्यान, विविध प्रसंगात श्रीरेणुकादेवीच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत असल्याचा भास होतो.



अनु.

सभामंडपात देवीच्या डाव्या बाजूला परशुरामाचा पाळणा असून त्यात परशुरामाची मूर्ती आहे. सभामंडपाच्या पूर्व दिशेला एक छोटासा खिडकीवजा झरोका आहे. वास्तुशास्त्राचा अनोखा चमत्कार इथे पाहायला मिळतो, तो म्हणजे पूर्व-पश्चिम रेषेवर वर्षातून एकदा सूर्य कक्षेत येतो तेव्हा त्याची कोवळी किरणं माता रेणुकेच्या मुखकमलावर पडतात. सभामंडपाबाहेर दक्षिणेला पिंपळाचा प्राचीन वृक्ष असून तिथे एक शिवलिंग आहे. हे जमदग्नीचं स्थान म्हणून परिचित आहे. माहूरगडावर येताना रेणुकेच्या दर्शनाआधी या शिवलिंगाचं दर्शन घेण्याचा प्रघात आहे. त्यानंतर सभामंडपात प्रवेश करून पाळण्यातल्या परशुरामाचं दर्शन घ्यावं आणि मगच रेणुकेचं दर्शन करावं असाही प्रघात आहे.

गडाच्या दक्षिणेला पायथ्याशी भगवान परशुरामाचं स्वतंत्र मंदिर आहे. माहूरगडावरून शंभर पायऱ्या खाली उतरून या मंदिरात जावं लागतं. डोंगर व जंगलाने वेढलेल्या या परिसरात मातृतीर्थ, मेवाळे, इंजाळे, गरुडगंगा आणि सर्वतीर्थ असे पाच तलाव आहेत. विप्र रामदास याने रचलेल्या 'आश्विनशुद्ध पक्षी अंबा बैसलि सिंहासनी हो...' या लोकप्रिय आरतीमध्ये, श्रीरेणुका मातेचा गौरव केला आहे. तिच्याविषयीचं वर्णन करताना रामदास म्हणतात,

द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनी हो।
सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो॥
कस्तुरी मळवट भांगी शेंदूर भरुनी हो।
उदोकारे गर्जती सकळ चामुंडा मिळुनी हो॥ उदो.॥

नवरात्रोत्सवामध्ये द्वितीयेच्या दिवशी

रेणुकासमवेत चौसष्ट योगिनींची आदरभावाने पूजा केली जात आहे. तिच्या भांगामध्ये शेंदूर तसंच ललाटी मळवट रेखून तिला सजवलं जात आहे. सर्वजण या चामुंडामातेचा जयजयकार करत आहेत.

देवीतत्त्वाचं मूळ आदिरूप म्हणून ओळखली जाणारी रेणुका ही सर्वार्थाने आदिमाता, जगदंबा आहे तसंच भूमातेचं मूळतत्त्व आहे. रेणुका म्हणजे पृथ्वी. परशुरामाची जननी तसंच जमदग्नी पत्नी म्हणून पुराणात ज्ञात असलेली ही रेणुका माहूरगडावर स्थापित झाली आहे. श्रीसूक्तामध्ये जिचा महिमा गायला गेला आहे अशी ही रेणुका 'जगदंबा' स्वरूपातही आपलं मूळ रूप टिकवून आहे. रेणुकामातेला मातंगी, यल्लमा, यमाई अशा विविध रूपात पुजलं जातं.

माता रेणुकेबाबत स्कंदपुराणात असलेल्या एका आख्यायिकेनुसार देव-दानवांच्या युद्धात दैत्यांनी कपटाने देवांना जिंकलं आणि इंद्रादी देवांना हाकलून लावलं. त्यानंतरही दैत्यांकडून देवजनांचा छळ सुरूच होता. त्यामुळे सर्व देव विष्णूला शरण गेले व राक्षसांपासून मुक्तीचं साकडं घातलं. विष्णूने त्यांना अदितीची प्रार्थना करण्यास सांगितलं तसंच अदितीमाता आपणांस रेणुकेच्या रूपात तिच्या उदरी धारण करेल, तिच्या पोटी जन्माला आल्यानंतर माझ्या हातून दैत्यांचा नाश होईल, असं सांगितलं तेव्हा सर्व देव-देवता अदितीकडे गेले व त्यांनी तिच्या कानी हे वृत्त घातलं. पुढे अदितीने कैलास पर्वतावर तपश्चर्या करून भगवान शंकरांना प्रसन्न केलं. देव, गंधर्व, किन्नर, सिद्ध, विद्याधर, सर्प, रुद्र आणि ऋषींचं तेजही अदितीमध्ये सामावलं होतं. अखेर यथावकाश अदितीच्या पोटी माता रेणुका जन्मास आली. तिने दुष्ट असुरांचा संहार करून देवांना भयमुक्त केलं.

श्रीक्षेत्र माहूर गडावर रेणुकादेवीच्या दर्शनासाठी वर्षभर गर्दी उसळलेली असते. नवरात्रादरम्यान गडावर आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापना करून उत्सवाला सुरुवात होते. प्रतिपदा ते नवमीपर्यंत रोज तेल व तुपाचा अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो. या काळात रेणुका देवीला रोज दहीभात, पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. नवरात्रातल्या पंचमीच्या दिवशी देवीचं मुखकमल अतिशय प्रसन्न दिसतं. या दिवशी देवीची सर्व अलंकारानिशी साग्रसंगीत पूजा केली जाते आणि सूर्यास्तापूर्वी देवीचे अलंकार उतरवून महाआरती केली जाते.

सप्तमीच्या दिवशी जवळच असलेल्या महाकाली गडावर जाऊन महाकालीची विधिवत पूजा करून देवीला महावस्त्र अर्पण केलं जातं. अष्टमीच्या पहाटे देवीची पूजा झाल्यानंतर यज्ञाला सुरुवात होते. नवरात्रोत्सवात सप्तशतीचा पाठ सुरू असतो. यज्ञ सुरू असताना सप्तशतीच्या आठव्या अध्यायाला यज्ञ थांबवून देवीची पंचामृतादीने स्नान घालून पूजा केली जाते. देवीला नूतन वस्त्रं परिधान केली जातात. नैवेद्य दाखवला जातो.

नवव्या अध्यायापासून यज्ञाला पुन्हा प्रारंभ होतो. अध्याय पूर्ण झाल्यानंतर अष्टमीच्या यज्ञाची सांगता होते. विजयादशमीला देवीचं मुख्य निशाण उतरवून इथल्या पवित्र खांबाला स्नान घातलं जातं. नंतर निशाणावर नवीन वस्त्रालंकार चढवले जातात. निशाणाचं हे कापड ५१ मीटर लांब असतं. त्यानंतर

देवीला स्नान घालून शृंगारपूजा केली जाते. महावस्त्र अर्पण करुन नैवेद्य दाखवला जातो. महाआरतीनंतर गडावरच्या सर्व देवी-देवतांजवळ निशाण चढवलं जातं. त्यानंतर रेणुकामातेचा पुत्र परशुरामाची पालखी मिरवणूक निघते. सीमोल्लंघनासाठी ही मिरवणूक वरदायिनीच्या डोंगरावर जाते. तिथे सीमोल्लंघन करून पुन्हा मिरवणुकीने पालखी परशुरामाच्या मंदिरात येते. रेणुका देवीच्या द्वारासमोर पालखी आल्यानंतर देवीला आपट्याची पानं अर्थात सोनं अर्पण केलं जातं. पुरणाचा महानैवेद्य दाखवला जातो व महाआरतीने या उत्सवाची सांगता होते. महाआरतीनंतर देवीला तांबूल भरवला जातो.





अनु.


सर्व महत्त्वाच्या शहरांतून माहूर इथे जाण्यासाठी रस्ते हा एकमेव पर्याय आहे. नांदेड-अदिलाबाद रेल्वेमार्गावरच्या किनवट स्थानकापासून श्रीक्षेत्र माहूर ५० कि.मी. अंतरावर आहे. अन्य शहरांपासून सांगायचं तर, नांदेडपासून १३० कि.मी., यवतमाळपासून ७६ कि.मी., अदिलाबादपासून ९० कि.मी., अमरावतीपासून १८० कि.मी., शेगावपासून २५० कि.मी., तर नागपूरपासून २२५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या श्रीक्षेत्र माहूर या तीर्थक्षेत्राला भेट देता येते. नवरात्रोत्सवात एस.टी. महामंडळाच्या वतीने जादा बसगाड्या सोडण्यात येतात. यादरम्यान खासगी वाहनांना गडावर प्रवेश नसतो. माहूर बसस्थानकावरून बसनेच गडावर जाता येतं. माहूर इथे भाविकभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी १७५ खोल्यांचे तीन खासगी भक्तनिवास आहेत. तसंच येथे शासकीय, वनखात्याचं आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचंही भव्य विश्रामगृह आहे.



अनु.


# अमरावती जिल्हा
## अमरावती

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते अमरावती | | | | | 670 | | | | |
| **1** | चिखलदरा | हिलस्टेशन | गार्डन | निसर्ग | मंदिर | 46 | NE | | | |
| **2** | सेमाडोह | खेडे | | निसर्ग | | 2 | N | 47 | SW | |
| **3** | मेळघाट | अभयारण्य | नदी | ट्रेक | | 58 | SW | 57 | SW | |






अनु.




# हिरवंगार चिखलदरा!

विदर्भ तसा अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. पण त्याला प्रसिद्धीच्या कळसावर नेऊन ठेवण्याचं काम जर कुणी केलं असेल, तर तो म्हणजे इथला उन्हाळा. विदर्भावर सूर्य उगवतो तोच मुळी आग ओकत. अशा या उष्णतेत डोळ्यांना सुखावणारी हिरवळ आपल्यात जपून ठेवणारी काही मोजकी थंड हवेची ठिकाणं या भागात आहेत. अमरावती जिल्ह्यातलं चिखलदरा हे त्यातलंच एक ! सृष्टीकर्त्याच्या हातून हिरव्या रंगाचा डबा निसटून तो इथं वर्षानुवर्ष तसाच उपडा पडून आपल्यातला अक्षय रंग इथल्या वनस्पतींना बहाल करतो, की काय असं वाटावं इतकी हिरवळ या भागात आहे. कदाचित म्हणूनच चिखलदऱ्याचा शोध लावणाऱ्या इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबिन्सनला सुमारे सन १८२३ मध्ये इथं आल्यावर इंग्लंडमध्ये विस्तीर्ण पसरलेली हिरवीगार कुरणं आठवली. आपल्या मायदेशात

असल्याचा आनंद घेण्यासाठी त्यानं काही काळ इथं वास्तव्य केलं.

तसं पाहता चिखलदरा हे ठिकाण पौराणिक काळापासून आपलं महत्त्व जपून आहे. श्रीकृष्णानं आपली लाडकी पत्नी रुक्मिणीचं हरण केलं ते याच भागातून. तसंच भीमानं कीचकाचा वधही याच भागात केला आणि त्याचा मृतदेह इथल्या दरीत फेकून दिला. म्हणून याच नाव झालं 'किचकदरा' आणि पुढं त्याचा अपभ्रंश होऊन हे झालं 'चिखलदरा'. समुद्रसपाटीपासून सुमारे १०८८ मीटर उंचीवर हे ठिकाण वसलेलं आहे. प्रत्येक पर्यटन स्थळाची आपली काही वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणं असतात, तद्वतच चिखलदऱ्यालासुद्धा काही अशा जागा आहेत, ज्या पहायलाच हव्यात. उन्हाळ्यातल्या हिरवळीचं अधिक समृद्ध रूपडं पावसाळ्यात इथं पाहता येतं.

## भीमकुंड

परतवाड्याहून मोथामार्गे चिखलदऱ्याला येताना अल्लाडोह गावाच्या दक्षिणेला हे कुंड पाहता येतं. साधारणतः ३५० फुट खोल असलेल्या या कुंडाभोवतीचे अनेक धबधबे आपलं मन मोहून घेतात. अशी आख्यायिका आहे, की कुंतीपुत्र भीमानं कीचकाचा वध करून त्याचं धड जवळच्या दरीत फेकून दिलं आणि त्यानंतर या कुंडात स्नान करून स्वतःला शुचिर्भूत केलं, म्हणून याचं नाव भीमकुंड.



अनु.

## वैराट देवी मंदिर

चिखलदऱ्याहून साधारण १० किमी अंतरावर वैराट नावचं एक छोटं खेडं आहे. या खेड्याच्या पश्चिमेला वैराट टेकड्यांच्या सान्निध्यात हे देवीचं पुरातन मंदिर पाहायला मिळतं. १०० ते १५० फूट खडतर अंतर दोराच्या सहाय्यानं पार करून या मंदिरापर्यंत जाता येतं. हे धाडस करणं प्रत्येकाला शक्य नसल्यामुळे मुख्य रस्त्यालगत एक मंदिर बांधण्यात आलं आहे.

## पंचबोल

पाच खोल दऱ्यांच्या संगमातून एका विशाल दरीच इथं निर्माण झाली आहे. चिखलदरा ते पंचबोल या रस्त्याचं वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात कुठंही न आढळणारी कॉफीची लागवड इथं आपल्याला बघायला मिळते. पंचबोल या नावाप्रमाणे आपल्या आवाजाचे पाच प्रतिध्वनी आपण इथं ऐकू शकतो असं म्हणतात. खर सांगायचं, तर मी स्वतः चार आवाज अगदी स्पष्ट ऐकले आहेत. पाचवा अगदीच अस्पष्ट किंवा नाहीच. कोणाला पाच आवाजही ऐकू येऊ शकतील. याच वाटेवर बीर तलाव पाहता येतो. ब्रिटीश काळात बांधलेला हा तलाव काही वर्षांपूर्वीपर्यंत संपूर्ण चिखलदरा परिसराला पाणी पुरवीत असे. सद्यस्थितीत हे काम शक्कर तलाव नावाचा एक रमणीय तलाव करतो.

## गव्हर्न्मेंट उद्यान

चिखलदऱ्यातील थोड्या वरच्या बाजूस असलेल्या पठारावर हे उद्यान आहे. फुलं आणि झाडांच्या विविध प्रजाती इथं पाहायला मिळतात. या उद्यानाचा एक भाग केवळ गुलाबाच्या झाडांनी व्यापलेला असून, तो भाग या फुलांसाठीच राखीव ठेवला आहे. अमरावतीमधल्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या संस्थेच्या प्रेरणेतून आणि मदतीनं इथं जलतरण तलावाची सुविधादेखील उपलब्ध आहे. याशिवाय छोटी झुकझुक गाडीसुद्धा आपलं स्वतंत्र अस्तित्व राखून आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत या उद्यानाला भेट देता येते. शिवाय, सनसेट पॉइंट, देवी पॉइंट, हरिकेन पॉइंट, महादेव मंदिर ही काही ठिकाणं आवर्जून पहावीत अशी आहेत. तसंच, चिखलदऱ्यात आढळणारी वनस्पती वा इथं असणाऱ्या प्राण्यांची माहिती द्यायला दोन संग्रहालयं सदैव तत्पर असतात. सांबर, अस्वल, रानकुत्री असो किंवा वेगवेगळ्या प्रजातीतील वनस्पती वा फुलं, लांब पसरलेली गवताळ कुरणं असोत किंवा साधे सरळ भाबडे आदिवासी कोरकू या सगळ्यांच्या सान्निध्यात काही काळ राहायला चिखलदऱ्यासारखं दुसरं ठिकाण नाही.

**कसं जाल ?**

हवाई मार्गानं जायचं असल्यास नागपूर हे जवळचं ठिकाण. अंतर सुमारे २३० किमी. रेल्वे मार्गानं पुणे-नागपूर मार्गावरच्या बडनेरा इथं उतरून बस अथवा कारनं जाणं सोयीस्कर. अंतर सुमारे १०० किमी. याशिवाय नागपूर आणि अमरावती येथून राज्य परिवहन मंडळाच्या बसेस तसंच खासगी वाहनं उपलब्ध आहेत.

सिनेमातली-सीरिअलमधली आउटडोअर लोकेशन्स बघितली की वाटतं, हे सेलिब्रेटी लोक कामानिमित्ताने किती ठिकाणी जातात. हे ठिकाण शहराजवळ असेल, तो लगेच टुरिस्ट स्पॉट होतो. नाहीतर, भलेभले रसिक अशी ठिकाणं शोधून दमतात. म्हणून 'रिचार्ज टीम' घेऊन आलीय हा नवा कॉलम 'टुरटूर'! आपले आवडते सेलिब्रेटी अशा टूरवरची धमाल, तिथल्या खास आठवणी, आवडती लोकेशन्स आपल्याशी शेअर करणार आहेत.

अभिनेत्री ऊर्मिला कानेटकर सिनेमाच्या शुटिंगनिमित्त १८ दिवस मेळघाटासारख्या दुर्गम भागात राहिली होती. तिने सांगितलेल्या तिथल्या काही आठवणी.



# ते १८ दिवस

शूटिंगसाठी आमचं अनेक शहरांमध्ये, देशांत जाणं होत असतं.. तिथे कामासोबत आम्ही मनसोक्त मजाच करत असतो. पण, खरं सांगू का, सेमाडोह या गावचा अनुभव एक्सायटिंग होता. हे मेळघाटातलं गाव आहे. म्हणजे अकोल्यानंतर येणाऱ्या स्टेशनवर उतरायचं.. तिथून गाडी करून चारेक तास प्रवास केला की हे गाव येतं. साधारण चिखलदऱ्याजवळ हे गाव आहे. हा सगळा भाग वाघांसाठीचा आरक्षित केला गेला. याच भागात हे गाव येतं. इथे मी आयुष्यात कधी येईन असं मला अजिबातच वाटलं नव्हतं. पण, 'मला आई व्हायचंय' या सिनेमाच्या शूटमुळे मी इथे पोहोचले.

खरं सांगते, या गावात वीज नाही. इथे मोबाइल्सना रेंज येत नाही.. इथे फक्त तुम्ही.. भवतालचा हिरवागार निसर्ग आणि शांतता असते. जस्ट इमॅजिन या गावात मी १८ दिवस राहिले. त्या गावात पोहोचल्यावर हे आदिवासी गाव विजेशिवाय राहतं याचं मला खूप अप्रूप वाटायचं, आजही वाटतं. पण, इथे धमाल येते. घोर जंगलात हे गाव असल्यामुळे खाऊच्या वासामुळे इथे अस्वलं वगैरे आलेली माझ्या सहकाऱ्यांनी पाहिलीत. वाइल्ड लाइफ सफारी करायची असेल, तर सेमाडोह गावात जा, असं मी सुचवेन.

मला तर वाटतं फुलपाखरांचा, छोट्या छोट्या किटकांचा अभ्यास करणारे अनेक लोक या गावात येत असावेत. शेकडो प्रकारचे वेगवेगळे किटक, झाडं, फुलं, फुलपाखरं मी इथे पाहिली. स्वच्छ, निर्मळ निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी सेमाडोह गावाला नक्की भेट द्यावी, असं मला वाटतं.

आपण इतके टेक्नोसॅवी झालोय, की मोबाइल, विजेशिवाय आपलं जीणं कठीण होऊन जातं. पण हे गाव आजही या सगळ्यापासून खूप दूर आहे. इतक्या असुविधा असूनही इथे आल्याचा पश्चात्ताप होत नाही. म्हणजे, जगाशी आपला संपर्क पूर्णतः तुटलाय याचा अनुभव मी घेतला. या दिवसांमध्ये निसर्ग पाहिला. पावसाळ्यातला निसर्ग पाहिला. खूप फ्रेश वाटलं मला इथे.

माझ्यासाठी ते दिवस खूप एक्सायटिंग आणि ॲडव्हेन्चरस होते. निसर्गाच्या सानिध्यात घालवलेले ते १८ दिवस.. मी कधीच विसरणार नाही.

# मेळघाटचं पदभ्रमण

सफरनामा
मेळघाट



मेळघाट म्हणजे घाटांचा मेळ घडवणारी जागा. डोंगर-दऱ्या, घनदाट वनराई यांच्या बहराचं हे ठिकाण. मेळघाट व्याघ्रप्रकल्पाने वाघांना सुरक्षित भूमी मिळवून दिली. कोरकू भाषा बोलणाऱ्या इथल्या आदिवासींचा हा नितांत रम्य परिसर सफरीसाठी प्रसिद्ध आहे. नदी पार करून थेट जंगलात प्रवेश मिळवता येतो. इथल्या जंगलात भटकणं केवळ अविस्मरणीय. सिपना नदीचा काठ, सेमाडोह, मसेंडी तलाव, चिखलदरा असा मेळघाटच्या पदभ्रमणाचा आनंद पुन्हा पुन्हा अनुभवण्यासारखा आहे.




सातपुडा पर्वतराजींची साद आली, की तिला नकार द्यावासा वाटत नाही. तिथल्या निसर्गसंपन्न मेळघाट भ्रमंतीने तर डोळ्याचं पारणं फिटतं. याची सुरुवातही मोठी उत्कंठावर्धक असते. सिपना नदीच्या काठावर असलेल्या सेमाडोह या निसर्गरम्य ठिकाणी बेसकॅम्प असतो. सुरुवातीला प्रस्तरारोहण आणि रिव्हर क्रॉसिंगसारखं प्रात्यक्षिक झाल्यानंतर पदभ्रमणाला आगेकूच करता येते. सिपना नदीचा काठ गुळगुळीत असल्याने फार जपून चालावं लागतं. नदी काळजीपूर्वक पार करावी लागते. त्यानंतर आपण पोहोचतो थेट हिरव्यागार जंगलात. रस्त्यात 'चौरासी पाटा' नावाचा कातळ लागतो. चौरसी पाटा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कातळाभोवती काही कथा आहेत. या भ्रमंतीदरम्यान तुम्हाला पावसाळी हवा लागल्यास, फारच चांगलं. इथला मसोंडी तलाव पाहून पेरियारची आठवण होते. तुरीच्या शेतातून चालणं तर निव्वळ अविस्मरणीय. मुक्काम करण्यासाठी सलोनी नावाचं टुमदार गाव आहे. गाव आणि घरांची स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे.

रायमुनियाच्या घनदाट जंगलातून जाणारा रस्ता चिखलदरा इथे घेऊन जातो. रायमुनिया म्हणजे, घाणेरी किंवा हळदीकुंकू म्हणून ओळखली जाणारी झुडपं. शोभेसाठी त्यांची लागवड केली जाते. आमझरी गावतून आपण चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी येतो. भीमकुंड, देवी पॉइण्ट, गाविलगड किल्ला या ठिकाणी धावती फेरी मारता येते. चिखलदरा इथे प्राचीन लाकडांचे नमुने दाखवणारं म्युझिअम आहे. पुढचं पदभ्रमण जंगलातून असल्याने गाइड सोबत घेऊनच पुढे जावं. गुग्गामलच्या जंगलातला प्रवास फारच मजेशीर असतो. इथे असणाऱ्या टेटूपट्टाड्या नावाच्या शेंगा आदिवासींच्या घराला लावलेल्या दिसतात.

यानंतर बोरखेडी बलडा या कॅम्पवर जाता येतं. बलडा म्हणजे टेकडी. ही मेळघाटातील सर्वात उंच आणि जंगलाने वेढलेली जागा आहे. भल्या पहाटे 'कुंड'च्या दिशेने प्रयाण करण्यासाठी तिखाडीच्या सुगंधी गवतातून भ्रमंती करता येते. नशिब चांगलं असेल, तर जंगलातून भटकणारा बायसन दिसेल. कुंड गावी पाण्याचं एकही कुंड नाही. मेळघाट व्याघ्रप्रकल्पात समाविष्ट केल्याने इथे वस्ती आढळत नाही. कुंडपासून कोलकाजकडे जाताना घनदाट जंगल कमी होत जातं. त्याच मार्गाने आपण परत येतो. मेळघाटच्या पदभ्रमणाचा आनंद पुन्हा पुन्हा अनुभवण्यासारखा आहे.

# नागपूर जिल्हा
## नागपूर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते नागपूर | | | | | 841 | | | | |
| **1** | रामटेक | | किल्ला | | मंदिर | 49 | NE | | | |
| **2** | पेंच नॅशनल पार्क कुर्सापार | अभयारण्य | | | मंदिर | 81 | NE | 40 | N | |





**खवय्यांना नावीन्यपूर्ण रेसीपींची ओळख करून देणाऱ्या विष्णू मनोहर यांना भटकंतीमध्येसुद्धा नावीन्य शोधण्याचा छंद आहे.नागपूरातील रामटेक या ठिकाणाची भेट त्यांना आपल्या हेक्टिक शेड्युल्डमध्ये नेहमीच दिलासा देणारी वाटते.**

# हौशी मुसाफिरी

मागच्या वर्षी वळवाच्या सरी कोसळल्यानंतर लगेचच नागपूरजवळच्या रामटेकला जाण्याचा योग जुळून आला. काळ्याभोर ढगांच्या आडून टप्प्याटप्प्याने पाऊस आपल्याकडे आगेकूच करत आहे आणि काही क्षणातच तो आपल्यावर बरसणार आहे, हा इथला प्रसंग मनाला सुखावणारा होता. ढगांच्या आडून पावसाच्या सरी आणि सूर्यकिरणांचा लपाछपीचा खेळ विदर्भात अनुभवायला मिळतोय, हे तर आणखीनच नवल. इथे बसून कालिदासाने आपल्या प्रेयसीला ढगांकरवी प्रेमसंदेश पाठवला आणि त्याच्या काव्य कल्पनाशक्तीतून 'मेघदूत' या महाकाव्याची रचना झाली ही आख्यायिका अगदी खरी असल्याची जाणीव होते...

माझ्या हेक्टिक शेड्यूलडचा तणाव दूर करण्यासाठी इथलं अप्रतिम निसर्गसौंदर्य, प्राचीन स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना असलेल्या रामाच्या मंदिराचं दर्शन, इंदिरा गांधी राष्ट्रीय अभयारण्य आणि कुर्सापार जंगलातील सफर अत्यंत मोलाची ठरली. वनवासाला जाताना काही क्षणासाठी राम इथे टेकला होता म्हणून या ठिकाणाला 'रामटेक' नाव पडलं. खुद्द रामटेकमधला एक ते दीड तासाचा किल्ला चढल्यानंतर रामाच्या मंदीराचं दर्शन होतं. गर्द वनराईच्या सानिध्यात हा किल्ला चढताना एक ते दीड तासाचं अंतर आपण कधी कापलं याचं भानच राहत नाही. या मंदिराच्या परिसरामध्ये भरपूर माकडं आहेत आणि इथलं आश्चर्य म्हणजे आरती सुरू झाल्यानंतर ही माकडं बेभान होऊन सैरावैरा धावायला लागतात, हे पाहिल्यानंतर आपल्याला अक्षरश: घाबरायला होतं... उंचावर असणाऱ्या या मंदिरामध्ये त्रिपूरी पौर्णिमेला कापूर जाळण्याची प्रथा आहे. हे दृश्य आख्ख्या नागपूरातून दिसतं, असं म्हणतात.

जंगलातील सफर तर अविस्मरणीय अनुभवच आहे. प्रत्यक्षात वाघ पाहण्यात किती आनंद आहे, हे इथं आल्यानंतरच कळतं. आमच्या ग्रुपमध्ये



अनु.

एकाचवेळी चार पाच वाघ पाहण्याची सुवर्णसंधी केवळ आमच्या जीपलाच मिळाल्याने हा आनंद माझ्यासाठी द्विगुणीत झाला होता. आमच्याबरोबर असलेल्या गाईडला हत्तीच्या साहाय्याने वाघ आसपास असल्याचा सिग्नल मिळाला. वाघ पाहण्यासाठी आम्ही एका झाडाजवळ दबा धरून बसलो होतो. एवढ्यात झाडीतून एक वाघ आमच्या जीपसमोरून क्रॉस झाला आणि काही क्षणातच पाच फूटावरून लागोपाठ तीन वाघ आमच्यासमोरून दिमाखदार ऐटीत झाडीत शिरले... कोणतीही हालचाल न करता आणि श्वास रोखून बसलेल्या आमचा आनंद त्यावेळी गगनात मावेनासा झाला होता...


इथे जवळजवळ सहा ठिकाणी उत्खनन चालू आहे. आत्तापर्यंत झालेल्या उत्खननामध्ये प्राचीन संस्कृतीचा राजवाडा, जुनी भांडी, हत्यारे आदी हाती लागलं आहे. ज्याकाळी स्थापत्यशास्त्राची प्रगती झाली नव्हती त्याकाळातील बांधकाम आणि कलेमध्ये एवढी सुसूत्रता आणि बारकावे असू शकतात, याचं आश्चर्य वाटतं.


इथल्या खाद्यसंस्कृतीबाबत बोलायचं झालं तर कपूरी पानांच्या वड्याची चव अजूनही जीभेवर आहे. तसेच राममंदिरातला वड्याचा भात आणि पुरणाचा नैवेद्यसुद्धा फार चविष्ट आहे... पुन्हा जर इथे कधी भेट दिली तर या अनोख्या पदार्थांची चव घेतल्याशिवाय परतणार नाही, असा निश्चयच मी केला आहे...



# चंद्रपूर जिल्हा
# चंद्रपूर

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते चंद्रपूर | | | | | 860 | | | | |
| **1** | ताडोबा | अभयारण्य | | | | 35 | NE | | | |





रिचार्ज ■ शुक्रवार

**कसं जाल ?**

ताडोबाला जाण्यासाठी सर्वात जवळचं रेल्वेस्टेशन आहे चंद्रपूर. चंद्रपूरपासून तासाभरात इथे पोहोचता येतं. तर नागपूरपासून हेच अंतर साडेतीन तास आहे. सर्वात जवळचा विमानतळ आहे नागपूर.

महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातलं ताडोबाचं जंगल इथल्या व्याघ्रप्रकल्पासाठी प्रसिद्ध आहे. १९५५ साली जाहीर झालेलं सर्वात जुनं असं हे 'नॅशनल पार्क'. ताडोबा नॅशनल पार्क ११६ चौरस किलोमीटर्स आणि अभयारण्य ५०९ चौरस किलोमीटर्स अशा एकूण सुमारे सव्वासहाशे चौरसकिलोमीटर्समध्ये हे जंगल पसरलेलं आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प हा देशातला एक महत्त्वाचा व्याघ्रप्रकल्प आहे. वाघाबरोबरच बिबट्या, चितळं, सांभर, हरणं, चौशिंगा, नीलगाय, अस्वल, रानमांजर, साळींदर, रानकुत्रे असे प्राणीही इथे पहायला मिळतात. त्याचबरोबर अनेक प्रकारचे गरुड इथे दिसू शकतात. रुबाबदार जनावर, वाघ पाहण्यासाठी खास इथे पर्यटकांची इथे गर्दी होत असते. सध्या इथे वाघाचे बछडेही खूप पहायला मिळतायंत. ताडोबात जाताना लागणाऱ्या गेट्सपैकी मोहार्ली गेटच्या जवळ एमटीडीसीचं सुंदर रिसॉर्ट आहे. इथे पर्यटकांसाठी एकूण १५ रुम्स आहेत. त्यापैकी १२ रुम्स एसी तर ३ रुम्स नॉनएसी आहेत. याशिवाय खासगी रिसॉर्ट्सही इथे आहेत.

**हे लक्षात ठेवा.**

जंगलात फिरताना गाइड कम्पलसरी घ्यावा लागतो. प्रत्येक गेटमधून ठराविक संख्येने गाड्या सोडल्या जातात. त्यामुळे इथे जाण्यासाठी चंद्रपूरच्या वनविभागाकडून वाहनासाठी आगाऊ परवानगी घ्यावी लागते. जंगलात गेल्यावर गाडीतून उतरण्यास सक्त मनाई असते. जंगलात प्लास्टिक किंवा कोणत्याही प्रकारचा कचरा टाकण्यावर बंदी आहे. शिवाय मंगळवारी दिवसभर पार्क बंद असतं हे ध्यानात ठेवावं.

**पार्कमध्ये जाण्याची वेळ :** सकाळी ५.४५ ते १०.३० आणि संध्याकाळी २.३० ते ६.३०



भारताचा राष्ट्रीय प्राणी असलेल्या वाघांच्या संख्येत भरघोस वाढ झाल्याचं नुकतंच जाहीर झालं. देशातील जंगलांमध्ये सध्या १७०६ वाघ आहेत. देशभरातील सर्व व्याघ्रप्रकल्पात जाऊन वाघ पाहणं आणि जंगलातलं वन्यजीवन अनुभवणं हा एक आगळा अनुभव ठरतो. यंदाच्या सुट्टीमध्ये एखाद्या टायगर सफारीला भेट देण्याचा प्लॅन जरुर करता येईल.




## ताडोबा

'ताँडोबा' हे महाराष्ट्रातील नागपूरजवळील चंद्रपूर जिल्ह्यात वसलेलं आहे. हे नागपूरपासून १५२ कि.मी. अंतरावर असून या अभयारण्यात आजच्या घडीला ६९ वाघ आहेत. या अभयारण्यात मोहर्ली व कोळसा या दोन ठिकाणांहून प्रवेश देण्यात येतो. हे जंगल पानगळीचे व बांबूच्या बेटांनी बनलेलं असल्याने इथे व्याघ्रदर्शन सहजरित्या होते. इथे जीप्समधून फिरण्याची व्यवस्था वनखात्यातर्फे केलेली असल्यामुळे जंगल उत्तमरित्या अनुभवता येतं.

## अशी असते टायगर सफारी

कोणत्याही नॅशनल पार्कची टूर जर प्लॅन करायची म्हटली तर अंदाजे ६ दिवसांच्या पॅकेजसाठी प्रति व्यक्ती सुमारे १२ हजार रुपये खर्च अपेक्षित असतो. यापैकी दोन दिवस जाण्या-येण्यात तर तीन दिवस जंगल फिरायला मिळतात. या तीन दिवसांत जंगलामध्ये साधारणतः ५ राऊण्ड्स मिळतात. जंगलात फिरण्याची वेळ ही सकाळी ५ ते साडेदहा आणि दुपारी अडिच ते संध्याकाळी साडेसहा अशी असते. जंगलात फिरताना वनविभागातर्फे सर्व सोयीसुविधा मिळतात. जिप्सीतून जंगलची राऊण्ड घेणं होतंच. शिवाय हत्तीवरुनही जंगल फिरता येतं. जिप्सीपेक्षा हत्तीवरची राऊण्ड तशी महाग पडते. या राऊण्डसाठी अंदाजे प्रत्येकी १५ ते २० हजार रुपये खर्च येतो. टायगर शो पाहायचा असेल तर हत्तीवरुन जाणं आवश्यक ठरतं. हत्तीवरुन राइडचा फायदा म्हणजे जंगलातल्या अगदी आतल्या भागांमधून आपल्याला फिरवलं जातं. वनखात्यातर्फे होणारा टायगर शो हा सकाळच्या वेळी होतो. एका हत्तीवर ४ माणसं बसवली जातात. सर्व नॅशनल पार्क्समध्ये मूव्ही कॅमेऱ्यासाठी ५०० रुपये आकारले जातात. जंगलात फिरताना शांतता ठेवणं, कचरा न टाकण, दारु न पिणं या गोष्टींची मात्र पुरेपूर काळजी घेतलीच पाहिजे.

# हेवन ऑफ वाइल्डलाइफ



माघ सुरू झाला की पानगळीच्या जंगलातल्या झाडांची पिवळी-तपकिरी पानं गळायला लागतात. फाल्गुन महिन्यात तर जंगल निष्पर्ण झाडांमुळे मोकळं दिसू लागतं. उन्हाळ्यात जंगलात खोलवर असलेल्या ओढ्या-नाल्यातलं पाणी आटायला सुरुवात होते. त्यामुळे प्राणी जंगलातल्या मुख्य पाणवठ्यावर जमा होतात. या पाणवठ्याजवळ आडोशाला तळ



ठोकून बसल्यास सहज प्राण्यांचं निरीक्षण करता येतं. म्हणूनच उन्हाळा हा ऋतू जंगल सफारीसाठी चांगला समजला जातो. यंदाच्या सुट्टीत तुम्ही जंगल सफारीचे बेत आखत असाल तर 'ताडोबा' हा चांगला पर्याय आहे.

ताडोबा हे महाराष्ट्रातलं सगळ्यात जुनं अभयारण्य समजलं जातं. सुमारे पाच दशक जुनं. सव्वासहाशे चौ. कि. मी. व्यासाचा हा परिसर आहे. १९५५ मध्ये 'ताडोबा' अभयारण्य म्हणून घोषित झालं त्यावेळी केवळ ११६ चौ. कि. मी. इतकाच हा परिसर होता. त्यानंतर १९८६ मध्ये नजिकच्या अंधारी नदीकाठचा भागही अभयारण्य म्हणून घोषित झाला. पुढे १९९५ मध्ये ताडोबा, अंधारी नदीचा सगळा परिसर 'टायगर रिझर्व्ह' म्हणून घोषित करण्यात आला. शंभर वर्षांपूर्वी इथं पहिलं रेस्ट हाऊस बांधण्यात आलं होतं. रेस्ट हाऊस बांधल्यानंतर काही वर्षांतच शिकारीवर बंदी घालण्यात आली.

खूप वर्षांपूर्वी हा परिसर सेंट्रल प्रोव्हिन्स या मध्य भारतातल्या चंद्रपूर तालुक्यात मोडत होता. चंद्रपूर म्हणजे त्यावेळच्या 'चांदा' या दख्खन पठाराच्या मध्यभागपासून ते पार बंगालच्या उपसागरापर्यंतचा हजारो मैलांचा पट्टा प्रचंड घनदाट जंगलांनी वेढला होता. चांद्याचा त्यावेळचा कलेक्टर, एफ. सी. हिक्स याने इथल्या परिसराचं वर्णन आपल्या पुस्तकात केलं आहे. तो लिहितो, 'घनदाट जंगलाच्या या परिसरामध्ये कच्चे रस्ते आहेत. बैलगाडी हे प्रवासाचं एकमेव साधन आहे. शिकारीच्या अमर्याद संधी इथे उपलब्ध आहेत. या जंगलात वन्य प्राण्यांच्या प्रचंड जातीजमाती पाहायला मिळतात.'

तुलनेत आज 'ताडोबा'चं जंगल कमी झालं आहे. तरीही वन्य प्राण्यांच्या अनेक जाती आजही इथे



अनु.

पाहायला मिळतात. ताडोबाच्या जंगलात वाघ, बिबटे, अनेक प्रकारची हरणं, कोल्हे, रानकुत्रे, रानडुकरं, अस्वलं, नीलगायी, गवे पाहायला मिळतात. इथे १८१ प्रकारचे पक्षी आणि तेरा प्रकारचे साप पाहायला मिळतात.

जंगलाच्या मध्यभागी एक मोठा तलाव आहे. पाणवठ्याचा भागापाशी गवताची कुरणंही आहेत. जंगलात बऱ्याच ठिकाणी बांबूची दाट बनं आहेत. तलावाच्या एका बाजूला वन्य विभागची रेस्ट हाऊसेस आणि युथ होस्टेलची एक मोठी डॉरमेट्री आहे. मगर प्रजनन केंद्रही आहे. तलावाला भोवती आणि जंगलाच्या अनेक खोलवर भागात जाण्यासाठी कच्चा रस्ता आहे.

चंद्रपूरपासून पंचेचाळीस कि.मी. अंतरावर ताडोबाचं अभयारण्य आहे. मुंबईहून सेवाग्राम किंवा विदर्भ एक्सप्रेसने गेल्यास वर्ध्याला उतरावं लागतं. दोन्ही गाड्या वर्ध्याला सकाळी पोहोचतात. वर्ध्याहून चंद्रपूरला जाण्यासाठी कनेक्टेड गाडी आहे. नागपूरवरून चंद्रपूर दीडशे कि.मी. अंतरावर आहे.


यंदाच्या सुट्टीत तुम्ही ताडोबाला जाण्याची तयारी करत असाल तर काही गोष्टी आवर्जून लक्षात ठेवा. नागपूर आणि लगतच्या परिसरात अतिशय कडक उन्हाळा असतो. त्यामुळे उन्हाळ्याचा त्रास होणाऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी. इथल्या तीन-चार दिवसांच्या मुक्कामात काही गोष्टी ठरवूनच पाळाव्या लागतात. माफक प्रमाणात केवळ शाकाहारी आहार घ्यावा. जंगल्यातल्या मुक्काममध्ये मांसाहारी पदार्थ खाण्याची इच्छा प्रकर्षाने होऊ शकते. ते प्रयत्नपूर्वक टाळायलाच हवे.

वन्यजीवन जवळून पाहायचं असेल तर आपल्यासोबत मोजक्याच लोकांना सोबत घेऊन जा. सफारीला जाणाऱ्यांची संख्या जास्त असल्यास छोटे ग्रुप बनवून वेगवेगळ्या दिशेला जाणं अधिक सोयीस्कर ठरेल. जंगल सफारीमध्ये पोषाखाचं भानही

पाळायला हवं. हिरवट रंगाचा पोषाख असावा. अधिक भडक रंगाचा असू नये. भडक रंग प्राण्यांच्या लगेच डोळ्यात भरतो. अधिक आवाज न करणारे बूट वापरावे. जंगल परिसरात आपली वागणूक अतिशय शिस्तबद्ध असावी. वातावरणाला साजेशी वागणूक असणाऱ्यांना वन्य अधिकारी उत्तम सहकार्य करतात. त्यांना जंगलाच्या आडवाटेवर वन्य प्राणी हमखास दिसणाऱ्या अनेक जागा माहीत असतात. भटकंती दरम्यान किंवा मचाणावर मौन पाळायला हवं. आपण प्राण्यांना बघण्याआधीच त्यांनी आपल्याला शोधलेलं असतं. ती आपल्याला नकळत झुडपामागून बघतही असतात. त्यामुळे जंगलात घुसण्याअगोदर स्थानिक वन्य अधिकाऱ्यांकडून आपल्याला याबाबत माहिती मिळू शकते.

इथेल नियम पाळून वन्यजीवन जवळून बघण्याचा अनुभव अविस्मरणीय असतो.

***टेकड्यांनी वेढलेल्या ताडोबाचा विस्तार सव्वासहाशे किमीचा आहे. यात ताडोबा आणि अंधारी असे दोन मुख्य विभाग आहेत. पांढरापॉनीहून उगम पावणारी अंधारी नदी इथली जीवनदायिनी आहे. ही वैनगंगेची उपनदी आहे. हे महाराष्ट्रातलं पहिलं अभयारण्य आहे. त्या वेळच्या मध्य प्रदेशाच्या सेण्ट्रल फ्रिव्हिन्स विभागातलं हे जंगल वन्यप्राण्यांच्या मोठ्या वावरासाठी प्रसिद्ध होतं.***







अनु.

झाडं-रानं-जंगलं-तलाव यांच्याविषयी प्रत्येकालाच खरीखुरी ओढ असते. यातलं प्राणी-पक्षीजीवन, वेगवेगळ्या ऋतूतले जंगलातल्या रंगांचे... गंधाचे नाना आविष्कार पूर्वीपासूनच माणसाला भुरळ पाडत आले आहेत. आपण नशिबवान आहोत. दूरवर पसरलेल्या सह्याद्री-सातपुडा पर्वतरांगांत असंख्य रानं आजही वैभवानं उभी आहेत.

या विश्वातले हे नाना आविष्कार आपल्या सारख्यांना जर थोड्या अवधीत पाहायचे असतील तर अभयारण्यात न्यायला हवं. पूर्व महाराष्ट्रातल्या चंद्रपूरचं ताडोबा अभयारण्य निसर्गसंपत्तीने समृद्ध आहे. याचं वैशिष्ट्य म्हणजे इथे महाराष्ट्रातलं हे असं अभयारण्य आहे, की सगळ्या प्रकारचे प्राणी बघायला मिळतात. इथला मोठा तलाव जंगलाच्या मध्यभागी असून काठावरच पण थोड्याशा उंचीवर वनविभागाची रेस्ट हाऊसेस आहेत. त्यामुळे कुटुंबासह अशा वेगळ्या ट्रिपला जायला, ही जागा बऱ्यापैकी सोयीस्कर आहे. तलावाच्या काठाकाठाने जरी फेरफटका घेतला, तरी वन्यजीवसृष्टीचं दर्शन होऊ शकतं.

टेकड्यांनी वेढलेल्या ताडोबाचा विस्तार सव्वासहाशे किमीचा आहे. यात ताडोबा आणि अंधारी असे दोन मुख्य विभाग आहेत. पांढरापॉनीहून उगम पावणारी अंधारी नदी इथली जीवनदायिनी आहे. ही वैनगंगेची उपनदी आहे. हे महाराष्ट्रातलं पहिलं अभयारण्य आहे. त्या वेळच्या मध्य प्रदेशाच्या सेण्ट्रल फ्रेव्हिन्स विभागातलं हे जंगल वन्यप्राण्यांच्या मोठ्या वावरासाठी प्रसिद्ध होतं. त्यामुळे हा भाग शिकारीसाठी प्रसिद्ध होता. इथे वन्यप्राण्यांच्या क्षणाचा शिस्तशीर प्रयत्न १८७३ मध्ये सुरू झाला. १९०५मध्ये मोठ्या वन्यप्राण्यांच्या शिकासाठी बंदी घालण्यात आली. १९३५ मध्ये इथे कुठल्याही शिकारीला प्रतिबंध करण्यात आला. १९५५ मध्ये ताडोबा अभयारण्य अस्तित्वात आले व १९५६ मध्ये ते महाराष्ट्राला देण्यात आले. १९८६ मध्ये ५०५ चौ. किमी व अंधेरीचा भाग याला जोडण्यात आला. १९९३ मध्ये ताडोबा रामगर प्रोजेक्ट म्हणून घोषित झाले. या जंगलातलं पहिलं रेस्टहाऊस १९०७ मध्ये बांधण्यात आलं.


ताडोबाच्या जंगलात उंच भाग खूप असल्याने मधला खबदाडींतून प्राण्यांना नैसर्गिक सुरक्षितता आहे. जंगलाला मैदानी प्रदेशही खूप आहे. त्यामुळेच बहुधा इथे जवळजवळ सगळ्या प्रकारचे प्राणी राहतात. त्यात जंगलाच्या मध्यभागी असलेला मोठा तलाव उन्हाळातही त्यांची पाण्याची गरज उत्तमपणे भागवतो. या शुष्क पानगळीच्या जंगलात बांबूची बेटं, ऐन, धावडा, मोह, तेंदू, खैर, करू, बेल, साग, अर्जुन, जांभूळ अशी अनेक प्रकारची झाडं आहेत. या जंगलाच्या आश्रयाला वाघ, बिबळ्या, अस्वल, रानकुत्रे, रानडुकरं, हरणं या वन्यप्राण्यांबरोबरच १८१ प्रकारचे पक्षीही राहतात. कोब्रा, अजगर, घोणस असे तेरा प्रकारचे साप या रानात आहेत. त्याचबरोबर इथली किटकसृष्टी चांगलीच समृद्ध आहे. असं असलं तरी इथली मुख्य आकर्षणं म्हणजे गवा, मगर आणि करड्या डोक्याचा मच्छिमार गरूड.

नागपूर चंद्रपूर अंतर आहे दिडशे किमी चंद्रपूरहून ताडोबा आहे ४५ किमी तसं वर्ध्याला उतरून चंद्रपूरला रेल्वेने जाणं जास्त सोयीस्कर आहे. वनखात्याच्या विश्रामगृहाचे आरक्षण चंद्रपूरला होतं. (टेलिफोन नं. (०७१७५-२५१४१४) ताडोबाला एमटीडीसीची पर्यटकगृहंही आहेत. तलावापासून हे ठिकाण पाच किमीवर असून कॅण्टीनची सोय आहे.

ताडोबाला जायला उत्तम काळ म्हणजे नोव्हेंबर ते फेब्रुवारी या दिवसात तापमान साधारण २५-३० डिग्री एवढं असतं. खरं वन्यजीवन बघायचं आणि फोटोग्राफी करायची असेल तर उन्हाळ्यात जायला हवं. मात्र उन्हाळ्यात दिवसाचं तापमान ४७ डीग्रीपर्यंत जातं. पण या दिवसात सगळं प्राणीजीवन तलावाभोवती एकवटतं. जर चार-पाच दिवस मुक्काम केला तर खूप काही बघता येईल.

# गोंदिया जिल्हा
# गोंदिया

| | | | | | | मध्यवर्ती ठिकाण ते स्थळ – निसर्ग | दिशा | पूर्वीच्या स्थळापासून अंतर किमी | दिशा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई ते गोंदिया | | | | | 981 | | | | |
| **1** | नागझिरा | अभयारण्य | | | | 51 | SW | | | |






अनु.





भंडारा जिल्ह्यातलं हे जंगल म्हणजे नंदनवन आहे. हत्तीला संस्कृतमध्ये नाग म्हणतात. पूर्वी म्हणे इथे हत्तींचा खूप वावर होता. त्यावरूनच याला नाव पडलं नागझिरा. जंगली जनावरांचा थरार अनुभवायचा असेल, तर इथे जायलाच हवं.

# नंदनवन!

नागझिरा अभयारण्य असं नाव ऐकायला विचित्र वाटतं ना? पण वन्यप्रेमींसाठी हे अभयारण्य म्हणजे नंदनवन आहे. वाघांपासून, वैविध्यपूर्ण पक्षी आणि कीटकांपर्यंतचे वन्यजीवन इथे अनुभवायला मिळतं. संस्कृतमध्ये हत्तीला नाग असं नाव आहे. फार पूर्वी या भागात हत्ती वास्तव्यास होते, त्यामुळे बहुधा अभयारण्याला हे नाव प्रचलित झालं असावं.

भंडारा वन विभागातील हे अभयरण्य म्हणजे अगदी स्वप्नातलं जंगलच वाटतं. घनदाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, गूढ शांततेत अचानक ऐकायला येणारी पक्ष्यांची शीळ, पाणवठ्यांवरील नैसर्गिक सौंदर्य आणि इथे वास्तव्यास असलेले वन्यजीव पाहण्याचा थरार अवर्णनीय आहे.

ताडोबाला अभयारण्याला अनेक पर्यटक भेट देतात पण नागझिऱ्याला भेट देणाऱ्यांची संख्या कमी असल्याने जंगलातील शांतता आजही कायम आहे. चांदण्या रात्रीत पाणवठ्यावर बसण्याचा अनुभव आणि सूर्योदयाच्या वेळी पक्ष्यांची मधुर शीळ ऐकण्याची मजा औरच असते. या अभयारण्यात वाघ, बिबट्या, गवे, अस्वल, रानकुत्री, निलगाय, सांबर, हरणे यांसह ३४ प्रकारचे प्राणी तर सर्प गरुड, स्वर्गीय नर्तक, शाटिक यांसह १७० प्रकारचे पक्षी आणि ३६ प्रकारचे सरपटणारे प्राणी वास्तव्यास आहेत.

**कुठे आहे अभयारण्य?**

विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात १५२ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात नागझिरा पसरलेलं आहे. वैनगंगा नदीने इथल्या नैसर्गिक विविधतेत भर घातली आहे. नागझिऱ्यातून फिरताना छोट्या-मोठ्या पर्वतरांगा व विस्तीर्ण पसरलेली तळी पाहायला मिळतात. उंच टेकड्यांवरील गर्द हिरवाईमध्ये फिरताना निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर पसरलेल्या उंच टेकड्या व हिरव्याकंच वनराईत आढळणारी नैसर्गिक तळी मनास सुखावतात. नागझिरा परिसरातील नागेदवपाडा, कोसमतोंडी, चोखरमारा, अंधारबन ही ठिकाणं आवर्जून बघितली पाहिजेत. निसर्ग अभ्यासक मारुती चित्तमपल्ली यांनी या जंगलातील वनसंपदा आणि वन्यजीवन अतिशय जवळून पाहिलं असून यावर विपुल लिखाणही केलं आहे.



अनु.

**कसं जायचं?**

विमान प्रवास असेल तर नागपूरला उतरुन साकोली या २२ कि.मी. अंतरावर गावाला जावं लागतं. तर, रेल्वेने गेल्यास गोंदिया स्टेशनवर उतरावे लागतं. तिथून अभयारण्य ४५ कि.मी. दूर आहे. अभयारण्याला भेट देण्याचा उत्तम सीझन म्हणजे एप्रिल आणि मे. पण ऑक्टोबर ते मे या कालावधीतही आपण जाऊ शकतो. हे अभयारण्य भटकंतीसाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत खुलं असतं.

**राहायची सोय ?**

नागझिऱ्यास भेट द्यायची असल्यास तेथील उप-वनसंरक्षकास संपर्क साधून आवश्यक माहिती घ्यावी लागते. अभयारण्याच्या बाहेर खासगी विश्रामगृहे असून तेथे जेवणाचीही उत्तम व्यवस्था होते. याशिवाय अभयारण्यामध्ये दिवसभर मधुकुंज, लताकुंज ही विश्रामगृहेही आपल्या सेवेत आहेत. पण शासकीय विश्रामगृहांचे बुकिंग मिळणे अवघड असते. नागझिऱ्यात फिरून झाल्यानंतर जवळच असलेल्या नवेगाव राष्ट्रीय उद्यानासही भेट देता येऊ शकते.